
विजय

धास्तावलेले मुसलमान

दादूमिया



धास्तावलेले मुसलमान

धास्तावलेले मुसलमान

दादूमिया

विजय प्रकाशन

धास्तावलेले
मुसलमान

धास्तावलेले मुसलमान / दादूमिया
Dhastavalele Musalman / Dadoomiya

प्रकाशक
सचिन जगदीश उपाध्याय
विजय प्रकाशन
हनुमान गल्ली, सीताबर्डी,
नागपूर ४४००१२
☎ : (०७१२) २५३०५३९
E-mail : vijayprakashan@gmail.com
Website : www.vijayprakashan.com

मुद्रणस्थळ
रवीन्द्र आर्ट्स
नागपूर ४४००१२

मुखपृष्ठ
संतुक गोलेगावकर

प्रथमावृत्ती
१ जानेवारी २०१८

किंमत ४०० ₹

ISBN 978-93-87042-29-2

हा ग्रंथ माझी स्नुषा
डॉ. सौ. सुचित्रा हीला अर्पण.
तीच्या उपचारामुळे मी लौकर बरा झालो व
हा ग्रंथ पूर्ण करू शकलो.

मनोगत

स्थळ : महाराजा सयाजीराव विश्वविद्यालयाची *लीडरशिप अँड गव्हर्नन्स ट्रेनिंग* ची *फॅकल्टी*. वेळ : सकाळचे १० वाजले होते. प्रसंग : *'भेदनीती'*वरील माझ्या भाषणाचा. मी विद्यार्थ्यांना रामायण-महाभारत काळापासून ते मोदींपर्यंत भेदनीतीचा का व कसा अवलंब करावा लागला व ते सारे कसे क्षम्य होते वा आहे ते निरनिराळी उदाहरणे देऊन समजावीत होतो. लगेच मुले म्हणाली, ''सर, हा तर अधर्म आहे.'' मी त्यांना समजावले, ''नाही, यास *राजधर्म* म्हणतात.'' मुले माझ्याकडे तोंड वासून बघत होती. मी पुन्हा म्हणालो, ''होय, मुलांनो, यास *राजधर्म* म्हणतात.''

प्रत्येक व्यवसायाची काही वैशिष्ट्ये असतात, 'खासियती' असतात, काही चांगल्या, काही वाईट. डॉक्टरांना *'प्लॅसिबो'* वापरावे लागते कारण त्यांना रोग्यांना बरे करायचे असते. सिव्हील इंजिनियरींग व्यवसाय सर्वात उत्तम, कारण तुम्ही किती विटा वापरल्या वा भिंतीवर सिमेंटचे किती मिलीमिटर्सचे प्लास्टर केले, हे या जन्मात तुमचे गिऱ्हाईक त्याचे मोजमाप करणार नाही, त्याला तुमच्यावर विश्वास ठेवावाच लागतो. धान्याच्या व्यापारात तांदुळात खडे - हल्ली चिनी प्लास्टीकचे तांदूळ - मिसळलेले असणार हे माहीत असून तुम्ही त्याला पुरा भाव देणारच, तुम्हाला खड्यांचे म्हणून २-३ टक्के कापून घेता येणार नाही. गाडी सर्व्हिसिंगला दिली की गराजवाला बाकीच्या केलेल्या व न केलेल्या गोष्टीचे मिळून ४-५ हजार रुपयांचे बिल तुमच्या हाती ठेवणार. त्याचप्रमाणे निवडणुकांच्या मोसमात इच्छुक उमेदवार व त्याचा पक्ष तुम्ही सुशिक्षित व सभ्य म्हणून काय वाटेल ती आश्वासने

देऊन व इतर अडाण्यांना लांचलुचपत देऊन तुमचे वा त्यांचे मत मिळविणारच. त्यास राजकारण म्हणतात. तेथे आभासाला महत्त्व आहे. सत्याला नाही. अश्वत्थामा लहान होता तेव्हा त्याची आई त्याला पिठात पाणी मिसळून दूध म्हणून देई, तसला प्रकार. मोदींचा २०१४ मधला सत्ताग्रहणाचा थाट आठवा. जणू एखाद्या सार्वभौम सम्राटाच्या राज्यारोहणाचा प्रसंग. अगदी शेजारी नवाझ शरीफ यांनादेखील हजर राहवला मोदींनी भाग पाडले. सारा आभास होता तो. पण इथले लोक खुश झाले.

हे सारे परिस्थितीजन्य असते. त्यामुळे कांही गोष्टी वा घटना किती चांगल्या वा किती वाईट, हे त्या त्या वेळी नेमके सांगणे कठीण असते. कारण, भविष्यात आणखी काही सत्य घटना बाहेर येतात व सारे चित्र बदलते. मुशर्रफला एकाच वेळी अमेरिका, आर्मी व अल्लाला खुश करण्याची तारेची कसरत करणे भाग होते. त्यामुळे न्यूक्लिअर बॉंबचे गुपित 'चुकून' फुटले व ते लिबियाकडे गेले आणि, त्यासाठी ए. क्यू. खान जबाबदार आहे, असे नाटक करावे लागले, सारा दोष खान या शास्त्रज्ञाच्या हलगर्जीपणामुळे झाला, असे अमेरिकेस दाखवावे लागले. मुशर्रफ त्या जागेवरून हटल्यावर कळले, खान निर्दोष आहे. म्हणून सारे राजकारण या तीन शब्दांवर चालते. ते तीन शब्द म्हणजे, *स्थल, काल* व *परिस्थिती*. हे तीन शब्द नीट समजले तर राजकारणात नैराश्य म्हणून कधी येत नाही, अपयश आले तरी खिन्नता मनास कधी शिवत नाही.

अन्यायामुळे रामास रावणाला व भीमास कीचकाला ठार मारावे लागले. अन्यायामुळे सूडाची भावना मनात जागृत होते व माणूस लढण्यास प्रवृत्त होतो. ही झाली वैयक्तिक अन्यायाची उदाहरणे. समूहावर वा गटावर वा देशावर अन्याय झाला की लोक पेटून उठतात व लढतात. त्यास क्रांती म्हणतात. १७८३ साली ब्रिटनच्या राजाने अन्याय केल्यामुळे अमेरिकन क्रांती घडली. ६ वर्षानंतर, म्हणजे १७८९ साली १६व्या लुई या फ्रेंच राजाने प्रजेवर अन्याय केला म्हणून फ्रेंच क्रांती झाली. १९ व्या शतकात स्पॅनिश (१८२०) व पहिली भारतीय (१८५७) क्रांती अनुक्रमे स्पॅनिश, पोर्तुगाल, रशिया व ईटालीच्या राजांच्या आणि कंपनी सरकारच्या छळातून मुक्त होण्यासाठी ह्या क्रांत्या घडल्या. २०व्या शतकात बोल्शेविक (१९१७) व दुसरी भारतीय (१९४२) क्रांती झाली व २१व्या शतकात दुसरी रशियन व अरब क्रांती झाली.

भारतात लोदी घराण्याचे राज्य होते त्या काळांत युरोपात तमोयुग संपून आधुनिकतेची सुरवात झाली. त्यास *रीनेसान्स* काळ म्हणतात. लोक विचार करू *(एज ऑफ रीझन)* लागले होते, प्रश्न विचारू लागले होते, ते हळू हळू जागृत होत

होते. त्या विचारयुगानंतर विज्ञानाने धर्माची जागा घ्यायची सुरवात केली. तेवढ्यात छापखान्याचा शोध लागला व वर्तमानपत्रे निघू लागल्यामुळे विचारांचे आदानप्रदान सुरू झाले व धर्मही अन्याय करू शकतो याविषयी युरोपियनांची खात्री पटू लागली. विज्ञान युगामुळे *औद्योगिक युग* (इंडस्ट्रिअल एज) अवतरले. हे होत असताना युरोपियन खलाशांना अज्ञात बेटे व देश ज्ञात झाले व या देशांनी आपापल्या वसाहती स्थापन केल्या. या सर्वांचा पाया विचारशक्ती *(रीझन)* होती, हे आपण कधीच विसरता कामा नये.

दुर्दैवाने भारतात मुसलमानी राज्य आले व भारताची चार वर्णांची आश्रम व्यवस्था लोप पावून एकच वर्ण देशात उरला. त्याचे नाव शूद्र वर्ण. ब्राह्मणाने इतर वर्णांना शिक्षण देऊन समाज जागृत ठेवण्याचे काम सोडले. क्षत्रियाने शत्रूशी लढून त्यास पराभूत करून देश स्वतंत्र व सार्वभौम ठेवण्याचे काम सोडले. व्यापाऱ्याने व्यापार करता करता दानधर्म करून ब्रह्म व क्षात्र वृत्ती जागृत ठेवण्याचे काम सोडले. सारा समाज मुसलमानांचा गुलाम झाला. जो तो नावापुरता ब्राह्मण वा क्षत्रिय वा वैश्य होता. आपले काही चुकते आहे याचाच समाजाला विसर पडला होता. त्याचे स्मरण करून देणारा पहिला पहिला संत म्हणजे समर्थ रामदास व पहिला खराखुरा क्षत्रिय म्हणजे शिवाजी. बाकीचा सारा गुलाम समाज कसा होता त्याचे त्रयस्थाकडून वर्णन वाचा :

''इंग्रजांनी जे पहिले शिपाई नेमले ते मुसलमान व हिंदू दोन्हीही धर्मांचे असून हिंदूपैकी उच्च वर्णांचे होते. यात बहुतेक राजपूत होते. त्यांचे दोन गुण होते. एक, आपल्या हितास वास्तविक किंवा काल्पनिक धक्का लावणारांसबंधी तिटकारा आणि आपल्या सेनानीसंबंधी एकनिष्ठा.... बंगालमधील देशी सैन्यात मुसलमानांच्या तीनचतुर्थांश इतके हिंदू आहेत. त्यांच्यापैकी बहुतेक राजपूत आहेत. राजपूत हा जन्मजात लढवय्या आहे. त्याची आई त्याला युद्धाखेरीज दुसऱ्या कोणाच्याच कथा सांगत नाही आणि मनुष्याच्या भावी आयुष्यातील प्रत्येक भावनेवर व कृतीवर बालपणी त्याच्या मनावर जे संस्कार होतात त्यांचीच छाप बसत असते. या वर्गातील लोक सामान्यतः शेती करतात, पण शेत नांगरीत असतानाही त्यांची ढाल व तलवार त्यांच्या नांगरठीजवळ ठेवण्यात येते व नांगराबरोबर तो चालू लागला म्हणजे त्याच्याबरोबर ती नेण्यात येते. *(जॉन माल्कम, नोटस् ऑन गव्हर्मेंट ऑफ इंडिया, ॲपेंडिक्स ई, पृ. २४७-४८)* इतर प्रांत बंगालपेक्षा वेगळे नव्हते. राजपूतांना ब्राह्मणांचे मार्गदर्शन नसल्याने राजपुतांना मुसलमान बादशहास कन्या वा बहीण अर्पण करण्यात लाज वा शरम वाटत नसे व आपल्या यवन जावयाचे वा

मेव्हण्याच्या साम्राज्याचे रक्षण करणे हे धर्मकर्तव्य वाटे. तीच वृत्ती वैश्यांची. गुप्ता नावाच्या मारवाडी पेढीवाल्यांनी ब्रिटीश राज्यसंस्थापनेस चोरवाटा दाखवून व आर्थिक मदत करून ब्रिटीशांची सत्ता बळकट केली व त्यांच्याकडून अनेक सर्टीफिकिटे मिळविली. त्यात प्रत्येक वेळी ''आम्ही तुमच्या धर्मांत हात घालणार नाही आणि तुमची देवळे रक्षण करू,'' असे आश्वासन दिलेले आढळते. (स्वातंत्र्यपूर्व काळात वर्ध्यास बजाजांनी व दिल्ली आणि कलकत्ता येथे बिर्लांनी गांधीजींची राहण्याखाण्याची बडदास्त ठेवली. गांधीजी बिर्ला हाऊसमध्येच मरण पावले. या मारवाड्यांनी खर्च केलेले पैसे दामदुप्पट स्वातंत्र्योत्तर काळात कसे वसूल केले ते प्रत्येक भारतीयाने पाहिलेले आहे.)

ज्या देशातला विचारवंत भ्रष्ट झाला तो देश बुडाला ही जाणीव प्रथम बंगाल व महाराष्ट्र येथील ब्राह्मणांत झाली. गोपाळ हरी देशमुख (लोकहितवादी) यांनी १८४९ मध्ये एका 'शतपत्रा'त लिहले, ''ब्राह्मण लोक हे आपले घरी आले म्हणजे सोवळे करतात व यवनाचा विटाळ झाला म्हणून म्हणतात. तथापि, त्यास राज्य करावयास त्यांनी हरकत केली नाही व कितीएक लोक मुसलमानांवर इतके फिदा झाले, की राज्य करणे व शूरत्व गाजविणे हे काम मुसलमानांचे होय, इतरांस यावयाचे नाही, असे म्हणू लागले. परंतु ह्या मूर्खांस हे समजत नाही, की ८०० वर्षांपूर्वी हिंदू राजे जाहलेले पांडव, राम, परशुराम हे मुसलमान होते की काय?... परंतु ही गोष्ट विसरले आणि सोवळे घरात आणले. देश सोवळा राखावयास विसरले आणि जो तो आपला स्वार्थ पाहू लागला. अशा अवस्थेत असता मुसल्मानांनी राज्य घेतले.''

थोडक्यांत, सारे गुलाम बनले होते. कोई बडे गुलाम अली, कोई छोटे गुलाम अली, लेकिन थे सब गुलामही गुलाम. गुलामाला नंतर नंतर पारतंत्र्याची इतकी सवय होते की तेच त्याला प्रिय वाटू लागते. इंग्रज हे आमच्या रानडे-गोखल्यांसारख्या नरमपंथीयांना ''दैवी राज्य'' *(डिव्हाईन डिस्पेंसेशन)* वाटू लागले होते. लोकहितवादींनी त्यावेळी लिहिले, ''आमच्या लोकांच्या रीती अगदी बदलल्याशिवाय या देशाचे हित होणार नाही व या लोकास स्वतः राज्य चालविण्याचे सामर्थ्य असल्याशिवाय इंग्रज लोक या देशातून गेले तरी उपयोग होणार नाही. पुन्हा गर्दी होईल व बेबंदी, अंदाधुंदी, भालेराई, होळकरी गर्दी व पेंढारी अशा गोष्टी पुनरपि होतील आणि कोणाचा जीव व घरदारही निर्भय राहणार नाही. जो जबरदस्त त्याचे हाती जाईल व जो निर्बल असेल तो उपाशी मरेल. त्याचे सर्व हरण होईल. यास्तव सूज्ञांनी इंग्रज जाण्याची इच्छा कदापि करू नये.'' *(शतपत्रे, पत्र नं ८९,*

२० जानेवारी १८५०) गुजराथेत नानालाल कवींच्या दौलतराम या वडिलांनी इंग्रजांची अशीच भलामण पुढील काव्यपंक्तीत केली;

वेर गया झेर गया, गया कारा केर करनारा ।
ए उपकार गणी ईश्वरनो हरख हवे तू हिंदुस्थान ।।

कलकत्यातील राजा राम मोहन रॉय सत्तेच्या जवळ असल्यामुळे ते व त्यांचे सहकारी बालविवाह, सती प्रथा वगैरे अनिष्ठ प्रकारांना आळा घालू शकले.

वाङ्मय हा तत्कालीन सामाजिक व राजकीय घटनांचा आरसा असतो. युरोपात विचार युगानंतर *रीनेसान्स* सुरू झाले, विज्ञानाचा पगडा वाढू लागला, धर्माचे प्रभुत्व लोप पावू लागले, औद्योगिक युग सुरू झाले, त्यातून वसाहतवाद जन्मला. वसाहतवादातून पहिले व पहिल्यातून दुसरे महायुद्ध जन्मले. या दोन युद्धातला काळही तेवढाच महत्त्वाचा आहे. पहिल्या महायुद्धानंतर ३ वर्षांनी लेनिन वारला व स्टालीन आला, पुढील वर्षी हिटलरने *मे कांफ* (१९२५) आणि पुढील दशकभर मंदीची झळ. या काळात स्पेन, इटली व जर्मनी येथे फॅसिझमचा प्रभाव होता. हिटलरचे तुष्टीकरण करून झाले, ते फसले, म्हणून *अलाईज* व *ॲक्सिस* राष्ट्रे यांची झुंज सुरू झाली. १९४१ सालच्या डिसेंबरात जपानने पर्ल हार्बरचा नाश केला, अमेरिका युद्धात उतरली, जपान-भारत युती झाली, पण १९४५ सालच्या अमेरिकेच्या ॲटम बॉंब प्रयोगामुळे जपानने शरणागती पत्करली. तिकडे पश्चिमेस हिटलरने आत्महत्या केली होती. अशा रीतीने गरम युद्ध संपले व शीत युद्ध सुरू झाले.

या सर्व अपूर्व घटनांचा प्रत्यक्ष अनुभव पाश्चात्त्यांना लाभला व त्यामुळे त्यांचे साहित्य अनुभवांनी रसरसलेले व समृद्ध झाले. भारताला या घटनांची अप्रत्यक्ष झळ सहन करावी लागली. भारतीय सैनिक लढले. भारतीय व्यापाऱ्यांना मंदीचा त्रास झाला व भारतीय जनतेस महागाई भोवली. पण आपल्या लेखकांना वा साहित्यिकांना प्रत्यक्ष युद्धावर जावे लागले नाही व त्याचा अनुभव लाभला नाही. त्यामुळे पाश्चात्त्य वाङ्मयाप्रमाणे आपले साहित्य धष्टपुष्ट घडू शकले नाही. क्रांतिकारकांच्या घटना तेवढ्याच तेजस्वी व स्फूर्तिदायक होत्या, पण दोन कारणांस्तव त्या तशा विविधअंगी उभारून आल्या नाहीत. इंग्रजांना असे साहित्य आवडणार नाही, त्यावर बंदी येईल ही सर्वसामान्यांच्या मनात असलेली भीती व गांधीजींची दुर्बल सत्याग्रहातून सबलांवर मात करतील *(मीक शॅल रूल द वर्ल्ड)* ही ख्रिस्ताची शिकवण, कारण, *अहिंसा परमो धर्मः ।* हा इंग्रजांचा पाठिंबा लाभलेला व त्यांना फायदेशीर ठरलेला नव मंत्र.

या *पोस्ट-कोलोनियल* कालखंडात गुलामी मानसामुळे इंग्रजीची सद्दी चालूच राहिली. इंग्रजी साहित्याला सलमान रश्दी, अमी चौधरी, अमिताव घोष, अनिता देसाई, हनीफ कुरेशी, रोहिंटन मिस्त्री, मीना अलेक्झांडर, अरुंधती रॉय, किरण देसाई वगैरे देशी लेखकांनी समृद्ध बनविले. गुलामी वृत्तीतून इंग्रजीचे श्रेष्ठत्व गृहीत धरल्यामुळे ना. सी. फडक्यांसकट सर्व देशी लेखकांनी धडाधड भाषांतरे केली व १००-१०० कादंबऱ्यांची *फॅक्टरी* काढली. विदेशींच्या मानाने आपल्याकडे स्वतःचे म्हणता येईल असे आपले साहित्य फार कमी प्रसिद्ध झाले. 'सोबत'मध्ये तर एक संपूर्ण पान 'आपल्या मराठी नाटकांचे मूळ कोणच्या इंग्रजी नाटकात सापडते,' यावरील माधव मनोहरांच्या खमंग लेखासाठी राखीव ठेवलेले असे. अपवाद इतिहासावरील साहित्याचे - राजवाड्यांपासून निनाद बेडेकरांपर्यंत. अपवादास अपवाद म्हणजे सध्या सुरू असलेल्या जातीय 'संभाजी ब्रिगेड'च्या कारखान्यातला 'रामदास हे औरंगझेबाचे हेर होते' असल्या पुचाट पुस्तिकांचा. प्रचलित राखीव जातींच्या राजकारणात त्यांचा मिसाईल्सप्रमाणे *वेपन्स ऑफ मास डिस्ट्रक्शन* म्हणून उपयोग केला जातो.

मराठीतील ''मुसलमानांवरील'' व ''मुसलमानांकडून'' लिहिले गेलेल्या साहित्याविषयी हेच म्हणता येईल. मराठी मुसलमान शिक्षणाचे प्रमाण एकंदर कमी असल्यामुळे मराठीतील नामवंत मराठी लेखकांच्या यादीत मुसलमानी नावे एकंदरीत कमीच. पूर्वी विविधवृत्तात आलमगीर व माणूस-सोबतमध्ये दादूमिया व टोपणनावांनी लिहिणाऱ्या इतर हिंदू लेखकांचा अपवाद सोडा. समाजवाद्यांनी मुसलमान लेखकांना प्रोत्साहन देण्याचे खूप प्रयत्न करूनदेखील त्यांना फारसे यश पदरात पडले नाही. कम्युनिस्टात जोषांत बोलणारे मुसलमान वक्ते झाले, मुसलमान लेखक नाहीत. हिंदी व गुजराथी भाषेत त्या मानाने मुसलमान लेखक जास्त आहेत. याचे कारण, अर्ध्या गुजराथेत - बडोदे संस्थानात - शिक्षण आवश्यक व मोफत होते. आणि गांधीजींचा गुजराथवरील एकंदर प्रभाव. बंगालप्रमाणे गुजराथला शिवाजी नाही. त्यामुळे कळत नकळत मुसलमानी भाषा, मुसलमानी संस्कृती, मुसलमानी परंपरा व मुसलमानी वास्तू यांची जपणूक व संवर्धन यांचा आपोआप वरचष्मा राहिला. उत्तर प्रदेशात उर्दूचा प्रभाव कटाक्षाने सुरवातीस टाळला गेला व हिंदीस - हिंदुस्थानीस नाही - राजाश्रय दिला गेला. उर्दूचे महत्त्व समाजवादी यादवांनी मुस्लीम तुष्टीकरणासाठी वाढविले.

मी बडोद्याचा, बटनगरीचा, म्हणजे गुजराथचा. महाराष्ट्रातले हिंदुत्ववादी आणि सेक्युलर लेखक मुसलमानांवर एकांगी लेखन करतात असे मला वारंवार

खटकू लागले. त्यांनी इस्लामी इतिहास वाचला नसावा, त्यांचे मुसलमान मित्र नसावेत किंवा त्यांना इस्लामी संस्कृतीशी परिचय व्हायची संधी मिळाली नसावी, असे मला वाटू लागले. त्यामुळे त्यांचे मुसलमानांवरील लेखन वरपांगी व उथळ वाटे. त्यांचे मुसलमानांवरील प्रेम वा द्वेष अनुभवांपेक्षा ऐकीव माहितीवर आधारलेला वाटे. गुजराथेत राहिल्यामुळे इतर मराठी लेखकांपेक्षा मुसलमानी संस्कृतीशी माझा जास्त परिचय आला. वास्तव्य मुसलमानी वस्तीत. त्यामुळे लहानपणापासून घरात मुसलमानांचे आवजाव असायचे. खेळायला सवंगडीही मुसलमान. त्यामुळे मुसलमानांची ''खरी ताकद'' लहानपणापासून समजली. पुढे मेडिकल प्रॅक्टीस सुरू केली. तेथेही ६०-७० टक्के पेशंटस् 'आपनेवाले.' अशील वकीलासमोर व रोगी डॉक्टरांसमोर आडवा झाला की सारे सत्य बोलू लागतो.

रोग व स्टीम रोलर यांच्यात एक साम्य आहे, दोघे समोरच्यास सपाट बनवितात. या दर्दीच्या कथा ऐकताना सतत जाणवू लागले की बाहेर शूर सरदाराचा आव आणणाऱ्या ह्या वीरांच्या मनांत कसली तरी व्यथा आहे, वेदना आहे. मग कळले की ते सारे द्विधा मन:स्थितीत जगत आहेत, त्यांचे द्विधा व्यक्तिमत्त्व *(स्प्लिट पर्सनॅलिटी)* आहे. त्यांची दादागिरी, अरेरावी खरी नाही, ते नुसता आव आणतात, ते केवळ नाटक आहे. मनात खोलवर कोठेतरी दडलेली भेदरलेली कोंबडी वसते आहे. संस्कृतीच्या शीडीवर हिंदू बरेच वर आहेत, मुसलमान अजून बरेच खालच्या पायऱ्यांवर आहेत, त्यांना अजून बरेच शिक्षण द्यावे लागेल, दुर्दैवाने त्यांना हे शिक्षण त्यांच्या मुल्लांमुळे मिळू शकत नाही, त्यासाठी त्या मुल्ला मौलवींचे ''राष्ट्रीयीकरण'' करावे लागेल, त्यांचे नॅशनल बोर्ड बनवावे लागेल, त्यांच्या त्यासाठी राष्ट्रीय पातळीवर परीक्षा घ्याव्या लागतील, वगैरे विचार मी पंतप्रधानांपर्यंत पोचविले. त्यांचे म्हणणे, जोपर्यंत पाकिस्थान शेजारी राष्ट्र आहे तोपर्यंत 'तुझे विचार केवळ स्वप्नेच राहतील.' माझ्या हिंदुत्ववादी मित्रांना मुसलमानांनी दुय्यम दर्जाचे नागरिक म्हणून येथे रहावे, असे वाटे. ज्यांना पहिल्या दर्जाची वागणूक पाहिजे त्यांनी पाकिस्थानात जावे, असे ते म्हणत. मागे गांधीजींनी *'अ हिंदू इज ए कॉवर्ड, एक मुस्लीम ए बुली'*, असे म्हणून ठेवले होते, त्याने ते सारे प्रभावित झाले आहेत असे मला वाटू लागले. ते असे कां?, याचा माझे मन शोध घेऊ लागले. डॉक्टर असल्यामुळे मनाची शास्त्रीय बैठक होती : पुराव्याशिवाय कशावर विश्वास म्हणून ठेवायचा नाही. 'बाप दाखव, नाही तर श्राद्ध कर.' म्हणून पुरावा गोळा करण्याची सवय लागली. पुरावे मिळत गेले. ते मी भरपूरपणे मराठी वाचकांसमोर ठेवीत गेलो.

सुरवात महंमदसाहेबांपासून केली. बाप रे, किती असुरक्षित पण नाट्यमय

जीवन! मक्केच्या कुरेशींना महंमदसाहेबांचा नवा धर्म पसंत नव्हता! जुन्या धर्मात मक्का हे तीर्थस्थान होते. नव्या धर्मामुळे आपले उत्पन्न बुडेल अशी त्यांना भीती वाटत होती. अबु तालीब हा खुद्द काकाच त्यांच्या प्राणांवर टपलेला. त्यांच्या जन्माच्या आधी चार महिने पिताश्री अबदुल्ला वारले तर मातोश्री अमीना ते सहा वर्षांचे असताना मरण पावल्या. त्यांचा सांभाळ हलिमा या बेदाऊनी स्त्रीने व आजोबा अब्द अल मुतालिब यांनी केला. सारे अरबी वातावरण त्यावेळी असुरक्षित होते. वयाने १५ वर्षे मोठ्या असलेल्या खदिजांशी त्यांचे १६व्या वर्षी लग्न लागले. त्यांना व्यापारासाठी भरपूर प्रवास करावा लागे. ''आपल्याला दैवी संदेश येतात,'' असे त्यांनी खदिजांना सांगितले. त्यावेळी त्यांचे वय होते चाळीस. खदिजा ही जगातील पहिली संस्कारित मुसलमान, (जमई) अली हा दुसरा व अबु बकर हा तिसरा. आणखी थोडेसे होते पण त्यांना एवढे असुरक्षित वाटले की ते अबिसिनियात पळून गेले! ४६व्या वर्षी आपण प्रेषित आहोत, असे त्यांनी जाहीर केले व असुरक्षितता आणखीनच वाढली. सारे मक्केचे प्रजाजन विरुद्ध गेले, इतके की ५०व्या वर्षी त्यांना यात्रिब येथे (मदीनेस) हिझरत करावी लागली. तेथे हिमतीने सैन्य जमविले, बळ वाढविले, राज्य स्थापले, मगच मक्केवर स्वारी केली व साऱ्यांना मुसलमान करून सोडले. सारे जीवन संघर्षमय व अशांत. पण शिवाजीप्रमाणे स्वबळावर प्रतिकूल असणाऱ्यांना त्यांनी सरळ केले. आणि पहिल्या बाजीरावाप्रमाणे त्या एकमेकांत सतत भांडणाऱ्या व एकमेकांचा प्राण घेणाऱ्या अरबांना दिशादर्शन केले. मराठ्यांप्रमाणे त्यांच्या भारलेल्या भटक्या भक्तांनी त्या वाळवंटी ओसाड प्रदेशात जादू करून दाखविली. त्यांच्या मृत्यूसमयी या नव्या मुसलमानांनी सारा अरबस्थान पादाक्रांत केला होता. जगात असे संघर्षमय पण नाट्यमय जीवन क्वचितच कोणा धर्मसंस्थापकाच्या वाट्यास आले असेल - भारतात तर नाहीच नाही.

त्यांच्या भक्तांना बहुधा वारसाईने ही असुरक्षितता, हा संघर्ष, ही युद्धखोरी मिळाली असावी. मरणोत्तर तरी शांती व स्थैर्य असावे? मरणोत्तर ४८ वर्षांतच कारबालाच्या लढाईत त्यांच्या हुसेन इब्न अली (६२६-६८०) ह्या नातवास (म्हणजे महंमदकन्या फातिमा व जावई अली इब्न अबी तालीब यांचा दुसरा पुत्र) ठार मारण्यात आले. त्याचे धड कैरोच्या हुसेन मशिदीत पुरण्यात आले तर शरीर इराकमधील कारबाला येथे. तेथपासून शिया-सुन्नी असे दोन पंथ इस्लाममध्ये निर्माण झाले. पहिले चार खलिफा ज्यांना कायदेशीर वाटतात ते सुन्नी. पहिले तीन खलिफा ज्यांना 'उपरे' वाटतात ते शिया. सुन्नी (सनातनी) ८० टक्के आहेत तर शिया (पक्ष) २० टक्के. ''शियांना काफीर समजा,'' असा आतंकवाद्यांचा नवा

आग्रह असतो. त्यामुळे जगभर शिया पंथीय सुरक्षित नाहीत. आज युपीतील शिया व पश्चिम भारतातील बोहरा व खोजा शिया सुदैवाने भारतात असल्याने बरेच सुरक्षित आहेत - उद्याचे माहीत नाही. पाकिस्थानचे राष्ट्रपिता जीना शिया होते, तरीदेखील तेथे शियांना भीती वाटते. मक्केच्या कुरेशींना खुश करण्यासाठी खलिफा कुरेशीच राहतील व मक्का हे तीर्थस्थानच चालू राहील असे ठरले. महंमद-पूर्व काळी कायदे बनविण्यासाठी मजलीस असे. त्यांच्या मुख्यास शेख म्हणत. इस्लाममध्ये ही मजलीस चालू राहिली. प्रेषितांच्या सहकाऱ्यांनी पहिल्या चार खलिफांना निवडून दिले होते. आजही मुस्लीम देशांत पार्लमेंटला मजलीसच म्हणतात.

बडोद्यात राह्यल्यामुळे मला मोठा राजकीय फायदा झाला, 'इलस्ट्रेटेड विकली' पासून 'ऑर्गनायझर' पर्यंत आणि 'माणूस-सोबत' पासून ते मटा-लोकसत्तेपर्यंत सर्वांत खूप राजकीय लेख आणि मुलाखती प्रसिद्ध करता आल्या, सिद्धांत मांडता आले व बरीचशी राजकीय निरीक्षणे करता आली. बडोदे आडगाव. राजकीय ऋषींची रहदारी विरळा. कोणी चुकूनमाकून आला की बराचसा वेळ मला देऊ शके. गुजराथेत संघ व जनसंघ जवळजवळ वाळीत टाकल्यासारखे. ''गांधीजींना मारेकरी'' म्हटल्यावर काय बिशाद होती ते पक्ष तेथे वाढतील? त्यामुळे त्यांचे नेते तर मला *फॅमिली मेंबर्सच* वाटायचे. भांडवलशाही गुजरातमध्ये साम्यवादी नेते? शिवशिव, नाव घेऊ नका. म्हणून अमेरिकन रोटरी क्लबमध्ये मी साम्यवादी बी.टी. रणदिव्यांचे भाषण ठरविण्याचे धाडस करू शकलो.

आमच्याकडे दोन पक्षांचे प्राबल्य होते - काँग्रेस व समाजवादी. सनत मेहता उत्कृष्ट समाजवादी वक्ता. जुना दोस्त. पत्नी मराठी अरुणा नाडकर्णी. बडोद्यात हॉटेलची पद्धत आत्ता आली. तेंव्हा पाव्हणे आले तर ते तुमच्या घरीच उतरणार. घरी गप्पांचा अड्डा जमतो तसा हॉटेलात रंगू शकत नाही. सत्ताधीश पाव्हणे सर्कीट हाऊसमध्ये उतरायचे. तेथील सारे नोकरचाकर माझे पेशंटस्. त्यामुळे ते माझे दुसरे घर होते. अनुभवाने प्रत्येक घटनेस तीन बाजू असतात, ते समजले - पेपरात येणारी, खोटी व दाबून टाकलेली सत्य बाजू. पहिली पत्रकार मांडतात, दुसरी राजकारणी नेता व तिसरी त्याचा विरोधक. *पॉवर पॉलिटिक्स* वर गप्पा रंगायच्या. मला स्वत:ला कोणच्याच पोस्टमध्ये रस नसल्यामुळे व माझा सारा भर *'इनसाईड स्टोरी'* वर असल्यामुळे समोरच्याला माझ्याशी बोलण्यात विशेष व वेगळे वैशिष्ट्य वाटे. ३०-४० वर्षे त्या व्यवसायात गेली तर *स्कील डेव्हलपमेंट* होणारच व ते स्कील व ती दुर्मिळ माहिती लेखनात उतरणारच. राजकीय समीक्षक मी असा बनलो.

त्यामुळे मी दादूमियांचे दोन सिद्धांत लोकप्रिय करू शकलो : (१) भारतीय राजकारणात मुसलमान ही समस्याच नाही, हिंदू नेतृत्व ही खरी समस्या आहे..(२) भारतीय व जागतिक राजकारणात तुम्ही किती माणसे मारता यावर तुमची ताकद मापली जाते; विचारबिचार दुय्यम ठरतात. टिळक मागे पडतात, गांधीजी अमर ठरतात. शरद जोशींना विसरले जाते, ठाकऱ्यांना नाही. मोदी चटकन पंतप्रधान होऊ शकतात, अडवानी नाहीत. चर्चिल, हिटलर, चौएनलाय, जॉर्ज डब्ल्यू बुश, ओबामा... किती नावे सांगू?

अनुभवासारखा अन्य चांगला शिक्षक नाही. येथे माझे एक निरीक्षण सांगण्यासारखे आहे. सारे पत्रकार व लेखक मित्र त्यावेळी तावातावाने दंग्यांवर लिहीत. कोणी तो सुरू केला? किती हिंदू मेले व किती मुसलमान? मी त्यांना सांगे, ''असे काही नसते. दंग्यांचे *आऊटसोर्सिंग* होते. कंत्राट दिले जाते, पैसे मोजले जातात व *प्लॅनिंग*नुसार दंगे घडतात. कोणालाच ते पटत नसे. मलाही ते पटले नसते. पण भोगीभाई पटेल माझा जुना पेशंट. तो दंग्यांची कंत्राटे घेई. ज्यांना पटायचे नाही त्यांना मी दंगे पहायला आमंत्रण देई. कांही निश्चित् बडोद्यास आले, त्यांना ते पटले. त्यात पॅरिसची पत्रकार मॅरीज होती, पुण्याचे भीमराव कुलकर्णी होते व मुंबईचे रवींद्र पिंगे. हळव्या मनाचे पिंगे त्यामुळे माझे भक्त बनले. इतरांना ही खुनाखूनी पहाणे अमानुष वाटले. तुम्ही काहीही सांगता, असे ते म्हणत. दुसरी गोष्ट मृतांच्या संख्येची. ती *मॅनिप्युलेट* करता येते, असे मी सांगायचो. मित्रांना ते पटत नसे. त्यांना कोणच्या तोंडाने सांगू की माझा एक नातेवाईक - बाळ गोखले - इंदूरला दंगे झाले की एक गोष्ट नियमितपणे करायचा - मृतांच्या गळ्यात जानवे चढवायचा. त्यामुळे कायम इंदूरात हिंदूच मरायचे व लोक भडकून सूड घ्यायला तयार राहयचे. मध्य प्रदेशात भगवेकरण झपाट्याने झाले त्याचे अल्पसे श्रेय या बाळाला आहे, हे विसरता येणार नाही. त्यावर मी ''सामन्या''त मोठा लेख लिहिला होता. ही गोखले मंडळी मूळ पद्मश्री वाकणकरांप्रमाणे उज्जैनची. बाळ म्हणायचा, ''मी कट्टर गांधीभक्त आहे. अहिंसा परमो धर्मः ।''

मला आणखी एक सत्य गवसले. आजची अप्रिय वाटणारी घटना २-४ पिढ्यांनंतर प्रिय नाही, पण कमी अप्रिय वाटू लागते. पानिपतानंतर मागे राहिलेले वा पळून गेलेले मराठे आज लाखाच्या संख्येने तेथे संघटितपणे राहतात. त्यांना मराठी येत नाही, पण त्यांना मराठी असण्याचा सार्थ अभिमान वाटतो. तस्साच अभिमान बलुचिस्थानातल्या मराठ्यांना. त्यांचा धर्म आज भले इस्लाम असेल पण त्यांना मराठा असल्याचा जबरदस्त अभिमान आहे. उद्या पाकिस्थानाविरुद्ध लढायचे

झाले तर ते आपल्याला मदत करतील. इंग्रजांनी हजारो भारतीयांना पूर्व आफ्रिकेत व उत्तर अमेरिकेत आणि कॅनडात मजूर म्हणून नेले. गांधीजींना त्यांच्यासाठी लढावे लागले. पण ते आज बृहत्भारताचा मोठा भाग म्हणून सुखात नांदत आहेत. भाजपा व विहिप त्यांच्या पैशांमुळे संपन्न बनले. मोदी २०१४ साली म्हणून सत्तेवर येऊ शकले.

स्वातंत्र्य मिळून ७० वर्षे झाली, पण सामान्य माणूस ब्रिटीश काळात जास्त सुखी व समाधानी होता तसा आज तो नाही. कोणच्याही म्हाताऱ्यास विचारा, तो भूतकाळात अज़ून रमतो! स्वातंत्र्याची फळे सामान्य माणसापर्यंत पोचली नाहीत, हाच याचा अर्थ. ती फळे फार थोड्यांच्या वाट्यास आली आहेत. ते आज खूप श्रीमंत बनले आहेत. त्यांच्या हाती आज सत्ता आली आहे, फार मोठ्या संख्येने गरीब लोक कसेबसे जगत आहेत तर ५ कोटी लोक दिवसा एकच वेळी जेवू शकतात. याचे कारण आमची लोकशाही. सज्जन व सरळ माणूस आज निवडणूक लढवू शकत नाही. चोर, डाकू व ठग असेल तर तोच लोकांची मते मिळवू शकतो. राजकारण, शासन व न्याय व्यवस्था आज चोरांच्या हाती गेली आहे. चोरांचे, चोरांकडून व चोरांसाठी हे राज्य आहे. ही लोकशाही नाही, चोरशाही आहे, त्यासाठी कॉंग्रेस हा पक्ष जबाबदार आहे. कॉंग्रेसमुक्त भारत व भाजपाची कॉंग्रेस होऊ न देणे या दोन गोष्टी मोदींनी केल्या तर ते अमर होतील. कॉंग्रेस म्हणजे पांच 'बे' - बेईमानी, बेपनाह, बेतमीजी, बेदर्दी व बेरोजगारी. सध्या राहुल गांधींचा भाजपावर हे पांच 'बे' ठोकण्याचा उद्योग जोरात चालू आहे. भाजपास व्हिटॅमिन एल (लीडरशिप)च्या अभावाने ग्रासले आहे. भाजपाजवळ दहा मोदी असायला पाहिजेत. यंत्रे आयात करता येतात, माणसे आयात करता येत नाहीत.

राजकारणात समाजशास्त्र महत्त्वाचे आहे. समाजशास्त्रात खानदानीपणा तेवढाच महत्त्वाचा. त्यामुळे घराणेशाही 'नकोशी' झालेली नाही. कारण *लॉ ऑफ डिमिनिशिंग रीटर्नस्* त्याची आपोआप काळजी घेतो. थोरल्या बाजीरावास दुसरा बाजीराव संपवितो, सयाजीराव गायकवाडांना प्रतापसिंग संपवितात, जेपींना लालू व जवाहरलालांना राहुल. हे सारे क्रूर आहे पण वास्तव आहे - शेवटी जग चालले पाहिजे ना? *अल्ला इज बोथ मायटी अँड मर्सीफुल. ही हॅज टु टेक केअर ऑफ द एंटायर वर्ल्ड.* म्हणून जेएनयूची घोषणा असते :

अफझल बोले आझादी, गीलाणी बोले आझादी ।
छिन के लेंगे आझादी ।।

सुन्नी असो का शिया, दोन्ही मुसलमान गट महाशक्तींच्या हातची खेळणी आहेत. ह्या सुपरपॉवर्स त्यांना त्यांच्या स्वार्थासाठी चक्क 'वापरतात'. पं. नेहरूंनी मला सांगितले, ''माझ्या नॉनअलाईनमेंटच्या धोरणामुळे मी दोघा महाशक्तींना समान खुश वा नाखुश ठेवून भारतास त्यांच्या राजकारणाचा आखाडा होऊ दिला नाही. येथे डाळ शिजेना, म्हणून त्यांनी आपला मोर्चा मध्यपूर्वेस वळविला. त्यामुळे भारताचा विकास होऊ शकला.'' हे खरे असावे, म्हणून कोणच्याच इतर पंतप्रधानांनी भारताचे हे तटस्थपणाचे परराष्ट्रीय धोरण बदलले नाही. यात महाशक्तींना आर्थिक फायदाच फायदा. सुरवातीला मदतीचा हात म्हणून थोडीशी मदत करायची, त्या काळात आग लावण्याचे काम करायचे व तुम्हाला अब्जावधी डॉलर्सची शस्त्रे विकायची. युद्धामुळे माणसांचा संहार व वास्तुंचा विध्वंस होणार, हे नक्की. आता पुनर्वसनाची गरज पडते, त्यासाठी अब्जावधी डॉलर्सचे *सॉफ्ट लोन*. त्यांचेच प्लॅन्स्, त्यांचेच कंत्राटदार, ते सांगतील ती किंमत, त्यांची *मेंटेनन्स* व्यवस्था व माणसे, त्यांचेच प्रकल्प व त्यांचीच रंगरंगोटी करून घासून पुसून नवीन दिसणारी यंत्रसामुग्री. जगास दाखविणार, किती उपकार केले! दातृत्व हे केवढे? उत्तर आफ्रिका, मध्य आशिया व मध्य पूर्व (पश्चिम आशिया) येथील ८० टक्के प्रजा मुसलमान आहे. मध्य पूर्वेत आतंकवादाचे राज्य आहे, इतर दोन स्थळे अजून बाकी आहेत. येथे इस्लामी मूळवाद *(फंडामेंटालिझम)* पसरविणाऱ्या दोन शक्तींचा उदय झाला. पहिली सौदी अरेबियन व दुसरी तृणमूल किंवा सामान्य लोकांपर्यंत पोचलेली. ही तृणमूल संस्था *(मुस्लीम ब्रदरहूड)* ७० देशात आज काम करते. मध्य पूर्वेत महासत्तांनी मुसलमानी राष्ट्रांना वापरून त्यांना आतंकवादी कसे बनविले ते आता पाहू.

उजवे उदारमतवादी

ऑटोमन साम्राज्य जेथे जेथे होते तेथे तेथे मुसलमान प्रजा दिसते. हे साम्राज्य पहिल्या महायुद्धानंतर खतम् झाले. तेथे युरोपियन सत्ता आली. दुसऱ्या महायुद्धानंतर ही वसाहतवादी सत्ता अदृश्य झाली. इराक, सिरीया, इजिप्त वगैरे देशांनी तुर्कस्थानाचे मॉडेल पसंत केले, त्यांनी लोकशाही व युरोपियन वा अमेरिकन कायदा स्वीकारला. तेथे आपोआप इस्लामिक कायदा व संस्कृती मागे पडली. १९४८ साली युनोने पॅलेस्टाईन भूमी अरब व ज्यू यांच्यात वाटली. चिडलेल्या अरब देशांनी इस्त्राएलवर स्वारी केली. इस्त्राएल केवळ नुसते जिंकले असे नाही तर त्यांनी आणखी जमीन लाटली! १९६७ साली इजिप्त व सिरीया यांनी लष्करी तयारी करून दुसरा हल्ला इस्त्राएलवर केला, पं. नेहरूंनी त्यास नैतिक पाठिंबा दिला

(नैतिक पाठिंब्यास विचारतो कोण?), पण त्या ६ दिवसांच्या लढाईत इस्त्राएल पुन्हा जिंकले व इस्त्राएलने इजिप्तचा थोडा भूभाग व जॉर्डनचा पश्चिम किनारा, सिरीयाचे गोलन हाईटस् व पूर्व जेरुसलेम एवढा भाग व्यापला. इजिप्त व सिरीयाने तिसऱ्यांदा स्वारी केली, पण पुन्हा ते पराभूत झाले. त्यामुळे अरब दुर्बळ आहेत हे सिद्ध झाले. त्यातून सेक्युलर पॅलेस्टाईनं लिबरेशन ऑर्गनायझेशन (पीएलओ) जन्मली. तीचा धंदा अपहरण, छुटक बॉंबिंग, चोरटे हल्ले, वगैरे, वगैरे.

डावे उदारमतवादी

रशियन क्रांती व्हायच्या आधी मुल्लामौलवींना विरोध करणारा इस्लामिक समाजवादी गट मध्य पूर्वेत १९१७ पासून काम करीत आहे. तो खाली भारतात पसरला तर ब्रिटीश साम्राज्यवादाची वाट लावेल अशी भीती इंग्रज़ांना पहिल्यापासून होती. भारतीय मुस्लीम लीगमध्ये समाजवादी विचारांचे बरेच सभासद सक्रिय होते. अशक्य गोष्टी शक्य करून दाखवायचा काही बेकार विचारवंतांचा धंदाच असतो. गांधींच्या सैल व सैरावैरा विखुरलेल्या विचारांना सैद्धांतिक बैठक प्राप्त करून देण्याचे श्रेय काही पुण्याच्या ब्राह्मणांना दिले जाते. कुराणात समानता सांगितली आहे, म्हणजे समाजवादच आहे असे सिद्ध करणारे व त्यातून इस्लामिक जागृतीची *(रिनेसान्स)* स्वप्ने पाहणारे काही द्रष्टे इराक, सिरीया व इजिप्तमध्ये होते. त्यांना रशियाची आर्थिक (व सैद्धांतिक) मदत मिळत होती. मार्क्स वा तर्कतीर्थांसारख्या नुसत्या सिद्धांतवाद्यांना कौन पूछत है? त्यांना स्टालीन वा गांधीजी कोणीतरी राजकीय नायक लागतोच. तसा नायक त्यांना गमाल अब्दुल नासरच्या रूपाने १९५० व १९६० च्या दशकांत मिळाला. पाकिस्थान, अल्जेरीया, इंडोनेशिया, सुदान, सोमालिया, येमेन व लिबिया येथे तो अरब समाजवाद वा बाथ समाजवाद आगीसारखा झपाट्याने पसरला. अफगाणिस्थानात जसा तो आला तसा त्याने पाकिस्थानातही भुट्टोच्या *पीपल्स डेमॉक्रेटिक पार्टीच्या* रूपाने प्रवेश केला आणि अमेरिका धास्तावली - आता कम्युनिस्ट भारतही गिळणार! उगाच नाही अमेरिकेने अफगाणिस्थानात अब्जावधी डॉलर्स ओतले. इंदिरेने रशियास लष्कर आणण्याची घाई करू नका, असे बजावले होते, पण भारताचे कोण ऐकतो? दुर्बळांचे देवही दुर्बळच. (शिवाजीने दक्षिण भारत मुसलमान होण्यापासून वाचविला तस्सा ठाकऱ्यांनी महाराष्ट्र, विशेषतः १०० कापड गिरण्या असणारी मुंबई साम्यवादापासून वाचविली. हे ऐतिहासिक सत्य आहे व ते डांग्यांनी माझ्याजवळ एका मुलाखतीत कबूल केले होते!)

शेवटी भांडवलशाहीचा विजय

हा सारा 'डावा' इतिहास मोठा मनोरंजक आहे. तो किती आधी बाल्फर व *'आयर्न कर्टन' फेम* चर्चिल यांनी ओळखला होता! डावे मध्य पूर्वेत यशस्वी झाले असते तर भारतही 'लाल' झाला असता. पूर्वी नकाशात ब्रिटीश लाल, आता कम्युनिस्ट लाल. नेहरूही लाल होण्याच्या तयारीत होते, पण गांधीजींनी त्यांना वाचविले. जसे वाजपेयींना ग्वालेरच्या राजमातेने वाचविले. गडाफीने लिबियातील राजेशाही संपविली व तो स्वतःस समाजवादी म्हणवून घेऊ लागला. इजिप्त, सिरीया, इराक व पीएलओचे १९७० सालचे *यंग सोसालिस्ट अलायन्स* चे मोठे पोस्टर अजून लोकांना आठवते. त्यावेळी या अलायन्सची आखाती देशातील राजे (शेख) व इराणचे शहा 'देवधर्मावर विश्वास न ठेवणाऱ्यांचे दलाल' (रशिया-चीनचे) म्हणून बदनामी करीत! इराणच्या शहाने इराणी मार्क्सिस्ट अल शरिआतीचा सुपारी देऊन खून करविला होता. मात्र याच डाव्यांनी १९७९ साली धार्मिक खोमेनींना हाती धरून इराणी क्रांती घडवून आणून बरोबर बदला घेतला. (कम्युनिस्टांनी स्वामी रामानंद तीर्थांना हाती धरून हैदराबादेत क्रांती घडविलीच ना? सरदारांनी त्याचा लष्कर धाडून सांगता समारंभ केला. समाजवादी मेनन व नेहरूंनी त्यास पोलीस कारवाई म्हटले.) १९७० साली नासर गेले व समाजवादाचे सौंदर्य व सामर्थ्य संपुष्टात आले. समाजवाद्यांना संधीसाधू म्हणतात कारण ते अर्थशास्त्र चांगले जाणतात. पेट्रोलशिवाय गाडी चालत नाही. पेट्रोलचे बिल चुकवायचे झाल्यास तर आपल्यात ताकद नाही. म्हणून अशोक मेहता व जयवंतराव टिळकांसारखे राजकारणी व पु. ग. सहस्त्रबुद्ध्यांसारखे खंदे लेखक नेहरूंच्या काँग्रेसमध्ये आले, आणि स. ह. देशपांडे व श्रीपाद जोशींसारखे साहित्यिक भाजपात शिरले. त्याच थाटात 'पॉलिटिकल इस्लाम'चे हे डावे बंदे सौदी अरेबियाच्या कळपात सामील झाले. १९७३-७४ मध्ये तेल संकट *(ऑईल क्रायसिस)* आले. सारी सोंगे करता येतात, पैशाचे नाही. समाजवादाची शेवटची विकेट अफगाणिस्थानात पडली. पीडीएफचा व रशियन पाठिंबा असलेला अफगाणिस्थानातील इस्लामिक समाजवाद ''सौर क्रांती''त बदलला होता. समाजवादाचा हा शेवटचा अवतार. यानंतर पाळी होती ती लिबरल (उदारमतवादी) इस्लामच्या उदयाचा. (साधारणतः हा काळ आपल्याकडे जनसंघाच्या उदयाचा काळ होता. तिकडे अल शरायती गेला, आपल्याकडे चिमणभाई पटेल.)

आजच्या वर्तमानकाळात विचार केला तर सारे जग मुसलमान, म्हणजे

असुरक्षित, तर होत नाही ना, असा संशय येऊ लागतो. ते पूर्णापासून, आदर्शांपासून ढळलेले जग आपल्यास वाकुल्या दाखविते, भेडसाविते. सकाळचे वर्तमानपत्र उघडताच किंवा सकाळची टीव्ही चॅनल लावताच भक्ती संगीताच्याऐवजी आपणास खून, मारामाऱ्या, बलात्कार, अपहरण, अपघात या विषयांच्या बातम्यांनी आपले मन खिन्न व उदास होते. या सगळ्या घडामोडींकडे यंत्रवत् कोरडेपणाने, असंवेदनशीलपणे पाहणारे, आपण, जगण्याच्या एका बिकट, वाकड्यातिकड्या चढउतारावर, विनाशाच्या गर्तेजवळ उभे आहोत, अशी भयंकर निराशेची जाणीव होते.

एकीकडे विज्ञानाची वैभवशाली व्यवस्था तर दुसरीकडे 'हा हन्त हन्त नलिनीं गज उज्जहार'ची निराशाजनक नेणिव. त्यावरून दलाई लामांची वास्तवाची जाणीव करून देणारी काव्यपंक्ती आठवते,

"यांची चंद्रावर धाव ।
पण यांना शेजाऱ्याचे माहीत नाही नाव ।।"

ज्यांनी प्रेम देऊन मन घडवायचे त्या आई-वडिलांजवळ मुलांवर मायेची पाखर घालण्यासाठी वेळच नाही. श्रीकृष्णाने आम्हा हिंदूंना कुरूक्षेत्रावर मारे आश्वासन दिले,

यदा यदाही धर्मस्य ।
जर वैही धर्माते अभिभवी ।
अधर्मू हा ।
ते वेळी आपुले याचेनि कैवारे ।
मी साकारू होऊनी अवतरे ।।

गेली १३०० वर्षे आम्हाला मुसलमानांनी सतत काय दिले? भय, क्रोध, मत्सर, मोह, आमच्या पोरींचे अपहरण, बलात्कार, हत्या, दंगे आणि बॉबस्फोट? आमचे महात्मे, पंडित वगैरे त्यांना सतत काय सांगीत आले आहेत? शहाणपणाचे, समजूतदारपणाचे, मानवतेचे उपदेश? महाभारताच्या व्यास पर्वापासून आजच्या संगणक व मोबाईल पर्वापर्यंत आमचा आक्रोश एकच आहे :

उर्ध्वबाहुः विरौम्येष्य न च कश्चित् श्रुणोति माम् ।
ध्रर्मात् अर्थश्च कामश्च सद्धर्म : किम् न सेव्यते? ।।

गेली १,३०० वर्षे आम्ही हेच श्रीकृष्णाचे खोटे खोटे आश्वासन ऐकत आलो आहोत :

अद्वेष्टा सर्व भूतानां मैत्रः करुण एव च ।
निर्ममो निरहंकारः समदुःख सुखक्षमी ।।

सतत संतुष्ट, संयमी, दृढनिश्चयी, कोणाकडून कोणतीही अपेक्षा न करणारा, सावध, भूतकाळ उगाळत न बसणारा आणि शत्रू-मित्र, थंड-उष्ण, सुख-दुःख, निंदा-स्तुती, मान-अपमान यांच्याकडे समदृष्टीने पाहणारा स्थिरमती, संयमी, मितभाषी भक्त मला प्रिय होतो, असे निःसंदेहपणे कृष्णाने अर्जुनाला सांगितले आहे. हे ऐकून ऐकून आम्ही आता थकलो आहोत, कंटाळलो आहोत.

हे देवा, 'यत्न तो देव जाणावा', 'अचूक यत्न तो देव' असे सांगणाऱ्या रामदासांनी पंढरपूरला विठ्ठलाचे दर्शन घेतले. कमरेवर हात ठेवून उभ्या असलेल्या पंढरीनाथाला पाहून त्यांना राग आला व त्यांनी विचारले :

येथे उभा का श्रीरामा । मनमोहन मेघश्यामा ।
चापबाण काय केले । कर कटीवरी ठेविले ।।

सारखे परमेश्वराला सूनवावेसे वाटते, ''हे श्रीनाथा, भारतास आजवर तू महात्मे, पंडित व विचारवंत यांचा सतत पुरवठा केलास. तो सप्लाय आता बंद कर व आम्हास एखादा रामदास, एखादा शिवाजी धाड.''

फक्त भीती वाटते, एखादे वेळेस तो श्रीहरी, तो श्रीकृष्ण हांसत हांसत फटकारेल, ''किती कृतघ्न आहात रे तुम्ही हिंदू! अरे, मीच रामदास व शिवाजी असे *टू इन वन* असे सावरकर आणि सुभाष केवळ तुमच्यासाठीच धाडले होते, त्यांचे तुम्ही काय भले केलेत?''

असे विचारले तर आमच्यापाशी काय उत्तर आहे?

■■■

अनुक्रम

ऋणनिर्देश

- चंद्रशेखर नेने
- डॉ. वैजयंती दा. नेने
- चंद्रकांत कोल्हटकर
- विसुभाई पटेल
- मोहन पुरंदरे
- डॉ. भास्कर व रजनी व्यास
- विंग कमांडर अशोक मोटे
- श्रीधर दामले
- चिरायू पंडित
- जिगर इनामदार
- मनीष सोनी
- ऋषी नेने
- सचिन उपाध्याय
- राजेंद्र हरफळे

असुरक्षिततेचे मानसशास्त्र

असुरी प्रवृत्ती

पुष्कळदा मला प्रश्न पडतो, आपण भारतीय यवनांसमोर हारलो कां? आपण आपले स्वातंत्र्य कां गमावले व आपण गुलाम कां झालो? आपल्याकडे एवढे भौतिक व मानसिक ज्ञान होते, एवढ्या सिद्धी होत्या, एवढे आत्मज्ञान होते की त्याचा नीट वापर केला असता तर या जगात आपला कोणी पराभव करणे अशक्य होते. साहेबाने आपल्याला ह्या सर्व 'भाकडकथा' आहेत असे शिकविले. आणि आपण ते न विचार करता सारे स्वीकारले! हळूहळू आता आपल्याला कळू लागले आहे की साहेबाने ते सर्व त्याचा स्वार्थ साधण्यासाठी केले, त्याने आपली चक्क फसवणूक केली, चुकीचे मार्गदर्शन केले. पण आपले तर डोके ठिकाणावर होते ना? आपण का फसावे? त्यालाच बुद्धीभ्रंश म्हणतात. तुमच्यात 'तमस्' भरपूर प्रमाणात असेल तर तुम्ही दुसऱ्याचा हांसत बुद्धीभेद करू शकता. तसे करणे म्हणजे एक ताकद आहे. राज्य करायचे असेल तर, म्हणजेच राजधर्म पाळायचा असेल तर, ते करणे आवश्यक आहे.

पूर्वी राजपुत्रांना रामायण व महाभारत शिकवीत असत. त्यायोगे त्यांना राजधर्माची *अप्लाईड सायकॉलॉजी* शिकविली जाई. कळत व नकळत हे शिक्षणाचे दोन प्रकार. नकळत शिक्षण म्हणजे संस्कार देणे. संस्कार इलेक्ट्रोप्लेटिंग प्रमाणे काही काळच टिकतात, वापराने ते कमी कमी होतात, त्यामुळे व्हॅक्सिन प्रमाणे, संस्काराचा *बूस्टर डोस* पुन्हा द्यावा लागतो. मध्यपूर्वेचे व भारताचे प्राचीन काळापासून जवळचे संबंध होते याचे मोठे एक तासाचे भाषण सामान्य माणसास देण्याची

गरज नाही. त्याला महाभारताची गोष्ट सांगा, त्याला ते ज्ञान आपोआप येईल. म्हणून कीर्तनकाराची आवश्यकता. पण कीर्तनकारासच हे कोठे माहीत असते? म्हणून तर त्या परंपरेचा ऱ्हास झाला.

पुराणात शोणितपूरचा वारंवार उल्लेख येतो. शोणितपूर म्हणजे असुरांची राजधानी निनेव्हे. बायबलात तीला 'रक्ताची नगरी' म्हटले आहे. महाभारत काळात तेथे बाणासूर राज्य करी. त्याची कन्या उषा. तीचे कृष्णपुत्र अनिरुद्ध यावर मन जडले. तीच्या सखीने अनिरुद्धास द्वारकेतून शोणितपुरात उचलून नेले, अपहरण केले. नारदाने हे स्थान द्वारकेपासून ११,००० योजने दूर आहे, असे म्हटले आहे. कृष्णाने निनेव्हेवर स्वारी केली, बाणासुराचा पराभव केला व उषा-अनिरुद्धाचे लग्न लावले. शोणितपुरातच कार्तिकेयाचा जन्म झाला. शोणितपुराला अनलावरुद्ध, म्हणजे आगीने घेरलेले, असे दुसरे नाव आहे. भूगर्भात तेल व वायू यांचे साठे असल्यामुळे ते बाहेर पडत तेव्हा आग निर्माण होई. कार्तिकेय हा सेनापती आहे व निनेव्हेत तो युद्धदेव म्हणून आजही पूजिला जातो. तेथे तो शुलमन म्हणून ओळखला जातो. तो दक्षिण भारतात गेला व सुब्रह्मण्याम (मुरुगन्/मुर्गा) म्हणून ओळखला जाऊ लागला. श्रीलंका व दक्षिण भारत येथे असुरांचेच राज्य होते. महाभारतात शंखासुर, बाणासुर, जटासुर, तारकासुर, जंभासुर, मयासुर, कैटभ, कुंभ, निकुंभ, किर्मीर, अंकध, अंध, वृत्र, धुंधु, धेनुक, नरक, नमुचि, सुंद, उपसुंद वगैरे असुरांची रेलचेल आहे. देवांच्या राजाला, इंद्रास, असुरघ्न म्हणतात. इराणात असुरांचे राज्य होते. पर्शियन इंद्रास अंग्रमन्यु म्हणतात. अहुरमज्द शब्द असुरमहस् पासून निघाला असे राजवाडे म्हणतात. खाल्डियन, इराणी व हिंदू यांचे पूर्वज एके काळी एकच असावेत. देव व असुर हे प्रजापतीचे पुत्र. दितीचे पुत्र ते दैत्य आणि दनूचे पुत्र ते दानव.

भले इंग्रजांनी पुराणांना भाकडकथा म्हटले असेल, पण जर्मन व अमेरिकनांनी त्यावर ग्रंथ लिहिले, उदा. जॉन हाफकिन युनिवर्सिटीने प्रसिद्ध केलेला एच.डब्ल्यू. मॅगौनचा *असुरी कल्प* हा ग्रंथ. तसेच कपिल ऋषींचा शिष्य ईश्वर कृष्ण याने लिहिलेला *शांख्यकारिका* हा ग्रंथ. ६ व्या शतकांत चीनी भाषेत भाषांतर केला गेला. १८३२ साली लासेनने त्याचे लॅटीनमध्ये भाषांतर केले व पुढे कोलब्रुकने इंग्रजीत आणि लोनिंसरने जर्मनमध्ये. अरेरे, आम्ही करंटे, आम्हाला तेवढे संस्कृत येत नाही, त्यामुळे मानसशास्त्रातील नवे व जुने यांचा संगम आम्हास साधता येत नाही. तो करू शकलो तर आम्ही जग जिंकू. अरेरे, आता ८७ व्या वर्षी संस्कृत शिकणे किती अवघड होईल.

लोकांना असुरक्षित कां वाटते?

असुरक्षित वाटणे व इतरांना असुरक्षित वाटावयास लावणे हे शास्त्र आहे. काहींना ती नाट्याप्रमाणे कला वाटते. त्यात राक्षस वा असुर पारंगत होते, असे आपले रामायण व महाभारत सांगते. दानवांनी देवांना या कलेच्या (?) बळावर हैराण करून सोडले होते. हे असुर युफ्राटिस व तैग्रिस नद्यांच्या मधील भूभागात रहात. त्यांना सेमाईट म्हणत. सुमेरियन लोक त्यांचे शेजारी. असुरांनी इराकच्या मध्यभागी अक्काड व उत्तर भागात अस्सुर ही नगरे स्थापन केली. अक्काडवाल्यांना बाबिलोनियन (ईराक) म्हणत. १३८० साली त्यांची ताकद जास्तीत जास्त होती. दक्षिण भारतात त्यावेळी संगम साम्राज्य (१३३६-१४८५) होते. उत्तरेत फिरुझशाह तुघ्लग यांचे राज्य होते. असुरांपासून ही कला मुसलमानांकडे येणे हे साहजिक होते.

असुरक्षितता मुख्यतः तीन कारणांमुळे येते : (१) नुकतेच मिळालेले अपयश वा नकार : यामुळे तुमचा समाधान *कोशंट* ४० टक्क्यांनी खाली जातो. त्यात पत्नीचा मृत्यू, नोकरी सुटणे, गंभीर आजाराचे निदान इत्यादींचा समावेश होतो. ही कारणे स्वाभिमान वा स्वमूल्य वा आत्मविश्वासावर हल्ला चढवितात. तुमचे स्वतःचे मूल्य मूळातूनच कमी असेल तर परिणाम दुप्पट होतो. भित्यापाठीमागे राक्षस, म्हणतात, तसा प्रकार. (२) आत्मविश्वासाचा अभाव : कौटुंबिक मेळावा, पार्टी, मुलाखती वगैरे सामाजिक ठिकाणी तो आढळतो. तेथे तुम्ही आपले काही तरी चुकते आहे अशी काळजी करीत वागता व लोकांना टाळता. पूर्वी कधीतरी कोणीतरी तुम्हाला उपरे म्हणालेले असते, कोणी वाईट रीतीने तुमचा अपमान केलेला असतो, किंवा रागे भरलेले असते. बऱ्याच वेळा घरी कडक स्वभावाचे आईबाप असतात, ते तुमच्या पाठीशी लागतात, तू लोकप्रिय झाला पाहिजेस, तू यशस्वी झाला पाहिजेस, वगैरे. त्यातून उलटी प्रक्रिया व्हायची शक्यता असते. (३) पर्फेक्शन : तुम्ही पर्फेक्शनिस्ट असाल तर पंचाईतच आहे. तुम्हाला तुमची पत्नी लावण्यवती पाहिजे, तुमचे घर सर्वांत सुंदर पाहिजे, तुमची मुले गोंडस असावीत असे वाटते, तुमच्याजवळ मर्सिडीज गाडी पाहिजे, तुमचा बॉस समजूतदार असायला पाहिजे, तुम्हाला समाजात मानमरातब पाहिजे... तुमची यादी बरीच लांब आहे. तुमच्या अपेक्षा पूर्ण न झाल्यामुळे तुम्हाला असुरक्षित वाटायला लागते. (४) न्यूनगंड असला तरी स्वतःला असुरक्षित वाटू लागले. लोक आपल्याला सतावतात, त्रास देतात, आपली टर्र उडवितात, असे वाटू लागते. न्यूनगंड शारीरिक वा स्वभावाच्या अथवा कर्तृत्वाच्या कमतरतेने येऊ शकतो, जसे लठ्ठपणा, चकणेपणा,

पंगुत्व, वगैरे; किंवा चक्रमपणा, आक्रमकपणा, विसराळूपणा, धांदरटपणा, बावळटपणा, वगैरे; गरिबी, खालच्या जातीतील जन्म, खेड्यातून आल्यामुळे गावंढळपणा, वगैरे. दुर्दैवाने, तुमच्या मनातल्या अपेक्षांप्रमाणे सारे काही तसेच्या तसे घडत नाही, कोणाच्या १० तर कोणाच्या २५, फार नशिबवान असेल तर ५० टक्के अपेक्षा फळतात. त्या जेवढ्या कमी फळतात तेवढे तुम्ही जास्त निराश होता, तुम्हाला असुरक्षित वाटते आणि आपली लायकीच नाही, असले वेडे विचार मनांत येतात. तुमची भूक मंदावते, तुम्ही कमी जेवता, त्यामुळे तुम्हाला थकलेले वाटते व तुम्ही गाणे गुणगुणता, भय इथले संपत नाही.

बऱ्याचशा असुरक्षिततेचे मूळ मत्सरात आढळते. मत्सर लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांत दिसून येतो. मोठ्या वयात माणूस तो लपविण्यास शिकतो. तज्ञ डोळ्यांना त्याच्या देहबोलीतून वा संवादातून तो व्यक्त होताना दिसतो. आपल्या मैत्रिणीवर आणखी कोणाचा डोळा आहे असा संशय जरी आला व तो आपल्यापेक्षा रूपाने, गुणाने, पैशाने, जातीने वा चालीरीतीने श्रेष्ठ असेल तर तो तीला चोरून नेईल अशी भीती निर्माण होते व त्या भीतीतून मत्सर जागृत होतो. तुमच्यात मी समोरच्यास सहज चीत करेन असा आत्मविश्वास नसेल तर, किंवा स्वतःची प्रतिमा छोटी असेल तर असुरक्षितता व त्यातून तो मत्सर द्विगुणीत होतो. तुम्ही स्वतःस समोरच्यापेक्षा श्रेष्ठ समजत असाल तर तुम्हाला त्याच्या धाष्टर्याची गंमत वाटते, हंसू येते व तुम्ही त्यास खेळविता.

मुस्लीम बिनसरकारी संस्था (एनजीओ)

हिंदू व मुसलमान यात मोठा फरक आहे. हिंदू नेते आदर्शवादी असतात तर मुसलमान वास्तववादी. राजपूतांनी रणांगणावर पाठ कधीच दाखविली नाही, पण ते सदैव लढाया हारले व त्यांच्या सुंदर बायकांना जौहर करावा लागला. सारा मुसलमानी मुलुख पायाखाली घातलेल्या रामदासांनी पहिल्यांदा शिवाजीला शिकविले, "धर्म पाळणाऱ्यांशी धर्मयुद्ध ठीक आहे, पण अधर्मियांशी धर्मयुद्ध? तो मूर्खपणा होईल." असेच व्यावहारिक शहाणपण विद्यारण्य स्वामींनी हरिहर आणि बुक्क या बंधुंना शिकविले. त्या बळावर विजयनगर साम्राज्य १३३६ ते १५३०, म्हणजे जवळजवळ दोन शतके टिकले. मुसलमान कमी शूर, कमी शिकलेले व कमी सुरक्षित आहेत पण ते वास्तववादी असतात. म्हणून, मूठभर मुसलमानांनी बलाढ्य शत्रूशी ६२४ साली बद्रची लढाई जिंकली होती. अल्ला मुसलमानांच्या बाजूने उभा राहतो, म्हणून 'मदत केल्याबद्दल अल्लाशी कृतज्ञ रहा' अशी कुराणाची आज्ञा

(३:१२३) आहे. भारतात मुसलमानांचे कायदेतज्ञ नेहमी सांगतात : ''लोकशाहीत राहून लोकशाहीचे नियम वापरून केवळ हिंदुंचा डाव त्यांच्यावरच उलटवा. ते सोपे आहे. लोकशाहीची स्वतःची अशी काही कायदेशीर कमजोर स्थाने आहेत, त्यांचा फायदा उठवा.'' भारतास आदर्शवादी नेहरू मिळाले तर पाकिस्थानात वास्तववादी कायदे आझम जीना. म्हणून नेहरूंनी काश्मीरची लढाई मध्येच थांबविली, काश्मीर प्रश्न युनोत नेला व *प्लेबिसाईट* ला मान्यता दिली. म्हणून अर्धे काश्मीर आज पाकिस्थानच्या ताब्यात आहे. एनजीओ हा असाच नेहरूंच्या भोळेपणाचे जिवंत उदाहरण. मुसलमान नेते त्यांच्या भक्तांना सांगतातः'' असे हजारो एनजीओज् निर्माण करा व कायदेशीरपणे अब्जावधी डॉलर्स आयात करा. आपल्याजवळ अल्लाचे आशीर्वाद, मनुष्यबळ, विचारधन व पेट्रोडॉलर्स असल्यावर आपण जग जिंकू शकू.'' चांगले 'कव्हर' वापरून 'बेकायदेशीर' कामे काढायची, त्यासाठी धैर्य लागते, ते या समाजाजवळ भरपूर आहे. आपण जे काम करतो ते धर्मासाठी, अशी त्यांच्या मनाची खात्री त्यांच्या धर्मगुरूंनी केलेली असते. अर्थात, हे करीत असताना मनातल्या मनात कोठेतरी ते असुरक्षित असतात व त्यामुळे त्यांच्या हातून कोठेतरी चूक राहून जाते. इस्लामिक रीसर्च फाऊंडेशनचे डॉ. झाकीर नाईक १९ नोव्हेंबर २०१६ रोजी नॅशनल इनव्हेस्टिगेशन एजन्सी च्या (एनआयए) झडतीत छान सापडले. ते सौदी अरेबियास पळून गेल्यामुळे त्यांचा तुरुंगवास सध्या तरी टळला आहे. त्यांची भाषणे आतंकवादी असत. ढाकाच्या कॅफेच्या बॉंब हल्ल्यात सापडलेल्या आरोपींनी सोशल मिडियात नाईकांच्या भाषणाने आपणास स्फूर्ती मिळाली, असे कबूल केले होते. युके, कॅनडा व मलेशिया येथे त्यांना भाषण करण्यावर बंदी आहे. देशात अशांतता पसरविण्यासाठी *अनलॉफुल ॲक्टिव्हीटीज* (प्रिव्हेन्शन) कायद्याखाली त्यांच्या १०-१२ संस्थांवर बंदी घालण्यात आली आहे. आतंकवादाचा प्रसार करणाऱ्या आंतरराष्ट्रीय *पीस टीव्ही* शी त्यांचा संबंध होता. हवाला डीलर सुलतान अहमद बिचौलियाने दाऊद इब्राहीमने आपल्यामार्फत डॉ. झाकीर यांना २०० कोटी रुपये हवालामार्गे पाठविल्याचे कबूल केले आहे. *(दै. दिव्य भास्कर, २१ फेब्रुवारी २०१७)*

नेहमीप्रमाणे हिंदू येथे गाफील होते. डॉ. झाकीर नाईकांनी त्यांना जाग आणली. संशोधन केले तेव्हा समजले की भारतात ३३ लाख एनजीओज् आहेत, त्यातील फक्त ३ लाख संस्था त्यांचे हिशेब सरकारला देतात. बहुतेक सगळ्या संस्था त्यांचे बेकायदेशीर कृत्य झाल्यावर, उदा. धर्मांतरास लाखो डॉलर्सची मदत, आतंकवाद्यांना मदत, वगैरे, त्या गायब होतात. बऱ्याच केसेसमध्ये अधिकारी

लांच घेतात व त्यांच्या कुकर्मांकडे काणाडोळा करतात. सरकार कॅगसारख्या संस्थांवर बिनसरकारी संस्थांचे ऑडीट करण्यासाठी ९,००० कोटी रुपये खर्च करते. *(संजीव सिरोही, सुप्रीम कोर्ट व एनजीओ फंडींग. अलाईव्ह मासिक, फेब्रुवारी २०१७, पृ. ७)*

भारतातील मॅकार्थीझम्

भारतीय हिंदुंना खऱ्या अर्थाने वाणी व लेखणीचे स्वातंत्र्य कधी लाभलेच नाही. भारतातील हिंदू प्रथम दिल्ली सल्तनतचे, नंतर मोगलांचे, त्यानंतर इंग्रजांचे व शेवटी काँग्रेसच्या घराणेशाहीचे गुलाम म्हणून जगत आले. गुलामीत स्वतंत्र प्रज्ञा काम कशी करणार? त्याच्या उलट १७७६ मध्ये गोरे अमेरिकन्स् स्वतंत्रपणे वाढले, त्यांनी ब्रिटीशांची गुलामी युद्ध करून फेकून दिली व आपल्या वैज्ञानिक शोधांच्या बळावर दोन महायुद्धानंतर जगाचे अग्रणी झाले. भारतीय हिंदू गुलामी मानसामुळे मागासलेलेच राहिले. पाकिस्थानातील मुसलमानांची तीच अवस्था होती. त्याच्या उलट युरोप व अमेरिका येथील वैज्ञानिकांनी संशोधन करून शत्रूचे मानस व वृत्ती जाणण्याचा प्रयत्न केला व त्या संशोधनाच्या बळावर आपल्या सरकारास मार्गदर्शन केले. गुलामी मानसामुळे हिंदू नेत्यांना दुसऱ्याचे ऐकणे म्हणजे कमीपणा वाटे. मलाच सारे कळते असा दुराभिमान असलेल्या नेत्यांना काही शहाणपणाचे चार शब्द सांगणे गेली सत्तर वर्षे अशक्य बनले. त्याच्या उलट, पश्चिम युरोप व अमेरिका येथील गोऱ्या प्रजेला पाहिजे त्या विषयावर संशोधन करण्याचे व त्यावर लेखन करण्याचे मुक्त स्वातंत्र्य गेली कित्येक शतके लाभलेले आहे. मुसलमानांचा आक्रमक स्वभाव, काळ्या मुसलमानांची गुन्हेगारी, काळे मुसलमान व पोलीस, गोरे मुसलमान आयसिसकडे आकर्षित होतात त्याची कारणमीमांसा, मध्यपूर्वेतील लोकांचे मानस, सुन्नी व शिया यांचे संबंध वगैरे भारतात 'जातीय' (कम्युनल) व म्हणून त्याज्य समजल्या जाणाऱ्या विषयांवर युरोप-अमेरिकेत कितीतरी सखोल मानसशास्त्रीय काम झालेले दिसते. त्याची सुरवात नेपोलियनने इजिप्तवर स्वारी (१७९८-१८०१) केली तेव्हापासून दिसून येते. हा काळ साधारणतः म्हैसूरात टीपूचे राज्य होते तेव्हाचा. आम्ही दगडी मूर्तीस पूजतो, तुम्ही ''मुडद्यासी पूजिता'' असे ''हिंदू-तुर्क संवाद'' या काव्यात लिहिणाऱ्या संत एकनाथाशिवाय कोणी फारसे याचे संशोधन केल्याचे ऐकिवांत नाही. काहींचे यावर संशोधन व लेखन आहे पण ''आपण जातीय ठरू'' या भीतीने ते प्रकाशकांकडे जात नाहीत, कारण कोणी प्रकाशक त्या 'जातीय'

मालाला हातसुद्धा लावणार नाही, अशी त्यांची खात्री असते.

अमेरिकेची ज्ञानोपासना

भारतात, विशेषतः काश्मीरात, आतंकवाद्यांचे शेकडो-हजारो हल्ले, बाँबस्फोट व गोळीबार झाले व होत आहेत. आपण त्याचे फारसे मनावर घेत नाही. त्यावर संशोधन करावे व त्या शास्त्रीय माहितीच्या आधारे आपले परराष्ट्रीय धोरण आखावे ही आपल्याकडे राजकीय इच्छाशक्तीच नाही. त्याच्या उलट, अमेरिकेत सप्टेंबर ११, २००१ रोजी वर्ल्ड ट्रेड सेंटरवर हल्ला झाला व त्यात १,५९५ लोक दुर्दैवाने मरण पावले. त्यामुळे लोकांनी विमानाने प्रवास करण्याचे कमी केले, स्वतःच्या गाडीने जायचे पसंत केले. लगेच मायकेल रोथचाईल्ड या विसकॉंसिन विश्वविद्यालयाच्या मानसशास्त्राच्या प्राध्यापकाने संशोधन करून पुढील माहिती लोकांसमोर ठेवली :

- तुम्ही दर आठवड्यास एकदा विमानाने प्रवास करीत असाल तर तुमची पळविलेल्या विमानात मरायची संधी साठ लाखांत एकदा, कारण ९/११ नंतर पुन्हा आतंकवादी हल्ला झाला नाही व हायजॅकर्स वर्षातून एकदाच विमान पळवितात.
- कोणच्याही वर्षी कारच्या अपघातात तुम्ही मरण्याचा ७,००० त १ दा चान्स.
- कोणच्याही वर्षी कॅंसरने तुम्ही मरण्याचे प्रमाणे ६०० त १ दा.

हे सांगण्याचे कारण अमेरिकन्स ९/११ मुळे किती घाबरले आहेत व त्याचा परिणाम म्हणून ताज्या निवडणूकीत ट्रंपसारख्या आजवर राजकारणाचा कसलाच अनुभव नसलेल्या नेत्यास देशाचा अध्यक्ष निवडून देण्यात झाला. अमेरिकन सरकारने जगभरच्या मुसलमानांचे गेल्या १६ वर्षांत सर्व बाबतीत एवढे शास्त्रीय संशोधन केले की विचारू नका. संशोधन करण्यासाठी अमेरिकेने साऱ्या जगातून तज्ञ गोळा केले, त्यांना मोठाले पगार दिले व त्यातून निरनिराळे शोध लावले. या शोधातून त्यांनी खर्च केलेल्या रकमेच्या दसपट नफा त्यांना मिळाला. प्यू रीसर्च सेंटर प्रमाणे २०१० साली जगात १.६ अब्ज मुसलमान होते, म्हणजे ते जगाच्या लोकसंख्येच्या २३ टक्के होते. जगात त्यांचा दुसरा क्रमांक आहे. त्यांनी त्यांचा तौलनिक *फर्टिलिटी रेट* चा अभ्यास करून मुसलमानांच्या लोकसंख्येत २०१० ते २०५० या काळात ७३ टक्के वाढ होईल असे भाकीत केले. त्या मानाने ख्रिस्त्यांत ३५%, हिंदूत २४% व ज्यूत १६% वाढ होईल. अमेरिकेची लोकसंख्या किती

वाढेल याचेही आकडे प्यूने पेश केले. म्हणून ट्रंपचा अवतार २०१७ साली झाला. मुस्लीम धार्जिणेपणापायी आपल्या येथे संख्याशास्त्रज्ञांची चक्क मुस्कटदाबी करण्यात आली. त्याउलट, प्यूने २०१५ साली *फर्टिलिटी* रेटमधील फरक प्रसिद्ध केला :

२०१० ते २०१५ या काळातील मुस्लीम व मुस्लीमेत्तर यांच्यातील फर्टिलिटी फरक		
देश	मुस्लीमेतर	मुस्लीम
सबसहारा आफ्रिका	२.६ ते ३.०	४.५ ते ५.६
मध्य पूर्व आणि उत्तर आफ्रिका	२.६ ते ३.०	४.५ ते ५.६
उत्तर अमेरिका	२.० ते २.७	४.५ ते ५.६
यूरोप	२.० ते २.६	४.५ ते ५.६
जग	२.३ ते ३.१	४.५ ते ५.६
(प्यू रीसर्च सेंटर)		

याच प्यू संशोधन केंद्राने जगातील मुसलमान असलेल्या देशात शरीया ह्या मुसलमानी कायद्यास किती पाठिंबा आहे याचाही शोध घेतला व अमेरिकन सरकारला मार्गदर्शन केले :

१. दक्षिण-पूर्व युरोप : रशिया (४२%); कोसोव्हो (२०); बोस्निया-हर्जगोविना (१५); आल्बानिया (१२).

२. मध्य आशिया : किर्गिझस्थान (३५%); ताजिकीस्थान (२७); टर्की (१२); कझकस्थान (१०); अझरबैजान (८).

३. दक्षिणपूर्व आशिया : मलेशिया (८६%); थायलँड (७७); इंडोनेशिया (७२).

४. दक्षिण आशिया : अफगाणिस्थान (९९%); पाकिस्थान (८४); बांगलादेश (८२)

५. मध्यपूर्व ते उत्तर आफ्रिका : इराक (९१%); पॅलेस्टाईन (८९); मोरोक्को (८३); इजिप्त (७४); जॉर्डन (७१); ट्यूनिशिया (५६); लेबॅनॉन (२९).

६. सबसहारा आफ्रिका : नायजर (८६); जिबुटी (८२); काँगो (७४); नायजेरिया (७१); युगांडा (६६); इथिओपिया (६५); मोझांबिक (६५); केनिया (६४); माली (६३); घाना (५८); सेनेगल (५५); कॅमेरून

(५३); लायबेरिया (५२); छाड (४७); गिनिआ बिसौ (४७); टांझानिया (३७).

प्रेमाचा थर्मामीटर

पाश्चिमात्त्यांचा सर्व गोष्टींचे युनिटस् ठरविणे व ते त्यात ''मापणे'' याची गंमत वाटते. प्यूने फिलींग (भावना) थर्मामीटर नावाचा एक सर्व्हे (डिसें. २०१५) तयार केला तो साऱ्या जगासाठी उपयोगी आहे, विशेषतः आळशी भारतीय हिंदूंसाठी. यात तपमान शून्य ते १०० आहे. त्यात अमेरिकनांना मुसलमानांविषयी वाटणारा आपुलकीचा ओलावा वा उब मोजली जाते. साधारण अमेरिकनास ४०, डेमॉक्रॅट पक्षास ४७, रीपब्लिकनांस ३३. याच्या उलट, अमेरिकनांना ज्यू, कॅथॉलिक, बौद्ध, हिंदू व मॉर्मन यांच्याविषयी प्रेमाचा उबदारपणा चांगला उंच (६०) जातो. अर्ध्या अमेरिकनांना (४९%) मुसलमान अमेरिकाविरोधी आहेत असे वाटते. ९०% नायजेरियन मुसलमानांना, विशेषतः बोको हरामांना, आयसिसविषयी आपुलकी वाटते. हेच प्रमाण पॅलस्टाईन (४०%), अफगाणिस्थान (३९), इजिप्त (२९) व बांगलादेश (२६) असे आहे. भारतीय तरुणांना कुतूहलाच्या पोटी थोडे आकर्षण (१०) तर त्यांच्या आईबापांना नफरत (२) वाटते. ५ वर्षानंतर ह्या प्रमाणात काही नकारात्मक फरक घडतात कां याकडे आपल्या गृह खात्याचे लक्ष आहे.

दुसऱ्या एका सर्व्हेप्रमाणे अमेरिकेत ६५% सुन्नी आहेत तर ११% शिया राहतात. अमेरिकेची दोस्ती सुन्नी सौदींशी आहे. नीट बघितले तर आजवर अमेरिकेने हल्ले चढविले ते शिया इराक, सिरीयावर. त्यामुळे अमेरिकन सुन्नींना त्याची ना खंत ना खेद. दुर्दैवाने, आपल्या मुसलमानी राजकारणात ह्या शिया-सुन्नींचा तौलनिक अभ्यास केला जात नाही. समोरच्या पक्षातील नर्मस्थाने शोधून काढून त्यांच्यावर हल्ला करणे व आपला फायदा करून घेणे यासच राजकारणाचा धंदा *(बिझिनेस ऑफ पॉलिटिक्स)* म्हणतात. शिवाजीने दक्षिणेतील शियांशी दुश्मनी केली व आपले राज्य वाढविले, मात्र सुन्नी औरंगझेबास फारसे डिवचले नाही. वेळ येताच तो सुन्नींविरुद्ध शिया राजांना मदतीसाठी धावला. जे इतिहासापासून काहीच शिकत नाहीत, ते नाश पावतात.

''हा सर्व खटाटोप कशासाठी?'' मी माझ्या ओळखीच्या भारतधार्जिण्या अमेरिकन सिनेटरला विचारले. तो म्हणाला, ''कारण आम्हास विश्वावर राज्य करायचे आहे. तुम्हाला तर तुमचा देशसुद्धा सांभाळता येत नाही.'' त्याचे बोलणे मला फार खटकले. म्हणून नमुन्यासाठी वरील माहिती व तत्त्वे मी पेश केले. असे

शंभर तक्ते अमेरिकेकडे तयार आहेत. जागेच्या अभावी मी ते देऊ शकत नाही. याउलट आमचे लोकप्रतिनिधी काय करीत आहेत? लोकसभेत मारामारी व दंगे. ज्ञान हे मोठे शस्त्र आहे व वेळ येताच ते नीट वापरलेच पाहिजे, हे ते विसरले तर कसे होणार? हे विद्वान वा संशोधक लालुसारख्या अडाणी लोक प्रतिनिधींना भेटणे टाळतात. बोलायचे ठीक आहे, पण कशावर? त्याचे काही ज्ञान तर पाहिजे. प्रतिनिधींचे नाही, पण त्यांच्या अज्ञानातून निर्माण होणाऱ्या उद्धटपणाचे त्यांना भय वाटते. या मंडळींना राजकारण म्हणजे पैशांची टांकसाळ वाटते, ते विकास वा लोकहित जाणत नाहीत. परिस्थिती मोठी बिकट आहे. तिच्या मुळाशी गुलामी मानस आहे. दुर्दैवाने, गेल्या ७० वर्षांत ते कोणी बदलण्याचे प्रयत्न केलेलेच नाहीत. मोदींना हे मानस बदलायचे आहे, जीवनशैली बदलायची आहे.

भयाची चांगली बाजू

भय स्वतः वाईट नाही, भय जगण्यासाठी आवश्यक आहे. भय नसते तर आपण दरीत उडी मारली असती व मानव वंश नष्ट झाला असता. उत्क्रांती *(इव्होल्युशन)* म्हणजे जगण्यासाठी स्वतः केलेले शारीरिक व मानसिक बदल. उत्क्रांतीचे पहिले पाऊल म्हणजे जिवाणू आणि विषाणू यांचे उत्पादन. त्यांनी सजीवांवर हल्ले सुरू केले, त्यामुळे स्वतःला वाचविण्यासाठी सजीवांना आपल्यांत बदल घडवावे लागले. १८५९ साली या उत्क्रांतीच्या मानसशास्त्राची चार्लस् डार्विनने सुरवात केली, १९६०च्या दशकात नोआम चॉम्सीने त्याचा व भाषेचा संबंध जोडला तर २००० साली जॉफ्रे मिलरने त्याचा सेक्सशी संबंध लावला. पुरुषांच्या या दुनियेत माणूस सर्वात जास्त कशाला घाबरत असेल तर मरणाला, त्याच्या खालोखाल अपयशाला, त्यानंतर लोकप्रियतेच्या ओहोटीला, त्यानंतर अनुक्रमे नोकरी, यौवन व आरोग्य हातातून निसटण्याला. ९/११ नंतर अमेरिकेतील भयाच्या कारणांचा क्रम बदलला. सरकारी अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराचा पहिला व आतंकवाद्यांचा दुसरा क्रमांक आज आहे. आपल्या जवळच्या नातेवाईकाचा मृत्यू – बंदुकीच्या गोळीने किंवा अन्य कारणाने – त्याचा तिसरा क्रमांक. येथे तर्कापेक्षा भावना जास्त काम करते. यातून दोन प्रश्न वर येतात : गुन्हेगारांना भय वाटते कां? मुसलमान जिहादींना भय वाटते कां? भय तर दोघांना वाटते, पण दोघेही त्या भयावर कशी मात करतात, ते पाहणे मनोरंजक ठरते. आतंकवादी अल्लाच्या नावाने काफीरांना ठार मारतात व त्या कृत्यास जिहाद म्हणतात. खरे म्हणजे इस्लामचा व आतंकवाद्यांचा संबंध नाही. आतंकवादी निर्ढावलेले गुन्हेगार आहेत.

ते प्रसिद्धीसाठी हपापलेले खुनी आहेत, उदा. ओसामा बिन लादेन व ऐमन अल् जवाहिरी. कोणचाही गुन्हेगार जेव्हा गुन्हा करतो तेव्हा तो गुन्हा आपण काही चांगल्या कामासाठी केला असाच दावा करतो. एखादा जिहादी काफर वा शिया ठार मारतो, तेव्हा आपण धर्मयुद्ध लढत आहोत, असा तो दावा करतो. तो बाँब फेकतो किंवा एखाद्या सुईसाईड बाँबर ला बळी देतो किंवा मशिदीतील शेकडो जणांचे प्राण घेतो, तेव्हा त्याचा तोच दावा असतो. पण ह्या दाव्यातील सत्य खोटे व पिरगाळलेले किंवा विकृत असते. हा आतंकवादी अशा वेळी कुराणाचा आधार घेतो. कुराणात हिंसाचाराचा बराच संदर्भ आढळतो : "जेथे मिळतील तेथे काफिरांना ठार करा. (९.५) जेव्हा धर्मावर श्रद्धा नसणाऱ्यांशी लढायची वेळ येईल तेव्हा त्यांच्या मानेवर एक मुक्का जोरात ठेवून द्या." (४७.४) तसे बघायला गेलात तर बायबलात व गीतेतदेखील असे संदर्भ आढळतील. "मी पृथ्वीवर आलो ते शांततेसाठी नाही, तलवारीसाठी. (मॅथ्यू १०.३४-३६)" महाभारतात एकमेव अपवाद. भीष्मांनी धर्मराजांना सांगितले,

"अहिंसा परमो धर्मः तथा हिंसा परो धर्मः ।
अहिंसा परमं दानं अहिंसा परमं तपः ॥"

(मभा. १३.११६.२५)

संस्कृतीच्या शिडीवर हिंदू खूप वर उभा आहे. आणि मुसलमान एकदम खाली. म्हणून हिंदू अहिंसेची, नम्रतेची व प्रेमाची भाषा बोलतात. आणि मुसलमान, हिंसेची, द्वेषाची व अरेरावीची. आज दोन प्रयत्न दिसतात - एक उंचावर उभे राहिलेल्या हिंदूस खाली ओढणे व दोन, खाली असलेल्या मुसलमानास वर खेचणे. पहिला सोपा आहे, पण भाजपा त्याच्या विरुद्ध आहे. दुसरा अवघड, नव्हे अशक्य, आहे, खूप वेळ व पैसा खाणारा आहे व धार्मिक गुरूंना तो नको आहे, त्यात त्यांचे महत्त्व कमी होईल.

द्वेष

द्वेषाने द्वेष वाढतो. तो फक्त प्रेमाने कमी होतो. माणसे बऱ्याच भिंती बांधतात, पूल नाही. आपण समोरच्यास समजवून घेतले तर दोघात प्रेम वाढते. द्वेषास मग जागा उरत नाही. भीतीने क्रोध निर्माण होतो, क्रोधातून द्वेष आणि द्वेषातून मनःस्ताप. म्हणून मनात भीती व राग निर्माण करू नका. द्वेष एका दिवसात निर्माण होत नाही, त्याला अनेक प्रसंगांची वा घटनांची पार्श्वभूमी लाभलेली असते. अहंकारातून नकारात्मक विचार मनात येतात, त्यातून ईर्षा निर्माण होते,

ईर्षेतून द्वेष निर्माण होतो. जर्मनांना वसाहतवाद्यांचा द्वेष कां निर्माण झाला? कारण इंग्रज व फ्रेंचांनी जर्मनांचे खूप शोषण केले होते, त्यांना खूप अपमानकारक वागणूक दिली होती, त्यांना पहिल्या महायुद्धांत हरविले होते. म्हणून त्यांनी दुसरे महायुद्ध खेळले. त्यानंतर "पुन्हा कधीच नाही" *(नेव्हर अगेन्)* हा शब्दप्रयोग वापरात आला. पॅलेस्टाईनी लोक ज्यूंवर हल्ले चढवितात, रूवांडात हजारो माणसांची कत्तल होते, बोसनियात हजारो मुसलमानांची हत्या होते व ९/११ रोजी हजारो अमेरिकन्स ठार मारले जातात. सुरवातील निश्चित् त्याचे दुःख सतावते पण रोज रोज तेन्तेच घडते व माणूस कोडगा बनतो. त्याला परपीडेतच सुख वाटायला लागते. त्याचा मौल्वी सांगतो : इस्लाम खत्रे मे है। धर्माची ढाल स्वसंरक्षणार्थ असतेच. दोष धर्माचा नसतो, धर्माच्या दलालांचा असतो. एकटेदुकटे प्रसंग नाहीत. भारताचा इतिहास चाळला तर पानापानावर मुसलमानांनी निष्पाप व निर्दोष हिंदूची कत्तल केलेली व त्यांच्या पवित्र मंदिरांचा विध्वंस केलेला आढळतो. हे भांडण खरे म्हणजे फाळणीनंतर मिटायला पाहिजे होते. पण भारताच्या आदर्शवादी गांधी-नेहरूंनी फाळणी धर्माच्या आधारावर झाली असताना मुद्दामच हिंदू व मुसलमान लोकांची अदलाबदल केली नाही व द्वेषाचे मूळ चालूच ठेवले. त्यांना मुसलमान ही व्होट बँक वाटली. जीना व डॉ. आंबेडकर त्या मानाने समंजस, त्यांनी लोकांच्या अदलाबदलीचा मार्ग सुचविला होता. गांधी-नेहरूंनी त्यांच्या स्वतःच्या अहंकारासाठी व राष्ट्रीय सुरक्षा समजाच्या अभावी १० लक्ष माणसांचा बळी दिला! त्यास अहिंसा म्हणतात.

भारत-पाकिस्थानातील वाद भविष्यात कधी संपेल काय? भारतातल्या भारतात हिंदू व मुसलमानांतील गेली ५०० वर्षे चालणारी संघर्ष व द्वेषाची आग संपुष्टात येईल काय? त्या दोघांत समाधान होईल काय? त्यासाठी गांधीजींनी मुस्लीम हा आपला छोटा भाऊ आहे, असे सांगून १९१५ ते १९४८ अशी ३३ वर्षे मुसलमानांचे तुष्टीकरण करण्याचे शिकविले. त्यातून काय मिळविले? देशाची फाळणी व २ देशांमधील ५ युद्धे आणि एका देशाचे फुटून निघणे. गेल्या ७० वर्षांत काँग्रेसजवळ पाऊण कालखंड सत्ता होती. लोकांना काँग्रेस हवी होती कां? नाही, काँग्रेसचे सतत *मायनॉरिटी* सरकार राहिले. ५५ टक्के लोक मतदान करतात. सत्ता जिंकायला २८ टक्के मतांची जरूर असते. मुसलमान, आदिवासी व दलित तेवढी मते पुरवीत. काँग्रेसला इतरांच्या मतांची जरूर कधी लागलीच नाही. स्वातंत्र्यपूर्व काळात गांधीजी फॉर्म्युला फसला. नंतरच्या काळात काँग्रेस फॉर्म्युला यशस्वी ठरला, पण हिंदू हिताचा बळी देऊन. *ॲट द कॉस्ट ऑफ हिंदूज्.* काँग्रेसच्या

हिंदू द्वेषाची परिणती सावरकरांसारख्या सच्चा हिंदू नेत्यांची उपेक्षा करण्यात झाली. संरक्षण मंत्रालयाने एकाही संरक्षण प्रकल्प वा रणगाडा वा फायटर जेट वा पाणबोटीस सावरकरांचे नाव दिले नाही. अगदी पवारांसारखे मराठी संरक्षणमंत्री असतानादेखील. साऱ्या हिंदूंची मने मेलेली नव्हती. अशा अपवादात्मक हिंदूंना सत्ताधाऱ्यांचा जरूर संताप आला. कॉंग्रेसने पाठिंबा दिला. हिंदू सोशिक व सहिष्णु म्हणून फक्त गांधीजी, इंदिरा व राजीव यांची हत्या झाली. या हत्या हिंदू द्वेषाचे प्रतीक होत्या हे कोणी लक्षातच घेतले नाही. बाबरी मशिदीचा विध्वंस हेसुद्धा त्याचेच प्रतीक आहे. हा द्वेष असाच पुढे चालू राहिला व भारतास एखादा ट्रंपसारखा नेता मिळाला तर भविष्यात आणखी काय काय होईल ते सांगता येत नाही. मुसलमान जगांत तर असुरक्षित आहेत, ते भारतातही तेवढेच असुरक्षित आहेत. त्यांना चांगला नेता मिळत नाही व त्यांना सुबुद्धी सुचत नाही, हे त्यांचे तर दुर्दैव आहेच, पण भारताचेदेखील तेवढेच अभागीपण आहे. कारण, द्वेष म्हणजे शेवटी नुकसान - तुमचे, आमचे व देशाचे. लक्षांत ठेवा, मुसलमानांनी केलेली हिंसा ही अस्सल व मूळची (ओरिजिनल) असते. तीचा जन्म त्यांच्या काल्पनिक वा खऱ्या असुरक्षितेतून होतो. हिंदूंनी केलेली हिंसा नक्कल व प्रतिक्रिया असते.

शुद्धाचा आग्रह

सर्वजण शुद्ध गोष्टी अधिक पसंत करतात, मग ती गोष्ट स्त्री असो, का सोने असो का धर्म. सोन्यासारख्या गोष्टीत तांबे मिसळावेच लागते, तरच सोन्याचे दागिने आपण वापरू शकतो. औषधात भेसळ असेल तर ते मृत्यूला आमंत्रण ठरते. इस्लाम धर्म जसजसा वाढत गेला तसतसे त्यात इतर संस्कृती व परंपरा यांची भेसळ वाढत गेली. त्यामुळे इस्लाम हा धर्म बदलला, बिघडला, त्यातील भेसळ काढून टाकण्याची वेळ आली आहे, असे जुन्या लोकांना वाटणे साहजिक होते. पाकिस्थानच्या नावातच ही शुद्धतेची भावना होती : पाक+इ+स्थान. भारतात हिंदू संस्कृती होती. सहवासामुळे इस्लाम शुद्ध राहू शकत नाही, हिंदुत्वाचे संस्कार त्यास भ्रष्ट करतात, त्यामुळे ही भेसळ दूर करणे हा एक मुद्याचा प्रश्न समोर ठेवून इस्लामला पाक ठेवणे व त्या शुद्ध इस्लामचे राज्य स्थापन करणे हा आता काही सनातन्यांचा धर्म होऊन बसला आहे. पहिले इस्लामिक राज्य १९९६ मध्ये तालिबानने अफगाणिस्थानात सुरू झाले. त्याचे नवे नाव होते युनायटेड इस्लामिक फ्रंट. २००१ नंतर युनोत व जगात ते इस्लामिक रिपब्लीक ऑफ अफगाणिस्थान म्हणून ओळखले जाऊ लागले. बुऱ्हाणउद्दीन रब्बानी त्याचे पहिले अध्यक्ष होते.

इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड सिरीया चा (आयसिस) जन्म त्यानंतरचा. त्याचा जन्म जून २०१४ चा, त्याची जननी अल् कायदा, कायदा शरियतचा व प्रमुख खलिफा. जाहीरपणे अनेकांना फाशी देण्याबद्दल आयसिस बदनाम होत होते. त्याचा जगभर विस्तार सुरू होता व हिंसा भीतीदायक होती - २१ देशात ९० हल्ले आणि १,४०० जणांची कत्तल. राजधानी मोसुल. २०१४ साली आयसिसकडे ३४,००० चौ. मैल जमीन होती व २०१६ च्या पहाणीप्रमाणे ३,५०० गुलाम आयसिसच्या मालकीचे होते. त्यात स्त्रिया व मुले प्रामुख्याने आहेत. सिरीयाचे ऐतिहासिक महत्त्व आहे : "रोमचे ख्रिस्ती सैन्य व इस्लामी सेना यांचे अंतिम युद्ध येथे होईल," असे भाकीत प्रेषित महंमदसाहेबांनी केले होते. आयसिसचे युद्ध यंत्र *(वॉर मशीन)* २ अब्ज डॉलर्सचे आहे. हा पैसा ते सरकार तेल (पेट्रोल), खंडणी, कर व महत्त्वाच्या लोकांना पळविण्यातून व त्याच्या मोबदल्यात मिळणाऱ्या पैशातून जमा होतो. सद्दाम हुसेनचे माजी लष्कराचे सैनिक त्यास आयते मिळाले आहेत. २००४ साली अल बगदादीला अमेरिकेने मुक्त केले. त्याने अल खलिफा इब्राहीम हे नवे नाव स्वीकारून तो आता खलिफा बनला आहे. अल कायदाची स्थापना अबु मुसाब अल जवाहिरीने २००४ साली केली व २००६ मध्ये शियांविरुद्ध मोहीम सुरू केली. १०-११ जून २०१४ रोजी त्यांनी मोसुल व तिक्रित घेतले. आपण जगातील १.५ अब्ज मुसलमानांचे खलिफा आहोत असे त्याने २९ जून २०१४ रोजी जाहीर केले. दुसऱ्या दिवशी १२ लाख मुसलमान बेघर झाल्याचे युनोने घोषित केले. १५ फेब्रुवारी २०१५ रोजी प्रे. ओबामांना आयसिसशी लढण्यास काँग्रेसने परवानगी दिली. आयसिसने २१ इजिप्तच्या ख्रिस्त्यांची मुंडकी उडविली. इजिप्तने सिरीयावर आकाशातून बॉंबवर्षाव केला. ७ मार्च २०१५ रोजी नायजिरीयन बोको हरामने सिरीयन खलिफास मान्यता दिली. १ एप्रिल २०१५ रोजी शियांनी हल्ला चढवून तिक्रितवर आपले प्रभुत्व मिळविले. १३ नोव्हेंबर २०१५ रोजी पॅरीसमध्ये आयसिसच्या ६ आत्मघाती बॉंबर्सनी १२९ फ्रेंच लोक ठार मारले. २१ फेब्रुवारी २०१६ रोजी आयसिसने १२२ माणसे दमास्कसमध्ये मारली. डोनाल्ड ट्रंप व पुटीनचे टेलिफोनवरून बोलणे झाले व दुसऱ्या दिवसापासून (१५ नोव्हेंबर २०१६) अलेप्पोवर रशियन विमाने झेपावू लागली. एके काळचे दोन कट्टर शत्रू निष्पाप नागरिकांना वाचविण्यासाठी एकत्र आले. ते समीकरण उलटविण्यासाठी पाक-चीन युती झाली. मोदींना पहिली युती पसंत आहे, दुसरी अजिबात नाही. पाकिस्थानला जगाने 'रोग नेशन' जाहीर करावे यासाठी मोदीजींचे जोरदार प्रयत्न सुरू आहेत.

आयसिस एवढे गरम का?

घरी फार कडक सोवळेपणा असला की तो जाचक ठरतो व त्यामुळे नवीन पिढी बंडखोर निघते. याचा पुरावा म्हणजे कर्मठपणामुळे मानसिक विकृती सुरू झाल्या व बगदाद येथे ७०५ साली आणि कैरो येथे ८०५ साली वेड्यांची हॉस्पिटले सुरू झाली. बऱ्याच स्त्रियांना निद्रानाशाचा विकार होई, त्यातून *सायकोसिस.* केंब्रिजमध्ये मुस्लीम मानसशास्त्राचा लहानसा सर्टिफिकेट कोर्स आहे. आपल्याकडे इस्लामिक स्टडीज् सर्व विश्वविद्यालयातून शिकविण्याची सोय नाही. गुलामगिरीने आपली ज्ञानजिज्ञासा मृत किंवा मृतवत् झाली आहे. इस्लामकडे शत्रू म्हणून पाहण्याच्या दृष्टिकोणाकडून आपण त्या धर्माचा नीट अभ्यास करीत नाही. पाश्चिमात्त्य प्रत्येक गोष्टीचा शास्त्रीय अभ्यास करतात व त्यापासून त्यांना राजकीय व आर्थिक फायदा मिळतो. दाराने नाही का उपनिषदांची पर्शियनमध्ये भाषांतरे करवून घेतली? हिंदू व मुसलमानांनी जुने ग्रह सोडून नव्याने अशा अभ्यासाची सुरवात केली पाहिजे. ''सारे कुराणात सांगितले आहे,'' असे गृहीत धरले की तुमच्या सभ्यतेचा विकास कसा होणार, तुम्ही पाश्चिमात्त्य देशांशी स्पर्धा कशी करणार? असा विचार इराक, इराण, कैरो वगैरे ठिकाणी होऊ लागला होता. आणि मुसलमानांच्या कमनशिबाने तालिबान चळवळ सुरू झाली व हा शैक्षणिक विकास एकदम ठप्प झाला. अफगाणिस्थान व पाकिस्थान येथे घडले म्हणून ते लोक भारतात आले. भाजपाने व संघाने यावर भर देऊन आपल्या संस्थेत इस्लामी स्कॉलर्स निर्माण केले पाहिजेत. फार बंधने आली की तुमची क्रियाशक्ती *(क्रिएटिव्हीटी)* मंदावते, म्हणून शिष्यांना प्रश्न विचारण्यास प्रवृत्त करा, असे भारतीय धोरण (कस्त्वं, कोहं, कुत आयातः? कामे जननी, को मे तातः) पुढे जगभर पसरले. इस्लामी मूळवाद्यांनी प्रश्न विचारण्यास बंदी केली, स्त्रियांना 'चूल व मूल' यातच अडकवून टाकले. त्यामुळे इस्लामचा विकास थांबला. तालिबान चळवळीने प्रथम अफगाणिस्थानचे, मग पाकिस्थानचे, नंतर काश्मीरचे व नंतर भारतातील मुसलमानांचे अतोनात नुकसान केले. सोव्हिएट सैन्याशी लढताहेत ना, ठीक आहे, असे म्हणून अँग्लोअमेरिकांनी त्यांना खतपाणी घातले. मौ. महंमद ओमर (१९९६-२०१३) व ओसामा बिन लादेन (१९९७-२०११) हे महानायक ठरले. जेव्हा त्यांनी ११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटर चे पानिपत केले, तेव्हा अमेरिकेची झोप उडली व त्यांनी या आतंकवाद्यांची हत्या करण्याचे सत्र सुरू केले. क्रिया व प्रतिक्रिया सुरू राहतात. इस्लामचा पाश्चिमात्त्यांवरील संताप समजण्यासारखा आहे. ''त्यांनी इस्लामला वापरले, आमचे तेल वापरले, इस्लामची शुद्धता नष्ट केली, त्यामुळे मुसलमान

बिघडले, त्यामुळे आम्हास अमेरिकेस धडा शिकवायचा आहे व मुसलमानांना पाक (शुद्ध) बनवायचे आहे,'' अशी त्यांच्या सनातन्यांची भूमिका आहे. त्यात सूड आहे आणि तळमळसुद्धा. आणि जाज्वल्य धर्माभिमान. त्यांचे नवे निर्बंध फारच जाचक आहेत.

१. **पुरुषांसाठी** : संगीत ऐकायचे नाही किंवा, वाजवायचे नाही. सिनेमा, टीव्ही व व्हिडीओज् पहायचे नाहीत. २१ मार्च रोजी पारंपरिक पर्शियन नवे वर्ष साजरे करायचे नाही. त्या दिवशी रजा द्यायची नाही. १ मे ला साम्यवादी कामगार दिवस साजरा करायचा नाही व रजा द्यायची नाही. मुलांना बिगर-इस्लामी नावे ठेवायची नाहीत. तशी नावे आढळली तर ती बदलायची. केस कापण्यावर बंदी आणणे. दाढीमिशा वाढविल्याच पाहिजेत. मुसलमानी वेश व टोपी घातलीच पाहिजे. मशिदीत ५ वेळा नमाज पढलाच पाहिजे. पक्षांना पिंजऱ्यात ठेवून पाळायचे नाहीत. मॅचेस पहाताना टाळ्या वाजवून खेळाडूंना प्रोत्साहन द्यायचे नाही, त्यावेळी *'अल्ला हो अकबर'* च्या घोषणा द्यायच्या. पतंगी उडवायच्या नाहीत. बिगर-इस्लामी साहित्य वाचायचे नाही. मुसलमानाने धर्म बदलला तर त्यास फांशीची सजा द्यायची. विद्यार्थ्याने पागोटे घातलेच पाहिजे. ज्यूंनी नाझी आमदानीत केले तसे बिगर मुसलमानांनी कपड्यांवर पिवळा बॅज लावलाच पाहिजे. इंटरनेटवर बंदी. वगैरे, वगैरे.

२. **स्त्रियांसाठी** : स्त्रियांनी सारे शरीर झाकून घ्यावे. कपडे पातळ वा रंगीत वा घट्ट वा शरीर दाखविणारे नसावेत. त्यांना अत्तर आणि पुरुषी कपडे वर्ज्य. त्यांनी काळा पायघोळ बुरखा घातला पाहिजे. त्याच्या पादत्राणातून वा वस्त्रांतून आवाज न आला पाहिजे. रस्त्याच्या मधून त्यांनी चालायचे नाही. नवऱ्याच्या परवानगीशिवाय त्यांनी घराबाहेर पडायचे नाही. परक्या पुरुषांशी त्यांनी बोलायचे नाही; अगदी आवश्यकच असेल तर हळू आवाजात व हांसल्याशिवाय बोलायचे. परक्यांकडे त्यांनी पाह्यचे वा त्यांच्याबरोबर मिसळायचे नाही.

३. **तालिबानांची स्त्रियांवरील बंधने** : तालीब म्हणजे विद्यार्थी. मदरसांत शिकणारे विद्यार्थी. त्यांना सोव्हिएट सैन्याशी लढण्यासाठी मौ. महंमद ओमर यांनी रीक्रूट म्हणून भरती केले, त्यांचे लष्करी संघटन (१९९४-९६) केले, सरकार (१९९६-२००१) चालविले आणि २००२ पासून आजवर अमेरिकेविरुद्ध बंडाळी केली. शिस्तपालनात हा पुरुष, ही स्त्री, असा भेद करून चालत नाही.

स्त्रियांनी घराबाहेर शिक्षिका, इंजिनियर, वगैरे कामे करू नयेत. डॉक्टर वा नर्सचे काम काबूलमधील हॉस्पिटलात केले तर चालेल. घराबाहेरील कोणचेच काम

वर्ज्य, घराबाहेर जायचे असेल तर वडील, भाऊ, किंवा नवरा तेथे हजर असायला पाहिजे. त्यांनी पुरुष डॉक्टरांकडून ट्रीटमेंट न घेतली पाहिजे. दुकानदारांबरोबर त्यांनी बोलले नाही पाहिजे. त्यांनी शाळेत, कॉलेजात वा शैक्षणिक संस्थेत नोकरी करायची नाही. (तालिबानाने शाळांचे रूपांतर मदरसात केले.) इस्लामचे नियम न पाळणाऱ्या स्त्रियांना शिव्याशाप ऐकायला मिळतील व चाबकाने चोपले जाईल. शुद्धता महत्त्वाची. विवाहबाह्य संबंध ठेवणाऱ्या स्त्रीस दगडांनी ठेचून मारले जाईल. नातेवाईकांशिवाय स्त्रीने टॅक्सीने प्रवास करायचा नाही. स्त्रियांसाठी खेळांवर बंदी. रेडिओ, टीव्ही व ईदच्या किंवा इतर जाहीर समारंभात त्यांनी भाग घ्यायचा नाही. मोटर बाईक चालविण्यावर बंदी आहे. त्यांच्या नदीच्या काठी वा तलावावर कपडे धुण्यावर बंदी. त्यांनी बाल्कनीत उभे राहण्यावर बंदी. खिडक्या उघड्या ठेवायच्या नाहीत. पुरुष शिंप्यानी स्त्रियांच्या दालनात जाण्यावर बंदी. स्त्रियांना पब्लिक बाथ वर जायची बंदी. पुरुषांसाठी व स्त्रियांसाठी वेगळ्या बसेस असतील. त्यांनी रूंद पँटस् बुरख्याखालीपण वापरायच्या नाहीत. स्त्रियांचे फोटो काढणे वा व्हिडीओ घेणे कायद्याने बंद. त्यांचे फोटो पेपरात वा पुस्तकांत छापण्यावर बंदी.

हिंदूंवरही राग

हिंदूंना शिस्त मोडणे मनापासून आवडते, पाळणे नाही. ती कायदेभंगाची कला गांधीजींनी हिंदूंना शिकविली. हिंदू व मुसलमान यांच्यात पॅरीटी ठेवण्याचे कामही त्यांचेच. ती चळवळ दोन गृहमंत्र्यांनी - सुशीलकुमार शिंदे व चिदंबरम् - पुढे चालविली व असीमानंद, साध्वी प्रज्ञा सिंग, कर्नल पुरोहित वगैरे मंडळींवर हिंदू आतंकवादी असल्याचा आरोप ठेवून त्यांना कडक शिक्षा देऊन पाकिस्थानचे हात बळकट केले व त्यांच्या प्रचार खात्यास भरपूर इंधन पुरविले.

दिल्लीत १९९२ साली पृथ्वीराजाचे राज्य गेले व महंमद घोरीचे गुलाम घराण्याच्या कुतुबद्दीन ऐबक यांची मुसलमानी राजवट आली खरी, पण मुसलमानांना जे पर्शियात (६३३-४१) घडले त्याची पुनरावृत्ती येथे होणार अशी भीती वाटू लागली. त्यांची भीती खरी ठरली. पर्शियात अरब योद्धे जिंकले पण पर्शियन संस्कृतीचा पराभव झाला नाही. भारतात मुसलमान जिंकले पण त्यांना क्षणोक्षणी सामाजिक, नैतिक, व्यावहारिक व धार्मिक बाबतीत हिंदू श्रेष्ठत्व खुपत होते. त्याचे वर्णन १९११ साली बॅ. मझर-उल-हक यांनी लिहून ठेवले आहे :" मुसलमानांच्या जन्मापासून मरणापर्यंत होणाऱ्या अनेक व्यवहारांत व समारंभात हिंदू चालीरीती पावलोपावली घुसलेल्या आहेत. लहान मुलांना उद्देशून मुसलमानात जी गाणी

म्हणतात त्यात 'नंदलाल सावळिया' वगैरे कृष्णवाचक शब्द जेथे तेथे आढळतात, उदा.

अलबेलिने मुझे दर्द दिया ।
सावळियाने मुझे दर्द दिया ।।

गर्भधारणेपासून मूल जन्मेपर्यंत स्त्रियांसंबंधातले साजरे करण्यात येणारे सारे समारंभ हिंदूच आहेत, उदा. उष्टावण, नाककान टोचणे, स्त्रियांची ओटी भरणे इत्यादी. त्यात दुर्वा, हळद, तांदूळ, गूळ, नारळ, दही, तेल वगैरे पदार्थ वापरले जातात. लग्नात निका पढणे एवढाच काय तो मूळ मुसलमानी समारंभ. लग्नात शहानक नावाचा दहीभात खाण्याचा विधि करतात, तो जोधाबाईने जहांगीर बादशहाच्या काळी सुरू केला. पुनर्विवाहित किंवा अपवित्र स्त्रियांना दहिभातासाठी बोलावीत नाहीत. भांगातील शेंदूर हिंदू चाल. लग्नातील गाणी हिंदी. तिजा, चेहलम्, बरसी हे मुसलमानी मरणविधि मूळचे हिंदू. पुनर्विवाह मुसलमानात करतात पण तो हीन मानण्याची भावना मूळ हिंदूच. मुजुमदार, फत्तेबहाद्दूर, जंगबहाद्दूर, संगादीन, मातदीन वगैरे मुसलमानी नावे मूळ हिंदू. महाराष्ट्र, कर्नाटक, बंगाल, गुजराथ, आंध्र वगैरे राज्यांत अजून मुसलमान घरी व दारी स्थानिक भाषेचाच वापर करतात. सर्वत्र उर्दूची भाषिक चळवळ आहे पण मर्यादित. अजून मुसलमानांचे उच्चार, ठसके, हावभाव, बोलण्याचा आविर्भाव, वाक्प्रचार व हातवारे हे सारे त्या त्या भागातील हिंदूंप्रमाणेच आहेत. "१९३० व १९४० च्या दशकांत लाल तुर्की गोंडावाली व काळी फेज टोपीची फॅशन होती. त्या काळच्या धवलश्वेत सिनेमात ती फॅशन दिसून येते. आजतरी पुरुष इंग्रजी शर्टपॅंट वा टी-शर्ट आणि लुंगीत दिसतात व मुली आणि स्त्रिया साड्यात किंवा पंजाबी ड्रेसमध्ये. स्कूटर वा बाईक चालवायला पंजाबी ड्रेस बरा पडतो."

मुसलमानात मूर्तिपूजा नाही. पण हिंदू असताना झालेले मूर्तिपुजेचे संस्कार कसे जाणार? म्हणून बाटल्यावर ताबूताची पूजा सुरू झाली. पंजे, नालपीर, नालसाहेब म्हणजे मूर्ती नाहीत तर काय आहे? हिंदू मूर्तीत प्राण ओतून (प्राणप्रतिष्ठा) त्यांना जिवंत समजून त्यांची पूजा करतात. मुसलमान प्रेताची पूजा करतात. हे मी म्हणत नाही, संत एकनाथांनी म्हणून ठेवले आहे, "आम्ही पूजा फत्तरे। तुम्ही का मुड्यावरी ठेविता चिरे? ।।" डोले म्हणजे काय? ताबुतातील डोले म्हणजे तिरड्या. मेलेल्यांची स्मारके करणे, कबरी बांधणे, हे इस्लामी धर्माविरुद्ध आहे. कराचीस जा, मोठी जीनांची कबर दिसेल. (पुढे ती अडवाणींची कबर ठरली! ते डेप्युटी पीएम झाले, पीएम नाही! खुद्द महंमद पैगंबरांची कबर नाही, पण भारतात राहून शहा,

सुलतान व पातशहांनी आपल्या कबरी बांधून घेतल्या - अगदी औरंगझेबानेदेखील. ही हिंदूंच्या मूर्तिपुजेची नक्कल नाही? अकबर तर सोवळ्या ब्राह्मणाप्रमाणे राह्यचा! या बादशहांचे मुखवटे नाण्यांवर खरेच? (देवास न मानणाऱ्या नेहरूंचाही मुखवटा नाण्यावर खराच!)

हा पीर, तो दर्गा वगैरे पूजास्थाने भारत सोडून कोठल्याच इस्लामी देशात दिसत नाहीत. ती हिंदू समाधीची सहीसही नक्कल आहे. मुसलमानांचे उरूस भरतात ती स्थाने मूळची हिंदू आहेत. मूळ साधू वा सत्पुरुषाची समाधी, मग शंकराच्या पिंडीची स्थापना व नंतर इस्लामी आक्रमणामुळे दर्गा व उरूस. बऱ्याच ठिकाणी दर्ग्याचे पुजारी हिंदू व मुसलमान आहेत. जव्हार येथील राजवाड्याबाहेरील पिरास सदोबा म्हणतात. तो मूळचा सदानंद नावाचा सत्पुरुष होता. त्याचा पुजारी मुसलमान आहे. नगरच्या पीरास विठोबा म्हणतात. अहमदाबादेस मलीकसहान याच्या कबरीस नरसोबा म्हणतात. कल्याणच्या टेकडीवरील पीरास बाबा मलंग म्हणतात व त्याचे पुजारी केतकर म्हणून ब्राह्मण आहेत. चिंचवड भागातील मुसलमान संकष्ट्या करतात. पंढरपूर भागातील मुसलमान एकादशा करतात. वाडी, औदुंबर, गाणगापूर वगैरे विभागातील बरेच मुसलमान शनिवारचा उपास करतात. हॅबिटस् डाय हार्ड! पुष्कळ हिंदू या दर्ग्यांना नवस बोलतात. तसेच बरेच मुसलमान हिंदूंच्या यात्रांना जातात व हिंदू देवतांना भजतात. टिपू सुलतान प्रचंड हिंदूद्वेष्टा. १७९१ त पेशव्यांनी त्यावर एवढा जोरदार हल्ला चढविला की टरकलेल्या टिपूने हिंदू देवता व शंकराचार्यांचे पाय धरले. हरिपंत फडके लिहितात : "रंगस्वामींपाशी व शिवालयी ब्राह्मण अनुष्ठानास घालून प्रयोग चालविले आहेत. एक ब्राह्मण जलात मस्तक ठेवून २-२ प्रहर वरती पाय करून अनुष्ठान करीत आहे. बहुत ब्राह्मणांकरवी अनुष्ठाने चालविली. त्यात कोणी भोजन करून आहेत, कोणी निरशनाचा फराळ करून आहेत. शृंगेरीकर स्वामी यास तेथे नेले आहे. ते उपवास करतात. त्याजकरता भोजनाविशी बहुत बहुत आग्रह केला. त्यांनी उत्तर दिले जे, भोजनाचा प्रकार ज्या वेळी घडेल तेव्हा करीन. तेव्हा बहुत प्रकारे सांगितले जे, तुम्ही स्वस्थ असावे, द्रव्य पाहिजे तितके देईन. सर्व यथास्थित करून देईन. याप्रमाणे बोलोन सुवर्णप्रतिमा फार काही एक करून दिल्या. ४० सहस्त्राचा शिधा ब्राह्मण भोजनाकरिता देवीला. पट्टणात दररोज दोन हजार ब्राह्मण भोजन करीत आहेत." *(खरे, ऐतिहासिक लेख संग्रह)*

संतमंडळाची छाप हिंदूंप्रमाणे मुसलमानांवरही होती. सत्पुरुषांच्या अनेक चमत्कारांच्या गोष्टी त्यावेळी प्रचलित होत्या. मुसलमान प्रजा सोडा, सुलतानही

त्यांच्या भजनी लागत! कबीर तर हिंदू देवता व तत्त्वज्ञान त्याच्या दोह्यातून सांगे. शेवटी तो रामानंदांचाच चेला ना? त्या भ्रष्टाचाराच्या, अनाचाराच्या व दुराचाराच्या यावनी काळी शेकडो साधूसंत साऱ्या भारतभर होऊन गेले व त्यांनी हा देश, धर्म व संस्कृती टिकविली. अकबरासारख्या व दारासारख्या बादशहांना त्यांनी भजनी लावले होते! विजापूरचा एक बादशहा दत्तभक्त होता. दत्ताच्या कृपेने तो खडखडीत बरा झाला, अशी कथा गुरुचरित्रात आहे, ती जिज्ञासूंनी पहावीत. इस्लामला आमची पाठशाळा मंजूर नाही. केवळ या साधूसंतांमुळे त्या संस्था जिवंत राहिल्या व समाजाला ज्ञानप्रकाश मिळत राहिला. ते नसते तर हा देश अंधारात पार डुबून गेला असता!

इस्लामचे भवितव्य

१७७६ साली अमेरिकेचा खऱ्या अर्थाने जन्म झाला. धर्मछळास कंटाळून गरीब युरोपियन्स, सुरवातीस गरीब कॅथॉलिक आयरीश, तेथे गेले. त्यांनी त्यांच्या कापसाच्या मळ्यात काळ्या गुलामांना कामास जुंपले. काळ्यांना नागरिक म्हणून वागणूक मिळत नव्हती, त्यांच्याकडे "कमोडिटी" म्हणून पाह्यले जाई. १८६४ साली काळ्यांना मुक्त केले गेले. तो एक क्रांतिकारक निर्णय होता. ते स्वतंत्र होते, पण त्यांना समान अधिकार मिळालेले नव्हते, त्यांना मतदानाचा हक्क नव्हता. त्यांच्यासाठी बसेस वा आगगाड्यात अलग बसण्याची व्यवस्था होती. काळ्यातही न्यूनगंड होता. गुलाम मानस असेल तर तुमच्या हातून क्रिएटिव्ह काहीही होऊ शकत नाही. १९६८ साली 'आय हॅव्ह अ ड्रीम'वाल्या मार्टीन ल्यूथरने काळ्यांना अलाबामा येथे खरे स्वातंत्र्य मिळवून दिले.

काळ्यांबरोबर हिस्पॅनिक्सची समस्या होती व आहे, नव्हे वाढतच आहे. २०१४ साली हिस्पॅनिक्सची संख्या १७%, म्हणजे ५.५ कोटी होती. २०६० साली वाढता वाढता ती २८%, म्हणजे ११.९ कोटी होईल. त्यातील २/३ लोक मेक्सिकन आहेत. २०१५ साली मंदीमुळे (डीप्रेशन) त्यांची वार्षिक वाढ ४.४ वरून २.८ पर्यंत खाली गेली. नव्याने निवडून आलेल्या अमेरिकेच्या डोनाल्ड ट्रंपला हा मेक्सिकन्सचा लोंढा थांबवायचा आहे. हे हिस्पॅनिक्स अमेरिकेत ड्रग्ज् आणतात, ते गुन्हेगार आणि बलात्कारी वृत्तीचे आहेत; त्यामुळे ह्या मंडळींना प्रवेशबंदी केली पाहिजे, असे ह्या नव्या अध्यक्षांचे म्हणणे आहे. त्यासाठी मेक्सिकन सरहद्दीजवळ चीनप्रमाणे मोठी भिंत बांधून हवी आहे. त्याचप्रमाणे आतंकवादाशी संबंध असलेल्या देशातील कोणच्याही रहिवाशांना त्याचा अमेरिकन भूमीवर उतरू

देण्यास नकार आहे.

राजकारणात भविष्यकथन करणे अवघड आहे. तेथे कोठे केव्हा व कशी उलथापालथ होईल ते आधी सांगणे अशक्य आहे. भारतास असाच एखादा ट्रंप पंतप्रधान वा राष्ट्रपती म्हणून लाभला व ट्रंपप्रमाणे त्याने अटी सांगण्याची सुरुवात केली तर आधीच असुरक्षित असलेल्या भारतीय मुसलमानांचे काय होईल ते सांगणे मुश्कील आहे.

■■■

कथा लग्नसंबंधांची

कुतूहल कमीच

एके काळी हिंदूत कुतूहल व चौकसपणा भरपूर होता. ५०० वर्षांच्या गुलामीमुळे त्या गुणांची उतरती भांजणी सुरू झाली. त्यामुळे आमचे विज्ञान नाहीसे झाले. 'नवे शोध लावून काय करायचे, त्याचा फायदा शेवटी यावनी सत्तेसच होणार ना,' अशी व्यवहारी पण रास्त विचारसरणी सुरू झाली. आम्ही आळशी, गुलाम व परधार्जिणे बनलो. 'जैसे थे' (स्टेटस क्वोईझम्) यातच आम्हाला सुख व समाधान वाटू लागले. एके काळी गुरूपाशी बसून कुतूहलापायी 'हे काय?', 'ते काय?' असे प्रश्न विचारणारे व विषय समजून घेणारे (उपनिषद) आम्ही हिंदू नादान बनलो. मुसलमानांना आम्ही खडे चारले, दिल्लीवर कोणी राज्य करायचे ते आम्ही ठरवीत असू व थेट अटकेपर्यंत आम्ही भगवा झेंडा फडकाविला. वासुदेवशास्त्री खरे यांनी मराठे इंग्रजांसमोर का हारले त्याविषयी लिहिले आहे, ''देशाभिमानशून्यता, समूहरूपाने कार्य करण्याची नालायकी, स्वार्थसाधनाची बेसुमार हाव, आळस, हेळसांड, दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिण्याची सवय इत्यादी दुर्गुण आमच्या राज्यनाशास कारण झाले आहेत. असल्या दुर्गुणांनी खिळखिळे झालेले कोणतेही पौरस्त्य राष्ट्र सुधारलेल्या पाश्चात्त्य राष्ट्रांशी विरोध प्राप्त झाला असता टिकाव धरू शकणार नाही. हिंदुस्थान इंग्रजांनी घेतले नसते तर फ्रेंचांनी घेतले असतेच. प्रवाहात पडलेली भांडी एकमेकांवर आदळली असता कोणते फुटायचे - मातीचे की लोखंडाचे - हे ठरलेलेच आहे.'' *(वासुदेवाशी खरे, प्रस्तावना, मराठी आणि इंग्रज, न.चि. केळकरकृत)*

अगदी याच दुर्गुणांमुळे इंग्रजांआधी मुसलमानांनी आमच्यावर मात केली. शौर्य, बुद्धीवैभव, नीतिमत्ता, वगैरे सर्व गुणांत आम्ही त्यांच्यापेक्षा कितीतरी पटीने श्रेष्ठ होतो. पण आम्ही क्रौर्यात मागे पडलो, कुतूहलांत मागे पडलो आणि कुटनीतीत कमी पडलो. क्रौर्याच्या गडद छायेत आमची बुद्धी पार थिजून गेली व आम्हास आमचा सपशेल पराभव झालेला आमच्या डोळ्यांनी पहावा लागला. त्याची छाया आमच्या सर्वच - सामाजिक, राजकीय, धार्मिक व सांस्कृतिक - जीवनाच्या पैलूंवर पडला. मुसलमानांनी बाटलेल्यांची आमच्यावर शुद्धी करायची नाही अशी अट लादली. त्यामुळे त्यांचे संख्याबळ वाढले व आमचे कमी झाले. दुसरी अट होती सिंधू नदी ओलांडायची नाही, म्हणजे समुद्र प्रवास करायचा नाही. त्यामुळे आमचा व्यापार, आमचे सारे अर्थशास्त्र त्यांच्या हाती गेले. आमच्याजवळ कुशल कारागीर होते, ते चांगले व स्वस्त उत्पादन देत होते, पण फायदा अरबांना होत होता, आम्हाला नाही. तिसरी अट आम्हीच आमच्यावर लादली होती - रोटीबंदी व बेटीबंदी. या साऱ्या बंद्या आम्हास फार महागात पडल्या. त्या मोडल्या तर सजा होती शिरच्छेदाची. वाळीत टाकण्याची. बहिष्काराची. त्यामुळे हिंदू व मुसलमान समान पातळीवर एकमेकांशी कधी वागूच शकले नाहीत. त्या दोघांमधील वागणूक जित व जेते किंवा दाता व घेणारा अशी वागणूक सदैव राहिली.

त्याचा परिणाम दोन समाजातील सर्वात महत्त्वाच्या सेतूवर - लग्नसंबंधावर - झाला. कालचा ब्राह्मण आज मुसलमान बनला, त्यांच्यात रोटीबंदी व बेटीबंदी असल्यामुळे दोन समाज एकदम अलग पडले. शुद्धी नाही, त्यामुळे घर वापसी नाही. एखादी पिढी संबंध बरे राहिले, नंतर प्रेम व लागणी यांचा ग्राफ हळूहळू खाली खाली येत गेला. इंग्रजांना त्याचा फायदा मिळाला. गांधीजींनी ऐक्यावर भर दिला, पण कसा? कोरा चेक देऊन. त्यात हिंदूंच्या स्वाभिमानास कोठेच जागा (स्पेस) नव्हती. सावरकरांना ते पसंत नव्हते. 'एडवर्ड जाऊन निझाम येणार असेल तर ते आम्हास मंजूर नाही,' असे त्यांनी बाणेदार उद्‌गार काढले. भूतकाळांत एकनाथांचा सन्माननीय अपवाद. त्यांचा 'हिंदू-तुर्क संवाद' प्रसिद्ध आहे. पण एकनाथांचे इस्लामचे ज्ञान वरवरचे होते असे त्यातून सिद्ध होते. ते सखोल नव्हते. त्यावेळी छापखाने नव्हते, हाताने लिहिलेली बाडे असत, पण त्यांची किंमत सामान्यांना परवडत नसे. फक्त राजेरजवाड्यांकडेच ग्रंथालय असे.

मुल्लांचे मुल्ला प्रमोद पाठक

मराठी सारस्वतात कुराण व इस्लाम यांचा चांगला अभ्यास असलेले मराठी

लेखक हाताच्या बोटांवर मोजता येतील. त्या यादीत गोव्याचे डॉ. प्रमोद पाठक अग्रस्थानी आहेत. माझ्या घरी आमची भेट झाल्यावर 'आपनेवाले' भेटल्याचा मला खराखुरा आनंद झाला. खूप वेळ आम्ही इस्लाम व भारतीय मुसलमान यावर चर्चा केली. 'लव्ह जिहाद'चाही प्रश्न निघाला. मी त्यांना विचारले, ''*लव्ह जिहाद* च्या समस्येची चर्चा खूप झाली. ती समस्या आता सोडवायची कशी याचा आता आचार व विचार झाला पाहिजे.''

''म्हणजे?''

''*लव्ह जिहाद* का होतो? ही भारतीय नाही, वैश्विक समस्या आहे. पाश्चिमात्त्य देशात यावर खूप मानसशास्त्रीय संशोधन झाले आहे. गरीब अल्पसंख्यांक व श्रीमंत बहुसंख्यांक यांच्या संघर्षात अल्पसंख्यांक बहुसंख्यांकांचा द्वेष करायला शिकतात. त्याचे कारण संपत्तीची उणीव *(रीसोर्स डेफिसीट)* व स्पर्धा. हा द्वेष तरुण मुसलमानास भडकावतो व तो कोणत्याही थराला जाऊ शकतो. शक्ती मिळविण्यासाठी *मोटीव्हेशन* लागते. शक्तीचे तीन प्रकार : शारीरिक शक्ती, बौद्धिक शक्ती व सांपत्तिक शक्ती. या शक्तीतून लोकांवर प्रभाव पाडण्याची अनोखी शक्ती वा ऊर्जा प्राप्त होते. या सर्व प्रकारात शक्तीची गरज महत्त्वाची. तो सुरुवातीचा क्षण. आणि *लव्ह जिहाद* हा अंतिम क्षण. त्यात वैयक्तिक महत्त्वाकांक्षा ही हाकणारी ताकद *(ड्रायव्हिंग फोर्स)*. या प्रकारात महत्त्वाकांक्षेत असते एक मानसिक सुख : मी एका काफरास मुसलमान बनविले. दलित मुलांच्या बाबतीत नेमकी हीच प्रक्रिया पहावयास मिळते. त्याची उदाहरणे म्हणजे सुशीलकुमार शिंदे, प्लॅनिंग कमिशन वाले जाधव, नामदेव ढसाळ व डॉ. आंबेडकर. ही कारणमीमांसा समजून घेतली नाही व नुसता *लव्ह जिहाद*चा प्रचार केला तर समाजाचे ध्रुवीकरण पहावयास मिळते.''

''पण उपाय कोणता?''

''मनाची चौकट बदलणे. द्वेषाची तीव्रता कमी करणे.''

''गोव्यात नेमके तेच काम मी करीत आहे. द्वेष अज्ञानातून येतो. गोव्याच्या 'डेली हेराल्ड'मध्ये त्यासाठी मी एकंदर ४० लेख लिहिले - १८ कुराणावर, १२ हादीतवर आणि १० शरियावर. 'विवेक'मध्ये लिहिलेले लेख निराळे. माझा एक सिद्धांत आहे. जग सारे *इस्लामोफोबिया* काढण्यासाठी सज्ज झाले आहे. तो काढा, पण त्याबरोबर मुसलमानात असलेला काफिरांविषयीचा *फोबिया* काढायला हवा. त्याचा सर्वत्र मी प्रचार व प्रसार करतो. *काफीरोफोबिया* दूर झाल्याशिवाय या क्षेत्रात आपण एकही पाऊल पुढे टाकू शकणार नाही.''

"लेख लिहून जागृती येत नाही. लेख कोण व कितीजण वाचतात? ब्रेनवॉशिंग हा एकच मार्ग त्यासाठी आहे. ब्रेनवॉशिंग जरा *स्ट्रॉंग* शब्द आहे. पुनर्शिक्षण *इज अ बेटर वर्ड. री एज्युकेशन. मिसगायडेड* लोकांना वठणीवर आणण्यासाठी हा रामबाण उपाय आहे. केवळ मुसलमान नाही तर आपल्या हिंदू पोरींचेही पुनर्शिक्षण करणे आवश्यक आहे. त्यांना मुसलमान पोरांविषयी बऱ्याच *मिथ्स्* डोक्यात असतात. ते फार भारी व सुखदायक असतात. ती मुले हिंदू पोरींना खूप गिफ्टस देतात, हॉटेलात नेतात, सिनेमे दाखवितात व एका मोहाच्या क्षणी बरोबर गटवितात. हिंदू मुले त्यापैकी काहीच करीत नाहीत, बुजरी असतात. मुसलमान मुलांना मार्गदर्शन करणारे त्यांचे मुल्लामौल्लवी असतात. ते सांगतात, "तीला गर्भवती करून टाक. म्हणजे ती तुझी कायमची दासी झाली, असे समज." हे मार्गदर्शन १९४० च्या दशकापासून चालू आहे. त्याचे 'लाल किताब' म्हणून उर्दू पुस्तक बाजारात त्या वेळी मिळे. किंमत एक रुपाया. वशीकरणाचे शास्त्र त्यात थोडक्यात दिले होते. फाळणीच्या आधी खूप हिंदू मुली गटविल्या गेल्या."

"त्यासाठी 'शारीन एल फकी' नावाच्या विदुषीचे पुस्तक या मुलींचे ब्रेन वॉशिंग साठी खूप उपयोगी पडेल. तीचे *'सीटाडेल'* नावाचे एक पुस्तक आहे. ॲमॅझॉन वर मिळते ते."

"माहीत आहे. पन्नाशीच्या बाई आहेत त्या. मूळच्या इजिप्तच्या, पण लंडनमध्ये वाढल्या. सध्या टोरोंटोत असतात. त्यांनी व अली सीना या एक्स मुस्लीमाने कॅनडात वादळ माजविले आहे. मुसलमान अरब स्त्रियांचे लैंगिक स्वानुभव त्यात आहेत. "त्यांच्यात काही दम नाही, नुसते थोराड दिसतात", असे लिहिले आहे त्यात. आपल्या मूर्ख मुलींचे डोळे उघडतील त्याने. त्यांच्या डोक्यातील भ्रामक अपसमज निघतील त्यामुळे."

"दोन्ही बाजुंचे ब्रेन वॉशिंग करणे आवश्यक आहे, हे तुमचे म्हणणे पटले."

"त्यासाठी सरकारी मदत लागेल. संस्थाकीय मदतही लागेल. पुढे मागे झेड सिक्युरिटीदेखिल लागेल. टीमवर्कशिवाय होणार नाही ते काम. एकट्यादुकट्याचे ते काम नोहे."

आधुनिकता आणि इस्लाम

भारतात मुसलमानांचे राज्य (१२०६ ते १५२६ आणि १५२७ ते १७०७) होते. त्यामुळे येथील मूळ हिंदू रहिवाशांचे नागरिक हक्क व धार्मिक हक्क वारंवार पायदळी तुडविले जात. त्याविरुद्ध दक्षिणेत शिवाजी व पंजाबात शीख गुरू यांनी

बंड पुकारले. जेव्हा मुसलमानांची सत्ता दुर्बल झाली तेव्हा ते स्वतंत्र बनले. बंगाली दुर्बल होते, त्यामुळे त्यांची मालमत्ता वारंवार लुटली जाई व त्यांच्या धर्माचा सतत अपमान केला जाई. त्यांना शिवाजीसारखा नेता न लाभल्यामुळे ते शेवटपर्यंत मुसलमान राजवटीशी एकनिष्ठ राहिले. पर्याय नव्हता. इंग्रजांनी ही धर्मविरोधाची भावना वेळीच ओळखून तेथील मारवाडी सावकारांना हाताशी घेऊन बंगालमध्ये आपली सत्ता स्थापन केली. महाराष्ट्रात व पंजाबात असाच स्वामीद्रोह घडला, पण तो व्यापारी वर्गाने केला नाही, तो महाराष्ट्रातील जहागीरदारांनी केला. सर जॉन माल्कमने स्वतःच त्या सरदारांची नावे घेऊन त्यांच्या ब्रिटीश राजनिष्ठेचे पोवाडे गायले आहेत. *(सर जॉन माल्कम, मिनीट, नोव्हेंबर १८३०)* प्रत्येक घटनेचे चांगले व वाईट परिणाम होत असतात. युरोपात धर्माचा ऱ्हास झाल्यामुळे विचारांचे युग आले व त्याची परिणती विज्ञानाचा उदय व औद्योगिक क्रांतीमध्ये झाली. युरोपात वस्ती वाढली व त्यांना बाहेर पडावे लागले. त्यातून वसाहतवादाचा जन्म झाला व दळिद्री युरोप गडगंज श्रीमंत बनला. त्यांच्या सुधारणांचे वारे जगभर वाहू लागले. महाराष्ट्रातील विचारवंतांनी 'पेशवाई कशाने बुडाली?' यावर आत्मपरीक्षण व चिंतन करून ती बुडली याची पुढील कारणे शोधली : (१) राष्ट्रवादाचा अभाव, (२) असंघटित हिंदू समाज, व (३) दुबळे नेतृत्व. इंग्रजी भाषा शिकून पाश्चिमात्त्य विज्ञान व तंत्रज्ञान आपण आत्मसात केलेच पाहिजे, तरच आपण भारतमातेस स्वतंत्र, सबळ व समृद्ध करू शकू, या निष्कर्षावर ते आले आणि त्या दिशेने पुढील उद्योगास लागले. सुदैवाने त्यांना लोकमान्य टिळकांसारखे दूरदृष्टीचे व भरभक्कम नेतृत्व लाभल्यामुळे देशांत, विशेषतः बंगाल व महाराष्ट्र येथे, चैतन्य सळसळू लागले.

भारताप्रमाणेच १८व्या शतकांत औद्योगिक क्रांतीचा मध्य पूर्वेतल्या इस्लामवर परिणाम झाला. विज्ञान, वास्तवता व विचार करण्याची शक्ती *(रीझन)* यांचा प्रभाव तेथील लोकांवर पडला. सुरुवात नेपोलिअनच्या १७९८ च्या इजिप्तवरील स्वारीने झाली. फ्रेंच सेनेने मिसरचे ३,००० पायदळ कापून काढले. नेपोलिअनचा हा ऑटोमन साम्राज्यातील इजिप्तवरील विजय वळांक ठरला. त्याने ऑटोमनच्या लोकांना 'आपण कां हारलो?' त्याचा विचार करावयास भाग पाडले. त्याच्या महंमद अली या राजाने आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान शिकण्यासाठी युरोपात आपले तरुण धाडले. पॅरीसमध्ये ५ वर्षे काढल्यावर ताहतावीने १८३१ साली अनेक युरोपियन ग्रंथांचे अरेबिकमध्ये भाषांतर केले व युरोपियन विज्ञानाचे महत्त्व आपल्या बांधवांना समजावले. शरिया कायदा नव्या दृष्टिकोनातून पहा, असा

त्याने प्रचार केला. तो त्यांचा राजा राम मोहन राय ठरला. खैर अलदीनदेखील पॅरीसमध्ये ४ वर्षे होता, तो परत आल्यावर इजिप्तचा देवेंद्रनाथ टागोर (ठाकूर) ठरला. हे वारे हळूहळू साऱ्या पश्चिम आशियात, विशेषतः तुर्कस्थानात, पसरले. तेथे १८३४ मध्ये विज्ञानावर, १८४८ मध्ये खगोलशास्त्रावर व १८६५ साली जीवशास्त्रावर तुर्की भाषेत ग्रंथनिर्मिती झाली. १८६९ साली त्यांनी फ्रेंच मेट्रिक सिस्टीम आणली. केमाल पाशाच्या हाती सत्ता आल्यावर तर तेथे आधुनिकतेचा अतिरेक झाला. ही आधुनिकता साथीच्या रोगाप्रमाणे ट्युनिशियात सारे ऑटोमन साम्राज्य व ईराणमध्ये वेगाने धर्मशास्त्रापासून कायदेशास्त्रापर्यंत पसरली. हे आधुनिकतेचे 'वाघिणीचे दूध' पश्चिम आशियासाठी टॉनिक ठरले.

पहिले महायुद्ध (१९१४-१८) हा त्या विभागातील दुसरा वळांक ठरला. त्यात ऑटोमन साम्राज्य खलास झाले व ब्रिटन आणि फ्रान्स या दोघा विजयी देशांनी पश्चिम आशियावर कब्जा बसविला. पाश्चिमात्य संस्कृती व सायन्स निरर्थक आहे, विनाशक आहे, त्यापेक्षा समाजवाद जास्त परिणामकारक व पॅन-अरबवादास पोषक आहे असा पराभूत व जित मुसलमानांचा ग्रह झाला. त्यातून अरब बाथ पक्षाचा व नासरवादी समाजवादाचा उदय १९५० व १९६० च्या दशकांत झाला. त्याचा उगम दुसऱ्या महायुद्धातून (१९३७-४५) झाला. त्या होळीत इंग्लंडचा साम्राज्यवाद खाक झाला व अमेरिकेच्या प्रचंड मदतीमुळे जर्मनीसकट सारा पश्चिम युरोप उभा झाला आणि 'लोखंडी पडदा'वाला रशियासुद्धा. त्यातून ईस्त्राएलचा कांटा अरब मांसात खुपत राहील अशी चतुर योजना सुरू झाली. ईस्त्राएल व मुसलमानी अरब देश यांच्यात १९६७ साली ६ दिवसांचे युद्ध झाले, या मुसलमान देशांनी ज्यूंच्या हातून जबरदस्त मार खाल्ला व गाझा भूपट्टा सोडावा लागला. पराभवातून जागृती व जागृतीतून जिद्द निर्माण होते. या दुसऱ्या वळांकानंतर ही सुधारणांची गाडी उलट्या दिशेला चालू लागली. तसे होण्यास काही महत्त्वाची कारणे आहेत. पहिले म्हणजे तेलामुळे अरब एकदम श्रीमंत बनले. १९७० च्या दशकाच्या मध्यभागी या अरब मंडळींनी तेलाचा भाव चौपट वाढविला व साऱ्या जगास हादरा बसविला. या समृद्धीमुळे हज यात्रींची संख्या १९२६ मध्ये ९०,००० होती ती १९७९ मध्ये २० लाख झाली. त्याचा सर्वांत जास्त आर्थिक फायदा सौदी अरेबियास झाला. तो फायदा त्याने सर्वत्र सुन्नी इस्लामचा प्रसार करणाऱ्या मदरसा व मशिदी बांधण्यासाठी वापरला. वहाबी व सलाफी इस्लाम त्यामुळे वाढला. कारण, अमेरिका व ब्रिटनसारखी युद्धपिपासू राष्ट्रे मुसलमानांना एकमेकांत लढवितात व शस्त्रे विकून अब्जावधी डॉलर्सचा फायदा करतात, असा मुसलमानांचा

ग्रह झाला. १९७९ साली इराणमध्ये आयातोल्ला खोमेनीने जी क्रांती केली ते दुसरे कारण. त्यातून आतंकवाद जन्मला व वाढला. हे काफर मारलेच पाहिजेत या चिडीतून इस्लामिक राष्ट्र स्थापन झाले व साऱ्या युरोपात भीतीचे वातावरण पसरले. त्यांना लव्ह जिहाद, लव्ह लँड व लव्ह नंबर्स या तीन 'एल'ची मोठी धास्ती वाटते. मुसलमानांची बहुसंख्या झाली व पोरी आणि जमिनी हातातून गेल्यावर मग जीवनात राहणार काय? मोदींना जगद्गुरु व्हायची केवढी संधी आली आहे? तसे झाले तर २१ वे शतक आम्हा हिंदुंचे!

आंतरधर्मीय लग्ने

दुसऱ्या महायुद्धानंतर जीवनास वेग मिळाला व साऱ्या गोष्टी पटापट होऊ लागल्या. 'अर्था'चे त्या नव्या जीवनातील स्त्रीचे स्थान एकदम प्रभावी बनले. स्त्रियांना अर्थार्जन करणे गरजेचे वाटू लागले. चंगळवाद वाढल्यामुळे व नवनवी साधने व यंत्रे बाजारात येऊ लागल्यामुळे अर्थाची कधी नव्हती एवढी गरज भासू लागली. स्त्री-पुरुष एकत्र नोकरी करीत असल्यामुळे आंतरजातीय व आंतरधर्मीय लग्नांचे प्रमाण एकदम वाढले. त्याचबरोबर घटस्फोटांचे. आर्थिकदृष्ट्या स्त्री स्वावलंबी झाल्यामुळे हे सारे बदल होत आहेत, हे जगावर इतकी शतके राज्य करणाऱ्या पुरुषाच्या लगेच ध्यानात आले. सहिष्णु हिंदू नवऱ्याने ते विष नाखुषीने पचविले व तो नीलकंठ असल्याच्या तोऱ्यात समाजात वावरू लागला. पण मुसलमान नवऱ्यास ते दुःख पचविता येईना. तो जास्त धर्मनिष्ठ, जास्त हुकूमशहा, जास्त कडक, जास्त भूतकाळात रमणारा व आतंकी बनला. 'आधीच मर्कट, त्यातून मद्य प्याला' अशी त्याची मनःस्थिती झाली. ९/११ नंतर तर सारे जग त्याचा तिरस्कार करू लागले. मुसलमान असणे हे पाप मानले जाऊ लागले. मुलींचे आई-बाप मुलींना उघडपणे सांगू लागले, "कोणचाही मुलगा चालेल, मुसलमान नको." या सुधारणा पर्वाची परिणती अशी द्वेषात होईल असे पूर्वी कधीच वाटले नव्हते. ११ सप्टेंबर २००१ नंतर काहीही खास प्रयत्न न करता जगात आपोआप ध्रुवीकरण झाले. दोन संस्कृत्यांचा संघर्ष तेथून सुरू झाला.

आंतरधार्मिक लग्नातील आव्हाने

धर्म म्हणजे मोठी जात. आखाती देशांत जातींना टोळ्या समजतात. निरनिराळ्या जातींचा (वा टोळ्यांचा) समूह म्हणजे धर्म. त्यास "वे ऑफ लाईफ" म्हणतात. जातीप्रमाणे धर्माची मूळे खूप खोल गेलेली असतात. आंतरधार्मिक लग्नाची आव्हाने गुंतागुंतीची आहेत. त्यातील काही आव्हाने :

१. **मित्र व कुटुंबीयांच्या पाठिंब्याचा अभाव** : "कठीण समय येता कोण कामास येतो?" ही सुक्ती येथे फार लागू पडते. ख्रिस्ती वा मुसलमान मुलाशी लग्न लावले तर त्या मुलीला कोणी पाठीशी घालणारे नसते. स्वार्थी नवऱ्यास तिचा "अनाथपणा" बरोबर लक्षात येतो. त्याचा तो बरोबर फायदा उठवितो.

२. **एकमेकांना समजून घेणे** : हे त्या पतीच्या संवेदनशीलतेवर अवलंबून राहते. "तू जायगी तो दुसरी आएगी" अशी त्याची मानसिक चौकट असेल तर तीची स्थिती बिकट होते. काही अपवाद आढळतात, पण दुर्मिळच. अमेरिकेत मात्र हे जोडपे फार छान वागते, एकमेकांच्या आवडी वा नावडींना जपते व सारे एकजुटीने काम चालते. याचे कारण हे जोडपे तेथे बेटासारखे असते. आजूबाजूला सारे परदेशी असतील तर मोठी पंचाईत. आता आपल्या लोकांची तेथे संख्या वाढत आहे. त्यामुळे जीवन सुसह्य व्हायला चांगली मदत होते. युरोप अमेरिकेत तेथील अति स्वातंत्र्यामुळे *(पर्मिसिव्ह सोसायटी)* गोरी सवत येण्याच्या टांगत्या तलवारीच्या शक्यतेस नाकारता येत नाही.

३. **धीर धरा व स्वीकारा** : सामंजस्य कोणी दाखवायचे? आईने का बापाने? कारण हे दोन्ही धर्मातील फरक पायाचे आहेत व न सुटणारे आहेत. यावर काही नवा तोडगा काढण्याचे कसब प्रत्येकाजवळ असेलच असे नाही. यातून संघर्ष व वादावादी अटळ आहे. सुरुवातीला आंधळ्या प्रेमामुळे या समस्यांचा कधी विचारच केलेला नसतो. जेव्हा या समस्यांना वरचेवर तोंड द्यायची वेळ येते तेव्हा ती अबला अगतिक झालेली असते. नाहीतर, नवरा तलाक देईल व दुसरी बीब्बी घरात आणेल ही नवी भीती निर्माण झालेली असते. म्हणून कॉमन सिव्हील कोडची गरज. कायद्याने एक पत्नीव्रताची आवश्यकता. आई-बाप जवळ असण्याची शक्यता कमीच. आणि असलेच तर ते मुलाचीच बाजू घेणार.

४. **मुलांची समस्या** : मुलांनी आईचा धर्म पाळायचा का बापाचा, ही मोठी समस्या आहे. इंदिरा गांधींनी आपल्या मुलांची नावे राजीव व संजीव (पुढे संजय) ठेवली. नातूसुद्धा राहुल झाला. ही तर फार मोठ्या घराण्याची गोष्ट. सामान्यांचे काय? हिंदू मुलगी मुसलमान घरात आली की तिला प्रथम मुसलमान बनवून घेतले जाते. मग तो पतौडीचा नबाब असो कां साधा गिरणी कामगार जॉबर असो. यासाठी हा समाज फार आग्रही आहे. बाटविल्याशिवाय निकाह होऊच शकत नाही, उदा. पार्शी रूटी व जीना. आई व बाबा या दोघांना आपल्या धर्माची मुख्य तत्त्वे आपल्या मुलांत उतरावीत असे वाटणे साहजिक आहे. पण परंपरा व चालीरीती परस्पर विरोधी असतील तर काय? हा प्रश्न दोघांसमोर उभा राहतो. एक

धर्म मूर्तीची पूजा करतो तर दुसरा मूर्ती तोडण्यात अभिमान बाळगतो. अशा परिस्थितीत बालबुद्धीने मुलाने काही वेडावाकडा प्रश्न आजोबास विचारला व आजोबा गरम झाला तर ते साहजिक कां असाहजिक?

५. **आई-बापांची समस्या** : ही फार गंभीर समस्या आहे. यात तीन प्रकार आहेत. काही समंजस आई-बाप मुलीच्या आई-बापांना भेटतात व विनंती करतात, "तुम्ही ब्राह्मण. तुमची व आमची संस्कृती एकदम वेगळी. ती आमच्या घरी आली तर आम्ही तिला नीट वागवू, पण हा जो फरक आहे, तो तिला आज जाणवणार नाही, पण पुढे जाणवेल. तेव्हा तिला समजवा व जमले तर तिला थांबवा." प्रेम आंधळे असते. मुली कोणाचेच ऐकत नाहीत. लग्न होते. काही वर्षे गेली की मग तिला सत्य समजते, पण तेव्हा फार उशीर झालेला असतो. दुसरा प्रकार मुलाने काफर मुलगी घरी आणली व तिला मुस्लीम केली याचे स्वागत करणारे असतात. तिसरा प्रकार तटस्थ आई-बापांचा. "आपको जो कुछ करना है वो करो, हमारे पास मत आवो," अशी त्यांची धारणा असते.

आजची तरुण पिढी आपल्याला सारे विचारून करेल अशी आता आई-बापांची अपेक्षा नाही. अपेक्षाभंग व त्यातून होणारा मनःस्ताप यापेक्षा ते चूप्प बसणे पसंत करतात. मुसलमान आई-बाप मुलांनी वेगळे रहावे ही कल्पनाच सहन करू शकत नाहीत. सारे दोषांचे खापर सूनेच्या डोक्यावर फोडले जाते.

आंतरधार्मिक लग्नाचे फायदे

१. नेहरूंसारख्यांना ती राष्ट्रीय एकात्मता वाटते. इतरांना ते पटत नाही. नेहरू व त्यांचे चेले म्हणून स्वतःस पुरोगामी समजतात व इतरांना प्राचीन, बुरसटलेल्या विचारांचे व अधोगामी समजतात. साऱ्या डावऱ्यांना नेहरूंचे तत्त्व मान्य आहे. समाजवादी म्हणजे साम्यवाद्यांचे धाकटे बंधू. पुण्यात अशी लग्ने असली तर ना. ग. गोरे तेथे आवर्जून जात. त्याविषयी आणीबाणीत ते माझे पाहुणे असताना मी त्यांना त्याबद्दल विचारले. उत्तर मिळाले, "इट वाज जस्ट ए मॅडनेस."

२. क्रिया म्हटली की प्रतिक्रिया आलीच, समसमान पण विरोधी. मुसलमानांनी हिंदूंच्या बायका पळविल्या व बाटविल्या. आता चित्र उलटे दिसू लागले आहे. ही म्हटली तर सुरुवात आहे. म्हटला तर नेहरू युग व मोदी युग यातला हा फरक आहे. केरळातील नामवंत सिने क्षेत्रातील स्त्रिया हिंदू बनल्या. त्यांच्यापैकी काहींची माहिती सांगतो :

अ) **जमोल** : ही ख्रिस्ती मल्याळी सिने नटी हिंदू झाली. तिने चंद्रशेखर पिलै

यांच्याशी लग्न केल्यावर तीचे नवे नाव गौरी झाले.

ब) **नयनतारा** : कोशीतील (कोचीन) आर्य समाजाच्या मंदिरात २ तासांच्या शुद्धी प्रक्रियेनंतर डायना मरिअम कुरियन ही सुप्रसिद्ध दाक्षिणात्य नटी नयनतारा बनली.

क) **ॲनी** : ह्या अतिशय हुषार नटीने शाहजी कैलास यांच्याशी लग्न केल्यावर ती चित्रा कैलास झाली.

ड) **बीना अँटनी** : मनोज नायर यांच्याशी लग्न लावल्यावर ही मल्याळी टीव्ही नटी बीना बनली.

ई) **लीझ प्रियादर्शन** : प्रसिद्ध मल्याळी नटी व प्रियदर्शन या सिने-डायरेक्टरांची पत्नी. लग्नानंतर लक्ष्मी बनली.

फ) **मीरा जस्मीन** : ही ख्रिस्ती नटी म्हणते, ''अमृतानंदमयी यांच्या आशीर्वादामुळे मला चांगले दिवस लाभले.'' पूर्वी ती ख्रिस्ती होती तेव्हा तिला राज राजेश्वर मंदिरात प्रवेश नाकारला होता. आता हिंदू झाल्यावर ती थाटात त्या मंदिरात गेली, दर्शन घेतले व प्रसादही खाल्ला.

ही माहिती ज्यांच्याजवळ असेल त्यांना केरळांत *लव्ह जिहाद* जास्तीत जास्त कां ते सहज कळून येईल. ही प्रतिक्रिया आहे व तीदेखिल मुसलमानांची, ती आत्यंतिक असायलाच पाहिजे. पण हा आगीबरोबरचा खेळ कालांतराने आपोआप थंड पडेल. पण दुर्लक्षून चालणार नाही.

मुसलमान वा ख्रिस्ती बाटून हिंदू बनला की हिंदू मनास गुदगुल्या होतात, हे कटु पण प्रिय सत्य आहे. ती प्रक्रिया उलट झाली तर 'त्यां'ना आनंद होतो. एवढी जातीयता आपल्या रक्तात खोल भिनली आहे. दाऊदमुळे सिने क्षेत्रात सारे खान शिरले व ''सुप्रसिद्ध'' केले गेले. सलमान खान तर *ब्रांड अँबेसेडर* बनला. संजय दत्त तर चक्क गुन्हेगार. आतंकवाद्यांना मिळालेला. पण फडणीस सरकारने त्यास मोकळे सोडले. हा सुनील दत्तांचा मुलगा नसता तर फडणीस असे वागले असते कां? या खानांच्या बायका हिंदू आहेत. एक खान आपली एक मराठी नटी पळवू पहात होता. तिचे आईबाप शहाणे, त्यांनी तिचे लग्न लावून टाकले व तिला अमेरिकेत पार्सल करून टाकली. आपली हिंदी सिनेसृष्टी या खानांच्या विळख्यातून केव्हा सुटणार? दाऊद पॉवर लक्षांत आली कां?

मला सुधीर फडक्यांनी सांगितलेले आठवते : ''मी मुसलमानांच्या विरुद्ध नाही. माझ्या लग्नात महंमद रफींनी स्वतः मंगलाष्टके म्हटली होती. कलेत

धर्मास स्थान नसते, नसावे. कला कला असते, शुद्ध व पवित्र. पण काही लोकांना शुद्धास अशुद्ध बनवायचे असते. ते कसे? आत राजकारण आणून. हिंदूचे तत्त्वज्ञान आहे : सर्वे सुखिनः सन्तु । या लोकांचे उलटे असते. माझे चांगले होण्यासाठी तुझा बळी गेला तरी मला हरकत नाही. या तत्त्वास माझा विरोध आहे.'' म्हणून पुन्हा म्हणतो : हिंदू जागृत केव्हा होणार? आपली हिंदी सिनेसृष्टी या खानांच्या विळख्यातून केव्हा सुटणार?

मोकळेपणा : कां कोणास ठाऊक, मुसलमान पतीच्या बायकोस नवरा आपले नीट संरक्षण करेल याचा दांडगा आत्मविश्वास वाटतो. मग ती बायको हिंदू असो, युरोपियन असो का अरब. त्याचे कोडे मला अजून उलगडलेले नाही. हजबंड म्हणजे संरक्षक. *मुस्लीम्स् मेक गुड हजबंडस्.* त्यांच्या बाया व पोरे पब्लिक पार्क वा इतर जाहीर स्थळी कशा मोकळेपणाने वा निर्भयपणे मजेत हिंडत असतात. खरे म्हणजे या स्त्रियांचा एवढा छळ होतो. माझी एका भाजपाच्या महान नेत्याशी नेहमी चर्चा चालायची : ''मोनोगॅमीचा कायदा काढून टाका, प्रत्येक हिंदू तरुणास एका मुसलमान स्त्रीशी लग्न करायला सांगा, मुसलमानांना बायकाच मिळणार नाहीत, व मुसलमानांचा प्रश्न आपोआप सुटेल. ती पिढी संपली की तिची जागा घ्यायला दुसरी पिढीच नसेल.'' माझ्या या सूचनेच्या भीतीने बहुधा त्या थोर नेत्याने लग्नच केले नाही.

धार्मिक : धार्मिक कट्टरपणा वाढण्यास गुरू, बाबा मुल्ला वा पाद्री चांगले वातावरण तयार करतात. राजकीय नेते मजा मारतात. साधा माणूस कष्ट करतो व गरीबीत सडतो. त्याला कोणी वाली मिळत नाही. त्यामुळे त्यांना बळी *(व्हिक्टीम)* झाल्याचे दाखवून सतत मागण्या करण्याची सवय लागली आहे. गेल्या ७० वर्षांत ही सवय बदलण्याची कोणी तसदीच घेतली नाही. युनोत पाकिस्थान तेच बळी असल्याचे नाटक करतो. वैयक्तिक आणि वैवाहिक पातळीवर त्याच नाट्याची पुनरावृत्ती होते.

मुलांची समस्या : परिस्थिती त्यांना आक्रमक व स्वावलंबी बनविते. फसविल्याशिवाय नीट राहता येत नाही ही शिकवणूक बालपणापासून मिळते. त्यामुळे रडत न बसता मार्ग काढण्याची शिकवणूक लवकर सुरू होते. हिंदू मुले त्या मानाने जास्त लाडावलेली, हट्टी व स्वकेंद्रित असतात, 'स्ट्रीट स्मार्ट' नसतात.

आंतरधार्मिक लग्नाचे तोटे

१. **दंगे** : बातमी विकृत करून जनतेस भडकवावयाचे कसे, याचे एक

शास्त्र आहे. ह्या गुणामुळे माध्यमांना महत्त्व येते. म्हणून त्यास चौथा स्तंभ *(फोर्थ इस्टेट)* म्हणतात. सरकारचा प्रचार करायला सरकार काही वर्तमानपत्रांना व वार्ताहरांना "पाळते." ३ फेब्रुवारी १९६१ रोजी मकसूद व लतीफ यांनी २० वर्षांच्या उषा भार्गवचर बलात्कार केला. तिने स्वतःस जाळून घेतले. भाजल्यावर ती बरेच दिवस जिवंत होती, म्हणून तिचे "डाईंग डिक्लेरेशन" घेतले गेले व त्यावरून त्या दोघांना कोर्टात ४ फेब्रुवारी १९६१ रोजी हजर केले. त्यांच्यावर केसही झाली. मुंबईच्या 'ब्लिटझ' ने काय अपप्रचार करावा? उषा कुमारीकाच नव्हती, तिला सेक्सचा चांगला अनुभव होता. हे सारे कशासाठी? मकसुद व लतीफला कमी सजा व्हावी म्हणून! हा घाणेरडा प्रकार पाहून लोक इतके संतापले की तेथे जातीय दंगा झाला. त्या वणव्याची आग साऱ्या उत्तर प्रदेशात पसरली. हे सारे नेहरूंच्या राज्यात! मर्द मायावतीचा अपवाद सोडला तर आजवर एकाही नेत्याने मुसलमानांच्या अरेरावीला वेसण टाकण्याचा प्रयत्न केलेला नाही. संजय गांधी होते पण टिकले नाहीत.

२. तलाक : हा शब्द तीनदा उच्चारला की घटस्फोट मिळतो. तो एसएमएस किंवा ई-मेलवरही मिळतो. दुबईतून भारतात असलेल्या बीबीला आता इंटरनेटवरून तलाक देता येतो. आजची स्त्री ही गुलामी कदापि सहन करणार नाही. मोदींच्या राज्यात या सुधारणेची सुरुवात तर झाली आहे. एखाद्या रानटी समाजाला मनसा, तनसा बदलणे वाटते तेवढे सोपे काम नाही. पण सुरुवात झाली आहे. मुल्लामौलवी 'आपले राज्य लवकर संपुष्टात येणार' या भीतीने एकत्र आले आहेत. पहिल्यांदा शीतयुद्ध व नंतर गरम युद्ध होणार हे निश्चित. मुलायम, लालू व राहुल बच्चू त्या वाहत्या गंगेत हात धुवून घेतील. एकलो मोदी बिचारो शूं करे? अशी आशा करू या की २०१७ च्या उत्तर प्रदेशातील निवडणुकांच्या शॉकमधून ही मंडळी लवकरच बाहेर पडतील व त्यांचे चाळे पुन्हा सुरू होतील. नशिब नालायकांना नेहमी नजराणा देत असते.

३. सामाजिक दर्जा : काफीराला सामाजिक दर्जा? ते कसे शक्य आहे? *काफीर तेवढा मारावा । नाहीतर शोषूनी अर्धमेला करावा ॥* साऱ्या अब्राहमिक पंथियांचे हे एकच धोरण आहे. चर्चिलने नाही का लाखो बंगाल्यांना भातावाचून मारले? तेच धोरण १७६१ साली पानिपतावर अब्दालीने अंमलात आणले. आज पाकिस्थान तेच धोरण स्वीकारून भारतास सतावतो आहे. सिंधू करारान्वये भारतास फक्त १९ टक्के पाणी, ८१ टक्के पाकिस्थानला. मला वाटत नाही, जगात अशा अन्य करारावर कोणा मूर्खाने सही केली असेल! रघुपती राघव राजाराम । पतित पावन सीताराम ॥

४. **धार्मिक दर्जा** : 'लूटो' हा परवलीचा शब्द. आम्ही तुम्हाला जिवंत राहून देऊ, पण आम्हाला २५% जिझिया कर द्या. इतर कर वेगळे. सारे मिळून सरकार ७० ते ८० टक्के मालमत्ता लुबाडून घेणार. हिंदूंनी असा ५०० वर्षे छळ सहन केला.

५. **मुलांची समस्या** : गोंधळलेली मने घेऊन ही प्रजा निर्मिती होते. कसले संस्कार आणि कसले शुद्ध वातावरण? खाओ, पिओ और मजा करो. ना ध्येय, ना दिशा, ना मार्ग. आतंकवाद्यांच्या हाती सापडले तर आतंकवादी, संगीतवाल्यांच्या हाती सापडले तर खाँसाहेब, गॅरेजवाल्यांच्या हाती सापडले तर उत्तम मेकॅनिक. कोणीच मिळाले नाही तर आम आदमी. ही बिचारी दिशाहीन मुले शिक्षणावाचून वाया जातात. त्यांच्या नावाने त्यांचे नेते सारे फंड उडवून टाकतात.

हिंदू पत्नी-मुस्लीम पती

मानसशास्त्र : मुसलमान पुरुष जात्याच अरेरावी करणारा असतो. अबलेवर तर तो जास्तच डाफरतो. कारण हिंदू पत्नीला नवऱ्यास उलटून बोलायचे संस्कार नसतात. आताच्या कॉन्व्हेन्टमध्ये शिकलेल्या व सेंट झेवियरमध्ये "समान हक्कांचा अधिकार" मागणाऱ्या मुलींचे मला माहीत नाही. त्यामुळे "स्त्री जन्मा ही तुझी कहाणी, हृदयी अमृत, नयनी पाणी।" अशीच या हिंदू पत्नीची अवस्था होते. माहेर तुटलेले असल्यास कोपऱ्यात जाऊन मुळुमुळु रडण्यापेक्षा ती जास्त काही करू शकत नाही.

येथे यादीत जास्त नावे सिने नटांची आढळतील. आमचे उल्लू हिंदू तरुण सलमानसारखे दिसण्याचा, बोलण्याचा व वागण्याचा प्रयत्न करतात. त्यांचे सोडा, पण आमचे पं. नेहरूदेखील युसूफ खान उर्फ दिलीप कुमारची नक्कल करीत. काही मुंबईच्या तरुण नेत्यांनी सलमानची नक्कल करण्यासाठी स्थानिक पार्कमध्ये शिकार केली. केशवाय नमः, नारायणाय नमः या स्टाईलवर सलमानखानाय नमः, आमीरखानाय नमः असा जप करणारे उल्लू के पठ्ठे मी पाहिलेले आहेत. म्हणून ही नावे दिली आहेत. ते आपल्या हिंदू पत्नीस सन्मानाने वागवीत नाहीत, यापासून तरी आमच्या मुलींनी बोध घ्यावा, ही इच्छा. अर्थात् आमचे कोण ऐकणार?

ते वयच काहीतरी जगावेगळे करून दाखवावे अशा महत्त्वाकांक्षेने भारलेले असते. त्याची काही कारणे : त्यास खतपाणी घालणारे 'सैराट' सारखे सिनेमा, आई-बापांना वेळ नसणे, नव्या क्लासेस सिस्टीम मुळे सायंकाळी संघ शाखेवर जाऊन संस्कार मिळविणे कमी झाले आहे, टीव्हीवर कार्टून्स दिवसरात्र दाखविणे,

वगैरे. कम्युनिस्ट व त्यांचे छोटे भाई सोशालिस्ट यांचे तर उद्दिष्टच हिंदू धर्मसंस्कार खलास करणे व पुरोगामी नावाचा एक समाज पुढे आणणे. देशाचे नुकसान करण्याबद्दल त्यांना फाशी दिले तरी ती सजा अपुरीच पडेल. ना. गो. गोऱ्यांच्या शब्दात 'इट वॉज् जस्ट अ मॅडनेस.'

एका ताटात जेवण ही गोष्ट आपल्या हिंदू मुलीस पटतच नाही. बुरखा वा हिजाब त्यांना गुलामी वाटते. तोंडाची लाळ त्यास लागते व तो ओला बुरखा तसाच दिवसभर वाळगावा लागतो. त्या मध्यरात्री २-३ वेळा थंड पाण्याने आंघोळी करून थकून जातात. ते मूर्तिपूजा मानीत नाहीत, पण या ना त्या मार्गाने मूर्तिपूजा करतातच. दर्गा म्हणजे मूर्तिपूजाच आहे. ते टीका करतात, ''परमेश्वर व माणूस यांच्यामध्ये ब्राह्मण हा एजंट कशाला?'' मग मुल्लामौलवी व शाही इमामची लुडबुड का चालविली जाते? आपल्याकडे संत म्हणजे ज्याच्यासमोर नतमस्तक व्हावे अशी व्यक्ती. शुद्ध व निष्कलंक चारित्र्य, सत्यवचनी व परमेश्वरावर संपूर्ण निष्ठा.

याउलट, तथाकथित सुफी संत म्हणजे हेर, धन्यास सारी माहिती पुरविणारे व योग्य वेळी भारतावर आक्रमणासाठी आमंत्रण देणारे. सुरुवातीला ते त्या आक्रमकांबरोबर आले, उदा. ख्वाजा मोईनुद्दीन चिस्ती १२३३ ला अजमेरला आला व त्याने पृथ्वीराज आणि हिंदू भारत यांची वाट लावली. ख्वाजा कुतुबुद्दीन १२३६ ला दिल्लीस आला. हे दोन ख्वाजा शहाबुद्दीन घोरीबरोबर आले. बडोद्याच्या खंडेराव गायकवाड महाराजांना एका सुफी संताने मुलगा वारस होण्याची लालूच दाखविली. ते एवढे भाळले की गुप्तपणे मुसलमान झाले. पहाता पहात बडोदे मिनी पाकिस्थान बनले. काही ब्राह्मणांनी बडोदे संस्थान वाचविले. त्यांनी कट रचून सयाजीरावांना गादीवर बसविले.

शेख निझाम उद्दीन औलिया दिल्लीस १३३५ ला आला. आमच्या समाजवादी मधु दंडवत्यांनी दिल्लीतील एका स्टेशनला त्याचे नाव दिले. जणू इतिहासांत हिंदू वा शीख संत अस्तित्वातच नव्हते. त्यांना आधुनिक संत विनोबा भावे आठवले नाहीत. मधु दंडवते माझे चांगले मित्र होते. या नावाविषयी मी विचारलेच. ते म्हणाले, ''वरून प्रेशर आले.'' जनता राज्यात आंधळे मुसलमान प्रेम असलेले व दंडवत्यांवर दाब देऊ शकणारे कोण मंत्री असावेत याचा मला अजून पत्ता लागलेला नाही. का दंडवते खोटे बोलले?

काही उदाहरणे

१. मुस्लीम नट इरफान खानच्या आसामी पत्नीचे नाव सुतपा सिकदार.

त्यांच्या मुलांची नावे बाबिल आणि अय्यान.

२. सुप्रसिद्ध व सुंदर नटी रेखाला चार बहिणी. राधा गणेशन् या बहिणीने उस्मान सैय्यद यांच्याशी लग्न लावले. ती दोघे अमेरिकेत राहतात.

३. संगीत दिग्दर्शक अनु (अनवर) मलीक यांनी अंजुशी लग्न लावले. त्यांना दोन मुली. एकीचे नाव अनमोल. त्यांचा मोठा भाऊ दाबू मलीक. त्यांच्या पत्नीचे नाव ज्योती. अमल व अर्मान ही त्यांची मुले.

४. १९८० च्या दशकांत लीना दास ही कॅब्रे डान्सर म्हणून पुढे आली. महंमद रफीचा मुलगा शाहीद. त्याने लीना दासशी लग्न केले. त्यांना दोन मुले आहेत. सुधीर फडक्यांच्या लग्नात याच महंमद रफींनी मंगलाष्टके गायली होती.

५. झाईद खानने त्यांची शाळेतील हिंदू मैत्रीण मालाइका पारेखशी लग्न केले. त्याच्या बहिणीने ह्रतिक रोशनशी लग्न लावले. दुसऱ्या बहिणीनेही हिंदूशीच लग्न लावले.

६. मिनी माथुर ही टीव्ही अँकर म्हणून प्रसिद्ध आहे. तिने फिल्म डायरेक्टर कबीर खानशी लग्न लावले. त्यांच्या मुलाचे नाव विवान व मुलीचे सायरा.

७. मुस्लीम नट फारुख शेखची पत्नी गुजराती हिंदू रूपा. त्यांना दोन मुली - शाईस्ता आणि साना.

८. मीरा नायर ''मोन्सून वेडींग'' या फिल्मच्या दिग्दर्शक. त्यांचा युगांडाचा मुस्लीम नवरा प्रा. मोहंमद मामदानी कोलंबिया युनिव्हर्सिटीत शिकवितो. त्यांच्या मुलाचे नाव आहे झोरान. ती नेहमी हिंदूविरोधी सिनेमा का काढते ते वाचकांना आता सहज कळून येईल.

९. मुझफर अली हे फिल्म डायरेक्टर. आझाद हिंद फौजेच्या कॅ. लक्ष्मी सहगल यांची मुलगी सुहासिनी सहगल, ही त्यांची पत्नी.

१०. अहंमद डंपी हे कॉंग्रेसचे राजकारणी व संजय गांधींचे दोस्त. भूतपूर्व मिस इंडिया नैना बालेश्वर या खासदारही होत्या. डंपी हा त्यांचा दुसरा नवरा. पहिल्या नवऱ्यापासून त्यांना रीवान व रीवका आणि डंपीपासून आझान हा मुलगा आहे व अलीह ही कन्या.

११. प्रीती ही ईमतिआझ अल्ळीची पत्नी. ''जब वुइ मेट'' हा त्यांचा सिनेमा खूप गाजला.

१२. सितारा देवी या मशहुर कथ्थक नर्तकीने 'मुगल-ए-आझमचे' दिग्दर्शक

के. असीफ यांच्याशी लग्न लावले, पण सिताराने लवकरच घटस्फोट घेतला. त्यानंतर सिताराने प्रताप बारोटशी लग्न लावले पण तेही लवकरच मोडले.

१३. नट फारुख शेखची पत्नी रूपा गुजराती हिंदू आहे. शाईस्ता आणि शायना या त्यांच्या दोन मुली.

१४. सलीम-जावेद या ड्युओपैकी सिने-लेखक सलीम यांच्या घरात धर्मांचे कडबोळे दिसते. सुशीला ही त्याची मराठी पत्नी. सलमान, अरबाज व सोहेल हे त्यांचे मुलगे आणि अलवीरा ही त्यांची मुलगी. अरबाज खानने ख्रिस्ती कॅथॉलिक मलाईका अरोराशी लग्न लावले. अर्हान हे त्यांच्या मुलाचे नाव. नट सोहेल खानने हिंदू सीमा सचदेवशी लग्न केले. त्यांच्या मुलाचे नाव निर्वाण. अलवीराचे लग्न नट अतुल अग्निहोत्रीशी झाले. त्यांच्या मुलीचे नाव अलीझेब व मुलाचे नाव अय्यान. सलीमच्या दुसऱ्या पत्नीचे नाव हेलन. ती अँग्लोइंडियन ज्यू आहे. त्यांनी अर्पिता ही मुलगी दत्तक घेतली आहे.

१५. शीला दिक्षितांच्या मुलीचे नाव लतिका. तिचे लग्न मुसलमान सैय्यदशी झाले.

१६. सुप्रसिद्ध टीव्ही अँकर हुसेन कुवाजेरवालाने हिंदू टीना दरेराशी लग्न लावले.

१७. अॅक्टर-डीरेक्टर फरान अख्तरची पहिली पत्नी रीया जैन. त्यांचा आता घटस्फोट झाला आहे. अधुना भभानी या हिंदू बंगाली मुलीशी त्याने दुसरे लग्न लावले. त्यांना दोन मुली : शाक्या व अकीरा. मुलाचे नाव कल्याण. जावेद अख्तरचा भाऊ सलमान. त्याने मोनीशा नायरशी लग्न लावले.

१८. सतारवादक कै. विलायत खान यांची पत्नी हिंदू ब्राह्मण (बंगाली) मोनीशा. त्यांचा घटस्फोट झाला. त्यांचा मुलगा शुजात. तोही उत्तम सतार वादक आहे. त्याची मुस्लीम पत्नी परवीन आणि मुलाचे नाव आझान.

१९. विलायत हुसेनच्या मुलीचे नाव झीला. ती सुफी गायिका आहे. तिचे मुसलमान मुलाशी लग्न झाले असून त्यांच्या मुलाचे नाव यमन आहे. त्याचे लग्न हिंदू राजपूत मुलीशी झाले व घटस्फोटदेखील. विलायत हुसेनच्या दुसऱ्या पत्नी ख्रिश्चन आहेत. त्यांच्या मुलाचे नाव हिदायत.

२०. कोरीओग्राफर अहंमद खानचा भाऊ बॉबी खान. गायिका सुनीधी चौहान ही वयाच्या १८ व्या वर्षीच पळून गेली व बॉबी खानशी लग्न लावले.

तिच्या घरच्या मंडळींना ते लग्न मान्य नव्हते. सुदैवाने (?) एका वर्षातच त्यांचा घटस्फोट झाला.

२१. अबीद हुसैन हे अर्थशास्त्रज्ञ व डिप्लोमॅट होते. त्यांच्या हिंदू पत्नीचे नाव त्रिलोक कर्की. त्यांच्या मुलांची नावे सुहैल व राणा. मुलीचे नाव विशाखा.

२२. "फूल खिले है गुलशन, गुलशन" या दूरदर्शन मालिकेत तब्बसुम ही नटी खूप गाजली. ही बेबी तब्बसुम अयोध्यानाथ व असगरी यांची मुलगी. तिचे लग्न रामायण मालिकेतील राम, अरुण गोवील याचा भाऊ विजय याच्याशी झाले.

२३. कौसर मुनीर ही बॉलिवुडची एक कवयित्री. तिने तेथील नट निर्मल पांडे याच्याशी लग्न केले.

२४. झहीदा हुसैन हीने "गॅंबलर" आणि "प्रेम पुजारी" या सिनेमात देव आनंदबरोबर व "अनोखी रात" यात संजीव कुमारबरोबर काम केले होते. ती संजय दत्तची चुलत बहीण! तिने के. एन. सहायशी लग्न केले.

२५. पंकज उधास गझल गायनाबद्दल मशहूर आहे. त्याची पत्नी फरीदा मुस्लीम आहे.

२६. उस्ताद अलीउद्दीन खानांची मुलगी रोशन आरा. तिचे लग्न बापानेच रविशंकर या आपल्या खास चेल्याशी लावून दिले. हिंदुस्थानी संगीत भ्रष्ट होऊ नये म्हणून काही काशीच्या ब्राह्मणांनी इस्लाम धर्म स्वीकारला व संगीत शास्त्राचे संरक्षण केले. राज दरबारामुळे त्यांना थोडाफार फरक करावा लागला. म्हणून कर्नाटकी संगीत अस्सल मानले जाते. या संगीत जपणाऱ्या उस्ताद ब्राह्मणांना लाख लाख दंडवत.

२७. टीनू आनंद तथा विरेंद्र राज आनंद यांची पत्नी शहनाझ. नट जलाल आगाची ती बहीण. "सात हिंदुस्थानी" या सिनेमात आनंदने काम केले होते. "शहेनशाह" या सिनेमाचे त्यांनी दिग्दर्शन केले होते.

२८. अझीम प्रेमजी या विप्रोच्या उद्योगपतींना कोण ओळखत नाही? त्यांच्या रीशाद या मुलाने २००५ साली आदिती या हिंदू मुलीशी लग्न लावले. त्यांच्या मुलाचे नाव रोहन व मुलीचे नाव रीहा.

२९. 'देवदास', 'हम दिल दे चुके सनम' वगैरे सिनेमांचे संगीत दिग्दर्शक ईस्माईल दरबार यांनी प्रीती सिंहाशी लग्न केले व तिचे नाव आयेशा ठेवले.

३०. अल्ला बक्ष व प्रभावती देवी (लग्नानंतर इक्बाल बेगम) यांची मुलगी मेहजाबेन

बानो (सिनेमातील नाव मीना कुमारी) जास्त प्रसिद्ध आहे. मीनाकुमारीच्या बहिणीचे नाव मेहेल्का (लग्नानंतर माधुरी) व तिच्या नवऱ्याचे किशोर शर्मा.

३१. गझल गायक तलत अझीझने सिंधी हिंदू बीना अडवाणीशी लग्न केले. अदनान व शायान ही त्यांची दोन मुले.

३२. शाहरुख खानच्या पत्नीचे नाव गौरी चिब्बर. पुत्र आयान व पुत्री सुहाना.

३३. ''इंडियन काऊबॉय'' फिरोझ खानने सुंदरीशी लग्न केले. सोनिया सहानी या नटीची ती बहीण. सोनियाने 'बॉबी' या सिनेमात ऋषी कपूरच्या आईचे काम केले. १९८५ साली त्यांचा घटस्फोट झाला. फरदीन व लैला ही त्यांची मुले. दोघांनी हिंदू परिवारात लग्ने केली.

३४. खय्याम ह्या संगीत दिग्दर्शकाने जगजीत कौर या शीख मुलीशी शादी केली होती.

३५. नटी दिया मिर्झाची आई दीपा बंगाली हिंदू. तिचे वडील जर्मन ख्रिस्ती. त्यांचा घटस्फोट झाला. दिया लहान होती. दीपाने अहमद मिर्झाशी लग्न केले. मिर्झा २००२ साली मरण पावले. दिया मुसलमान नाही, पण ती आडनाव मात्र मिर्झा लावते.

३६. दारुच्या धंद्यात एकाधिकारशाही गाजविणारे विजय मल्या पूर्वी देशभक्त होते. त्यांनी रेखाशी दुसरे लग्न लावले व तेथून त्यांची वृत्ती बदलली. रेखाने आधी महंमूदशी लग्न लावले होते व त्या दोघांना लैला नावाची एक मुलगीही होती. विजय मल्यांनी लैलास दत्तक घेतले. आता ती स्वतःला लैला मल्या म्हणविते.

३७. तलत महंमूद अफलातून गायचा. तो अकाली मरण पावला. त्याची बायको लतिका ख्रिस्ती होती. त्यांचा मुलगा खलिद. त्याने हिंदू रेखा पांडेशी लग्न लावले.

३८. कबीर बेदींची मुलगी नटी पूजा बेदी. तिने फरहान फर्निचरवाला या मुसलमानाशी लग्न केले व नंतर घटस्फोटही घेतला. त्यांना अलिया व ओमर या नावाची दोन मुले आहेत.

३९. सलीम मर्चंट हे सलीम-सुलैमान दुकलीमधले एक संगीत दिग्दर्शक. शंकर-जयकिसनप्रमाणे. सलीमची बायको हिंदू आहे.

४०. साबा करीम हे क्रिकेटर म्हणून गाजले. त्यांची बायको रश्मि रॉय. त्यांच्या

मुलाचे नाव फिदेल.

४१. तौफिक कुरेशी उत्तम तबलावादक आहेत. त्यांनी गीतीका वर्दे या शास्त्रीय संगीत गायिकेशी लग्न लावले. त्यांच्या मुलाचे नाव शिखर नाद.

४२. लालकृष्ण अडवाणींच्या पुतणीने मुसलमानाशी लग्न लावले. लालु यादवाने त्यांचा रथ बिहारच्या हद्दीत शिरताच त्यांना अटक केली.

४३. सामाजिक कार्यकर्ती तीस्ता सेटलवाड पत्रकार म्हणून काम करीत असताना जावेद आनंद या सहकाऱ्यांशी लग्न लावले. त्यांच्या मुलांची नावे तमारा व जिब्रान. या बाईने मोदींना बदनाम करण्याचे शर्थीचे प्रयत्न केले. मोदी तिचे काही वाकडे करू शकले नाहीत. तिला काँग्रेस व सारे डावे यांचा, तसेच साऱ्या छापील व इलेक्ट्रॉनिक मिडियाचा भरपूर पाठिंबा आहे.

४४. इमरान खान या सिने नटाला कोण ओळखीत नाही? त्याच्या बायकोचे नाव आहे अवंतिका मलीक. आमीर खान हा अनिल पाल व नूझत खान यांचा सुपुत्र. त्यांचा घटस्फोट झाला. तरीही इमरान खान पाल हे आडनाव न लावता खान लावतो, कारण आज सिने सृष्टीत खान नावाचा दबदबा आहे.

४५. भारतीय क्रिकेटर महंमद काईफच्या बायकोचे नाव आहे पूजा यादव.

४६. महंमद हिदायतउल्ला हे भारताचे सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश होते. त्यांना उपराष्ट्रपतीही बनविण्यात आले होते. ते १९९२ साली वारले. त्यांच्या बायकोचे नाव पुष्पा शाह. त्यांच्या वकील मुलाचे नाव अर्शद.

हिंदू पती-मुस्लीम पत्नी

मानसशास्त्र : आपल्याकडे हिंदू मुलगा मुसलमान मुलीशी लग्न करीत नाहीत असा एक गोड भ्रम आहे. कोण कोणाकडे केव्हा आकृष्ट होईल व त्यांच्या मैत्रीचे रूपांतर लग्नात कधी होईल ते सांगणे अवघड आहे. मराठी मनाला हे न पटणारे आहे. इतिहासाचे भूत त्याच्या पाठीवर स्वार झाले आहे. बिहार व उत्तर प्रदेश येथे हिंदूंनी ना कधी प्रतिकार केला, ना कधी दिल्ली व पटना येथे राज्य केले. तेथे गुलामीचे वातावरण होते. मराठी मनाचा हा गोड भ्रम काढण्यासाठी हा पुढे दिलेल्या माहितीचा उपद्व्याप मी केला आहे.

फालतू घराण्यातली मुस्लीम मुलगी असेल तरी तिच्या हिंदू पतीकडून अवास्तव अपेक्षा असतात. त्या पतीने सिद्ध केल्या तर संसार चांगला होतो, नाहीतर रोज कटकटी. "हे असे कां?" याचा मी बरेच दिवस शोध घेत आहे, पण

मला त्याचे समर्पक उत्तर मिळत नाही. काँग्रेसने मुसलमानांचे तुष्टीकरण करून त्यांचे फाजील लाड केले, त्यातून ही हाव निर्माण झाली असावी. ह्या मुलींची स्वस्त व सवंग (चीप) आवड आपल्या हिंदू मुलांना पसंत पडत नाही. यामुळे खटके उडतात. पण मुलगी समंजस, सुसंस्कारी व सुशिक्षित असेल तर मुलाच्या आवडीनिवडी शिकते व त्याप्रमाणे वागते. मुस्लीम मुलीला केवळ आई-बाप व नातेवाईक यांचा विरोध असतो असे नाही, तीला मित्रही विरोध करतात.

रविशंकरांना अत्तराचा भलताच शौक. विमानात ते माझ्या शेजारच्या सीटवर बसले होते. मला त्या अत्तराचा भपकारा भयंकर वाटत होता. मी त्यांना विचारले, ''बंगालमध्ये अत्तराची आवड जास्त आहे कां?'' माझ्या प्रश्नाचा रोख त्यांना कळला. ते म्हणाले, ''ही सवय मला माझ्या पहिल्या पत्नीमुळे लागली. ती मुसलमान होती. माझ्या गुरूंची कन्या. त्या लोकांना आपल्यासारखी रोज आंघोळ करण्याची सवय नसते. मला ते सहन व्हायचे नाही, पण मी स्पष्टपणे बोलू शकत नव्हतो. म्हणून हा अत्तराचा शौक. बरेच वेळा गरजेपोटी केलेल्या वस्तुंची पुढेपुढे सवय होते.'' त्यांनी मला कडू गोष्ट - *कल्चरल शॉक* - गोड शब्दात सांगितली होती.

बॉलिवुड व टीव्ही क्षेत्र यात एकंदर सेक्युलर वातावरण खूप दिसते. तेथे मुसलमानी डीएनए अंगात (रक्तात) असल्याशिवाय प्रवेश मिळत नाही. असे विधान केले तर ती अतिशयोक्ती ठरू नये. विठ्ठलराव गाडगीळांनी एकदा गप्पांच्या ओघात मला सांगितले, ''आमच्या टीव्हीच्या इमारतीचे नाव आहे, रँडम हाऊस. लोक त्यास रंडी हाऊस म्हणतात.'' वसंत साठे नभोवाणी व माहिती खात्याचे मंत्री झाले. बॉलिवुडच्या मुसलमान नट्या त्यांच्या देखणेपणावर एवढ्या भाळल्या की इंदिरा गांधींना त्यांचे खाते बदलून 'खतां'चे खाते सोपवावे लागले.

मुसलमान मुलीला हिंदूंची सर्वात खूप आवडणारी गोष्ट म्हणजे वेळी अवेळी करायला लागणाऱ्या आंघोळीपासून मुक्तता. ईस्लाममध्ये दर शरीर संबंधानंतर ''शुद्ध'' व्हावे लागते. कित्येक वेळा तर २-३ वेळा थंड पाण्याने त्या बापडीस स्नान करावे लागते! मी अनेक मुलींना या अघोरी आंघोळीनंतर उद्‌भवणाऱ्या न्यूमोनियासाठी ट्रीटमेंट दिली आहे. म्हणून मला ही अति खाजगी गोष्ट माहीत.

काही उदाहरणे

१. सुनील दत्त ह्या हिंदू नटाने मुस्लीम नरगीसशी लग्न केले. त्यांच्या संजय या गुन्हेगार मुलाने दिलनवाझ शेखशी लग्न केले. तिचे फिल्मी नाव आहे

मान्यता. (खरे म्हणजे दत्त मंडळी हिंदू. कारबालाच्या लढाईत त्यांच्या पूर्वजांनी अलीस वाचविण्याची खूप कोशीश केली होती. पार्शी सागरमार्गे पळून गुजरातमध्ये आले, याऊलट हे व्हाया अफगाणिस्थान, पंजाबमध्ये पळून आले. त्यांचे वंशज स्वतःस हिंदू समजतात, उदा. गीता बाली, गुजरातचे पोलीस डीआयजी दत्ता, वगैरे. अपवाद संजय, तो स्वतःला 'अर्धा मुसलमान' समजतो.)

२. हिंदू हृतिक रोशनने सुझानी खानशी लग्न केले. ती संजय खानची (आब्बास खान) मुलगी.

३. हिंदू नट अतुल अग्निहोत्रीने अलबिरा खानशी लग्न केले. ती सलमान खानची सख्खी बहीण आणि सलीम खानची मुलगी.

४. मुस्लीम नट फिरोज खानची मुलगी लैलाने रोहित राजपालला वर म्हणून पसंत केले.

५. कृष्ण चंदर यांचे उर्दू साहित्यात फार वरचे स्थान आहे. त्यांनी सलमा सिदीक्कीशी लग्न लावले.

६. नजमा हेपतुल्ला या मौ. अबुल कलाम आझादांच्या पुतण्या. त्यांना तीन मुली. त्यापैकी एकीने हिंदू मुलाशी लग्न लावले.

७. नाना चुडासमा हे गुजराती हिंदू मुंबईचे शेरीफ. त्यांच्या मुस्लीम पत्नीचे नाव मुनैरा जसदनवाला. अक्षय आणि साईना ही त्यांची अपत्ये. दोघांनी हिंदूशीच लग्ने लावली. साईना ही भाजपाची टीव्ही राष्ट्रीय प्रवक्ती आहे.

८. नट संजय खानना दोन मुली. त्यांच्या जावयांची नावे अजय अरोरा (सिमोनीचे पती) व हृतिक रोशन (सुझानीचा भूतपूर्व नवरा).

९. आदित्य पंचोलीची पत्नी झरीना वहाब.

१०. कोकणस्थ ब्राह्मण अजित आगरकरच्या पत्नीचे नाव आहे फतिमा घडीयाळी. ती बोहरा, म्हणजे मूळची गुजराथच्या पाटणची ब्राह्मण.

११. नट सुनील शेट्टीने माना कादरीशी लग्न लावले. तिचे वडील मुंबईचे सुप्रसिद्ध आर्किटेक्ट आहेत.

१२. कै. राजेश पायलटचे सुपुत्र सचिन पायलट ह्या खासदारांनी सारा अबदुल्लाशी लग्न केले. असे म्हणतात, घटस्फोटासाठी पायलटना एक कोटी रुपये मिळाले! जम्मू व काश्मीरचे मुख्यमंत्री फारुख अबदुल्लांची ही सुकन्या.

१३. गोविंदा या नटाच्या पिताश्रींनी - अरुण अहुजांनी - नझीमाशी लग्न केले

होते. त्यांनी तिचे नाव बदलून ''निर्मला देवी'' ठेवले होते.

१४. एका सधन मुस्लीम कुटुंबातील झुबेदा या मुलीने १९४७ साली एका मुस्लीम तरुणाबरोबर लग्न केले. त्याच्याबरोबर पाकिस्थानात जाण्यास तिने नकार दिला. म्हणून त्याने घटस्फोट घेतला. तिने पुढे हनुवंत सिंग या जोधपूरच्या महाराजांशी लग्न केले. एका विमान अपघातात हे नवपरिणित जोडपे मरण पावले. पुढे सिने-टीकाकार व दिग्दर्शक म्हणून प्रसिद्ध झालेला खलिद महंमद (फिझा, तेहझीब, सिलसिला, वगैरे) हा त्यांचा मुलगा. शाम बेनेगलने दिग्दर्शित केलेल्या ''झुबेदा'' या सिनेमाची स्क्रिप्ट (हस्तप्रत) त्यांनी लिहिली होती. त्यात करिश्मा कपूरने काम केले होते.

१५. डायरेक्टर-एडिटर शिरीश कुंदर यांनी डायरेक्टर-कोरिओग्राफर फरा खानशी लग्न केले होते.

१६. मनोज बाजपयींनी शबाना रझाशी लग्न केले होते. तिचे सिने नाव ''नेहा'' होते. विधु विनोद चोप्रांच्या ''करीब'' या सिनेमात बॉबी देऊलबरोबर नेहाने काम केले होते.

१७. मुंबईचा कुप्रसिद्ध गुंडोबा व नंतर आमदार झालेल्या अरुण गवळींनी आयेशाशी लग्न लावले व तिचे नाव ''आशा'' ठेवले. बाळ ठाकरे त्यांना हिंदू दाऊद म्हणत.

१८. १९६७ च्या ब्यूटी कॉंटेस्ट मध्ये प्रथमच नय्यरा मिर्झा या मुलीने भाग घेतला व तिने प्रथम क्रमांक पटकाविला. तिने हिंदू धर्म स्वीकारला व ती सौ. नलिनी पटेल झाली. ती अमेरिकेत राहते.

१९. वहीदा रहमानने ''शगून'' या सिनेमात कमलजीत म्हणून पंजाबी नट शशी रेखीबरोबर काम केले व त्याच्याशी लग्न लावले.

२०. अनिल धारकर या सुप्रसिद्ध इंग्रजी लेखकाने पाकिस्थानी ईमतियाझशी लग्न लावले. त्यांची मुलगी आयेशा सिने नटी आहे व तिने सुईसाईड बॉंबर म्हणून ''द टेररिस्ट'' मध्ये काम केले आहे. हे धारकर मूळचे बडोद्याचे. माझे फिजिऑलॉजीचे मास्तर डॉ. दिघे यांचे ते मेहुणे. एकदम मवाळ. या कुटुंबातील एक धारकर शिकागोचे प्रसिद्ध सर्जन होते.

२१. डान्स मास्टर बी. सोहनलाल यांच्याशी कोरिओग्राफर सरोज खानने लग्न केले. त्यांना २ मुले आहेत - कुकु व कोरीओग्राफर राजू खान. त्याने ''शोबिझ'' हा सिनेमा दिग्दर्शित केला आहे.

२२. राज बब्बरने कम्युनिस्ट आई-बापांची मुलगी नादीरा झहीरशी लग्न केले.

२३. नफीसा अली ही पूर्वीची मिस इंडिया व नटी. तिच्या शीख नवऱ्याचे नाव कर्नल सोंधी.

२४. नसीरा शर्मा ही सुप्रसिद्ध हिंदी लेखिका. तिचा नवरा हिंदू आहे.

२५. गेल्या युगाची सुंदर नटी मुमताझने सधन व्यापारी माधवानीशी लग्न लावले.

२६. जॉर्ज फर्नांडीस संरक्षण मंत्री होते तेंव्हा गाजलेले नेंव्हल चीफ विष्णू भागवत यांची ॲडव्होकेट पत्नी नीलोफर. दोघांनी जनता सरकारला अक्षरशः पाण्यात पाहिले.

२७. नट व गायक किशोर कुमारने मुमताझ बेगम (मधुबाला) या सुंदर नटीशी १९६० साली लग्न लावले. मधुबालाची बहीण झहीदा. तिने दिग्दर्शक ब्रिज भूषण सहानींशी लग्न केले.

२८. त्रिनिदादचे सुप्रसिद्ध इंग्रजी लेखक व्ही. एस. नायपॉल हे मूळचे बिहारी हिंदू आहेत. नादिया या पाकिस्थानी पत्रकार मुलीशी त्यांनी नुकतेच लग्न लावले.

२९. आशा पारेखचे वडील हिंदू बनिया व आई मुसलमान होती.

३०. राजीव राय यांनी ज्या सिनेमाचे दिग्दर्शन केले त्यात नटी होती रझा मुरादची पुतणी सोनम तथा त्रिदेव कन्या.

३१. सीएनएन-आयबीएनची कुंकू लावणारी अँकर सेहर झम्मन हिने लेखक धीरज सिंगशी लग्न लावले. आजकाल ते कुंकू गायब झाले आहे.

३२. साऱ्या जगात प्रसाधन तज्ञ म्हणून प्रसिद्ध असणारी शहनाझ हुसैनने हिंदू बनिया आर. के. पुरी यांच्याशी लग्न लावले.

३३. माधुरी दिक्षितशी साम्य असलेली नटी फरहीन ९० च्या दशकांत खूप गाजली. तिने क्रिकेटर मनोज प्रभाकरशी लग्न लावले.

३४. ''राम तेरी गंगा मैली'' या सिनेमात गाजलेली नटी मंदाकिनीचे (यास्मीन) वडील ख्रिश्चन व आई मुस्लीम होती. मुंबईत प्रॅक्टीस करणारे नेपाळी हिंदू डॉक्टर ठाकूर यांची ती पत्नी झाली.

३५. बॉलीवूड नट व खलनायक रणजीत (बेदी) याने नाझनीनशी लग्न लावले.

३७. महाराष्ट्र टीव्ही चॅनलवर सारखे निखिल वागळे विचारत असतात : ''हे काय चालले आहे?'' ते त्यांनी ''यह क्या हो रहा है?'' या हंसल मेहतांच्या सिनेमाच्या शीर्षकावरून उचलले आहे. वुडस्टॉक व्हीला व

छळ हे त्यांचे इतर गाजलेले सिनेमे. बॉलीवुडमध्ये सपोर्टिंग रोल करणारे नट युसुफ हुसैन यांच्या सफीना या मुलीशी हंसल मेहतांनी लग्न लावले.

३८. मॉडेल फिरोझ गुजरालचे वडील जॉर्ज हे ख्रिस्ती व आई विकार ही मुसलमान. पेंटर सतीश गुजरालच्या मोहीत या मुलाशी तिने लग्न केले. सतीशचे बंधू इंदर कुमार काही काळ (२१ एप्रिल १९९७ ते १८ मार्च १९९८) भारताचे पंतप्रधान होते.

३९. मुस्लीम सत्यशोधक हमीद दलवाईंच्या मुलीचे लग्न शरद चव्हाण नावाच्या हिंदू मुलाशी झाले.

४०. १९७० च्या दशकांत "चेतना" व "दस्तक" हे दोन सिनेमे रेहाना सुलतानच्या धीटपणामुळे गाजले. तिने नंतर हिंदू डायरेक्टर बी. आर. ईशारा यांच्याशी लग्न केले.

४१. मुसलमान नटी झोरा एके काळी खूप गाजली. तिने कमलेश्वर नाथ सहगल यांच्याशी लग्न केले.

४२. टीव्ही तारका तनसीम शेखने बिल्डर समीर नेरूरकर यांच्याशी लग्न करून ती तनीषा नेरूरकर बनली.

४३. अनिता आयूब ही पाकिस्थानी नटी ९० च्या दशकांत काही भारतीय सिनेमात झळकली. तिने सौमील पटेलशी लग्न केले व अमेरिकेत ती स्थायिक झाली.

४४. राणी नाराह ही आसाममधून निवडून आलेली खासदार. मूळची ती जहाँ आरा चौधरी होती. तिने हिंदू धर्म स्वीकारला, आसामचे भरत चंद्र नाराह या राजकीय पुढाऱ्याशी लग्न केले व राजकारणात पुढे आली.

ही लग्ने यशस्वी होतात कां?

मी एक अरबी पायलटला आर्य समाजात नेऊन हिंदू बनविले. त्याचे एका पटेल पोरीवर प्रेम होते. त्या दोघांचे आर्य समाजात लग्नही लावून दिले. पुढे ती दोघे सौदी अरेबियाला गेली. मुसलमानी कायद्याप्रमाणे त्याने तिला दोन अरब सवती आणल्या. त्यांच्या कायद्याप्रमाणे भारतीय स्त्रीपासून झालेल्या संततीला सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक सन्मान मिळतो, पण कायदेशीर वारस होता येत नाही.

मी काळे नावाच्या मराठा तरुणाशी बडोद्यातील मीर बाकर अली या सरदार घराण्यातील मुलीशी आर्य समाजात जाऊन लग्न लावले. पण काळेला

त्यानंतर भयंकर मानसिक छळ सोसावा लागला. दर तासाला काळेला टेलीफोनवर धमक्या येऊ लागल्या. त्या मुलीला तिच्या घरातून स्त्री सभासद काळ्यांच्या घरात येत व समजावीत, ".ये तुमने क्या किया? एक काफीर लौंढे के साथ शादी कर के इस्लाम का नाम मिट्टी में मिला दिया." नंतर काळेच्या घरावर दगडांचा मारा सुरू झाला. काळे कोठेही दिसला की त्यास "क्यूं बे काले, शादी तो तूने की, अब तू पस्ताएगा," अशा सरळ धमक्या येऊ लागल्या. काळेची बीब्बी मला सांगू लागली, "डॉक्टर साहब, काले का कल खून हो जाएगा तो आप जिम्मेदार होंगे." ही दमदाटी आणखी काही आठवडे चालू राहिली. शेवटी मीच त्या बीब्बीला सांगितले, "काही दिवस तू तुझ्या घरी जाऊन रहा, म्हणजे काळेला जरा सुखाची झोप येईल." तिने ऐकले व काळेला सुखी केले. तिला वाईट वाटत होते पण वस्तुस्थिती लक्षात ठेवून अशा काही स्टेप्स घेणे आवश्यक होते. ती माहेरी गेली. तिच्यावर कडक पहारा बसविण्यात आला. आजपर्यंत तिला तिच्या लोकांनी घराबाहेर पाऊल म्हणून टाकून दिले नाही. त्या दोघांना अमेरिकेस जॉब मिळावा यासाठी मी खूप खटपट केली, पण काळे तेवढा शिकलेला नव्हता. एका पटेल मित्राच्या न्यू जर्सीतील मॉलमध्ये काम करण्यासाठी मित्राला तयार केले, पण नेमका त्यावेळी अमेरिकेत कायदा आला, "अमेरिकेतील आशियन चालतील, पण भारतातून नोकर मागवायचे नाहीत." त्याला व्हिसा कधी मिळूच शकला नाही.

हे जेव्हा घडले तेव्हा आतंकवादी नावाचा शब्द कोणी ऐकला नव्हता. पण ही जातच झनूनी आहे, आतंकवादी आहे, त्यांच्यासमोर आपण असहाय्य ठरतो, ही गोष्ट नक्की. दुसरी गोष्ट, त्यांना त्यांचे सारे आपनेवाले खुशीने मदत करतात. वकिली सल्ल्यापासून ते आर्थिक मदतीपर्यंत. त्याउलट, वकील मंडळी माझ्या घरी येऊन माझ्या आईला घाबरवीत, "या तुमच्या मुलाचे लक्षण काही ठीक दिसत नाही. कशाला या फंदात पडायचे? ही सारी कामे रिकामटेकड्यांची. शेवटी याचा परिणाम त्यांच्या प्रॅक्टीसवर होईल." या मला हिंदुत्वाच्या कामात आर्य समाजी सोडले तर मराठी मंडळींपैकी एकानेही मदत म्हणून केली नाही. जेवढे हिरमुसले करता येईल, जेवढे निरुत्साही करता येईल तेवढे केले. संघातल्या मित्रांनी कोरडी सहानुभूती जरूर दाखविली, पण शाब्दिक, कृतीने नाही. त्यावेळी जनसंघ नुकताच कोठे वर येत होता. त्यामुळे त्यांना लोकांत 'अप्रिय' व्हायची इच्छा नव्हती. ते सांगायचे, "हे काम हिंदू सभेचे, आमचे नाही." हिंदू सभावाले म्हणत, "हे काम संघाचे. त्यांच्या हाती लाठी तरी असते, आमच्या हाती शस्त्र वगैरे काहीच नाही."

आता अशा केसेस माझ्याकडे अजून येतात. तेव्हा मी त्यांना सांगतो, ''अजून आपला समाज तेवढासा जागृत झालेला नाही. तू शहाणा असशील तर या फंदात पडू नकोस. अगदी हट्टालाच पेटला असशील तर तिला आधी अमेरिकेत नर्सिंग वा इतर तत्सम कामासाठी पुढे धाड. थोडेसे कमावून दे तिला व मग तू तेथे जा. नोकरी तर मिळेल. पण येथे राहू नकोस. काळेचा मला भयंकर अनुभव आलेला आहे. येथे राहिलास तर दोघेही दुःखी व्हाल.''

माझ्या अनुभवावरून मुलगा राजकारणी, वा सिनेमावाला वा रंगभूमीवरील नट असेल किंवा खूप श्रीमंत असेल तर त्याने या फंदात पडावे. साध्या माणसाचे हे काम नोहे. नटाची केमिस्ट्रीच निराळी असते. घरच्या स्त्रीकडूनच रतीसुख मिळाले पाहिजे असा त्याचा आग्रह नसतो. त्याचा मोठा चाहता वर्ग असतो. त्यांच्या नैतिकतेच्या कल्पना वा स्टँडर्डस् निराळी असतात. नटी असेल तर नवऱ्यास थोडा सैल सोडायला तिची मानसिक तयारी असते. पण एकंदर म्हणायचे झाले तर हा छंद अतिधनाढ्य लोकांचा आहे, तुमचा आमचा नाही.

बलात्कार (रेप)

हा विषय मुद्दामच शेवटी ठेवला. मुसलमानात याचे प्रमाण जास्त असावे, असा संशय आहे. निश्चित आकडे उपलब्ध नाहीत. हा संशय मुसलमानांना मान्य नाही. ते म्हणतात, ''आम्हाला ४-४ बायका करण्याची मुभा आहे, आम्हाला बलात्कार करण्याची गरजच काय?'' सामाजिक शास्त्रज्ञांचे म्हणणे वेगळे आहे, ''बलात्कार का करतात?'' बलात्कारी भ्याड असतात. त्यांना कामसुख हवे असते, जबाबदारी टाळायची असते. त्यामुळे असली कृत्ये बेकार, बेजबाबदार व बेताल गुंड- हिंदू व मुस्लीम - करतात. मुस्लीम गुंडांना त्यात काफीर पोरीस भोगण्याचे व एका मुस्लीम मुलाला या जगात आणण्याचे असे दुप्पट (डबल) मानसिक सुख मिळते.'' अशा गुंडांचा बंदोबस्त सौराष्ट्रांत एका रणरागिणीने केला होता. तिचे नाव पुष्पाबेन मेहता. ही बालविधवा होती. गांधीजींच्या आश्रमात वाढलेली. तिचे भाऊ गगनविहारी मेहता, अमेरिकेचे पहिले भारतीय राजदूत. पुष्पाबेन कोणाच्या बापाला न घाबरणारी. नेहरूंना फक्त तीन लोक ''तू'' म्हणून संबोधीत -- गांधीजी, डॉ. बी. सी. रॉय व पुष्पाबेन. नेहरू तीला घाबरत. ''तू करनेवाला है, इतना बता दे,'' ती नेहरूंना फर्मावयाची, ''नाहीतर मी माझ्या पद्धतीने ते घडवून आणेन. ''ती *एम्प्टी थ्रेट* नसे, ती ते काम घडवून आणण्यास समर्थ होती. मोरारजीभाई म्हणत, ''पुष्पाबेने कह्यु छे ने, तो करी नाखो.'' तिच्या

बाबतीत ''नो आर्ग्युमेंट,'' असा कायदा होता. शिंदीया नॅव्हीगेशन तिच्या ताब्यात होते. फियाट कार कंपनी तिच्या व्यवस्थेखाली होती. खरी मालकी सुमती मोरारजी व शेठ वालचंद हिराचंद यांच्याकडे होती, पण वहिवट पुष्पाबेनकडे. राजा मॅनेजर होते. पुष्पाबेन होत्या तोपर्यंत संप होणे शक्यच नव्हते. ती सरळ त्या मजुराच्या घरी जाई व विचारी, ''तुझी वैयक्तिक अडचण मला सांग.'' त्याच दिवशी ती अडचण दूर होई. मग कशाला जाईल कोणी संपावर? युनियन असायची पण कागदावर. तिचा नेता पुष्पाबेन. लोक तिला मानायचे, कारण तिचा वैयक्तिक स्वार्थ काहीच नव्हता. कामगारांना ती 'छोकरा' म्हणून संबोधन करावयाची. त्यांना ती खरोखर आईच वाटायची.

पुष्पाबेनचा ड्रायव्हर प्राणशंकर माझा पेशंट होता. त्याच्या मुलाचे दुकान माझ्या दवाखान्याखाली तळमजल्यात आहे. तो मला पित्यासमान मानतो. पुष्पाबेन होत्या तोपर्यंत गुजरातेत बलात्कार होणे शक्यच नव्हते. तिची ७-८ स्त्रियांची प्रायव्हेट आर्मी होती. त्यांना तिने प्रशिक्षण दिले होते. त्यांना तिने वस्तरे दिले होते. त्यांना धार लावायला शिकविले होते. कोणी बलात्कार केला तर या बाया त्याचे लिंग मूळाशी कापून टाकीत. त्याला बुट्टा म्हणत. जुनागढला भूत्तो दिवाण होता. त्याला बुट्टा बनविला होता, म्हणून तो बुट्टो. हळूच त्याने भूत्तो हे नाव बदलले. पुष्पाबेनने या 'कॅस्ट्रेशन' चा शास्त्रीय अभ्यास केला होता. लिंग कापले की रक्तस्त्राव थांबायला १० मिनिटे लागतात. समाजात त्याला बुट्टा म्हणून चिडवीत. ही शिक्षा मरणापेक्षाही जास्त जालीम होती. ह्या शिक्षेला कोणीही वांधा घेतला नव्हता.

पुष्पाबेनच्या नादी कोण लागणार? पोलीस कमिशनरने १-२ दा सांगून पाहिले. तिने नेहरूंना फोन जोडला व विचारले, ''तुला मेकॉलेचे पीनल कोड माहीत आहे. आमच्या सौराष्ट्रात हा कायदा गेली २,००० वर्षे चालू आहे. आमच्याकडे कोणी बलात्कार करायला धजावीत नाही. आफ्टर ऑल रिझल्टस् स्पीक.'' पुन्हा कोणी पुष्पाबेनच्या वाटेला गेले नाही. बलात्कारित मुलीची ती आईप्रमाणे काळजी घ्यायची, तिचे लग्न लावून द्यायची. आज पेपरात अशा मुलींची माहिती खूप येते, पण त्यांचे पुढे काय होते ते एकही पेपरवाला छापीत नाही. थोडक्यांत, बलात्काराचेही व्यापारीकरण झाले आहे. पोलीस कमिशनर कानेटकर डाकू भूपतच्या मागावर होते. पुष्पाबेनला त्याला बुट्टा बनवायचा होता. त्याला ती सन्माननीय (?) पदवी नको होती. म्हणून त्याने सरहद्द ओलांडली, तो पाकिस्थानात शिरला व दूधाचा धंदा करू लागला. मरेपर्यंत भारतात आला नाही.

२ जुलै १९७२ च्या सिमला कराराच्या वेळी पुष्पाबेन तेथे पाहिजे होती. भूत्तोला तिने ठणकावले असते, ''अरे बुढ्या, तू काय आम्हाला शिकविणार? बऱ्या बोलाने या करारावर सही कर.'' तिने काश्मीर प्रश्न एका झटक्यांत सोडवून टाकला असता.

अशी पुष्पाबेन परत भारताला मिळणे मुश्कील आहे.

■■■

हिंदू द्वेषाचे मूळ – १

दोन समदुःखी : ज्यू व हिंदू

जगात दोन समाज असे आहेत की जन्मभर जगाने त्यांचा द्वेषच केला आहे. पहिला ज्यू समाज व दुसरा हिंदू समाज. विशेषतः गेल्या २०० वर्षांत तर या द्वेषाचा कळस झाला आहे. एकट्या जर्मनीत हिटलर व त्याची नाझी सेना यांनी छळ करून करून ६ कोटी ज्यू मारले आहेत. त्यात दीड कोटी मुले होती. त्यास हॉलो (होल) कास्ट (जाळणे) म्हणतात. गांधीजींनी प्रथम विरोध केला असला व "माझ्या प्रेतावरून फाळणी होईल," असे म्हटले असले तरी निमूटपणे त्यांनी देशाच्या धर्मावरून फाळणीला मान्यता दिली व त्या मान्यतेनंतर पंजाबात एकंदर १० लाख स्त्रीपुरुष व मुले कापली गेली – ७ लाख हिंदू – शीख व ३ लाख मुसलमान. त्या आधी नोआखलीत ५,००० तर कोलकत्यात १०,००० हिंदू मारले गेले, तर बिहारमध्ये ३०,००० मुसलमानांची कत्तल झाली. आज जगात १ कोटी ४२ लाख ज्यू आहेत तर हिंदू १.५ अब्ज. दोघात बरीच साम्यस्थळे आहेत. दोघांना धर्मांतर मान्य नाही. ज्यू किंवा हिंदू धर्मात तुम्हाला जन्मावे लागते. अब्राह्मिक धर्मात ज्यूंचा धर्म आद्य आहे. हिंदू धर्माचे तर खरे नाव सनातन धर्म हेच आहे. त्यांचे सायनॉगॉग तर हिंदूंचे मंदिर. गुजराती प्रजा ज्यूंसारखी व्यापारी जात. सतत मार खाणाऱ्या या गुजु व्यापाऱ्यांनी दादागिरी करणाऱ्या मुसलमानांना २००२ साली असा धडा शिकविला की लोक पहातच राहिले : हा 'गांधींचा गुजरात' राहिला नाही, तो 'मोदींचा गुजरात' झाला आहे. ही स्फूर्ती त्यांनी बहुधा

इस्त्राएल या ज्यू राष्ट्रापासून घेतली असावी. इस्त्राएल तिन्ही बाजुंनी मुसलमानी देशांनी वेढलेले आहे. आजवर ते देश चिमुकल्या इस्त्राएलचे काही वाकडे करू शकले नाहीत. भारताची स्थिती याहून वेगळी नाही. (२००२ च्या दंग्याच्या खऱ्या माहितीसाठी वाचा दादूमियाकृत 'जेव्हा गुजराथला जाग येते.' मोदी पंतप्रधान होणार हे भाकती सर्वप्रथम त्यात केले होते.)

दोघांना सारख्याच धमक्या

मुसलमानी अरब राष्ट्रांनी 'दोन दिवसात इस्त्राएलला शरण आणू.' असे म्हणत दोनदा स्वारी केली होती व दोन्ही वेळा हे चिमुकले राष्ट्र अजिंक्य राहिले होते. भारतावर पाकिस्थानाने ४-५ वेळा स्वाऱ्या केल्या व दर खेपेस मार खाल्ला. "मला फक्त १५ मिनिटांसाठी पोलिसांचा पहारा काढून टाका, मी हिंदूंची अशी कत्तल करून दाखवेन की भारतात एकही हिंदू औषधाला शिल्लक राहणार नाही," असे फुत्कार अकबर ऊद्दीन या एम.क्यू.एम.च्या असयुद्दीन ओवैसीच्या भावाने हैदराबादेत काढले होते. आजही तो अशीच भडकावू भाषणे देत फिरत आहे. महाराष्ट्रांत त्याचा प्रभाव वाढत आहे. मात्र उत्तर प्रदेशांत गेल्या निवडणुकांत त्याचे काही चालले नाही. १९४७ च्या ऑगस्ट महिन्यात महंमद अली जीनांनी "डायरेक्ट ॲक्शन"च्या भाषणात असाच सूर काढला होता. "लियाकतअली, सुऱ्हावर्दी, चंगीझखानाने काय कत्तल केली अशी कत्तल मी कलकत्यात करून दाखवेन," असे म्हणाले होते. आणि तशी कत्तल त्यांनी तीन दिवस तेथे करून दाखविली. १०,००० हिंदू गमावल्यानंतर घाबरून जाऊन काँग्रेस नेत्यांनी पाकिस्थानास संमती दिली व देशाची फाळणी होऊन काँग्रेसच्या हाती सत्ता आली. फाळणी झाली कारण काँग्रेसचे भित्रे पुढारी. त्या आधी ४२ वर्षांपूर्वी बंगालची फाळणी लॉर्ड कर्झनने केली होती. तेव्हा लोकमान्य टिळक काँग्रेसचे प्रमुख पुढारी होते. त्यांना मदत करणारे मराठी व बंगाली क्रांतिकारक होते. त्यांच्या बॉंबच्या सतत होणाऱ्या धडाक्याने इंग्रज सरकार घाबरले व ६ वर्षांनी फाळणी रद्द झाली. टिळक मर्द होते. त्यांच्या मरणानंतर वेगळे पुढारी सत्तेवर 'आणण्यात आले'. त्यांनी या देशात मर्दपणा कसा नाहीसा होईल ते पाहिले. त्यांची "अहिंसा" त्यांनी त्यासाठी वापरली. सारे पैशाचे राजकारण सुरू झाले. पैसा आला की भ्रष्टाचार त्या मागोमाग येतोच. "फंडगुंड" हा शब्द प्रथमच वापरात आला. आज जे गलिच्छ व घाणेरडे राजकारण दिसते त्याची सुरुवात १९२० नंतर झाली. आज जातीयता, भ्रष्टाचार व गुंडशाही यांचे थैमान जे दिसते त्याची बीजे आपणांस तेथे आढळतात.

घाणेरडे राजकारण

मात्र हिंदू द्वेष जो जगभर दिसतो त्याची कारणे इंग्रजी काळात दडलेली दिसतात. बऱ्याच वेळा मनात येते की हिंदूंनी जगावे कसे, त्यांनी असे काय घोडे मारले आहे की ज्याने त्याने उठसुठ हिंदूंचा दुःस्वास करावा, त्यांची हेटाळणी करावी, त्यांच्या संस्थांवर बंदी घालावी, त्यांना लुटावे, त्यांना घाबरवून सोडावे, त्यांच्या बायकांवर बलात्कार करावा? सर्वांत गंमत म्हणजे येथे राहणाऱ्या, येथे शिकून मोठे झालेल्या आणि याच देशाचे अन्नपाणी खाणाऱ्या आमच्याच कांही हिंदू बांधवांना हिंदू धर्माचा, हिंदू संस्थांचा व हिंदू चालीरीतींचा द्वेष करावासा वाटतो! मुसलमान आम्हास काफीर समजतात व आम्हास पाण्यात पाहतात. ते सत्तेचे राजकारण आहे, असे म्हणून आपण त्यांना माफ करू या. पण मुसलमानेतरांचे आम्ही काय वाकडे केले आहे? ते सोडा, हिंदुत्वाची हेटाळणी करणाऱ्या सेक्युलर हिंदूंचे आम्ही काय वाकडे केले आहे? माणसे इतकी ब्रेन वॉश्ड् होऊ शकतात की ते आपल्याच बांधवांवर शाब्दिक आणि शारीरिक अत्याचार करू लागतात? लगेच, मनात येते, आम्ही नाही का आजवर आमच्याच दलित बांधवांना वाईट वागणूक दिली? काळ आमच्यावर सूड तर घेत नाही ना? करावे तसे भरावे.

खरे सांगायचे तर हा विषय अतिशय गंभीर आहे व त्याचे शास्त्रीय संशोधन वा अभ्यास व्हायला पाहिजे. तो अभ्यास अजून पुरेसा झालेला नाही. याचे कारण सरळ व स्पष्ट आहे. काँग्रेसला तो नको होता. त्या पक्षाची सारी उभारणीच मुस्लीम व दलित व्होट बँकांवर झाली आहे. अवर्णांचे तुष्टीकरण व सवर्णांचा द्वेष हेच त्या पक्षाचे धोरण होते व आहे. इतर डावे पक्ष त्याचीच नक्कल करतात, कारण हुकूमी मते मिळतात, उदा. साम्यवादी, समाजवादी व आप पक्ष. मोदींच्या राजवटीत असे संशोधन व अभ्यास व्हायला पाहिजे, पण मोदी सरकारचा सारा वेळ आप, काँग्रेस व सारे डावे आणि क्षेत्रीय (उदा. शिवसेना) पक्षांच्या संयुक्त, सतत व सत्ताकेंद्रित हल्ल्यांना तोंड देण्यात जातो. विरोधकांचा तोच डाव आहे. कसेही करून मोदींना नामोहरम करून सोडायचे व आपण सत्तेत परत यायचे. म्हणजे जुना खेळ पुन्हा चालू. येथील गरीब जनतेला हे नको आहे, त्यांना पुढे जायचे आहे, पण विरोधकांच्या कपटी जाळ्यांत ते अडकले आहेत. अशा वेळी सत्य असत्य वाटते व असत्य सत्य वाटू लागते. या खेळात काँग्रेस तरबेज आहे. कांहीही करून सत्तेवर यायचेच ही त्यांची महत्त्वाकांक्षा आहे. ती जनतेच्या असहाय्यतेचा, गरिबीचा, अज्ञानाचा, लांचलुचपतीला अनुकूल असण्याचा व घाबरटपणाचा लाभ उठविल्याशिवाय राहणार नाही. मोदी ते नीट जाणतात.

अशा परिस्थितीत संशोधनाला व अभ्यासाला कोण विचारतो? पण खाज म्हणून माझ्यासारख्या जातीच्या अभ्यासकास राहवत नाही व लोकांना सत्य सांगावेसे वाटते. येथे मी हिंदू द्वेषाचे मूळ शोधण्याचा प्रयत्न केला आहे. याची मला कल्पना व काम करण्याची स्फूर्ती कोठून मिळाली? प्रा. डॉ. बी. टी. दवे नावाचे माझे फिजिशियन ज्येष्ठ स्नेही एकदा मला म्हणाले, ''माझे वडील लंडनला आयसीएसच्या विद्यार्थ्यांना भारताचा इतिहास शिकवीत.'' मी एकदम म्हणालो, ''मला त्यांना भेटायला आवडेल.'' आम्ही भेटायची वेळ ठरविली. त्याप्रमाणे आम्ही भेटलो व पोटभर गप्पागोष्टी झाल्या. त्या रात्री मला झोप लागली नाही. तसेच, दादा गोगटे नावाचे माझे स्नेही होते. ते मूळ अजमेरचे. राजस्थानी भाषा मराठीप्रमाणे सहज बोलत. त्यांनी राजकुमार कॉलेजात राजकुमारांना 'कमजोर' बनविण्यासाठी इंग्रजी मडमा कशा वागवीत, कसे त्यांचे सक्तीचे हस्तमैथून *(फोर्स्ड मास्टर्बेशन)* करीत, त्यांना अफूचे वा तंबाखूचे व्यसन लावीत, त्याची सखोल माहिती दिली. त्यावर मी 'सोबत'मध्ये एक प्रदीर्घ लेखही लिहिला होता. म्हणून सयाजीराव गायकवाडांनी आपल्या मुलांसाठी व नातवांसाठी राजवाड्याच्या कंपौंडमध्ये स्वतःचे 'प्रिन्स स्कूल' सुरू केले. ते गुरुकुल होते. ८-१० विद्यार्थी. तेवढेच शिक्षक. रियासतकार सरदेसाई तेथे शिकवीत. या इंग्रजांनी बंगालच्या मानवनिर्मित दुष्काळांत चार कोटी भारतीय मारले होते. व्हिक्टोरिया राणी ही सर्वात मोठी ड्रग स्मगलरांची राणी होती, एवढा मोठा ड्रगचा (अफूचा) व्यापार तीने चीनशी केला! इंग्रज किती क्रूर, कपटी पण हुषार देशभक्त आहेत त्याचे दर्शन मला या दोघांनी करून दिले. ते अनैतिक होते. पण त्यांना राज्य करावयाचे होते. तो त्यांचा राजधर्म होता. माझा एक अमेरिकन सिनेटर मित्र आहे. त्याने अमेरिकन शस्त्रे मला सांगितली, उदा. डबल्यू टी ओ, वर्ल्ड बँक, ह्यूमन राईट्स वगैरे. त्यामुळे यशोदेला कृष्णाच्या तोंडात जसे विश्वदर्शन झाले तसे मला अमेरिका दर्शन झाले. मी कळवळून विचारले, ''पण हे सारे कशासाठी?'' त्याने थंडपणे उत्तर दिले, ''कारण अमेरिकेस जगावर राज्य करायचे आहे. तुम्हाला तर साधा भारतही सांभाळता येत नाही.''

त्या उत्तराने मी एकदम वर उडालो.

आधुनिक शस्त्रे

एवढी पार्श्वभूमी सांगितल्यावर इंग्रजांनी हिंदूद्वेष हा ''शस्त्र'' म्हणून कसा वापरला ते आता सांगतो. इंग्रज मोठे चौकस, चतुर व चौफेर दृष्टी ठेवणारे होते.

त्यांनी मराठा पॉवर बरोबर ओळखली होती. मराठ्यांना परकीय सत्ता सहन होत नाही, त्यांना *स्वदेश, स्वधर्म* व *स्वभाषा* जास्त आवडते. अफगाण व मोगल दोन्ही परकीय सत्ता. मोगलांना त्यांनी खेळणे बनविले होते. परकीय अफगाणांचा पराभव करण्यासाठी ते पुण्याहून थेट पानिपतपर्यंत गेले. मराठ्यांचा १७६१ सालचा पानिपतावरील पराभव इंग्रजांना पथ्यावर पडला व त्यांनी आपली सत्ता पलासी येथे लढाई न लढता बंगाल व बिहार येथे बळकट केली. भारतीय परावलंबी आहेत ते इंग्रजांनी नेमके हेरले होते. बंगालमध्ये मीर जाफरने परकीय इंग्रजांच्या मदतीने बंगालची मनसद मिळविली होती. त्याच वेळी त्याचा अफगाण भाईबंद अहंमद शाह परकीय अब्दालीच्या सहाय्याने नामधारी दिल्लीचा बादशाह दुसऱ्या अहमद शाहाचा मीर बक्षी बनला होता. ते कटु सत्य प्रथम पहिल्या बाजीरावाने ओळखले होते. तेव्हापासून मराठ्यांचे दिल्लीचे राजकारण सुरू झाले. मराठे पानिपतावर हारले नसते तर इंग्रजांचा बंगालमधील उदय १-२ दशकांनी लांबला असता. ईस्ट इंडिया कंपनीचा क्लाईव्ह भारतात सत्ता बळकट करावयाची असेल तर कपटानेच, हा धडा बरोबर शिकला होता. १७६४ मध्ये त्याने बक्सर येथे विजय मिळविला व बंगाल बळकावला. १७६५ मध्ये मोगल बादशाहाने क्लाईव्हबरोबर अलाहाबादचा करार करून कंपनी सरकारकडून संरक्षण मिळविले. त्यानंतर अवधच्या राजाने तर क्लाईव्हच्या पायाशी लोळणच घेतली. इंग्रज व मराठे यांच्या संघर्षात पानिपतचे फार महत्त्व आहे. मराठ्यात फूट पाडून त्यांचा मुसलमानांकडून मराठ्यांचा काटा कसा काढायचा हे तंत्र ते अबदालीपासून शिकले. काँग्रेसने इंग्रजांपासून फक्त हिंदूंचा द्वेष उचलला, त्यांची अभ्यासू व चौकस वृत्ती नाही. नेहरू स्वतःला समाजवादी म्हणवून घेत. त्यामुळे त्यांना डावरी मंडळी साहजिकच आपली वाटली. नेहरूंच्या काळी *लीडर ऑफ द ऑपोझिशन* कोण होते? कम्युनिस्ट. हे अभ्यासाचे, संशोधनाचे व विकृतीकरणाचे काम काँग्रेसने कम्युनिस्टांकडे सोपविले. शिक्षण व प्रचार खात्यातील साऱ्या नेमणुका डाव्यांकडे गेल्या. काँग्रेसचा लोकसभेत वैध बचाव करण्याचे काम वाक्‌चातुर्य असलेल्या समाजवाद्यांकडे गेले. राष्ट्रवादाचा दावा सांगणाऱ्यांना जातीयवादी *(कम्युनल)* बनवून त्यांना वाळीत टाकण्यात आले. ते नाटक आहे हे प्रथम अडवाणींनी ओळखले व नामधारी निधर्मीपणा *(स्युडो सेक्युलॅरिझम)* हा शब्द लोकप्रिय केला. भारतीय इतिहासात अडवाणींची कामगिरी खूप मोठी आहे. तोगडिया-अडवाणी वादात दोघे दडपले गेले व नरेंद्र मोदी पुढे आले.

भय इथले संपत नाही

स्वातंत्र्यपूर्व कालखंड

१. **जेम्स मिल** : या दासीपुत्राने एकदाही भारतास भेट दिली नाही. तरीही तो भारताचा इतिहासकार होऊ शकतो! सत्तेपुढे शहाणपण नाही. हा स्कॉटीश तत्त्वज्ञानी (१७७३-१८३५) व इंग्लंडच्या १८६५ च्या लोकसभेचा खासदार. जॉन स्टुअर्ट मिलचा (१८०५-७३) हा पिता. दोघेही सामाजिक सुधारक व वृत्तीने लिबरल. इंग्रजांनी आपल्याला कोणते भारतीय गट मदत करतील व कोण विरोध करतील ते बरोबर जोखले होते व त्याप्रमाणे शासकीय व्यवस्थेची रचना केली. भारतात बहुसंख्य हिंदू आहेत, ते येथील मूळचे रहिवासी आहेत व ते आपल्याला मदत करणार नाहीत, हे त्यांना बरोबर समजले होते. लढाऊ मुसलमानांचा उपयोग सैन्यासाठी करायचे त्यांनी नक्की केले. यासाठी त्यांना मुसलमानांना महत्त्व देणे भाग पडणार होते. हिंदूंना शासनात जागा देऊन त्यांना दुर्बळ व भित्रे ठेवणे आवश्यक होते. दोघांत अविश्वास व भीती निर्माण करून त्यांना एकमेकांशी लढविणे आवश्यक होते. ह्या योजनेप्रमाणे त्यांनी शिक्षण व्यवस्था आंखली. जेम्स मिलचा बाप चांभार व आई दासी. लंडनमध्ये तो पत्रकार म्हणून काम करी. 'ब्रिटीश इंडियाचा इतिहास' या ग्रंथाचा हा लेखक. हेलीबरी कॉलेजातील शिकाऊ आयसीएसच्या गोऱ्या तरुणांसाठी त्याने हा ग्रंथ लिहिला. विल्यम जोन्स व वॉरन हेस्टिंग्ज प्राचीन भारताचा गौरव करू लागले. त्यांना हाणून पाडावे यासाठी त्याला ही नोकरी देण्यात आली. हेच शिकून तयार झालेले बाबू उद्या शाळा वा कॉलेजात प्रिन्सिपॉल होणार होते. त्यांच्या "हो" ला "हो" नेटिव्ह लोक करणार व त्यांच्या विद्यार्थ्यांना ते हेच ज्ञान शिकविणार. प्राचीन भारताची कालरेखा या त्यातील पहिल्याच प्रकरणात त्याने लिहिले, "हिंदू हे खोटारडे आहेत.... ब्राह्मण फार उद्धट आहेत आणि ते काहीही भाकड गोष्टी रचतात व ऐतिहासिक कथा म्हणून ठोकून देतात." *(जेम्स मिल, हिस्टरी ऑफ इंडिया, आशिया, १९९०, पृ. २८८)* "प्राचीन संस्कृत साहित्य म्हणजे "ॲबसर्ड अँड एक्स्ट्राव्हेगंट" आहे, ते अगम्य व काल्पनिक आहे. ते अहिंसा सांगणारे, म्हणून वीर रसास मारक आहे. युरोपियन साहित्याची तुलनाच करता येणार नाही. मुसलमान धीट व शूर आहेत व त्यांची तुलना युरोपियनांशी करता येईल. हिंदू धर्म म्हणजे सारे भोंगळ, ढिले, ठावठिकाणा नसणारे, न समजणारे व असंबंधित आहे." *(मिहीर बोस, मिडनाईट टु ग्लोरियस मॉर्निंग, टाईम्स ग्रूप, २०१६, पृ. १२७)* गांधीजींवर कोणाचा प्रभाव पडला होता ते आता सहज समजून यावे.

''हिंदू एवढे अज्ञानी होते की त्यांना कमान बांधणे माहीत नव्हते,'' त्याने लिहिले, ''युरोपात मुसलमानांनी सुंदर व प्रेक्षणीय इमारती बांधल्या. तसेच त्यांना रस्ते बांधणे व पूल उभारणे ठाऊक नव्हते. पर्शियनांच्या कलेत या मुसलमानांनी सुधारणा केल्या व त्या पूर्णत्वास नेल्या. पर्शियनांचे शाहनामा सारखे काव्य हिंदूंच्या महाभारतापेक्षा श्रेष्ठ आहे. सूत कातण्यात कदाचित हिंदूंनी श्रेष्ठत्व मिळविले असेल पण पर्शियनांची मखमल काही कमी प्रतीची नाही. हिंदूच्या बुद्धीबळ या खेळाची मी मात्र प्रशंसा करतो.'' गझनीच्या महंमदाने सोमनाथाचे मंदीर लुटले. त्याचा मिलला केवढा आनंद झाला. त्याने लिहिले, ''सुलतानाने मंदिरात प्रवेश केला. त्याने देवांच्या मोठाल्या मूर्ती पाहिल्या व त्याचा संताप अनावर झाला. त्याने लोखंडी हातोडा हाती घेतला व त्या मूर्तींची नाके तोडली. जमलेल्या ब्राह्मणांनी त्यास लाखो रुपयांची लालूच दाखविली. ती रक्कम ऐकून त्याचे सल्लागार (ओमर) आनंदून म्हणाले, ''स्वामी, स्वीकार करा.'' महंमद त्यांच्यावर खेकसला, ''मला मूर्तिभंजक म्हणवून घ्यायला आवडेल, मूर्तींचा विक्रेता, म्हणून नाही.'' त्याने जोरात मूर्तीच्या पोटावर हातोडा मारला. काय आश्चर्य, पोट फुटले व त्यातून हिरे, माणिक, मोती वगैरे बाहेर पडू लागले.'' *(जेम्स मिल, हिस्टरी ऑफ इंडिया, आशिया, १९९०, पृ. ५३४)* खरे म्हणजे महंमद जगातला मोठा दरोडेखोर व लुटारू होता, पण मिलला त्यात सारे सद्गुण एकवटलेले दिसले. तो त्याला ''आशिया खंडातला सर्वोत्कृष्ट राजा'' म्हणतो. ''त्याच्या दरबारात सारे विद्वान लोक होते. गझनीत मोठे विश्वविद्यालय होते. तेथे साऱ्या जगातून विद्यार्थी शिकावयास येत. हिंदूंपेक्षा ते कोणच्याही बाबतीत कमी नव्हते.'' *(तत्रैव, पृ. ६९९)* हिंदूंपेक्षा मुसलमान सर्व बाबतीत श्रेष्ठ होते असा मिलचा आग्रह होता. ब्रिटीश मुसलमानांप्रमाणे एका पाठोपाठ एक देश जिंकत होते. त्यामुळे हिंदूंना कमी प्रतीचे व हिणकस लेखणे मिलसाठी आवश्यक बनले असावे. त्याशिवाय ब्रिटीश श्रेष्ठ कसे दिसले असते? क्लाईव्हच्या प्लासीच्या लढाईस आता अर्धे शतक उलटले होते. दिल्लीच्या बादशहासमोर अजून इंग्रज वाकून कुर्निसात करीत होते. हा कार्यक्रम १८५७ सालापर्यंत चालू होता व इस्लामचे श्रेष्ठत्व त्यांना मान्य होते. बादशहा इंग्रजांना अजून फर्मान देतच होता. वर्षातून ते बादशहाला चार वेळा नझराणा देत होते. ईस्ट इंडिया कंपनीच्या रुपायावर बादशाहा दुसऱ्या झफरचे नाव कोरलेले होते. भले तो नामधारी सम्राट होता, पण दिल्लीत त्याचा दरबार भरत असे. साऱ्या भारतभर मोगलांचा कायदा लागू होता. त्याचा अधिकारी फतवा काढे व इंग्रज अधिकारी गुन्हेगारास सजा फर्मावी. १८५२ साली सर जॉर्ज कँपबेलने लिहून ठेवले, ''आम्ही

नंतर कायदे केले पण त्याच्या पायाशी मुस्लीम कायदाच होता.'' हे मोगलांचे कथळत असलेले वैभव इंग्रजांकडे चालत आले. मिलसारख्या लेखकाने त्याने दिपून जाऊन हिंदूंना हिणकस लेखले, तर क्षम्यच आहे. त्याची पोच तेवढीच होती. लक्षांत ठेवा, टिळक काय, मोतीलाल काय, गांधीजी काय, नेहरू काय - पहिल्या ३-४ पिढ्या या विकृत इतिहासाच्या ज्ञानावर पोसल्या गेल्या होत्या. राजवाडे जन्मास आले नसते तर आपणही याच इतिहासाची पोपटपंची केली असती.

२. **मेकॉले** : थॉमस बॅबिंग्टन मेकॉले (१८००-५९) हा इंग्लंडचा फार मोठा निबंधकार व इतिहासकार. २१व्या वर्षी हा खासदार झाला. त्याने प्राचीन रोम व अर्वाचीन इंग्लंडवर अनेक ग्रंथ लिहिले. त्याने राजवाड्यांप्रमाणे लग्न न करता इतिहास या विषयाला वाहून घेतले व 'इंग्लंडचा इतिहास' नावाचा अत्यंत विद्वत्तापूर्ण ग्रंथ लिहिला. जेम्स मिलने गव्हर्नर जनरलच्या कौंसिलमध्ये थॉमस बॅबिंग्टन मेकॉलेला लॉ मेंबर म्हणून चिटकवून दिले होते. मिलप्रमाणेच त्याने संस्कृतचा एक शब्दही वाचला नव्हता. दोघांनीही भारतीय प्राचीन साहित्य - मूळ वा भाषांतर - वाचले नव्हते. दोघांनाही एकदेखील भारतीय भाषा येत नव्हती. त्याला आजचे ५००,००० पौंड वार्षिक पगार मिळत असे. हिंदूंना इंग्रजी शिकवून त्यांनी हिंदू धर्माचा त्याग करावा हे त्याचे अंतिम ध्येय होते. त्याने त्याच्या वडिलांना लिहिले, ''माझी खात्री झाली आहे की माझी ही शिक्षण योजना पुरेपूर अंमलात आली तर पुढील ३० वर्षांत बंगालमध्ये एकपण मूर्तिपूजक शिल्लक राहणार नाही.'' भारताच्या मेकॉलेच्या *'हिडन अजेंडा'* विषयी कोणाला काहीच माहिती नव्हती. सावरकरांनी ती माहिती सर्वप्रथम त्यांच्या १८५७ च्या स्वातंत्र्यसमरावरील ग्रंथाच्या प्रस्तावनेत दिली व लोकांना त्यांनी जागे केले. मेकॉलेने जगाची दोन विभागात वाटणी केली : सुसंस्कृत जग व रानटी जग. युरोप-अमेरिका पहिल्या गटात तर आफ्रिका व आशियातील देश दुसऱ्या गटात. ब्रिटन पहिल्या गटात पहिल्या क्रमांकावर.

इंग्लंडच्या शाळांतून इंग्रजी भाषेतून जे ज्ञान देतात त्या मानाने संस्कृत साहित्यातील ज्ञान अगदी फालतु आहे, असे त्याचे मत होते. १८३५ च्या फेब्रुवारीत त्याने शिक्षणावर जे टिप्पण *(मिनिट)* लिहिले ते धोरण म्हणून लॉर्ड बेंटिंगने स्वीकारले व त्याच्या वारसांनी तेच पुढे चालू ठेवले. मेकॉले म्हणतो, ''आम्हाला भारतीयांना सुसंस्कृत करावयाचे आहे, पण आमचे शास्त्रीय ज्ञान संस्कृत वा अरबीमधून देणे शक्य नाही. सर्वसामान्य भारतीयांसाठी इंग्रजी भाषा काय, संस्कृत काय किंवा अरबी काय, सर्व भाषा तितक्याच परदेशी *(फॉरीन)*

आहेत. कबूल, मी मुळातून संस्कृत वा अरबी साहित्य वाचलेले नाही, पण तज्ञांकडून त्यांचा सारांश मी समजावून घेतलेला आहे. ओरिएंटॅलिस्टस् भले काहीही दावा करीत असोत, पण माझी खात्री झाली आहे की पाश्चिमात्त्य ज्ञानाच्या पुस्तकांचा एक कप्पा संस्कृत साहित्याच्या सबंध कपाटापेक्षा जास्त उपयोगी आहे." मेकॉलेचा आत्मविश्वास दांडगा होता. तीस वर्षानंतर भारतात कोणीही मूर्तिपूजक औषधालाही सापडणार नाही, असे तो म्हणे. *(झरीर मसानी, ब्रिटन्स लिबरल इंपिरीअलिस्ट, बॉडले हेड, २०१३, पृ. ११४)* "संस्कृतात काव्यावर जास्त भर आहे. पण इंग्रजीतील काव्य संस्कृत काव्यापेक्षा केव्हाही श्रेष्ठ आहे. युरोपियन भाषेत जे विज्ञानाचे सत्य मांडले गेले आहे त्याच्या पुढे संस्कृतातील काल्पनिक भाकडकथा एकदम फिक्क्या वाटतात. इतिहासाचा विषय घ्या. इंग्रजीत कालरेषेप्रमाणे सारी माहिती निश्चितपणे दिलेली आढळते. संस्कृतात ते काळाचे बंधन वा शिस्त म्हणून काही नाही. सहाव्या इयत्तेपासून इंग्रजी माध्यमातूनच शिक्षण दिले गेले पाहिजे. त्याने एक मोठा फायदा होणार आहे. भारतातील असंख्य अडाणी लोक व इंग्रज शासक यामध्ये सुशिक्षित लोक दुवा म्हणून काम करतील व लोकांत सुधारणा करणे सोपे जाईल. मर्यादित पैसा व मर्यादित काळ यांच्यामुळे ब्रिटीश शासकांना लाखो भारतीयांना शिक्षण देणे परवडणार नाही. त्यासाठी आमचा एक नवा भारतीयांचा वर्ग निर्माण करण्याचा कार्यक्रम राहील. हा वर्ग रक्ताने व रंगाने भारतीय असेल पण आवडीनिवडी, मते, नीतिमत्ता व बुद्धिमत्ता यांच्या बाबतीत इंग्रज श्रेष्ठ असतील. हा वर्ग त्याच्या स्थानिक भाषांत सुधारणा घडवून आणेल व त्यांना वैज्ञानिक शब्द व संकल्पना शिकवेल. आम आदमीपर्यंत हे ज्ञान पोचवायला हा वर्ग मदत करेल." (मेकॉले हा द्रष्टा होता. त्याने सांगितले होते तसेच घडले. त्याचे म्हणणे आमच्या विद्वानांनी शिरोधार्य मानले - त्या वेळी व आजसुद्धा. त्याचे म्हणणे आमच्या विद्वानांनी शिरोधार्य मानले - त्यावेळी व आजसुद्धा. स्वातंत्र्य मिळाले, इंग्रज गेले पण इंग्रजी भाषा मागे राहिली. "आम्हास हिंदी भाषा नको," यासाठी १९६५ साली तामिळनाडूत भीषण दंगे झाले. त्याचे नेतृत्व एके काळी गव्हर्नर जनरल असलेल्या राजाजींनी करावे, यापेक्षा दैवदुर्विलास आणखी काय असू शकतो? २०१४ पासून मोदींमुळे पुन्हा हिंदीस बरे दिवस येऊ पहात आहेत. हाय रे किस्मत, लेकिन तूने पीही नही.)

३. १८५७ चा शॉक : १८५७ मध्ये बहुसंख्य सैनिक हिंदू होते. त्यावेळी ब्रिटीश सैन्यात मुसलमान पठाणांची लष्कर भरती चालूच होती. इंग्रजी सैन्यात त्या काळात मुसलमान शिपायांचे प्रमाण २४.९ टक्के होते. १९३० च्या दशकांत

ते २८.९५ टक्के होते. शीखांची टक्केवारी १३.६ इतकी खाली आली होती. शीख, गुरखा, राजे व जमीनदार यांच्या गद्दारीमुळे स्वातंत्र्य सैनिक हारले. मुसलमानांचे पुनश्च मोगल साम्राज्य स्थापण्याचे स्वप्न धुळीस मिळाले. बादशहाच्या मुलांना गोळी मारून ठार करण्यात आले. लाखो संशयितांना व सैनिकांना झाडावर लटकवून फाशी देण्यात आले. ''नाझींनी जर्मनीत ज्यूंना मारले त्यापेक्षा कितीतरी पटीने इंग्रजांनी केवळ संशयाने भारतीयांना यमसदनास पाठविले,'' असे मायकेल एडवर्डने लिहून ठेवले आहे. हे इंग्रजांचे दिल्लीतील शक्ती प्रदर्शन होते. ''मुसलमानांनो, तुम्ही शूर वीर असाल, पण आमच्यासमोर तुम्ही झाडपाला आहात,'' असा मुसलमानांना आणि ''हिंदूंनो, आता तुम्हाला मुसलमानांची भीती बाळगण्याचे कारण नाही, आता आम्ही तुमचे योग्य ते संरक्षण करू,'' असा हिंदूंना तो संदेश होता. हिंदूंनी खरोखरीच सुटकेचा निःश्वास टाकला. त्यांना तो ''दैवी संकेत'' वाटणे साहजिक होते. इंग्रज व्यवस्थापनात हुषार होते. प्रत्येक गोष्टीचा ते बारकाईने अभ्यास करीत व आपल्याला कोण, किती व कसे उपयोगी पडेल, त्याचा अंदाज घेत. या अभ्यासाच्या जोरावर त्यांनी अंशतः १७५७ ते १८५७ या कालखंडात अंशतः व संपूर्णपणे १८५८ ते १९४७ या ८९ वर्षांत बऱ्यापैकी राज्य केले. ब्रिटीश साम्राज्यावर सूर्य मावळत नसे, हे निरीक्षण सत्य आहे.

१७७३ साली प्रथम फोर्ट विल्यमच्या प्रेसिडेन्सीत गव्हर्नर जनरल ऑफ बेंगाल चे पद निर्माण करण्यात आले. १८५७ साली नानासाहेब पेशवे, झांशीची राणी वगैरे हिंदू सत्ताधीश एकत्र आले व दिल्लीच्या नामधारी बादशाहच्या अधिपत्याखाली ते इंग्रजांविरुद्ध लढले. त्यात पेशवे जिंकले असते तर ते दिल्लीचे बादशहा झाले असते व हिंदू राष्ट्राची घोषणा केली असती. म्हातारा नामधारी मोगल बादशहा पेशव्यांचे पेन्शन खात बसला असता. झाले उलटे. इंग्रज जिंकले. त्यांनी ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य बरखास्त केले, गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट (१८५८) पास केला व सत्ता इंग्रज राणीकडे आली. भारताचे राजकारण बघण्यासाठी सेक्रेटरी ऑफ स्टेटची नेमणूक झाली. गव्हर्नर जनरल पद काढून व्हाईसरॉयची नेमणूक करण्यात आली. त्याच्या मदतीसाठी १५ जणांचे लंडनमध्ये कौन्सिल स्थापन करण्यात आले. व्हाईसरॉयला *स्टॅच्युटरी ऑथॉरीटी* नसे. त्याची नेमणूक पार्लमेंट करीत नसे. तो अधिकार राणीकडे होता. त्याचे नाव सेक्रेटरी ऑफ स्टेट सूचवी. पहिल्या कालार्धात भारताचा प्राथमिक अभ्यास पूर्ण झाला होता. हिंदू दुर्बल आहेत, त्यांना आपण केव्हाही चिरडून टाकू, अशी ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांची खात्री झाली होती. राजपूत बढायाखोर, मराठे बेशिस्त

व व्यवस्थापनात कच्चे, दाक्षिणात्य अंधश्रद्धा, बंगाली आळशी व शीख भोळसट हे त्यांचे निरीक्षण आजही तितकेच ताजे वाटते. मुसलमानांनी येथे ५०० वर्षे राज्य केले आहे, ते नीच व घातकी आहेत, त्यांच्यावर विश्वास ठेवता येणार नाही, आपल्याला त्यांच्यापासून सावध राहिले पाहिजे, अशी त्या अधिकाऱ्यांची खात्री झाली होती. यातून इंग्रजांचे 'मुस्लीम तुष्टीकरणा'चे धोरण सुरू झाले. १९४७ सालानंतर काँग्रेसने ते धोरण चालू ठेवले. व्यवस्थापनातील हुषारीमुळे इंग्रजांनी कानाला खडा लावला की यापुढे भारतात धार्मिक सुधारणा करण्याचे नाव घ्यायचे नाही. त्यामुळे धर्माधर्मात तेढ लावून द्यायला त्यांना आता सारा वेळ देता आला. एक दिवस आपल्याला येथून जावे लागणार आहे हे त्यांच्या 'पॉलिसी मेकर्स'ना चांगले ठाऊक होते. शरीराने आपण येथून गेलो तरी आपली व्यापारी व संरक्षण हिते व्यवस्थित सांभाळली जातील, असे त्यांचे धोरण होते. तसेच झाले. पाकिस्थानची सारी सूत्रे अँग्लो-अमेरिकन गटाच्याच हाती राहिली. १८५८ ते १९४७ या ८९ वर्षांतील 'फोडा व राज्य करा' या धोरणाचे ते फलित आहे. अरेरे, आमच्या नेत्यांना ते धोरण काश्मीरांत वापरता आले नाही!

४. **चार्लस् स्पर्जन** : हा बाप्टिस्ट मिशनरी होता. १८५७ च्या ऐन रणधुमाळीत लंडनच्या क्रिस्टल पॅलेससमोर २५,००० च्या समुदायास आपण हिंदूंना नष्ट केले पाहिजे अशा अर्थाची प्रवचने देई. तो म्हणत असे, ''हिंदू धर्म म्हणजे उकिरडा आहे, तो आपण स्वच्छ केला पाहिजे. ते ज्या प्राण्यांची देव म्हणून पूजा करतात (गणेश व मारुती) ते देव आदरणीय नाहीत. त्यांनी राक्षसांना देव मानले असते तर एक वेळ आम्ही ते सहन केले असते. हिंदू धर्मात ना नीती, ना चांगले व्यवहार. तो धर्म म्हणजे शुद्ध नरक आहे.'' *(मिहीर बोस, मिडनाईट ट्र ग्लोरियस मॉर्निंग, टाईम्स ग्रुप, २०१६, पृ. १३८)* स्पर्जनसाठी ही देशभक्ती असेल, त्याला इंग्रजांना युद्धात जिंकण्यासाठी चिथावणी द्यायची होती. त्याच्या प्रेक्षकांत फ्लॉरेन्स ऑफ नायटिंगेल असायची. ती त्याच्या भाषणांनी एवढी प्रभावित झाली की तिने स्पर्जनला ५० पौंड त्याच्या फंडाला दान केले.

५. **चार्लस् डिकन्स्** : त्याची *'टेल ऑफ टु सिटीज'*ही कादंबरी प्रत्येकाने वाचलेली असेल. तो कधी भारतात आला नाही, मात्र त्याची दोन मुले भारतात नोकरी करीत. त्याने नानासाहेबाच्या सैन्याने केलेल्या कानपूरच्या कत्तलीचा अहवाल वाचला. तो एवढा संतापला की त्याने दानशूर अंजेला बुर्देट-कौंट्सला लिहिले, ''मला असे वाटते की मी तेथे कमांडर इन चीफ असायला पाहिजे होते. ज्यांनी आमच्यावर एवढे अत्याचार केले त्या हिंदू वंशालाच मी नष्ट केले असते. मी

एकही हिंदू या पृथ्वीतलावर जिवंत ठेवला नसता. हा हिंदू वंश म्हणजे माणुसकीला लागलेला मोठा कलंक आहे. अतिशय चपळतेने व निष्ठुरपणे हा मानवतेस लागलेला कलंक काढला पाहिजे, नष्ट केला पाहिजे.'' *(ग्रेस मूर, डिकन्स अँड एंपायर, ॲशगेट, २००४)*

६. **किपलिंग** : रूडयार्ड किपलिंग (१८६५-१९३६) हा लेखक मुंबईत जन्मला. त्याने प्राण्यांच्या गोष्टी असलेली दोन *जंगल बुक* व *किम* नावाची अमर पुस्तके लिहली. १९०७ साली त्यास साहित्याचे नोबेल प्राईज मिळाले. भारताच्या पहिल्या स्वातंत्र्य युद्धानंतर आठ वर्षानंतर हा भारतात जन्मला. इंग्रजी साहित्यात त्याचे स्थान अवादातीत मोठे आहे. मात्र हिंदूंपेक्षा त्याचा ओढा मुसलमानांकडे जास्त होता, हे त्याने कधीच लपवून ठेवले नाही. मुसलमानांच्या तुलनेत हिंदू हे वक्र गतीचे, मानवी व प्राण्यांच्या अवतारांना मानणारे व गोंधळलेले असतात, असे त्याने आपले निरीक्षण मांडून ठेवले आहे. त्याला एक उर्दू शेर फार आवडे, ''जेथे मुसलमान, तेथे संस्कृती.'' रामायण म्हणजे थापा आहेत, असे त्याचे मत होते. महाभारत म्हणजे केवळ गोंधळ, असे तो म्हणे. इस्लाम म्हणजे सक्रिय व जेत्यांचा धर्म, तर हिंदू धर्म म्हणजे दैववादी, नैराश्य व पळपुटा धर्म, असे त्याचे मत होते. २० व्या वर्षीच त्याने आपले मत बनवून टाकले होते की रामायण म्हणजे ''फालतू वस्तुंचा गुच्छ,'' आणि महाभारत म्हणजे ''शेणाचा पो,'' व ''होपलेस, एमलेस व नॉनसेन्स'' आहे. *(डेव्हिड गिल्मौर, द लाँग रिसेशनल, पिमलिको, पृ. ५७)*

७. **आगाखान** : खरे सांगायचे तर आगाखान ही त्यांना पदवी मिळाली. हा इस्माइली खोजा पंथाचा प्रमुख व इंग्रजांचा हस्तक. मुस्लीम लीगचा जनक. पुढील अर्ध शतकांत इंग्रजांचे मुस्लीम प्रेम वाढीस लागले. कॉंग्रेस सुरुवातीस पार्शांच्या हाती होती, नंतर हिंदूंनी लोकशाहीत अल्पसंख्याकांच्या हक्कांची जपणूक करण्यासाठी मुसलमानांना तिचा कब्जा मिळवून दिला. पण मुसलमानांचा ओढा ऑटोमन साम्राज्य कोसळत असल्यामुळे सतत तुर्की मुसलमानांकडे असे. तुर्की गोंडावाली लाल टोपी त्या काळात भारतीय मुसलमानात फार लोकप्रिय होती. पहिल्या महायुद्धात मुसलमान शिपाई तुर्की मुसलमानांशी लढले नाहीत. इंग्रजांना हे प्रकरण डोईजड होईल अशी भीती वाटू लागली. त्यांनी सैय्यद अहमद खानांना हाती धरले व कॉंग्रेसला ''चेकमेट'' करण्यासाठी त्यांचा वापर केला. सिमला येथे मुसलमान व्हाईसरॉयना भेटले व आम्हाला बहुसंख्यांक हिंदू देशात भीती वाटते. त्यासाठी आम्हाला खास हक्क व सवलती देऊन आमचे रक्षण करा, अशी विनंती करण्यात आली. आगाखानांनी त्या शिष्ठमंडळाचे नेतृत्व केले होते. पाश्चिमात्त्य

देशांप्रमाणे भारतात लोकशाही नसावी अशी आगाखानांनी व्हाईसरॉयकडे मागणी केली. कारण, हिंदू नेहमीच बहुसंख्यांक राहणार, अशी भीती त्यांनी व्यक्त केली. मुसलमानांचा इतिहास पाहिला तर ते नेहमीच जेते होते व हिंदू जित होते. हिंदू त्याचा बचपा काढतील, सूड घेतील, अशीही त्यांनी चिंता व्यक्त केली. हे सारे *स्टेज मॅनेज्ड* होते व या नाटकाचा लेखक, निर्माता व दिग्दर्शक लॉर्ड मिंटो होता. त्याचा पहिला नायक सैय्यद अहमद, नंतर काश्मीरी कवी इकबाल व नंतरचा जीना होता. (पाकिस्थान या विषवृक्षाचे बीज अशा रीतीने १९०७ साली पेरले गेले, १९४० साली त्यास खतपाणी घातले गेले व त्या वृक्षास १९४७ साली फळे आली.)

८. **लॉर्ड मिंटो** : लॉर्ड कर्झन एक नंबरचा हिंदू द्वेष्टा. त्याने बंगालची फाळणी १९०५ साली केली. त्याने लोकमान्य टिळक व बडोद्याच्या सयाजीराव महाराज गायकवाड यांना फार छळले. तो "सर्वांत जास्त अप्रिय" गव्हर्नर जनरल (१९०५-१०) होता, असे त्याचे थोडक्यात वर्णन करता येईल. त्याने लॉर्ड मिंटोचे नाव आपला वारस म्हणून सुचविले. त्यामुळे तो किती हिंदू द्वेष्टा असावा त्याची कल्पना यावी. सेक्रेटरी ऑफ स्टेट जॉन मोर्लेने त्यास लिहिले, "सुधारणांनी राज वाचणार नाही, पण सुधारणा केल्या नाहीत तर दुसरे काहीच राज ला वाचवू शकणार नाही." त्यावर मिंटोने लिहिले, "तुम्ही म्हणता सुधारणांनी राज वाचेल, मला भीती वाटते, मी तुमच्याशी सहमत होऊ शकणार नाही. कारण आम्ही राज साठी लढायला समर्थ आहोत आणि आम्ही नेहमीप्रमाणे त्या लढाईत जिंकू." शेवटी न लढता मिंटो सुधारणांसाठी तयार झाला, त्या मोर्ले-मिंटो सुधारणा म्हणून प्रसिद्ध आहेत. १९०९ साली त्या इंडिया कौन्सिल ॲक्ट म्हणून पास झाल्या. कॉंग्रेसला टक्कर देईल अशी मुस्लीम लीग त्याने आगा खानांच्या मदतीने निर्माण केली व भारतीय राजकारणात विष कालविले. मुस्लीम लीगला सुशिक्षित पदवीधर पाहिजेत, म्हणून त्याने अलीगढ विश्वविद्यालयास भरघोस मदत केली. पाकिस्थानात लाहोर येथे मिंटो हॉस्पिटल व मिंटो पार्क त्याच्या मुस्लीम प्रेमाची आजही साक्ष देतात.

९. **न्यायमूर्ती अर्नोल्ड** : तुर्कस्थान जेव्हा फॉर्मात होते व सुन्नी पॉवर म्हणून गाजले तेव्हा पाश्चिमात्त्य राष्ट्रे शिया पंथ हा इस्लामचा प्रॉटेस्टंट पंथ आहे व सुन्नी पंथ हा कॅथॉलिक पंथाप्रमाणे दुराग्रही आहे, असे मानीत होती. त्याचा परिणाम भारतात दिसला. १८६६ साली ब्रिटीश न्यायाधीश अर्नोल्ड यांनी पहिल्या आगाखानांच्या बाजूने निकाल दिला. त्यांच्या काही दुखावलेल्या अनुयायांनी

त्यांच्यावर बालंट आणले होते. त्या निकालात ते म्हणाले, ''शिया पंथ पुरोगामी आहे. तो प्रॉटेस्टंट पंथासारखा आहे. सुन्नी पंथ हट्टी व दुराग्रही कॅथॉलिकांप्रमाणे आहे. गेली दोन शतके हिंदू स्वातंत्र्याची लढाई लढत आहेत. त्यामुळे इंग्रजांनी हिंदूंना राक्षसत्व बहाल केले. रोज त्या धर्माची निंदानालस्ती होत असते.'' *(मिहीर बोस, मिडनाईट टु ग्लोरिअस मॉर्निंग, टाईम्स ग्रूप, २०१६, पृ. १४८)*

१०. **विल्यम आर्चर** : आर्चर (१८५६-१९२४) हा स्कॉटीश लेखक पण लंडनमध्ये नाट्य समीक्षक म्हणून रमला. त्याने *डॉल्स हाऊस* हे इबसेनचे नाटक इंग्रजीत आणले. त्याचे *हिरवी देवता* हे नाटक खूप गाजले. ''हिंदूंना संस्कृती नाही'' हा मिलचा सिद्धांत त्याने आपल्या ''इंडिया'' या पुस्तकात पुढे चालविला.

११. **जॉर्ज बर्नार्ड शॉ** : प्रसिद्ध नाटककार, निबंधकार व पुस्तिकाकार. हा जन्माने आयरीश. जॉर्ज (१८५६-१९५०) १८८२ साली समाजवादाकडे वळला. १८८५ साली त्याने नाटके लिहिण्यास सुरुवात केली. *माय फेअर लेडी* (१९१३) ही त्याची सर्वात गाजलेली संगीत नाटिका. १९६४ साली त्यावर सिनेमाही निघाला होता. १९२५ साली त्यास साहित्याचे नोबेल पारितोषक मिळाले होते. त्यास भारतमित्र समजले जाते. पण आर्चरच्या मतांशी तो सहमत होता.

१२. **विन्स्टन चर्चिल** : सर विन्स्टन चर्चिल (१८७४-१९६५) हा दोनदा (१९४०-४५) + (१९५१-५५) इंग्लंडचा कॉंझर्व्हेटिव्ह पंतप्रधान होता. दुसऱ्या महायुद्धाचा तो महानायक. मात्र युद्धाला कंटाळलेल्या ब्रिटीश जनतेने १९४६ साली त्यास हारविले व मजूर पक्षास सत्तेवर आणले. इंग्रजी सैन्याबरोबर तो एकदा बंगलोरला व एकदा वायव्य सरहद्द प्रांतात राहिला होता. बलुची सैनिकांची बहादुरी पाहून तो मुसलमानांच्या प्रेमात पडला. कर्झन वायलीला ठार मारणाऱ्या मदनलाल धिंग्राचा अपवाद सोडला तर गांधीजींसकट साऱ्या हिंदूंचा तो द्वेष करी. चर्चिल एक नंबरचा वंशवादी (रेसिस्ट) व हिंदूद्वेष्टा होता. १९४५ च्या जानेवारीत रुझव्हेल्ट व स्टालीन यांना युद्धोत्तर युरोप कसा असेल याची चर्चा करण्यासाठी याल्टा येथे भेटला. त्याचा सचिव जॉन कोलविल याने जाताना बेवर्ले निकोल्स याने लिहिलेल्या *'हिंदुस्थानावरील निकाल'* या पुस्तकाची एक प्रत साहेबाच्या हाती दिली. एचएमएस ओरिअन या बोटीवर असताना त्याने ते पुस्तक वाचून काढले. चर्चिलने ते वाचल्यावर पत्नीस लिहिले, ''तू हे पुस्तक वाचलेस पाहिजे. हिंदू काय चीज आहे ते कळण्यास तुला ते मदत करेल.'' आधीच मर्कट, तशात मद्य प्याला, अशी या पुस्तकाने चर्चिलवर जादू केली. त्याचा सचिव कोलविलच्या डायरीत पुढील मजकूर आढळतो : ''पंतप्रधानांनी माझे पुस्तक वाचले. ते वाचून हिंदू

घाणेरडा वंश आहे व तो लवकरच नाश पावणार आहे अशी साहेबांची खात्री झाली. तो म्हणाला, ती प्रक्रिया जास्त गतिमान करण्यासाठी बर्ट हॅरिसला त्याची जास्तीची फायटर बॉंबर विमाने भारतावर घेऊन जाण्यासाठी सांगितले पाहिजे.'' ब्रिटीश सोसायटीचे सर्वोच्च नेतृत्व इस्लामच्या एवढे आहारी गेले होते की विन्स्टन चर्चिलच्या मेहुणीस भीती वाटू लागली की तो आता मुसलमान होतो की काय? तिचे नाव लेडी ग्वेनडोलीन. तिने १९०७ च्या ऑगस्टमध्ये चर्चिलला लिहिले, ''कृपा करून मुसलमान होऊ नका. तुम्हाला पाशा म्हणून मिरवायची फार हौस दिसते आहे. आपल्याला इस्लामविरुद्ध लढायचे आहे, हे तुम्ही पार विसरून गेलेला दिसता.'' पठाणांच्या सान्निध्यांत राहून इस्लामने चर्चिलवर एवढा पगडा बसविला होता की त्याने लेडी लिट्टनला त्याच वर्षी लिहिले, ''तुम्हाला मी कदाचित पाशा वाटण्याचा संभव आहे. खरे म्हणजे मी पाशाच असायला पाहिजे होतो.'' *(डेली टेलिग्राफ, २६ डिसेंबर १९१४)* चर्चिल मुसलमान झाला नाही पण मुसलमानांप्रमाणे त्यांनी सदैव काफीर हिंदूंचा द्वेष केला. ब्रिटीश सैन्यातील कमजोर इंग्रजांना ''हिंदू'' म्हणून चिडविले जाई, तसेच ''हिंदू मुलीशी लग्न करणे'' नापाक समजले जाई. हिंदू मुलगी वापरायची व फेकून द्यायची. पहिल्या महायुद्धाच्या मध्यभागी एका ब्रिटीश अधिकाऱ्याने सैन्यातून राजीनामा दिला. त्यावेळी फ्रान्समधील इतरांनी ''अ स्टुपिड हिंदू'' आपल्यातून गेला याबद्दल आनंदाचा जल्लोष साजरा केला. असा होता इंग्रजी साहित्याचा जगावर परिणाम. भारतातील हिंदूदेखील हिंदूंचा तिरस्कार करू लागले. यास मानसशास्त्रात नकारात्मक परिणाम (नेगेशन ईफेक्ट) म्हणतात. त्याच्या लेखी हिंदू म्हणजे *फॉडर* होते. ते एका इंग्रजी युद्धगीतात छान व्यक्त झाले आहे :

We don't want to fight
But by Jove if we do
We won't go to the front ourselves
We'll send the mild Hindoo.

लक्षात असू द्या की ऑटोमन साम्राज्य पहिल्या महायुद्धाच्या वेळी मध्य पूर्वेत असलेल्या आठ लाख अरबांना या ''माईल्ड हिंदू'' सेनेने खिळखिळे केले होते. आणि दिल्लीचे मोगल साम्राज्य ''बचेंगे तो ओर भी लढेंगे'' असे म्हणणाऱ्या मराठा सेनेने.

१३. कॅथॅरीन मेयो : या अमेरिकन बयेने २०व्या शतकातील हिंदूंविरुद्ध सर्वात स्फोटक असे *'मदर इंडिया'* हे पुस्तक लिहून हिंदू द्वेषाचा विक्रम प्रस्थापित केला. अमेरिकेत येणाऱ्या काळ्यांना व आयरीश कॅथॉलिकांना तिने विरोध केला

होता. १९२५ च्या ऑक्टोबरमध्ये तिने *इंडिया ऑफीसच्या* अधिकाऱ्यांना गाठले व मला इंडियावर एक पुस्तक लिहावयाचे आहे, असे सांगितले. ''मी जे लिहिते त्यावर लोक विश्वास ठेवतात,'' ती म्हणाली. *(कॅथरीन मेयो, मदर इंडिया, जोनाथन केप, १९२७, पृ. २०)* तिने भारताचे इतके भयंकर चित्र उभे केले की गांधीजींनी त्या पुस्तकावर लिहिले, ''हे कोणा गटर इन्स्पेक्टरचे काम दिसते.'' 'लंडन टाईम्स' ही हादरून गेला. त्याने लिहिले, ''*सर्व्हायव्हल ऑफ द फिटेस्ट* असे सामान्यतः मानले जाते, पण भारतात ते उलटे आहे, तेथे सारे लैंगिकतेने पछाडलेले लोक राहतात व *सर्व्हायव्हल ऑफ द अनफिटेस्ट* न्यायाने ते जिवंत राहतात, असे हे पुस्तक वाचल्याने कळते.'' मेयो बाईंनी लिहिले, ''मध्य आशियातील मर्द लोकांनी तेथील घाणेरडा हिंदू धर्म नष्ट करण्यासाठी भारतावर स्वाऱ्या करून तो देश जिंकला. भारत म्हणजे भौतिक व अध्यात्मिक समस्यांचा डोंगर : दारिद्र्य, आजारीपण, अज्ञान, राजकारणातील अल्पसंख्यांक, असहाय्यता, परिणामशून्यता, त्यामुळे येणारा न्यूनगंड... या पर्वताच्या तळाशी त्यांची शारीरिक दुर्बलता. आणि त्यामुळे आपला वंश जिवंत ठेवण्यासाठी पशुतुल्य लैंगिक वासनेची आसक्ती.'' हे सिद्ध करण्यासाठी हिंदू कसे लिंगाची पूजा करतात त्याचे या बाईने विकृत वर्णन केले आहे. ती लिहिते, ''हिंदू शिवाच्या लिंगाची पूजा कां करतात? देशभर, विशेषतः खजुराओ व मोढेरा येथे, निरनिराळ्या लैंगिक आसनांच्या कृती मंदिरांच्या भिंतीवर कोरून कां ठेवल्या आहेत? निरनिराळ्या राजवाड्यात त्यांची पेंटिंग्ज का दिसतात? भारतात सर्वात जास्त बालविवाह कां दिसतात? येथे स्त्रियांना सामाजिक प्रतिष्ठाच नाही. त्या पतिता आहेत. हिंदूंची सामाजिक व्यवस्थाच सडलेली आहे. स्त्रियांना फक्त कामवासनेत व प्रसूतीत रस आहे. तोच त्यांचा संवादाचा विषय असतो. मग ती स्त्री उच्च वर्णीय असो का शूद्र. मुली वाढतात ते या लैंगिक वातावरणात. उत्तर असो का दक्षिण, चांगल्या दिसणाऱ्या मुलांना वयाने मोठ्या पुरुषांची कामवासना पुरी करण्यासाठी प्रशिक्षित केले जाते. मुलींना ते मंदिरात प्रशिक्षण मिळते. आईबापांनाही त्यात काही गैर आहे असे वाटत नाही. उलट, त्यात त्यांना आनंद मिळतो. मुली 'चांगली झोप येण्यासाठी' तर मुले 'आपण पुरुष आहोत' हे सिद्ध करण्यासाठी हस्तमैथून करतात. ते सतत झाल्यामुळे हिंदू तरुण नामर्द होतात, त्यांच्या नसा कमजोर होतात.'' *(तत्रैव, पृ. २८-३०)*

मेयो बाई तर मिल व मेकॉले या दोघांच्या पार पलीकडे गेली. हिंदू नामर्द *(डीजनरेट)* का यांचे कारण त्यांची अति लैंगिकता, असा नवा सिद्धांत तिने मांडला. तिच्या पुस्तकाचे दुसरे प्रकरण आहे, गुलामी मानसिकता. त्याचे कारण

हिंदूंची समलैंगिकता हे होय, असे मेयो बाई म्हणतात. हिंदूंच्या सडलेल्या संस्कृतीमुळे *(रॉटन कल्चर)* त्यांना इंग्रजांचे गुलाम व्हावे लागले. या पुस्तकात तिने घेतलेल्या मुलाखतींनी भरपूर पाने व्यापिली आहेत. त्यात अनेक तळटीपा, इतरांच्या भाषणांचे अहवाल यांची रेलचेल आहे. निराद चौधरी म्हणतात, ''सरळ व साधेभोळे अमेरिकन्स यावर सहज विश्वास ठेवतील असे मेयो बाईंना वाटणे हे साहजिक होते.'' भारतात तर या पुस्तकाने गदारोळ केला. त्याविरुद्ध मोठ्या पुढाऱ्यांनी आवाज उठविला. मात्र 'टाईम्सने' विरोधी सूर छापण्यास चक्क नकार दिला. निराद चौधरींसारखे चमचे इंग्रज सरकारच्या न्यायी सरकारचे गोडवे गात होते, पण ६० वर्षे झाली तरी अजूनही मेयोस भारतीय प्रजेने माफ केलेले नाही. ५० वर्षांनंतर मेयोने असे कां लिहिले, त्यामागे कोणचे राजकारण होते, याचा अभ्यास दोन इंग्रज स्कॉलर्सनी येल विश्वविद्यालयात केला. आपले सारे कागदपत्र तिने त्या युनिव्हर्सिटीला दिले होते. त्यातला एक कोटमन. दुसरा निकोल्स. (दर वेळेस असे का होते? संघावर सखोल अभ्यास व ग्रंथ वॉल्टर अँडरसन व दामले यांचा आहे. डॉ. आंबेडकरांच्या भारतीय घटनेवर सर्वोत्कृष्ट पुस्तक आहे एका अमेरिकनाचे, ग्रॅनविल ऑस्टीनचे.) गांधीजींनी आंबेडकरांना त्यांनी दलितांसाठी केलेल्या कामासाठी त्यांना कायदे मंत्री बनविले. त्यांनी ती घटना बनवायला तीन वर्षे लावली. खरे म्हणजे गव्हर्मेंट ऑफ इंडिया, १९३५ कायद्याची ती कॉपी आहे. डॉ. आंबेडकरांना ते काम कसे मिळाले याचे सर्वांना नवल वाटले. डॉ. आंबेडकर म्हणाले होते, ''भारतात लोकशाही मूळातच नाही. जी लोकशाही दिसते तो एक मुलामा आहे.'' लोकशाहीच नाही तर तिची घटना कोठून असणार? शंकर यांनी त्यावर एक व्यंगचित्र काढले. नेहरू कासवास चाबूक मारताहेत. कासव म्हणजे घटना. १९४९ चे हे व्यंगचित्र २०१२ साली एकदम प्रकाशाच्या झोतात आले. एनसीआरटीच्या एका पाठ्यपुस्तकांत ते पुन्हा छापले होते. ब्राह्मण नेहरू दलित आंबेडकरांना चाबकाने बडविताहेत असा त्याचा अर्थ लावला गेला. लोकसभेत तीन महिने त्यावर चर्चा चालली होती. शिक्षण मंत्री कपिल सिब्बलांना जाहीर माफी मागावी लागली! *(हिंदू, ४ ऑगस्ट २०१२)*

१४. जॉन कोटमन : वरील दोन इंग्रज स्कॉलर्समध्ये जॉन कोटमन एक होते. त्यांनी बाईंचा बचाव पुढीलप्रमाणे केला आहे : त्यावेळी भारतीयांत *सोडोमीचा* प्रकार लोकप्रिय होता. बाप त्यांच्या मुलांवर समलिंगी मैथुन (सोडोमी) करीत! त्याविरुद्ध कोणी बोलत नव्हते. कारण भारतात ''लाज वाटणे'' हा प्रकारच मुळी अस्तित्वात नव्हता. सारे वातावरण सडलेल्या लैंगिकतेतून निर्माण होणारी दुर्बलतेचे

प्रदर्शन होते. मात्र या स्कॉलर्सनी एक महत्त्वाची गोष्ट लपविली : ब्रिटीश सरकारने या बाईस असले ओंगळ पुस्तक लिहिण्यास पैसे व राजाश्रय दिला. मेयोने शेवटपर्यंत हे गुपित बाहेर येऊ दिले नव्हते. *(ब्रियान कॉनन, बेव्हर्ली निकोल्स, कॉन्स्टेबल, १९९१, पृ. २२५)* भारताबद्दल अमेरिकेस सहानुभूती वाटे. 'भारतास स्वतंत्र करा', असा लकडा अमेरिकेने ब्रिटनच्या मागे लावला होता. प्रत्यक्षात भारत कसा आहे ते दाखविण्यासाठी व भारतीयांची प्रतिमा *(इमेज)* बिघडविण्याचा हा धंदा! चर्चिलला अमेरिकेस वाटणाऱ्या सहानुभूतीचे भंजन *(सॅबोटाज)* करावयाचे होते!

१५. **निकोल्स्, बेव्हर्ली** : मिल व मेकॉले यानंतर भारतात जास्तीत जास्त मानसिक क्रांती कोणी घडविली असेल तर निकोल्सने. पहिल्या दोघांच्या हाती तर सत्ता होती. निकोल्स् तर साधा इंग्रज पत्रकार होता. त्याने *'व्हर्डिक्ट ऑन इंडिया'* हे पुस्तक लिहून हिंदूंची जास्तीत जास्त निंदा केली. मिस मेयोचा नंबर त्यानंतरचा. हे पुस्तक लिहिण्यासाठी तो भारतात एक वर्ष राहिला होता. मुख्य म्हणजे तो व्हाईसरॉयचा पाहुणा होता. सरकारने त्यास भारतास पाठविले. हे सत्य त्या काळी *ऑफिशिअल सिक्रेटस अॅक्ट* मुळे लपवून ठेवण्यात आले होते. त्याने ब्रिटीश वैचारिक भूमिकेचाच पाठपुरावा केला. महायुद्धाच्या काळात प्रवासाची परवानगी कोणास मिळत नसे, पण यास अपवाद केला गेला व थॉमस कुक कंपनीमुळे तो भारतात येऊ शकला. *(तत्रैव, पृ. २२१)* या पत्रकाराने हे पुस्तक लिहून आपली देशभक्ती महायुद्धाच्या काळात सिद्ध केली. त्याचे कारण तसेच होते : *हिटलर युथ* या नाझी संस्थेसाठी त्याने भाषणे केली होती व कार्लटन हॉटेलात त्याने जोआकिम फॉं रिबेनट्रॉपला खाना दिला होता. त्यानंतर प्रेस कॉंफरन्स झाली व पाहुण्याने नाझी धोरण काय आहे ते पत्रकारांना विशद केले. ब्रिटनचा फॅसिस्ट नेता ओस्वाल्ड मोस्ले यांची भेट घेऊन युद्ध थांबविण्यासाठी त्याने प्रयत्न केले होते. डंकर्कनंतर हिटलरने 'विवेकास आवाहन' नावाचे *(अपील टु रीझन)* भाषण केले होते त्यावर हा निकोल्स भाळला व तो शांततेसाठी प्रयत्न करू लागला. हे सारे इंग्रज सरकारविरुद्ध होते व जर्मनीला अनुकूल होते. त्यासाठी त्याला पैसे मिळाले असले पाहिजेत. तो स्वतः समलिंगी होता. तो त्यावेळी ब्रिटनमध्ये गुन्हा समजला जात होता. आता त्याला 'आपण देशभक्त आहोत', असे सिद्ध करावयाचे होते. तशी संधी समोरून चालून आली. ती त्याने सोडली नाही. आता त्याने मिस मेयोला गुरू मानले. मेयोने हिंदूंना शिव्या दिल्या होत्या, त्याने पण हिंदूंना गलिच्छ शिवीगाळ केली. 'सर्व बाबतीत हिंदूंना काही अक्कल नाही', असे त्याने प्रतिपादन केले. त्यासाठी त्याने मिलचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला. हिंदू सिनेमा कुचकामाचे

व हिंदू पत्रकार खोटारडे, असा त्याने आरोप केला. त्याला गांधींना भेटायचे होते, पण नेमके त्यावेळी ते तुरुंगात होते. गांधींना त्यांनी फॅसिस्ट म्हटले व सारे हिंदू नाझींपेक्षाही वाईट आहेत, असे त्याने लिहिले. त्याने गांधीजींची तुलना हिटलरशी केली आहे. काही जणांनी गांधीजींची तुलना येशू ख्रिस्ताशी केली होती. त्यांना खोडून काढण्यासाठी त्याने ही शक्कल लढविली. तो लिहितो : ''ख्रिस्ती धर्म हा क्रॉसवरील ख्रिस्तामुळे ओळखला जातो. आपण त्याला देवत्व नाकारतो पण येशूसारखा 'संपूर्ण माणूस' जगात दुसरा कोणी नाही. आता आपण हिंदू धर्माकडे वळू. गणेश हे हिंदू धर्माचे बोध चिन्ह आहे. गणेश म्हणजे अर्धा हत्ती व अर्धा माणूस. बंगलोरच्या गणपती मंदिराची माझी भेट मी कधीच विसरणार नाही. ती सायंकाळ होती. त्या सायंकाळच्या सोनेरी किरणात ती गणेशाची काळ्या दगडाची मूर्ती चकाकत होती. एका मोठ्या खडकातून ती कोरली होती. हत्तीचे डोके व गणपतीचे हातपाय यांच्यात कोठेही ताळमेळ नव्हता. मूर्तिकार 'जिनियस' होता त्यात प्रश्नच नाही, पण 'ईव्हिल जिनियस'. क्रॉसवरील ख्रिस्ताने जगास संदेश दिला : ''त्यांना क्षमा करा. त्यांना ते काय करीत आहेत हे समजत नाही. याउलट, सोंडवाला व उंदरावर बसलेला हा गणेश जगाला काहीच संदेश देऊ शकत नाही. सर्व धर्मांच्या दालनात या दोघांची कधी तरी तुलना होऊ शकेल का?'' ''कॉंग्रेस ही १०० टक्के फासिस्ट आहे. जसा प्रत्येक नाझी 'सुपरमॅन' असतो तसा प्रत्येक कॉंग्रेसमधील ब्राह्मण 'भूदेव' असतो. कॉंग्रेस ही ब्राह्मणांची संस्था आहे. तेथे फासिस्ट गांधींची सत्ता चालते. नाझींकडे ''हेल हिटलर'' म्हणतात, तसे कॉंग्रेसमध्ये ''गांधीजी झिंदाबाद'' (की जय) म्हणतात. ''निकोल्सच्या शब्दाशब्दात हिंदू द्वेष ठासून भरला होता. मुस्लीम बाया बुरखा घालतात, पण निकोल्स त्यासाठी हिंदूंनाच दोषी धरतो! तो पेशावरचे वर्णन करतो, ''मी रस्त्यावरून चाललो होतो. फार थोड्या स्त्रिया रस्त्यावर दिसल्या. त्या सर्व डोक्यापासून पायापर्यंत काळ्या पोशाखाने आच्छादिलेल्या. एका फटीतून दोन डोळे दिसत व एक भोक तोंडासाठी उघडे ठेवलेले.''

बहुधा वर्षभर भारतात राहूनसुद्धा त्याला कोणी सांगितले नाही की ह्या पोशाखाला *नकाब* म्हणतात, व हा हिंदूंचा नाही, तर मुसलमानांचा अधिकृत पोशाख आहे. गांधीजींचा प्रतिस्पर्धी महंमद अली जीनांना तो भेटला. जीनांनी त्याला ''पाकिस्थान कां हवे?'' ते समजवून सांगितले. निकोल्सच्या पुस्तकात *''डायलॉग विथ अ जायंट''* असे त्यावर एक स्वतंत्र प्रकरण आहे. साऱ्या पुस्तकात एकाच व्यक्तीची प्रशंसा केलेली आढळते. ती आहे जीनांची. त्यांनी जीनांचे वर्णन

''जुन्या पठडीतील डिप्लोमॅट'' व ''आशियातील सर्वात महत्त्वाचा नेता'' असे केले आहे. तो लिहितो, ''जीनांची टीका सरळ व सकारात्मक आहे. हिंदूंप्रमाणे ती द्वेषपूर्ण कधीच नसते. ती डॉक्टरांच्या ''डायाग्नोसिस''प्रमाणे आहे. जीना व इतर हिंदू नेते यांच्याविषयी सांगायचे झाल्यास सर्जन व जंतरमंतरवाला मांत्रिक यामधील जो फरक असतो तसा त्या दोघांमध्ये आहे. त्यांचे शब्द जळजळीत वाटतील पण ह्या नेत्यावर विश्वास ठेवायला हरकत नाही.'' जीनांवरील प्रकरण वाचून त्यांचा गुरू चर्चिल नक्की खुश झाला असेल.

१६. फ्रान्सिस टकर (जीओसी इन सी) : इंग्रजी सैन्यात तो ३३ वर्षे होता. शेवटची २ वर्षे तो ईस्टर्न कमांड चा जीओसी होता. १९५० साली तो निवृत्त झाला. त्यानंतर त्याने फार मौलिक चिंतन-लेखन केले. तो म्हणतो : ''ब्रिटीश तेलाचे सायन्स व नवी मुस्लीम शक्ती या दोघांचे लग्न लागले. त्यामुळे उत्तर आफ्रिका ते सहारा रण, पर्शिया व अफगाणिस्थान आणि त्याचे पुढे एक्सटेंशन हिमालयाच्या पायथ्याशी नेले तर हा हिरवा पट्टा कम्युनिस्ट रशियाचे आशियातील आक्रमण थोपवू शकेल. हा लाखो मुसलमानांचा नवा पट्टा रशियाच्या मुसलमानी राज्यातील कम्युनिस्ट मुसलमान ह्या तुर्कस्थानासकट पश्चिम आशियातील मुसलमानी राज्यातील मुसलमानांना आकर्षित करण्यापासून वाचवेल.'' बाप रे, असल्या वैश्विक व विशाल विचारसरणीचा विचार कोणी भारतीय सेनापतीने केला असेल, असे वाटत नाही. तो पुढे म्हणतो, ''आपल्या साऱ्या कारकीर्दीत हिंदू भारताचा तो सर्वात कठीण समय होता. अंधश्रद्धांवर आधारलेला हिंदू धर्म या काळात तुटत, मोडत होता.... भौतिकवादाच्या या कालखंडात कम्युनिझमसारखा जडवाद हिंदू धर्म जर नष्ट झाला तर निर्माण झालेली पोकळी भरून काढेल. साम्यवाद व हिंदू धर्म या दोघांमध्ये इस्लामला उभे करणे ही काळाची गरज आहे असे आमच्यापैकी काही जणांना वाटले. १९४४ साली मी काबूलला भेट दिली तेव्हा समजले की अफगाणिस्थानातील लोकांना हिंदू राज्याचे मोठे भय वाटते. त्यांचा हिंदूंवरील अविश्वास एक महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे अफगाण इंग्रजांचे मित्र राहतील व पाकिस्थानच्या निर्मितीस मान्यता देतील असे आम्हास वाटले.'' थोडक्यांत, प्लासीच्या लढाईनंतर बंगालमध्ये जी भावना होती त्याची आरशातील प्रतिमा टकरला अफगाणिस्थानात पहावयास मिळाली. टकरच्या पुस्तकात शेवटी परिशिष्टात हिंदू धर्माची माहिती दिली आहे व त्यात 'चर्चिलने युरोपात साम्यवादाचा उदय होत असल्याचा विचार, उद्धृत केला आहे. टकर लिहितो, ''लोखंडी पडदा हिंदू धर्म आणि इतर धर्म वा व्यवस्था यांच्यामध्ये मोठा अडसर आहे. नवे प्रभाव तो

थांबवितो. एका समाजाच्या लोकांपासून तो दुसऱ्या समाजाच्या लोकांना तो मिसळू देत नाही. ख्रिस्ताच्या जन्माच्या हजारो वर्षे आधीपासून हिंदू धर्म येथे अस्तित्वात आहे. लोखंडी पडदा जर दूर झाला तर भारताची पोकळी साम्यवाद भरून काढेल. त्यामुळे हिंदू धर्मातील लोकांची मोठी दयनीय अवस्था होईल.'' *(सर फ्रान्सिस टकर, व्हाईल मेमरी सर्व्हज्, कॅसल, १९५०, पृ. २६-२७)* ही दयनीय स्थिती आपण बंगाल व केरळात अनुभवीत आहोत. ६७ वर्षानंतर संघास या राज्यांत जागृती आणायची जबाबदारी पार पाडावी लागत आहे.

१७. **लॉर्ड माऊंटबॅटन** : काही इंग्रज इतिहासकारांनी मौंटबॅटन यांनी टकरचा दृष्टिकोण डोळ्यासमोर ठेवून भारताची फाळणी करून भारताचे भलेच केले आहे, असे मत व्यक्त केले आहे. हे खरे आहे की मौंटबॅटन नेहरूंचे चांगले मित्र होते व लेडी मौंटबॅटनशी तर नेहरूंची विशेष मैत्री होती. मौंटबॅटनने धर्माचा विचार कधी केलाच नाही. त्याच्यासमोर नेहरू व महंमद अली जीना हे दोन निधर्मी नेते उभे होते. कोणच्याही धार्मिक फूटपट्या लावल्या तरी जीना हे त्या अर्थाने कडवे मुसलमान कधीच नव्हते. गांधीजींच्या स्पर्धेत एक वेगळे राष्ट्र बनविण्यासाठी त्यांनी इस्लाम 'धर्माचा वापर' निश्चित केला. मौंटबॅटनचा ओढा पाकिस्थानाकडे होता, याचे अनेक पुरावे मिळतात. चर्चिलने त्यांना तसे पढविले होते. त्यांना पाकिस्थानचे गव्हर्नर जनरल व्हायचे होते पण जीनांनी त्यांना चक्क नाही म्हटले. फाळणीमुळे हिंदू व शीख पाकिस्थान सोडून भारतात पळून येत होते. त्यावेळी हा गोरा साहेब त्याच्या गोऱ्या सैनिकांचे प्राण वाचवायच्या मागे जास्त होता. म्हणून त्याने गोरे सैन्य तेथे धाडले नाही. त्यास माहीत होते की पाकिस्थानी सैन्यास गोरे ख्रिस्ती काय वा काळे हिंदू-शीख काय, दोघेही काफीर होते. त्यांनी अडविण्याचा प्रकार केला असता तर त्यांनाही ठार केले असते. गांधीजींना पाकिस्थानास ५५ कोटी रुपये द्यायला लावणारा कळीचा नारद हाच तो मौंटबॅटन. गरीब झालेल्या इंग्रजी संरक्षण उद्योगास जवळजवळ एक दशक भारताच्या माध्यमातून सावरणारा हाच तो मौंटबॅटन. पाकिस्थानास अमेरिकन शस्त्रे मिळत होती पण त्यांचे डीफेन्स प्रमुख बरीच वर्षे इंग्रज होते. काश्मीर प्रश्न यानेच युनोत नेण्याचा सल्ला नेहरूंना दिला होता. त्याला भीती वाटत होती, सरदार पटेलांनी हैदराबादेत जशी पोलीस ॲक्शन घेतली तशी ते काश्मीरात घेतील - तेथे हिंदू बहुसंख्यांक करतील व ती समस्या कायमचीच सोडवून टाकतील. (सरदार पटेल तर जाहीरपणे म्हणत, कशाला चिंता करता?) असा हा हिंदूद्वेष्टा गोरा साहेब व त्याची विषकन्या मड्डम लेडी मौंटबॅटन. दोष शिकाऱ्याचा नाही, आमचाच मासा स्वतः होऊन त्या गळाला

लागला व तिचा शिकार बनला. शिकाऱ्याला दोष देण्यात काय अर्थ आहे? नेहरूंच्या बेडरूममध्ये दोन मोठे फोटो लावले होते. एक लेडी मौंटबॅटनचा, दुसरा जॅकलिन केनेडीचा. *सॉरी, नो कॉमेंट्स.*

१८. प्र. फ्रँकलिन रुझव्हेल्ट (१९३३-४५) : ह्या ३२व्या डेमॉक्रॅट अध्यक्षांना भारताची विशाल बाजारपेठ डोळ्यासमोर दिसत होती. अमेरिकेच्या तीन मोठ्या अध्यक्षात त्यांची गणना होते. दुसरे जॉर्ज वॉशिंग्टन व तिसरे अब्राहम लिंकन. त्यांनी अमेरिकेस मंदीतून वाचविले. ते पोलिओचे बळी होते. त्यांचे पहिल्या १०० दिवसातील *न्यू डील* फार प्रसिद्ध आहे. भारतास स्वातंत्र्य मिळावे यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. म्हणून चर्चिल त्यांना फार घाबरत असे. भारतीय कसे नादान आहेत हे त्याने अमेरिकन्सना पटविण्याचे अगणित उपाय करून बघितले, पण त्यात तो निष्फळ ठरला. रुझव्हेल्टना मोठा प्रश्न पडत असे की भारताच्या ब्रिटीश आर्मीमध्ये मुसलमान शिपाई बहुसंख्येने का? हिंदू कां नाहीत? हिंदू काँग्रेसला काही सवलती दिल्या तर त्याचा वाईट परिणाम भारतीय सैन्यावर तर होणार नाहीं ना, अशी इंग्रजांना भीती वाटत असावी, असे त्यांना वाटे. (हे सर्व दृष्टिकोण आपल्यासाठी नवे आहेत! आम्ही स्वतंत्रपणे संशोधन करीतच नाही. पाश्चात्त्यांच्या संशोधनाची केवळ नक्कल करतो.)

१९. वॉल्टर लिप्पमन : लिप्पमन (१८८९-१९७४) हा पत्रकार न्यूयॉर्क सीटीत जन्मला. तो 'हेराल्ड ट्रिब्यून'साठी लेखन करी. १९६२ साली त्याला साहित्याचे पुलिट्झर प्राईज मिळाले. त्याची प्रवास वर्णने वाचणे म्हणजे एक मोठा आनंदाचा अनुभव आहे. त्याने बेरेनसन ह्या मित्राला पत्रात लिहिले, "हिंदू जग आपल्याला परके वाटते. त्याच्या तुलनेत इस्लामी जग जास्त जवळचे वाटते. जास्त सुसंस्कृत वाटते. कलकत्यात तर मला तेथील घाणेरडी प्रजा पाहून ओकारीच आली. तेथे फूटपाथवर किमान एक लाख लोक रहात असावेत. रेल्वे स्टेशनातील प्रेते व दुर्गंधी याची तुम्ही कल्पनाच करू शकणार नाहीत. तसेच मजुरांच्या वस्तीत तुम्ही पाऊल ठेवणे अशक्य आहे. एका रविवारी मी कालीची पूजा एकीकडे व काळ्या बकऱ्यांची कत्तल दुसरीकडे, असे चित्र माझ्या डोळ्यांनी पाहिले." *(डोनाल्ड स्टील, वॉल्टर लिप्पमन अँड द अमेरिकन सेंच्युरी, लिटल ब्राऊन, १९८०, पृ. ४३४)* मोगलांची थडगी, राजवाडे व पेंटींग्ज त्याला फार आवडली. हिंदूंच्या मंदिरापेक्षा हिंदू शिल्प-कला त्यास जास्त पसंत पडली. त्याच्या मित्राने "आपण तुझ्याशी सहमत आहोत," असे लिहले.

२०. कीर हार्डी (एम.पी. १९०६-०८) : नाईट स्कूलमधून शिकलेला

खाणीतला कामगार, पहिला समाजवादी खासदार व लो. टिळकांचा मित्र. स्त्रियांना मताचा हक्क, भारतास होमरूल, स्कॉटलँडला होमरूल व दक्षिण आफ्रिकेची वंशवाद मुक्ती अशी त्यांची चार सूत्रे होती. लिबरल पक्ष म्हणून भारताच्या स्वातंत्र्यास त्यांचा पाठिंबा नव्हता. पक्ष दुर्बळ होता. तो सत्तेवर यायचा कधी प्रश्नच नव्हता. हा अपवाद होता. त्याने भारतास भेट दिली होती. भारतातून मजूर पक्षाच्या पेपरात त्याने "भारतास स्वातंत्र्य दिलेच पाहिजे" अशा अर्थाचे लेख लिहिले होते व त्या लेखांचे पुढे 'भारत : निरीक्षण व सूचना' नावाचे लहानसे पुस्तकही प्रसिद्ध केले होते. ते वाचून इंग्रजी प्रजा भयंकर भडकली होती. त्यांनी हार्डीवर देशद्रोहाचा आरोप केला होता. बंगालची फाळणी केली म्हणून हार्डीने कर्झनवर टीका केली होती. भारतात शांतता कधीच येणार नाही, कारण गोरे व काळे यांचा परस्परांवरील अविश्वास. फक्त त्यांना स्वराज्य दिले तर शांती परत येईल, असे त्याने निर्भीडपणे लिहिले होते. भारतीय व युरोपियन्स् एकाच आर्यन वंशाचे आहेत, इंग्रजांनी भारतीयांना सुसंस्कृत बनविले नाही, उलट आपण त्यांचे शोषण केले व त्यांची गरिबी वाढविली. लो. टिळक व हार्डी उत्तम मित्र होते. टिळकांनी त्याच्या मजूर पक्षास जंगी मदत करून त्या पक्षास उभे केले. टिळकांच्या या दूर दृष्टीकडे इतिहासकारांचे दुर्लक्ष झाले आहे. कदाचित् जाणून बुजून तसे करणे भाग पडले असावे.

२१. जोसेफ हार्पर : मजूर पक्ष नेहेमीच भारताच्या स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता होता अशी एक गोड गैरसमजूत होती व आहे. जोसेफ (१९१४-७८) त्यास अपवाद होता. तो मजूर पक्षाचा खासदार होता. त्याच्या हिंदू द्वेषाचे कारण कळत नाहीत. कदाचित् त्याने मिल व मेकॉले यांचा सखोल अभ्यास केला असला पाहिजे.

२२. माल्कम मगरीज : कलकत्यात थॉमस मालकम मगरीज (१९०३-९०) 'स्टेट्समन' दैनिकाचा संपादक होता. त्याची राजकीय मते सुरुवातीला कम्युनिस्ट होती. त्यात हिंदू द्वेष आपोआप येतोच. दुसऱ्या महायुद्धात त्याने सैनिक व हेर असे दुहेरी काम केले. त्याचे विचार आत्यंतिक होते व ते प्रगट करायला त्याच्यापाशी समर्थ लेखणी व तेवढेच समर्थ धारिष्ट्य होते. राणीने वॉशिंग्टनला १९५७ साली भेट दिली तेव्हा *'सॅटर डे इव्हिनिंग पोस्ट'*मध्ये "इंग्लंडला राणीची गरज आहे काय?" हा चुरचुरीत लेख लिहिला होता. त्या आधी १९५५ मध्ये "रॉयल सोप ऑपेरा" नावाचा तिरकस लेख छापला होता. इंग्रज एवढे खवळले की त्याला नोकरीवरून काढून टाकण्यात आले व बीबीसीवर त्याच्या

कार्यक्रमांवर बंदी घालण्यात आली. तो नेहमी म्हणे, ''लक्षात ठेवा, फक्त मृत मासे प्रवाहाबरोबर वाहतात.'' आयुष्याच्या सायंकाळी देवाला न मानणारा हा डावा एकदम ख्रिश्चन धर्माच्या प्रेमात पडला.

२३. रामसे मॅकडोनाल्ड : मजूर पक्षाच्या तीन संस्थापकांपैकी एक. त्यांनी स्थापन केलेल्या पक्षातूनच त्यांची गच्छंती केली गेली होती. १९२४ व १९२९-३१ या काळांत मजूर पक्षाच्या सरकारचे ते पंतप्रधान होते. रामसे मॅकडोनाल्ड भारतातील पब्लिक सर्व्हिसेसच्या रॉयल कमिशन चे सभासद होते. ते पुढे ब्रिटनचे पंतप्रधान झाले. 'फोडा आणि राज्य करा' या धोरणावर त्यांचा भलताच विश्वास होता. त्यांनी 'कम्युनल अवार्ड' भारतावर ठोकून बसविले. त्यास मॅकडोनाल्ड अवार्ड असेही म्हणतात. गांधीजींना या अवार्ड विरुद्ध आंदोलन व नंतर उपासावर उतरावे लागले. मुसलमानांना जसा वेगळे मतदान करण्याचा अधिकार दिला होता तसा अधिकार त्यांनी दलितांना दिला व हिंदूधर्मियात सवर्ण व अवर्ण असे युद्ध लावून दिले. अल्पसंख्यांक मुसलमानांना वेगळ्या मतदानाचा अधिकार ही पाकिस्थानची पूर्वतयारी होती. तशीच त्यांनी भारतात दलितस्थानाची तयारी सुरू केली. दलितांना अल्पसंख्यांक समजणे हीच मूळातून चूक होती, नव्हे, ती जाणूनबुजून केलेली बदमाषी होती. त्यासाठी तुरुंगात असलेल्या गांधीजींनी प्राणांतिक उपास करून हिंदू धर्माची तोडफोड थांबविली व भारतास वाचविले. 'आमच्या धर्मात ढवळाढवळ करण्याचा तुम्हाला अधिकार नाही, आम्ही आमचे पाहून घेऊ' असे जे लो. टिळकांचे धोरण होते त्याचे हे गांधीजींचे धोरण 'एक्सटेंशन' होते.

२४. वुड्रो व्याट : वुड्रो व्याट (१८१८-१९३७) हा राजकारणी नेता, प्रकाशक व लेखक होता. राणी एलिझाबेथ, मार्गारेट थॅचर व रूपर्ट मर्डेक यांच्या जवळचा. तो शाळा मास्तरचा मुलगा. त्याने दुसऱ्या महायुद्धात भाग घेतला होता. १९४५ साली तो मजूर पक्षातर्फे खासदार म्हणून जिंकून आला. १९४६ साली तो कॅबिनेट मिशन बरोबर भारतात आला. मिशन व मुस्लीम लीग यांच्यामधील दुवा म्हणून त्याने काम केले. १९५१ मध्ये तो ॲटलीच्या कॅबिनेटमध्ये मंत्री होता. बीबीसीच्या 'पॅनोरामा' या कार्यक्रमात त्याचे मोठे योगदान होते. महायुद्धात मुसलमान सैनिकांबरोबर काम केल्यामुळे कदाचित तो पक्का हिंदू द्वेष्टा बनला होता. दक्षिण आफ्रिकेत नेल्सन मँडेला ''कम्युनिस्ट-स्टाईल काळा हुकूमशहा'' होऊ पहात आहे, असे त्याचे मत बनले होते. त्याचे मरणोत्तर आत्मचरित्र तीन भागात डायरी रूपात प्रसिद्ध झाले. इंग्रजी राजकारणाचे अंतरंग त्याने खुलंखुल्ला सांगून अत्यंत स्फोटक मसाला वाचकांना पेश केला.

२५. **क्लेमंट ॲटली** : त्यांना करिश्मा नव्हता. ते लाजाळु होते. चर्चिलच्या वॉर मंत्रीमंडळात ते उपपंतप्रधान होते. १९४५-५१ या काळात ते पंतप्रधान होते. १९३९ ते १९५५ या काळात ते मजूर पक्षाचे नेते होते. त्या काळात कृष्ण मेनन हे काँग्रेसचे (म्हणजे नेहरूंचे) लंडनमधील प्रतिनिधी होते; सुधीर घोष गांधीजींचे. जीनांना ती भीती वाटे. चर्चिल जीनांना यांचे त्यांच्यावर वरदहस्त होते. दोघांचा गुप्तपणे पत्रव्यवहार होता. चर्चिल टोपणनावाने पत्रे लिहित. ॲटलींचे भारतीय काँग्रेस नेत्यांवर खूप उपकार होते. चर्चिलच्या विरुद्ध जाऊन त्यांनी सत्तांतराचा ठराव पास करवून घेतला होता. त्यांच्या धोरणांची नक्कल करणे हे आपले पवित्र कर्तव्य आहे अशा कृतज्ञतेच्या भावनेतून समाजवादी नेहरूंनी आपले धोरण आखले. ब्रिटीश इंडिया तील मुसलमानांना पाठीशी घालायचे हे पारतंत्र्यातील पाप कमसे कम स्वतंत्र भारतात नष्ट होईल अशी सर्वांची अपेक्षा होती, पण कसले काय? चाचा नेहरूंनी मुस्लीम तुष्टीकरणाचे जुने *कलोनियल* धोरण चालू ठेवले. त्यांनी सर्व डाव्या मंडळींना सर्व वर्तमानपत्रात नोकऱ्या दिल्या व त्यांनी सर्व बक्षिसे, अवार्डस् व परदेशांचे दौरे वगैरे डाव्या लेखकांना बहाल करण्याचा सपाटा लावला. इतका की विचारवंत म्हणजे समाजवादी वा डावा, असे समीकरण या देशात निर्माण झाले. हिंदुत्ववादी लेखकांना वाळीत टाकण्यात आले. 'गांधींचे मारेकरी' हा आरोप मोठा गंभीर होता. त्याने सारे चळचळा कापायचे. केवळ मराठी नाही तर सर्व भाषांतील लेखकांना. बिचारे प्रकाशक. त्यांना स्वतःची बुद्धी नसते. ते तज्ञ म्हणून पगारी लोक नोकरीस ठेवतात. हे तज्ञ कोण? पुन्हा डावे. आली का पंचाईत? आता किंचित् परिस्थिती बदलली आहे. तरीदेखील देशभर जास्तीत जास्त वाचल्या जाणाऱ्या वर्तमानपत्रांचे संपादक अजून डावेच आहेत. टीव्हीवर सारा स्टाफ डावाच असतो. एखाददुसऱ्या हिंदुत्ववाद्यास आमंत्रण दिले जाते. सारे डावे मिळून त्याचा अभिमन्यू करतात. त्याचे नाव चर्चा. टीव्ही डिबेट.

२६. **विद्याधर सुरजप्रसाद (व्ही.एस.) नायपॉल** : हा त्रिनिदादचा इंग्रजीतून लेखन करणारा भारतीय वंशाचा लेखक. १९८९ साली त्यांना सर ही पदवी प्राप्त झाली. २००१ साली त्यांना नोबेल प्राईज मिळाले. एडवर्ड सैदने नायपॉलने "युरोपियनांच्या वसाहतवादाच्या भाकडकथा त्यांनी जगात रुजविल्या," अशी त्यांच्यावर टीका केली आहे. त्याचे गाजलेले पुस्तक म्हणजे *'एरिया ऑफ डार्कनेस'*. हिंदू किती घाणेरडे आहेत ते समजून घ्यायचे असेल तर नायपॉल वाचावे. *(व्ही. एस. नायपॉल, द ओव्हरक्राऊडेड बॅराकून, पेंग्विन, १९७६, पृ. ८८)* १९६६ साली मुंबईच्या पोहण्याच्या तलावावर खच्चून गर्दी जमली होती.

त्यावेळी महेश योगी पाण्यावरून चालणार होते. त्यांनी पहिले पाऊल टाकले व ते धप्पकन पाण्यात पडले. ब्लिटझ् व नायपॉल यांनी त्यांच्यावर कडाडून टीका केली होती. इंग्लंडमधील ऑक्सफर्ड येथे शिक्षण व नादीरा खान ही दुसरी पाकिस्थानी पत्नी ही त्यांच्या हिंदू द्वेषाची कारणे समजण्यास पुरेशी आहेत.

■■■

त्यावेळी महेश योगी पाण्यावरून चालणार होते. त्यांनी पहिले पाऊल टाकले व ते धप्पकन पाण्यात पडले. ब्लिटझ् व नायपॉल यांनी त्यांच्यावर कडाडून टीका केली होती. इंग्लंडमधील ऑक्सफर्ड येथे शिक्षण व नादीरा खान ही दुसरी पाकिस्थानी पत्नी ही त्यांच्या हिंदू द्वेषाची कारणे समजण्यास पुरेशी आहेत.

■■■

कायद्याचे पालन करायला आवडत नाही.''

''तुम्ही लोकांसाठी काय करता?''

''मी खूप काम करते, पण त्यांच्या मनाची चौकट बदलणे मला शक्य होत नाही. त्यासाठी मी *फॉल्स लेबल्स्* हे पुस्तक लिहिले. त्यांना मी सतत सांगते, ''तुम्ही तुमच्या पायावर उभे रहा, स्वावलंबी बना, दुसऱ्यांच्या कुबड्या वापरू नका. कॅमेरून सध्या आर्थिक संकटात आहे. सरकारकडून फारसे न मागता सरकारला तुम्ही मदत करा. सुसंघटित व्हा. पण लोकांना माझे सांगणे फारसे पटत नाही.''

''तुमच्याकडे तर केवढी साक्षर प्रजा आहे. आणि वस्ती एवढी लहान. काम करायला किती सोपे. फटाफट रिझल्टस् मिळाले पाहिजेत,'' मी म्हणालो.

''ते होत नाही, म्हणून तर विचारते आहे, काही तरी मार्ग सूचवा.''

या मेरीने माझ्या डोक्याला चालना दिली.

पं. नेहरू मला एका मुलाखतीत सांगीत होते, ''मला दहा माणसे अशी पाहिजेत की जे या देशास बदलून टाकतील आणि माझ्या स्वप्नातला भारत साकार करतील. अनेक कोटींच्या देशात मला अशी दहा माणसे मिळू शकत नाहीत. ही माझी शोकांतिका आहे.''

''तुम्हाला माहीत आहे कां,'' मी त्यांना वेड्यासारखा प्रश्न विचारला, ''की तुमच्या कॉंग्रेसमधील नेते चोर आहेत?''

''हे मला ठाऊक नाही असे तुम्हाला वाटते कां,'' त्यांनी मला प्रतिप्रश्न विचारला.

''आणि हे माहीत असून तुम्ही त्यांना बदलू शकत नाही?''

''तेच तर माझे दुःख आहे.''

माझ्या डोक्यातील प्रश्न

त्या राणीच्या आत्ताच्या व पं. नेहरूंच्या जुन्या मुलाखतीने माझ्या मनात अनेक प्रश्न निर्माण झाले. ते पुढीलप्रमाणे :

१. प्रत्येक नेत्याला समाज आपल्या मनासारखा पाहिजे असतो, ते कां?

२. मनासारखा म्हणजे नेमके काय? चमच्यांचा? आपल्या 'हो'स 'हो' म्हणणाऱ्यांचा? एक साच्यातला?

३. विरोधकांशिवायचा असे म्हटले तर लोकशाही कोठे राहिली?

४. स्वतःच्या पत्नीचा स्वभाव बदलता येत नाही. ते सोडा, आपल्या स्वभावातील

दोष शेवटपर्यंत आपल्याला दूर करता येत नाहीत. मग समाजाला बदलायला निघालेला नेता वेडा म्हणायचा, कां अति महत्त्वाकांक्षी?

५. समाजाचा स्वभाव बदलणे आवश्यक आहे कां?

६. सहिष्णुतेने सहजीवन शक्य नाही कां? त्याचेच दुसरे नाव लोकशाही, हे खरे कां?

७. आशियन देशात जेवढा जातीवाद व जातीयवाद दिसतो तेवढा युरोप-अमेरिकेत कां दिसत नाही?

८. भारतात ''आम्ही'' व ''तुम्ही'' असा भेदभाव कां?

प्रश्नांची उत्तरे

बऱ्याच विचारवंतांना पत्राने वा टेलीफोनवर बोलून वा प्रत्यक्ष भेटून, त्यांच्याशी चर्चा करून आम्ही - ते व मी - पुढील मतांवर आलो :

१. हा मानवी स्वभाव आहे. तो तुम्ही बदलू शकत नाही. प्रत्येक गृहिणीला आपल्या मनासारखे घर लागतेच ना? आपल्या मताशी नवऱ्याने सहमत असावे असे मनातल्या मनात वाटते ना? आणि पतीला पत्नीने? समाज म्हणजे *एक्सटेंडेड फॅमिली.* त्या समाजाच्या नेत्यास समाजाने आपल्या मनाप्रमाणे, आपल्या तत्त्वांप्रमाणे वागावे, रहावे अशी अपेक्षा ठेवली तर त्यात चूक काय आहे?

२. मनासारखा समाज म्हणजे नेत्याच्या मनात असलेल्या सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक व धार्मिक वगैरे कल्पनांशी अनुरूप असलेला समाज निर्माण करणे.

३. तो आग्रह असावा, दुराग्रह नसावा. म्हणजे, माझीच तत्त्वे बरोबर आहेत, इतरांची चूक, त्यांना आपण नष्ट करू, हा झाला दुराग्रह. ती लोकशाही नाही, ती हुकूमशाही. इतरांच्या तत्त्वांचा, विचारांचा योग्य तो मानसन्मान करणे म्हणजे लोकशाही. हिंदू धर्म सर्वसमावेशक आहे, *इनक्लुझिव्ह* आहे. सारे अब्राहिक धर्म *एक्स्लुझिव्ह* आहेत. तीच कथा आधुनिक राजकीय तत्त्वप्रणालींची. कम्युनिझम् वा कॅपिटॅलिझम् *एक्स्लुझिव्ह* आहेत. बस्स, फक्त आम्ही. इतरांना नो एन्ट्री. केवळ प्रवेशबंदीच नाही तर ''काफरांना ठार करा'' असा कडवटपणा तेथे आढळतो. लोकशाही म्हणजे सुधारलेल्या, जास्त *मॅच्युअर* झालेल्या, सुसंस्कृत मानवाची राज्यशास्त्रीय तत्त्वप्रणाली आहे. राजेशाही व हुकूमशाही झाल्या जुन्या जमान्यातील राजकीय तत्त्वप्रणाल्या. प्रत्येक माणूस त्याला संधी मिळाली की हुकूमशहासारखा वागू लागतो. त्यास एकाधिकारशाही जात्याच पसंत आहे.

४. स्वभावो न दुरतिक्रमः । असे म्हटले गेले आहे. दुर्योधनाची कबुली फार बोलकी आहे :

जानामि धर्मं न च मे प्रवृत्तिः । जानाम्यधर्मं न च मे निवृत्तिः ।
केनापि देवेन हृदि स्थितेन । यथा नियुक्तोस्मि तथा करोमि ।

(योग्य काय ते मी जाणतो, पण तसे मी वागू शकत नाही; अयोग्य काय तेही मी जाणतो, पण ते केल्याशिवाय मला राहवत नाही. माझ्या हृदयातील वसलेला परमेश्वर मला जशी आज्ञा देईल त्याप्रमाणे मी वागतो.)

माणूस व पशू यात फरक कोणचा? माणसाला परमेश्वराने विचार व वाणी दिली आहे. नाही तर दोघेही सारखेच आहेत.

आहार निद्रा भय मैथुनं च । सामान्यं एतद् पशुभिः समानाः ॥
धर्मो ही तेषां अधिकं विशेषः । धर्मेण हीनः पशुभिः समानाः ॥

उत्क्रांतीच्या शिडीवर काही माणसे जास्त उंचीवर पोचलेली दिसतात, तर काही अजून खालीच रेंगाळताना दिसतात. ते वरच्यांना खाली खेचू पहातात तर वरचे खालच्यांना वर येण्याचे आमंत्रण देतात. जग ही दोघातील रस्सीखेच उत्साहाने व टाळ्या पिटून तिची मजा चाखताना गेली शेकडो वर्षे दिसत आहे, पण खेळ काही केल्या संपत नाही. कदाचित् संपणारही नाही.

५. स्वभाव बदलणे आवश्यक का अनावश्यक ते तुम्ही कोणाच्या बाजूने उभे आहात, त्यावर अवलंबून आहे. स्टालीनने किंवा मावने ठरविले होते, कम्युनिस्ट प्रजा अमुक प्रकारची असावी. त्यातून सैबेरियाचे कँप्स् वा सांस्कृतिक क्रांती जन्मास आली. प्रजेचे जे कांही व्हायचे ते होईल पण मी म्हणतो ते झालेच पाहिजे, असा त्या राजकर्त्याचा आग्रह असतो. शरद पवार तर लोकशाही मानणारे. पण त्यांच्या संभाजी ब्रिगेडचा आग्रह मराठ्यांना मान्य पण ब्राह्मणांना व दलितांना एकदम अमान्य. मुसलमानांनी काफीरांना समतेने वागवू नये, असा कुराणाचा आदेश (फतवा) आहे. तसा बायबलने नॉन-ख्रिस्त्यांना *हेदन्स* म्हटले आहे. एकेकाळी त्यांचा छळही *(ईनक्विझिशन)* केला गेला. आता ते सुसंस्कृत झाले आहेत व जुना आग्रह त्यांनी सोडलेला दिसतो. अपवाद ट्रंपचा. असे ट्रंप्स प्रत्येक देशांत आहेत. ते निवृत्त होत नाहीत. त्यांना खुर्चीवरून खाली खेचावे लागते.

६. समाज सहिष्णु असावा अशी आधुनिक युगाची गरज आहे. परिस्थिती उलट होऊ पाहत आहे. आतंकवाद वाढत आहे. आतंकवाद म्हणजे आत्यंतिक असहिष्णुतता. एकदम *एक्स्लुझिव्ह.* त्याची प्रतिक्रिया तेवढीच आत्यंतिक. ते

आपण सिरीयावर होणाऱ्या बेमुदत बॉबिंगवरून समजून येते. प्रे. ट्रुमनला सांगण्यात आले होते, "हा अणुबॉंब अति संहारक आहे. तो तुम्ही जपान्यांवर टाकू नये व त्यांची लाखो माणसे क्षणार्धात होत्याची नव्हती करू नये." तरीही हिरोशिमा व नागासाकी या बेटांवर ६ व ९ ऑगस्ट १९४५ रोजी अमेरिकेने ॲटम बॉंब्ज् टाकलेच. कारण ते जपानी पिवळ्या चामडीचे होते. गोरे नव्हते. पण प्रे. ट्रुमनने आपला बचाव असा केला: "युद्ध चालू राहिले असते तर जपानी सेनेने हजारो अमेरिकन सैनिक मारले असते. माझ्या अमेरिकन बांधवांचे जीव वाचविण्यासाठी मला हा निर्णय घ्यावा लागला." इंग्रज जनरल डायरने अमृतसरच्या हिंदू-शीखांच्या कत्तलीच्या बाबतीत असाच साम्राज्यशाही बचाव केला होता. इंग्रजी पार्लमेंटने त्याचा सन्मान करून त्याला मोठी पर्स बक्षीस दिली होती. १९१९ साली तेथे शांतता होती, तो युद्धकाळ नव्हता. सांगायचा मुद्दा हा की जिंकणाऱ्या पक्षास विजयाचा माज चढत असतो. तेथे विवेक काम करीत नाही. दारूडा नाही का त्याच्या निष्पाप बायकोस दारूच्या नशेत मार मार मारतो?

७. सोशल सायकॉलॉजीनुसार (सामाजिक मानसशास्त्र) भारतापेक्षा पश्चिमेस त्या शास्त्राचा चांगला विकास झाला आहे कारण तेथे लहान मुलांना चांगले नागरिकत्व म्हणजे काय याचे धडे शाळेपासून दिले जातात. दुबई, कतार, वगैरे आखाती शहरात लहानपणापासून कडक शिस्तीचे धडे दिले जातात. स्वच्छता, रहदारीचे नियम, नागरिक शास्त्राचे नियम या बाबतीत अरब नागरिक भारतीयांपेक्षा बरेच पुढे आहेत. नेहरूंनी ही आद्य कर्तव्ये पाळली असती तर मोदींना स्वच्छतेची मोहीम सुरू करावी लागली नसती. मुले आजूबाजूस पहातात की कायदे मोडले की शिक्षा होते. आपल्याकडे पोलिसांनी पकडले तर दहा रुपये लांच द्यावी, असे पालक मुलांना आपल्या आचरणातून धडे देत असतात. पश्चिमेची श्रीमंती, शिस्त व वेळेचे बंधन हीदेखील मदत करतात. माझे मित्र श्रीधर दामले अमेरिकेत बँकेत काम करीत. त्यांना भेटायला मी बँकेत गेलो. रागावून ते मला म्हणाले, "येथे कां आलात? ही अमेरिका आहे. कामाच्या वेळी येथे असे भेटता येत नाही. माझी नोकरी जाईल." मला भारताची सवय. मी यात काही चूक करीत आहे असे माझ्या मनाला वाटलेच नाही कधी. कारण पाव्हलाव्हच्या कुत्र्याप्रमाणे असे माझे मन कोणी *कंडिशंड* केलेच नव्हते. अशी शिस्त असल्यावर 'नमाज पढण्यासाठी मी मशिदीत जातो,' ही सबब तेथे कशी बरे चालेल? याऊलट, येथे परवानगी दिली नाही तर कदाचित् साहेबाची नोकरी जाईल!

त्रिवेंद्रमला नंबुद्रीपाद माझे पाडोसी होते. मुख्यमंत्र्यांच्या सरकारी घरात न

राहता ते आपल्याच घरात साधेपणाने रहात. मी रोज त्यांच्याबरोबर सकाळची कॉफी घेई. ते एकदा मला म्हणाले, ''निवडणूकीच्या मार्गाने जगातले सत्तेवर आलेले पहिले कम्युनिस्ट सरकार असे ऐकायला सुरवातीला बरे वाटले. आता मी पस्तावतो आहे. रोज संप, रोज नारेबाजी, रोज मोर्चे. असे असल्यावर आमचे कारखाने कसे चालतील? उत्पादन नाही तर संपत्ती निर्माण कशी होणार? संपत्ती नाही तर विकास कसा होणार?'' तोच अनुभव मला पाटण्यात राम मनोहर लोहियांबरोबर आला. ते मला म्हणाले, ''आमच्या हाती सत्ता आली तेव्हा मला कसला आनंद झाला म्हणून सांगू? आम्ही फर्मान काढले, ''आता आमच्या राज्यात कामचुकारपणा चालणार नाही. रोज सहा तास नीट काम केले पाहिजे.'' ते पुढे म्हणाले, ''या लोकांनी काय करावे? त्यांनी जुलुश काढला, ''हम काम नही करेंगे.'' आम्ही फर्मान काढले, ''फिर हम बंदूक चलाएंगे.'' त्यांनी दुसरा मोर्चा काढला. घोषणा होती, ''गोली खाएंगे, लेकिन हम काम नही करेंगे.'' लोहियांनी मला सांगितले, ''मी त्या दिवशी घरी येऊन चक्क रडलो. माझ्या लोकांनी माझा पराभव केला होता. अन्य कोणी नाही.''

जपानची अमेरिकेने लाखो माणसे मारली व उद्योग नष्ट केले. 'त्यासाठी दर वर्षी ६ व ९ ऑगस्टला तुम्ही अमेरिकन एंबसीसमोर मोर्चे का काढीत नाही?' या प्रश्नाला माझ्या जपानी मित्राने जे उत्तर दिले ते मी विसरू शकत नाही : ''केवळ घोषणाबाजी करून वा जुलूस काढून स्वतःच्याच देशात दंगे करणे व देशाचे नुकसान करणे ही ज्यांना वास्तवतेत कांहीच करायचे नाही अशा दुर्बळ लोकांची ओळख आहे. आज अमेरिकन प्रेसिडेंट जपानी टीव्ही वापरतो, जपानी मोबाईलवरून बातचीत करतो व जपानी पेनने सही करतो. यातच आमचा विजय आहे आणि सूडदेखील.''

८. सामाजिक समानता आणि सद्‌भाव हे आदर्श आहेत. आदर्शाबरोबर वास्तवतादेखील बघितली पाहिजे. आदर्शाच्या नावाखाली अस्पृश्यता, घटस्फोट व 'आम्ही आणि तुम्ही' हा भेदाभेद जर घडत असेल तर विचार आणि व्यवहार यांच्यात ही तफावत कां? असा प्रश्न साहजिकच उपस्थित होऊ शकतो. सामाजिक मानसशास्त्रात सामाजिक व मानसिक पातळीवर जे तादात्म्य अनुभवतात त्याला *इन-ग्रुप* म्हणतात. जेथे हा संबंध निर्माण होऊ शकत नाही त्यास *आऊट ग्रुप* म्हणतात. अलगतावाद या आऊट ग्रुप मधून जन्म घेतो. चटकन सामान्य माणूस राजकीय नेत्यास त्याबद्दल दोषी ठरवून मोकळा होतो. प्रत्येक नेत्यास 'आपण काही सामाजिक सुधारणा कराव्यात', असे वाटते. 'चला, आपण जग बदलू या',

असे म्हणणे सोपे आहे. तसे करण्याआधी 'सामाजिक मानसिकता' जाणून घेणे आवश्यक ठरते. प. नेहरूंनी हिंदू कोड बिल आणले, पण त्याआधी लोकांची मानसिकता काय आहे ते जरादेखील चाचपून बघितले नाही. त्यांना तशी गरज वाटली नाही. आपल्या लोकप्रियतेचा त्यांना जरा फाजील आत्मविश्वास होता. प्रत्येक नेत्यास ५ वर्षांचा काळ या सुधारणांसाठी मिळतो. तो नेता पुढच्या निवडणूकीत लोक निवडतीलच अशी खात्री नसते. त्यामुळे आपले नेते 'शॉर्ट कट' शोधून काढतात, उदा. नेहरूंनी घेतलेले सारे काश्मीरमधील निर्णय हे शॉर्ट कटस् होते. तीच गोष्ट संयुक्त महाराष्ट्राची. कधी द्वैभाषिक, कधी त्रैभाषिक. इंदिरेनेदेखील पित्याप्रमाणे शॉट कटस्चा आश्रय घेतला. दोघेही स्वभावाने *'इंपल्सिव्ह'* होते. शॉर्ट कटस् नेहमीच महाग ठरतात. पुढील पिढ्यांना त्यांची किंमत मोजावी लागते.

ब्रेन वॉशिंग

सी-नाव या चिनी शब्दाचा अर्थ ब्रेन वॉशिंग. ते एक शास्त्र आहे. ते जरी प्राचीन असले तरी त्याला विज्ञानाचा दर्जा कालपरवा मिळालेला आहे. त्यास 'चिकाटीने केलेला बलप्रयोग' म्हणता येईल. हेतू एकच. ''छळाने, बळाने, कळीने कंटाळून का होईना, पण माझ्या पक्षात ये, माझ्याशी एकनिष्ठ रहा, मी सांगितलेली तत्त्वे पाळ.'' यात मी महत्त्वाचा, माझा अहंकार आणखी महत्त्वाचा. प्रत्येक जेत्याने पराभूत जित लोकांना आपल्या पक्षात/धर्मात आणण्याचा व त्यांच्यावर आपला प्रभाव पाडण्याचा मनापासून प्रयत्न केला होता. महंमद गझनी व महंमद घोरीने बळ व छळ वापरून भारतात ते प्रयोग केले तसे अरबांनी व तुर्कांनी इराणात व भारतात, हुणांनी युरोपात, रोमन कॅथॉलिकांनी युरोपातील ज्युंवर आणि स्पेनने दक्षिण अमेरिकेतील रेड इंडियन्सवर तसे प्रयोग यशस्वीपणे केले होते. हिंदूंनी आमचा छळ झाला हे सतत रडत बसण्यात काही अर्थ नाही. ब्रेनवॉशिंगची शास्त्रीय सुरुवात १९५० च्या दशकांत चीन्यांनी कोरियात व व्हिएटनाममध्ये केली. मात्र त्या शास्त्राचा विकास करण्याचे श्रेय आधुनिक महासत्तांना (रशिया व अमेरिका) व महासत्ता इच्छुकांना (चीन व भारत) जाते. हिंदू व बौद्ध भिक्षुंनी बळाऐवजी अहिंसेचा वापर करून मध्य व आग्नेय आशियात आपला प्रभाव अनेक शतके कसा टिकविला याचे संशोधन सर्व मोठाल्या आंतरराष्ट्रीय विश्वविद्यालयातून आज होत आहे. त्यांच्या दृष्टीने तो चमत्कार आहे. भारतात साधू त्यांच्या भक्तांना ताब्यात ठेवण्यासाठी व गांधी-नेहरू घराणे त्यांचा कळप एकत्र राखण्यासाठी नेमके काय करतात याचेही तेथे संशोधन चालते. त्याने तात्त्विक मनाचा साचा

बदलण्यास मदत होईल, असे त्यांना वाटते. या शास्त्राचा फायदा प्रचंड आहे, याची त्यांना खात्री पटलेली आहे. आपण त्याचे नीट संशोधन केले तर ट्रिपल तलाक, अयोध्या वा बाबरीसारखे किचकट प्रश्न चटकन् सुटतील. परदेशी शास्त्रज्ञ आम्हास चिडवितात, ''तुम्हाला वेळ साधता येत नाही. तुमच्या हाती चांगले एक लाख सैनिक १९७२ साली सापडले होते. भारत जगातील बेस्ट *सायकॉलॉजिकल लॅबोरेटरी* झाली असती!'' डॉ. दाभोळकर गेले, नाहीतर आसाराम बापूंच्या मानसिक बळींचे मानसिक बदल उलटविण्यात (डीप्रोग्रामिंग) ते आज मग्न असते. त्यांचे अंधश्रद्धा निर्मूलनवाले भक्त आज 'सनातन संस्थे'च्या मागे लागले आहेत. भारत अमेरिका असती तर सरकारने डॉ. आठवल्यांना आतंकवाद्यांचे ब्रेन वॉशिंग करण्यासाठी वापरले असते! काय करणार, हिंदू मानस आडवे येते, नुसती बडबड, काम संस्कृती *(वर्क कल्चर)* नाही.

अ) कोरियन लढाई : कोरियन युद्धात (१९५०-५३) अमेरिकन युद्धकैद्यांचे चीन सरकार ब्रेन वॉशिंग करीत असे. त्यांच्या विचारांचे व आचारांचे चीनी शास्त्रज्ञ मॅनिप्युलेट करीत. त्यासाठी त्यांच्या मनावर ते ताबा मिळवीत. तेदेखील त्यांच्या इच्छेविरुद्ध, त्यांच्या नकळत, त्यांच्या जुन्या निष्ठा विरघळत व ते निराळीच भाषा, निराळेच विचार व्यक्त करीत. १९६२ सालच्या भारत-चीन युद्धानंतर भारतीय युद्धकैद्यांवरदेखील असे प्रयोग होत असत, असे जन. ब्रिज मोहन कौल यांनी *अनटोल्ड स्टोरी* या पुस्तकात लिहून ठेवले आहे. हे काम खूप महागडे असे. अमेरिका करते म्हणून रशिया हा उद्योग करू लागला. पश्चिम जर्मनीत अमेरिकेने साऱ्या नाझी जर्मनांची मने एवढी जिंकली की ते सारे नाझीविरोधी व कोको कोलाप्रेमी बनले. तो मोठा चमत्कार होता. त्याआधी दुसऱ्या महायुद्धात फॅसिस्ट ईटली, नाझी जर्मनी, साम्राज्यशाही इंग्रज व कम्युनिस्ट रशिया यांनी असे प्रयोग त्यांच्या जनतेवर निश्चितपणे केले होते. महायुद्धोत्तर काळात सोव्हिएट युनियनचे प्रचार व मानसिक प्रभाव पाडण्याच्या प्रयत्नाचा वार्षिक खर्च ३.५ ते ४ अब्ज डॉलर्स असे. युद्धविरोधी चळवळींवर केजीबी १ अब्ज डॉलर्स दर वर्षी खर्च करी. मुसोलिनीच्या फॅसिझमकडे व हिटलरच्या नॅशनल सोशॅलिझमकडे अप्रत्यक्षपणे सुभाषबाबू, सावरकर, डॉ. मुंजे, डॉ. हेडगेवार, गुरुजी गोळवलकर, बाळासाहेब ठाकरे वगैरे मंडळी चांगलीच आकर्षित झाली होती. शिवाजी पार्कवरील शिवसेनेच्या सभा भव्यता व दिव्यता यांच्या बाबतीत बर्लीन स्पोर्टपॅलॅस्ट वरील नाझी रॅलींची नक्कल असे. तुताऱ्या व फटाक्यांच्या आवाजासकट!

ब) सीआयए : सीआयए ला साहजिकच उत्सुकता झाली व त्यांनी हे

शास्त्र बरेच पुढे नेले. त्यास आता मनावर ताबा मिळविणे *(माईंड कंट्रोल/इंडॉक्ट्रिनेशन)* म्हणतात. ते तंत्रज्ञान आता सर्रास शाळा, कॉलेजेस, हॉस्पिटल्स्, लष्कर व धार्मिक आश्रम येथे वापरतात. त्याचा चांगला वा वाईट वापर ते कोण वापरते यावर अवलंबून असते. आसाराम बापू व त्यांचा मुलगा आज तुरुंगात आहेत. आकाशवाणी मंत्री विठ्ठलराव गाडगिळांनी ईलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या द्वारा लोकांना मूर्ख कसे बनवायचे, त्याचे बीबीसीचे एक पुस्तकच मला दाखविले होते. त्यांनी ते ब्रिटीश कॉमन्सच्या लायब्ररीतून आणले होते. त्याच्या मर्यादित कॉपीज् होत्या. अमेरिकेच्या फॉक्स न्यूज चॅनलच्या ब्रेनवॉशिंगच्या १४ सूत्रांचे डॉ. सिंथिया बोझ यांचे पुस्तक उपलब्ध आहे. भारतातील परदेशी चॅनल्स् त्यांचा छान उपयोग करताना दिसून येतात. त्यांची ब्रेन वॉशिंग ची १४ सूत्रे पुढीलप्रमाणे :

१. घाबरवून सोडणे : एखाद्याचा *विक पॉईंट* घेऊन त्यावर प्रश्नांचा भडिमार केला की तो माणूस घाबरून जातो. निखिल वागळे मराठी चॅनल्सवर *टेरर* होते व ते या तंत्राचा अवलंब करीत. ही सर्वात प्राचीन व जास्त परिणामकारक पद्धत आहे. माणूस मरणाला फार घाबरतो. ते टाळण्यासाठी तो काहीही करायला तयार होतो. शीख गुरू किंवा संभाजीसारखे वीर मुसलमान होण्यापेक्षा मरण पत्करत, पण ते अपवादात्मक. पूर्वीची सारी बाटवाबाटवी तलवारीच्या जोरावर *(अॅट गन पॉईंट)* झाली. सामान्य व असामान्य यात फरक असणारच. असे असामान्य संख्येने बोटावर मोजण्याएवढे. मत वा मन परिवर्तन सामान्यांचेच करायचेच असते. म्हणून मौलवी वा मिशनरी दलितांना जास्त पसंत करतात, ब्राह्मणास वा क्षत्रियास नाही. तो आर्य समाजात जाऊन 'परत घरी येतो.' (शुद्धी) व्यापारी पैसे खर्च करून सुटून जातो, म्हणजे लांच देऊन बाटविणाऱ्यालाच मूर्ख बनवितो. हे मुसलमान बाटगे पूर्वी पायदलात नोकरी करीत. मुसलमान राजा त्यांना *''फॉडर''*म्हणून वापरी. ते मोठ्या संख्येने कापले जात, त्याचे राजाला फारसे दुःख वाटत नसे. हळदीघाटीच्या लढाईचे उद्‌गार प्रसिद्ध आहेत : ''इस पार या उस पार काफीरही मर रहे है। इसमें इस्लामकीही आखीर फत्ते हो रही है।''

२. चारित्र्यहनन करणे : चारित्र्य असेल तरच त्याचे हनन करणार ना? लालु यादवचे तुम्ही काय चारित्र्यहनन करणार? चारित्र्य ही मोठी दुर्मिळ चीज आहे. गुन्ह्यांची नोंद ठेवणारी फाईल तयार करणे ही कम्युनिस्टांची चाल आहे, ती नेहरूंनी व इंदिरा गांधींनी उचलली. वेळ येताच, रूसी करंजियांच्या *ब्लिटझ्* साप्ताहिकाचे *लास्ट पेज* त्या व्यक्तीचे *लास्ट डेज्* ठरवायला तयार होतेच. आचार्य अत्रे सांगीत, ''घोटाळे माझ्याकडे चालत येतात.'' त्यांचे *स्फुटनिक* सदर लास्ट

पेज ची मराठी आवृत्ती होती. अंतुले कसे निघाले? माधव गडकऱ्यांच्या भ्रष्टाचार्य अंतुले या पुस्तकामुळे. माधवसिंग सोलंकी कसे काढले गेले? माझ्या *सोबत* मधील भ्रष्टाचार्य माधवसिंग सोलंकी या लेखमालेमुळे. गडकऱ्यांना राम नाईकांनी व सनत मेहता या अर्थमंत्र्यांनी मला फायली पुरविल्या होत्या! सनातन संस्थेचा वकील वा नेता हाती सापडला की सर्व अँकर्सना फार आनंद होतो. त्यास उभे-आडवे प्रश्न विचारून घाबरवून सोडणे हा त्यांचा नित्याचा खेळ आहे. पूर्वी भाजपाचा एक व इतर ४-५ जण काँग्रेसवाले, समाजवादी, राष्ट्रवादी, साम्यवादी सभासद (तज्ञ) असत. सारे मिळून त्याचा अभिमन्यू करीत. २०१४ च्या मे नंतर ही परिस्थिती बदलली.

३. **एखाद्याला मोठे करणे** : हा पत्रकारांचा रोजचा खेळ आहे, त्यासाठी त्यांना पैसे मिळतात, मानसन्मान मिळतो, परदेशी दौरे काढता येतात, व शिष्यवृत्त्या मिळतात. पूर्वी ऑक्सफर्ड, केंब्रिज व मॉस्को येथे व आज हार्वर्ड येथील शैक्षणिक कारखान्यात भविष्यातील नेते निर्माण केले जातात. गांधी, जीना, नेहरू, पटेल, सावरकर वगैरे सर्वच्या सर्व नेते *मेड इन इंग्लंड* होते. तशी खास काळजी तत्कालीन ब्रिटीश राज्यकर्त्यांनी घेतली होती. विरोधी सावरकरांना बॅरिस्टरीची सनद नाकारण्यात आली. प्राचीन काळी युरोपात व आशियातील राजे नालंदा विद्यापीठात 'तयार' होत असत. कृतज्ञतेच्या पोटी ही किंमत मोजली जाते, उदा. योगाचार्य बाबा रामदेवांना पतंजली द्वारा मोठे केले जात आहे. पार्शी व बोहरी व्यापाऱ्यांना मुंबई बेटावर इंग्रजांनी राजाश्रय दिला. काँग्रेसवाल्यांनी राहुलला व समाजवाद्यांनी अखिलेशला अक्षरशः डोक्यावर घेतले. (*मदर इंडिया* लिहिणाऱ्या अमेरिकन लेखिका कॅथरीन मेयोस लंडनच्या इंडियन ऑफिसने भारतीयांची बदनामी करण्यासाठी पैसे पुरविले होते, सतरा वर्षांनंतर जोनाथन केप या *मदर इंडियाच्या* प्रकाशकाने *व्हर्डिक्ट ऑन इंडिया* हे निकोलचे पुस्तक प्रसिद्ध केले. हा पठ्ठ्या व्हाईसरॉयच्या घरीच राह्यचा. थॉमस कुक या प्रवासी कंपनीने त्यास फुकट भारतास नेले होते. हा खटाटोप कशासाठी? अमेरिका *भारतास दुसऱ्या महायुद्धानंतर स्वातंत्र्य द्या* असा हट्ट धरून बसली होती. भारताची बदनामी करणे इंग्लंडची गरज होती.)'' मात्र, मीना प्रभु स्वतःच्या खर्चाने जगभर फिरतात व सुंदर पुस्तके लिहतात. कांही प्रवासी कंपन्या टीव्ही मालिकांचा आश्रय घेऊन स्वतःची जाहिरात करतात व गिऱ्हाईके आकर्षून घेतात.

४. **इतिहासाचे पुनर्लेखन करणे** : शिवाजी महाराज हे मराठ्यांचे स्फूर्तिस्थान. त्यांना लहान दाखविले तर मराठ्यांना हांसत चेपता येईल. इंग्रजांनी

तसे प्रयत्न करून बघितले, पण राजवाड्यांसमोर ते टिकेनात. अनुकूल छोट्यांना मोठे करणे व प्रतिकूल मोठ्यांना लहान बनविणे हा राजकर्त्यांचा खेळ सुरू असतो. त्यासाठी न. र. फाटक, य. दि. फडके, बिपीन चंद्र, रोमा थापर, इरफान हबीब व खुषवंतसिंग यांच्यासारख्या इतिहासकारांना पोसावे लागते. त्यांना पदके, पद्मश्रीसारखे मानसन्मान, परदेशी वाऱ्या, संमेलनांचे अध्यक्ष, त्यांची पुस्तके क्रमिक पाठ्यपुस्तके लावणे, दारुच्या बाटल्या (व बाया) पुरवाव्या लागतात. एकदा का त्यांना चैनीची चटक लागली की ते राजकर्ते सांगतील ते लिहावयास तयार होतात. त्यातून शत्रूस कन्हैय्या, बुऱ्हान वाणीसारखे तरुण नेते निर्माण करता येतात. (२४ सप्टेंबर २०१३ रोजी जन, व्ही. के. सिंग बोलून गेले, भारतीय सैन्यास जम्मू व काश्मीरात मंत्र्यांना फंडिंग करावे लागते. त्यावर मोठे वादळ निर्माण झाले. गुडगवा येथे प्रेस कॉन्फरन्स घेऊन त्यांनी सारवासारव केली, ती लांच नसते.) आपल्याकडे कर्णास मोठे करून शिवाजी सावंतांनी खूप नाव व पैसा मिळविला. त्यानंतर संभाजीला 'अच्छे दिन' आले. मग तर 'मोठे करण्याच्या' या साथीच्या बिमारीचा झंझावातच सुरू झाला. ही फॅशन आपण पाश्चात्यांकडून उचलली. त्यांनी पुढील कांही शोध लावून प्रचलित अपसमज बदलण्याचे शर्थीचे प्रयत्न केले :

- शेक्सपियर एक नव्हता, अनेक होते.
- 'पाव नसेल तर केक खा' हे मेरी अँटॉनीने म्हटलेच नव्हते, त्यावेळी ती ऑस्ट्रेलियात होती व फक्त ९ वर्षांची होती.
- हिरोडोटसने पिरॅमिड गुलामांकडून फुकट बांधवून घेतले असे प्रथम लिहले, पण ते खोटे आहे.
- मध्ययुगात संशयी पुरुषांनी स्त्रियांना *चॅस्टिटी बेल्ट* घालणे भाग पाडले, हेसुद्धा खोटे आहे.
- अलेक्झांड्रियाचे ग्रंथालय सीझरने त्या शहरावर हल्ला करण्याच्या किती तरी आधी जाळले गेले.
- ट्रोजनचा घोडा ही होमर कवीची केवळ कल्पना आहे, प्रत्यक्षांत तो कधीच नव्हता.

थोडक्यांत, इतिहास असा 'निर्माण' केला जातो, उदा. संभाजी ब्रिगेड पुरस्कृत ब्राह्मणविरोधी शेकडो पुस्तिका.

५. **बकरा बनविणे** : स्त्रियांवरून बदनाम करणे व एखाद्याचा बकरा बनविणे थेट चाणक्यापासून चालत आलेली पद्धत आहे. चाणक्य या व्यावसायिक

(प्रोफेशनल) स्त्रियांना 'विषकन्या' (बाया वा स्त्रिया नाहीत) म्हणतात. विन्स्टन चर्चिल यात फार हुषार होता. त्याने जनरल आयसेनहॉवरना सोडले नाही. युद्धकाळात त्यांच्या जीपची ड्रायव्हर मिसेस के चर्चिलना रोज सायंकाळी अहवाल पुरवी. लेडी मौंटबॅटन नसती तर हैदराबाद व काश्मीर समस्या नसती. इंदिरेला दिनेशसिंगना वॉर्निंग द्यावी लागली. या विषयावर एक ग्रंथ लिहिता येईल.

६. हिंसाचाराची भीती घालविणे : इस्त्राएल नशिबवान. त्याला असे नेतृत्व मिळाले की त्याने बनियांना हातात बंदूक दिली व ती चालविण्यास त्यांना शिकविली. देशाच्या स्वातंत्र्यासाठी. १९२५ मध्ये डॉ. हेडगेवार रत्नागिरीत जाऊन सावरकरांना भेटले व विचारविनिमय केला. हिंदूंची लढाऊ संघटना निर्माण केली पाहिजे, यावर दोघा नेत्यांचे एकमत झाले. त्यातून पुढे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा जन्म झाला. सावरकर नसते तर संघ जन्मास आला नसता. संघ नसता तर जनसंघ व भाजपा नसता. एखाद्यास गुंडापासून रक्षण देण्यासारखे पुण्य नाही. रामाने व कृष्णाने अयोध्येत व मथुरेत लोकांना राक्षसांपासून अभय दिले होतेच ना? शिवाजीने मराठमोळ्या जनतेस मुसलमानी अत्याचारांपासून वाचविले. म्हणून शिवाजी द ग्रेट. इंग्रजांनी हिंदूंना यवनांपासून अभयदान दिले. एकदा कां अभय दिले की लोक आपणहून 'मागितल्याविण' त्याची भरपाई करतात. म्हणून तर इंग्रजांनी १८५८ ते १९४७ अशी ८९ वर्षे हजार मैलांवरून राज्य केले. ट्रंपला गोऱ्या अशिक्षितांचा पाठिंबा आहे, असे गॅलपने प्रसिद्ध केले. युपीचे महत्त्व तेवढ्यासाठी आहे. बिमारू राज्यांचा तो राजा.

७. धमकावणे : करण थापर त्यात फार हुषार व तिखट जीभेचा होता. बाळासाहेब ठाकऱ्यांनादेखील त्याने सोडले नाही. मात्र, नरेंद्र मोदींनी त्याचे दात खट्टे कर दिये. तो त्यांचे मागे 'मोदीसाब' असे म्हणत पळत होता. ज्यांनी ते केविलवाणे दृष्य पाहिले ते धन्य होत! आता थापरसाहेब 'इंडिया टुडे' वर असतात पण मवाळ स्वरूपात. तीच गोष्ट राजदीप सरदेसायांची. अमेरिकेत ते एनआरआय भारतीयांना मोदींनी केलेल्या गुजरातच्या दंग्यावरील भाष्य विचारू लागले. लोकांनी तेथे त्यांना ठोकायचे तेवढे बाकी ठेवले होते. शिवसेनेने निखिल वागळ्यांना तर किती तरी वेळा पिटून काढले आहे. पुण्याच्या हिंदुत्वनिष्ठांनी अत्र्यांना सोडले नाही तर वागळे अशी कोनसी बडी हस्ती है? 'सोबत'कार ग. वा. बेहऱ्यांनादेखिल शिवसैनिकांनी प्रसाद चाखवला होता! काँग्रेसच्या जमान्यात या मंडळींचा केवढा रूबाब होता. मोदींनी या 'भुकणाऱ्या कुत्र्यांना' 'टेम' केले आहे.

८. गोंधळ उडवून देणे : नेहरू प्रजा समाजवाद्यांना हाताशी धरून

लोकसभेत गोंधळ माजवून मूळ विषयास बगल देत, असे मला हरी विष्णू कामत यांनी सांगितले. त्यांनी नाथ पैना विचारले, "आपण हे नेहरूंचे शिकारी कुत्रे बनण्याचे बंद केले पाहिजे." थंडपणे नाथ पै म्हणाले, "आपल्याला दुसरा काही मार्ग आहे का?" कामतांनी नेहरूंना मदत करण्याचे बंद केले पण ते एकटे पडले. हे शास्त्र आहे व त्याच्या जोरावर या गँगच्या बळावर आठवडेच्या आठवडे मूळ विषय टाळला जाई. हल्ली काँग्रेसने सभेचे कामकाज चालूच द्यायचे नाही, असे नक्की केले आहे. त्यायोगे त्यांना मोदींना जेरबंद केल्याचे मानसिक समाधान मिळते. 'हे तंत्र आम्ही भाजपाकडून शिकलो', असे ते म्हणतात.

९. **सवंग लोकप्रियता** : लोक माझ्या मागे उभे आहेत असा आभास निर्माण करणे दुर्बळ वा आत्मविश्वास नसलेल्या नेत्यांसाठी गरजेचे असते. त्यासाठी ते कितीही खाली वाकावयास तयार असतात, उदा. राजीवची आकाशापर्यंत स्तुती करणारे वसंत साठे किंवा 'इंदिरा इज इंडिया' असे म्हणणारे आसामचे देवकांत बारुआ. त्या मानाने कम्युनिस्ट व जनसंघ/भाजपात असे भाट दिसत नाहीत, हे आश्चर्य आहे. संघात ते भरपूर आहेत.

१०. **दैवीपण लादणे** : त्याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे राम व श्रीकृष्ण, तसेच शिवाजीस शिवाचा अवतार समजणे. पण एखादा नेता स्वार्थासाठी एखादे पाऊल उचलतो, ते चुकीचे ठरते व तो देवत्वाकडून दानवत्वाकडे पोचतो. सतत तीन वर्षे 'सोबत'कार बेहेरे व मी यांनी ब्रेनवॉशिंग ची कसरत केल्यावर बाळासाहेब ठाकऱ्यांना हिंदुत्वाकडे वळवू शकलो. गुरुजी गोळवलकर व अरुण साठ्यांसारखे सनातनी संघवाले यांचा ठाकऱ्यांच्या नावाला सख्त विरोध असून आम्ही यशस्वी झालो. त्यासाठी मला 'सोबत'मध्ये *संघ, जनसंघ व शिवसेना* ही २१ लेखांची प्रदीर्घ मालिका लिहावी लागली. समाजवादी ती पुस्तक रूपाने प्रसिद्ध करावयास तयार होते, पण मी नाही म्हटले. तो काळ शरद पवारांचा सुवर्ण काळ होता. पण १९८६ साली त्यांना राजीव गांधींच्या काँग्रेसमध्ये शिरण्याची दुर्बुद्धी झाली व महाराष्ट्राचा देव दानव बनला. मराठी तरुणांना पवार औरंगझेबाच्या दरबारातील मिर्झा राजे जयसिंग वाटले. पवारांचा पतनकाल सुरू झाला व शिवसेनेचा भरभराटीचा काळ सुरू झाला. ठाकरे महाराष्ट्राचे लाडके दैवत बनले. फक्त पवारांचे वाकडे पाऊल पडले, म्हणून. हे सारे प्रमोद महाजन महाराष्ट्र भाजपाचे तरुण प्रमुख होते, म्हणून. हंसतमुखाने ठाकऱ्यांनी केलेले अपमान गिळायची त्यांची ताकद अचाट होती.

११. **सतत पुनरावृत्ती करणे** : गोबेल्स हा हिटलरचा प्रचार मंत्री होता.

त्याचे पुढील वाक्य प्रसिद्ध आहे : एखाद्या थापेची १०० वेळा पुनरावृत्ती करा, ती सत्य बनते. 'काँग्रेस ही मरायला टेकलेली संस्था आहे, देशास चांगले दिवस पाहिजे असतील तर काँग्रेसमुक्त भारत निर्माण केला पाहिजे', असे पालुपद बेहेरे व नेने (दादूमिया) बाळासाहेबांसमोर सतत तीन वर्षे गात होते. बेहेरे तर गेले पण नेने ते पालुपद मोदींना सुनावीत. मोदी २०१४ ची व २०१७ ची निवडणूक विकासाच्या मुद्यावर जिंकले. विकासाच्या जादूच्या कांडीने मोदींनी पॅन इंडिया ब्रेन वॉशिंग केले. लो. टिळकांनी स्वराज्याची, गांधीजींनी हिंदू-मुस्लीम ऐक्याची, नेहरूंनी जातीयवाद नष्ट करण्याची, इंदिरा गांधींनी 'सीआयएपासून सावध रहा' याची जपमाळा फिरवीत लोकांचे पुनर्शिक्षण करण्याचा सतत प्रयत्न केला. पुढे सेक्युलर तत्त्वप्रणाली वारली व फक्त संधीसाधुपणाचा गोंधळ उरला. त्याचे रूपांतर सावळ्या गोंधळात झाले. २०१४ मे पासून स्युडो सेक्युलरवादास दूर करण्याची प्रक्रिया सुरू झाली.

१२. अतिशिक्षितास पुस्तकी ठरविणे : एखादा विरोधी विचार नेत्यांना घातक असतो. तो विचार सर्वत्र पसरायच्या आधीच तो मारावा लागतो. त्यास 'प्रतिबंधक उपाय योजना' म्हणतात. सर्वात सोपा उपाय म्हणजे त्या व्यक्तीस वेडा ठरविणे. चेंबरलेनने हिटलरचा अनुनय न करता त्यास वेडा ठरवून नाझी चळवळ बंद पाडली असती तर चर्चिलला एवढे मोठेपण मिळालेच नसते. लेनिनशी वाद घालणाऱ्या एम.एन. रॉयना कम्युनिस्टांनी वेडा ठरविले होतेच ना? स्टालिनच्या कम्युनिस्टांचे तंत्र होते : "त्यास वेडा कुत्रा म्हणा व ठार मारा." रामदासांचे पुढील वचन प्रसिद्ध आहे : बुडाला औरंग्या पापी । आचार्य अत्र्यांचा मराठ्यातील मथळा होता : *विनोबा कां वानरोबा?* जास्त उदाहरणांसाठी २०१७ तील संजय राऊत संपादित 'सामन्या'चे अंक किंवा 'नवयुग-मार्मिक'मधील अत्रे व ठाकरे यांचे तुंबळ वाक्युद्ध पहा.

१३. मैत्री हा गुन्हा ठरविणे : 'द मॅन इज नोन बाय द कंपनी ही कीप्स्', अशी इंग्रजीत म्हण आहे. कृष्ण मेननमुळे नेहरूंना अमेरिकन 'टाईम'ने *क्रिप्टोकम्युनिस्ट* मानले. काश्मीरात सगेसोयरे काय बोलतात, काय करतात, यावर हेर खात्याची बारीक नजर असते. सारे कम्युनिस्टस् पाकिस्तानचेच मित्र भासतात, कारण हिंदू काय किंवा मुसलमान काय, त्यांना दोघे सारखेच. ते धर्मच मानीत नाहीत. त्यांनी फाळणीला व ज़ीनांना विरोध म्हणून कधी केलाच नाही. शरद पवारांना संभाजी ब्रिगेडचे 'पॅट्रन गॉड' च मानले जाते. अजूनही 'मटा वा लोकसत्ता' ही दैनिके पवारांच्या खिशात आहेत, असेच लोक मानतात. 'सकाळ' तर भावाचाच, म्हणजे

त्यांचाच.

१४. लक्ष दुसरीकडे वळविणे : तो पहा उंदीर, असे म्हणून आपण छोट्या मंडळींचे लक्ष दुसरीकडे वळवून त्यांचे दुःख कमी करतोच ना? दुर्भिक्ष, महापूर, अतिवृष्टी, टोळधाड, दंगे, आगी वगैरे नैसर्गिक व मानवनिर्मित एवढी संकटे आजूबाजूस आहेत की त्याचा विचार केला की मानवास धडकीच भरावी. पण यशस्वी पुढारी सतत काही ना काही प्रसंग वा उत्सव योजून प्रजेचे लक्ष दुसरीकडे वळवितात व जीवन सुसह्य करतात. नेहरूंनी संघाचा बागुलबुवा त्यासाठी तयार केला, तर 'फॉरीन हँड' हे इंदिरा गांधींसाठी लोकांचे लक्ष दुसरीकडे वळविण्याचे साधन बनले होते. टीव्हीमुळे हे काम सोपे झाले आहे. साऱ्या चॅनल्स परदेशी मिशनऱ्यांच्या हाती आहेत, विशेषतः आर्थिक उलाढाल्या. त्यामुळे करण थापर वा सरदेसाईंसारख्या बदनाम इंग्रजी पत्रकारांना 'इंडिया टुडे' नोकरीत ठेवून घेतो– स्वस्तात. पूर्वी संघीय सरकारी अधिकारी गुरुपौर्णिमेस गुरुदक्षिणेचे पाकीट दुसऱ्या कोणाच्या हाती धाडीत. नोकरी गेली तर काय करा? पोट हा सर्व क्रियाकर्मांचा केंद्रबिंदू आहे.

तंत्र, मंत्र व यंत्र

ते सारे निरनिराळ्या वेळी स्थल-काल-परिस्थितीवर अवलंबून असते. वापरणाऱ्याचा हेतू काय आहे ते महत्त्वाचे ठरते. जसा हेतू, तसे परिणाम.

अ) डॉक्टर्स : रोग वा विकार मिटविणे हे डॉक्टरांचे आद्य कर्तव्य आहे. हिप्नॉसिसने अनेक मानसिक व कधी कधी कांही शारीरिक रोग बरे करता येतात. शिरेत पेंटोथाल चे इंजेक्शन देऊन तीच सिद्धी प्राप्त होऊ शकते. केवळ सत्य माहिती (फॅक्टस्) महत्त्वाची नसते, तुम्ही तिला कसे वळण लावता, कसा अर्थ काढता, ते महत्त्वाचे असते. रोग्यांना पटविण्यासाठी डॉक्टरांना ते स्कील विशेष वाढवावे लागते. ताप कां आला तर चटकन् डॉक्टर सांगतात, 'हवामानात बदल झाल्यामुळे.'

ब) साधू : धर्माचा वापर (कां दुरुपयोग?) भक्तगणांची संख्या वाढविण्यासाठी करणे आवश्यक असते. संपत्ती त्या संख्येवर अवलंबून असते. स्थावर-जंगम मिळून डॉ. झाकीर नाईकांची मालमत्ता १०० कोटी रुपायांची आहे असे ईडीने प्रसिद्ध केले. १७ जून २०११ रोजी पुट्टपार्थी येथे २० लोकांनी ३६ तास मोजणी केली तेव्हा त्यांना ९८ किलो सोने व ११.५६ कोटींची रोकड तसेच ३०७ किलो चांदी प्राप्त झाली. ३० जानेवारी २०१४ रोजी पोलिसांनी तपासानंतर

आसाराम बापूंची १०,००० कोटी रुपयांची मालमत्ता व त्यांच्या मालकीच्या अगणित जमिनी असल्याचे जाहीर केले. खरे म्हणजे सच्चा संन्याशी सर्व सुखाचा, संपत्तीचा त्याग करतो. येथे तर उलटे चित्र दिसते. त्यांना हिप्नॉटिझम जाणणे कां आवश्यक आहे ते आता समजते.

क) राजकारणी : लोकांना गुंगीत ठेवून स्वतः सत्ता, सुख व संपत्ती यांचा अमर्याद उपभोग घेण्यासाठी हा प्राणी जन्मास येतो. त्याच्या लोकांना संमोहित करण्याच्या कलेच्या जोरावर तो संपत्तीचा संचय करतो. संपत्तीतून तो सत्ता विकत घेतो व नंतर सत्तेतून संपत्ती. खरे म्हणजे वाईट मार्गास लागलेल्या प्रजाजनांची मती सुधरवून त्यांना सक्षम व सुदृढ नागरिक बनविणे हे पुढाऱ्यांसाठी कर्तव्य व गरज होऊन बसते. तसे केले नाही तर राज्य करणे अशक्य होईल. हे काम कोणास न दुखावता, टोकाचे बळ न वापरता आपल्या बुद्धीवैभवाच्या बळावर करायचे असते. राजकारणी नादान असतील तर मात्र पंचाईत होते. लोकशाहीत ४-५ वर्षांनंतर नेत्यास निदान बदलता तरी येते. हुकूमशाहीत तो बदल घडविणे अशक्य असते. मांजराच्या गळ्यात घंटा कोण बांधणार, अशी नाजूक अवस्था होते. अमेरिकेप्रमाणे भारतीय घटनेत दोन टर्म्सपेक्षा जास्त वेळ पंतप्रधान वा राष्ट्रपती राहता येऊ नये अशी सुधारणा करणे आवश्यक आहे. पण वाघाला 'तुझ्या तोंडाला दुर्गंधी येत आहे' असे कोण सांगण्याचे धाडस करणार?

ड) शिक्षक : मंद बुद्धीच्या विद्यार्थ्यास चलाख बनविणे हे बऱ्याच वेळा शिक्षकांसाठी मोठे आव्हान असते. ख्रि. पू. ३ ऱ्या शतकात मठ्ठ राजपुत्रास तयार करण्यासाठी विष्णु शर्मांनी *पंचतंत्र* लिहिले. त्यात प्राण्यांवरील गोष्टी आहेत. जगातील सर्व धर्मात व भाषेत या गोष्टी गेल्या व त्यांनी भारताचे नाव मोठे केले. गोष्टींतून ब्रेन वॉशिंगची ही अनोखी पद्धत आहे. म्हणून भारतीयांना कथाकार *(स्टोरी टेलर्स)* म्हणतात.

इ) कामगार पुढारी : उत्पादन वाढविण्यासाठी कामगारांना पुनर्शिक्षण देणे आवश्यक असते. जास्त उत्पादन म्हणजे जास्त कमाई. पण ती धन्यासाठी कां कामगारांसाठी? अडाणी कामगारांना सोप्या शब्दात अर्थशास्त्र समजावणे फार अवघड काम आहे. ब्रेन वॉशिंग हा शब्द ऐकूनच त्यांचे डोके फिरते, म्हणून त्यांना ग्राह्य होईल असा शब्द : पुनर्शिक्षण.

आंतरराष्ट्रीय राजकारण

भारताबाहेरील स्वतंत्र राष्ट्रे ब्रेनवॉशिंगचा कसा उपयोग करतात ते आपण

सुरवातीला पाहिले. यापैकी काही राष्ट्रे व महासत्ता भारतीयांवर कसा प्रभाव पाडतात व त्यांचे ब्रेनवॉशिंग कसे करतात ते आता पाहू :

अ) **ब्रिटन** : स्वातंत्र्योत्तर सुरुवातीच्या वर्षात भारतावर राज्य केले सरदार पटेल व मौंटबॅटन यांनी. नेहरू त्यांच्या पंतप्रधानपदाची मजा चाखत होते. त्यांच्या साथीला होती लेडी मौंटबॅटन. चर्चिलने धाडलेली विषकन्या. गांधी युगातही नेत्यांवर हा प्रयोग चालू होताच. तो सुशासनाचाच एक भाग होता. जेम्स मिलने प्रथम आयसीएस अधिकारी व नंतर नेटीव्ह प्रजा यांचे ब्रेन वॉशिंग केले. त्याने लिहिले, ''चीनी व भारतीय लोक इतरांची नक्कल करण्यात कुशल आहेत. त्यांना स्वतःची बुद्धी नाही.... हिंदू माणसे ढोंगी, लबाड, खोटे बोलण्यात व वागण्यात चतुर, दगलबाज व अंधश्रद्ध आहेत. त्यांच्या तुलनेत अमेरिकेचे रेड इंडियन्स खूप पुढे आहेत. हा देश अत्यंत मागासलेला आहे.'' हेच शाळा-कॉलेजात शिकविले गेले व पूर्वग्रह दुराग्रह बनले. यावर शिक्षणाचे धोरण रचले गेले. मेकॉलेने लिहिले, ''युरोपियन ग्रंथालयाच्या कपाटातील पुस्तकांचा एक कप्पा साऱ्या भारतीय व अरबी पुस्तकांच्या भांडाराच्या बरोबरीचा आहे. संस्कृत साहित्यात आलेली ऐतिहासिक माहिती एकत्रित केली, तरी ती इंग्रजी प्राथमिक शाळेतल्या पाठ्यपुस्तकातील माहितीपेक्षा कमी प्रतीची भरेल. हिंदूंच्या नीतिशास्त्राची अवस्थाही तीच आहे... म्हणून, ही शिक्षित मंडळी रंगाने व रक्ताने भारतीय प्रजा व आम्ही शासक यांच्यात मध्यस्थाचे काम करतील.'' इंग्रजांना भारतीयांचा उद्धार करावयाचा होता. उद्धार म्हणजे नायनाट अशी बहुधा त्यांची कल्पना असावी. हे युरोपियन्स् व इंग्रज पालक सवयीने २० ते ३० टक्के आपली मुले रस्त्यावर बेवारशी म्हणून टाकून देत. त्यांनी भारताच्या नीतीवर भाष्य काय करावे? भारतात समाजवादी व साम्यवादी 'अभ्यासू व विद्वान' म्हणून पुढे आले. कार्ल मार्क्स त्यांचे दैवत. त्याचेही मत निराळे नव्हते. फक्त युरोपात संस्कृतीचा प्रकाश होता, युरोपबाहेर सारा अंधार आहे, असे त्याचे मत होते. वसाहतवादी जनता अपरिपक्व *(इमॅच्युअर)* आहे, क्रांतीसाठी अजून लायक झालेली नाही, तिला आधी सुशिक्षित व सुसंस्कृत करणे महत्त्वाचे आहे, असे मार्क्स म्हणे. इंग्रजांनी भारतीयांचा जो उद्धार (?) केला त्याच्या पायात १९४० सालापर्यंत परत परत छापलेले मिलचे *ब्रिटीश इंडिया* हे पाठ्यपुस्तक व मेकॉलेची मिनिट्स् दडलेली होती.

म्हणून भारताचा उल्लेख युरोपियन विचारवंत *बायकी भारत* (शी इंडिया) असा करीत. भारताच्या ५-६ पिढ्या असल्या पसरविलेल्या अंधश्रद्धांवर पोसल्या गेल्या होत्या. त्यास विष्णुशास्त्र्यांनी 'वाघिणीचे दूध' म्हटले. पं. नेहरूंनीदेखील

१९२८ च्या जानेवारीत गांधीजींना लिहिले, ''तुमचे तथाकथित रामराज्य हे खऱ्या अर्थाने उत्तम राज्य होते, असे मला वाटत नाही. तुम्हाला औद्योगिकरणाचे दोष दिसतात, पण गुण दिसत नाहीत... कधी काळी भारत ज्ञानाच्या शिखरावर होता व पाश्चात्त्यांकडून शिकण्यासारखे काही नाही, हे आपले मत मला मुळीच मान्य नाही.'' गांधीजींना हे पत्र प्रसिद्ध करावयाचे होते, पण नेहरूंनी त्यास लेखी नकार दिला. धर्मपाल म्हणतात, ''२०० वर्षे ब्रिटीश येथे होते. ज्या देशावर त्यांनी विजय मिळविला, त्याची लूट करणे रास्तच होते, असे त्यांना वाटे. भिन्नवंशीय लोकांनी सहकार्याने एकत्र राहावे, ही गोष्ट प्रॉटेस्टंट ब्रिटनला कॅव्हाही पचली नाही. कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट आयर्लंडमध्ये अनेक वर्षे सुरू असलेल्या परस्परांच्या कत्तली, हा त्याचा सबळ पुरावा आहे.'' *(धर्मपाल, डीस्पॅयलेशन अँड डीफेमिंग ऑफ इंडिया)*

ब) अमेरिका : ऑस्कर वाइल्ड हा इंग्रज लेखक प्रथम अमेरिकेस गेला. पत्रकारांनी त्यास विचारले, ''अमेरिकन्स् तुम्हाला कसे वाटले?'' वाइल्ड म्हणाला, ''तुम्ही अमेरिकन्स व्यक्तिपूजक आहात, पण या व्यक्ती तुम्ही गुन्हेगारांच्या गटातून निवडता. तुम्ही बचाव करता, गुन्हा सिद्ध होईस्तोवर प्रत्येकजण निरपराध असतो.'' अमेरिका म्हणजे भांडवलशाही. भांडवलशाही म्हणजे फायदा आणि फायद्यासाठी केलेला उद्योग म्हणजे गुन्हेगारी. नेहरूंना फायदा या शब्दाची नफरत होती. भारतातील अन्नाचा तुटवडा, पाकिस्थानची स्वारी आणि जातीय द्वेष याचा फायदा अमेरिकेने भरपूर घेतला व भारतास रडविले. त्याचा वचपा इंदिरेने हरित क्रांती निर्माण करून घेतला. स्वतःच्या स्वार्थासाठी पश्चिम आशियात अमेरिकेने जो रक्तपात व कत्तली केल्या त्यामुळे आतंकवादाचा भस्मासूर उद्भवला, असा अरब आग्रह धरतात.

क) रशिया : ब्रिटनला रशियाच्या भारतावरील प्रत्यक्ष स्वारीपेक्षा अप्रत्यक्ष वैचारिक आक्रमणाचे भय जास्त वाटत होते. लो. टिळकांसारखे व मोतीलाल नेहरूंसारखे भारतीय आघाडीचे नेते रशियाने विकासाच्या बाबतीत केलेल्या क्रांतीने प्रभावित झाले होते. १९१७ साली भूमीगत कम्युनिस्टस् बाहेर आले व *प्रावदा* पत्र चालू केले. लेनिनने १९१८ साली विरोधी पत्रे बंद पाडली. १९३० ते १९४१ या काळात *बांधकाम* (कन्स्ट्रक्शन) या पत्राद्वारा युरोपात रशियात सुरू असलेल्या घर बांधणीचा एवढा प्रचार झाला की जॉर्ज बर्नाड शॉ, एच.सी. वेल्स व रोमा रोलाँसारखे विद्वानही 'आमच्या देशात कामगारांना अशी घरे कां नाहीत', याची जाहीर पृच्छा करू लागले. रशियाने तेथील लोकांचे अज्ञान दूर करून लोकांना शिक्षित केले, याबद्दल, ते अचंबा व्यक्त करू लागले. १९२२ साली विरोधी लेखकांच्या पुस्तकांची प्रसिद्धीपूर्व तपासणी होई व जरूर पडली म्हणून बंदीचा कायदा करण्यात आला.

प्रचाराच्या धुमधडाक्यात असल्या छोट्या गोष्टींकडे लक्ष द्यायला जगाला वेळ नव्हता. जग रशियाच्या पंचवार्षिक योजनांची प्रशंसा करण्यात मशगुल होते. रशियन कामगार रांगडा पण प्रचंड उत्पादन देणारा आहे, याचे सर्वत्र कौतुक होते. कम्युनिस्टांनी हजारो कुलाक ठार मारले. त्या भयाने लोक साम्यवादी बनले. म्हणजे, त्रास व छळ कमी होईल! दुसऱ्या महायुद्धात व्होल्गा जर्मन्सना देशद्रोही ठरविण्यात आले. स्वतः स्टालीन भयाच्या बळावर राज्य करण्यात मानीत होता. प्रचाराने एखादी चळवळ किंवा क्रांती यशस्वी केव्हा होते? लोक जर सरकारच्या मागे ठाम उभे असतील तर. ते केव्हा तसे उभे राहतात? जेव्हा सरकार त्यांच्या मनात वर्तमानात आशा, विश्वास व खात्री निर्माण करते तेव्हा. रशियाने तसे केले व एक नवा समाज निर्माण झाला. जगाने तो मान्य केला. त्या मागचा बागुलबुवा जगास दिसला नाही. एखाद्या कादंबरीत एखादा घोडा ''हळू हळू'' जात होता असे लिहिले तर सेंसॉरवाले त्यास विचारीत, ''त्याला जलद दौडायला काय झाले?'' पण जगाला या फालतू गोष्टी जाणून घेण्यात रस नव्हता. त्यांना रस होता, काही तरी नवीन क्रांती घडत आहे व ती यशस्वी झाली पाहिजे. १९५० च्या दशकात म्हणून क्रुश्चेव्हने आत्मविश्वासाने बढाई मारली होती की कम्युनिस्ट व्यवस्था लवकरच पाश्चिमात्त्य व्यवस्थेस मागे टाकेल. प्रचाराच्या जोरावर जग मानीत होते की रशिया शांतिप्रिय आहे. लेनिन गेल्यावर त्याचे छोटे छोटे पुतळे व चरित्रे बाजारात आणून *पर्सनॅलिटी कल्ट* निर्माण करण्यात आला. स्टालीनने तो पुढे चालविला. हे सारे विस्ताराने सांगण्याचे कारण हे की नेहरूंनी याची बरोबर नक्कल भारतात केली. १९६२ सालापर्यंत त्यांची सरशी होती. सामान्य माणसासाठी नेहरू देव होते.

वेड्या भारतीयांनी - यात खुद्द लेखकही आलाच - त्यांचे सारे आंधळेपणाने ऐकले. चीनने केलेल्या पराभवामुळे पारडे फिरले. लाल बहादुरांनी १९६५ साली पाकिस्थानचा पराभव करून त्याचा वचपा काढला. ते गेले पण त्या व्यक्तिमहात्म्याचा फायदा इंदिरेने उठविला. बापाचे व मुलीचे मार्ग वेगळे नव्हते. इंदिरा अम्मा बनली. वडील चाचा होते.

१. **विद्यार्थी** : रशियाने बांगलादेशाच्या लढाईसाठी भारतास मदत केली खरी पण एका अटीवर : राजधानीत मध्यभागी डावे विचार शिकविणारे विद्यापीठ तयार व्हावे या अटीवर. इंदिरेच्या आजूबाजूस धर, हकसर वगैरे डाव्या काश्मीरींचे कोंडाळे होतेच. आज ४६ वर्षांनंतर त्याची फळे चाखायला मिळत आहेत. या युनिव्हर्सिटीच्या कॅंपसवर तरुण-तरुणी जेव्हा 'देशाचे तुकडे होवोत' अशा घोषणा देतात, तेव्हा माझ्यासारख्याचे काळीज फाटते. हे डावे विद्यार्थी दाऊद इब्राहीम व

बुऱ्हान वाणीच्या समर्थनासाठी जेव्हा उत्स्फूर्त घोषणा देतात, तेव्हा दुःख होते. दोष त्यांचा नसतो, दोष त्यांना शिकविणाऱ्या डाव्या शिक्षकांचा व त्यांची नेमणूक करणाऱ्या इंदिरा सरकारचा! देशाच्या तरुणांना देशविरोधी कारवाया करण्यासाठी चिथावणी देण्याचा साम्यवाद्यांचा उद्योग पहिल्यापासून आहे. त्यांनी तर सुभाषबाबूंनाही सोडले नाही. गांधीजींना सोडले नाही. या साम्यवाद्यांचे "द्वेष" हे मोठे शस्त्र आहे. देशभक्तांचा द्वेष आणि तिरस्कार व देशबुडव्यांविषयी ओतू जाणारे प्रेम आणि निष्ठा, ही त्यांची वैशिष्ट्ये आहेत. या द्वेषामुळे दंगे व दंग्यांमुळे रक्तपात घडतो.

२. **कामगार** : रशियाची नक्कल करून सारे कायदे कामगारांच्या बाजूने करून नेहरूंनी उत्पादन व त्यांची कार्यक्षमता खच्ची केली. ती सुधरायला मोदी युग यावे लागले. म्हणजे, आपण तीन दशके वाया घालविली.

३. **जनता** : आपण फार कडक शिस्त ठेवायचा प्रयत्न केला तर आपल्याला सत्ताभ्रष्ट व्हावे लागेल, अशी नेहरूंना मनातून भीती वाटत होती. सवंग लोकप्रियतेच्या मागे लागल्याने भारतात ए (अकाऊंटेबिलीटी/जबाबदारी), बी (बोल्डनेस/धैर्य), सी (कॅरॅक्टर/चारित्र्य) व डी (डिसिप्लीन/शिस्त) या गुणांची कायमसाठी वाढ होण्याचे थांबले. असे गुणहीन राष्ट्र सुपरपॉवर व्हायची स्वप्ने पहाते तेंव्हा त्याचे जगांत हसू होते.

ड) चीन : पुढाऱ्याने कोणावर आंधळा विश्वास टाकला की कशी त्रेधातिरपीट उडते हे पहावयाचे असेल तर नेहरूंचा १९६२ च्या आधीचा व नंतरच्या काळाचा अभ्यास करावा. त्यावेळी नेहरूंनी प्रे. केनेडींना लिहिलेली दोन पत्रे खरोखर दयनीय आहेत. ती वाचताना नेहरूंची दया येते. त्याचा प्रत्यक्ष परिणाम इंदिरा गांधी संशयी बनण्यात झाला.

१. **विद्यार्थी** : १९६२ च्या युद्धामुळे चीनने भारतीयांची सहानुभूती गमावली. त्यावेळी श्रीलंका सोडली तर नेहरूंच्या तटस्थ (नॉन अलाईंड) राष्ट्रांपैकी कोणीही भारतास मदत केली नाही. ती राजीव, वाजपयी व मोदी यांनी परत आणण्याचे कितीही प्रयत्न केले तरी 'जो बुंदसे गयी वो हौजसे वापीस नही आयी.' ठराविक लोक सोडले तर अजूनही सीपीआय(एम)वर सामान्य भारतीयांचा अविश्वास कायमच आहे. माववादी व नक्षलाईटस् यांच्या आतंकामुळे तो अविश्वास द्विगुणीत झाला आहे. कामगार व जनता आजही चीनविरोधी आहे पण चीनचा स्वस्त माल ते लोक सर्रास वापरतात. कारण राष्ट्रवादाचा अभाव.

ई) पाकिस्थान : पाकिस्थान नियमितपणे हिंदूंवर याचा प्रयोग गेली ७० वर्षे करीत आहे. तेथील मुसलमानांना हिंदू हे उपरे व पाकिस्थानला एकनिष्ठ नाहीत

हे पटवून देण्यांत पाकी नेते यशस्वी ठरले आहेत. ते पटल्यामुळेच तेथील हिंदूंची हकालपट्टी अधिकृतपणे व सुरळितपणे होऊ शकली. हा प्रयोग शाळेतील पाचव्या इयत्तेपासून *(कॅच देम् यंग)* सुरू होतो. इंग्रजांनी हिंदूंना छान वागविले व मुसलमानांवर अत्याचार केले, हिंदू आपले शत्रू आहेत, त्यांना पाकिस्थानास नष्ट करावयाचे आहे, वगैरे शिकविले जाते. भारताने पाकिस्थानाचा विकास होऊ नये यासाठी पाणी अडविले आहे व पाकिस्थानाचा एक भाग - काश्मीर - बळकावला आहे, असेच पाकी साडेचार कोटी मुलांना शाळेच्या पाठ्यपुस्तकातून शिकविले जाते. १९६५ चे युद्ध पाकिस्थानानेच जिंकले असा तद्दन खोटा इतिहास शिकविला जातो. तेथे पाकिस्थानचा इतिहास ७१३ साली महंमद बिन कासीमने सिंध जिंकला तेथून सुरू होतो. ८ व्या इयत्तेत शिकविले जाते : "हिंदू वंशवाद मानणारे आहेत, त्यांना सर्व अहिंदूंना या जगातून नष्ट करावयाचे आहे." म्हणून पाकिस्थानास इस्लाम वाचविण्यासाठी जिहाद पुकारावा लागतो. अशा रीतीने ब्रेन वॉश झालेले पाकिस्थानी तेथील हिंदू, बौद्ध व ख्रिस्ती यांना शत्रू समजून त्यांचा छळ करतात. त्यांना बाहेर हाकलतात. सुदैवाने, भारतीय मदरसा व मुस्लीम शाळा कॉलेजातून असले विपरीत ज्ञान विद्यार्थ्यांना दिले जात नाही.

१. पाकिस्थानी विद्यार्थी : १९७० च्या दशकात पाकिस्थानात आयुब-खानांची लष्करी राजवट आली व त्यांनी पाकिस्थानात विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात इस्लामी तत्त्वे घुसडली. जीना पवित्र व सनातनी मुस्लीम म्हणून सादर करण्यात आले व हिंदू आणि भारत यांचा द्वेष करण्याची शिकवणूक चालू करण्यात आली. ह्या प्रक्रियेची (पाकिस्थानची तत्त्वप्रणाली) सुरुवात १२ एप्रिल १९५९ रोजी आयुबने सुरू केली. त्यासाठी प्रत्येक पाकिस्थानी नागरिकाने व सैनिकाने आपले प्राण अर्पण केले पाहिजेत. हिंदू व मुसलमान यामधील फरक व त्यातून होणारा पाकिस्थान या संकल्पनेचा जन्म पाकिस्थानासाठी अति महत्त्वाचा आहे. इस्लाम हा या राष्ट्राचा प्राण आहे, तो सर्वांना बांधून ठेवतो.

१९७१ नंतर पाकिस्थानला धर्म तोच असला तरी संस्कृती व भाषा वेगळी असल्याकारणाने पूर्व पाकिस्थान आपल्याला सोडून गेले, हे शिकविणे अवघड पडू लागले.

२. काश्मीरातील दलाल : हिझबुल मुझाहिद्दीनचा सध्याचा कमांडर व बुऱ्हान वाणीचा वारस झाकीर रशीद भट (मुसा) याचे पाकिस्थानाने संपूर्णपणे ब्रेनवॉशिंग केले आहे. २०१७ च्या जुलैत त्याने काश्मीरी तरुणांना त्याने एका १२ मिनिटांच्या व्हीडीओच्यामार्फत सांगितले, "हुरियतची लढाई सेक्युलर नाही, तसेच

काश्मीरी स्वातंत्र्य किंवा राष्ट्रवादासाठीही नाही. असे कोणी सांगीत असेल तर त्यावर विश्वास ठेवू नका. भारतीय पोलिसांवर तुम्ही दगडफेक करा. तुम्ही दगडफेक केली की इस्लाम स्टेटला मदत होते. एके दिवशी काश्मीरात आयएसचा झेंडा फडकणार आहे." झाकीर मुसाने हुरियतला भले शिव्याशाप दिले असतील, पण अलगवादी हुरियत नेते सैय्यद अली शाह गीलानी व मिर्वाझ उमर फरूख आणि जेकेएलएफचे यासीन मलिक हे सारे काश्मीरी नेते तरुणांना भडकावतात, दगडफेक करायला चिथावतात व त्या दगडफेकीला इंतिफाद (आझादी/स्वातंत्र्य) मानतात. ते मुसाप्रमाणेच काश्मीरी मतदारांना येत्या राज्य व केंद्रीय निवडणुकांवर बहिष्कार टाकण्यास फर्मावतात. बुऱ्हान वाणीप्रमाणे वारस मुसा आयएस स्टाईलप्रमाणे आपला संदेश लोकांपर्यंत व्हीडीओच्या, व्हॉटस ॲपच्या व सोशल मिडियाच्या माध्यमातून पोचवायला शिकले आहेत. थोडक्यात, आयएसच्या ह्या काश्मीरातील दलालांनी - बुऱ्हानी व मुसा - भारत व भारताची सेना यांच्याविरुद्ध यशस्वीपणे जिहाद पुकारला आहे.

चीन जास्त सावध व हुषार आहे. त्याचे इंटरनेट, व्हॉट्स ॲप वगैरे सारी सिस्टीम निराळी आहे. चीनच्या बाहेर संदेश जातच नाहीत. काश्मीरमध्ये संदेश वहनावर नियंत्रण घालणे आवश्यक आहे. काश्मीरच्या बाबतीत नेहरूंनी चूक केली, मान्य आहे, पण ७० वर्षांत एकाही नंतर आलेल्या पंतप्रधानास व राष्ट्रपतीस ती चूक सुधारता येऊ नये? अजून वेळ गेलेला नाही, ती चूक सुधारता येईल. कशी ? खालील मुद्दे वाचा व विचार करा :

- स्वायत्तता (ऑटोनॉमी) फक्त काश्मीर घाटीच्या मुसलमानांना पाहिजे आहे. जम्मू व लेह येथील लोकांना ती नको आहे. ३७० कलमाचा आधार घेऊन काश्मीरमधील सत्ताधीशांचा लेह व जम्मूविरुद्ध सत्तेचा दुरुपयोग चालूच राहणार.
- जम्मूत १५ लाख लोकांसाठी लोकसभेत एक प्रतिनिधी दिल्लीत धाडला जातो. काश्मीरात ते प्रमाण ११ लाखांसाठी एक खासदार असे आहे.
- २००८ च्या विधानसभेच्या निवडणुकीत जम्मूत ३०,८४,४१७ लोकांनी ३७ आमदार निवडून दिले. याउलट, काश्मीरात ३२,६०,६६३ मतदारांनी ४६ आमदार निवडून दिले. हे व्यस्त प्रमाण कां झाले? एकच कारण. ३७० कलमाची जादू (सामर्थ्य). दुसऱ्या शब्दात, शेख अबदुल्लांची दादागिरी किंवा लहान भावाचे लाड पुरविणे.

- काश्मीरात मुसलमान १९४७ साली ८५ टक्के होते. हिंदू कमी कमी करत आता ५८ टक्क्यांवर आला आहे. उद्या कदाचित तो शून्यावर येईल. नव्हे, तसे ध्येयच आहे. घाटी त्यांना हिंदू मुक्त करायची आहे. १०० टक्के मुसलमानी प्रदेश. मग प्लेबिसाइटची मागणी. त्यानंतरची पायरी पाकिस्थानात विलीनीकरण. त्यानंतर जम्मू हिंदुमुक्त करणे. आणि लेह बौद्धमुक्त करणे. मग पाकीकरण ताकदीच्या जोरावर!
- दोन्ही प्रदेश समरस (होमोजिनीअस) नव्हते. जम्मूत काही विभाग असे आहेत की तेथे मुस्लीम बहुसंख्यांक आहेत. लडाखमध्येदेखील कारगील विभागात शिया मुसलमान बहुसंख्यांक आहेत. इतरांत सुन्नी व बौद्ध आहेत. जम्मू व लेह यांनी स्वायत्तता समजा मागितली तर त्यामुळे इतर कटकटी व डोकेदुख्या सुरू होतील. त्या त्या छोट्या उपविभागांना स्वायत्तता दिली तर त्या कटकटी दुप्पट वाढतील.

३. काँग्रेस : काँग्रेसने कायम सत्तेत राहण्यासाठी राष्ट्रवादी व सच्चे देशभक्त यांचा द्वेष करावयास शिकविले. त्या द्वेषाचा परिणाम आज पहावयास मिळतो. भारतीयांचे ब्रेन वॉशिंग करण्याच्या प्रक्रियेत पहिले नाव सावरकरांचे येते. अंदमानातील निर्ढावलेल्या गुन्हेगारांचे व रत्नागिरीत सनातनी हिंदूंचे मोठ्या यशस्वीपणाने त्यांनी पुनर्शिक्षण केले. त्यामुळे काँग्रेसच्या नेत्यात धडकी बसणे स्वाभाविक होते. भयाने, अज्ञानाने वा सूडबुद्धीने नव्या पिढीस क्रांतिकारक व त्यांचे मुकुटमणी सावरकर यांची ओळख होऊच नये अशी काँग्रेसी नेत्यांनी तरतूद केली. आज अशक्य वाटणारी समाजसुधारणा सावरकरांनी त्या काळांत रत्नागिरीसारख्या सनातन्यांच्या बालेकिल्ल्यांत घडवून आणली. पण शाहू-फुले-आंबेडकरांच्या महाराष्ट्रात याचा उल्लेखही सहसा कोणी करीत नाही. महाराष्ट्रातील तमाम सरस्वतीचे उपासक त्यांच्या साहित्यसेवेविषयी मूग गिळून बसतात. रबरी झालेल्या आमच्या शरीरात सावरकर पोलादी कणा घालण्याचे अशक्य काम करू पहात होते, म्हणून त्यांचा मुक्त कंठाने गौरव करताना अजूनही आमची जीभ चाचरते. या बाबतीत काँग्रेसने हिंदू महासभा व संघ यांच्यात जाणूनबुजून दुरावा निर्माण केला. त्याची कथा अतिशय मनोरंजक पण वास्तव आहे. तेवढीच वेदना देणारीही. तेथे दया माया नाही.

४. पुनर्शिक्षण (ब्रेन वॉशिंग) : या पूर्वी कधी नव्हती अशी अनुकूल परिस्थिती हिंदूंसाठी जगभर निर्माण झाली आहे. त्याचा फायदा आता हिंदूंनी उठविलाच पाहिजे. गीतेने हिंदूंना एक मोठा धडा शिकविला आहे : उद्धरेत् आत्मन्

आत्मानम् । कठिण समय येता कोण कामास येतो? हे हिंदू माणसा, सुरुवात तर कर. यश तुझ्या बाजूने आहे. यशासारखे दुसरे कोणचेच यश नाही. केल्याने होत आहे रे । आधी केलेच पाहिजे ।। हिंदूंनी आता नॉनहिंदूंचे सुरुवातीचे पुढील सहा सूत्री पुनर्शिक्षण करण्याची वेळ आली आहे : (भारतीय शास्त्रात सूत्रांचे फार महत्त्व आहे, उदा. पतंजलींची सूत्रे, पाणिनीची सूत्रे, वगैरे. सूत्रे जगभर लोकप्रिय आहेत. सुटसुटीत व लक्षांत ठेवायला सोपी. ही दादूमियांची सूत्रे पुढील दशकभर तरी महत्त्वाची राहतील.)

अ. मुसलमानांसाठी :

१. नो ट्रिपल तलाक (समान नागरी कायदा).

२. नो बुरखा.

३. नो बळाने वा पैसे देऊन धर्मांतर.

४. येस वंदे मातरम्.

५. येस ध्वज वंदन.

६. येस कुटुंब नियोजन.

काही दिवस आतंकवादी हल्ल्यांचे प्रमाण यानंतर वाढेल. ते घाबरविण्यासाठी असेल. त्याने काहीच फायदा होत नाही व त्यास माध्यमात प्रसिद्धी मिळत नाही, हे पाहिल्यावर ते प्रकार अजिबात बंद होतील. एकदा का त्याचा फायदा समजला की विरोधदेखील बंद होईल. हे करीत असताना मुसलमानांना चिथावणी देणाऱ्या नतद्रष्ट हिंदूंना आधी आत टाकावे लागेल. लक्षात ठेवा, तो त्यांचा आर्थिक प्रश्न असतो, त्यासाठी त्यांना पैसे मिळतात.

ब. ख्रिस्त्यांसाठी :

१. नो फॉरेन मिशनरीज्.

२. नो फोर्स्ड कन्व्हर्जन्स्.

३. नो फॉरेन नेम्स्.

४. नो ट्रक विथ इनसर्जंटस्.

५. येस मदर इंडिया लॉयल्टी.

६. येस फॅमिली प्लॅनिंग.

८. नामर्दपणा पुरे झाला

पेशवाईतील रास्त्यांसारख्या ब्राह्मण सरदारांच्या ताकदीच्या गोष्टी आपण खूप वाचल्या व ऐकल्या. म्हणून इंग्रजांनी ब्राह्मणांचे ब्रेन वॉशिंग केले व त्यांचा आखाडा बंद केला. इंग्रजी *हिडन अजेंडा* होता क्रांतिकारकांच्या जन्मस्थानांवर बंदी घालणे. गोखल्यांना दक्षिण आफ्रिकेत धाडून गांधीजींना भारतात *मारो काटो* कार्यक्रम बंद पाडण्यासाठी आमंत्रण देणे, हे त्याच्या पुढचे पाऊल होते. सत्य व अहिंसेचा प्रचार हे तिसरे पाऊल. जे कार्यक्रम करू त्याची आधी जाहिरात करू, याचे नाव सत्य. गोऱ्यांचे पवित्र रक्त भूमीवर सांडणार नाही, त्याचे नाव अहिंसा. इंग्रजी पेपर्सचे माहात्म्य पद्धतशीरपणे वाढविण्यात आले. 'टाईम्स'मध्ये छापून आले आहे ना, म्हणजे ते खरे, अशी समजूत करून देण्यात आली. महात्मेपण अशा रीतीने इंग्रजी पेपर्समधून वाढविण्यात आले. ''क्षत्रियांनो, आम्हीदेखील एके काळी राज्य केले होते, थेट अटकपर्यंत भरारी मारली होती, आमच्यातदेखील क्षात्र बळ होते,'' अशी मर्दुमकीची ब्राह्मणांची भाषा सत्य व अहिंसेने पार लुळीलंगडी करून टाकली. इंग्रजांच्या ब्रेन वॉशिंग च्या शास्त्राचा तो विजय होता.

ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर वाद निर्माण करून समाजातील या दोन महत्त्वाच्या घटकांतील समतोलपणा त्यांनी घालविला. त्या आधी १८५७ मुळे सावध झालेल्या त्या शत्रूने हिंदू व मुसलमान यांच्यात सर सैय्यद अहंमदांच्या द्वारा तेढ लावून दिली. जातीय दंग्यांच्या निमित्ताने मुसलमानांचे शौर्य व क्रौर्य जास्त आहे असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला गेला. त्यात इतिहासात कच्चे असलेल्या महात्म्याने काडी लावली, *''अ हिंदू इज ए कॉवर्ड अँड अ मुसलमान, ए बिगट.''* आमचे पढतमूर्ख तेवढेच धरून बसले. त्यांच्यासाठी लो. टिळकांनी शिवाजी व गणेश उत्सव चालू केले. मेळ्यातून मर्दपणा दुमदुमू लागला. त्यातून क्रांतिकारक निर्माण झाले. होळ्या पेटल्या. विलायती कापडास कोणी शिवेना. इंग्रजी शाळा-कॉलेजांना समांतर अशी राष्ट्रीय शाळाकॉलेजे उभी राहिली. इंग्रजांचे धोरण होते. मर्दपणा वर येऊ पहात आहे? लगेच त्यावर घाला घातलाच पाहिजे. 'सत्य व अहिंसे'चा जन्म त्या हल्ल्यांचा एक भाग. सत्याग्रह हा दुसरा भाग. घोषणा दिल्या, प्रातःफेरीत भाग घेतला की झालात तुम्ही देशभक्त. त्याच्या पुढचा भाग 'चरखा चला चला के'चा. मर्दपणा नामशेष करण्याचा दुसरा उत्तम मार्ग नाही. रक्त सांडायला नको, फांसावर चढायला नको. त्याच्या पुढची पायरी क्रांतिकारकांची हेटाळणी करणे. दुसऱ्या महायुद्धात सावरकरांनी सैन्यात जा, युद्धशास्त्र शिकून घ्या व मर्दपणे जगा, असा प्रचार केला. त्यांना पदवी कोणची मिळाली? स्वातंत्र्यवीर नाही, रीक्रूटवीर! मर्दपणा? शिव शिव, नाव घेऊ नका. तो इंग्रजी रणनीतीचा विजय होता.

मर्दपणा शिकविणारे शेवटचे आधुनिक क्रांतिकारक म्हणजे बाळ ठाकरे. दल, संघ व शिवसेनेच्या शाखेतील युवकांची तुलना होणे अपरिहार्य आहे. त्यावर एके काळी मी 'सोबत'मध्ये २१ लेखांची मालिकाच सादर केली होती. सेवा दलाच्या मुलामुलींना 'करायला पायजेल आहे' सारखी यशवंती बुळबुळीत भाषेचा वीट आला होता. संघाच्या मुलांची कृतिशून्य संस्कृतप्रचुर शिष्ठ भाषा लोकांच्या चांगली परिचयाची झाली होती. त्यामुळे संघाचे भूतपूर्व बौद्धिक प्रमुख पु. ग. सहस्त्रबुद्धेही त्या कोरड्या पण वांझ संस्कृतीला विटले होते. त्यावर पु. भा. भाव्यांचे निरीक्षण पुढीलप्रमाणे : ''हातावर हात आणि लाठीवर लाठी आपटत गेली ४० वर्षे स्वस्थ बसलेली युवकांची इतकी मोठी संघटना जगात अन्यत्र कोठेही नसेल.'' याउलट शिवसैनिकांचे मोर्चे, आंदोलने, घेराव, बंद असले सक्रिय उद्योग (काहींच्या मते चाळे) लोकांच्या आकर्षणांचा विषय बनले होते. त्याचे सारे श्रेय ठाकऱ्यांच्या लढाऊ व चिथावणीखोर भाषणानांच द्यावे लागेल. तोडा, फोडा, झोडा अशा आक्रमक वाक्प्रचारांचा सतत उपयोग करणे, हे त्यांचे वैशिष्ट्य होते. त्या झुंडशाहीच्या जोरावर समस्या चटकन सुटायच्या, प्रश्न मार्गी लागायचे. संघाच्या ब्राह्मणी व सोवळ्या संस्कृतीत ते बसू शकत नव्हते. म्हणून त्यासाठी 'बजरंग दला'ची निर्मिती करावी लागली. गुरुजींच्या विचारांवर रोज वादविवाद होत. मात्र, संघाने आपला धाक म्हणून कधी निर्माण केला नाही. याउलट, ठाकऱ्यांविरुद्ध कोणी काही बोलेल काय, बोललाच तर कानाखाली आवाज काढणे, अशी शिवसेनेची संस्कृती होती. शिवाजी, पावभाजी अशी कोणा लेखिकेने हेटाळणी करताच सैनिकांनी तिचे लेखन कायमचे बंद करून टाकले. शोभा डे आणखी काही स्वानुभव सांगू शकतील. पण महाराष्ट्राला हा मर्दपणा पसंत होता, त्याला तो भावला होता. बाळासाहेबांची भाषा 'सामन्या'ने नेत्याच्या अनुमतीने पुढे चालविली पण तिचा आक्रस्तळेपणात रूपांतर होताच लोकांनी ती नाकारली. बाळासाहेब गेल्यानंतर शिवसेनेचा एवढ्या झपाट्याने ऱ्हास होईल असे कोणालाच वाटले नव्हते. *कालाय तस्मै नमः।।*

लक्षात ठेवा, सर्जिकल स्ट्राईक व नोटबंदीनंतर काश्मीरमधील पाकी हल्ले कमी झाले.

सरते शेवटी

२०१४'नंतर २०१७ मध्ये मोदींना निवडणुकीत घवघवीत यश मिळाले. त्यांनी कृतिशून्य व फक्त बडबड करणाऱ्या सर्व स्पर्धकांना अक्षरशः लोळविले.

त्यांनी जणू २०१९ च्या निवडणुकीची पूर्वतयारी म्हणून योगी आदित्यनाथांना युपीचे मुख्यमंत्री बनविले. या दणदणीत पार्श्वभूमीवर आता तरी हिंदूंनी जागे व्हावे व ख्रिस्ती आणि मुसलमानांचे पुनर्शिक्षण (ब्रेन वॉशिंग) करावे, अशी वेळ आली आहे. ते दोघे वेगळे पण उघड उघड आमचे ब्रेन वॉशिंग करतात, तर आपण त्यांचे पुनर्शिक्षण (री-एज्युकेशन) करायला काय हरकत आहे? ब्रेन वॉशिंग शब्दाची भीती वाटत असेल तर पुनर्शिक्षण हा जास्त चांगला शब्द आपण वापरू या. जसे अस्पृश्यास प्रथम हरीजन व नंतर दलित म्हणू लागले. काश्मीरचे उदाहरण देतो, म्हणजे विषय चटकन समजेल.

सार्‍या भारतभर भारताची घटना चालते. त्या घटनेने कोणाचे स्वातंत्र्य धोक्यात आले आहे काय? कोणच्याही राज्याने वा तेथील लोकांनी तशी तक्रार आजवर केलेली नाही. त्या सर्व राज्यांत सर्वांचे मूलभूत हक्क (फंडामेंटल राईटस्) व्यवस्थित सांभाळले जात आहेत ना? त्यांचे स्वातंत्र्य, त्यांची ओळख, त्यांची संस्कृती अबाधित राहिली आहे ना? बंगाल, महाराष्ट्र व पंजाबचे स्वातंत्र्य जर त्या घटनेखाली व्यवस्थित राखता येणे १-२ वर्षे नाहीत तर ७० वर्षे शक्य आहे, तर ती घटना काश्मीरची भाषा, संस्कृती व स्वातंत्र्य कां बरे सांभाळू शकणार नाही? त्यासाठी काश्मीरला वेगळी घटना कशाला पाहिजे? काश्मीरच्या राजपालाचे नाव बदलून सदर-ई-रियासत केले. त्याने काही बिघडले नाही. बस्स, तसे आता काश्मिरी घटनेचे नाव बदला व तिच्या जागी भारतीय घटना ठेवा. त्याचेच नाव पुनर्शिक्षण. त्याने सारे भारतीय एकत्र येऊ शकतील व त्यांच्यातील बंधुत्व वाढीस लागेल. या अलगतेस, या फुटीरपणास खतपाणी आपण कशाला घालायचे? महाराष्ट्रात वा गुजरातेत काय आझादी नाही? काश्मीरची आझादी इतर राज्यातील आझादीपेक्षा काय निराळी असते? आजवर भारताने १९८९-९० ते २००९-१० या कालखंडात काश्मीरवर रु. ९५,००० कोटी खर्च केले आहेत. हजारो भारतीय सैनिकांनी आपले रक्त काश्मीरसाठी सांडले आहे. भारतीयांचे व काश्मीरी माणसाचे रक्त एकच असते ना? काश्मीरात एकदा महापूर आला, एकदा भूकंपामुळे खूप नुकसान झाले. दोन्ही वेळा भारतीय सैन्याने काश्मीरी माणसांना अगदी हुरियतवाल्यांना देखिल वाचविले. याची काही कदर तर कराल की नाही?

आज सर्वत्र आपण आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करतो. अज्ञानी काश्मीरी माणसाच्या मेंदूत काही विकृती काश्मीरच्या काही जुन्या नेत्यांनी घुसविल्या आहेत. आता आधुनिक मानसशास्त्रीय तंत्रज्ञानाचा वापर करून आपण काश्मीरच्या मनावर ताबा ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे व या पुनर्शिक्षणाच्या कार्यक्रमातून

आपण शंकराचार्यांच्या काश्मीराचे तनमनधन खर्चून योग्य ते संरक्षण केले पाहिजे.

बरबादी नाही तर आझादी. आणि त्या आझादीसाठी कोणास स्मराल? ज्याने आम्हास प्रथम हिंदूत्वाचे शास्त्रीय धडे शिकविले त्या वीर सावरकरांना. त्या महात्म्याने आम्हास विज्ञानाचे महत्त्व सांगितले व जगात भारत अद्ययावत् असावा अशी इच्छा व्यक्त केली. आज अमेरिकेत वा जगांत आम्हास जो मान सन्मान मिळतो तो आमच्या तरुण शास्त्रज्ञांमुळे. सावरकरांच्या ब्रेन वॉशिंग क्षमतेची शत्रूंना व मित्रांना तेवढीच भीती वाटली, आजही वाटते. त्यांनी आम्हास सांगितले:

''मलाही वल्पना करू द्या. माझे गाणे मला गाऊ द्या.''

''या जगात जर हिंदूत्वाचे मानाचे राष्ट्र म्हणून जगायचे असेल - तसा आपला अधिकार आहे - तर ते राष्ट्र हिंदू ध्वजाखालीच स्थापन झाले पाहिजे. या पिढीत, नाहीतर पुढच्या पिढीत माझी ही वल्पना खरी ठरेल. माझी वल्पना खोटी ठरली, तर वेडा ठरेन मी. पण माझी वल्पना खरी ठरली, तर प्रोफेट ठरेन मी. माझा हा वारसा मी तुम्हाला देत आहे.'' *(टिळक जयंतीच्या निमित्ताने पुण्यात १ ऑगस्ट १९३९ रोजी केलेल्या भाषणातून)*

■■■

भारतीय मुसलमान

इतिहासाचे भूत

युनान-ओ-मिश्र-ओ रोमा सब मीट गये जहाँ से
अब तक मगर है बाकी नाम-ओ-निशान हमारा ।
कुछ बात है के हस्ती मीटती नही हमारी
सदियों रहां है दुष्मन दौर-इ-झमन हमारा ॥

ग्रीक, इजिप्शिअन्स् आणि रोमन सारे या जगातून अंतर्धान पावले. पण आम्ही येथे अजून कायम आहोत, नक्कीच आमच्यात कांही तरी खास आहे, म्हणून आम्हाला कोणी पुसू शकत नाही, भले सारे जग कित्येक शतके आमच्याविरुद्ध ठाकले आहे.

कोठे ती जीना-इकबाल सारख्या सशक्त व समर्थ नेत्यांची पिंढी आणि कोठे आजच्या नवाझ शरीफ व इमरान खान सारख्यांची लोभी व लांचखाऊ पिढी! त्यांना पाकिस्थान हे राष्ट्र मुसलमानी देशात अग्रगण्य असावे असे मनापासून वाटत होते. भारतीय मुसलमानांना मात्र पोरके व अनाथ झाल्यासारखे वाटत होते. ना शिक्षण, ना संख्या, ना सत्ता.

जोपर्यंत चंद्रसूर्य आकाशात झळकत राहतील तोपर्यंत हिंदू तथाकथित मुसलमान वीरांनी इतिहासात केलेले अत्याचार विसरू शकतील असे वाटत नाही. या गौतम बुद्धाच्या 'अहिंसे'च्या भारत देशात इस्लाम स्वीकारण्यास नकार देणाऱ्यांची सरसकट कत्तल करणाऱ्यांना हिंदू कसे बरे माफ करू शकतील? या मुडद्यांचे

मनोरे उभे करायचे व 'गाझी' पदवी मिळवायची? याला बाबर व अकबरसुद्धा अपवाद नव्हते. त्या अकबराला अशोकाप्रमाणे ''द ग्रेट'' म्हणावयाचे? काही पुरुषांची कत्तल व उरलेल्या स्त्रियांना व मुलांना गुलाम बनवून त्यांचा व्यापार ही दोन इस्लामची वैशिष्टये. त्या सर्वांना सक्तीने मुसलमान केले जाई व मग ते विकले जात. गोऱ्यागोमट्या व देखण्या मुलांना मोठी मागणी असे. त्यांना 'लैंगिक खेळणी' म्हणून वापरले जात. जनानखान्यावर लक्ष ठेवायला अशा पोरांचे खच्चीकरण केले जाई. जहांगीराच्या अबदुल्ला खान या सेनापतीने ५ लक्ष असे गुलाम बनविले होते, असे त्याने स्वत:नेच लिहून ठेवले आहे. जयपाल या गांधारच्या (कंदाहार) राजास गुलाम बनवून ८० दीनारांना विकले होते. हजारो निष्पाप स्त्रियांना गुलाम म्हणून बाजारात विकल्या जात. रामदासांनी लिहिले आहे,

किती गुर्जिणी ब्राह्मणी भ्रष्टवील्या ।
किती शांमुखी जाहजीं फांकविल्या ।।
किती एक देशांतरी त्या विकील्या ।
किती सुंदरा हाल होऊनि मेल्या ।।

मंदिरांचा विध्वंस? अध्योध्या, काशी, मथुरा, सोमनाथ, अजमेर, हंपी वगैरे मंदिरांचा विध्वंस हिंदू कसा बरे विसरू शकतील? एक देव दुराचारी । फोडिला बळे । येक देव देव जापाणिला । येक देव उदकी टाकिला । येक देव नेऊन घातला । पायातली ।। काय गंमत आहे, जशास तसे या न्यायाने हिंदू क्षत्रियांनी मुसलमान स्त्री-पुरुषांना ना कधी गुलाम बनविले, ना कधी त्यांचे दर्गे किंवा मशिदी तोडून त्यावर आपली मंदिरे उभारली, आणि ना कधी त्यांच्यावर कधी रक्षणकर (जिझिया) लावला. मुसलमानांनी जुनी हिंदू नावे बदलून नवी मुस्लीम नावे ठेवली, उदा. अयोध्या (फैझाबाद), मथुरा (इस्लामाबाद), नाशिक (गुलशनाबाद), कर्णावती (अहमदाबाद), देवगिरी (दौलताबाद), खडकी (औरंगाबाद), पाटणा (अझीमाबाद), कोल (अलीगड), वगैरे. कसले बायले हिंदू, स्वतंत्र भारतात आजही अहमदाबाद व अलीगढ ही शहरे दिमाखाने उभी आहेत! ही कसली आली आहे हिंदू अस्मिता? मुसलमानांनी सारनाथ, वैशाली, ओदंतपुरी, नालंदा, विक्रमशीला, तक्षशीला यांच्यासारख्या जगप्रसिद्ध विद्यापीठांचा विध्वंस केला, ते हिंदूंनी कसे बरे विसरायचे? मुसलमान राजांनी हिंदूंनी दिवाळी व होळी साजरी करायची नाही, असा फतवा काढला होता, ते कसे बरे विसरायचे? त्याला इतिहासाचे ओझे म्हणा किंवा भूत म्हणा, पण तो इतिहास विसरणे अशक्य, अशक्य व कदापि अशक्य.

त्यांचा खेळ, आमचा खेळखंडोबा

घटनांच्या पलीकडे जाऊन त्यांच्या कारणमीमांसेचा विचार करायला मला इंदिरा गांधींनी शिकविले. "भारतासारख्या उपखंडाचे पंतप्रधान म्हणून कसे वाटते?", मी इंदिरा गांधींना एकदा विचारले होते. त्यांचे उत्तर मी या जन्मात कधी विसरणार नाही : "भारतापुरता विचार केला तर अभिमान वाटतो, पण त्यापलीकडे जाऊन विचार केला तर आंतरराष्ट्रीय राजकीय पटावर आपल्याला ह्या महाशक्ती प्यादी म्हणून वापरतात व आपण त्याविरुद्ध काहीच करू शकत नाही, त्याचे मोठे दुःख होते." मागे वळून पाहिले व शांतपणाने विचार केला तर या वसाहतवादी इंग्रजांनी हिंदू व मुसलमानी प्रजेचे कसे खेळणे बनवून टाकले होते व आपले नेते त्यांच्या हाती कसे खेळत राहिले, ते पाहिले तर आश्चर्य वाटते. काही उदाहरणे :

१. भारताच्या राजकारणाचे गांधीजी हे महानायक. इंग्रजांच्या हातचे सर्वात मोठे बाहुले. गोपाल कृष्ण गोखल्यांना दक्षिण आफ्रिकेत धाडून क्रांतिकारकांच्या हातून मारल्या जाणाऱ्या गोऱ्या साहेबांची संख्या कमी करण्यासाठी या अहिंसावादी सत्याग्रह्यास इंग्रजांनी भारतात १९१५ साली बोलावून घेतले व पहिल्या महायुद्धात रीक्रूटमेंट केल्याबद्दल *कैसर-इ-हिंद* हे सोन्याचे पदक बक्षीस दिले. पांच वर्षांत त्यांच्याहून जास्त अनुभवी व जास्त हुशार स्पर्धकाचा - जीनांचा - नागपूर येथे १९२० मध्ये परस्पर कांटा काढला गेला. गांधीजींनी आपल्या मार्गात येणारे सारे कांटे एकामागोमाग दूर केले. कधी फुल टॉस बॉल टाकून तर कधी बॉल स्पिन करून. मोठ्या शिताफीने त्यांनी जीनांना 'सेल्फ आऊट' केले. (डॉ. खऱ्यांना क्लीन बोल्ड तर सुभाषचंद्रांना गुग्ली टाकून! ते सारे टीमवर्क होते. इंग्रज अंपायर होते. त्यांनी सावरकरांसारख्यांना टीममध्ये घेतलेच नाही. त्या साऱ्या पंचरंगी चटकदार टेस्ट मालिकेचे नाव *फ्रीडम स्ट्रगल*.)

२. जीना हे राजकारणातील दुसऱ्या क्रमांकाचे महानायक. बऱ्याच जणांना त्यांना 'खलनायक' म्हणावयास आवडेल. एके काळी गोखले व सरोजिनी नायडू यांनी टिळक युगात त्यांना 'हिंदू-मुसलमान एकतेचे दूत' म्हटले. टिळक युगात भारताचे स्वातंत्र्य या समान ध्येयासाठी हिंदू व मुस्लीम यांना जीनांनी एकत्र आणले व लखनौ करार घडवून आणला. १९१३ साली जीनांनी मुस्लीम लीगमध्ये प्रवेश केला. ध्येय भारतीय स्वातंत्र्य. १९१५ साली मुस्लीम लीगच्या वार्षिक सभेत पुढच्या रांगेत कोण कोण बसले होते? मदन मोहन मालवीय, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, ॲनी बेजंट, बी. जी. हॉर्निमन, सरोजिनी नायडू व महात्मा गांधी! ही ताकद एकट्या जीनांची होती. ब्रिटीश साम्राज्यवाद्यांना हा माणूस परवडण्यासारखा

नव्हता. त्यांची चक्रे हालली आणि त्याच एकतेच्या राजदूताच्या हातून १९४० ते १९४७ या काळात अलगतावादाचा पुरस्कार केला गेला व त्याच्याच करवी देशाची फाळणी घडवून आणली गेली. पडद्यामागे जे घडले ते कोणी सांगत नाही. पडद्यामागे जे घडले तो खरा इतिहास होता. बाकीच्या केवळ बाष्कळ बखरी.

३. सावरकर जर अंदमानात धाडले गेले नसते तर लो. टिळकांचे ते खरे राजकीय वारस ठरले असते, गांधीजी नाहीत. १९३७ सालापर्यंत राजकीय विषयावर भाष्य करावयास त्यांच्यावर बंदी होती. म्हणून किर्लोस्कर मासिकात त्यांनी सामाजिक विषयांवर लेख लिहिले. तेही तितकेच पायाचे व क्रांतिकारक होते. त्यांच्या हिंदू समाजाच्या ''बेड्या'' कोण व कशा विसरेल? ते राजकीय दृष्ट्या स्वतंत्र झाले खरे, पण त्यांना आपले विचार लोकांसमोर मांडायला फार कमी वेळ मिळाला. तोपर्यंत गांधीजींनी आपले दुकान व्यवस्थित थाटले होते आणि गिऱ्हाईकी उत्तमपणे जमविली होती. स्वस्त व सवंग गांधीवादासमोर त्याग व शुद्धता यांची मागणी करणारा सावरकरवाद टिकू शकला नाही. १८५७ च्या स्वातंत्र्यासमराचे लेखक सावरकर एके काळी हिंदू-मुस्लीम ऐक्याचे खंदे पुरस्कर्ते होते. अंदमानाच्या अनुभवाने शहाणे झालेले सावरकर आता शुद्ध हिंदुत्वाचे खंदे अभिमानी झाले होते. कारण, त्यांना साम्राज्यवाद्यांचे खरे स्वरूप समजले होते. ते गांधीजी-नेहरूंना तितकेसे समजलेले नव्हते. लोकांसमोर गांधीजींची खरी प्रतिमा येऊ न देणे व सावरकरांची फक्त खोटी जातीयवादी प्रतिमा लोकांसमोर उभी करणे ही ब्रिटीश शासकांची चलाखी यशस्वी होणे, ही या देशाची खरी शोकांतिका आहे.

४. भारतात मुसलमान ही समस्याच नाही, बेजबाबदार हिंदू नेतृत्त्व ही या देशाची खरी समस्या आहे. यास *दादूमियांचा सिद्धांत* म्हणतात. स्वातंत्र्योत्तर ७० वर्षे या नेतृत्वाने हिंदुंवर दुतर्फी रहदारीचा नियम व मुसलमानांना एकतर्फी रहदारीचा नियम लागू केला, उदा. हिंदूंना सक्तीचे कुटुंबनियोजन तर मुसलमानांना चार बायका व वीस मुलांची सवलत; हिंदूंना शुद्धी करण्यावर बंदी तर मुसलमानांना बाटवाबाटवी करण्यासाठी सौदी अरेबियाचे पाहिजे तेवढे पेट्रोडॉलर्स; हिंदूंना शस्त्रबंदी, मुसलमानांना बेकायदेशीर शस्त्रे बाळगण्याची अनौपचारिक परवानगी; हिंदूंना त्यांच्या खर्चाने काशीयात्रा तर मुसलमानांना सरकारी खर्चाने मक्केची हज यात्रा. हिंदू शाळा-कॉलेजांवर जाचक सरकारी नियम व अंमलबजावणी, मुसलमानांना त्यातून मुक्ती. ही यादी अजून बरीच लांबवता येईल. या अन्यायी तफावतीतून गोंधळ निर्माण होतो. गोंधळातून शेफारणे, शेफारण्यातून अरेरावी, अरेरावीतून दंगे व रक्तपात आणि या दंग्यात मुसलमानांना न झालेल्या नुकसानीची (?) भरपाई.

५. साम्राज्यवादी इंग्रजांना व त्यांच्या अमेरिकन चेल्यांना पाकिस्थानाची गरज कां भासली? सौदी अरेबिया हीदेखील त्यांचीच निर्मिती होती. पॅन इस्लामला उचलून धरणारी फक्त ही दोन राष्ट्रे. पहिले तेलामुळे अतिसमृद्ध झालेले अरबस्थान. अमेरिकन डॉलर्स, अमेरिकन शस्त्रबळ व अफगाणी मनुष्यबळ यांच्या जोरावर माजलेले दुसरे पाकिस्थान. ज्या देशात मुसलमान अल्पसंख्य आहेत त्या राष्ट्रात सदैव अस्थिरता व अशांतता उभी करणे हा या दोघांचा आवडता संयुक्त खेळ आहे. त्यासाठी लागणारे धन सौदी अरेबिया पुरवितो. पाकिस्थान, मनुष्यबळ. इंग्रज व अमेरिकनांना तेलाचे देश व तेलाच्या राजकारणावर नजर ठेवण्यासाठी लष्करी तळ पाहिजे होता. तेथे नागरी लुडबुड चालत नाही. भारताने त्यास साफ नकार दिला. पाकिस्थानने ती ऑफर लगेच स्वीकारली. भांडवलशाही गटास भारतात साम्यवादाचा प्रसार होणे परवडण्यासारखे नव्हते. कल्पना करा, एकट्या आशिया खंडात रशियन आशिया, चीन व भारत साम्यवादी झाले तर जगाच्या 'बॅलेन्स ऑफ पॉवर' चे काय होईल? त्यासाठी भारतातील मुसलमानांची मानसिक चौकट बदलून त्यांना अलगतावादी बनविणे हे या अँग्लो-अमेरिकन गटाचे आद्य कर्तव्य ठरले. पैशाची व शस्त्रांची मदत ही नंतरची गोष्ट. काश्मीरचेच उदाहरण घ्या ना. फारुख अबदुल्ला व इंदिरा यांचे संबंध बिनसल्यावरच हा गट तेथे जास्त सक्रिय होऊ शकला. या गटाविरुद्ध असगरअल्ली इंजिनियर, हमीद दलवाई वगैरे मुस्लीम सुधारक व सेक्युलर मंडळींचा गट तुलनेने किती क्षुल्लक व किती दुर्बळ! आणि त्याला काटशह देणारे दिलीप पाडगावकरांसारखे मध्यस्थ, सॉरी, इंटरलॉक्यूटर्स व 'छोटीसी आशा' सारखे दिवसा मेणबत्त्या घेऊन मोर्चे काढणारे मुंबईचे भाबडे सूटबूट-टायवाले पार्ट टाईम देशभक्त!

भारतीय मुस्लीमांची ट्रॅजिकॉमेडी

१९४७ च्या जुलै महिन्याच्या अखेरीस मध्यवर्ती केंद्रीय विधानसभेचे मुस्लीम सदस्य जीनांना भेटले. जीना कराचीस जायची तयारी करीत होते. त्यामुळे ही बैठक जीनांना निरोप द्यायचा समारंभ ठरली. या सदस्यांनी, "तुम्ही तर भारत सोडून चाललात, आता भारतातील मुसलमानांचे भवितव्य काय?" असा प्रश्न साहजिकच जीनांना विचारला. निश्चित् असे काही बोलायचे जीनांनी टाळले. ते म्हणाले, "नव्या राजवटीत तुमचे तुम्ही ठरवायचे आहे. काहीही झाले तरी तुम्हाला भारताशी एकनिष्ठ राह्यचे आहे. तुम्हाला एका वेळी दोन घोड्यांवर स्वार होता येणार नाही." काही महिन्यांपूर्वी 'पाकिस्थान झिंदाबाद' या घोषणा देणाऱ्यांनी

निमूटपणे गांधी टोप्या डोक्यावर चढविल्या व ते एका रात्रीत 'राष्ट्रीय मुसलमान' झाले. पूर्वी असुरक्षित म्हणून पाकिस्थान मागितले व आता सुरक्षित व्हावे म्हणून ते सरसकट कॉंग्रेसवाले झाले. ही भारताच्या इतिहासातील सर्वात मोठी कॉमेडी! गांधी-नेहरू आमचे सर्वोच्च नेते! दोघांनाही जीनांना टीबीची बिमारी आहे हे माहीत नव्हते. असे आमचे पुढारी! ही माहिती असती तर दोघांनी जीना जायची वाट पाहिली असती. जीना गेल्यावर इतरांना 'फाळणी नको, एकत्र राहू या' हे समजावणे सोपे गेले असते. मौंटबॅटन जादा चलाख. म्हणून त्याने १९४८ जूनच्या ऐवजी १५ ऑगस्ट १९४७ ही तारीख प्रीपोन केली. हे साधे राजकारण आमच्या सर्वोच्च नेत्यांना समजू नये ही आमची ट्रॅजेडी!

भारताच्या इतिहासातील सर्वात मोठी शोकांतिका ही आहे की जीना भले स्वतःला मुसलमानांचे प्रतिनिधी मानीत होते, पण वस्तुस्थिती वेगळी होती. १९३७ साली मुस्लीम लीग सर्व प्रांतातील सर्व निवडणुका हारली होती. वायव्य सरहद्द प्रांतात मुस्लीम बहुसंख्य होते. तेथेही मुस्लीम लीगचा पराभव झाला. १९४२ नंतर सारे कॉंग्रेस नेते गजाआड होते. मुस्लीम लीगला ती सुवर्णसंधी होती. तरीदेखील खान बंधू कॉंग्रेसमध्येच होते. लीगला तेथे स्थान नव्हते. १९४७ साली फाळणी झाली. ज्यांनी पाकिस्थानास मोठ्या संख्येने मते दिली होती ते पाकिस्थानी युपी-बिहारचे मुसलमान भारतात राहणार होते. ते पाकिस्थानात गेले नाहीत. ज्या पंजाब व बंगाल प्रांतात मुसलमान बहुसंख्य होते तेथेच पाकिस्थान अस्तित्वात आले, इतरत्र नाही. कॉमेडी एवढ्यासाठी की ह्या प्रांतांनी पाकिस्थानची मागणी केलीच नव्हती! पंजाबात मुस्लीम लीगचे कट्टर विरोधी युनियनिस्ट पक्षाचे सरकार सत्तेवर होते. वायव्य सरहद्द प्रांतात खान बंधुंचे राज्य होते व ते कॉंग्रेसचे मित्र होते. काश्मीरमध्ये सुरवातीस शेख अबदुल्लांचे व नेहरूंचे चांगले मेतकूट होते. अमेरिकनांनी त्यांच्या डोक्यात काश्मीरला स्वित्झर्लंडप्रमाणे स्वतंत्र ठेवण्याची योजना घुसविली. तेथून सारा मामला बिघडला. त्याच्या विधवा बेगमेने मला सुनावले, ''जो बडा भाई हिंदोस्थानका बादशाह हो सकता है, तो छोटा भाई कश्मीरपे राज नही कर सकता?''

सरदार पटेलांनी फाळणीस होकार का दिला?

फाळणी झाली नसती तर जगात हिंदुस्थान हा सर्वात मोठा, म्हणजे १.४ अब्ज वस्तीचा देश झाला असता. तसेच, तो जगातील सर्वात मोठा मुसलमानांचा देश, म्हणजे ५० कोटी मुसलमान वस्ती असलेला देश झाला असता. तसेच, तो

जगातला सर्वात गरीब देश, म्हणजे ६० कोटी भुकेलेल्या लोकांचा देश झाला असता. त्या देशात वेगळे मतदारसंघ असते. वेगळे मतदारसंघ असलेल्या देशात मग लोकशाही कशी असती? घाबरट हिंदूंना पंजाब, सिंध व सरहद्द प्रांतावर राज्य करणे कितपत जमले असते ते सांगणे अवघड आहे. कारण, तेथे सतत हिंदू व मुस्लीम संघर्ष होत राहिले असते. मुसलमानांनी अफगाणिस्थानात पूर्वी केले त्याप्रमाणे तेथून हिंदूंना भगविण्याचे प्रयत्न केले असते. ईंटेरीम सरकारात नबाबजादा लियाकत अली खान अर्थ मंत्री होते. 'डायरेक्ट ॲक्शन' ने पोळलेल्या सरदारांनी स्वतःकडे गृहमंत्रीपद मुद्दाम ठेवून घेतले. लियाकत अली त्यांचे बाप निघाले, त्यांनी सरदारांना अक्षरशः रडविले, त्यांना साधा चपराशी नेमायचा असला तरी त्यांना लियाकत अलींना विचारल्याशिवाय काहीही करता येत नसे. त्या जाचाला कंटाळून "भविष्यात ही डोकेदुखी नको," म्हणून फाळणीला प्रथम होकार सरदारांनी दिला, मग नेहरूंनी. गांधींचा होकार तर १९४२ सालापासून होताच. सावरकरांनी तेंव्हाच हिंदूंना सावध केले होते : "Quit India will mean Split India." साम्राज्यवाद्यांच्या *स्ट्रॅटेजिक प्लॅनिंग* ला आता तरी सलाम कराल की नाही?

मुसलमान आणि अल्पसंख्यांक?

"मुसलमान हे अलग राष्ट्र आहे," असा धोशा जीनांनी १९४० सालापासून सुरू केला व १५ ऑगस्ट १९४७ रोजी ती कल्पना प्रत्यक्षात उतरवून दाखविली. १९४० साली हिंदुस्थानातील सर्व मुसलमानांनी जीनांना आपले पुढारी म्हणून मान्य केले नव्हते. १९४५ नंतर हळू हळू त्यांनी ते 'मुस्लीम ह्रदय सम्राटा'चे स्थान मिळविले. एमआरए बेग जीनांचे कांही वर्षे सचिव होते. त्यांनी "इस्लाम हे राष्ट्र कसे होईल?" असा प्रश्न जीनांना केला. जीना म्हणाले, "अमेरिका पूर्वी कोठे राष्ट्र होते? पण त्यांची तशी श्रद्धा होती व त्यांनी त्याप्रमाणे अमेरिकन राष्ट्रवाद प्रत्यक्षात आणलाच ना? श्रद्धा ठेवा. आपलेही पाकिस्थान नक्की जन्मास येईल."

मुसलमान भारतात अल्पसंख्यांक कधीच नव्हते, आज नाहीत व पुढे तसे राहणार नाहीत. मोगलांच्या राजवटीत मुसलमानांना आपण अल्पसंख्यांक आहोत असे कधी वाटले कां? १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध लढले गेले तेव्हा सेनेचा प्रमुख दिल्लीचा बादशाहाच होता. स्वतंत्र भारतात हैदराबाद सर्वात महत्त्वाचे संस्थान. तेथे ८४ टक्के हिंदू होते व ११ टक्के मुसलमान होते. त्यांचा प्रमुख निझाम. मोगलांच्या निझाम नावाच्या राजपालाने मोगल दुर्बळ झाले हे पाहून १७२३ साली "आपण

स्वतंत्र आहोत," असे जाहीर केले. हैदराबादेतील मुसलमानांना आपण कधी अल्पसंख्यांक आहोत असे कधीच वाटले नाही. भारत सरकारने हैदराबादेवर लष्करी कारवाई केली व ८४ टक्के हिंदूंना निझामाच्या गुलामगिरीपासून वाचविले.

याचा अर्थ, अल्पसंख्यांकपणा संख्येवर अवलंबून नसतो, तो सत्तेवर अवलंबून असतो. जोपर्यंत दिल्लीत मुसलमानी सत्ता होती तोपर्यंत कोण अल्पसंख्यांक व कोण बहुसंख्यांक याची कोणास आठवण झाली नाही. सत्ता म्हणजे शासन, न्यायखाते, लष्करी खाते व धर्म खाते (अम्मान-इ-अव्वल). यात नोकऱ्यांची मुसलमानांना १०० टक्के गॅरंटी. १९४८ साली पोलीस कारवाईमुळे निझामाच्या हातातून सत्ता काढून घेतली व हैदराबाद इंडियन युनियनमध्ये सामील झाले. तेव्हा तेथील मुसलमानांना एकदम ते अल्पसंख्यांक झाल्याची जाणीव झाली. ब्रिटीश काळात मुसलमानांना आपल्याला इंग्रजांचा पाठिंबा आहे अशी खात्री वाटत होती. इंग्रज न्यायाधीश आपल्यास सोडून देईल अशी दंग्यातील गुंडांना खात्री असे. तरीदेखील रानड्यांसारखे नरमपंथी कायद्याच्या राज्याची प्रशंसा करीत. ते टिळकांना कसे बरे मान्य व्हावे? फाळणी झाली, भारत स्वतंत्र राष्ट्र झाले व मुसलमानांना एकदम आपण पोरके झाल्यासारखे वाटू लागले. कारण आपण अल्पसंख्यांक आहोत, अशी त्यांना प्रथमच जाणीव झाली. गांधीजी मुसलमानांना "भारतात रहा," अशी विनंती करीत होते. मरण समोर दिसत असताना त्यांनी ती विनंती कां ऐकावी? भारतात मुसलमानांना हिंसेला तोंड द्यावे लागत आहे या कल्पनेने व्यथित झालेल्या गांधीजींनी "आता आपल्याला १२५ वर्षे जगावयाची इच्छा उरली नसल्याचे" जाहीर केले. गांधीजींनी हिंदू-मुस्लीम एकतेसाठी आमरण उपास सुरू केला. त्यांच्या सभेत "महंमद गांधी" व "गांधी मुर्दाबाद" अशा घोषणा होऊ लागल्या. भारतात हिंदूंना आता आपले राज्य आले आहे, आता आपल्याला कोणाचा जाच सहन करावा लागणार नाही, असा आनंद जरा कोठे होतो न होतो, तोच गांधीजींचे वारस व प्रिय शिष्य पं. नेहरूंनी "मी आहे तोपर्यंत भारत हे कधीच हिंदुराष्ट्र होऊन देणार नाही, आम्ही सदैव सेक्युलरच राहू," असे तुणतुणे सुरू केले. भारतात राहण्याचे ज्या साडेचार कोटी मुसलमानांनी पसंत केले त्यांच्याकडे हिंदूंनी "पाकिस्थानाचे पंचमस्तंभीय" या दृष्टिकोणातूनच पाहिले. याच्याउलट, नेहरूंनी आपण त्यांचे "भारतातील एकमेव पालक आहोत," अशा दृष्टीने त्यांचा पितृतुल्य सांभाळ केला, कमसे कम, तसे नाटक केले.

भारतीय मुसलमानांचे स्वॉट ॲनॅलिसिस

अ) बलस्थाने

१. अलगतावाद हे त्यांचे सर्वात मोठे बळ होते. त्यांचे नेतृत्व त्यामुळे सनातनी विचारांचे मुल्ला आणि मौलवी करू लागले. टिळकांनंतर काँग्रेसचे नेतृत्व गांधीजींकडे गेले. त्यांचे सल्लागार डॉ. अंसारी व अल्ली बंधु आणि शेवटी मौ. आझाद हेच होते व ते सारे सनातनी विचारांचे होते. त्यांचे व जीनांचे पटणे कधी शक्य नव्हते. जीना आधुनिक विचारांचे होते; त्यांना गांधीजींचा खिलाफतीचा पाठिंबा मान्य नव्हता. केमाल पाशाने तुर्कस्थानमध्ये सत्ता काबीज केली व पहिल्यांदा काही काम केले असेल तर खिलाफत बरखास्त करण्याचे. त्या बाबतीत जीना बरोबर ठरले व गांधीजी अज्ञानी.

२. या अलगतावादामुळे भारत ही मुसलमानांसाठी 'पुण्यभूमी' व 'पितृभूमी' कदापिही होऊ शकत नाही. त्यामुळे मोठा सवाल राजनिष्ठेचा उद्‌भवतो. काश्मीरचे मुसलमान तर आज आव्हान देतात, "आमची निष्ठा आधी धर्माला. आम्ही सरहद्दी जाणत नाही." हे लोण जर साऱ्या भारतात पसरले तर संरक्षणाच्या दृष्टीने फार मोठी अडचण होणार आहे. १९६५ साली मुसलमान सैनिकांनी पाकिस्थानासमोर आम्ही लढणार नाही, असे म्हणून शस्त्रे खाली ठेवली. इजिप्तचे मुसलमान जुने फॅरोहा (रामसे/राजे) व पिरामिडस् यांचा रास्त अभिमान बाळगतात. नेहरूंनी ते सत्य अलिगढच्या मुलांना सांगितले व तसा अभिमान त्यांनी रामकृष्णांचा बाळगावा, असे म्हणताच मुलांनी जो गोंधळ घातला तो पुसू नये. नेहरूंना मागील दरवाजाने सुरक्षिततेसाठी पळून जावे लागले. ही पंतप्रधानांची अवस्था. दुसऱ्याने ते धाडस केले तर बहुधा जीवालाच मुकावे लागेल. तुम्हाला जे पूज्य त्याचा आम्ही मुद्दाम अवमान करणार, हे मुसलमानांचे मानसशास्त्र झाले आहे. वंदे मातरम् हे राष्ट्रगीत गाण्यास नकार बहुधा याच अलगतावादामधून जन्म घेतो. "आम्ही अल्लाशिवाय कोणासमोर झुकत नाही," हे त्यांचे स्पष्टीकरण न पटणारे आहे. इंग्रजी आमदानीत "गॉड सेव्ह द किंग" हे ब्रिटनभक्तीचे गीत ते कसे बरे गायचे? त्यांचा शुद्धीला (घर वापसी) विरोधही त्याच अलगतेच्या भावनेतून निर्माण होत असावा. आम्ही हिंदूंना बाटवणार, पण हिंदूंनी मात्र शुद्धी करायची नाही, हा कोठला न्याय? त्याच अलगतेतून गोहत्या मुद्दाम हिंदूंना चिडविण्यासाठी केली जाते. तुम्ही डुक्करे मारू नका, आम्ही गाया कापणार नाही, अशी संमजसपणाची भूमिका कां बरे घेतली जात नाही?

३. अलगतावाद व पाकिस्थान निर्मिती हातात हात घालून फिरू लागले. धर्माच्या नावाने आधुनिक जगात फक्त दोनच देश जन्म पावले - पाकिस्थान व इस्त्राएल. मृतांची संख्या, जखमींची संख्या व निर्वासितांची संख्या या तिन्ही बाबतीत पाकिस्थान इस्त्राएलपेक्षा उजवे ठरले आहे. पण इस्त्राएल दिवसेंदिवस समर्थ होत आहे तर पाकिस्थानापासून बांगलादेश वेगळा निघाला. अमेरिका पैसे देताना आता 'शर्ते लागू' असे म्हणू लागली आहे.

४. धर्म हा नव्या राष्ट्राचा पाया आहे असे पाकिस्थान निर्मितीच्या वेळी वाटले होते, नव्हे खात्री झाली होती. १९७१ साली सिद्ध झाले की बंगाली मुसलमान असूनदेखील पाकिस्थानातून बाहेर पडले. म्हणजेच, धर्म हा एकच घटक पाया होऊ शकत नाही. तेथे इतर घटकदेखील काम करीत असतात. इस्लाम हा समान धागा असला तरी पख्तून, बलुची व सिंधी लोक पाकिस्थानातून बाहेर पडू शकतात. धर्माचा पाया निखळल्यामुळे भारतीय मुसलमानांना पोरके वाटू लागले आहे.

ब) नर्मस्थाने

१. उर्दू ही मुसलमानांची भाषा आहे हा जीनांचा सिद्धांत चुकीचा ठरला. जीनांनी पूर्व पाकिस्थानास भेट दिली. त्यांनी आपल्या (इंग्रजी) भाषणात "उर्दू ही भाषा बंगाली मुलांनी आत्मसात करावी" असे सांगितले. ते भाषण अर्थात कोणालाच पसंत पडले नाही. आणि त्या उर्दूच्या प्रश्नावरून पूर्व पाकिस्थान १९७१ साली 'बांगलादेश' झाला. पाकिस्थानात पंजाब्यांचे वर्चस्व आहे. ते अट्टाहासाने पंजाबीतूनच संभाषण करतात. पख्तून, बलुची व सिंधी त्यांची स्थानिक भाषा बोलणार. बांगलावरून युद्ध झाले व बांगला बोलणाऱ्यांचा बांगलादेश स्वतंत्र झाला. येथे तर उर्दू कोणीच बोलत नाही. त्यामुळे तेथील भाषिक असुरक्षितता वाढली आहे. त्यांना भीती वाटते, नजिकच्या भविष्यात पाकिस्थान म्हणजे केवळ पंजाब, अशी स्थिती भावी पिढ्यांना पहावयास तर मिळणार नाही ना?

२. स्त्रियांना दिली जाणारी पाशवी व अन्यायी वागणूक. त्याला आधार कुराणाचा आहे. तेथे पुरुषांचा पांढरा शुभ्र पोशाख तर स्त्रियांचा काळा बुरखा. काळा रंग उष्णता खेचतो तर पांढरा कपडा उष्णता बाहेर फेकतो. थोडक्यात, स्त्रीने घराच्या बाहेर पडू नये यासाठी मुद्दाम केलेली ती योजना आहे. चूल व मूल या पलिकडे स्त्रीला विश्व असू नये, या कल्पनेतून जन्म पावलेला हा क्रूर कट. स्त्री ही भोग्य वस्तू आहे, यापलिकडे तिला काही किंमत नाही, असे मानणारा हा

मध्ययुगीन धर्म. आधुनिक जगात एकदम मिसफिट्. सदैव असुरक्षित असणारी मुस्लीम स्त्री. तिची असुरक्षितता वाढवण्यासाठी आणखी तीन सवती आणण्याचा नवऱ्याला अधिकृतपणे धर्माने दिलेला हक्क. एवढ्याने जणू पुरेसे नाही म्हणून 'तलाक तलाक तलाक' असे तीनदा बोलले की नवरा झाला लग्नाच्या बंधनातून मुक्त! ज्या घरातील स्त्री असुरक्षित, ते घर, ते कुटुंब किती सुरक्षित असू शकणार आहे? त्यामुळे संस्कार नाहीत. म्हणून, बिनबुडाचे राष्ट्र.

३. मुसलमानात गुन्हेगारी कां वाढत आहे? कारण, मुसलमान पोरास घरापेक्षा तुरुंग जास्त सुरक्षित जागा वाटते. सरकारी खर्चाने राहायला फुकट जागा, दोन वेळचे फुकट जेवण, करमणुकीसाठी टीव्ही, अधून मधून धर्माची शिकवणूक देणाऱ्या एखाद्या मुल्ला व मौलवीची तुरुंगास भेट व चोरून मिळणाऱ्या तंबाखू, दारू ते मोबाईलची सोय. त्यास हा स्वर्ग वाटला तर नवल नाही.

४. १८५७ नंतर भारतीयांचा पराभव झाला. तो पराभव मुसलमानांना जास्त वर्मी लागला. कारण, त्यांच्या हातून त्यांची ५०० वर्षांची जुनी सत्ता निसटली होती. इंग्रजांनी भारतीयांवर इंग्रजी भाषा लादली होती. मुसलमानांची १०० टक्के साक्षरतापासून २० टक्क्यांवर आली. साक्षर मुसलमानांना आता शासनाचे दरवाजे बंद झाले होते. कारण, त्यांना इंग्रजी येत नव्हते. १८५८ ते १८७८ या वीस वर्षांत कलकत्ता विद्यापीठातील ३,१०० पदवीधरांपैकी फक्त ५७ तरुण मुस्लीम होते. मुसलमांनांना अलग पाडण्यासाठी हिंदू व इंग्रज दोन्ही जबाबदार आहेत. मुसलमानांनी इंग्रजी शिक्षण घ्यायचे नाकारले होते. त्यातून कुराणावर आधारलेले दोन 'रीव्हायव्हॅलिस्ट' गट उदयास आले.

५. माध्यमे खतरनाक भूमिका बठवितात. त्यांना ब्रेकिंग न्यूज मिळावी, त्यांची लोकप्रियता वाढावी, म्हणूनच ही माध्यमे योगी आदिनाथांसारख्या प्रक्षोभक भाषणे करणाऱ्यांना जास्त महत्त्व देतात व विवेकी व देशहिताच्या गोष्टी सांगणाऱ्या नेत्यांच्या वक्तव्यास प्रसिद्धी देत नाहीत. मोदींनी ''सबका साथ, सबका विकास'' हे आपले धोरण आहे असे स्पष्ट शब्दात सांगितले असले तरी विकासाच्या प्रकल्पांना ही माध्यमे फार थोडा वेळ देतात. त्यांचा सारा वेळ मुस्लीमांच्या अलगतावादी कारवायांना व दोन धर्मियांत असलेली फूट वाढविण्यातच व त्यास प्रसिद्धी देण्यातच जातो.

क) संधीस्थाने

१. कॉमन सिव्हील कोड (समान नागरी कायदा) स्वीकारून मुसलमान समाजाला हिंदू मने सहज जिंकता येतील व दोन समाजातील अंतर कमी करता

येईल. अहंकारी मुस्लीम पुढारी "हे आपल्या समाजाचे हिंदूकरण आहे," असा खोटा प्रचार करून मुसलमानांची मते कलुषित करीत आहेत. मानवी जीवन जास्त सुखी करण्यासाठी सुधारणा करणे आवश्यक आहे. बहुपत्नीकत्वावर बंदी व घटस्फोटाच्या सवलतीला आळा बसावा म्हणून पाकिस्थानाने त्या दृष्टीने पाऊल पुढे टाकले आहे. गोव्यात पूर्वी पोर्तुगीजांचे राज्य होते. तेथे पहिल्यापासून *कॉमन सिव्हिल कोड* होते. ते त्यांना चालले. पण स्वतंत्र भारतात आपलाच शरिया चालावा, कॉमन कोड आले तर आपल्या व्यक्तीस्वातंत्र्यावर गदा येईल अशी त्यांना भीती वाटते. मुस्लीम असहिष्णु नेते ही भीती घालविण्याऐवजी ती जास्त जास्त दृढ करीत आहेत.

२. भारतीय मुस्लीम असहिष्णु नेते कुटुंब नियोजनाबाबतीत धर्म मध्ये कां आणतात ते कळत नाही. लोकसंख्येला आळा घालणे ही राष्ट्रीय गरज आहे. ती खरे म्हणजे राष्ट्रीय समस्या आहे. पाकिस्थानात ते चालते, येथे नाही. हे असे कां? कुटुंबात थोडी मुले असावीत पण ती चांगली सुशिक्षित असावीत, हे तर्कशास्त्र कोणालाही समजण्यासारखे आहे. मुसलमानांची संख्या वाढवून भारतास मुस्लीम राष्ट्र (दारूल इस्लाम) बनविण्याचा हा वेडा प्रयत्न आहे, असे हिंदू संख्यातज्ञ जो आरोप करतात त्यात तथ्य असावे. नाहीतर, हिंदूंचे प्रेम मिळविण्यासाठी ह्या साध्या उपायास हा समाज का नकार देत आहे ते कळत नाही.

३. अशा अनेक छोट्या छोट्या गोष्टी आहेत की त्या मुसलमान समाज हांसत करू शकेल व भारतीय समाजात एकात्मता आणू शकेल. भ्रांत व अहंकारी हटवादापायी मुसलमान नेते हिंदू व मुसलमान यांचे सहकार्य होऊन देत नाहीत. 'मा तुझे सलाम' म्हणता येते, पण 'वंदे मातरम्' गाण्यास विरोध, याला काही अर्थ आहे कां? मशिदीवरील भोंग्यांमुळे सामान्य माणसाला, विद्यार्थ्यांना व न्यायालयातील कामकाजास अडथळ येतो, एवढे ही मंडळी समजू शकत नाहीत काय? अल्पसंख्यांक शिक्षण संस्थांना त्यांचे धर्मशास्त्र शिकविता येते. त्याने त्यांच्या अनुदानात किंवा इतर खर्चात व्यत्यय येऊ शकत नाही. पण हिंदू शिक्षण संस्थांना तसे करण्याची बंदी आहे. सर्वांना समान सवलती वा निर्बंध कां नाहीत? अशा जाचक नियमापासून सुटका करण्यासाठी मग रामकृष्ण मिशन किंवा आर्य समाजास, "आम्ही हिंदू नाही, आम्ही अल्पसंख्यांक आहोत," असे कोर्टात खोटे बोलावे लागते. या लोकशाहीत अशी विषमता कां असावी?

४. आपल्या घटनेनुसार (कलम १५-१) केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान यांच्या आधारावर नागरिकांत शासन भेदभाव करणार नाही. पण इंदिरा

गांधींच्या १५ कलमी कार्यक्रमानुसार अल्पसंख्यांकांना त्वरित कर्जे द्यावीत अशा सूचना रिझर्व्ह बँकेने बँकांना दिल्या होत्या. नरसिंह रावांनी *मायनॉरिटीज फिनान्स कॉर्पोरेशन्स*ची स्थापना करून ५०० कोटी रुपये वाटण्याची घोषणा केली होती. हे सहाह्य हिंदू नसेल तरच मिळते. १९८८ साली प्रत्येक जिल्ह्यात अल्पसंख्यांकांच्या हितावर लक्ष ठेवण्यासाठी एकेक बँक नियुक्त करण्यात आली होती. अल्पसंख्यांकांना कर्ज देण्याकरता विशेष अधिकारी व संपर्क अधिकारी खास नेमले गेले. २००५ साली तर पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी जाहीर केले की देशाच्या साधनसामग्रीवर पहिला अधिकार मुस्लीमांचा आहे. असे पंतप्रधान मिळाल्यावर त्या देशातील मुसलमान शेफारणार नाही तर काय होणार?

५. कलम ३७० मुळे जम्मू-काश्मीरमध्ये बाहेरच्या भारतीयांना मालमत्ता व नागरिकत्त्व घेता येत नाही. बी. के. नेहरूंनी मला सांगितले, "आमच्या काश्मीरी पंडितांना भविष्य दिसू शकले नाही. त्यांच्याच आग्रहामुळे हा नियम राजे हरिसिंगांनी केला." मनात आणले असते तर नेहरू व शेख अबदुल्ला यांना हा नियम सहज बदलता आला असता. राजकीय स्वार्थ आडवा आला. काश्मीरात हिंदू बहुसंख्य होऊ नये म्हणून मुद्दाम ही बंदी तशीच चालू ठेवण्यात आली आहे. असाच नियम ख्रिस्ती बहुसंख्या कायम ठेवण्यासाठी नागालँडला लागू करण्यात आला, असे आमचे नेतृत्व. म्हणून दादूमियांचा सिद्धांत.

ड) भयस्थाने

१. पूर्वी दळणवळणाची व संदेशवहनाची जलद साधने नव्हती, म्हणून हिंदू नेत्यांना 'पॅन इस्लाम' चळवळीचे नेहमीच भय वाटायचे. तशी वेळ आली तर येथील मुसलमानांना पळायला व कायमचे स्थायिक व्हायला अनेक मुसलमानी देश आहेत, पण हिंदूंनी पळून कोठे जायचे व कोठे स्थायिक व्हायचे, हा त्यांचा समान प्रश्न होता. आज तशी भीती वाटत नाही. पूर्वी पॅन-इस्लाम म्हणजे एक मोठा एक धर्मीय भरीव गट वाटायचा. तो भ्रमाचा भोपळा आज फुटला आहे. यात शिया-सुन्नी, प्रो-रशिया-प्रो-अमेरिका, तेलवाले-बिनतेलवाले वगैरे उभ्या-आडव्या किती चिरफळ्या आहेत त्याचे ज्ञान आता सर्वांना झाले आहे. पश्चिम आशियात भारतीय, पाकिस्थानी व इतर आशियन कामगार एवढ्या मोठ्या संख्येने काम करतात की त्यांच्या परकीय चलनाचा त्यांच्या मायदेशांना खूप फायदा होतो. त्याबरोबर त्यांचे आतंकवादी बनण्याचे प्रमाण तितकेच वाढते व त्याचा धोका आपल्या देशाच्या संरक्षणास होऊ शकतो, हे विदारक सत्य आपल्याला विसरता येत नाही.

२. मुस्लीम धार्मिक प्रेरणाकेंद्र मक्केत आहे. ख्रिस्त्यांचे जेरुसलेम व रोम येथे आहे. युरोपात प्रबोधन युग सुरू झाले. डेकार्ट, जॉन लॉक, थॉमस मूर, ईरॅमस, व्हॉल्टेअर, रुसो वगैरे मंडळींनी वैचारिक क्रांती व *रेनेसान्स* (१५ वे शतक) घडवून आणले. येथून इहवाद *(सेक्युलरवाद)* सुरू झाला. हे प्रबोधन युग भारतात १९ व्या शतकात राजा राम मोहन रॉय, ईश्वरचंद विद्यासागर, लोकहितवादी, आगरकर, म. फुले, रानडे, दयानंद सरस्वती वगैरे मंडळींनी आणले व हिंदू धर्मात सतीबंदी, विधवापुनर्विवाह, संमतिवयाचा कायदा, सारडा बिल, अस्पृश्यता-निवारण, मंदिरप्रवेश, हिंदू कोड बिल वगैरे बऱ्याच सुधारणा करून त्या लोकांना मान्य करावयास भाग पाडले. सर सैय्यद अहमद, हैदरी, सैय्यद हसन इमाम, मौ. आझाद वगैरे पुरोगामी मंडळींनी मुस्लीम मानसिकता बदलण्याचे प्रयत्न केले, पण गांधीजींनी खिलाफतीचे भूत त्यांच्या डोक्यात घुसवून कोहट, मोपला यांच्यासारख्या भीषण जातीय दंग्यांना आमंत्रण दिले व भारतीय राजकारणात मुल्लामौलवींचा माथेफिरुपणा कायम केला. गांधीजींनी सेक्युलर पक्षांची व विचारवंतांची गोची करून ठेवली. हमीद दलवाई, न्या. छागला, एम. ए. बेग वगैरे २-४ अपवाद वगळता कोणी या प्रश्नाला हात घालण्याची हिंमत दाखविली नाही. तलाक पद्धती, साक्षीपुराव्यात स्त्रीचे केले जाणारे अवमूल्यन, बहुपत्नीकत्वाला धार्मिक मान्यता, शहाबानो प्रकरणातील पोटगीचा प्रश्न, समान नागरी कायदा व इतर तत्संबंधित प्रश्न काँग्रेसच्या राजवटीत शीतपेटीत ठेवले गेले. त्यांना छेडले तर आपली हुकूमी मुस्लीम मते व सत्ता हातातून निसटून जातील, असे भय काँग्रेस नेत्यांना वाटले. वाजपेयींच्या ५-६ वर्षांच्या राजवटीतदेखील ती हिंमत झाली नाही. मोदींना आतंकवादाचा मुद्दा खूपच मदत करणारा मिळाला आहे. त्यामुळे मोदींना अनुकूल वातावरण मिळत आहे. त्यांनी सुधारणांच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. त्यात *टाईम्स नाऊ* व *रिपब्लिक* चॅनल्सनी पुढाकार घेतला आहे.

३. भारतात इस्लाममधील सुधारणांच्या बाबतीत जरा कोठे सुरुवात होते न होते तो दोन गुजराथी नेत्यांनी सत्तेच्या स्पर्धेत त्यांचा गळाच घोटला. १९१० साली सैय्यद हसन इमाम काँग्रेसच्या विशेष अधिवेशनात आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, "....every Indian must be Indian first and everything afterwards." साहिबजादा अफताब अहमदखान म्हणाले, "The real test of Muslim's sincerity lies in his making India the centre of all his worldly interests and aspirations, and in his exclusive devotion and loyalty to the cause of the motherland which, in effect means co-operation with and support of the Hindu majority in all that is

essential for the attainment of India's highest ideal." *(M.A. Karandikar, Islam in India's Transition to Modernity, pp 166-67)* हैदरींचे मत स्पष्ट होते, ''भारतीय मुसलमान जर अशोक, चंद्रगुप्त मौर्य यांच्या मोठेपणाने प्रभावित होणार नाहीत; अजंठा आणि वेरुळ येथील चित्रे आणि शिल्पकलांच्या सौंदर्याने आनंदित होणार नाहीत, अथवा त्यांचा अभिमान वाटणार नाही; श्रीकृष्ण व बुद्ध यांच्या सखोल विचारातून त्यांना जीवनरस मिळणार नाही, तर ही घटना दुर्दैवी म्हणावी लागेल. ही दुर्दैवी घटना म्हणजे हिंदी राष्ट्रवादाचा मृत्यूच होय.'' हिंदी वा भारतीय राष्ट्रवाद ही संकल्पना विनासंघर्ष सर्वमान्य होणारी आहे. लो. टिळकांना ती मान्य होती व १९२० सालापर्यंत टिळकभक्त जीनांनादेखील ती मान्य होती. नागपूर काँग्रेसनंतर त्यांच्यात कडवटपणा आला. इहवादी जीना जातीयवादी जीना झाले. ''येथे हिंदू आहेत, मुसलमान आहेत, ख्रिश्चन आहेत... पण भारतीय (इंडियन/हिंदी) नावाचा गट (स्पीसीज्) असल्याचे आपल्या ऐकिवात नाही'', असे उत्तर त्यांनी गांधीजींना व नेहरूंना दिले. जीनांचे हे विधान उद्धृत करून नेहरूंचे कॅनडियन चरित्रकार मायकेल ब्रेचर लिहितात, "Four thousand years of history evaporated in one sentence."

४. फाळणीनंतर भारतातील साडेचार कोटी मुसलमानांना एकदम आपण सत्ताहीन व पोरके झालो आहोत असे वाटू लागले. इस्लामच्या इतिहासात अशी घटना प्रथमच घडत होती. त्यांची संख्या कमी नव्हती पण ती एका विशाल उपखंडात विखुरलेली होती. खरे सांगायचे तर इस्लाम अरेबियातून बाहेर पडल्यावर इस्लामचे जुने नियम गुंडाळले गेले व इस्लामला वेगवेगळ्या स्थळी वेगवेगळ्या संस्कृतीशी जमवून घ्यावे लागले. १९४७ नंतर भारतात एकाधिकारशाहीची सवय असलेल्या इस्लामला लोकशाहीशी समझौता करावा लागला. भारतात उरलेल्या मुसलमानांना एवढे *'डीमॉरलाईज'* वाटू लागले की त्यांचे नेतृत्व घ्यायला कोणी पुढेच येईना. मौ. आझाद होते, पण मुसलमानात ते लोकप्रिय नव्हते, व हिंदू त्यांचा द्वेष करीत. अशा वेळी सरदारांचे शब्द खरे ठरतात की काय असे वाटू लागले. ''या जगात फक्त एकच राष्ट्रीय मुसलमान शिल्लक आहे व त्याचे नाव आहे जवाहरलाल मोतीलाल नेहरू.''

५. पाकिस्थानाची किंमत किती? एक दशलक्ष मृत्यू, एक कोटी घराबाहेर हाकललेले व गेली सत्तर वर्षे सतत संघर्ष. ६१ वर्षांनंतर जास्त माणसे मारली वा बेघर केली गेली, जास्त मालाची हानी झाली व जीनांनी निर्माण केलेल्या राष्ट्राची जगभर बदनामी झाली. जीनांना कधी वाटले असेल का की त्यांचे पाकिस्थान

एवढ्या लवकर 'रोग कंट्री' होईल? काय नशिब असते एकेकाचे!

६. पाकिस्थानी जेथे जातात तेथे ते 'संशयित' म्हणून त्यांना लोक ओळखतात. भारतीयांपेक्षा पाकिस्तान्यांना 'दोन राष्ट्रां'च्या सिद्धांताची अडगळ उगाचच बाळगावी लागते. पाकिस्थानास जगात 'फेल्ड राष्ट्र' म्हणून ओळखतात. पाकिस्थानास 'तालिबानांचा देश' म्हणून जग ओळखते. इंग्लंड व अमेरिकेतील पाकिस्थानी आपण इंडियन आहोत, असेच आग्रहाने सांगतात. पाकिस्थानी म्हटले की जग तिरस्काराने त्यांच्याकडे पाहणार याची त्यांची एवढी खात्री झाली आहे.

७. मुस्लीम देशात सुधारणांचे वारे वाहू लागले होते, पण भारतात मात्र मौ. मौदुर्दीसारखे मुस्लीम नेते भारतीय मुसलमानांना मध्ययुगात खेचून नेत होते. बंगालच्या बद्रुहुजा या खासदारांनी तर लोकसभेत विष ओकून गृहमंत्री गुलझारीलाल नंदा यांना प्रक्षुब्ध केले. सैय्यद बदरुहुजा म्हणाले, "Secularism is a snare and delusion, it is a fraud and a deception... Secularism! Thy name is hypocrisy, thy name is treachery, thy name is corruption, thy name is bribery... fifth and abomination. Thy name is exploitation of the minorities, particularly of the religious Muslim minority, spoilation and ruination of the Muslim minority." गोंधळलेल्या नंदाना काय बोलावे ते क्षणभर सूचेना. स्वतःला सावरून ते एवढेच म्हणाले, "I wonder how, in a few minutes, one could pour so much venom." येणाऱ्या आतंकवाद्यांच्या आगमनाची ती जणू नांदी होती.

८. मुसलमानांचा जुना हटवाद आज आतंकवादाच्या नव्या रूपाने जगास भेडसावू लागला आहे. आयसिसला ख्रिस्ती युरोपचे रूपांतर मुस्लीम युरोपात करण्याची स्वप्ने पडू लागली आहेत. त्यानंतर क्रमांक आफ्रिका व ऑस्ट्रेलियाचा. ट्रंपने त्यांना अमेरिकेत थारा मिळणार नाही असे जाहीर केले आहे.

■■■

हिंदू द्वेष्टे – २

अ) ओळख

स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेसने (म्हणजे गांधी-नेहरू अँड कंपनीने) इंग्रज सल्लागारांमुळे (उदा. मौंटबॅटन दांपत्य) जुनी *कलोनियल* शासन व्यवस्था पुढे चालविली. १८५७ सालानंतर इंग्रज बरेच कांही शिकले. १८५८ ते १९४७ या काळात इंग्रजांसाठी 'मुस्लीम तुष्टीकरण' ही गरज होती. १९३७ व १९४६ मधील अनुभवाने शहाणे झालेल्या काँग्रेसला सत्तेवर १०० वर्षे राहण्यासाठी हा 'शॉर्ट कट' बरा आहे, असे वाटले. ५० टक्के मतदान होते. याचा अर्थ जिंकण्यासाठी २६ टक्के मते लागतात. १० टक्के दलित, १० टक्के आदिवासी व १० टक्के मुसलमान म्हणजे झाले ३० टक्के. या अडाणी मंडळींची किंमत मोजली की काम फत्ते! एका वॉर्डात चार पिंपे दारू व काही लाख रुपये वाटले की सत्ता हाती येते. कशाला करायचे लांगूलचालन सवर्ण सुशिक्षित मतदारांचे? एकदम स्वस्त व साधा सौदा. विरोधी पक्षांना हे गणित समजायला ३-४ दशके लागली.

ब) मानसशास्त्र

इंग्रजांनी 'पॅरिटी' व्यवस्था शोधून काढली. मुसलमान अल्पसंख्यांक होते. ते बहुसंख्यांक या जन्मात होऊ शकणार नव्हते. म्हणून इंग्रजांनी त्यांना झुकते माप देऊन हिंदू व मुसलमान यांना समतोल ठेवण्याची व्यवस्था शोधून काढली. त्यांना जास्त सवलती, जास्त फायदे व कमी शिक्षा देऊ केल्या. काँग्रेसने इंग्रजांची लोकशाही आणली. लोकशाही म्हणजे निवडणुका. मुस्लीम लीगने वांधा काढला :

मुसलमान या जन्मी निवडणुका जिंकू शकणार नाहीत. कॉंग्रेसने लीगवाल्यांना समजावले, ''आम्ही तुमच्यावर अन्याय होऊ देणार नाही. कासव व ससा यांच्या शर्यतीत ससा जलद धावत असेल तर आम्ही सशास हळू धावायला भाग पाडू व कासवास शर्यत जिंकून देऊ. यास *पॅरिटी सिस्टीम* (सम-व्यवस्था) म्हणतात. ती आम्ही इंग्रजांकडून शिकलो आहोत.''

क) यादी

भारतातील हिंदू द्वेष्ट्यांची संपूर्ण यादी या लहानशा पुस्तकांत देणे अशक्य आहे. मात्र, गुप्तचर खात्यापाशी प्रत्येक राज्यातील अशा गुन्हेगार *(अनडिझायरेबल)* व्यक्तींचे व त्यांच्या संस्थांचे पत्ते व फोन नंबरसकट (ठेवलेल्या बायांच्या नाव-गाव-मोबाईल नंबरसकट) यादी मिळते. कंप्युटरमुळे ती आता अद्ययावत (अपटुडेट) ठेवणे शक्य झाले आहे. मी कांही निवडक मंडळींची नावे व त्यांची माहिती सांगतो.

ड) मुसलमान

१. **अस्सल** : भारतात अस्सल मुसलमान आहेत कुठे? गेल्या हजार वर्षात रक्ताची एवढी भेसळ झाली आहे की पुसू नये. इंग्रज आल्यावर येथे अँग्लो-इंडियन्स् निर्माण झाले. मुसलमान आल्यावर बाटगे. अँग्लो-इंडियन च्या स्टाईलवर मुस्लिंदू. अँग्लोइंडियन्स हळूहळू नाहीसे झाले. थोडे राहिले ते आता ऑस्ट्रेलिया वा अमेरिकेत राहतात. याउलट, मुस्लिंदुंची संख्या सशांप्रमाणे भराभर वाढत गेली. त्यांना न्याय मिळत नाही या सबबीवर त्यांनी पाकिस्थान मागितले. तरी अजून त्यांची भारतात आमच्यावर अन्याय होतो, हे तक्रारीचे टुमणे चालूच आहे. गांधी-नेहरू घराण्याच्या मेहेरबानीमुळे आज जम्मू-काश्मीर, आसाम व बंगाल येथे जवळ जवळ ९० टक्क्यांवर मुसलमान लोकवस्ती आहे. भारतात १८.४ कोटी मुसलमान राहतात. भारताच्या ६७५ जिल्ह्यांपैकी ८६ जिल्ह्यात २० टक्क्यांपेक्षा जास्त मुसलमान राहतात व १९ जिल्ह्यांत ५० पेक्षा जास्त टक्के मुसलमान राहतात. *(इंडियन एक्सप्रेस, ३ सप्टेंबर २०१४)* यांना भावी पाकिस्थाने म्हणता येईल.

२. **बाटगे** : बहुतेक मुसलमानांना माहीत आहे, पूर्वी ते कोण होते ते. माझे फिजिक्सचे प्राध्यापक मित्र व मुस्लीम सुधारक ॲक्टिव्हिस्ट प्रा. बंदूकवाला मला सांगतात, ''३०० वर्षांपूर्वी आम्ही त्रिवेदी होतो.'' ''मी पूर्वी हिंदू होतो.'' यांचे नीट ब्रेन वॉशिंग झाले तर वैमनस्य बरेच कमी होऊ शकेल व भारतीय राष्ट्रवाद वाढीस लागेल. शेजारी पाकिस्थानला नेमके ते नको आहे, त्यास येथे सतत दंगे

व्हायला पाहिजे आहेत, लोकांचा एकमेकांवरचा अविश्वास वाढावयास पाहिजे, म्हणजे त्यास भारतावर स्वारी करून भगवा भारत, हिरवा भारत करता येईल. त्यास महत्त्वाकांक्षा म्हणतात. ते नेमके आपल्याला टाळावयाचे आहे. आपल्याला ''जगा आणि जगू द्या'' *(लीव्ह अँड लेट लीव्ह)* हे धोरण येथे राबवायचे आहे. प्रेमाने प्रेम वाढते, द्वेषाने द्वेष वाढतो. धर्म घरी ठेवा, त्यास रस्त्यावर आणू नका. तुमचा धर्म तुम्ही पाळा, आमचा धर्म आम्ही पाळतो. तुम्ही शांतीने रहा, आम्ही शांतीने राहतो. शांती हा सनातन धर्माचा पाया आहे तर दंगे, युद्धे हा अब्राहमिक धर्मांचा पाया आहे.

३. खान, आमीर : एके काळी आमीर खानाने मोठ्या प्रमाणावर हिंदू व मुसलमानांची सहानुभती कमावली होती. त्याची *सत्यमेव जयते* ही टीव्हीवरील मालिका मानवी हक्कांवर प्रकाश टाकल्यामुळे खूप गाजली होती. पुढे त्यास काय दुर्बुद्धी झाली ते कळत नाही, बहुधा कीर्ती त्याच्या डोक्यांत शिरली असावी, पण त्याचा मुखवटा गळून पडला व तो हिंदू, भाजप व नरेंद्र मोदी हे तीन विषय आले की इतर मुसलमानांपेक्षा निराळा नाही, असा अनुभव आला. त्याची बायको हिंदू आहे. तिने आपण भारतात सुरक्षित नाही, आपण देश सोडायला हवा, असे आपल्याला सांगितले, असे त्याने टीव्हीवर सांगितले. यावर वेगळे भाष्य करायची जरूर नाही.

४. खान, शाहरूख : आमीरप्रमाणे शाहरूखची पत्नीदेखील हिंदू आहे. मात्र, त्याची मुले मुसलमान म्हणून वाढतात. वेळ येताच तो *मायनॉरिटी कार्ड* वापरतो. त्याचे व आमीरचे मुस्लीम फॅन्सचे वर्तुळ एवढे प्रचंड आहे की त्याला हिंदूंच्या पाठिंब्याची जरूरच नाही. आमीर काय, किंवा शाहरूख काय, धंदा चांगले जपतात. हिंदूंनी त्यांच्या सिनेमावर बहिष्कार टाकला तर ते त्यांना परवडण्यासारखे नाही. मुसलमान गरीब आहेत, त्यांना सिनेमा पाहणे किती परवडते, त्यांच्या प्रमाणाचे कोणीतरी संशोधन केले पाहिजे. भारतात रोज १० कोटी लोक सिनेमा पहातात. वस्तीच्या प्रमाणांत रोज ८ कोटी हिंदू व २ कोटी मुसलमान सिनेमा पाहतात: परदेशात किती भारतीय आठवड्यात किती हिंदी सिनेमा पाहतात त्याचे आकडे उपलब्ध नाहीत. कमाईतील १० टक्के का २० टक्के का ५० टक्के दाऊद (म्हणजे पाकिस्थान वा आयसिस) काढून घेते तेही बघायला पाहिजे. नेहरूंपासून गोळवलकर-सावरकरांपर्यंत हिंदू नेत्यांना अर्थशास्त्र म्हटले की फारसे पसंत पडत नाही. त्याचा या नव्या युगात विचार होणे महत्त्वाचे आहे.

५. खान, सलमान : अबदुल रशीद सलीम सलमान खानचा जन्म

१९६५ सालचा, इंदूर (म.प्र.) चा. *हम आपके है कौन?* या माधुरी (नेने) बरोबर काम केलेल्या सिनेमामुळे तो एकदम पुढे आला. त्याच्या दहा सिनेमांनी त्यास एक बिलियन रूपये (१५ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स) कमावून दिले आहेत व हा त्या उद्योगातील उच्चांक समजला जातो. जगात टॉप कमाई करणाऱ्या नटात त्याचा ७१ चा नंबर लागतो. गाडीने ५ जणांना ठार करणे, ऐश्वर्या रायला सतावणे, बेकायदा शिकार करणे वगैरे भानगडींसाठी तो कुप्रसिद्ध आहे. त्याला ५ वर्षांची तुरुंगवासाची सजा झाली होती पण संजय दत्तप्रमाणे सेक्युलर भारत सरकारने त्यास उदार होऊन छोड दिया...

६. **हबीब, इरफान** : शेवटी मोदी सरकारने याची गच्छंती केलीच. याने आझादांपासून स्फूर्ती घेऊन शिक्षण क्षेत्रात धुडघूस घालून विद्यार्थ्यांच्या ४-५ पिढ्यांचे पार वाटोळे केले आहे. याचे पिताश्री महंमद हबीब. या महंमदाने मुस्लीमांच्या इतिहासाचे पुनर्लेखन केले व साऱ्या विद्यार्थ्यांना खोटा इतिहास शिकविला, उदा. मुसलमान चांगले होते, त्यांनी भारतात वाईट असे काही केलेच नाही, त्यांच्या भाटांनी धन्यास बरे वाटावे म्हणून अतिशयोक्ती करून इतिहासात काय वाटेल त्या गोष्टी घुसडल्या व मुसलमानांना बदनाम केले. मुलाने रोमिला थापर यांची मदत घेऊन बापाची गादी पुढे चालविली व तो शिक्षण क्षेत्रात ४० वर्षे दादा होऊन बसला. ब्राह्मणांवर याचा फार मोठा राग. इतिहासात जे काही वाईट दिसते ते सारे या ब्राह्मणांनी केले, असा याचा दावा.

७. **ओवाईसी, अकबरउद्दीन** : तो व त्याचा भाऊ असाद उद्दीन भारतात राहून भारताविरुद्ध काय वाटेल ते गरळ ओकत असतात व मुसलमानांना चिथावणी देत असतात. कासीम रझवी व त्याचे रझाकार ह्यांचे हे आधुनिक अवतार आहेत. 'मला अर्धा तास द्या, मी साऱ्या हिंदूंची कत्तल करून दाखवितो', अशी त्यांनी धमकी दिली होती. या बंधुद्वयास भारतास दारुल इस्लाम बनवायचे आहे. पंत प्रधान नरसिंह रावांना त्यांनी दिलेली विशेषणे : कातील (खूनी), दरिंदा (राक्षस), बेईमान, धोकेबाज व चोर. ते चीन वा रशियात असते तर आज कॉंसेंट्रेशन कॅंप मध्ये खडी फोडत असते किंवा कदाचित् यापूर्वीच गोळीने वर पोचले असते. काय करणार, लोकशाही आहे ना भारतात? ते सतत हिंदूंचा द्वेष करतात व येथील मुसलमानांना येथे लौकरात लौकर पाकिस्थान स्थापन करण्याची चिथावणी देत असतात.

८. **गीलानी व इतर काश्मीरी अलगवादी** : भारत सरकारची - त्यात मोदीपण आले- नीती समजणे फार फार अवघड आहे. देशद्रोह्यांचा सन्मान व

राष्ट्रप्रेमींच्या वाट्याला हेटाळणी व अपमान. या देशद्रोह्यांना कशाला द्यायचे झेड संरक्षण? सुंठेवाचून खोकला जात असेल तर काय हरकत आहे? कॉंग्रेसने यांना 'पाळले' होते.

९. नाईक, झाकीर : हा व्यवसायाने डॉक्टर. इस्लामचा उद्धार करण्याचे खूळ त्याच्या डोक्यात घुसले व तो मुल्ला बनला. हिंदू गणपती देवदेवता यावर त्याचा मोठा घुस्सा. कारण ती देवता हिंदू, बौद्ध व जैनांना एकत्र आणते. तो भयंकर हुषार व तेवढाच 'चालू' मुल्ला आहे. त्याने हिंदू, बौद्ध व जैन धर्माचा अभ्यास केला आहे, पण त्यांचे खंडण करण्याच्या दृष्टीने. त्याच्याजवळ अगणित संपत्ती आहे. तो जगभर भाषणे देत फिरतो व वाटवाबाटवी करतो. त्याच्या चिथावणीखोर भाषणांनी उत्तेजित होऊन अनेक तरुण आयसिसला रीक्रूट होतात व आतंकवादी बनतात. तो पळून फरारी झाला आहे.

१०. पटेल, आकार : कै. खुषवंतसिंगांच्या सायंकाळच्या व्हिस्की क्लबचा हा मुसलमान सभासद छुपा रुस्तम आहे. *ॲम्नेस्टी इंटरनॅशनलच्या* तो डायरेक्टर आहे. तो बंगलोरात राहतो. आजवर त्याने अनेक टोप्या बदलल्या आहेत : कधी संपादक, कधी स्तंभ लेखक, कधी लेखक, कशी ॲक्टिव्हिस्ट, वगैरे वगैरे. सर्वात नवी टोपी ॲम्नेस्टी इंटरनॅशनलच्या डायरेक्टरशिप ची. नरेंद्र मोदींनी काहीही केले की नियमितपणे त्यावर याची विरुद्ध प्रतिक्रिया ठरलेली. 'विरुद्ध मत म्हणजे देशभक्ती', असे त्याचे मत आहे. तो लिहितो, ''बहुसंख्य आतंकवादी मुसलमान नाहीत, ते हिंदू माविस्टस् आहेत.'' त्याचे पटेल हे आडनाव फसवे आहे, जसे त्याचे लेखन फसवे आहे. आता तर तो 'टाईम्स' व 'इंडियन एक्सप्रेस'मध्ये नियमितपणे लिहू लागला आहे.

११. अख्तर, जावेद : कवी, सिने गीते व सिने संवाद लेखक म्हणून त्यांचे नाव मोठे आहे. हनी इराणी ही त्यांची पहिली पत्नी, आता घटस्फोटिता. वडीलही सिने गीतकार. पणजोबा १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाचे सेनानी. जावेदना ''जादू'' म्हणून ओळखतात. राजेश खन्नाने सलीम खान व जावेद अख्तर यांना प्रथम सिने संवाद लिहण्याची संधी दिली. अंदाज, शोले वगैरे सिनेमांचे त्यांचे संवाद गाजले. २००९ साली त्यांना कॉंग्रेसने राज्यसभेचे खासदार बनवून घेतले. त्यांचा प्रथम 'भारत माता की जय' ला विरोध होता, तो आता निवळला आहे. सोनियांना ''मौत का सौदागर'चे कुप्रसिद्ध भाषण लिहून देणारे हेच ते जावेद अख्तर. मोदींनी त्यांना चांगला धडा शिकविला.

१२. आझमी, शबाना : जावेद अख्तर यांची ही दुसरी पत्नी. सिनेमा

नटी. दाऊविले (फ्रान्स) येथे आंतरराष्ट्रीय सिनेमा महोत्सव झाला. तेथे हीने अनेक मुलाखती दिल्या. सर्वांत समान गोष्ट होती ती हिंदू आतंकवाद्यांवर टीकास्त्र. आणि भाजपा सरकारवर टीका. कारण, अल्पसंख्यांकांना ते संरक्षण देत नाही. मात्र, तिने मुस्लीम आतंकवाद्यांविरुद्ध एक अक्षर काढले नाही. मागे *इंडिया टुडे*च्या परिसंवादात श्री श्री रवि शंकर व हिंदू गुरूंवर तीने खूप गरळ ओकले. २००२ मधील गुजरातच्या दंग्यांची तीने तुलना हिटलरने केलेल्या ज्यूंच्या कत्तलीशी केली. गोधऱ्याच्या गुंडांनी ५६ रामसेवकांना - त्यात ३२ स्त्रिया होत्या - गाडीचा डब्बा पेटवून मुसलमान गुंडांनी ठार मारले, त्यावर तीने चूप्पी साधली होती. कारण तो गुन्हा आपनेवाल्यांनी केला होता!

इ) लग्नामुळे ख्रिस्ती वा मुसलमान

१. **दत्त, बरखा** : पहा खाली हिंदू क्र. २३

२. **चतर्जी, अंगना** : अमेरिकेतील हिंदूद्वेषी लॉबीची प्रमुख. तिने रिचर्ड शापिरोशी लग्न लावले. हा सीआयआयएसमध्ये अँथ्रॉपॉलॉजी विभागाचा प्रमुख आहे. २०१० साली भारतात येण्यास त्यावर बंदी होती. काश्मीरी मुसलमानांच्या आझादीचा हा खंदा पुरस्कर्ता. हे जोडपे काश्मीरी मुसलमानांसाठी काम करते, परिसंवाद घडविते व काश्मीर स्वतंत्र व्हावे यासाठी खूप परिश्रम घेते. कुतूहल म्हणून मीही अमेरिकेत वॉशिंग्टन येथे त्यांच्या एका परिसंवादास १० डॉलर्स प्रवेश फी खर्च करून हजर राहिलो होतो. त्यांना कोण त्यांचा, कोण परका, ते लगेच कळते. त्यांनी मला बोलूनच दिले नाही!

३. **सेटलवाड, तीस्ता** : तीस्ता मूळची हिंदू पण जावेद आनंदने तिला योजना करून गटवली. दोघेजण पत्रकारित्व करीत होते. जावेदच्या संगतीने तीस्ता 'बनली.' इतकी की तीस्ता म्हणजे "एनजीओतून जास्तीत जास्त संपत्ती मिळविणारी ॲक्टिव्हिस्ट", असे समीकरण तयार झाले. तिच्या हिंदू द्वेषामुळे तिला आखाती देशातून पेट्रोडॉलर्सचा ओघ सुरू झाला. हा 'मनी पॉवर' तिच्या डोक्यात गेला व तिने गुजरातच्या दंग्यांचा फायदा घेऊन रग्गड पैसा दंगा पीडितांच्या नावाने गोळा केला. त्यामुळे, तिचे मुसलमान साथी व सहकारी चिडले. तिला त्यांनी *एक्सपोज* केली व तिच्याविरुद्ध केसही केली. खरे म्हणजे तिला लोकांच्या विश्वासाचा असा गैरफायदा उठविणे, याची काहीच गरज नव्हती. विनाशकाले विपरीत बुद्धीः ।

ई) ख्रिस्ती

१. **जन्माने ख्रिस्ती** : जॅफ्रेलॉट, ख्रिस्तोफर : या सुप्रसिद्ध फ्रेंच इंडॉलॉजिस्टने

फ्रेंच भाषेत भारतावर व हिंदूंवर अनेक ग्रंथ निर्मिती केली आहे पण सारे हिंदू द्वेष्टे वाङ्मय. फ्रान्समध्ये भाजपाची त्यांनी सर्वात जास्त नालस्ती केली आहे, विशेषतः हिंदू टेररिझम वरून. भारतीय घटनांवर इंडियन एक्सप्रेसमधून त्यांची राजकीय भाष्ये नियमितपणे प्रसिद्ध होतात. फ्रेंच अधिकारी व डिप्लोमॅटस् त्यांचे साहजिकच ऐकतात.

२. **डॉनिजर, वेंडी** : ही अमेरिकन इतिहासकार सतत अकलेचे तारे तोडत असते, कारण तिला खऱ्या हिंदू संस्कृतीची ओळखच नाही. ती लिहिते, "रामास वाटले, रावणाने बिघडविलेली सीता आपण घरात ठेवली तर प्रजानन बंड करतील व आपली सत्ता जाईल. रामाचे सीतेवर प्रेम होते पण राजकारणासाठी त्याने सीतेचा त्याग केला... राम व सीता एकत्र बसून दारू पीत व प्रेम करीत." तिने हिंदू धर्माची नालस्ती करण्यासाठी *'द हिंदूज्': भारताचा पर्यायी इतिहास'* लिहिला व तो पेंग्विनने प्रसिद्ध केला. त्याविरुद्ध शिक्षा बचाव आंदोलन झाले व साऱ्या पुस्तकांचा नाश करण्यात आला. या आंदोलनाने परदेशी लेखकांना एक मोठा धडा शिकावयास मिळाला, *"यू कांट टेक अस् फॉर ग्रांटेड."*

३. **विटझेल, मायकेल** : हार्वर्ड येथे हा अमेरिकन हिंदू-द्वेष्टा संस्कृत शिकवितो. कॅलिफोर्नियातील अमेरिकन शालेय पाठ्यपुस्तकातील हिंदू विरोधी उल्लेख गाळायला त्याचा सख्त विरोध होता. रोमिला थापरचा हात धरून हा *लिंग्विस्ट* स्वतःला आता इतिहासकार मानू लागला आहे. डाव्या भारतीय इतिहासकारात तो भलताच लोकप्रिय आहे. आमचे अज्ञानी उद्योगपती त्याला लाखो डॉलर्सचे दान देतात.

४. **नुसबॉम, मार्था** : अंगना चतर्जी आणि कं. ला मदत करणारी ही मार्था नंबर १ ची हिंदू द्वेष्टी अमेरिकन बाई. सुरवातीस ती अमर्त्य सेनांबरोबर काम करीत होती. त्यांच्याशी तिचे मधुर संबंध आहेत. २०१४ च्या निवडणुकी-आधी अमर्त्य सेन म्हणाले होते, "मला मोदी पंतप्रधान झालेले आवडणार नाही." मार्थाला ना आर्किऑलॉजीचे ज्ञान, ना संस्कृतचे, ना जिऑलॉजीचे, ना मेटॅलर्जीचे, पण ती अमेरिकेत इंडालॉजिस्ट तज्ञ म्हणून मिरविते. अशा बायांना (विषकन्या) लोकांना उल्लू बनवायला आवडते. नोबेल प्राईज विनरची साथ असल्यावर आणखी काय पाहिजे? जलनेवाले जला करे.

५. **क्लिंटन, हिलारी** : ही कामातूर प्रे. बिल क्लिंटनची धर्म पत्नी. हीने सावरून घेतले म्हणून साहेब इंपिचमेंटपासून वांचले. हिलारीची सचिव व सल्लागार पाकिस्थानी आहे. तिचे नाव हुमा महंमद अबेदीन. तिच्या भारतविरोधी धोरणामागे

ही सचिवीण बाई आहे. मुस्लीम आतंकवाद्यांकडून हीने मोठ्या प्रमाणावर पैसा गोळा केला आहे. त्यांचा आतंकवाद ही कसा बरे नष्ट करणार होती? ट्रंपने तिचा पराभव केला, हे हिंदु भारतासाठी बरे झाले.

बाटगे

१. **कांचा ईलाया** : त्यांचे *'व्हाय आय ॲम नॉट ए हिंदू?'* हे पुस्तक प्रसिद्ध आहे. त्यांचा हिंदू द्वेष, विशेषतः ब्राह्मणांचा द्वेष, विख्यात आहे. जगातील साऱ्या दुष्ट व खराब गोष्टींसाठी ब्राह्मण जबाबदार आहे, असे यांचे मत आहे. त्यामुळे ते कांहीही बोलतात, उदा. 'शाकाहार म्हणजे देशद्रोह.' सारे सुरुवातीला गोमांस खात असत. ते त्यांनी सोडले व त्यांचा ऱ्हास सुरू झाला. कारण, त्यांना मिळणारे प्रोटीन बंद झाले.

२. **जॉन दयाल** : साऱ्या हिंदू द्वेष्ट्या ख्रिस्ती पादऱ्यांमध्ये विषय नीटनेटका मांडणारा हा एकमेव बिशप. इतिहासात *कलोनियल* युरोपियनांनी भारतीयांना *हेदन* समजून एवढी असहिष्णुता व अनादर दाखविला होता की जॉनना तो इतिहास आता पुसता येणे शक्य नाही. दक्षिण अमेरिकेत स्पॅनिश मिशनऱ्यांनी ॲझटक लोक व संस्कृती नष्ट केली, तसे भारतात घडले नाही, एवढेच मान्य करता येईल. टीव्ही डीबेटमध्ये तो नियमितपणे दिसतो व हिंदूंना शिव्याशाप देतो. नॉन स्टॉप बडबडत राहणे हे त्याचे वैशिष्ट्य.

३. **फादर सेड्रिक प्रकाश** : हा बाटगा पाद्री अमेरिकेत हिंदूविरुद्ध खूप विष पसरवितो. जून २००२ मध्ये वॉशिंग्टनच्या यू.एस. *कमिशन फॉर इंटरनॅशनल रिलिजियस फ्रीडम* समोर याने सांगितले, ''भारतात धार्मिक सहिष्णुता नाही.'' मोदींचा हा फादर पहिल्या क्रमांकाचा शत्रू. तीस्ता व जॉन दयाल यांच्या सहाय्याने तो सतत भारतावर टीका करीत असतो. त्यावर त्याचे पोट भरते.

लिबरल्स्

प्रो. रजनी कांत हार्वर्ड येथे शिकवितात. त्यांचे लिबरल विचार ऐका, खूष व्हाल : ''साधारणतः १७ व्या शतकांत पोस्ट रिनेसन्स युरोपात *युरोसेंट्रिक मॉडर्निझमची* सुरवात झाली. अमेरिका म्हणजे गेल्या ४०० वर्षातील युरोपियनांच्या विचारांची गोळाबेरीज. आई व मूल यांचे नाते म्हणजे नैतिकतेची खरी सुरवात. स्त्री ही खरी शांतीदूत आहे. पुरुष हा जात्याच आक्रमक असतो. अजून आपण ट्रायबलच आहोत. नावे निराळी. वृत्ती तीच पाशवी. राज्य म्हणजे धर्मादाय संस्था नाही. राज्यापाशी हिंसेची एकाधिकारशाही असते. ते भीतीदायक आहे. आजची

राष्ट्रे *(नेशन-स्टेटस्)* म्हणजे वाळुवरची रेषा आहे, आज आहे, उद्या नाही. त्यांच्यासाठी आपण आपले प्राण कां घालवायचे? टोळ्या नेहमीच प्रवाही असतात. त्या एकाच प्रदेशाला चिकटून कधी रहात नाहीत. मानवी जात प्रवाही आहे व तीची दिशा व गती माणसामाणसामधील संबंध व भाषा यावर अवलंबून असते.'' *(टाईम्स ऑफ इंडिया, १२ ऑक्टो. २०१७)*

आपल्या देशांत या घातकी जमातीचा पाहिजे तेवढा पुरेसा अभ्यास झालेला नाही. लिबरॅलिझम् हा गुण नाही, ती विकृती आहे. चाणक्याने त्याच्याविरुद्ध खूप लेखन केले आहे. शत्रूस चाणक्य काटा समजतो. पायात रूतलेला काटा तो काढून टाकतो, त्यास जाळतो व ती राख पाण्यात टाकून ते पाणी तो पिऊन टाकतो. प्रत्येक राजाने शत्रूस ही वागणूक द्यावी असे तो बजावतो. नादान हिंदुंनी चाणक्याचे ऐकले असते तर हिंदुस्थानाची अवनती झाली नसती. ना येथे मुसलमानी राजे राज्य करते, ना तागडीवाले इंग्रज. आपल्याकडे एकुलता एक व्यापारी राजा म्हणजे राजा हर्ष. ब्राह्मण राजे अनेक झाले. पेशवे शेवटचे. महाराष्ट्रातील कांही क्षुल्लक संस्थानिक अलीकडचे, पण त्यांच्या हाती सत्ता नव्हती. भारताच्या रक्तांत 'रुथलेसनेस'चा जीन क्षत्रियांत आहे, इतरांत तो अभावाने आहे. हिंदु राजा दुसऱ्या हिंदु राजाशी लढत होता तोपर्यंत तडजोडी ठीक होत्या. मुसलमानांशी व इंग्रजांशी लढताना आपला पराभव अटळ होता. रुथलेसनेससमोर शांतीदूत निष्फळ ठरतो. कारण, त्याचे धोरण असते, *माय वे और हाय वे.* अमेरिकेत लिबरल रुझव्हेल्टने पराभूत युरोप व जर्मनीवर अमर्याद पैसा खर्च केला. जरूर नव्हती. त्या देशांची दुसऱ्या महायुद्धांत कडक इस्त्री झाली होती. ब्रिटनच्या लिबरल चेंबरलेनला हिटलरचे तुष्टीकरण करण्याची गरज नव्हती. प्रत्येक देशांत लिबरल गांधी हा वायरस असतो वा शत्रूकडून बुध्याच टोचला जातो. भारतास तर धर्मराजापासून वारसा लाभला आहे. आपली स्थिती भीमासारखी आहे. भीम खूप चिडतो, पण त्याला स्वस्थ बसावे लागते. भारताचे दुसरे नाव आहे लिबरलीस्थान. बांगला देशींनो, तुम्ही या. रोहिंग्यांनो, तुम्हीपण या. चीन्यांनो, तुम्हीपण या. कारण, आमच्या देशाची परंपरा आहे- लिबरॅलिझम्ची. आवो, कोईबी आवो ओर राज करो. हम संजय दत्त जैसी झप्पी देंगे ओर गुलाब से आपका स्वागत करेंगे. गर्वसे कहो, हम लिबरल है।

हिंदू

१. **गांधी, मोहनलाल करमचंद** : जग त्यांना महात्मा म्हणून ओळखते. त्यांचे जगाच्या इतिहासाचे सामान्य ज्ञान फार कमी होते. त्यांना गीतासुद्धा माहीत

नव्हती. इंग्लंडमध्ये कोणीतरी त्यांना हटकले म्हणून ती प्रथम वाचली. त्यांना मुसलमानांच्या अत्याचारांची विशेष कल्पना नव्हती. त्यांच्या बेकारीच्या काळात मुसलमान दादाभाई अमीन यांनी दक्षिण आफ्रिकेत नोकरी दिली. त्या उपकारांचे ओझे त्यांच्या डोक्यावर होते. ''मी जास्त चांगला मुस्लीम आहे, मी कुराण जाणतो,'' असे ते म्हणत. त्यांचे सारे धोरण हिंदू-मुस्लीम ऐक्यावर आधारित होते. ''मी मुसलमान आहे असे समजून तुम्ही माझ्याशी बोला, मला इस्लामविषयी अतिशय प्रेम आहे,'' असे त्यांनी शौकत अलींना सांगितले होते. पण मुस्लीम लीगच्या आक्रमक नेत्यांना ते कधीच पटले नाही व त्यांची पाकिस्थानची मागणी कायमच राहिली. दुसऱ्या गोलमेज परिषदेत त्यांनी मुसलमानांना कोरा चेक दिला होता. हिंदू ७७ टक्के होते व मुसलमान २३ टक्के. गांधीजींना एवढे अगतिक व्हायचे कांहीच कारण नव्हते. डॉ. लोहियांनी 'कोरा चेक देणाऱ्या गांधीजींना फाळणीसाठी जबाबदार' धरले आहे. १९४८ च्या जानेवारीच्या १ ल्या आठवड्यात ''भारताशी एकनिष्ठ नसलेल्या मुसलमानांनी पाकिस्थानास जावे,'' असे कडक उद्‌गार काढल्याबद्दल सरदार पटेलांना त्यांनी झापले होते व त्यांना जातीय ठरविले होते. त्यांनी जीनांना *कायदे आझम* अशी पदवी देऊन त्यांना उगाचच मोठे बनविले होते.

गोसंरक्षण, संस्कृतचे शिक्षण, स्वदेशी, रामराज्य, शेतीचे भारतीकरण, खेडेगाव हे भारताचे एकम् (युनिट) अशी भाषा वापरणारे गांधीजी मुस्लीम धार्जिणे असू शकतील? लोकांना ते खरे वाटत नाही. पण ते कडु सत्य आहे. हैदराबादेत निझाम ८८ टक्के असलेल्या हिंदू जनतेचा छळ करीत होता. म्हणून लोकांनी निझामाविरुद्ध सत्याग्रह केला. गांधीजींनी त्यास विरोध केला. त्यांनी मुसलमानांनी केलेली बाटवाबाटवी चालू ठेवली पण आर्य समाजाने केलेल्या मुसलमानांच्या 'शुद्धी'वर बंदी आणली. इंग्रज जाऊन स्वदेशी निझाम आला तर ते त्यांना चालणार होते. यासाठी सावरकरांनी त्यांना विरोध केला होता. 'सावरकरांना अंदमानातून सोडा,' अशा विनंतीपत्रावर त्यांनी सही केली नाही व ''कोण सावरकर?'' असा प्रश्न विचारला. खिलाफत चळवळ सुरू होती त्यावेळी त्यांनी अफगाणिस्थानच्या अमीरांना ''या व भारतावर स्वारी करा'' असे पत्र लिहले. शिवाजी व गुरू गोविंदसिंगांना त्यांनी ''वाट चुकलेले देशभक्त'' ठरविले. स्वामी श्रद्धानंदांचा १९२६ साली खून झाला. त्यांच्या मारेकऱ्यास गांधीजींनी पाठीशी घातले व त्याचा बचाव केला. सरदारांनी सोमनाथाचे पुनर्जीवन केले ते त्यांना आवडले नव्हते. राष्ट्रपतींनी पूजेसाठी बसू नये अशी त्यांची व नेहरूंची मागणी (हट्ट) होती. काश्मीरात

पाकिस्थानशी युद्ध चालू होते. गांधीजींनी ५५ कोटी रुपये पाकिस्थानला द्या, असा हट्ट केला व उपास करून ते पैसे द्यायला भाग पाडले. आजही काश्मीरचा प्रश्न सुटलेला नाही. काश्मीरच्या हिंदू महाराजांना काढून त्यांच्या जागी शेख अबदुल्लांना ठेवणारे हेच ते महात्मा! शौकत अल्ली व महंमद अली म्हणजे शुद्ध १०० नंबरी सोने असे सर्टीफिकेट (२३ ऑक्टोबर १९२४ चा *यंग इंडियाचा* अंक) देणारे हेच ते बापुजी. त्याच अली बंधुंनी त्यांना *काफीर* म्हणून भरपूर शिव्या घातल्या. मोपला मुसलमान मारेकऱ्यांना त्यांनी *धर्मवीर* म्हटले. 'माझ्या मृत शरीरावरूनच पाकिस्थान मिळेल,' असे त्यांनी हिंदूंना आश्वासन दिले होते, पण जून १४-१५, १९४७ च्या दिल्लीच्या एआयसीसीत त्यांनी शब्द फिरविला व पाकिस्थानाच्या मागणीस संमती दिली. म्हणून चिडून संपादक नथुराम गोडशांनी "ही पीडा स्वतंत्र भारतात नको," असे म्हणत त्यांना स्वर्गात धाडले.

२. **नेहरू, जवाहरलाल** : गांधीजींचा हा वारस व चेला "शिक्षणाने इंग्लिश, संस्कृतीने मुसलमान व जन्माच्या अपघाताने हिंदू" असल्याचा दावा त्यांनी आपल्या आत्मचरित्रात केला आहे. गांधीजींप्रमाणे पं. नेहरूंना हिंदू असल्याचा अभिमान नव्हता. कारण ते अपघाताने हिंदू होते. इंटरनेटवर त्यांच्या धर्माविषयी बराच वाद आहे. लो. टिळकांपासून राहुल गांधीपर्यंत साऱ्यांचे जन्मस्थान गर्वाने दाखविले जाते. कोणीच नेहरूंचे जन्मस्थान निश्चितपणे दाखवू शकत नाही. भारताच्या राजधर्माविषयी *(स्टेट रिलिजियन)* त्यांचे तोंड सदा बंद असे. ते स्वतःस 'ॲग्नॉस्टिक' म्हणवीत. तरुण सावरकर लंडनमध्ये शिवाजी, राणा प्रताप यांच्यासारख्या वीरांच्या जन्मतिथ्या उजवीत, तेव्हा नेहरू इंग्रजप्रेमी असल्यामुळे 'तशा' उत्सवांपासून चार हात दूर रहात. मेकॉलेचे स्वप्न नेहरूंच्या रूपात प्रत्यक्षात अवतरले होते - रंगाने व रक्ताने भारतीय, पण आवडीनिवडी, मते, चारित्र्य व बुद्धी यांनी इंग्रज. नेहरूंना हिंदी भाषा येत नव्हती, एका मौल्वीने त्यांना उर्दू व इंग्रज शिक्षकाने इंग्रजी शिकविली होती. त्यांना संस्कृतचा गंधही नव्हता. त्यामुळे इतरांपेक्षा मौ. आझाद त्यांना जास्त जवळचे वाटत. सरदार पटेल थट्टेने त्यांना 'एकमेव राष्ट्रीय मुसलमान' म्हणत. १९२७ च्या कलकत्याच्या कॉंग्रेसला *मिलाप कॉंग्रेस* म्हणून ओळखतात. मिलाप म्हणजे ऐक्य. त्यात २ ठराव पसार करण्यात आले : मशिदीसमोर हिंदू मिरवणूक आली की वाद्ये वाजविणे बंद करावे. खेडेगावात गाय मारण्याचा मुसलमानांना अधिकार आहे. या दोन ठरावांना खूप विरोध झाला. पण हिंदूंकडून. तो मुसलमानांचा असता तर नेहरूंनी आधी ऐकले असते.

नेहरू ख्रिस्ती व मुसलमान नेत्यांनी दाब आणला की दबत. शेख अबदुल्याने

३७० कलमाचा घटनेत आग्रह धरला व नेहरू विचार न करता झुकले. ईशान्य भारतीय ख्रिस्ती नेत्यांनी त्यांच्या मुलांना शाळेच्या शिक्षणक्रमात धार्मिक शिक्षण हवे, असा आग्रह धरला तेव्हा नेहरूंनी ख्रिस्ती व मुसलमान मुलांचा तो हक्क मंजूर केला. कलम २७ व २८ खाली हिंदू मुलांना तो अधिकार नाकारला गेला. मौ. महंमद अलींनी ठराव मांडला की कॉंग्रेस अध्यक्षाचे पद हिंदू व मुसलमान यांच्यात ५० : ५० असे वाटले जावे. गांधीजी व नेहरू यांच्यापैकी कोणीच त्या ठरावास विरोध केला नाही, उलट महंमद अलींच्या देशभक्तीची प्रशंसाच त्यांनी केली. नेहरूंनी भारताची फार मोठी जमीन पाकिस्थानला व चीनला देऊ केली. नेहरूंच्या जागी गांधीजींनी सरदार पटेलांना पहिले पंतप्रधान केले असते तर भारताचे निराळेच रूप जगास पहावयास मिळाले असते. (वाचा दादूमियांचा ग्रंथ : If Sardar were the First Prime Minister)

३. गांधी, इंदिरा : इंदिरा गांधींची बांगलादेशाची निर्मिती ही राजकारणात न भूतो न भविष्यति अशी सिद्धी होती. पण हाती जवळ जवळ एक लाख पाकी सैनिक युद्धकैदी आले असता काश्मीर प्रश्न त्यांनी कायमचा सोडविला नाही ही त्यांची अक्षम्य चूक होती. इंदिरेचे फिरोझशी लग्न करण्याचा निर्णय नेहरूंना मान्य नव्हता. फिरोझचा नेमका धर्म कोणचा याविषयी वादच आहे. जेव्हा मुसलमान मतदारांनी राष्ट्रपती मुसलमान पाहिजे असा हट्ट धरला, तेव्हा त्यांची मागणी इंदिरा गांधींनी मान्य केली. तीच गोष्ट सुप्रीम कोर्टात सर्वोच्च न्यायाधीशांच्या नेमणूकीसंबंधीची. त्यासाठी आपण हिंदू न्यायाधीशांची ज्येष्ठता डावलीत आहोत, याचीही त्यांना आठवण राहिली नाही. मुसलमान मुलांसाठी १० पॉलीटेकनिक्स् सुरू करा, अशी मागणी आली, लगेच त्यांनी ती मंजूर केली. मुसलमानांनी मागणी केली की युपीची दुसरी राष्ट्रीय भाषा उर्दू असावी व अलीगढ विश्वविद्यालयाची मुस्लीम रचना शाबूत ठेवावी, तेव्हा लोकसभेचे स्पेशल सेशन बोलावून तो कायदा बाईंनी मंजूर करवून घेतला. मुसलमान विद्यार्थ्यांसाठी कोणच्याही जातीची स्पर्धेची परीक्षा नसावी व त्यांना सेंट्रल रीझर्व्ह पोलीस फोर्स, बँक्स्, रेल्वेज् आणि पब्लिक सेक्टर कारखान्यात त्यांना नोकऱ्या द्याव्यात असे बाईंनी मान्य केले.

४. गांधी, राजीव : आजोबांप्रमाणे राजीव स्वतःस ॲग्नॉस्टिक म्हणत असे. पण ते जगासाठी. १ फेब्रुवारी १९८६ रोजी पोप जॉन दुसरे पॉल भारतात १० दिवसांच्या यात्रेत राजधानीत राजीव व सोनिया यांना भेटले होते व त्यांनी सर्वांना कॅथलिक धर्माची दीक्षा दिली होती. राजीवचे वडील पार्शी (?) व पत्नी ख्रिस्ती होती. १९८९ च्या निवडणुकीत ख्रिस्ती नेत्यांसाठी मिझोरामच्या निवडणूक

जाहीरनाम्यात राजीवने निवडून आल्यावर 'आपण ख्रिस्ती तत्त्वांप्रमाणे शासन करू व शाळातील शिक्षणक्रम त्यानुसार बदलू', असे आश्वासन दिले होते. मुसलमानांनी शाह बानो केसमधील सुप्रीम कोर्टाचा निकाल आम्हास मान्य नाही अशी धमकी दिली तेव्हा त्याने त्याप्रमाणे तो रद्द केला व भारतातील सर्वोच्च न्यायालयाचा अवमान केला. श्रीलंकेत विचित्र निर्णय घेऊन राजीवने हजारो भारतीय जवानांचा फुकट बळी दिला.

५. **गांधी, संजय** : मोरारजीभाईंनी मला सांगितले होते की मनाने संजय चांगला होता, पण आईबापाचे उद्ध्वस्त खाजगी नाते त्यास नडले व तोही मोटारी चोरण्यासारखा वेडेपणा करू लागला. तो निर्भय होता कारण त्यास राजाश्रय होता. त्याने सुरू केलेली साम्यवादी विरोधी चळवळ, मुसलमानांची केलेली नसबंदी व लाल किल्ल्यासमोरील त्यांची झोपडपट्टी काढून जुनी दिल्ली साफसूफ करण्यात दाखविलेली धडाडी प्रशंसनीय होती, पण दुर्दैवाने तो *मिसगायडेड मिसाईल* ठरला, कारण त्यास जे सल्लागार भेटले ते लुच्चे, लफंगे व स्वार्थी होते, त्यांच्यासमोर राष्ट्रीय ध्येय वा निष्ठा वगैरे कांहीच नव्हते. बदफैल्ली मुसलमान सल्लागारांमुळे तो हिंदू द्वेष्टा बनला. इंदिरा त्यास थांबवू शकली नाही. महादजी शिंद्यांपासून सयाजीराव महाराजांपर्यंत जे घडत आले ते इंदिरा गांधींच्या घरी घडले.

६. **गांधी, सोनिया** : गुलामीमुळे भारतीयांना स्वकियांपेक्षा परकीयांचे प्रेम जास्त. विशेषतः गोऱ्या चामडीचे. सोनिया ईटालियन होती, म्हणून मरायला टेकलेल्या काँग्रेसमध्ये ती शिस्त व सुव्यवस्था आणू शकली. गुलाम गोऱ्या चामडीचे चूपचाप ऐकतात. सोनिया खासदार होती. 'वसाहतवादा'मुळे गोऱ्या लोकांची ''पूजा'' करावयास भारतीय शिकले होते. चिदंबरम् आजही गुलामासारखे वागतात. आतंकवादी ईसरत जहानला मोदींची हत्या त्यांनी गृहमंत्री असताना करून दिली असती! कात्रोचीवर असलेले भ्रष्टाचाराचे आरोप त्यांना चांगले माहीत होते, पण अब्जावधी डॉलर्स घेऊन गृहमंत्र्यांनी त्यास सुरक्षितपणे जाऊ दिले! सोनियास भारतीयांचे हे 'गुलामी मानस' चांगले माहीत होते. तिने त्याचा भरपूर फायदा उठविला. दोन्ही युपीएच्या शासनकाळात जो भयंकर भ्रष्टाचार घडला त्यामागे तीची ही 'बेदरकारी' काम करीत होती. 'आम्हाला कोणी हात लावू शकत नाही', हा उद्धटपणा त्यामागे होता. मोदी सत्तेवर आल्यामुळे या राणी व्हिक्टोरिया बेकार व बेघर झाल्या आहेत. त्यामुळे त्यांचा कॅंसरही बहुधा वाढला आहे, त्यांना म्हणून पुन्हा पुन्हा अमेरिकेस जावे लागत आहे. २०१९ मध्ये मोदी हारले तर पुन्हा या सोनियाला अच्छे दिन येतील, या आशेवर ही आजारी सम्राज्ञी जगत आहेत.

काँग्रेसवाले तीला 'इंदिरेचा अवतार' मानून पूजा करतात.

७. गांधी, प्रियंका : कोणालाच कॅथॉलिक प्रियंकाच्या खाजगी जीवनात ढवळाढवळ करण्याची इच्छा नाही. नेता म्हणून राहुल कुचकामाचा सिद्ध झाला. लगेच गुलामांनी 'प्रियंकास राजकारणात आणा,' अशी मागणी सुरू केली. ती इंदिरेसारखी दिसते, ती इंदिरेची जागा घेईल, वगैरे कुजबुज सुरू झाली. तिनेही इंदिरेप्रमाणे भाषणबाजी सुरू केली. पेपरवाल्यांनी लोकांच्या प्रियंकाकडून अपेक्षा वाढल्या आहेत असा *मोटिव्हेटेड* प्रचार सुरू केला. एवढ्यात तिचा नवरा रॉबर्ट वाडेरा याचा हरियाणातील जमिनीबाबतचा कोट्यावधी रूपयांचा भ्रष्टाचार बाहेर आला. नवऱ्याची सारी काळी कृत्ये चव्हाट्यावर आली. युपीच्या निवडणूकीत प्रियंका चूप्प होती. नवरा रॉबर्ट तिला भोवणार असे दिसते. जावयास 'अष्टम ग्रह' समजतात ते खरे असावे.

८. गांधी, राहुल : राहुल दिसायला देखणा, बोलायला व्यवस्थित व वागायला बरा आहे, पण त्याला राजकारण जमत नाही. 'हिंदू आतंकवाद इस्लामी आतंकवादापेक्षा जास्त घातक आहे,' असे तो म्हणाला. लोकमत लगेच त्याच्याविरुद्ध गेले. मुसलमान मतदारांना तो खुश करायला गेला व स्वतःवर आफत ओढवून घेतली. त्याच्या व रॉबर्ट वाडेराच्या चिनी राजदूताबरोबर झालेल्या बैठकीत नेमके काय शिजले ते कोणासच माहीत नाही. त्याला पाहून पेशवाई बुडविणाऱ्या दुसऱ्या बाजीरावाची आठवण लोकांना येते.

९. सिंग, विश्वनाथ प्रताप (पं. १९८९-९०) : मांडाचे हे राजेसाहेब राजीव गांधींच्या बोफोर्समधील भ्रष्टाचारामुळे व भाजपाच्या पाठिंब्यामुळे पंतप्रधान झाले. पण ते दुर्बळ व हिंदू द्वेष्टे निघाले. जुम्मा मशिदीचे इमाम सैय्यद अबदुल्ला बुखारी यांनी ५० लाख रुपये तेथे गेस्ट हाऊस बांधण्यासाठी मागितले, ते राजेसाहेबांनी लगेच मंजूर केले. रमझान महिन्यात राष्ट्रपती व पंतप्रधान यांनी मुसलमानांसाठी इफतार पार्टी द्यावी, अशी मागणी आली, तीही या पंतप्रधानांनी मान्य केली. हज यात्रेसाठी भारत सरकारचा एक खास प्रतिनिधी मक्केसाठी जावा व हज यात्रा 'कव्हर' करण्यासाठी त्याने टीव्हीचा एक ताफा यात्रेकरूंबरोबर धाडावा, ही मागणीदेखील मान्य करण्यात आली. भारतीय घटनेच्या कलम २५ नुसार मुसलमान व ख्रिस्ती धार्मिक गुरूंना हिंदूंचे धर्मांतर करण्याचा हक्क त्यांनी दिला. मंडल आयोगाचा अहवाल प्रसिद्ध करून राजेसाहेबांनी जवळजवळ आपली राजकीय हत्या केली असे म्हणावे लागेल. अरेरे, हा गोरागोमटा गुणी राजा कपाळ करंटा निघाला.

१०. **रॉय, अरुंधती** : प्रणय रॉयची ही चुलत बहीण. तिचे पहिले लग्न जेरार्ड द कुन्हांशी झाले. प्रदीप कृष्णन् हा फिल्म मेकर तिचा दुसरा नवरा. कर्मठ मार्क्सिझम् व पुस्तकी बुद्धिवादाच्या बुरख्याखाली लपविलेला हिंदू द्वेष तिच्या शब्दाशब्दातून ओसंडतो. तिचे *गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज्* हे पुस्तक कुप्रसिद्ध आहे. माविस्टस्, नक्षलाईटस्, तमीळ ईलम् आणि काश्मीरी अलगतावादी यांच्या सहवासात ही बाई रमते. तेथे ती एकदम सुखावते. 'मोदी ब्राह्मणवादाचा प्रसार करतात', असा तिचा आरोप आहे. असहिष्णुतेच्या वादविवादात तिने तिचे राष्ट्रीय अॅवार्ड परत केले. तिकडे कोणी लक्षच दिले नाही. कोणी आपल्याला भाव देत नाही, हीच तिची खंत आहे.

११. **मल्लिका साराभाई** : ही सिने नटी, नर्तकी पण *ह्यूमन ट्राफिकींगसाठी* पकडली गेली. मोदींची दुश्मन. भाजपाची दुश्मन. कॉंग्रेसवाली. पक्की स्यूडो सेक्युलर.

१२. **थापर, करण** : आयआयटीव्ही चा हा मालक बीबीसीसाठी कार्यक्रम निर्माण करतो. १९६२ च्या युद्धात गाजलेले जनरल प्राण नाथ थापर यांचा हा सुपुत्र. रोमिला थापर त्याची आत्या. एवढी ओळख त्याच्या हिंदू द्वेषावर प्रकाश पाडायला पुरी आहे. ज्याच्या त्याच्यावर तो कुत्र्याप्रमाणे भुंकी. बाळ ठाकरेदेखिल त्यात सामील. अपवाद माधुरी नेनेची मुलाखत. कलाकार हुसेन त्याचा लाडका. त्यावर टीका केली की याचे पित्त उसळते. मोदींनी मात्र त्याचा नक्षा पार उतरवून टाकला. मोदींची ती *न झालेली मुलाखत* फार गाजली. ऐसी मुलाखत पुन्हा होणे नाही.

१३. **थापर, रोमिला** : इतिहासकार म्हणून त्यांचे नाव खूप मोठे आहे. कारण त्यांच्यावर बिपीन चंद्रांचा व इरफान हबीबचा वरदस्त आहे. जगातील सर्व ख्यातनाम इंडोलॉजिस्टस्शी त्यांचा सतत संबंध येतो. जुन्या भारतीय परंपरांचा तिरस्कार करीत आपण मोठे बुद्धीवादी आहोत असा टेंभा मिरविणे हे त्यांचे वैशिष्ट्य राहिले आहे. त्यातून त्यांच्या अनेक विकृत समजुती जन्मल्या आहेत.

१४. **रॉय, प्रणय** : एनडीटीव्हीचे हे सीईओ आहेत. त्यांची पत्नी राधिका रॉय ही कम्युनिस्ट बिंद्रा करात यांची बहीण. आता त्यांचा हिंदू द्वेष कां, ते समजेल. मग त्यांना बरखा दत्त व टेहेलकाचे तरुण तेजपाल मिळाले व लवरकच एनडीटीव्ही हे डाव्यांचे केंद्र (हब) बनले.

१५. **पी. चिदंबरम्** : दहा वर्षे हे साहेब सत्तेवर होते. कधी वित्तमंत्री तर कधी गृहमंत्री. २००९ साली गृहमंत्री असताना इश्रत जहान ही लष्कर-इ-तोयबाची सभासद होती या अॅफिडिव्हेटवर त्यांनी सही केली. मोदींच्या हत्येच्या कटात ती

सामील होती. एका महिन्याने त्यांनी दुसऱ्या ॲफिडेविटवर सही केली. त्यात ती कटवाली होती याचा सारा उल्लेख त्यांनी गाळून टाकला. सोनिया गांधींना विचारून त्यांनी तसे केले. कारण काँग्रेसला निवडणूक जिंकायची घाई झाली होती. त्यांचा खोटारडेपणा पुढे उघडकीस आला. काँग्रेसची सत्ता गेल्यावर 'इंडियन एक्सप्रेस'मध्ये रविवारी ते एकटे काँग्रेससाठी बॅटिंग करतात : मोदींच्या कोणत्या चुका झाल्या त्यावर नियमितपणे व फर्ड्या इंग्रजीतून लेख लिहितात. हिंदू टेररीस्ट हा त्यांचा शोध. त्यासाठी त्यांना नोबेल प्राईझ मिळायला हवे!

१६. **करुणानिधी** : सी.एन. अण्णा दोराय त्याचे गुरू. इंग्रजांनी भारतीयांना मूर्ख बनविण्यासाठी *आर्य-द्रविड सिद्धांत* निर्माण केला, त्याचा अण्णांनी भरपूर फायदा उठविला. ख्रि.पू. १५०० या वर्षी आर्य बाहेरून आले व त्यांनी द्रविडांचा पराभव केला व उत्तर भारतात सत्ता काबीज केली, असा तो सिद्धांत. जसे आर्य भारतात बाहेरून आले तसे इंग्रज व मिशनरी बाहेरून आले, त्यात त्यांची काय चूक? ही परंपराच आहे, असे त्यांचे म्हणणे. करुणानिधींनी अण्णा लाईन पुढे चालविली व तामीळनाडु अलग करण्यासाठी अमेरिकेकडून खूप डॉलर्स उकळले. शेवटी सारे गाडे अर्थावर येऊन थांबते. आणि विरोधकांना पळविण्यात. या द्रविड कंपनीचे शत्रू तामीळ ब्राह्मण. त्यांना दिल्लीत वा अमेरिकेत पळावे लागले.

१७. **बॅनर्जी, ममता** : लोक तिला दीदी म्हणतात. ती काली मातेची पूजा करते, पण घरी, एकांतात. बाहेर, ती हिंदू लोक व देवदेवता यांचा द्वेष करते. कारण, तिचे बहुसंख्य मतदार मुसलमान आहेत. तिला बाहेरून मदत मिळत असावी - मुस्लीम मसल अँड मनी पॉवर. या हव्यासापायी तिने टाटांचा नानो कार्सचा प्रकल्प घालविला. तो मोदींच्या गुजरातला गेला.

१८. **घोष, सागरीका** : ही राजदीप सरदेसायांची पत्नी. तीचे पिताश्री कम्युनिस्ट व आकाशवाणीचे डायरेक्टर होते. ती सीएनएन आयबीएनवर काम करते. मुसलमानप्रेमी व हिंदू द्वेष्टी. बहुसंख्य हिंदू असलेल्या भारतात या चॅनेलला दुसरे कोणी कसे मिळाले नाही, याचे आश्चर्य वाटते. मुद्दा चुकून हिंदूंच्या अनुकूल जात आहे असे वाटले तर चटकन ती दुसऱ्या मुद्याकडे चर्चा वळविते, नव्हे, ते तिचे खास वैशिष्ट्य आहे.

१९. **एन राम** : 'हिंदू' या वर्तमानपत्राचा हा प्रदीर्घकालीन संपादक. पक्का कम्युनिस्ट व हिंदू द्वेष्टा. दक्षिण भारतात हिंदू पेपर फार मोठ्या प्रमाणावर वाचला जातो. *द हिंदू* चे नाव बदलून *अहिंदू* केले तर रास्त होईल.

२०. **गुहा, रामचंद्र** : हा काँग्रेसचा पगारी कानडी भाट. पक्का हिंदू द्वेषी.

त्याने बरीच पुस्तके लिहली आहेत. विद्वान आहे पण नेहरू-गांधी घराण्यास विकला गेलेला. त्यांच्या ग्रंथात सारे मोठे नेते आहेत, अपवाद सावरकर व सुभाषांचा. ते प्रख्यात व मोठे नाहीत! गांधी-नेहरू घराणे त्यांचे दैवत. कारण, ते लाखोंनी पैसे पुरवितात.

२१. **सरदेसाई, राजदीप** : हा घाणेरडा पत्रकार आहे, अशी याची ख्याती आहे. त्याच्या क्रिकेटर वडिलांनी उतार वयात ख्रिस्ती धर्म स्वीकारला. त्याने तर लहानग्या राजदीपच्या मनावर आघात नाही झाला? मोदी न्यूयॉर्कमध्ये भाषण करीत होते तेव्हा हा माईक घेऊन मोदींनी गुजरातेत किती लोक मारले? असा प्रश्न एनआरआयना विचारीत फिरत होता. लोक त्यास महारोग्याप्रमाणे टाळीत, किंवा ढकलून देत. ऐन गुजरातच्या दंग्यात त्याने अहमदाबादेत असेच अनुचित वर्तन केले. लोकांनी त्यास उचलून होळीच्या आगीत टाकण्याचे ठरविले. ताबडतोब तो पहिल्या फ्लाईटने दिल्लीस पळून गेला. म्हणून वांचला. काँग्रेसने त्यास महाराष्ट्रभूषण बनविले.

२२. **सेन, अमर्त्य** : हा नोबेल प्राईज विनर आहे. पण पक्का हिंदू द्वेष्टा, पक्का मार्क्सिस्ट. यास काँग्रेसने नालंदा विद्यापीठाचा प्रमुख द.म. ५ लाख रुपयांच्या पगारावर नेमले, पण त्याने तेथे काहीसुद्धा कार्य केले नाही. मोदी आल्यावर नव्या सरकारने त्यांची गच्छंती केली. हिंदुंना तो 'वायफळ बडबड करणारे' म्हणतो.

२३. **दत्त, बरखा** : तिची पत्रकारितेची सुरुवात साधी, सरळ व व्यवस्थित झाली पण तिचे दोनदा काश्मीरी मुसलमानांशी लग्न झाले व ती पार बदलली. ती एनडीटीव्ही सारख्या मातब्बर चॅनेलवर काम करू लागली. त्यामुळे एक निराळी शक्ती तिला लाभली. त्यात तिला काँग्रेस पक्षाचा पाठिंबा मिळाला. या सर्वात तिच्या हिंदू द्वेषाने भर टाकली. तिचे रूपांतर एका उद्धट हिंदूविरोधी अँकरमध्ये झाले. तिच्यावर व तिच्या बॉस प्रणय रॉयवर भ्रष्टाचाराचे *(पेड जर्नालिझम्)* आरोप झाले आहेत. (पहा राडीया पेपर्स)

२४. **येचुरी, सीताराम** : हा जुना जेएनयूचा विद्यार्थी संघटनेचा सचिव. चांगला विचारवंत व उत्तम वक्ता. पक्का प्रो-चीन कम्युनिस्ट. मोदींनी युनोत जाऊन २१ जून हा *योग दिवस* ठरविला. मुसलमान व ख्रिस्ती लोकांना त्याचा काही वांधा नव्हता. योग हा हिंदूंचा शोध आणि तो जगाने स्वीकारावा? येचुरींच्या पोटात लगेच दुखायला लागले. युनायटेड नेशन्स च्या जनरल अॅसेंब्लीने हा ठराव पास केला म्हणजे काय? तेही भाजपाचा ठराव? असा हा आमचा देशद्रोही विचारवंत. जेएनयूच्या कन्हैय्या व उमर खलीद यांच्या बरबादीच्या भाषणाचे (१६ फेब्रु.

२०१६) समर्थन करावयास हा पठ्ठ्या तेथे हजर!

२५. **पाटकर, मेधा** : उगवत्या राष्ट्रांतील महत्त्वाकांक्षी प्रकल्प सफल होऊ नयेत म्हणून प्रगत राष्ट्रे काही 'स्पीड ब्रेकर्स' उभे करतात. त्यामुळे मदत वा कर्ज रूपाने त्यांचे पैसे देणे वाचते. मेधा व तिची एनजीओ त्यातील एक. नर्मदा प्रकल्प होऊ नये व त्यामुळे गुजरात संपन्न होऊ नये, तो तसा झाला तर अमेरिकन मिशनरी भुके मरतील. आता तेथील आदिवासी त्यांच्या जाळ्यात फसणार नाहीत. क्रूरकर्मा मोदींना इंग्लंड व अमेरिकेने व्हिसा नाकारावा अशा अर्थाचे एक विनंतीपत्र तेथील सरकारांना पाठविले गेले. त्यावर मेधा पाटकरांची सही खरीच. अशा व्यक्तींचा ऑफीसचा खर्च व त्यांचे विमानाचे भाडे कोण भरतो तेवढे लक्षात घेतले तर सारा प्रकार कळून येतो. पण लक्षांत कोण घेतो?

■■■

सिनेमातील मुसलमान

एकदा मुंबईच्या ब्रॅबॉर्न स्टेडियमवरील एका प्रसंगाच्या निमित्ताने अशोक कुमारांशी बोलण्याची संधी आली होती. मी प्रभातच्या 'शांत व सोज्वळ' सिनेमांचे कौतुक करून म्हणालो, ''करमणुकीच्या नावाखाली हिंदी सिनेमात तुम्ही काहीही धांगडधिंगा दाखविता.'' त्यावर त्यांनी मला सांगितले, ''हा आपला गैरसमज आहे. सिनेमा हा एक आरसा आहे. समाजात जे घडते त्याची प्रतिमा आम्ही मोठ्या पडद्यावर दाखवितो.'' माझ्या शेजारी बलराज सहानी बसले होते. ते म्हणाले, ''एक लक्षांत घ्या. प्रभातचा काळ स्वातंत्र्यपूर्व काळ होता. करमणूकीबरोबर सामान्य माणसाला राष्ट्रवादाचा डोस पाजणे आवश्यक होते, नव्हे, राष्ट्रीय कर्तव्य होते. प्रभातने त्या वेळी ज्याची गरज होती ते दिले. आज स्वातंत्र्य मिळाल्यावर थकलेल्या कामगारास विकासाचे ज्ञान देणे आवश्यक आहे. नुसते ज्ञान दिले तर कोणी पैसे खर्चून थिएटरला जाणार नाही. म्हणून थोडा धांगडधिंगा, थोडे संगीत व थोडे ज्ञान. प्रोड्यूसर काही लाख रुपये खर्च करतो ते फायद्यासाठी. तो ज्ञानदान वगैरे काही जाणत नाही. प्रत्येकाची दृष्टी निराळी, प्रत्येकाचा इंटरेस्ट वेगळा. आमची स्थिती द्रौपदीसारखी. पांची पांडवांना तिला खुश ठेवावे लागे. तिच्यात व आमच्यात फरक एवढाच, की तिने प्रत्येकास वेगळा काळ ठरवून दिला होता. आम्हाला एकाच वेळी पाच जणांना खुश ठेवावे लागते.'' मी विचारले, ''हे पांच जण कोण?'' सहानी म्हणाले, ''प्रोड्यूसर, डायरेक्टर, राज्यकर्ते, प्रेक्षक व सर्वात महत्त्वाचे म्हणजे सेन्सॉर बोर्ड.'' ''लक्षात ठेवा,'' अशोक कुमार मध्येच म्हणाले, ''काहींना पैसे देऊन वश करता येते. पण प्रेक्षकांना वश करणे फक्त तुमच्या

कामावर अवलंबून असते, तुम्ही त्यांना विकत घेऊ शकत नाही." ते ऐकून सिनेमाविषयी माझा दृष्टिकोणच बदलून गेला.

बलराज सहानी मला विचारवंत वाटले. राज्यकर्ते हा महत्त्वाचा गट आहे हे तोपर्यंत माझ्या लक्षांत आले नव्हते. माझे बालपण इंग्रजी अमदानीत गेले. मी बडोदे संस्थानाचा नागरिक. म्हटले तर स्वतंत्र, म्हटले तर इंग्रजांचा गुलाम. त्यावेळी इंग्रजांनी "दूर हटो, दूर हटो, दुनियावालो हिंदोस्ताँ हमारा है, "ह्या गीतास परवानगी कशी दिली ते आश्चर्यच आहे. दुसऱ्या सिनेमाशी संबंधित असलेल्या अधिकाऱ्याने त्याचे रहस्य सांगितले, "पुढची ओळ म्हणा : "मंदिर मसजिद शीखोका गुरुद्वारा है." मंदिर मसजिद या जन्मात कधी एकत्र येऊच शकणार नाही, तशी साहेबाने 'पेरणी'च करून ठेवली होती. साहेबास सामान्य माणसाच्या मानसावरील सिनेमाचा प्रभाव चांगला माहीत होता. इंग्रजांविरुद्ध एक शब्दही वेडावाकडा आला तर साहेबास पसंत पडत नसे. आजच्यासारखे सेन्सॉर बोर्ड *'फॉर सेल'*नव्हते. *दे वेअर मोअर लॉयल दॅन द किंग."* हे खरे असावे. १९२० च्या दशकापासून बॉलिवुडचे बोलपट सुरू झाले, पण मुसलमान नट आत असले तरी भर होता अराजकीय पौराणिक वा ऐतिहासिक सिनेमांवर, उदा. आर.एस. चौधरींचा *अनारकली* (१९२८), मन थेटर्सचा *नूरजहान* (१९२३), मेहबूब खानचा *हुमायून* (१९४५) वा ए आर करदारांचा *शहाजहान* (१९४६). क्रिकेट, नाटक व सिनेमा एवढेच करमणूकीचे प्रकार होते. लोकांजवळ भरपूर वेळ होता. सामान्य माणूस तिसऱ्या वर्गाचे तिकीट काढू शकत होता. ऐतिहासिक सिनेमांच्या द्वारा "हिंदू हा भ्याड आहे तर मुसलमान हा गुंड आहे," ही महात्म्याची शिकवणूक लोकांच्या मनावर ठसविली जात होती. भ्याड हिंदू जास्त दुर्बल बनत चालला होता. त्यास क्रांतिकारकांच्या 'काटोमारो'पेक्षा गांधीजींची अहिंसा, प्रभात फेऱ्या, घोषणा व चरखा यातून निर्माण होणारी मिळमिळीत देशभक्ती आवडू लागली होती.

१९४७ साली धंदेवाईक बॉलिवुडचे प्रोड्युसर्स त्यांच्या स्क्रीन रायटरला सांगू लागले, "देखो, अभी नेहरू चाचाका जमाना शुरू हो गया है. नेहरू याने सेक्युलर, डेमोक्रॅटिक और इंडस्ट्रिअल. उनको तो बडा बडा डॅम्स और फॅक्टरीज् दिखती है. समाजवादसिवाय वे ओर कुछ बोलतेही नही. हिंदू-मुस्लीमका मिलन उनको प्यारा लगता है. उनको हिंदी समझती नही है, वे सिर्फ उर्दू जानते है. यह ध्यान में रखकर वैसी स्टोरी बनावो. ७० मिमिका बडा स्क्रीन सबसे अच्छा." त्यावेळच्या यश चोप्राचे बंधु बी. आर. चोप्रांचे सिनेमे बघितले तर तुम्हाला मोठाले डॅम्सचे बांधकाम चाललेले दिसेल, कामगारांच्या बंधुभाव व श्रमाचे महत्त्व

पटवून देणारी हिंदी गाणी : "साथी हात बढाना" *(नया दौर, १९५७)*, मुस्लीम कामगार अवैध हिंदू मुलाला वाढवितो व म्हणतो, "तू हिंदू बनेगा ना मुसलमान बनेगा, इंसान की औलाद है, इंसान बनेगा." त्यानंतरचा *धर्मपुत्र* (१९६१) सिनेमा. त्यात मुस्लीम मुलगा हिंदू घरात वाढतो. त्यात अशोक कुमारने नबाब बदरुद्दीनचे काम केले होते. देव आनंदचे *नौ दो ग्याराह* व राज कपूरचे *श्री ४२०* यातून गरिबी, प्रेम व भाईचारा यांचे प्रदर्शन दिसत होते. 'प्यार हुवा, इकरार हुवा' किंवा 'केहता हैं दिल रास्ता मुश्कील, मालुम नही कहाँ मंझिल' सारख्या गाण्यांनी लोकांना वेड लावले होते. नेहरूंचे निधर्मी व उदार धोरण त्यातून प्रगट होत होते. गुरू दत्तचा *प्यासा* (१९५७) भांडवलशाहीचे खंडन करणारा होता. "लोक, व्यक्ती व समाज यास शोषणरहित संबंधास या देशात कांही जागा आहे कां नाही?" असा खडा सवाल ह्या सिनेमाने उभा केला होता. नेहरूंना त्यांची धोरणे लोकप्रिय करण्यासाठी बॉलिवुड कसोशीने मदत करीत होता. हा सारा माल *'मेड टु ऑर्डर'* आहे याची सामान्य प्रेक्षकास कोठून कल्पना असणार? या नटनट्यांचे व संगीतकारांचे एक मोठे मंडळ नेहरूंनी बायजिंगला धाडले होते. त्यात दत्तोपंत पलुस्करही होते व त्यांनी त्या चिनी दौऱ्याचे वर्णन लिहून ठेवले होते. त्यात नेहरूंचे हे 'उसने शहाणपण' *(बॉरोड विसडम्)* आहे, चीन वा रशियात सिनेमा, साहित्य व संगीत यांना क़म्युनिझमच्या प्रसार व प्रचारासाठी वेठीस धरले जाते, याचा उल्लेख आहे. नेहरू भाषणांत दिलीप कुमारची नक्कल करीत, इंदिरा नर्गिस व तारकेश्वरी सिंहाची, काँग्रसने नरगीसला राज्यसभेचे सभासद बनविले, वगैरे मोठ्यांच्या 'छोट्या गोष्टी' चाणाक्ष व जाणत्या लोकांच्या नजरेतून सुटत नव्हत्या.

शाहरूख, आमीर व सलमान हे तीन खान बॉलिवुडमधील टॉप नायक आहेत. बरेच तज्ञ त्याचे श्रेय डी-कंपनीस देतात. तीच डी-कंपनी अमृता सिंग, शर्मिला टागोर, हुमा कुरेशी, सोहा अली खान, नर्गिस फक्री, टाबू, शबाना आझमी, कटरीना कैफ वगैरे नट्यांना टॉपवर नेण्यात का असमर्थ ठरली ते कळत नाही. इस्लाममध्ये स्त्रीस एकंदर "सन्माननीय" समजत नाहीत, हेच खरे. नूरजहान, रझिया बेगम व चांदबीबी हे मुस्लीम मध्ययुगीन इतिहासातील अपवाद समजायचे.

बॉलिवुडचे इस्लामीकरण

गेल्या १०० वर्षांत बॉलिवुडच्या एकाही फिल्ममध्ये मुस्लीम स्त्रियांना दगडांनी ठेचून मारण्याचा शरिया कायदा पाशवी आहे, असे दाखविले असेल तर शपथ. याउलट, हजारो फिल्म्समध्ये हिंदू चालीरीती वाईट आहेत, अन्यायी आहेत,

जंगली आहेत, असे ठासून दाखविले आहे. हिंदू धर्म साराच्या सारा पवित्र व चांगला आहे, असे कोणीच म्हणत नाही. त्यात सतीसारख्या किंवा अस्पृश्यतेसारख्या काही रूढी या परंपरा घुसल्या आहेत. प्रश्न आहे, हिंदू धर्मातील वाईट परंपरा जगास दाखवायच्या व इस्लाममधील लपवायच्या - हा दुटप्पीपणा कां? इस्लाम तेवढा सारा चोख, पवित्र व शुद्ध, हे दाखविण्याचा अट्टहास कां? यास न्याय म्हणता येईल काय? 'पीके', 'ओएमजी - ओह, माय गॉड', 'धर्म संकट में' या अलीकडच्या सिनेमात धर्माच्या नावाखाली साधूसंतांनी जो धुडघूस घातला आहे व लोकांची फसवणूक केली आहे, त्यांना लक्ष्य बनविले आहे. ठीक आहे, मग तेच धोरण राबवून जैनांच्या दीक्षा प्रकारातील दोष दाखवा ना जगाला. फकीर, सुफी संत, मुल्लामौलवी सामान्य मुसलमानास कसे नाडतात, त्याची पिळवणूक करतात, ते दाखवा ना. मद्रसात जुनेपुराणे अरबी ज्ञान देऊन मुसलमान मुलाला कसे जगाच्या मागे ठेवले जाते, विज्ञानविरोधी बनविले जाते, ते दाखवा ना. तलाक-तलाक असे तीन वेळा म्हणून मुसलमान स्त्रीस तिचा नवरा सोडून देतो. तो तिच्यावर अन्याय आहे. तो अन्याय दाखविण्यास कां डरता?

सुदैवाने, मुसलमान व हिंदू तज्ज्ञांनी याचा अभ्यास केला आहे व त्यांनी त्याची तीन कारणे शोधली आहेत : (१) बॉलिवुडच्या सिनेमात मुस्लीम सामाजिक वा राजकीय सिनेमा किती? टॉप २५, २०१४ च्या सिनेमात *धूम* व *माय नेम इज खान* हे दोनच सिनेमा मुसलमानांवर आहेत, म्हणजे त्यातील प्रमुख भूमिका मुस्लीम आहेत. ज्यात एक तरी मुस्लीम व्यक्ती आहे असे सिनेमा १० तून १ च असतात. अशा थोड्या मुस्लीम सिनेमात इस्लामविरोधी काही दाखविले तर मुस्लीम प्रेक्षक हे सिनेमा पाहण्याचे बंद करतील, अशी भीती निर्मात्यास वाटली तर नवल नाही. शेवटी प्रश्न "धंदा करण्याचा" आहे. हिंदू जात्याच सहिष्णु आहे. त्यास धर्माची, देवादिकांची, प्रथांची वा परंपरांची थट्टा वा मस्करी चालते, शिव्यासुद्धा चालतात. जे चालते, ते चालवतात. ज्या दिवशी शिवसेनेसारखे पक्ष विरोध करतील, त्यादिवशी निर्माता आगीशी खेळण्याचे आपोआप बंद करेल. (२) भारतात किती स्त्रियांना दगडाने ठेचून मारलेले कोणी पाहिले आहे? असा प्रकार असतो हेदेखील सामान्य मुसलमानास माहीत नसते. शरिया लॉ हा गुन्हेगारीसाठी आहे. भारतात गुन्हे म्हटले की सर्वांसाठी आयपीसीचा कायदा आहे. (३) इस्लाममधील दोष दाखविणारे सिनेमा अगदी नसतात असे नाही. पण प्रमाण कमी. फारच कमी. ते ओएमजीत दाखविले आहेत. इमाम सक्तीने धर्मांतर घडवितो त्याचे चित्रीकरण *धरम संकट में* मध्ये आहे. *फिझा* आणि *शाहीद* मध्ये मुसलमान

तरुण आतंकवादी गटात कसे जातात त्याचे चित्रण आहे. घटस्फोटित मुसलमान स्त्रीस दुसरे लग्न करावयाचे असेल तर त्याआधी आणखी एका पुरुषाशी शैय्यासोबत करावी लागते, ते *निकाह* पिक्चरमध्ये व्यवस्थित दाखविले आहे. अरब लोक कोवळ्या मुसलमान मुलींना हैदराबादेत विकत घेतात त्याचे चित्रण *बाजार* सिनेमात आहे. *पदम ओन्नु : ओरू विलापम्* या मल्याळी चित्रपटात मुसलमानी बालविवाहांवर प्रकाश टाकलेला आहे; *उप्पु* सिनेमात बहुपत्नीत्वाचे खंडण केले आहे, आणि *अलिफ* मध्ये मुसलमान स्त्रियांच्या समस्या रंगविल्या आहेत. मराठी चित्रपटात मात्र कटाक्षाने मुस्लीम सामाजिक समस्या टाळतात. हाईक म्हणता उगाच ब्रह्महत्या नको, असे निर्मात्यांचे धोरण आहे. इतर भाषिक सिनेमात तेच धोरण दिसते. पण हिंदी असो कां इतर भाषिक सिनेमा असोत, सर्वांना आतंकवादाची भयंकर भीती वाटते. डी-कंपनीचा पैसा बॉलिवुडमध्ये फिरू लागल्यापासून व हिंदी सिनेमांना भारताच्या बाहेर मार्केट मिळू लागल्यापासून "भय इथले संपत नाही." सारा पैशांचा खेळ आहे, घाबरायला तर पाहिजे ना? दोनचार लाखांची इन्व्हेस्टमेंट नसते, कोटीकोटी रुपायांची उलाढाल असते त्यात.

बॉलिवुडला *"धर्मांतराची फॅक्टरी"* समजतात. खरी सुरुवात दुर्गा खोटे यांनी केली. त्यांचे महंमद रशीद या गायकाशी दुसरे लग्न झाले पण ते अयशस्वी ठरले. सैफ अली खानसाठी शीख अमृता सिंग मुसलमान बनली, पटौडीने हिंदू शर्मिलेस मुसलमान केली व फरहान आझमीने हिंदू कन्यकेस आयेशा तकिआ बनविली. नर्गिस एकमेव अपवाद. सुनील दत्तने तिला हिंदू निर्मलादेवी केली. पूर्वी स्त्रियांच्या भूमिका करण्यासाठी स्त्रिया मिळत नसत, ते आपण दादासाहेब फाळक्यांवरील सिनेमांत पाहिले आहे. हळूहळू हलक्या व्यवसाय करणाऱ्या मुस्लीम स्त्रिया येऊ लागल्या. सुरुवातीला टॉपवर मुसलमान नट्याच असत, उदा. मधुबाला, मीना कुमारी, वहीदा रेहमान, मुमताज, झीनत अम्मन, आशा पारेख (बाप गुजराथी जैन व आई दाऊदी व्होरा) व ममता कुलकर्णी. नव्या पिढीतील उदाहरणे : शाहरूख खान व गौरी छिब्बा (ब्राह्मण); सैफ अली खान व करीना कपूर (बेबो); आमीर खान व (१) रीना दत्त आणि (२) किरण राव; ह्रतिक रोशन व सुझानी खान; अरबाज खान व मल्लिका आरोरा; फरहान अख्तर व अधुना बभानी; अर्जुन रामपाल व मेहेर जेसिआ; जेनेलिआ डीसूझा व रितेश विलासराव देशमुख; फराह खान व शिरीश कुंदर; आणि अमृता अरोरा व शकील लडाक. एक महत्त्वाचा अपवाद : धर्मेंद्राची पहिली पत्नी प्रकाश कौर. हेमा मालिनीशी लग्न करायचे म्हणून १९७९ साली इस्लाम हा राजमार्ग त्याने निवडला. हिंदुस्थानी संगीतात मुसलमान

बनविण्याची विशेष जादू दिसते, उदा. तानसेन ते बालगंधर्व ते छोटा गंधर्व (सौदागर). ए. एस. दिलीप कुमार हा दाक्षिणात्य संगीत तज्ञ. पण तो अल्ला रखा (ए.आर.) रहमान बनला. *आजा नाचले, दिल तोते तोते, दम दम मस्त कलंदर* या गीतांनी प्रसिद्ध झालेला हंस राज हंस सुफींमुळे मुसलमान बनला. ईलिया राजाचा मुलगा युवा शंकर २०१४ त मुसलमान बनला.

बॉलिवुड व भारतीय राजकारण यांचे जवळचे नाते आहे. वसंतराव साठे व अब्दुल रहमान अंतुले बॉलिवुडच्या नायकाप्रमाणे बोलत व चालत. बॉलिवुडच्या अति जवळीकीमुळे इंदिरेस साळ्यांचे खाते बदलून खतांचे मंत्रालय द्यावे लागले. अंतुले शेवटपर्यंत 'रगेल व रंगेल' राहिले. पूर्वाश्रमीचे करंदीकर (अंतुले) गावकऱ्यांत खूप लोकप्रिय होते. त्यांच्या इस्लामनिष्ठेचे रहस्य त्यांच्या अर्थकारणात होते. सौदी अरेबिया इस्लामच्या विस्तारीकरणासाठी लाखो-करोडो पेट्रो डॉलर्स खर्चायला एका पायावर तयार असतो. त्याचा पुरा फायदा अंतुले मुख्यमंत्री (१९८०-८२) असताना त्यांनी घेतला. मुंबईत साऱ्या मशिदी चकाचक नव्या झाल्या व सर्वांवर भोंगे (लाऊड स्पीकर्स) बसले. त्यांची नक्कल मग इतर राज्यात झाली. सारा भारत लाऊड स्पीकर्सवरील मुस्लीम बांगेने दुमदुमु लागला. आजही ३४ वर्षांनंतर मशीदीवरील कर्कश लाऊड स्पीकर्सवर बंदी नाही. हिंदू सहिष्णुततेचे जिवंत उदाहरण- सोनू निगमकी ऐसी तैसी. राम नाईकांनी व गडकऱ्यांनी त्यांचा माजलेला भ्रष्टाचार बाहेर काढला नसता तर इंदिरेस प्रिय असणाऱ्या अंतुल्यांनी महाराष्ट्राचे किती नुकसान केले असते त्याची कल्पनाच करवत नाही. (माधव गडकऱ्यांचे 'भ्रष्टाचार्य अंतुले' हे पुस्तक वाचा. त्याचा सूड अंतुलेनिष्ठ आपनेवाल्यांनी राम नाईक पेट्रोल मंत्री असताना 'इंडियन एक्सप्रेस' द्वारा घेतला! अंतुल्यांची कट्टर इस्लामनिष्ठा हुतात्मा करकऱ्यांच्या बाबतीत लोकसभेत दिसली.) ह्याच मुख्यमंत्र्यांनी मुसलमान स्मगलर्सना १९८० ते १९९० च्या दशकांत मोठे केले. बॉलीवुडचे इस्लामीकरण याच काळांत झाले. त्याचा आर्थिक परिणाम नाही म्हटले तरी अमिताभ बच्चन, गोविंदा व मिथुन चक्रवर्ती यांच्यावर झाला. पहिले दोन राजकारणात शिरले ते याच कारणासाठी. "मरणाशी गांठ आहे" म्हटले की भलेभले घाबरून जातात व पळ काढतात.त्यांच्यासमोर गुलशन कुमारचे जिवंत उदाहरण होते. त्याने भक्ति संगीताच्या कॅसेटस् काढल्या व त्या अफाट लोकप्रिय झाल्या. त्यांनी पांडुरंग शास्त्रींची शिष्या अनुराधा पौडवाल यांना संगीत क्षेत्रांत अमर बनविले. कंपनीच्या फायद्यातून वैष्णोदेवीच्यां प्रवाशांना मोफत जेवण मिळू लागले. "ये बकवास बंद करो," ची त्यास धमकी देण्यात आली होती, पण त्याने लक्ष दिले नाही. त्यानंतर कोणीही

भक्तीप्रधान संगीत एवढ्या मोठ्या प्रमाणावर काढायचे धाडस केले नाही. याऊलट, फिल्मी संगीतात कव्वालींचे प्रमाण वाढले. सिनेमातही नायक खलनायकास मारताना ''या अली'' वा ''अल्ला हो अकबर''च्या आरोळ्या वाढल्या. मूळ शम्मी कपूरने ''जंगली'' सिनेमात 'चाहे मुझे कोई जंगली कहे' या गाण्यामार्फत इस्लाम म्हणजे काय याचा डोनाल्ड ट्रंपप्रमाणे संदेश दिला आहे. हिंदीत याहू म्हणजे नरपशु किंवा गवारा. त्यावरून याहू डॉट कॉम निघाले. 'पीकेने' जाहीरपणे हिंदू देवतांची टिंगलटवाळी केली तेही लोकांना आवडले नाही. सेक्युलर किती इस्लामनिष्ठ असतो ते बॉलिवुडचा अभ्यास केल्याने समजते!

दिलीप कुमार – पहिला व दुसरा

कां कोणास ठाऊक, मुसलमान क्रिकेटर्स व बॉलिवुडच्या नटांचे एवढे भारतीयांनी कोडकौतुक केले तरी ते कांही वेळा असे काही बोलतात वा वागतात की लोकांना त्यांच्या देशप्रेमाविषयी संशय वाटू लागतो. अझरुद्दीनच्या ''मी मुसलमान असल्यामुळे माझ्यावर अन्याय होतो,'' असे वक्तव्य केल्यावर केवढा गदारोळ झाला. आणि तरीही कॉंग्रेसने त्यास हैदराबादेहून आपला निवडणुकीचा उमेदवार निवडला. काही उदाहरणे देऊन मी माझा मुद्दा स्पष्ट करतो.

दिलीपकुमार उर्फ युसूफ खानास त्याच्या भक्तांनी फक्त देव्हाऱ्यात ठेवून पूजा करायचे बाकी ठेवले होते. एवढे प्रेम लोकांनी त्याच्यावर केले. २००० ते २००६ या काळांत तर त्याला राज्यसभेचे सभासदही बनविले होते. कामिनी कौशल ही त्याची पहिली प्रेमिका. पण तिचे आधीच लग्न झाले होते. मधुबाला त्याची दुसरी माशुका. पण तिच्या घरच्यांनी त्यांच्या लग्नास विरोध केला. वैजयंतीमालेचा तिसरा क्रमांक. १९५५ ते १९६८ या १३ वर्षांत त्यांनी एकत्र काम केले होते. राज कपूर नंतर आला. शेवटी, १९६६ साली आपल्यापेक्षा २२ वर्षांनी लहान असलेल्या सायरा बानूशी त्याने लग्न लावले. १९८० साली असमाशी त्याने तिसरे लग्न लावले, पण ते फार दिवस टिकले नाही. फिल्म फेअर अवार्ड पासून ते दादासाहेब फाळके अवार्ड ते पद्मविभूषणपर्यंत सारी पदे व बक्षिसे त्याने मिळविली आहेत. मुंबईचा तो शेरीफ होता. पाकिस्थानाने पण *'निशान-इ-ईमतिआझ'* हा त्यांचा सर्वोच्च किताब त्यास दिला. शिवसेनेने त्यावेळी त्याच्या देशभक्तीविषयी शंका व्यक्त केली होती, पण पंतप्रधान वाजपयजी १९९९ साली मध्ये पडले व त्याने तो किताब स्वतःपाशी ठेवून घेतला, नाकारला नाही.

शाहरूख खान 'दुसरा दिलीपकुमार' म्हणून फिल्म जगतात ओळखला

जातो, एवढी त्याची लोकप्रियता आहे. तो अमेरिकेस जातो तेव्हा त्यास विवस्त्र करून त्याची झडती घेतली जाते. तो जाहीरपणे रडतो, "याचे कारण *माय नेम इज खान.*" २०१६ च्या नोव्हेंबरमध्ये सुब्रह्मण्यम् स्वामींनी एका टीव्ही मुलाखतीत सांगितले, "खरी गोष्ट निराळी आहे. अमेरिकन इंटलिजन्सजवळ त्याची संपूर्ण माहिती आहे. त्याचे व पाकी आयएसआयशी संबंध आहेत, असा त्यांच्याजवळ पुरावा आहे." त्याची शक्यता वाटते, याचे कारण त्याने दिल्ली काँग्रेस व कम्युनिस्टांना जवळ असलेल्या दिल्लीच्या 'आऊटलुक' साप्ताहिकांत 'टर्निंग पॉईंट' या सदराखाली *'बीईंग ए खान'* नावाचा लेख लिहिला. त्यात तो म्हणतो : "I sometimes become the inadvertent object of political leaders who choose to make me a symbol of all that they think is wrong and unpatriotic about Muslims in India... Rallies have been held where leaders have exhorted me to leave my home and return to what they refer to as my original homeland." भारतात बॉलिवुडच्या राजास (किंग खान) "शाहरूख खानला जीवन असह्य झाले," हे पाहून पाकिस्थानचे रहमान मलीक एकदम पुढे सरसावले व त्यांनी शाहरूख व त्याच्या कुटुंबीयांना पाकिस्थानात आश्रय द्यायची तयारी दाखविली. लगेच भारताच्या आर. के. सिंग ह्या गृह सचिवांनी मलीकांना उत्तर दिले, "मलिकांनी त्यांच्या प्रजाजनांच्या सुरक्षिततेची काळजी करावी." याचा अर्थ, आमच्या घरेलु मामल्यात पाकिस्थानला नाक खुपसायची गरज नाही. शिवसेनेच्या सल्लागार संजय राऊतांना ही सुवर्णसंधी वाटल्यास कांही आश्चर्य नाही. पूर्वी शिवसेना व शाहरूख यांच्यात एकदा वाजले होते. "भारत सरकार आपल्या नागरिकांचे रक्षण करण्यास सक्षम आहे," राऊतांनी 'सामन्या'तून बजावले, "पाकिस्थानाने त्यांच्या नागरिकांचे रक्षण करावे."

शाहरूख दिल्लीचा. त्याच्या वडिलांनी स्वातंत्र्य चळवळीत म्हणे, भाग घेतला होता. शाहरूख म्हणतो म्हणजे ब्रह्मवाक्य. त्याने आजवर ७५ सिनेमात काम केले आहे. फिल्मफेअर ॲवार्ड ८ वेळा जिंकले. म्हणजे तो आता युसूफ खानच्या गटात आला. तो पद्मश्रीचा मानकरी झाला. 'फोर्ब्ज इंडिया' ने एकट्या मागील वर्षी शाहरूखने ३७.७ दशलक्ष डॉलर्सची कमाई केली, अशी बातमी दिली. हे सारे सांगायचे कारण एकच : तो आता सेलिब्रिटी झाला आहे. शाहरूख बोलतो व सारा भारत ते ऐकतो. 'मन की बात' मोदी ऐकवितात. बस्स, तस्साच प्रकार. ह्या वादावर पडदा पाडण्यासाठी शाहरूखने एक लेखी विधान टीव्हीवर वाचले : "मला आगंतुक सल्ला देणाऱ्या लोकांना सांगावेसे वाटते की भारतात आम्ही एकदम सुरक्षित व समाधानी आहोत. येथे स्वतंत्र, निधर्मी लोकशाही

नांदते. माझ्या लेखांत असे कोठेही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे म्हटलेले नाही की भारतात आम्ही असुरक्षित, त्रासलेलो किंवा गांजलेलो आहोत."

लोकांना हे वकीलाने लिहून दिलेले 'राजकीय' स्टेटमेंट वाटले. पण त्याने लोकांचे समाधान होईना. शाहरूखच्या एकंदर वर्तनावर उलटसुलट प्रतिक्रिया सोशल मिडीयावर येतच राहिल्या. युनोने काळ्या यादीत टाकलेल्या व जमात-उद-दावा चा प्रमुख हाफीज सईद यांनी शाहरूखला सल्ला दिला : "तू पाकिस्थानलाच जा, तू तेथे सुरक्षित राहशील." शाहरूख मनातल्या मनात हांसला असेल. कारण आज पाकिस्थानवर सारखे आतंकवाद्यांचे हल्ले होत आहेत. तो मोठा असुरक्षित देश बनला आहे. त्यात शाहरूखची पत्नी हिंदू आहे. म्हणजे पाकच्या दृष्टीने मुस्लीम उम्मा ला काळीमा आणणारे कृत्य. शाहरूखला त्यासाठी नरकांत जावे लागणार. शाहरूखची 'रोजीरोटी' ज्या क्षेत्रातून येते ते हराम क्षेत्र आहे, कारण तेथे संगीत व नागड्याउघड्या पोरी काम करतात. लगेच दुसऱ्याने त्याचा बचाव केला, "शाहरूखला स्वर्ग मिळणार. बॉलीवुडमध्ये राहून तो तेथे मुसलमानांचे रिक्रूटमेंट करतो." तिसऱ्याने पुष्टी दिली, "discrimated against हे वर्णन शाहरूखला लागू होत नाही. ते खरे असते तर तो कीर्तीच्या शिखरावर चढू शकला नसता." शाहरूखला पाकिस्थानात असंख्य फॅन्स आहेत. एका पाकीने लिहिले, "हफीज सईद म्हणतो, पाकिस्थानात जा. ते खरे आहे. दुष्ट भारतापासून त्याला वाचविलेच पाहिजे." दुसऱ्याने लिहिले, "शाहरूखचे स्टेटमेंट एवढ्या सिरीयसली कां घेता आहात तुम्ही? वकीलाने लिहून दिले व त्याने ते वाचले. ते खरे आहे हे कशावरून?" काही भारतीयांच्या कडवट प्रतिक्रिया होत्या. एकाने लिहिले, "शाहरूख आता पाकिस्थानात एक नवा सिनेमा काढेल. त्याचे नाव असेलः *"माय नेम इज खान अँड आय ॲम नॉट शिया."* राजगुरु दिग्विजय सिंगांनी लिहिले, "शाहरूख भारत सोडून कोठे जाणार नाही. उलट, अदनान सामी, राहत फतेह अली खान, अली झफर यांच्यासारखे पाकिस्थानी जास्त जास्त भारतात येऊन सेटल होतील." एकाने तिखट शब्दात लिहिले, "शाहरूख आता मुल्ला होऊ पहात आहे. झाकीर नाईकाच्या शेजारी उभा असलेला शाहरूख टीव्हीवर पाहून आमच्या मनास वेदना होतात. एका नटाकडून आम्हाला धर्माचे धडे शिकायचे नाहीत." एक जण फटकळ होता : "शाहरूख खानने व्हिक्टीम कार्ड वापरले व जगाची सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न केला. हे आम्हास आवडलेले नाही. या क्षणापासून त्याची घसरगुंडी सुरू झाली." दुसऱ्याने त्याची री ओढली, "घटनेप्रमाणे हा देशद्रोह आहे. तो भारतीय आहे, म्हणून दुःखी आहे. तुला कोणी अडवले आहे? जा की

पाकिस्थानात. फक्त या देशात कमावलेली माया येथे ठेवून जा. त्या पैशावर आमचा हक्क आहे. तो आमच्या करातून आलेला आहे.''

संजूबाबा

काही योगायोग विचित्र असतात. १५ जून १९९३ रोजी सुभाष घईंचा संजय दत्त नायकाच्या भूमिकेत असलेला *खलनायक* चित्रपट रीलीज झाला. दोन महिने आधी दत्तला अटक झाली होती. तारीख होती १९ एप्रिल १९९३. १२ मार्च १९९३ रोजी मुंबईत झालेल्या बॉंबस्फोटात त्याचा हात होता, असा त्याच्यावर आरोप होता. २१ मार्च २०१३ रोजी स्वतःजवळ बेकायदा शस्त्रे बाळगल्यामुळे त्यास सुप्रीम कोर्टाने पाच वर्षांची सजा ठोठावली होती. यामधील २० वर्षांत काही मिडीयावाल्यांनी ''संजय निर्दोष आहे, त्यास सोडून द्या,'' असा सकारात्मक प्रचार करण्याबद्दल खूप कमावून घेतले. ते म्हणायचे, ''धंदा आहे.'' त्यात काही बॉलिवुडचे त्याचे सहकारीदेखील सामील होते. राखी सावंत एका प्रेस कॉन्फरन्समध्ये म्हणाली, ''संजू बाबाऐवजी मी जेलांत जायला तयार आहे!'' भूतपूर्व सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश व प्रेस कौंसिल ऑफ इंडियाचे अध्यक्ष मार्कंडेय काटजूंनी ''संजूबाबास सोडून द्या,'' असा आशीर्वाद दिला. ''त्याला दोन लहान मुले आहेत व त्याने आधीच खूप दुःख भोगले आहे,'' असा बचाव काटजूंनी केला. राहुल राजपुत्राचे राजगुरू (काहीजण त्यास कब्जी कलुशा म्हणतात) दिग्विजय सिंग म्हणाले, ''संजय आतंकवादी नाही. त्याने व त्याच्या आई-बापाने जातीयवादाविरुद्ध प्रचार केला होता. त्याचे त्याला बिचाऱ्याला असे बक्षीस मिळत आहे.'' ममता बॅनर्जींनीदेखील फेसबुकवर अशाच प्रकारचे वक्तव्य केले होते. लोकांना या 'बचावबाल्या ब्रिगेड'चे आश्चर्य वाटत होते. ते खरे असेल तर अजमल कसाबही बचाच होता! ह्या लोकांनी युसूफ मेननला 'सिझोफ्रेनिया'चा (डबल माईंड) विकार आहे, असा बचाव केला होता. 'दोन लहान मुले आहेत,' हा बचाव खरा असेल तर भारतात कोणी जेलमध्ये जाणारच नाही! काही खट्याळ भगव्यांनी तिरकस शेरा मारलाच, ''संजू बाबाने खूप दुःख सहन केले आहे, त्याने ३३ वर्षांत दोन लग्ने केली - पहिल्यांदा रीहा पिलैशी व नंतर दिलनवाझ शेखशी (आता मान्यता दत्त).'' कोणी बचाव केला, ''त्याने *मुन्नाभाई एमबीबीएस* व *लगे रहो मुन्नाभाई* हे दोन अप्रतिम सिनेमा आपल्याला दिले आहेत. खरे म्हणजे ते सिनेमे राजकुमार हिरानींची आपल्यास देणगी आहे. त्याचे स्क्रिप्टही त्यांनीच लिहिले. आणि मुन्नाभाईची भूमिका शाहरूख खान करणार होता. त्याच्या पाठीला मार लागला, म्हणून ती भूमिका संजूबाबाकडे

नशिबाने आली.

३३ वर्षांचा संजय बाबा. तो पद्मश्री (१९५८) नरगीस (फातमा रशीद) व सुनील दत्तचा मुलगा. नरगीस व नेहरू घराणे यांचे जवळचे नाते आहे. ती जद्दनबाईची मुलगी. मोतीलालांचा रंगेल स्वभाव साऱ्या दुनियेला माहीत. नरगीसचा बाप रावळपिंडीचा धनाढ्य पंजाबी हिंदू. नाव मोह्याल त्यागी. जद्दनसाठी तो मुसलमान झाला. सुनील दत्त सुरुवातीला रेडिओ सिलोनवर अनाऊन्सर होता. (अमिताभ बच्चनला दिल्लीच्या ऑल इंडिया रेडिओने *अनाऊन्सर* म्हणून रिजेक्ट केले होते.) घराणेशाहीच्या नव्या चौकटीत 'शोभावा' म्हणून सुनीलला काँग्रेसचा खासदार (१९८०-८५) बनविला गेला व 'आपल्या कुटुंबा'त सामील करून घेतले. (ती खासदारकी पुढे त्याच्या प्रिया या मुलीकडे गेली.) नरगीसही राज्यसभेची (१९८०-८१) खासदार झाली. अबु सालेमला गोव्याच्या किंवा मुंबईच्या विमानतळावर सुनीलपुत्र संजयला ठार मारायची सुपारी दिली होती. संजयची व दाऊदचा भाऊ शकील यांची दोस्ती होती. शकील सावध होता- व्यसनी व बढाईखोर संजय शकीलचे काळे धंदे पोलिसांना उघड करेल व पकडवून देईल, अशी भीती डी-कंपनीला वाटत होती. पूर्वीपासून संजूला 'बॅड बॉय ऑफ बॉलिवुड' म्हणत. काँग्रेसला लोकांनी का सोडले? कारण ती बदमाशांच्या हाती गेली. फेअरला फाऊल म्हणणे व फाऊलला फेअर, हेच तिचे काम बनले. सुनीलने दिवट्या बेट्याला विचारले, "तू असे कां केलेस?" बेटा संजूचा जबाब : *"आफ्टर ऑल, आय ॲम हाफ मुस्लीम."* तरीदेखील बापाने आयुष्याची शेवटची दोन वर्षे (१९८४-८५) मुलाला सोडवायचे खूप प्रयत्न केले. बाळासाहेबांचेही पाय धरले. त्यांनी कानांवर हात ठेवले : "त्याने आतंकवाद्यांना मदत केल्याचे सज्जड पुरावे पोलिसांजवळ आहेत!" सीबीआय, पोलीस व काँग्रेस यांनी खासदार बापाला मदत करायचे अतोनात प्रयत्न केले. कोणाचे काही चालले नाही. काय होता संजूबाबाचा अपराध? तुम्हीच म्हणाल, अपराध अक्षम्य आहे. सांगतो, ऐका.

नरसिंह रावांच्या अमदानीत ६ डिसेंबर १९९२ रोजी बाबरी मशीद पडली. संतापलेले मुसलमान रस्त्यावर उतरले. त्यांनी दंगे केले. त्या दंग्यांना मुंबईच्या शिवसेनेने मुहतोड जबाब दिला. मुंबईच्या पोलिसांनी त्यांना साथ दिली. सारी मुंबानगरी पेटून उठली होती. मुसलमान चळचळा कांपत होते. डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात मुंबई शांत झाली. आणि सारा भारतदेखील. येथे पहिले राऊंड पुरे झाले.

दुसऱ्या राऊंडची सुरुवात १९९३ च्या जानेवारीत झाली. जानेवारीच्या

पहिल्या आठवड्यात फार मोठ्या प्रमाणावर शस्त्रे व दारूगोळा दिघी या कोकणपट्टीवर गोळा करण्यात आला. 'कम्युनली सेंसेटिव्ह' अशा डोंगरी गावात रात्री रस्त्यावर झोपलेल्या माथाडी कामगारांची मुंडकी छाटून टाकण्यात आली होती. हेतू सरळ होता. हिंदूंनी सूड म्हणून रस्त्यावर उतरावे व मोठा दंगा सुरू व्हावा. ती आग मुंबईत पसरावी. आपनेवाल्यांना शस्त्रांचे वाटप करण्याचे काम पूर्ण झाले होते. दंग्यात ऑटोमॅटिक बंदुकीतून फायरिंग झाले की हजारो निष्पाप माणसे मारली जाणार होती.

तिसऱ्या टप्प्यात दुसरा शस्त्रांचा मोठा साठा फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यांत शेखाडी गावी पोचला होता. पण तोपर्यंत मुंबई शांतच होती. जशी अपेक्षा होती तसे दिघीस जातीय दंगे झालेच नाहीत. ज्यांच्याकडे शस्त्रे पोचली होती ते आता अस्वस्थ होते. पोलिसांनी पकडले तर काय करा? ही सारी घरे आपनेवाल्यांचीच होती. म्हणून प्लॅन थोडासा बदलला गेला. दंगे झाले नाहीत. एवढे 'मर्द मराठे' कापूनदेखील. योजनाकारांना वाटले, आपले प्लॅनिंग कोठेतरी मार खाते आहे.

जास्त स्ट्रॉंग औषधाची जरूर होती. ते औषध ५ आठवड्यानंतर, म्हणजे १२ मार्चला बॉंबस्फोटांच्या रूपात मुंबईस देण्यात आले. काफीर मोठ्या प्रमाणावर मारले गेले खरे, पण मुंबईत दंगे झाले नाहीत. भारतभर ते पसरण्याची गोष्ट तर दूर राहिली. जानेवारी व फेब्रुवारीत मिळून एकंदर ७५ एके - ५६ ऑटोमॅटिक रायफल्स, शेकडो पिस्तुले, ३.५ टन आरडीएक्स, शेकडो हॅंड ग्रेनेडस् व हजारो काडतुसे भारतात आली होती. दंगे करून नुकसान - मानवी व मालमत्तेचे - करण्यासाठी. गुजरातच्या दरियावरील गावातही शस्त्रे उतरविण्यात आली होती. ती अबु सलीमने मुंबईस संजय दत्तच्या घरी पोचविली. ही माहिती ऐकीव नाही, अबु सलीमनेच जबानीत कोर्टात सांगितली. दत्तच्या घरी कां? खासदाराच्या मुलाच्या घराची तलाशी कोण घेईल? अबु सालेमला २००५ पर्यंत पकडलेसुद्धा नाही. सीबीआयने बॉंबस्फोट व दत्त प्रकरण वेगवेगळी केली. दोघांचा काहीच संबंध नाही, असे सांगितले. (पुढे सुनंदा पुष्कर आणि शशी थरूर, २०१५ व शीना बोरा आणि पीटर मुखर्जी, २०१२ केसेसमध्ये पोलीस सेलेब्रिटींचे गुन्हे कसे दडपतात ते लोकांना चांगले पहावयास मिळाले.) अर्थात् हे सारे स्टेज-मॅनेज्ड चारी बाजुंनी कसे करतात याची कल्पना लोकांना आली. 'संजय बचाव' हा एक कलमी कार्यक्रम चालू होता. त्यास थोरांचे आशीर्वाद लाभले होते. येशू ख्रिस्ताचे शब्द थोडे बदलून म्हणावेसे वाटते, ''देवा, यांना क्षमा करू नकोस. ते काय करीत आहेत व त्याचे दुष्परिणाम काय होतील ते त्यांना चांगले ठाऊक आहे.'' प्लॅन असा होता की बॉंबस्फोट झाले

की प्रामुख्याने हिंदूंचे लोंढे स्टेशनातून मोठ्या संख्येने बाहेर पडतील. त्यांच्यावर हँड ग्रेनेडस् टाकले की ते आणखी गोंधळतील व त्यांच्यावर एके-५६ मधून फायरिंग केले जाईल. त्यानंतर तेथे हजारो प्रेतांचा खच पडेल. संजय 'सेलिब्रेटी'चा मुलगा होता. त्यास *डिप्लोमॅटिक इम्युनिटी* खुद्द सीबीआयनेच दिली. दाऊदचे (म्हणजे पाकिस्थानी आर्मीचे) गणित किती अचूक होते!

सुनील, दाऊ टू?

५००० वर्षांपूर्वी आंधळ्या धृतराष्ट्र राजाने दुर्योधन या आपल्या परमप्रिय पुत्रासाठी महाभारत घडविले. त्यानंतर अनेक धृतराष्ट्र या पृथ्वीवर होऊन गेले. बाबर व हुमायूनाची गोष्ट सर्वांना माहीत आहे. सुनील दत्त हा त्या अनेक धृतराष्ट्रांतील एक.

काय गंमत आहे, ३ एके-५६ रायफली व काही हँड ग्रेनेडस् बाळगल्याबद्दल संजयला ५ वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा देण्यात आली. तज्ञांचे म्हणणे, संजयचा गुन्हा यापेक्षा कितीतरी पटीने जास्त होता. या गुन्ह्यांसाठी त्याला सजा दिली गेलीच नाही. संजयचे ते इतर गुन्हे कोणचे ते आपण पाहू.

भारताच्या हिंसेच्या इतिहासांत डी कंपनीची ही योजना सर्वात मोठी, सर्वात क्रूर व सर्वात धाडशी होती. त्यात गुन्हेगारांना सुरक्षितपणे विमानाने दुबईस पळून जाण्याची निर्दोष व्यवस्था केली गेली होती. ती व्यवस्था कोणी केली? कोणचा अधिकारी लांच खाऊन फुटला? त्याला अजून शिक्षा झालेली नाही. १६ जानेवारीस ही शस्त्रे संजयच्या घरी सुखरूप पोचली. पित्यास हे माहीत होते. दोघांपैकी एकाने पोलिसांना फोन करून कळविले असते तर मार्चमध्ये होणारा अनर्थ टळला असता. शस्त्रांचे पाकिस्थानात प्रशिक्षण देण्यासाठी कित्येक तरुणांना रवाना केले गेले, असे सुप्रीम कोर्टाच्या तपासणीत कळले. शस्त्रांचा 'वेल्डींग' केलेला पोलादी पेटारा उघडण्यासाठी बांद्र्यातील लिंकिंग रोडवरील मॅग्नम प्रॉडक्शनचे कंपौंड निवडण्यात आले. त्याचे मालक होते हिंगोरा व काडावाला. आयत्यावेळी पोलिसांच्या भीतीने त्यांनी नकार दिला. त्यांनी संजयचे घर सुचविले. संजयला दुबईहून फोन आला. तो तयार झाला. त्याच्या गॅरेजमध्ये तो पेटारा आणण्यात आला. नेमके तेथे खासदार सुनील दत्तला दिलेले बॉडी गार्डस् उभे होते. त्यांना सारे दिसले असते, म्हणून संजयने त्यांना ''दुसऱ्या गेटपाशी जा,'' असे फर्मावले. ते गेले, पण त्यांच्या मनात संशयाची पाल चुकचुकलीच. पेटारा खोलण्यात आला व शस्त्रे बाहेर काढण्यात आली. संजयने त्यातून तीन एके, दोन पिस्तुले व चार हँड

ग्रेनेडस् आपल्यासाठी काढून घेतली. ही शस्त्रे अबु सालेमने गुजरातेतून संजयच्या घरी आणली होती. या प्रवासात - विशेषतः सीमेवर - कोणीही अबुची गाडी चेक केली नाही. संजयने दाऊदच्या अनीस या भावास फोन करून सांगितले, ''येथे गॅरेजमध्ये हँड ग्रेनेडस् ठेवणे मला धोक्याचे वाटते, ती तू घेऊन जा.'' अनीसने मंसूर अहमदला धाडले व ग्रेनेडस् हालविण्याची व्यवस्था केली. पुढे हिंगोरा व काडावाला यांना पकडल्यावर त्यांनी संजयचे नाव घेतले. पोलिसांना त्याचा संशय आला होताच. पण नेमका संजय शूटिंगसाठी मॉरीशसला गेला होता. पोलिसांनी स्वस्थ बसायचे ठरविले. पण कोणा पत्रकाराने यावर एक लेख लिहिला. पोलिसांना आता स्वस्थ बसणे अशक्य झाले. कोणा हितेच्छुने मॉरीशसला फोन जोडला व या लेखाविषयी संजयला माहिती दिली. तो घाबरला. त्याने फोनवर नूलवालाला कळविले, ''माझ्याकडे तीन एके व काही पिस्तुले आहेत. ताबडतोब त्यांचा नाश कर.'' मरीन लाईन्सवर एका फाऊंड्रीत ही शस्त्रे नूलवाल्याने नेली. पण एकेची नळी व पिस्तुले काही केल्या वितळेचनात. संजयला त्याचा 'माल' परत करण्यात आला. (दुर्दैवाने, संजय व अनीस, संजय व अबु सालेम यांचे सेलफोनवरील संवादाचे रेकॉर्ड व हस्तप्रत पोलिसांकडे आहे व ती सामुग्री त्यांनी सुप्रीम कोर्टास पुरावा म्हणून पेश केली.)

माशा अल्ला संजय दत्त रंगेहात पकडला गेला. 'मला काही विचारू नका, मला आता एकटे सोडा,' अशी त्याने पत्रकारांना विनंती केली. त्याच्याबरोबर त्याची कॉंग्रेस खासदार बहीण प्रिया दत्त होती. यामुळे कांही कॉंग्रेसवाले आपल्या पदाचा कसा दुरुपयोग करतात व अंडरवर्ल्ड आणि आतंकवाद्यांबरोबर संबंध ठेवून कसा देशद्रोह करतात ते लोकांना समजले. २०१४ च्या निवडणुकीत लोकांनी सारा राग बाहेर काढला व मोदींना जिंकवून आणले. आपल्या यशास संजूबाबाचाही हातभार लागला आहे, म्हणून की काय महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी त्यास महिनामहिनाभर पॅरोलची सूट दिली असावी! कां, तर तब्येत बिघडली म्हणून? मग तो त्या काळात शूटिंग कसा करीत होता? मुन्नाभाई, ये पुछनेका होता नही है.

अंडरवर्ल्ड व बॉलीवुड

कॉंग्रेसमधील मुसलमान लॉबीने बॉलिवुडसाठी एक नवा कायदा जाणून बुजून पसार केला व त्याला उद्योगाचा दर्जा नाकारला. त्यामुळे सिनेमांच्या हिंदू निर्मात्यास बँका वा इतर वैध मार्गाने कर्जे मिळेनाशी झाली. त्यामुळे निर्मात्यांना बिल्डींग कॉंट्रॅक्टर्सकडे किंवा स्मगलर्स किंवा हवालावाल्यांकडे हात पसरावा लागे.

ही मंडळी ४० ते ६० टक्के व्याज या फिल्म निर्मात्यांना आकारीत. पूर्वी गुजराती वा सिंधी निर्माते असत. त्यांची जागा आता या मुसलमान गँगस्टर्सनी घेतली. त्यांना तर ही देवाची देणगी वाटली. त्यांचा काळा पैसा पांढरा करण्याचे मोठे साधनच हाती आले.

राजकारण, क्रिकेट, संगीत व सिनेमा यात डी-कंपनीने धुमाकूळ घातला. राजकारणी विलासराव देशमुखांना २००८ साली मुख्यमंत्रीपदास मुकावे लागले तर १९९७ मध्ये गुलशन कुमारास प्राण गमवावे लागले. दाऊदने वाळवंटात शारजास आंतरराष्ट्रीय क्रिकेटचे केंद्र (हब) बनविले. इंग्रजांनी आपल्याला बॅटिंग व बॉलिंग शिकविले तर दाऊदने इंग्रज, ऑस्ट्रेलियन्स्, भारतीय व पाकिस्तान्यांना *मॅच-फिक्सिंग* शिकविले. हे बेटिंगचे खाते त्याचा भाऊ अनीस व सुनील सावंत सांभाळीत. (दुबईत १९९५ साली सुनीलचा खून झाला.) बेटिंग कशावरही होते - टॉस, वैयक्तिक स्कोअर, बॉलरचे वाईड बॉल्स, एका इनिंगचा स्कोअर व अंतिम रिझल्ट. १९८७ साली दिलीप वेंगसरकरने शारजाच्या मॅचमध्ये ड्रेसिंग रूममध्ये दाऊद घुसला होता व त्यास कॅप्टन कपिल देवने बाहेर हाकलले होते, असा जळगावच्या एका भाषणात गौप्यस्फोट केला होता. ''पाकिस्थानला हारविले तर मी प्रत्येकास कार बक्षीस देईन,'' असेही आश्वासन दाऊदने कपिलला दिले होते. रवी शास्त्रीनेही अशीच माहिती पत्रकारांना दिली होती. या खेळाच्या क्षेत्रांत दाऊदच्या ''सुरस व चमत्कारीक गोष्टी'' मोठ्या चवीने चघळून सांगितल्या जातात.

२००० च्या दशकांत हवालामार्गे काळा पैसा मुस्लीम एजंटांकडून बॉलीवुडमध्ये सर्वांत मोठ्या प्रमाणावर येऊ लागला. त्यांना हिंदू नटांपेक्षा 'आपनेवाले' नट जास्त पसंत होते. हिंदू नट काळ्या धंद्यात आपल्यास सहकार्य देणार नाहीत, असे त्या एजंटांना वाटणे साहजिक होते. त्यांना भीती होती की ते पोलिसांना व हेर खात्यास मदत करून आपला भरभराटीस आलेला धंदा बंद पाडतील. वर्तमानपत्रांत आलेल्या 'कॅसेट किंग' गुलशन कुमारांच्या दिवसाढवळ्या झालेल्या हत्येचा तपशील, तसेच सलमान व ऐश्वर्या यांच्यात झालेल्या भयंकर संवादाची हस्तप्रत यांच्यामुळे बॉलिवुडला 'अंडरवर्ल्ड'ने किती घट्ट वेढा घातला आहे व त्यातून त्याची सुटका होणे किती अवघड आहे, त्याची कल्पना लोकांना आली. दाऊदच्या पाठिंब्यामुळे आमीर खान, शाहरूख खान व सलमान खान हे मुसलमान नट पुढे आले. त्यांच्यामागे अफाट काळा पैसा होता. हिंदू नट असलेले सिनेमा फ्लॉप जाऊ लागले. त्याची कारणे तीन : (१) त्यांच्याजवळ एवढ्या मोठ्या प्रमाणावर काळा पैसा नसे. (२) तुम्ही हिंदू नट घ्यायचे नाहीत, अशी त्या फिल्मवाल्यांना धमकी

दिली जायची, घेतले तर प्राणाशी गांठ आहे, असा त्यांचे एजंटस् धाक दाखवायचे. डी-कंपनीचे मोठे नेटवर्क आहे. त्यांना सुपारी देणे वा स्वीकारणे काही विशेष वाटत नाही. (३) नाहीतर, मोठ्या प्रमाणावर त्यांना मुंबईत खंडणी द्यायला लागायची. याचा अर्थ, ज्या प्रमाणात फायदा व्हायला पाहिजे, तो होत नाही. मग धंदा कशाला करायचा? तोटा करण्यासाठी?

सरकारला आपली घोडचूक समजली. २००० साली सरकारने हिंदी सिनेमा ह्यास उद्योगाचा दर्जा दिला व फिल्मच्या निर्मात्यांना आता बँकेतून कर्ज मिळू लागले. पण या काळ्या पैसेवाल्या आतंकवाद्यांना ही सोन्याची अंडी देणारी कोंबडी आपल्या हातातून जाऊ द्यायची नव्हती.

त्यांनी निर्माता, दिग्दर्शक, नटनट्या वगैरे मंडळींवर दाऊदच्या गुंडांकडून दाब आणविला, कर्ज आमच्याकडूनच घ्यावे लागेल. कारण ते एका हाताने मोठे कर्ज देत, व त्यांच्या गुंडांमार्फत, म्हणजे दुसऱ्या हाताने खंडणीच्या रूपात ते पैसे परत घेत असत. २०११ साली विकीलीक्सने बरेचसे इ-मेल व इतर संदेश जगास खुले केले. त्यावरून कळले की दाऊद भले दुबईला हालला असेल, पण त्याच्या हस्तकांचे मुंबईत खंडणी उकळविण्याचे काम तेवढ्याच जोराने चालू आहे. *'चोरी चोरी चुपके चुपके'* या सिनेमाचा निर्माता नझीम रिझवी याने २००१ साली खंडणी द्यायचे नाकारले होते. त्याला व त्याच्या अब्दुल रहीम अल्लाबक्ष या दुय्यमास सहा वर्षांची कैदेची सजा झाली. कारण त्यांनी खंडणीची माहिती गुप्त ठेवली होती. भरत शाह या हिऱ्यांच्या व्यापाऱ्यास पाकिस्थानातील शकील या गँगस्टरची माहिती असून ती सरकारला दिली नाही, म्हणून अटक करण्यात आले होते. या विकीलीक्समुळे मुंबईच्या अंडरवर्ल्डच्या निरनिराळ्या उद्योगांवर व त्यांच्या काळ्या पैशांच्या व्यवहारावर खूप प्रकाश टाकला गेला. याशिवाय आपल्या हेर खात्याच्या एजन्सीजचे माहिती गोळा करण्याचे काम २४ × ७ चालूच असते. एक पाकिस्थानचा नट शकीलकडे गेला व 'मला भारतीय सिनेमात चान्स दे', अशी त्याने विनंती केली. लगेच त्याने एका फोन कॉलवर एका मोठ्या प्रॉडक्शन हाऊसमध्ये या पाकिस्थानी नटास काम देवविले. असेच एका फोनवर शकीलने दाऊदच्या जीवनावर सिनेमा काढण्याचे आश्वासन घेतले. या विकीलीक्सवरून कळले की शकीलला नकार दिलेला आवडत नाही. *'आय हेट टिअर्स'*, हे त्याच्या बाबतीत खरे आहे. तो काहीही करू शकतो. पासपोर्ट व व्हिसा तयार करणे म्हणजे त्याच्यासाठी डाव्या हातचा खेळ. २०१३ साली त्याने एका दिग्दर्शकास पाकी नटीस काम देण्यास त्याने नकार दिल्याबद्दल जीवे मारायचा घाट घातला. परवीन बाबीचाही असाच

रहस्यमय मृत्यू झाला होता. तिला *पॅरानॉईड सिझोफ्रेनिया* झाला होता. आपली हत्या करावयास बरेच जण टपून बसले आहेत असा तिचा आरोप होता, त्यात अमिताभ बच्चनचेही नाव होते.

बॉलिवुडची ही "दुसरी बाजू" फार कमी लोकांना माहीत असते. माधुरी दीक्षितचे आईबाप जास्त हुशार. काही कमीजास्त व्हायच्या आधीच तिचे लग्न करून तिला दूर अमेरिकेत पाठवून दिली. ती परत आली खरी पण दोन मुलांची आई म्हणून. बॉलिवुडचे लोक शकील "भाई"ला टरकून असतात. *'राम तेरी गंगा मैली'*ची सुंदर नायिका मंदाकिनी आज दाऊदच्या जनानखान्यात बंदिस्त आहे. *'विजय, मिट्टी और सोना'* व *'ओय ओय'*ची १९८० ते १९९० या काळात बॉलिवुड गाजविणारी नटी आज अमेरिकेत आहे. तिने राजीव रायशी लग्न केले. शकीलने त्यांच्याकडून ५० कोटी रुपये खंडणी मागितली. राय व सोनम हादरले व भारत सोडून पळून गेले. सोनू वालिया परवीन बाबीसारखी दिसे. राकेश रोशनच्या *'खून भरी मांग'* या सिनेमात सेक्स सिंबॉल म्हणून गाजली, तीला अशीच अदृश्य करण्यात आली. मीनाक्षी तर फक्त १७ वर्षांची होती. *'हीरो'*, *'शहेनशहा'* व *'दामिनी'*ची ती नायिका. 'घटक' हा तिचा शेवटचा पिक्चर. ती कोठे आहे ते आज कोणालाच माहीत नाही. सोमी अलीचे गाजलेले सिनेमे म्हणजे *आंदोलन, यार गद्दार, अंत* व *'आव, प्यार करे'*. तिला व मंदाकिनीला हाजी मस्तानने ठेवली होती! मीना कुळकर्णीचे काय झाले? ड्रग माफीया विकी गोस्वामीबरोबर ती राहते. तिला मादक द्रव्यांच्या हेराफेरी करण्यासाठी केनियात पकडली होती. *तिरंगा, क्रांतीवीर, किस्मत, करण अर्जुन, नशीब, चायना गेट* असे एकाहून एक सरस सिनेमा ममताने आपल्याला दिले. अरेरे, *तिरची टोपीवाले, जोडी नं. १* वगैरे चांगले सिनेमा देणाऱ्या मोनिका बेदीने डॉन अबु सलीमबरोबर स्पेनमध्ये रहावे? अनिता अयूब ही पाकिस्थानी नटी कामासाठी बॉलिवुडमध्ये काम करावयास आली. निर्माता जावेद सिद्दीकीने तिला हिंदी सिनेमात घेण्यास नकार दिला. त्याचे बक्षीस म्हणून त्यास गोळ्या घालून ठार करण्यात आले.

अर्थात् अंडरवर्ल्डचे हस्तक बॉलिवुडमध्ये आहेत व त्यांनी "असे काही नाही, दोघांचा काही संबंध नाही," असा जोरदार व सकारात्मक प्रचार छापील व टीव्ही माध्यमातून सुरू केला. त्यांचे बचावाचे काही मुद्दे पुढीलप्रमाणे होते : (१) पूर्वी युसूफ खानास दिलीप कुमार असे हिंदू नाव घ्यायची गरज पडली. तो काळ ब्रिटीश वसाहतवादाचा होता. आता लोकशाही आहे. भारत स्वतंत्र देश आहे. सेक्युलर आहे. त्यामुळे आता तशी हिंदू नावे घ्यायची जरूर मुसलमान नटनट्यांना

वाटत नाही. (२) नट त्याच्या गुणांनी पुढे येतो, धर्मामुळे नाही. त्यांच्यात जर अभिनयाचे गुण नसतील तर लोक त्यांना केव्हाच लोकप्रियतेच्या रिंगणातून बाहेर फेकून देतील. (३) एसआरके व आमीर खान यांच्या बायका मूळच्या हिंदू आहेत. त्यांचा त्यांच्यावर प्रभाव पडणारच. (४) खेळाडु व नट यांचा खेळ बघायचा असतो. सचिन तेंडुलकर व मेरी कोम हिंदू वा ख्रिस्ती आहे याचा कोणी विचार करते का? निधर्मी राज्यात कोणाचा कोणचा धर्म आहे ह्यास काय महत्त्व आहे? (५) बॉलीवुडचे चित्रपट पाकिस्थानात तसेच कॅनडा व अमेरिकेतील भारतीय व पाकिस्थानी पहातात. त्यांचा आग्रह असतो की नट्या हिंदू असल्या तर चालतील, पण नट 'आपनेवाला चाहिये.' हा बचावाचा प्रचार चालत असताना त्यावर सुधीर फडक्यांशी मी चर्चा केली. ते म्हणाले, ''एक मुसलमान या क्षेत्रात आला की तो आणखी दोन मुसलमान कलावंत आत घुसवितो. हिंदू कलावंत याउलट लाजाळु असतात. आणि ते मेरीटचा आग्रह धरतात. प्रश्न ते मुसलमान असण्याचा नाही, तेवढे हिंदू नट वा संगीतकार कमी होतात, हा मुद्दा महत्त्वाचा आहे. आमच्या हिंदू नटास वा संगीतकारास वा दिग्दर्शकास पाकिस्थानात संधी दिली जाते कां? अजिबात नाही. मग आमच्या होतकरू कलावंतांनी कोठे जायचे?''

या डी-कंपनीने बॉलीवुडला वेठीला धरले. हा दाऊद या नटनट्यांना दुबईला पार्ट्यांसाठी आमंत्रण देतो व त्यांच्याकडून फुकटात करमणूक करवून घेतो. काही नट्यांना तर त्याने आपल्या जनानखान्यात सामील करवून घेतले व त्यांची फिल्म करिअर संपुष्टात आणली. हे सारे कोड भाषेत चालते, उदा. नटनट्या ''हाजी साहेबाची लेकरे'' म्हणून ओळखल्या जात. दाऊदचा मुलगा मोईन क्रिकेटचा शोकीन आहे. तो त्यांना पाहुणचारासाठी बोलावतो.

भारतातील सिनेमा उद्योगास आता १०० वर्षे पुरी झाली. भारतीयांना त्याविषयी अभिमान वाटतो. येथील नायक उंच इमारतींवरून खाली उडी मारतात, चालत्या ट्रेनच्या टपावर नाचतात, मोटार गाड्यांच्या शर्यती खेळतात आणि काय वाटेल त्या स्टंटबाजी करतात. सिनेमास शंभर वर्षे पुरी झाली, पण वाईट वाटते की या उद्योगातील नटनट्या अल्पायुषी असतात. त्यांच्यावर खूप ताण असतो. गीता बालीने एक वर्ष लहान असलेल्या शम्मी कपूरशी लग्न तर केले, पण ३५ व्या वर्षी देवीच्या रोगाने ती मरण पावली. विजयालक्ष्मी वडलापती दक्षिण भारतात फार लोकप्रिय होती. एका सिनेमात सिल्कचे काम केल्यामुळे ती सिल्क स्मिता म्हणून महशूर होती. आर्थिक हलाखीमुळे तिला डिप्रेशन आले व वयाच्या ३६ व्या वर्षी तिने आत्महत्या केली. गुरू दत्तमुळे भारतीय सिनेमा सुवर्ण युगात आला, पण

वयाच्या ३९ व्या वर्षीच अति मद्यपानाने व सिझोफ्रेनियामुळे या गुणी नटाने व दिग्दर्शकाने स्वतःला मारले! मीना कुमारीस *ट्रॅजेडी क्वीन* म्हणत. कमाल अमरोहीने तिला सोडली. तिला दारुचे व्यसन लागले. ३९ व्या वर्षी तीचा एका खाजगी इस्पितळात ट्रॅजिक मृत्यू झाला : तिच्या जवळ मेडिकल बिल द्यायलादेखील पुरते पैसे नव्हते. पद्मश्री स्मिता पाटील. अत्यंत बुद्धिमान नटी. तिचा नवरा बब्बर खान. ३१ व्या वर्षी ॲबोर्शननंतरच्या काळांत तिचा रहस्यमय मृत्यू झाला, असे म्हणतात.

संजीव कुमार असाच बुद्धिमान व हुषार नट. शोलेमधला ठाकूर. ४७ व्या वर्षी तो हार्ट ॲटॅकने मरण पावला. त्याला हेमा मालिनी फार आवडायची, पण तिने धर्मेंद्रशी लग्न केले. मधुबाला म्हणजे बॉलिवुडची मॅरिलीन मन्रो. ३६ व्या वर्षी मद्रास सिनेमाच्या शुटींगमध्ये तिला रक्ताची उलटी झाली व मरण आले. तरुणी सचदेवला 'रचना गर्ल' म्हणायचे. या पिक्चरमध्ये तिने अमिताभ बच्चनबरोबर अविस्मरणीय काम केले होते. २४ व्या वर्षी नेपाळात तिच्या विमानाला अपघात झाला व ती मरण पावली. दिव्या भारतीने १३ व्या वर्षी आपली कामाची सुरुवात केली. तिला बॉलीवुडची राणी म्हणत. तिने मुंबईत पाचव्या मजल्यावरून उडी मारून आपली जीवनयात्रा संपविली. जिया खानने अमिताभ बच्चन बरोबर *निशब्द* मध्ये काम करून बॉलिवुड गाजविले. २५ व्या वर्षी आपल्या फ्लॅटमध्ये तिने गळफास लावून आपले जीवन संपविले.

अल्पायुषी होणे एक गोष्ट, आत्महत्या करायला लागणे एक गोष्ट व दुष्ट लोकांमुळे रहस्यमय मृत्यू येणे ही आणखीनच निराळी गोष्ट. पूर्वी कधी घडायचे नाही ते आता अघटित घडू लागले आहे - रहस्यमय मृत्यू. २६ वर्षांच्या अर्चना पांडेला उमर पठाण नावाचा बॉयफ्रेंड होता. अर्चना बॉलिवुडमध्ये *फायनांशिअल कन्सल्टंट* होती. तिचा असाच रहस्यमय मृत्यू झाला. तिने लिहून ठेवलेल्या चिठ्ठीत तीने पठाणला दोषी ठरविले होते. जीयाने सुरज पंचोलीचे नाव चिठ्ठीत लिहिले होते. तो आदित्य पंचोली व झरीना वहाबचा मुलगा. सुरजची जामिनावर सुटका झाली. नफिसा जोसेफला *ब्युटी क्वीन* म्हणत. तिच्या ट्रॅजिक मृत्यूची अशीच रहस्यमय कहाणी आहे. कुणाल सिंग या नटाचाही गळफास लावून झालेला मृत्यू लविना भाटीया ह्या फॅशन डिझायनरमुळे झाला असावा, असे मानले जाते. कुनालचे आधीचे लग्न झाले होते. त्याच्या पत्नीच्या कानी त्याचे हे *अफेअर* आले होते.

नेत्यांवरील बायोपिक्स

बायोपिक म्हणजे राजकीय नेत्यावरील किंवा युद्ध नायकावरील नाट्यमय

'बायोग्राफिकल फिल्म.' सत्य कथेपेक्षा ती थोडीशी निराळी असते. तेच प्रसंग, त्याच घटना, पण त्यात नाट्याचा मसाला भरला की ही बायोपिकची करंजी खुसखुशीत होते. आपले बॉलिवुड मुसलमानांच्या प्रभावाखाली असल्यामुळे खूप प्रसवशील आहे. पण दर्जा इंडियन आहे, माफ करा, नॉर्थ इंडियन, आहे. तुलनेने मराठी सिनेमा जास्त परिणामकारक आहे. बॉलिवुडला पैशाची कमतरता नाही, त्यामुळे 'टेक्नीकली' हे सिनेमे *'निअर-पर्फेक्ट'* असतात, पण कथा, ॲक्टिंग वगैरे बाबतीत ते उथळ व 'लाऊड' असतात. बायोपिकच्या बाबतीत पाश्चात्त्यांच्या ते कोठेच जवळपासही येऊ शकत नाहीत. हे दुर्दैवी आहे. याची कारणे दोन : (१) अजून आपले राष्ट्रीय धोरण ठरविलेले नाही. काँग्रेसचे, कम्युनिस्टांचे, एमआयएमचे व भाजपाचे राष्ट्रीय धोरण एक होऊ शकत नाही. असा परिस्थितीत फक्त गोंधळ निर्माण होऊ शकतो. (२) इंग्रजांच्या कुटील नीतीमुळे भारतीयांची ब्राह्मण-ब्राह्मणेतर व मुसलमान व बिगर-मुसलमान अशी सरळ सरळ दोन गटात विभागणी झाली आहे. या गटांची अवस्था *''ईस्ट इज ईस्ट अँड वेस्ट इज वेस्ट, अँड नेव्हर द ट्रेन शॅल मीट,''* असे थोडक्यांत वर्णन करता येईल. हा फरक कमीकमी कसा करता येईल यासाठी कोणीच प्रयत्न करीत नाही, कारण आपले सारे सांप्रतचे राजकारण ''त्या फरका''वर आधारित आहे. त्यामुळे अजून कांही दशके आपल्याकडे चांगले बायोपिक्स निघतील अशी आशा करणे व्यर्थ आहे.

बेन किंगस्लेने गांधी (१९८२) मध्ये काम केले व तो त्यामुळे जगप्रसिद्ध झाला. ॲटनबरोंचा 'गांधी' हा सिनेमा अपवाद होता. पण त्यास राजाश्रय होता. सुरुवातीलाच इंदिरा गांधींनी त्यास ८ कोटी रुपये दान म्हणून दिले होते. महंमद अली *'ग्रेटेस्ट'*मुळे व ऑडी मर्फी *'टू हेल अँड बॅक'*मुळे प्रकाशात आले. आपल्याकडे उत्तम बायोपिक्स् नाहीत तर त्यावरील उत्तम भाष्यकार कोठून येणार? अमेरिकेचा बायोपिक तज्ञ जॉर्ज एफ.कुस्टेन, ''हॉलिवुड युग संपले व बायोपिक्सही संपले,'' असे हळहळतो. बिंगहॅम पुरुषी व महिला असे बायोपिक्सचे दोन वेगवेगळे भाग करतो. महिला विभागात महिला कशास बळी पडतात त्याच्या चित्रणास तो महत्त्व देतो. सीआयए एजंटांवरील सिनेमा तेवढ्यासाठी लोकप्रिय होतात. कास्टिंग महत्त्वाचे असते. 'निक्सन'मध्ये अँथनी हॉपकिन्स अजिबात निक्सनसारखा वाटत नाही. अमेरिकन जॉन वेन मंगोल चंगीजखान कसा वाटणार? लुई गॉसेट हा आफ्रिकन अमेरिकन नट इजिप्शिअन प्रे. सादत कसा वाटेल? सेलीना मेक्सिकन अमेरिकन होती तर तिची भूमिका करणारी नटी जेनिफर लोपेज न्यूयॉर्कमध्ये राहणारी प्युएर्टो रीकन होती. व्ही. शांतारामांच्या डॉ कोटणीसांवरील सिनेमात जयश्रीने काम केले

होते, ते व्यवस्थित चालले, कारण कोटणीसांच्या चिनी माशुकास भारतात कोणीच पाहिले नव्हते! मराठी बायोपिकमध्ये लो. टिळक "सिंह" वाटत नाहीत किंवा सावरकर "वीर" वाटत नाहीत. हिंदी *डिसकव्हरीत* नेहरू तृतीयपंथी वाटतात व ऐकू येतात. याउलट, *आंधी* मध्ये सुचित्रा सेन (इंदिरा) छान कणखर वाटते. कास्टिंग (नायकाची निवड) फार महत्त्वाची आहे.

ज्यांना उत्कृष्ट बायोपिक्स पाहायची आवड आहे त्यांच्यासाठी काही चांगल्या फिल्म्स्ची (डीव्हीडी) मी शिफारस करेन. अमेरिकेत त्या १-१ डॉलर्सला "सेल"मध्ये मिळतात. व्यापारी त्यावर त्यांचा नफा चढवून भारतात विकतात : (१) *लिंकन*, २०१२ : गुलामांच्या धोरणाविरुद्ध लढा व सिव्हील वॉर वरील असामान्य सिनेमा. (२) *ऑल द प्रेसिडेंटस मेन*, १९७६ : *वॉटरगेट घोटाळा* व निक्सनच्या अस्तावर ही सुंदर फिल्म; प्रत्येकाने पाहिलीच पाहिजे. (३) *गॅदरिंग स्टॉर्म*, २००२ : चर्चिल व हिटलर यांचे उत्कृष्ट क्षण, रशियाशी जर्मनीचे फाटते व जर्मनी रशियावर हल्ला चढवितो. दुसऱ्या महायुद्धाचे अप्रतिम चित्रण. (४) *मालकम एक्स*, १९९२ : काळ्या राष्ट्रवादी नेत्याचे व नेशन ऑफ इस्लामच्या अधिकाऱ्याचे वॉशिंग्टनमधील कर्तृत्वाचे चित्रीकरण. (५) *गांधी*, १९८२ : बेन किंगस्लेने गांधीजींची भूमिका अप्रतिम रंगविली आहे. याचे कारण रिचर्ड ॲटेनबरोचे दिग्दर्शन. भारताच्या ५० वर्षांच्या स्वातंत्र्य लढ्याचे ३ तासात छानसे दर्शन. (६) *जेएफके*, १९९१ : जॉन एफ के केनेडीच्या हत्येवरील भयंकर फिल्म. (७) *प्रायमरी कलर्स*, १९८७ : बिल क्लिंटनच्या १९९२ च्या निवडणुकीवरील बहारदार चित्रण. (८) *पॅटन* : दुसऱ्या महायुद्धात जन. जॉर्ज एस पॅटनने असा पराक्रम केला की जर्मन्सही त्यास मानतात. हॉलिवुडची ही सर्वोत्कृष्ट फिल्म आहे. (९) *क्राय फ्रीडम* : रिचर्ड ॲटेनबरोने द. आफ्रिकेतील अपार्थीड धोरणाचे अप्रतिम चित्रण केले आहे. डेंझेल वॉशिंग्टन व केल्विन क्लाईनची कामे "मार डाला." (१०) *मॅंडेलाज् लॉंग वॉक* : इड्रिस एल्बा व नौमी हॅरीस. यात एक धोका आहे. असले सुंदर चित्रपट पाहिले की भुक्कड भारतीय चित्रपट पाहवणार नाहीत. आपल्याकडे असे असामान्य प्रयत्न का होऊ शकत नाहीत?

सिनेमांच्या क्षेत्रात काही बहाद्दर मंडळी आहेत. जाणूनबुजून ते हे 'रिस्क' घेतात व सेंसॉर बोर्डाची परीक्षा बघतात. गांधीजींवर बरेच सिनेमे काढण्यात आले. मात्र, त्यांच्या खुन्याची - नथुराम गोडशांची - बाजू मांडणारी नाटके निघाली, सिनेमे अजून निघावयाचे आहेत. जमाना बदलला आहे. राष्ट्रपित्याची दुसरी बाजू काही असेल तर ती आता बाहेर आली पाहिजे. *इटस् हाय टाईम नाऊ.* सावरकर

व वल्लभभाई पटेल यांच्यावर जिद्दीने सिनेमे काढण्यात आले. अशा फिल्म्स् 'कमर्शिअली हीट्' होऊ शकत नाहीत. कारण, आख्खे 'स्टेट' त्याविरुद्ध असते. सुधीर फडके जिद्दीचे, म्हणून त्यांनी सारी ताकद पणास लावून पैसे उभे केले व सावरकरांवर चित्रपट काढला. काळ बदलला आहे. त्यांच्यावर भविष्यात त्यांना न्याय देईल असा सिनेमा निघेल, अशी आशा वाटते. जीनांवर पाकिस्थान सरकारच्या मदतीने एक बायोपिक निघाला होता, असे ऐकतो.

नेहरूंवर अजून चांगला सिनेमा निघायचा आहे. १९६२ च्या पराभवामुळे नेहरू अचानक - अनपेक्षित नाही - बदनाम झाले. पंतप्रधान इंदिरा गांधीदेखील आणीबाणीने बदनाम झाल्या, पण १९७१ च्या बांगलादेशाच्या विजयामुळे त्यांनी भरपाई केली. "त्यांची २ शीख रक्षकांनी केलेली हत्या व त्यानंतर घडलेल्या शीखांच्या कत्तलीं"वर हरी सचदेव यांनी एक सिनेमा तयार केला. त्यात सोहा अली खान व वीर दास यांनी काम केले होते. सचदेवांना त्यात बऱ्याच सुधारणा (काटछाट) कराव्या लागल्या. "नेत्याच्या मरणोत्तर करविण्यात आलेला रक्तपात व कत्तली हा विषय लोकांच्या समोर आणणे आवश्यक होते, म्हणून आपल्याला हा उद्योग करावा लागला," असे सचदेवांनी सांगितले, "आपल्याला सेन्सॉरमुळे ९ ठिकाणी कात्री लावावी लागली व बऱ्याच प्रसंगी हिंसेचे प्रकार वेगळ्या स्वरूपात दाखवावे लागले." या फिल्मचे दिग्दर्शक शिवाजी लोटन पाटील होते. अशीच मराठी टीव्ही मालिका गांधी वधोत्तर झालेल्या ब्राह्मणांच्या हत्यांवर व करविण्यात आलेल्या जाळपोळींवर दाखविण्यात आली होती. तिचा दर्जा उत्तम होता. आणीबाणीत व नंतर इंदिरा गांधींवर आधारलेल्या *आंधी* (१९७५) या सिनेमात सुचित्रा सेन व संजीवकुमार यांनी फार छान काम केले होते. त्यास गुलझारांचे दिग्दर्शन लाभले होते. त्यातील आर.डी. बर्मन यांचे संगीत कानांना आजही लोभस व मोहक वाटते. सुरुवातीस तर त्यावर बंदी होती. १९७७ साली इंदिरा हारली व हा सिनेमा राष्ट्रीय बनला. *किस्सा खूर्सीका* या इंदिरेवरील सिनेमाला फार त्रास झाला. यशवंतराव व शरद पवार यांच्यावर बायोपिक निघावयास पाहिजेत. अण्णासाहेब शिंदे यांच्यावर देखील. अजित पवारांवर खुसरबुशीत विनोदी चित्रपट काढला तर गाजेल!

....

भारतात शौकत व महंमद अल्ली बंधू, मौ. आझाद, रफी अहमद किडवाई, खान अब्दुल गफार खान वगैरे मुस्लीम नेत्यांवर सिनेमे निघू शकतात, पण ते 'धंदा' म्हणून यशस्वी होणार नाहीत. त्यामानाने टीपू सुलतानावरील टीव्ही सिरीअल गाजली. खरे म्हणजे टीपू हिंदुसाठी खलनायक होता. त्याने तलवारीचा धाक

दाखवून लाखो हिंदूंना मुसलमान बनविले.

गांधी नेहरू घराण्यावर फिल्म उद्योगाचे भलतेच प्रेम दिसते. घराण्याची चमचेगीरी केली तर आपल्याला लाभ होईल, असे त्यांचे गणित असावे. घराण्याबाहेरच्या मंडळींवर - सुभाष, लाल बहादूर व नरसिंह राव - मात्र त्यांचा घुस्सा दिसतो. सुभाष, सावरकरांप्रमाणे, गांधीविरोधी होते. त्यांच्या दोनदा मिळविलेल्या कॉंग्रेस अध्यक्षपदाच्या निवडणुकांतील विजय, त्यांचा बर्लीनचा प्रवास, तेथून केलेली रेडिओवरील भाषणे, त्यांनी सबमरीनमधून केलेला टोकियोचा प्रवास, त्यांचे भारताबाहेर स्थापन केलेले आझाद हिंद सरकार व त्या सरकारची आझाद हिंद सेना - यापेक्षा जास्त स्फूर्तिदायक दुसरे काय असू शकेल? दुर्दैवाने, त्यांच्यावर चांगला सिनेमा नाही. तेलगू भाषेत एक विसरला गेलेला *'महानायक'* नावाचा एक युद्धपट आहे. सचिन खेडेकर नायक व श्याम बेनेगल दिग्दर्शक. लाल बहादूर असेच दुर्दैवी आहेत. १९६५ च्या युद्धाचे हे नायक, त्यांच्यावर एक मल्याळी कॉमेडी चित्रपट आहे. लाल, बहादुर व शास्त्री अशा तीन वेगळ्या मित्रांवर आधारलेली ती कॉमेडी आहे. नरसिंह रावांवर सिनेमा निघणे अवघडच दिसते. निर्मात्यांना बाबरी मशिद नडते. ते प्रकरण कोणच्याही निर्मात्याची झोप उडवेल असेच आहे. बाळ ठाकऱ्यांवर सिनेमा यायला पाहिजे. तोही उद्धवच्या व राजच्या हयातीत. पुढील पिढीचे काही खरे नाही. तेथेही *''बॉबे बर्निंग''* व श्रीकृष्ण अहवाल हे स्पीड ब्रेकर्स आहेतच. दाक्षिणात्य, साम्यवादी, हिरवे, बिहारी... त्यांचे किती शत्रू सांगावेत? इतिहास बदलता येत नाही. 'सरकार' हा त्यांच्यावरील बायोपिक हिंसाप्रेमी प्रेक्षकांना आवडला. अमिताभ बच्चनने बाळासाहेबांचे काम केले होते. कास्टिंगच चुकीचे होते. जयदेवची पत्नी स्मिता ठाकरे आमच्या बडोद्याची. तीचा प्रवेश व जवळच्या सहकाऱ्यांनी त्यांना सोडून जाणे व गृहकलहामुळे राजने आपली वेगळी चूल मांडणे - हे सर्व नाट्य भविष्यात जेव्हा सिनेमाच्या स्वरूपात सादर होईल तेव्हा ते 'ग्रॅमी अवार्ड विनर' असणार आहे. पण त्यासाठी रिचर्ड ॲटनबरोच्या ताकदीचा दिग्दर्शक लागेल. अजून आमची मानसिक गुलामगिरी गेलेली नाही, त्याचे हे लक्षण आहे. मोदींवर बायोस्कोप म्हणजे एक थ्रिलर होईल. त्यांची प्रत्येक घटना - गोध्रापासून ट्रंपशी शेक हॅंडपर्यंत- वादग्रस्त आहे. कांही त्यांच्यावर अतोनात प्रेम करतात, कांही त्यांचा द्वेष करतात. म्हणून, तो रेकॉर्ड ब्रेक सिनेमा होईल.

■■■

जम्मू आणि काश्मीर

असुरक्षित काश्मीरी मुसलमान

१९८९ नंतर पाश्चिमात्य जग काश्मीरकडे कसे बघते, माहीत आहे? त्या खोऱ्यातील मुसलमानांच्या मनांतील जातीय ज्वालामुखी त्या वर्षी ऊफाळला व दिल्ली आणि इस्लामाबाद यांच्यात जबरदस्त विवाद सुरू झाला. पाश्चिमात्य जगाला त्याची फार भीती वाटली. काश्मीरवरून केव्हाही तिसरे महायुद्ध पेटू शकते. दोघांकडे ॲटम बॉम्ब्ज् आहेत, त्या युद्धातून *न्युक्लीअर वॉर* पेटू शकते, पाकिस्थान दोघात दुर्बल व अविवेकी असल्यामुळे पाकिस्थान आधी आगळीक करेल व चिडून भारत पाकिस्थानची राखरांगोळी करून सोडेल अशी अमेरिकेला सतत २६-२७ वर्षे भीती वाटत आली आहे. पण कसले नि काय? त्यातले कांहीच घडले नाही. केवळ युनोत दोघेजण भांडत आहेत. फक्त भाषणे, आणखी स्फोटक भाषणे. अर्धा अधिक काश्मीर पाकिस्थानाने बळकावला. त्यातला काही भाग पाकिस्थानाने चीनला देऊन टाकला. हलवायाच्या घरावर तुळशीपत्र! या भारताच्या 'जगा व जगू द्या' (पेशन्स) ची कमाल आहे. अमेरिकेत असे काही घडते तर तिसरे महायुद्ध निश्चित् झाले असते.

विसरताय, आपण ''सत्य व अहिंसा'' वाले राष्ट्र आहोत. ''आम्ही कोणाशी लढणार नाही, आम्हाला सैन्य करायचेच काय?'' असा वेडगळ प्रश्न विचारणारे नेहरू आमचे पंतप्रधान होते. आणि ''आपल्या सैन्याला आपण शेती करायला पाठवू.'' असे म्हणणारे डॉ. राजेंद्र प्रसाद आमचे पहिले राष्ट्रपती होते. आमची नेते मंडळी म्हणजे १२ व्या शतकात अधर्मी महंमद घोरीशी धर्मयुद्ध लढणाऱ्या

पृथ्वीराजाची २० व्या शतकातील सुधारून वाढविलेली आवृत्ती होती. त्या युगात सावरकर नावाचा एक समर्थ रामदास या मंडळींचे कान उपटण्यासाठी हयात होता, पण नेहरू शिवाजी नसल्याने त्यांनी या गुरूचे काहीही ऐकायचे नाही असे ठरविले होते, एवढेच नाही, तर या गुरूला नजरकैदेत ठेवले होते. पुढे नेहरूंना त्यासाठी सजादेखील मिळाली - शारीरिक व राजकीय अपंगत्व.

गुंतागुंत कशामुळे?

अमेरिकेची कथा निराळी होती. प्रे. लिंकनना शांती पाहिजे होती. त्यासाठी जगात सर्वात बलाढ्य सेना त्यांना निर्माण करावयाची होती. लोक हांसले. शांती व सेना? त्यांनी समजावले, ''एवढे बलाढ्य सैन्य की कोणीही आमच्याकडे वाकड्या नजरेने पहाणार नाही.'' ही झाली अमेरिकेची विचारसरणी. भारतीय नेत्यांना विचारले तर ते सांगतील, ''तुम्हाला वाटते काश्मीरचे काम तेवढे सोपे नाही. फार गुंतागुंतीचे काम आहे. म्हणून शांतीने, सबूरीने घ्यावे लागते.'' ही गुंतागुंत कोणी केली? कां केली? कशी केली? ती सुटेल कां?

गुंतागुंतीचा हा काश्मीरचा प्रश्न बड्या नेत्यांचे खाजगी जीवन, हिंदु-मुस्लीम संबंध, आतंकवाद, राज्यपुरस्कृत हिंसाचार, भेदनीती व ऐतिहासिक राजकीय निर्णयांच्या घोडचुका या सर्वांची सरमिसळ आहे. या प्रश्नाचे ५ महत्त्वाचे घटक आहेत :

१. १९४७ साली काश्मीर भारताकडे जावा अशी इंग्रज सरकारची जराही इच्छा नव्हती. त्यांच्या दृष्टीने फाळणी हिंदू इंडिया व मुस्लीम इंडिया अशी झाली होती. काश्मीरात मुसलमान बहुसंख्य होते. त्यामुळे ते पाकिस्थानात जावे, असे ब्रिटीश धोरण होते. त्यात ब्रिटीशांचे पश्चिम आशियातील तेलाचे राजकारणही दडलेले होते. नेहरू व शेख अबदुल्ला यांचे बंधुवत् जवळचे नाते, त्यातून निर्माण झालेला अबदुल्लांविषयी फाजील आत्मविश्वास व हिंदू राजास काढून अबदुल्यास त्या जागी बसविण्याची ''ख्वॉईश'' ही पार्श्वभूमी महत्त्वाची आहे. हैदराबाद वा भोपाळ वा जुनागढ येथे मुस्लीम संस्थानिक होते, पण ते काम सोपे होते -- प्रजा बहुसंख्य हिंदू होती. काश्मीरात उलटी परिस्थिती होती. त्यामुळे ''नेहरू करताहेत ते त्यांना करू द्या, आपण त्यात नाक खुपसणे योग्य ठरणार नाही,'' अशी इतर नेत्यांची विचारसरणी होती. शेख अबदुल्लांच्या विधवा बेगमेस मी विचारले, ''काश्मीरवर सत्ता गाजवायची एवढी काय खाज?'' एकदम उसळून त्या म्हणाल्या, ''मोठा भाऊ जर हिंदुस्थानावर राज्य करतो तर छोट्या भावाने काश्मीरवर राज्य

केले तर काय बिघडले?'' मला त्या एका वाक्यात साऱ्या काश्मीरच्या राजकारणाचा अर्थबोध झाला. खरे म्हणजे फाळणीची इंग्रजांची प्रक्रिया ही सदोष होती. भारत व पाकिस्थान सदोष फाळणीची सदोष प्रक्रिया विसरून गेली ७० वर्षे एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करीत आहेत.


२. दोन्ही देशांनी काश्मीर हा आपापल्या राष्ट्रवादाची ओळख समजून तो गुंता आणखीनच वाढविला. पाकिस्थानची राष्ट्रवादाची व्याख्या होती, मुसलमानांसाठी वेगळे व त्यांच्या हक्काचे घर. एका शब्दात दारुल इस्लाम. म्हणजे, हिंदू राजाच्या छळातून मुसलमानांना मुक्त करणे. दुसऱ्या शब्दात, काश्मीरशिवाय पाकिस्थान असूच शकणार नाही. जीनांनी ही टोकाची भूमिका घेतली होती व बढाई मारली होती, सकाळचा नास्ता कराचीत, व दुपारचे जेवण श्रीनगरमध्ये. जीनांच्या वारसांची हीच भूमिका होती व आहे. बरोबर, याउलट, भारताचा सारा भर काश्मीरातील ''सेक्युलर'' लोकशाहीच्या ''देखाव्या''वर होता. पुन्हा सांगतो, देखाव्यावर. काश्मीरच्या आम आदमीच्या विकासाचा दोघांपैकी २०१४ पर्यंत कोणीही विचार केला नव्हता. आजवर तेथे फक्त अमाप पैसा ओतायचा. तो तेथील मूठभर मंडळींनी आपापसांत वाटून घ्यायचा. मजा करायची. आणि 'प्युपाज् साँग'प्रमाणे म्हणायचे, *''गॉड नेहरू इज इन दिल्ली, अँड एवरीथिंग इज राईट विथ द वर्ल्ड.''* थोडक्यात *बाय अँड रूलचे* आजवर धोरण होते. २०१४ साली मोदी आले व त्यांनी भाषाच बदलली. ती भाषा विकासाची होती. सबका साथ, सबका विकास.

३. दोघा देशांच्या अंतर्गत राजकारणावर काश्मीरने उगाचच फार प्रभाव गाजविला. पाकिस्थानाने आपल्या चुका व दोष झाकण्यासाठी काश्मीर प्रश्न वापरला. भारतात पंतप्रधान काश्मीरी पंडित, परराष्ट्र मंत्रालयात काश्मीरी पंडित व इतर क्षेत्रात उच्च स्थानी कौल, धर आणि काव. अगदीच वेळ आली तर सोव्हिएट युनियन होतेच त्याचा 'व्हेटो' वापरायला. या त्यांच्या ''अधिकारा''मुळे काश्मीरच्या धोरणात अहंकार व ताठा आला. आम्ही करू ती पूर्व, इतरांनी यात नाक खुपसायचे नाही, असा अलिखित नियम बनला.

४. काश्मीर हे सरहद्दीवरील राज्य. चार इतर राष्ट्रांच्या सरहद्दी तेथे भिडलेल्या. त्यामुळे आपोआप त्यास लष्करी महत्त्व प्राप्त झाले. १ जानेवारी १९४९ रोजी लष्करचा सल्ला न घेता जनरल नेहरूंनी ''सीझ फायर''चा हुकूम दिला व काश्मीरचा अर्धा भाग पाकिस्थानाकडून जिंकायचा राहून गेला. आज आपल्याकडे जे आतंकवादी येतात ते सारे न जिंकलेल्या त्या भागातून प्रशिक्षित होऊन येतात. १९६५ साली आपण *सीझ फायर लाईन* ओलांडली व लाहोरकडे कूच केले. जनरल आयूबला तो

मोठा धक्का होता. त्याने परस्पर लडाखचा काही भाग चीनला देऊन टाकला. चीनने तेथे पक्का हमरस्ता बांधला. शत्रूने व्यापलेले हे सारे स्ट्रॅटेजिकली महत्त्वाचे मुलूख परत घ्यायची आपण कधी भाषाही केली नाही, कारवाई तर सोडूनच द्या. पूर्वी बर्फाळ सियाचीनला जाणे व तेथे रहाणे अशक्य होते. तंत्रज्ञान प्रगत झाल्यामुळे हेलीकॉप्टर्सच्या सहाय्याने आपण तेथे अखंडित खाद्यपदार्थ व आवश्यक गोष्टींचा पुरवठा करू शकतो व तेथे पेट्रोलिंग करतो. त्यामुळे आज सियाचीन ग्लेसियर ही सर्वात महागडी युद्धभूमी बनली आहे. आणि डोकेदुखीदेखिल.

५. काश्मीरप्रमाणे गुजरात, पंजाब व राजस्थान हेदेखील पाकिस्थानचे पडोसी प्रदेश आहेत, पण तेथे विकासामुळे ते प्रांत कसे पुढारलेले व प्रसन्न वाटतात. काश्मीरात आपण आपल्याला अनुकूल असे लोकसंख्येचे प्रमाण *(फेव्हरेबल पॉप्युलेशन रेशिओ)* करायला पाहिजे होते, ईस्त्राएल किंवा हिमाचल प्रदेशाप्रमाणे आधीच 'सुजलां सुफलां' असलेल्या ह्या भागात बागायतीचे उत्पन्न वाढवावयास पाहिजे होते व औद्योगिक विकास साधावयास पाहिजे होता. यातील आपण एकही गोष्ट केली नाही. याचे कारण आत्मविश्वासाचा अभाव व संशय - भाऊबंदकी म्हटली की अविश्वास, संशय व भीती येणारच. फक्त पर्यटकांवर अवलंबून राहिलो. कलम ३७० मुळे आपण जास्त कामसू व कुशल बिगरकाश्मीरींना तेथे वसवू शकलो नाही. आळशी व अविश्वसनीय काश्मीरी मजुरांमुळे तेथे आपले उद्योग चालू शकले नसते. फुकट पोसत गेल्यामुळे ते आणखीनच आळशी बनले. पुढे



पाकिस्थानाने १९९० नंतर आतंकवादी धाडण्याच्या धोरणामुळे पर्यटन व उद्योग यांचा विचार करणेही बंद पडले. नाहीतर जम्मूमध्ये भारतीय उद्योगपतींनी आपले छोटे कारखाने सुरू केले होते. नाही म्हणायला, बागायतीचे (केशर व सफरचंद) उत्पन्न वाढले आहे. आपले तेथे पैसे ओतणे व नेत्यांना विकत घेणे जोरात चालू आहे. साऱ्या जगात असे सुस्त व मस्त दुसरे काश्मीर शोधून मिळणार नाही. अपवाद पाकिस्थानचा. आपण काश्मीरला पोसतो. अमेरिका पाकिस्थानला. आपल्याकडे दगडफेक व मंदिरांची नासधूस. त्यांच्याकडे वर्ल्ड ट्रेड सेंटरचे दोन मिनार पाडणे. दोन्ही जगातल्या मोठ्या लोकशाह्या!

लष्करापासून मुल्लांना दूर ठेवा

अफगाणिस्थानातून सोव्हिएट युनियनने १९८९ मध्ये काढता पाय घेतला. अमेरिकेचे काम झाले होते. आता अमेरिकेस त्या जिहार्दीची आवश्यकता नव्हती. मात्र जम्मू आणि काश्मीरातील पाकिस्थानच्या भाडोत्री दलालांनी त्यांच्या इस्लामाबादमधील बॉसला कळविले, ''आम्ही आपल्या हुकूमाप्रमाणे येथे अलगवादी आक्रमक आंदोलन सुरू केले आहे. येथील मुसलमानही आता जागृत झाले आहेत. इस्लामी उठाव करायला ही आता नामी संधी आहे.''

दोघांचे असे ठरले होते की पाकिस्थानात शुद्ध (पाक) इस्लामी राजवट आणणे, भारतात जिहाद पुकारणे व मध्य आशियात तालिबानच्या सहाय्याने फंटामेंटालिस्ट राज्य सुरू करणे. पण तो कट फसला. काश्मीरात मात्र ते फंडामेंटालिस्ट रॅडिकल मुस्लीम कार्यकर्ते घुसवू शकले व त्यांच्या मार्फत तेथे पाकिस्थानचा प्रभाव वाढवू शकले. यास त्यांनी ''आगे बढो'' चे धोरण, असे नाव दिले. कारण पाकिस्थानचा प्रभाव वाढला तरच भारताची पकड हलकी होऊ शकते. जसे हिंदू जगताचे भारत करतो तसे पाकिस्थानास साऱ्या इस्लामी जगताचे नेतृत्व करावयाचे आहे, थोडक्यांत, हे जुळ्याचे दुखणे आहे. भारत काशी, मथुरा व बौद्धगया सांभाळतो तर पाकिस्थान मक्केला लष्करी संरक्षण पुरवितो.

पाकिस्थानी लष्करी अधिकाऱ्यांना मार्गदर्शन मिळते ते लष्करी तज्ञांकडून, धार्मिक गुरूंकडून नाही. लष्करास शिया-सुन्नी व तत्सम पंथीय वादापासून दूर ठेवण्यासाठी पाकिस्थान सरकारचा प्रयत्न चालू असतो. इंग्रजांनी ते पथ्य आजवर छान पाळले. आजूबाजूस आयएसआयचा धार्मिक प्रचार एवढा जोरात चालतो की लष्कराला त्यापासून दूर ठेवणे मुश्कील काम आहे. लष्कर प्रमुख असिफ नवाझ जांजुआने लष्करास ''दाढीवाल्यां''पासून दूर ठेवण्यात खूप यश मिळविले होते. जे

धार्मिक होते किंवा धर्माच्या प्रभावाखाली आले होते ते सारे आयएसआयकडे आपोआप गेले. मात्र, ''दाढीवाल्यां'चा काश्मीरी नागरी प्रजेवर खूपच प्रभाव पडला. काश्मीरी प्रजेच्या मानसिक चौकटीत कसा बदल होत गेला व तो कोणी कशा प्रकारे साधला ते पाहणे मनोरंजक होईल.

अमेरिका, अल्ला आणि आर्मी

पाकिस्थानाप्रमाणे येथेदेखील या तिन्ही शक्तींचा प्रभाव आढळतो. सुरुवातीला इंग्रजांचा प्रभाव होता. १ जानेवारी १९४८ रोजी काश्मीर केस युनोत दाखल झाली व काश्मीरवर अमेरिकेचा प्रभाव सुरू झाला. प्रे. ट्रुमन व ॲटली यांनी भारत व पाकिस्थान या दोघात नेहरूंनी काश्मीर प्लेबिसाईट अधिकारी निमिट्झ यांची मध्यस्थी स्वीकारावी असे वारंवार सूचविले. अमेरिकेने हैदराबादेच्या निझामाला व जुनागढच्या नबाबालाही पाठिंबा दिला होता. अमेरिका डच व पोर्तुगीज वसाहतवाद्यांना कां पाठीशी घालत आहे ते नेहरूंना समजत नव्हते. नेहरूंनी कम्युनिस्ट चीनला मान्यता दिली ते अमेरिकेला आवडले नव्हते. अमेरिकेत नेहरूंना 'क्रिप्टोकम्युनिस्ट' समजत. नेहरूंचे 'कोरीया धोरण' अमेरिकेला पसंत नव्हते. अमेरिकेचा जपानशी केलेला 'शांतता करार' नेहरूंना पसंत नव्हता. तिबेटला चीनचा भाग समजणे (१९५०) व बुल्गानिन आणि क्रुश्चेव्ह यांची भारतभेट (१९५५) यामुळे तर तो अमेरिकन समज पक्का होण्यास मदतच झाली. बहुसंख्य काश्मीरी मुसलमानांचा नेहरूंच्या ''सेक्युलर'' धोरणास पाठिंबा होता ते अमेरिकेला पटत नव्हते.

अल्लाची शिकवणूक मदरसांमार्फत छोट्यांच्या जगास दिली जाते. देवः, देवौ, देवाः । हे जसे संस्कृत पाठशाळेतून शिकविले जाते तसे. पण दोहोत मोठा फरक आहे. पाकिस्थानचा माहिती खात्याचा मंत्री पर्वेझ रशिद त्यांच्याविषयी म्हणतात, ''ज्यांना आपण खूप देणग्या देतो ती अज्ञानाची विद्यापीठे द्वेष व कट्टरपणा निर्माण करणारे कारखाने आहेत.'' *(डॉन, १० मे २०१५)* बस्स, पाकिस्थानने काश्मीरात पहिले काही केले असेल तर पाकिस्थानी शिक्षक असलेल्या मदरसा चालू केल्या. मदरसात फंडामेंटालिस्ट व आतंकवादी तरुणांचे उत्पादन होते. १९८० च्या दशकांत अफगाणिस्थानात सोव्हिएटविरोधी जिहादी लढाऊ पाहिजे होते, ते सारे मदरसांनीच पुरविले होते. ९/११ नंतर 'तालिबान' मानस तयार करण्यासाठी त्यांनाच जबाबदार धरले होते. ९/११ च्या कमिशनच्या अहवालात मदरसांना ''कमालीचा हिंसाचार शिकविणाऱ्या भट्ट्या'' असे म्हटले आहे. खुद्द पाकिस्थानात जुलै २००७ ची लाल मशिदीची घटना घडली व ज्यात

१५० माणसे मारली गेली किंवा पेशावरमध्ये आर्मी पब्लिक स्कूलच्या १३५ मुलांची कत्तल झाली त्यास मदरसाच जबाबदार होत्या. अफगाण तालिबान चे नेते (मुल्ला ओमर, अख्तर मंसूर व जलाल ऊद्दीन हकानी) आणि तेहरिक-इ-तालिबान पाकिस्थान (टीटीपी) (हकिमुल्ला मेहसूद व मुल्ला फझलुल्ला) ही सारी मदरसांचीच पैदास आहे. इतर सुप्रसिद्ध (?) मदरसांच्या विद्यार्थ्यांत हफीज गुज बहादूर, वलिऊर रेहमान मेहसूद, खलिद हकानी (आत्मघाती बॉंबर्सचा मास्टर माईंड), कारी हुसेन वगैरे नावे आहेत.

काश्मीरचा व लष्करचा प्रथम संबंध १९६५ साली कसा आला ते आपण सविस्तर वर पाहिलेच आहे. पाकिस्थानात शासक व लष्कर यांचे अतूट नाते आहे. प्रत्येक लष्कराचे एक राष्ट्र असते *(द आर्मी हॅज अ नेशन)*, असे म्हणतात ते खोटे नाही. पाकिस्थानच्या लष्कराविषयी तर बोलायलाच नको, जगात त्याचा ८ वा क्रमांक आहे, आणि भारताचा ४ था.

काश्मीरच्या असुरक्षित सत्ताधाऱ्यांचा कालपट

१) काश्मीर : पंतप्रधान (१९४७-१९६५)

दोन प्रधान, दोन विधान व दोन निशाण. जनसंघाच्या डॉ. शामाप्रसाद मुखर्जींनी त्या धोरणास प्रखर विरोध केला; त्यात १९५३ साली त्यांचा रहस्यमय मृत्यू झाला. तेव्हा जगास कळले की काश्मीरात लहरी, उधळी व इस्लामी लोकशाही आहे. तेथे राजसत्ता किती काळ टिकेल, त्याचा भरवसा नाही, उदाहरणार्थ,

१९४७ : मेहेरचंद महाजन (१४२ दिवस) राजाचे दिवाण.
१९४८ : शेख अबदुल्ला (५ वर्षे १५७ दिवस) (नॅ.कॉं.) दोनदा अटक व तुरुंगवास.
१९५३ : बक्षी गुलाम महंमद (१० वर्षे ६४ दिवस) (नॅ.कॉं.)
१९६३ : ख्वाजा शमसुद्दीन (१४० दिवस) (नॅ.कॉं.)
१९६४ : गुलाम महंमद सादीक (१ वर्ष २९ दिवस) (कॉं)

२) काश्मीर : मुख्यमंत्री (१९६५-२०१६)

१९६५ : गुलाम महंमद सादीक (६ वर्षे २५७ दिवस) (कॉं)
१९७१ : सैर मीर कासीम (३ वर्षे ७५ दिवस) (कॉं)
१९७५ : शेख अबदुल्ला (२ वर्षे २९ दिवस) (नॅ.कॉं.)
१९७७ : गव्हर्नर्स रूल (१०५ दिवस)

१९७७ : शेख अबदुल्ला (२) (५ वर्षे ६१ दिवस) (नॅ.काँ.)
१९८२ : फारुख अबदुल्ला (१ वर्ष २९८ दिवस) (नॅ.काँ.)
१९८४ : गुलाम महंमद शाह (१ वर्षे २४७ दिवस) (अवामी)
१९८४ : गव्हर्नर्स रूल (२४६ दिवस)
१९८४ : फारूख अबदुल्ला (२) (३ वर्षे ७३ दिवस) (नॅ.काँ.)
१९८६ : गव्हर्नर्स रूल (६ वर्षे २६४ दिवस)
२००२ : फारूख अबदुल्ला (३) (६ वर्षे ९ दिवस) (नॅ.काँ.)
२००२ : गव्हर्नर्स रूल (१५ दिवस)
२००२ : मुफ्ती महंमद सईद (३ वर्षे ० दिवस) (पीडीपी)
२००५ : गुलाम नबी आझाद (२ वर्षे २५२ दिवस) (काँ)
२००८ : गव्हर्नर्स रूल (१७८ दिवस)
२००९ : ओमर अबदुल्ला (६ वर्षे ३ दिवस) (नॅ.काँ.)
२०१५ : गव्हर्नर्स रूल (५२ दिवस)
२०१५ : मुफ्ती महंमद सैईद (३१२ दिवस) (पीडीपी)
२०१६ : गव्हर्नर्स रूल (८८ दिवस)
२०१६ : मेहबूबा मुफ्ती (२४६ दिवस) (पीडीपी) सहकारी पक्ष आहे का विरोधी, ते कळत नाही. या नाटकबाजी करण्यात तरबेज आहेत. मागे आतंकवाद्यांनी पळविल्याचे नाटक केले होते. याची तुलना महाराष्ट्रातल्या शिवसेना-भाजपा सरकारशी करता येईल. दोन्ही ठिकाणी खलनायक माहीत आहे, पण त्याच्याविरुद्ध काही कारवाई करता येत नाही. जगासाठी हे मोठे कोडे आहे.

३) कालपट : काश्मीरवरून पाक-भारत युद्धे

१९४७-४८: पाकिस्थानी फौजेने आफ्रिडी वेषात काश्मीरवर स्वारी केली. हरिसिंग महाराजांनी *इन्स्ट्रुमेंट ऑफ सक्सेशन*वर सही केली.

१९६५ : नेहरू गेले व लाल बहादूर सत्तेवर आले. आयूबला ते दुर्बळ वाटले व काश्मीर हिसकावून घ्यायची चांगली संधी आहे, असे समजून स्वारी केली.

१९७१ : पश्चिम व पूर्व पाकिस्थानात बंगाली भाषेवरून संघर्ष झाला. यात काश्मीरचा कोठेच संबंध नव्हता. लढाई झाली, ९०,००० पाकी सैनिक शरण आले. १३ दिवसांनंतर लढाई संपली. ६ डिसेंबर

१९७१ रोजी बांगलादेश हे नवीन सार्वभौम राष्ट्र जन्मास आले. गड आला पण सिंह गेला. गृहमंत्री यशवंतराव व पंतप्रधान इंदिरा यांचे एकदम संबंध बिघडले.

१९८९ : १९८७ ची निवडणूक फसवी व खोटी होती, म्हणून विरोधी मंडळींनी बंडाळी सुरू केली. पाकिस्थानाने त्यांना शस्त्रे पुरविली.

१९९९ : दोन्ही राष्ट्रांनी अणुबाँबची चांचणी केली, लाहोर करारावर सह्या झाल्या आणि पाकिस्थानाने कारगिल युद्ध सुरू केले. कवी वाजपयींना ऊल्लू बनविले.

२००१ : श्रीनगरच्या विधानसभेवर पाकिस्थानाने हल्ला चढविला व ३८ मंडळी ठार मारली. त्यानंतर दिल्लीच्या लोकसभेवर हल्ला चढविला व १४ माणसे मारली.

२००७ : दोन सरकारे चर्चा करणार त्याआधी रेल्वेवर हल्ला झाला व ६८ पाकिस्थानी मारले.

२०१५ : एक हजार जखमांचे धोरण. युद्धापेक्षा स्वस्त. भारतीय अर्थशास्त्राचे कंबरडे त्याने मोडते व रोज २-३ जवानांची जानहानी होते. पाकी धाक कायम राहतो, नव्हे वाढत राहतो.

काश्मीरमधील संघर्षाचे टप्पे

संतप्त पाकिस्थानचा धुस्सा आपण समजू शकतो. छोटा भाऊ झाला म्हणून काय झाले? तो काय वाटेल ते मागेल. त्याने मागितले म्हणून आपण सारे देऊन टाकायचे की काय? भारतदेखील स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्र आहे. त्यालाही स्वाभिमान आहे. भारत पाकी धमक्यांना डरणारा नाही. पाकिस्थानने काश्मीरात काय धुमाकूळ घातला आहे ते प्रत्येक भारतीयास माहीत असायलाच पाहिजे.

१. मानसिक अवस्था (१९७१-१९७७) : तत्त्व होते, *कॅच देम यंग.* बालपणीच *अँटी-इंडिया बायस* मनांत भरवून दिला की प्रचाराचे काम सोपे होते. मदरसांची संख्या वाढू लागली. यासाठी सौदी अरेबियातून मदत येई. मदरसात मुलांचे ब्रेन वॉशिंग करण्यात येई व भारत सरकार आपला दुष्मन आहे हे मनावर बिंबविण्यात येई. आतंकवादासाठी ही मानसिक पूर्वतयारी आवश्यक होती. जन. झिया-उल-हक १९७७ साली सत्तेवर आला. त्याने हे *सबव्हर्जनचे* (भेद) काम जास्त उत्साहाने हाती घेतले. हा इंदिरेचा सर्वात कठीण काळ होता.

२. भेद (सबव्हर्जन) (१९७८-१९८८) : भेद (सबव्हर्जन) म्हणजे

पोटात शिरून पाय लांब करणे, जे कचाने देवयानीसाठी राक्षसांच्या शुक्राचार्यांबाबतीत केले. पाकिस्थानने काश्मीरातील मुसलमान समाजास पोखरून काढले. त्यांना पैसे देऊन त्याचे निषेध मोर्चे, पदयात्रा, वगैरे प्रकार सुरू केले. जगात त्यांचे व्हीडीओ दाखवून भारताची बदनामी सुरू केली. भारतातील पाकिस्थानी 'मित्रांनी' (डावे व सेक्युलर) तोच मसाला वापरून भारतात भारताची बदनामी सुरू केली. भारतीय मुसलमानांना ते पटायचे. मुसलमान पत्रकारांनी तो मसाला वापरला. घरका भेदी लंका दाहे. मोरारजी, चरणसिंग, इंदिरा व राजीव यांचा हा सर्वात गोंधळलेला कालखंड भेदासाठी खूप अनुकूल होता.

३. युद्धाची सुरुवात (१९८९-१९९३) : पाकिस्थानच्या मदतीने काश्मीरात *प्रॉक्झी वॉर* सुरू झाले. त्यासाठी आझाद काश्मीरात काश्मीरी तरुणांना लष्करी प्रशिक्षण देऊन त्यांना परत काश्मीरात धाडले गेले. प्रशिक्षणाचा प्रयोग त्यांनी काश्मीरी पंडितांवर केला, त्यांना भयभीत करून, काहींची कत्तल करून, त्यांचे प्रचंड प्रमाणावर स्थलांतर घडवून आणले व काश्मीर खोरे पूर्णपणे मुसलमान केले. समजा, *प्लेबिसाईटचा* प्रसंग आलाच तर १०० टक्के यशाची खात्री. २,४८,००० काश्मीरी पंडित काश्मीर खोऱ्यातून बाहेर पडले. गेल्या २० वर्षांत त्यांची निर्वासित छावण्यात सोय भारतास करावी लागली. (सरदारांनी धमकी दिली पण भारताने प्रतिक्रिया म्हणून एकाही मुसलमानास बाहेर हाकलले नाही! असे 'जशास तसे' धोरण प्रत्यक्षात उतरले असते तर पाकिस्थानात धाक निर्माण झाला असता. हिंदूंना आपले कोणी वाली नाही असे वाटले नसते.) यासाठी भारतीय लष्कराची काश्मीरात नियुक्ती आवश्यक. ते कटु कर्तव्य सैन्यावर सोपविले गेले. त्यामुळे खोटेनाटे आरोप सुरू झाले. स्त्रियांवर बलात्कार हा मोठा आरोप. नशिब, सरकार बधले नाही. जन. आयूबला लाल बहादूर शास्त्री चा काळ स्वारीसाठी योग्य वाटला. तसा, पाकिस्थानास विश्वनाथ प्र. सिंग, चंद्रशेखर व नरसिंगराव हा काळ आक्रमक धोरणासाठी मोठी संधी वाटली.

४. लष्कराचा प्रभाव (१९९४-१९९५) : आतंकवाद्यांपासून संरक्षण करण्यासाठी काश्मीर ही भारतीय लष्कराची मोठी छावणी बनली. त्याने फायदा झाला. १९९५ साली ८०० आतंकवादी शरण आले. आतंकवाद्यांची रीक्रूटमेंट थंडावली. आयएसआयने परदेशी आतंकवाद्यांच्या हाती नेतृत्व दिले. भाडोत्री आतंकवादी आता इतर मुस्लीम देशातून रीक्रूट होऊ लागले.

५. आतंकवादाचा प्रसार व प्रचार (१९९६-१९९८) : निवडणुकांत जिंकून आलेल्या उमेदवारांचे लोकप्रिय सरकार स्थापन झाले. आतंकवादाची व्याप्ती

दक्षिणेकडे सरकू लागली. स्थानिक भरती थंडावली. श्रेय देवे गौडा व गुजराल यांना.

६. कारगिलचे धाडस (१९९९) : प्रशिक्षण, शस्त्रांचे शिक्षण वगैरेसाठी आतंकवादी कारवायांत पाकी सैन्याची प्रत्यक्ष मदत. परदेशी आतंकवाद्यांची संख्या वाढते. स्थानिक रीक्रूटमेंट थंडावली. कृपा कबीराजकी।

७. कारगिलनंतर (२००९) : आतंकवाद्यांची गुणात्मक वाढ. आत्मघातकी हल्ल्यांची सुरुवात; जन. मुशर्रफ सत्तेवर. पाकिस्थानी सैन्याचा हस्तक्षेप वाढतो. स्थानिक रीक्रूटमेंट थंडावते. जुलै २००१ ची आग्रा शिखर परिषद अयशस्वी.

८. राजकीय बदल (२००९) : तरुण, तडफदार मुख्यमंत्र्याकडून मोठ्या अपेक्षा. नवी पहाट. भ्रष्टाचार कमी व्हायची चिन्हे नाहीत. वाईट शासन सुधारणेकडे वाटचाल शून्य. राजकर्त्यांना शासन व्यवस्था शिकविण्याची गरज. पैसे देऊन दगडफेक करून निषेध मोर्चे. लोक ते लोक संपर्क (लाईन ऑफ कंट्रोलच्या दोन्ही बाजूंच्या लोकांचा संपर्क) काश्मीर ते पीओके बस सर्व्हीस व सरहद्दीवरील व्यापारात वाढ. हवालावाले त्या बसचा दुरुपयोग करतात. २००४ साली बाजपयी हारले व बच गये! पुढील दशंक गुलाम घराण्याने राज्य केले. काळा कालखंड.

९. नवाझ शरीफ पाकी निवडणूकीत विजयी (२०१३-१६) : भारत-पाक संबंध सुधारावेत अशी इच्छा व्यक्त करतात. भारतीय सेनेवर वाढते हल्ले. वाढते *सीझ फायर व्हायोलेशन्स्*. लडाखमध्ये वाढते चिनी हल्ले. २०१४ साली दिल्ली व श्रीनगर येथील मोतीलाल सन्सचे दुकान बंद झाले.

१०. प्रवासी सुरक्षित : रोज टीव्हीवर दगडफेक दाखविल्यामुळे उगाच भय वाटते. श्रीनगर, गुलमर्ग, सोनमर्ग व पेलगाम येथे दगडफेक होत नाही, त्यामुळे टुरिझम व्यवस्थित चालू आहे. प्रवाशांना कांही त्रास होत नाही. फक्त पोलीस व लष्करावर दगडफेक करतात. तेही अनंत नागसारख्या दूरच्या निवडक ४-५ जागी. टीव्ही उगाचच लोकांत दहशतीचे वातावरण तयार करतो. ५ टक्के लोक ९५ टक्क्यांना ओलीस धरतात.

काश्मीरातील प्रमुख आतंकवादी हल्ले

१९८८ : जुलैत जम्मू काश्मीर लिबरेशन फ्रंटने आझादीसाठी दंगे सुरू केले. १४ सप्टें. ला भाजपच्या पं. टिकालाल टपलुंना ठार केले. अजून टपलुंचा मारेकरी सापडलेला नाही. पंडितांसाठी ही पहिली (धोक्याची) घंटा होती. यानंतर जेकेएलएफ व इतर इस्लामिस्ट संस्थांनी पंडितांची हत्या करण्याचा यज्ञ सुरू केला.

१९८९ : २१९ च्या वर का. पंडितांना ठार मारल्यावर पंडितांची जम्मू व दिल्लीत हिझरत. जुलै व ऑगस्टमध्ये ३ सीआरपीएफचे जवान व महंमद युसूफ हलवाई यांची हत्या; केंद्रीय गृह मंत्री मुफ्ती सैद यांच्या मेहबूबा या कन्येचे अपहरण. (ते नाटक होते, हे पुढे बाहेर आले.)

१९९० : ४ जानेवारीस 'अफताब' या उर्दू पेपरात हिझबुल मुजाहिद्दीनची 'काश्मीर सोडा'ची जाहीर धमकी; दुसरी घंटा; गृहमंत्री मुफ्ती यांनी मुख्यमंत्री फारूख यांना पाडण्यासाठी व्ही.पी. सिंगांना जगमोहनना राज्यपाल नेमण्याची विनंती; १९ जानेवारीस जगमोहन आत व अबदुल्लांचा राजीनामा; जगमोहन खराब हवेमुळे जम्मूत अडकले; त्याचा फायदा घेऊन पंडितांची खोऱ्यात कत्तल; इतर हिंदू बाहेर पळाले; त्यांची घरे व मालमत्ता मुसलमानांनी बळकावली; ३७० कलमामुळे काश्मीर घटनेप्रमाणे भारतात राहणाऱ्या लोकांना काश्मीरात वसता येत नाही व नागरिकत्व मिळत नाही. (एनडीटीव्हीवर १९ जाने. २०१६ रोजी फारूख अबदुल्ला म्हणाले, ''पंडितांनी आपल्या हिमतीवर परत यावे, आम्ही कांही त्यांची भीक मागणार नाही.'')

१९९५ : परदेशी प्रवाशांचे अपहरण. त्यातील एकाचा शिरच्छेद.

१९९७ : २२ मार्च रोजी बडगाम जिल्ह्यातील संग्रामपूर गावी ७ काश्मीरी पंडित ठार मारले.

१९९८ : वंधामची कत्तल. भारतीय सैनिकांच्या वेषात आलेल्या आतंकवाद्यांनी २४ काश्मीरी पंडित ठार मारले.

११९८ : प्राणकोटची कत्तल. २६ हिंदू ठार मारले.

१९९८ : चंपानारी कत्तल. १९ जूनला २५ ग्रामीण हिंदू खलास केले.

२००० : अमरनाथच्या ३० यात्रेकरूंना कंठस्नान.

२००१ : श्रीनगरच्या विधानसभेवर हल्ला व बॉंबस्फोट. त्यात ३८ लोक ठार झाले.

२००२ : २ आत्मघातकी बॉंबर्सनी ३० मार्च रोजी रघुनाथ मंदिरावर हल्ला चढविला. त्यात ११ लोक ठार. त्यात ३ पोलीस. ८ महिन्यांनी पुन्हा तसाच फिदायीन हल्ला. १४ ठार. हिंदू इतिहासापासून धडे शिकत नाहीत.

२००२ : कासीमनगर कत्तल. लष्कर-ए-तोयबाचा गोळीबार. २७ ठार.

२००३ : नदीमार्ग कत्तल. लष्कर-ए-तोयबाचा गोळीबार. २४ हिंदू ठार.

२००५ : श्रीनगरमध्ये भारतीय सैन्यावर हिझबुल मुजाहिद्दीनचा कार बॉंब हल्ला. ४ जवान व १ नागरिक ठार.

२००५ : श्रीनगरमध्ये बडशाह चौकात गोळीबार. २ ठार, १७ जखमी. त्यात २ पत्रकार.

२००५ : अल् मंसूरी गटाने शिक्षणमंत्री गुलाम नबी लोने यांची हत्या केली.

२००६ : डोडा व उधमपूर येथे ३५ हिंदूंची कत्तल. वैष्णोदेवीस जाणाऱ्या बसेसवर हँड ग्रेनेडसचा हल्ला.

२००८ : अमरनाथ दंग्यात ७० जणांचे मरण.

२०१० : १२० मृत्यू; सर्व्हे टीम रवाना; यातून २०१६ मध्ये बुऱ्हान वाणी जन्मला.

२०१३ : २००१ च्या लोकसभेवरील हल्ल्याचा मेंदू अफझल गुरूला फाशी दिले.

२०१४ : काश्मीर खोऱ्यात लष्कर व नागरिकांवर हल्ले. २१ नागरिक ठार. येणारी निवडणूक होऊ नये यासाठी भयाचे वातावरण निर्माण करणे, हा उद्देश.

२०१६ : ८ जुलै रोजी बुऱ्हान वाणीची हत्या; ६५ मरण व ४००० घायाळ; ४० दिवस कर्फ्यु; पर्यटन व्यवसाय बंद; पठाणकोट (२ जाने) व ऊरी (३० सप्टें.) येथे हल्ले. आय-सी ८१४ विमान अपहरण प्रकरणात 'मुक्त' केलेला मौ. मसूद अझहर व त्याचा भाऊ अब्दुल रौफ अझगर या दोघांचे; लष्कराच्या छावणीत पहाटे शिरून हँड ग्रेनेडस्च्या सहाय्याने आगी लावणे; २१ जवान ठार. पठाणकोट येथे भारतीय लष्कराच्या युनिफॉर्मातील ६ बंदूकधाऱ्यांच्या हल्ल्याने भारतीय लष्करातील कांही त्रुटी बाहेर आल्या, उदा. थेट कमांड स्ट्रक्चरची कमतरता, बरेच दिवस चालणारा हल्ला, भारतीयांच्या मरणांची मोठी संख्या, निरनिराळ्या पथकात नसणारा एकसूत्रीपणा (कोऑर्डिनेशन), हल्ला संपला हे जाहीर करण्याची घाई - हे सारे हेरखात्याकडून आधी माहिती मिळालेली असून. याचा अर्थ, आपल्याकडे त्यांना मदत करणारी काही राजद्रोही मंडळी (स्लीपर सेल्स्) अस्तित्वात आहेत. त्यांना शिक्षा होत नाही.

२०१७ : गेल्या ५ महिन्यात ३२ शाळांना गुंडांनी आगी लावल्या. अमरनाथच्या ६ स्त्रिया व १ पुरुष यात्रेकरूंना १० जुलैला आतंकवाद्यांनी ठार केले.

काश्मीरी पंडीत, एक शोकांतिका

८ व्या शतकापासून भारतावर अरब व तुर्कांच्या स्वाऱ्या सुरू झाल्या पण ते या जास्त अवघड व डोंगराळ काश्मीरकडे १३२० सालापर्यंत वळले नाहीत. सुलतान शिकंदर बुत्सिखान (१३८९-१४१३) हा महंमद तुघ्लगाचा समकालीन. याने 'मुसलमान व्हा नाहीतर मरण पत्करा'चा सपाटा लावला. भीतीने हिंदू, विशेषतः काश्मीरी पंडित, येथून पळायची सुरुवात झाली व काश्मीरात मुसलमानांची संख्या वाढू लागली. डोग्रा घराण्यामुळे (१८४६-१९४७) ते वाचले. गुलाबसिंगांनी (१८४६-५७) मुसलमानांना परत हिंदू करून घ्यायची तयारी केली, त्यासाठी काशीहून ब्राह्मण बोलावले, पण आयत्या वेळी काक या दिवाणाने विरोध केल्यामुळे ती धर्मक्रांती व्हायच्या आधीच करपून गेली. १९४८ साली मुस्लीम लीगने केलेले दंगे व १९५० साली जमिनीच्या सुधारणा यामुळे अनेक का. पंडितांना काश्मीर सोडावे लागले. १९ जानेवारी १९९० रोजी सर्व मशिदीतून "काश्मीरी पंडितांनो, काश्मीर सोडा"चा फतवा काढला गेला. नाहीतर ते मारले जातील, अशी धमकीदेखील देण्यात आली. १९८९ ते २०११ या काळात २१९ का. पंडित मारले गेले. हा फतवा फक्त पुरुषांसाठी होता, स्त्रियांना व मुलांना मुसलमान करून गुलाम बनविण्यात येणार होते. १९९० च्या दशकांत १.४ लाख का. पंडितांपैकी १.० लाख लोकांनी काश्मीर सोडले व जम्मू आणि दिल्लीत ते निर्वासितांच्या छावण्यात रहावयास गेले. २०१६ पर्यंत फक्त १ का. पंडित परत गेला. इतरांना तेथे जाऊन मरणाचा धोका पत्करायचा नव्हता. त्यांच्या पाठीशी ना केंद्र सरकार उभे होते, ना राज्य सरकार. ते अनाथ होते, आजही ते अनाथ आहेत. आज छावण्यात त्यांची फार बिकट परिस्थिती आहे. २७ व्या हिजरतचा वाढदिवस साजरा करताना सुप्रसिद्ध नट अनुपम खेर यांनी ट्विटरवर लिहिले, "फैलेगा फैलेगा हमारा मौन समुद्र के पानी में नमक की तरह, नसों में दौडते रक्त में घुलता हुवा पहोंचेगा दिलो की धडकनो के बहुत समीप और बोरी से रिस्ते आटे सा देगा हमारा पता." त्या ट्विटरचा शेवट होता : "और तब हमारे मौन के धमाके से बडा दूसरा कोई धमाका नही होगा." अरेरे, हे पंडित फक्त वाचीवीर आहेत, ते शिवभक्त आहेत, पण त्यांना रौद्र स्वरूप धारण करता येत नाही. भित्र्यांच्या बडबडीला भीक कोण घालणार? फक्त मरणासाठीच जगायचे!

युपीए व काश्मीर

वाजपायीनंतर २००४ ते २००९ व २००९ ते २०१४ या कालखंडात सोनिया गांधींच्या वतीने मनमोहन सिंगांनी भारतावर राज्य केले. त्या काळांत दोन मुद्यांवर भर होता : बंडखोरांना ठोकून काढणे व उत्तम प्रशासन देऊन प्रजेला खुश ठेवणे आणि तक्रार करायला वाव न देणे. तरुणांना नोकऱ्या देणे हा महत्त्वाचा मुद्दा होता. तसेच, इतर आर्थिक-सामाजिक प्रश्न (उदा. राज्याच्या बाहेर उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणे, तांत्रिक शिक्षण देऊन त्यांना स्वतंत्र उद्योग सुरू करण्यास उत्तेजन देणे, वगैरे) होते. पण त्यांचा काँग्रेसने विचारच केला नव्हता. अलगतावादी मंडळी म्हणत, "काश्मीरवर चर्चा असल्यास पाकिस्थानी प्रतिनिधीस सामील करून घ्या." वाजपयी व नवाझ शरीफ यांच्या वेळी परिस्थिती एवढी वाईट नव्हती. मुशर्रफ आल्यावर ती बिघडली. आझादीच्या मागण्या वाढल्या, निषेधाची आंदोलने वाढली, दगडफेक वाढली, जिहादी दंगे वाढले व मृतांची संख्या वाढली. मशिदीतून "या व जिहादी आंदोलनात भाग घ्या," अशा घोषणा होऊ लागल्या. निवडून आलेले आमचे प्रतिनिधी काय करीत होते? भाषणबाजीतून ते बाहेर कां येत नाहीत? अलगतावाद्यांसाठी जेवढे जास्त लोक मरतील तेवढे त्यांचे पालक जास्त जिहादी बनतील, दगड फेकतील व त्यासाठी पाकिस्थानी पैशांवर अवलंबून राहतील, हे धोरण होते. राजकर्ते अलगतावाद्यांना कां पोसतात? बुऱ्हान वाणीच्या अंत्ययात्रेला पहा ना किती लोक जमले होते. पूर्वी फक्त पुरुष जमा व्हायचे, आता आंदोलनात स्त्रियाही भाग घेऊ लागल्या आहेत. आता लोक पोलीस चौक्यांवर दगड मारू लागले आहेत, आगी लावू लागले आहेत. काँग्रेस किंवा नॅ. कॉन्फरन्सकडे या प्रश्नांची उत्तरे नव्हती.

२००८ साली दिलीप पाडगावकर आणि कंपनी काश्मीरात इंटरलॉक्युटर्स म्हणून गेले होते. काँग्रेस सरकारने आमच्या शिफारसी ऐकल्या असत्या तर २०१६ मध्ये जी हिंसा झाली ती घडली नसती, असे ते म्हणतात. त्यांच्या कांही शिफारसी : (१) डोळ्यांना सैन्य खुपते, ते कमी व्हावे; (२) मानवी हक्कांचे उल्लंघन झाले त्यात सुधारणा; (३) आर्म्ड फोर्सेस स्पेशल पॉवर्स ॲक्ट चा पुनर्विचार; (४) तेथे अकाऊंटेबिलीटी; (५) डिस्टर्बड् एरियाज ॲक्ट काढून टाकावा. भाजपने "त्यांना दिलेल्या ब्रीफपेक्षा जास्तच चौकशा केल्या," अशी शेरेमारी केली. भाजपनेदेखील आमच्या शिफारसींकडे दुर्लक्षच केले, असे पाडगावकरांचे म्हणणे. थोडक्यांत, सारी टोलवाटोलवी होती. ती सरकारच्या पैशावर पोसलेल्या बुद्धिवादी पोळांची नाटकबाजी होती. सर्वजण केंद्र सरकारला लुटत होते, यांनीच कां मागे रहावे?

मोदी व काश्मीर

मोदींनी पाकिस्थानशी प्रेमाचे संबंध ठेवण्याचे खूप प्रयत्न केले. पंतप्रधान नवाझ शरीफ यांना सत्ताग्रहण सोहळ्यास खास आमंत्रण दिले. त्यांनी मोदींच्या आईंना साडी भेट दिली. पॅरीसच्या हवामान बैठकीत त्यांचा चांगला सुसंवाद झाला. त्यानंतर नवाझ शरीफांच्या वाढदिवशी अफगाणिस्थानातून परतताना लाहोरला विमान वळविले व त्यांचे अभिनंदन केले. पठाणकोटच्या विमानतळावर ६ आतंकवाद्यांनी हल्ला केला व आपले ७ जवान मारले. ''हा हल्ला झालाच नाही,'' असे पाकिस्थानी शिष्टमंडळाने म्हटले. तरीही भारताने त्यांच्याशी बोलणी चालूच ठेवली. यामुळे, पक्षातच ''मोदी ढापळले, ते अक्षम आहेत,'' वगैरे टीका सुरू झाली. काश्मीरात एव्हाना ७० नागरी व २ पोलीस मरण पावले होते. भारतीय सेनेने आतंकवादी बुऱ्हान वाणीस ठार केले. काश्मीरी मुसलमान भाडोत्री तरुणांनी श्रीनगर, अनंतनाग वगैरे ठिकाणी दगडफेक सुरू केली. अशा परिस्थितीत या लोकांच्या दाबाखाली मोदींनी पाकव्याप्त काश्मीरात पाकिस्थानच्या एका प्रशिक्षण केंद्रावर मध्यरात्री छापा टाकून त्यांचे बरेच जवान मारले व तो तळ उद्ध्वस्त केला. या नंतरच्या नोव्हेंबरातील सार्कच्या इस्लामाबादच्या बैठकीत मोदींच्या विनंतीनुसार बांगलादेश, नेपाळ व भूतान यांनी बहिष्कार टाकला. मोदीचे ते शक्तीदर्शन होते.

मोदी 'डोव्हल डॉक्ट्रिन'चे भक्त आहेत. पाकिस्थानच्या हद्दीत बरेच लष्करी तळ आहेत. तेथे आतंकवाद्यांना प्रशिक्षण देतात. २०१० साली ते म्हणाले होते, ''या काश्मीरी अलगतावाद्यांशी बोलणी करण्यापेक्षा त्यांना चांगला धडा शिकवायला पाहिजे.'' त्यानंतर डोव्हल *नॅशनल सिक्युरीटी ॲडवायसर* झाले. डोव्हल म्हणतात, ''भारताने आता गियर बदलला आहे. पूर्वी आपले बचावात्मक धोरण असे. आज आपले धोरण बचावात्मक आक्रमणाचे आहे.'' २०१४ च्या भाषणात त्यांनी पाकिस्थानला सुनावले, ''तुम्ही अजून एक मुंबई करा आणि तुमच्या हातून बलुचिस्थान गेलेच म्हणून समजा.'' ते म्हणतात, ''भारत फार आक्रमक झाला तर पाकिस्थान ते फार काळ सहन करू शकणार नाही.'' त्यानंतर १५ ऑगस्ट २०१६ रोजी मोदींनी लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात नवीन फारसे कांही नव्हते पण पुढील वाक्ये पाकिस्थानला चांगली झोंबतील अशी होती : ''बलुचिस्थान, गिलगित व पाकिस्थानव्याप्त काश्मीरातील लोकांनी माझे खूप खूप आभार मानले आहेत. मला त्यांना अजून भेटायचा मोका मिळू शकलेला नाही. पण त्यांनी माझे व भारतीयांचे खूप आभार मानले आहेत.'' असे बोलून त्यांनी पाकिस्थानला संदेश

धाडला की जम्मू व काश्मीरमध्ये अशांतता माजवायच्या आधी १०० वेळा विचार करा. कांचेच्या घरात राहणाऱ्यांनी दुसऱ्यांवर दगडफेक करू नये. भारतासाठी हे धोरण नवे होते. गेली ७० वर्षे भारतीय नेते 'उगाच तिसऱ्या महायुद्धाला आमंत्रण कशाला?' असे म्हणत दमाने घेत व सोषिकपणाचा कळस करीत. पाकिस्थानला ती भारतीयांची दुर्बलता वाटे. जगात भारत म्हणजे 'सॉफ्ट स्टेट' असे समीकरण दृढ झाले आहे.

राहुल गांधींनी १२ जुलै २०१६ रोजी ईदच्या दिवशी एका भाषणांत सुनावले, ''मनमोहन सिंग पंतप्रधान होते तेव्हा त्यांनी त्यांचे सारे लक्ष काश्मीरवर केंद्रित केले होते. मोठ्या मेहेनतीनंतर त्यांनी तेथे शांतता प्रस्थापित केली होती. मोदी सरकारने त्यांची ती सारी मेहेनत वाया घालविली.''

भाजप खासदार अनुराग ठाकूर यांनी ''काश्मीर ही मोठी 'कबर' बनली आहे. त्यांच्याशी संवाद स्थापणे हे आम्ही मानतो, पण सध्या तेथे दंगा करणारा जमाव नेतृत्वहीन आहे. त्यामुळे प्रश्न आहे, संवाद कोणाशी करायचा? आतंकवादी हल्ले निश्चित कमी झाले आहेत. २००५ साली १९९० हल्ले झाले तर २०१४ साली २२२ हल्ले झाले. घूसखोरीदेखील २००५ साली ५५७ वेळा होती. ती २०१४ साली २२२ वेळा झाली. दगडफेक नवीन नाही, ती १९८० च्या दशकापासून होत आहे. काश्मीर प्रश्न कायमचा सोडवायचा असेल तर थोडीशी किंमत मोजावी लागेल.''

मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्ती म्हणतात, ''आता मोदींच्या राजवटीत काश्मीर प्रश्न सोडविला गेला नाही तर तो या जन्मात सोडविला जाणार नाही.''

कारण सरळ व सोपे आहे. काश्मीर ही भाऊबंदकीची समस्या आहे. भाऊबंदुकी नेहेमीच शोकांतिका (ट्रॅजेडी) ठरते. मोदींना त्याची चांगली सवय आहे.

■■■

बांगलादेश

मानसशास्त्र

गंगेचे पाणी व गाळ यामुळे बांगलादेश सुपीक बनला आहे. फाळणीमुळे पूर्वेस हे तांदुळाचे कोठार व पश्चिमेस गव्हाचे कोठार आपल्याला गमवावे लागले. येथे मॉन्सूनची हवा व वादळे यांचे अधिराज्य आहे. १९४७ पर्यंत तो पूर्व बंगाल व १९७१ पर्यंत पूर्व पाकिस्थान होता. त्यास रामकृष्ण, विवेकानंद व रवींद्रनाथ ठाकूरांमुळे देशभक्ती व क्रांतिकारकांचा वारसा मिळाला आहे, शेजारचा पश्चिम बंगाल व हा बांगलादेश यांची संस्कृती व राष्ट्रभाषा समान आहे. दोघांना बंगाली सिनेमा व कलकत्ता यांचे आकर्षण आहे. बांगलादेशात जगातील सर्वांत गरीब लोक राहतात व त्यांची तेथे दाट व प्रचंड लोकसंख्या आहे. सतत येणारी वादळे गरिबांना आणखी गरीब बनवितात. त्यामुळे त्यांना परदेशी मदतीवर सतत अवलंबून रहावे लागते. मुस्लीम वस्ती ८० टक्के, हिंदू १३ टक्के व इतरात बौद्ध, ख्रिस्ती व आदिवासी रहात होते, आता नाही. धार्मिक छळ, बेकारी व गरिबीमुळे त्यांना आपली स्थिती सुधारण्यासाठी भारतात पळून यावे लागते. तेथे साक्षरता कमीच आहे. पण राजकीय जागृती भलतीच जाज्वल्य आहे. त्याचबरोबर संगीत, साहित्य व कला यांची अभिजात आवड आहे. वादविवादात समोरच्यास हारविण्याची जन्मतः खुमखुमी आहे. त्यामुळे येथे राज्य करणे अवघड, नव्हे अशक्य, आहे. दारिद्र्यामुळे मनाचा कल समाजवादाकडे आहे. त्यामुळे पंजाबी सरंजामशाही व उर्दूची दादागिरी ते कसे बरे खपवून घेतील?

महाराष्ट्राचा व बंगालचा जवळचा संबंध आहे. १९०५ साली लॉर्ड कर्झनने

बंगालची फाळणी केली. ती रद्द करा, अशी मागणी कोणी करावी? पुण्याच्या केसरीने. लो. टिळकांनी बंगाल्यांना एवढे पेटविले की इंग्रजांना ६ वर्षांत ती फाळणी रद्द करावी लागली. रघुजी भोसले "आपण छत्रपतीचे नातेवाईक, पेशवे आपले नोकर," असे समजत. आपापसातील भांडणामुळे व पेशव्यांचा द्वेष यामुळे त्यांची सत्ता असलेले बंगाल, बिहार व ओडीसा हे तिन्ही प्रांत इंग्रजांनी घशाखाली घातले, तरी त्यांना काही वाटले नाही. *(वि. ग. खोबरेकर, महाराष्ट्राचा इतिहास, भाग २, पृ. ३३८)* रघुजी पेशव्यांशी झगडले, इंग्रजांशी नाहीत. रघुजी भोसले व त्यांचे सेनापती कोल्हटकर यांच्या बंगालच्या स्वाऱ्या सुप्रसिद्ध आहेत. त्या जेथे झाल्या तो बंगालचा भाग सध्या ममताच्या ताब्यात आहे. जेथे झाल्या नाहीत, त्या 'बांगलादेशा'वर कधी शेख हसीना तर कधी खलिदा झिया आपला हक्क सांगते. ऐतिहासिक दृष्ट्या, काला पहाडाचे (१६८५) खूप महत्त्व आहे. त्याचे एका मुस्लीम मुलीवर प्रेम होते. त्यांना लग्न करायचे होते. ब्राह्मण कांही केल्या लग्न लावण्यास तयार होईनात. काम आणि क्रोध यांच्या झटक्यांत काला पहाडच मुसलमान बनला. सूड म्हणून त्याने मोठ्या प्रमाणावर बंगाल व ओडीसातील हिंदूंना मुसलमान केले. रघुजींनी आणखी स्वाऱ्या केल्या असत्या तर पूर्व बंगाल हिंदू राहिला असता व भारताकडे असता. इतिहासापासून आम्ही कांही शिकत नाही, हेच खरे. काश्मीरच्या व आसामच्या भूतपूर्व राज्यपालांनी - जन. श्रीनिवास कुमार सिंहांनी (१९२६-२०१६) - मी बडोद्यात अलेंबिकच्या गेस्ट हाऊसमध्ये त्यांना भेटलो होतो तेव्हा- त्यांनी मला हेच सांगितले.

जनरल सिंहा

या भूतपूर्व राज्यपालांनी व मी प्रचलित राजकारणावर चर्चा केली. ते म्हणाले, "विकसित राष्ट्रांना राष्ट्रीय धोरण असते. सत्तेवर असणारे किंवा विरोधक या दोघांची राष्ट्रीय धोरणे समान असतात. कोणी ती सहसा उल्लंघून जात नाही. ती जागृती त्या लोकांत व नेत्यात येण्यास कांही शतके जावी लागली. आज आमच्याकडे आमच्या नेत्यांतच ही जागृती नाही, तर ती लोकांत कोठून येणार? याचे कारण या कोणच्याच नेत्याने देशासाठी लढा दिलेला नाही. अहिंसक लढ्यावर माझा विश्वास नाही. ती भंपकगीरी होती." 'ट्रायल' म्हणून त्यांनी ते आसामचे राज्यपाल असताना ८ नोव्हेंबर १९९८ रोजी राष्ट्रपतींना एक पत्र लिहिले. बांगलादेशातून भारतात लोंढेच्या लोंढे आल्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेस धोका उद्‌भवत आहे, आसामची अस्मिता संकटात आली आहे, केंद्र सरकार त्या बाबतीत आवश्यक ते लक्ष देत

नाही, अशी तक्रार आपण राष्ट्रपतींना केली व हा धोका त्यांनी टाळावा अशी विनंती केली. राष्ट्रपतींनी त्याकडे दुर्लक्ष केले.

मी त्यांना म्हणालो, ''गव्हर्नरचे जे सरकार ऐकत नाही ते सामान्य माणसाचे काय ऐकणार?''

''बांगलादेश आपण निर्माण केला. त्यात आपला हेतू होता की आपल्याला स्थिर व सुरक्षित शेजारी लाभावा. झाले उलटे. तेथून आपल्याकडे प्रथम निर्वासित व नंतर आतंकवादी येऊ लागले. ते आपल्या दहशतवाद्यांना आश्रय देऊ लागले, लपवू लागले. कारण त्यांचे राजकर्ते चीन्यांचे हस्तक होते. त्यांच्यासाठी जणू आपण आपली सरहद्द सछिद्र (पोरस) ठेवली होती. त्यांना साऱ्या सवलती देण्यात आल्या. त्यांना आपले नागरिक बनविले गेले. कां? तर त्यांची मते बंगालच्या कम्युनिस्ट पक्षास मिळणार होती.''

''अमेरिकेत मेक्सिकन असेच घुसतात.''

''कारण तेथेही लोकशाही आहे. लोकशाही म्हणजे मतांच्या भिकाऱ्यांचे राज्य. सुभाषबाबू पहिले पंतप्रधान असते तर ही घोडचूक झाली नसती.''

''म्हणजे?''

''त्यांनी हुकूमशाही लादली असती. ते असते तर त्यांनी लोकशाही नक्की आणली नसती. मुसलमानांचे प्राबल्य वाढून दिले नसते. समान नागरिक कायदा देशात आणला असता. लष्करी शिक्षण जारी झाले असते. राष्ट्रीय शिक्षणावर भर दिला गेला असता. राष्ट्र संपन्न व समर्थ झाले असते.''

''सुभाषबाबू आज आपल्यात नाहीत. १९७१ साली बांगलादेशास इंदिरेने फोडले. आता मिलिटरीली बांगलादेशाचे भवितव्य काय?''

''आपल्याला इंदिरेचा *अनफिनिश्ड अजेंडा* पूर्ण करायचा आहे. आपल्याला अजून सिंध, वायव्य सरहद्द प्रांत व बलुचिस्थान तोडायचा आहे. पाकिस्थान म्हणजे पश्चिम पंजाब, असे भविष्यात चित्र असायला पाहिजे.''

बांगलादेशींची घुसखोरी

ही घुसखोरी म्हणजे हा सुसंघटीत गुन्हेगारीचा मोठा व्यापार *(बिझिनेस)* आहे. उद्योग *(इंडस्ट्री)* म्हटले तर जास्त रास्त होईल. बांगलादेशाचे सरकार घुसखोरांना आसामी व इतर भारतीय भाषा शिकविते. ते समजण्यासारखे आहे, पण भारत सरकार, तुम्हीदेखील? तुमचे अधिकारी घुसखोरांना रेशनकार्ड व निवडणुकीचे ओळखपत्रही मिळवून देतात. या लोकांनी पश्चिम बंगाल, बिहार व

उत्तर प्रदेशचा थोडा थोडा भूभाग जोडून त्यात हे घूसखोर वसवायचे व पुढे मागे हा भाग बांगलादेशात विलीन करायचा. त्याचा नकाशा उपलब्ध आहे. त्याचे नामकरणही झाले आहे : मुघलीस्थान. या पाक-चीनी योजनेची सविस्तर माहिती 'आसाम ट्रिब्यून' ने प्रसिद्ध केली होती. प. बंगालचे गव्हर्नर टी.व्ही. राजेश्वर यांनी केंद्रास "ही दुसरी फाळणी असेल," अशी वॉर्निंगही दिली होती. ही घुसखोरी गटागटाने होते, कधी ५० जणांचा गट, तर कधी २०० जणांचा. जेथे वस्ती करायची तेथील भाषाही शिकवून झालेली असते. कोणच्या पडीक जमिनीवर तळ ठोकायचा, कोठे स्वस्त मजूर म्हणून काम सुरू करायचे हे आधी ठरलेले असते. इतर देशांत गुप्त हेरांची मदत घेतात. येथे तर सारा उघड मामला आहे. कंत्राटदारांचे राज्य आहे.

स्थायिक होण्यासाठी कंत्राटदार लागतो. त्याची माणसे शासनात असतात. आपल्या कामगारांच्या पोटावर पाय देण्यास त्यांना कसलीच लाज-शरम वाटत नाही. बस्स, आपला फायदा होत आहे ना? कायदा व सुव्यवस्था या नवागतांमुळे ढासळते. सो व्हॉट? या नवागतांचा आपल्या अर्थतंत्रावर बोजा बसतो. ठीक आहे, केंद्र सरकार बघून घेईल. या घुसखोरांची संख्या वाढली की तिरंगा जाळणे, मारामाऱ्या व हिंसाचार करणे, चोऱ्या व घरफोडी होणे हे प्रकार सुरू होतात. ब्रह्मपुत्रा 'नदी'तून नौकेतून हजारो घुसखोर भारतात शिरतात, नदीचा काठ व्यापतात व हळूहळू आत शिरतात. स्थानिक कामगार १०० रुपये रोज घेत असेल तर हे नवागत ४०-५० रुपायांवर खुश असतात. ते ओळीने घरे किंवा शेते विकत किंवा भाड्याने घेत नाहीत. अधूनमधूनची घरे व शेते घेतात. ती घेतल्यावर आजूबाजूचे लोक त्यांच्या त्रासाला कंटाळून, त्यांनाच विकून मोकळे होतात. म्हणजे, आक्रमक घुसखोर प्रस्थापित होतो व बिचारा भारतीय विस्थापित. हे सगळे ठरवून होते, नियोजन करून होते व त्यात स्थानिक दलालांची साथ/फूस असते. त्यांना पोलिसांचे व अधिकाऱ्यांचे आशीर्वाद असतात. त्यात बऱ्याच पैशांची उलथापालथ होते. यामुळे बांगलादेशाची पूर्वी १६ कोटी लोकसंख्या होती ती आज १५ कोटी झाली. १ कोटी लोक कोठे गेले? साधे व सरळ उत्तर : ते भारतात आले. कॉंग्रेसवाल्यांनो, कम्युनिस्टांनो, ही पापे कोठे फेडाल? केवळ मतांसाठी देशाच्या सुरक्षेस धोका निर्माण करता?

एखाद्या दुकानात चोरी झाली तर पोलीस दुकानातील साऱ्या नोकरवर्गाची तपासणी करतात. 'आतलाच कोणीतरी' सामील असल्याशिवाय अशी चोरी होऊच शकत नाही. हेच मोठ्या प्रमाणावर देशांच्या बाबतीत घडते. "घुसखोर बांगलादेशी आणि चिथावणीखोर मुल्ला व मौलवींच्या जीवावर तृणमूल कॉंग्रेस मोठी झाली.

देशाच्या सुरक्षेला धोक्यात आणून मिळवलेली सत्ता येथील घूसखोरांच्या उपद्रवाला कायम पाठीशी घालत आली आहे. दहशतवादी यंत्रणेचे नेटवर्क उद्ध्वस्त करण्यास पुढे सरसावलेल्या राष्ट्रीय यंत्रणेने आपला तपास मंदावणार नाही ना, याची काळजी घ्यायला हवी.'' *(ब्रिगे. हेमंत महाजन, बांगलादेशी घूसखोरी, पृ. २१४)* जमाते इस्लाम पलीकडे व जमात-उल-मुजाहिद्दीन आपल्याकडे पैशांची व माणसांची देवघेव करण्यात सक्रिय आहेत. मध्यंतरी कांही मिलिटरी जवानांनी मालडा येथे धाड पाडून कांही ठिकाणे जाळून टाकली. त्यात ११,००० कोटी रुपयांच्या ५०० व १००० च्या नोटा जळल्या. ममता मोदींच्या नावाने सध्या जो ठणाणा करीत आहे त्यामागे हा जळलेला काळा पैसा आहे. ममता कोणच्या तोंडाने सत्य काय आहे ते सांगेल? या पैशाच्या जळणावर तर प. बंगालमध्ये बाँबचे कारखाने चालतात. त्यांच्या जोरावर तर शेख हसीनास पदच्युत करून जिहादी खलिदा झियांना आणण्याचे कारस्थान ममता दीदी करीत आहे.

बंगालमध्ये जसे जमात-उल-मुजाहिद्दीन तसे आसामात युनायटेड लिबरेशन फ्रंट चे जिहादी भाडोत्री हिंदू सैनिक. त्यांना उत्तर हिंदुस्थानातून येणारे हिंदी भाषिक कामगार डोळ्यात खुपतात. त्यांना बांगलादेशी चालतात. ५ ते १४ जानेवारी २०११ या काळात उल्फाच्या भाडोत्री हिंदू सैनिकांनी बिहारमधून आसामात आलेले दूध विक्रेते, विटांच्या भट्टीवरचे कामगार या सर्वांना वेगळे काढून ६० लोकांना ठार मारले. २००० व २००३ मध्येही अशाच १५० हिंदी भाषिक कामगारांना ठार मारण्यात आले होते. उल्फाचे नेते, दुर्दैवाने, सारे हिंदू आहेत. १९८० सालानंतर घुसखोरांना भारतातून हाकलवून देण्याची चळवळ सुरू झाली होती. दुर्दैवाने, त्यांना बांगलादेश व पाकिस्थानच्या हेर खात्याचे हुषार अधिकारी यांनी 'वापरले' व वेळोवेळी पैसा, प्रशिक्षण, पोरी, शस्त्रे आणि सवलती पुरवून त्यांना 'अंकित' करून सोडले. त्याचा परिणाम म्हणून त्यांनी जो मुख्य मुद्दा - स्थलांतरितांविरुद्ध मोहीम - तोच सोडला. या नेत्यांच्या बायका व पाकी हेर खात्याचे अधिकारी यांचा जवळचा संबंध आहे. त्यामुळे आपल्या छावण्यातल्या सर्व गुप्त वार्ता शत्रु पक्षांत सरळ पोचतात.

''आसामातील हिंदी भाषिक लोकांच्या मनात दहशत निर्माण करणे, हेच नेमके बांगलादेशी जिहादी घटक आणि आंतरसेवा गुप्तवार्ता खात्यांना हवे आहे. याची कारणे दोन : पहिले, केंद्राच्या आसामकडे दुर्लक्ष करण्याच्या धोरणाने भ्रमनिरास झालेल्या इतर अनेकांपेक्षा त्यांची भारताशी असलेली ओळख अधिक घट्ट आहे. दुसरे, हिंदी बोलणाऱ्या लोकांचे हाती आसामच्या अर्थव्यवस्थेचे नियंत्रण

आहे. मोठे व्यापारी म्हणूनही आणि कुशल कामगार, म्हणूनही. राज्याशी शत्रुत्व असलेल्या शक्तींना आर्थिक पोकळी निर्माण होण्यात रूची आहे. त्यामुळे अनधिकृत बांगलादेशीयांचा ओघ आणखी सशक्त करता येईल. अनेक वर्षांपासून आसाम सरकार आणि २०१४ च्या आधीच्या केंद्रानेही इकडे दुर्लक्ष केलेले आहे. आता त्यांनी जे पेरले त्याची फळे पिकत आहेत.'' *(संपादकीय, सेंटीनल, ९ नोव्हेंबर २००६)*

आयएसआयचा बंगाल्यांनी केलेला पराभव

पूर्व पाकिस्थान म्हणजे पश्चिम पाकिस्थानची वसाहत (कॉलनी). इंग्रजांना बंगाली आळशी, बडबडे, खूप भात खाणारे व घामट वाटायचे. त्यांच्या शरीराला माशाची दुर्गंधी यायची, ते आवडायचे नाही, म्हणून इंग्रज मडमा त्यांना उपहासाने 'बाबू' म्हणायच्या. बा म्हणजे मासे व बू म्हणजे दुर्गंध. त्यांना तो बहुमान वाटायचा, उदा. सुभाषबाबू, अरविंदबाबू. इंग्रजांना बंगाली आपल्या उपयोगाचे नाहीत, नुसतेच बोलघेवडे, लष्करात कधी भरती होणार नाहीत, वा कधी लढणार नाहीत. बंगाली संतांनी या घाबरट शेळ्यांना वाघ बनविले. जतीन दासला बॉघा जॉतीन म्हणायचे! स्वातंत्र्यानंतर दिल्लीने बंगालला वाईट वागविले. त्यामुळे मूळची बडबडीची मनोवृत्ती पुन्हा उफाळून आली. २०१४ साली एका बांगलादेशी मंत्र्यानेच त्यांच्या २ लाख हज यात्रेकरूंचे 'देशाच्या तिजोरीवरील भार' असे वर्णन केले होते. तो म्हणाला, ''त्यांचा उपयोग काही नाही, फक्त वाहतुकीला अडथळा आणणे हे त्यांचे काम.'' त्याला ठार मारण्यासाठी ५ लाख टाकांचे बक्षीस जाहीर झाले!

बांगलादेशाची जन्मकथा म्हणजे पाकिस्थानी आयएसआय या हेर खात्याच्या पराभवाची कहाणी आहे. या खात्याचे दोन विभाग होते, संरक्षण मंत्रालयाखाली परदेशी विभाग व गृहखात्याच्या हुकूमतीखाली देशांतर्गत आयबी. राजकारण्यांना कोणची माहिती द्यायची ते सेनाप्रमुख ठरवी. पंतप्रधान फिरोझखान नून (१९५७-५८) यांना वाटे, लष्कराचे अधिकारी आपल्याविरुद्ध कांहीतरी कट शिजवत आहेत. राष्ट्रपती सैद इस्कंदर अली मिर्झांचे व लष्कराचे चांगले संबंध होते. आयूबखानांना सारखी भीती वाटे, त्यांना डावलून नून जनरल शेर अलीला प्रमुख बनवतील. मिर्झांनी लष्कराच्या मदतीने १९५८ साली मार्शल लॉ पुकारला, १९५६ ची घटना नाकारली व आयूबखानांना प्रमुख बनविले. जन. आयूबखान जास्त महत्त्वाकांक्षी निघाले. प्रेसि. मिर्झांना सुरक्षिततेसाठी लंडनला पळून जावे लागले. आयूबांचा आयएसआयवर विश्वास नव्हता, त्यांना आयबी व एमआय जास्त

भरवशाचे वाटत. त्याचे कारण होते. १९६७ साली आयूबखानांविरुद्ध कट रचला जातो आहे याची आयएसआयला जरासुद्धा कल्पना नव्हती. आयूबखानांना बंगाली अधिकाऱ्यांवर तर अजिबात विश्वास नव्हता. कारण, आयएसआय व इतर हेर विभागांनी फातिमा जीना एवढी लोकप्रिय आहे याची जरादेखील माहिती आयूबखानांना दिली नव्हती. १९६५ साली भारतासमोर आपला पराभव झाला याचे कारण आपले कमकुवत हेर खाते, अशी त्यांची समजूत, नव्हे खात्री झाली होती. भारताविरुद्ध प्रचार करण्यासाठी एमआयने व्हॉईस ऑफ काश्मीर रेडिओ ची मदत घेतली. ते केंद्र बेकार निघाले म्हणून पीओकेतून तो प्रचार सुरू झाला. पण तो भारतात व्यवस्थित ऐकू येई. ऑल इंडिया रेडिओ नेमके त्याविरुद्ध प्रचार करी व पाकिस्थानी जनतेला सत्य समजून येई.

१९६५ च्या पराभवानंतर आयूब बदनाम झाले, त्यांची तब्येत बिघडली, त्यांनी राजीनामा दिला व त्यांच्या जागी याह्याखान पाकिस्थानचे प्रमुख (१९६९-७१) बनले. १९७० च्या अखेरीस निवडणुका आल्या. दोन्ही भागात बंधुभाव रहावा म्हणून इस्लामचा आश्रय घ्यायचे ठरले व आयएसआयने पूर्व पाकिस्थानात सनातनी जमात-ए-इस्लामी ची मदत घेतली. तेथे अवामी लीगला 'सेक्युलर' धोरण जास्त पसंत होते. आयएसआयला याची कल्पनाच नव्हती. (असे कसे हे गुप्तचर खाते?) १९७० च्या डिसेंबरमध्ये जो परिणाम बाहेर आला त्याने आयएसआय घाबरली. ३१३ बैठकांपैकी अवामी लीगने लोकसभेच्या १६७ जिंकल्या. शेख मुजिबूर रहेमानांनी घटना समितीच्या ३०० पैकी २९८ जागा जिंकल्या. आयएसआयने पाठिंबा दिलेल्या जमात-ए-इस्लामी ला फक्त २ जागा मिळाल्या होत्या. लष्कर प्रमुख म्हणून आयएसआयची अंतिम जबाबदारी शेवटी याह्याखानांकडेच येई. एकीकडे आयएसआयचा हा दारुण पराभव आणि दुसरीकडे भारतात रीसर्च अँड ॲनॅलिसीस विंगची (रॉ) नेत्रदीपक कामगिरी. रॉ १९६८ मध्ये नुकतीच सुरू झाली होती. विशेषतः १९७१ सालचा बांगलादेशचा विजय रॉच्या माहितीवर पूर्णपणे आधारलेला होता. खरे म्हणजे सुरा व सुंदरी यात खुशी मानणारे याह्याखान एवढे सक्षम नव्हते, आयूबांनी त्यांना वारस म्हणून कां पसंत केले, हा विवादास्पद मुद्दा होता. १९७१ साली हजारो बंगाली स्त्रीपुरुष मारले गेले व ९३,००० पाकिस्थानी सैनिक भारताने कैदी म्हणून पकडले. यामुळे याह्याखानाची सत्ता संपुष्टात येणार हे स्पष्ट झाले. जायच्या आधी आयएसआय ही संस्था जास्त सक्षम करावी हे मात्र याह्यांनी नक्की केले. त्यासाठी ह्या संस्थेने अमेरिकेच्या सीआयएची मदत घ्यायचे ठरले.

बिचाऱ्या भुट्टोचा बळी

"फ्रेंडस्, बट् नॉट मास्टर्स" हा ग्रंथ लिहिणाऱ्या आयूबखानांना १ मे १९६० रोजी रशियाने पेशावरहून यू-२ रीकॉनायसन्स साठी हे अमेरिकन विमान उडविले व कॅ. फ्रान्सिस पॉवर यास पकडले, हे कळले व त्यामुळे आयूबखानांना मोठा धक्का बसला. प्रे. केनेडी (१९६१-६३) व प्रे. जॉनसन (१९६३-६८) या काळात अमेरिका व पाकिस्थान यांचे संबंध फारसे चांगले नव्हते. प्रे. निक्सनला याह्याखान फार आवडायचा. प्रे. निक्सन इंदिरा गांधींना "म्हातारी हडळ" म्हणत. किसिंजर व निक्सन या दोघांना एकाही पाकिस्थानी पत्रकारास त्रास न येता रावळपिंडी ते बायजिंग हा प्रवास गुप्त ठेवून याह्याखानांनी जी मदत केली ती आयएसआय व सीआयए यांच्या सहकार्याचा कळस म्हणता येईल. निक्सनने इंदिरा गांधींना ७ व्या फ्लीटचा धाक दाखविला. इंदिरेने म्हणून रशियाशी मैत्री व लष्करी करार केला. त्यासाठी सोव्हिएट नौदलास विशाखापट्टणम् व अंदमान-निकोबार येथे विशेष सवलतीही दिल्या. त्याविरुद्ध सीआयएने आयएसआयला काश्मीर, आसाम व पंजाब येथील बंडखोरांना शस्त्रे व प्रशिक्षण पुरविले. त्यानुसार नागा व मिझो बंडखोरांनी भारतास छळून काढले. ते कमी वाटले म्हणून की काय डॉ. जगजितसिंग चौहाण यांना १९७० साली लंडनला हालविले व अलगतावादी खलिस्थानी चळवळी चे प्रमुख नेमले. त्यांची व हेन्री किसिंजर यांची अमेरिकेत मुलाखत घडवून आणली. त्यांच्या खलिस्थानी चळवळीमुळे ऑपरेशन ब्ल्यू स्टार घडले व शेवटी त्यात इंदिरा गांधींचा १९८४ साली खून झाला. त्यानंतर ही हेर खात्यांची जोडगोळी बरीच थंड पडली. कारण, राजीव गांधी सत्तेवर आले व अमेरिका आणि भारत यांचे संबंध सुधारले.

१९७१ चे बांगलादेशाचे नुकसान 'पचविण्या'चे कठीण काम भुट्टोंकडे आले. आयूबांच्या राजवटीत ते परराष्ट्रमंत्री होते. १९६७ च्या डिसेंबरमध्ये त्यांनी पाकिस्थान पीपल्स पार्टी (पीपीपी) स्थापन केली. १९७३ साली ते पाकिस्थानचे पंतप्रधान (१९७१-७७) बनले. १९७२ सालापासून बलुचिस्थानात अलगतावाद्यांचे बंड सुरू झाले होते. १९७३ पासून तेथे इराणमार्गे शस्त्रे येण्यास सुरुवात झाली. इराणच्या रझा शाहास इराणचे बलुची बंड करतील अशी भीती वाटे, म्हणून पाकिस्थानातील बलुची बंडखोरांना चिरडून टाकण्यासाठी त्याने भुट्टोस आर्थिक, शस्त्रे, हेलीकॉप्टर्स व सावाक या हेर खात्याचे सहाय्य देऊ केले. बलुची बंडखोरांना शेजारच्या अफगाणांची फूस होती. भुट्टोने झियाउद्दीनला मोठे केले. भुट्टोची कामगिरी विशेष गाजली नाही. आयूबप्रमाणे भुट्टोचाही आयएसआयवर विश्वास उरला नव्हता.

त्याने लष्करी अधिकाऱ्यांना खुश करण्यासाठी परदेशी राजदूत म्हणून धाडले. त्याने फारसा फरक पडला नाही. जुलै ५, १९७७ रोजी लष्कराने कट केला व भुट्टोची हकालपट्टी झाली. ४ एप्रिल १९७९ रोजी जन. झियाने भुट्टोस फाशी दिले. आणि झियाचा रहस्यमय अंत १७ ऑगस्ट १९८८ रोजी विमान अपघातात झाला. राजीवने एका मुलाखतीत सांगितले, ''झिया व मी आम्ही काश्मीर प्रश्न सोडवत आणला होता, फक्त सह्या करायचे बाकी होते. आणि एवढ्यात त्याचा खून झाला.'' आणि राजीव गांधींचा खून एका तमीळ आत्मघाती बाँबरने मे १९९१ मध्ये केला.

बंगाली मुसलमानांच्यां असुरक्षिततेचा कालपट

१९७२-७५ : **शेख मुजिबुर रहमान** : भारतास जणू खिजवण्यासाठी भारताच्या स्वातंत्र्यादिनी (१५ ऑगस्ट) साऱ्या मुजिबुर रहमानच्या खानदानाची क़त्तल करण्यात आली. फक्त शेख हसीना वाचल्या कारण त्यावेळी त्या दूर लंडनमध्ये होत्या. खोडकर मुस्ताक या मुजिबुरच्या सहकाऱ्यास प्रमुख बनवून नवे सरकार रचले गेले.

१९७५ : **ऑगस्ट ते नोव्हेंबर** : नव्या सरकारने मुजिबुर रहमानच्या धोरणात आमूलाग्र बदल केले. एवढ्यात लष्करी कट झाला, त्यात मुस्ताक यांना काढण्यात आले, मुजीबुर रहमानच्या मंत्र्यांना जेलमध्ये टाकण्यात आले व शासनात मोठा गोंधळ उडाला. लष्कराचे प्रमुख ब्रिगे. जनरल खलीद मुशर्रफ यांचाही खून करण्यात आला. राज्यकर्ता कोण तेच कळेना.

१९७५-८१ : **झिआयुर रहमान** : मुशर्रफ यांची जागा मेज. जनरल झिआयुर रहमान यांनी घेतली. त्यांनी रेडिओ व टीव्हीची मदत घेऊन देशवासीयांना शांत केले व मार्शल लॉ पुकारून लोकसभा विसर्जित केली व आणीबाणी जाहीर केली. झिया साहजिकच प्रशासक बनले. त्यांनी १९ मुद्यांचा आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम जाहीर केला व १९७८ साली निवडणुका घेऊन स्वतः निवडून आले. त्यात ३० पक्षांनी भाग घेतला होता. घटनेची पुन्हा दुरुस्ती केली गेली. त्यांनी स्वतंत्र आर्थिक धोरणावर आधारलेले परराष्ट्रीय धोरण आंखले. दुर्दैवाने मे १९८१ मध्ये चितागाँग येथे त्यांची हत्या करण्यात आली. त्यांच्या जागी अब्दुस सत्तार आले.

सत्तारांनी झियांच्याच धोरणाची अंमलबजावणी केली.

१९८२-९० : **हुसेन मोहंमद ईर्शाद** : झियांच्या हत्येनंतर बरोबर १० महिन्यांनी सैन्य प्रमुख ले. जन. हुसेन मोहंमद ईर्शाद यांनी रक्तहीन क्रांतीनंतर सत्ता काबीज केली, मार्शल लॉ पुकारला व ते देशाचे अध्यक्ष बनले. त्यांनी अवामी लीगच्या सदस्यांना आपल्या बाजूस वळविले आणि त्यांच्या पाठिंब्याने झियांचे जुने आर्थिक धोरण चालू ठेवले, १९८६ साली मोर्चे वगैरे काढण्यासाठी राजकीय सवलती जाहीर केल्या, जमाते इस्लामचा पाठिंबा मिळविला व स्वतःची जातीय पार्टी स्थापन केली. बेगम खलिदा झियाचा विरोध होता तरीदेखील अवामी लीग व जातीय पार्टीचे राज्य सुरू केले. निवडणुकात अनेक गैरप्रकार घडले. पण ईर्शाद सत्तेवर आले व त्यांनी नोव्हेंबर १९८६ त मार्शल लॉ काढून टाकला. मंत्रीमंडळात सैन्याचे कांही प्रतिनिधी असावेत या त्यांच्या कल्पनेस सर्वांनीच कसून विरोध केला. जमाते इस्लामीने अवामीच्या ऐवजी बांगला नॅशनल पक्षाला पाठिंबा दिला व ईर्शादांना भरपूर विरोध केला. त्यांनी चिडून लोकसभा बरखास्त केली, पण त्यांना मार्च १९८८ मध्ये निवडणुका जाहीर कराव्याच लागल्या. विरोधी पक्षांनी त्यावर बहिष्कार टाकला. तरी निवडणुका झाल्याच. त्यात ३०० पैकी ईर्शादच्या जातीय पार्टीने २५१ बैठका जिंकल्या. नवीन राजवटीने आपला राजधर्म इस्लाम असे जाहीर केले. नाही तर आजवर सत्तेवर असणारा प्रत्येक पक्ष 'सेक्युलर' असायचा. ईर्शादविरुद्ध प्रचंड आंदोलने सुरू झाली, त्यांना राजीनामा द्यावा लागला व २७ फेब्रुवारी १९९१ रोजी पुनश्च निवडणुका होऊन जमाते इस्लामच्या सहाय्याने पै. वा. झिआयुर रहमानांच्या पत्नी खलिदाबाई परत सत्तेवर आल्या.

१९९१-९६ : **खलिदा झिया (१)** : आता दोन विधवा बेगमांचा सत्तेचा संघर्ष उघडपणे चालू झाला. एकीचा नवरा १५ ऑगस्ट १९७५ रोजी मारला गेला होता तर दुसरीचा झिया पाच वर्षांनंतर १९८१ साली. १९९४ सालच्या एका पोटनिवडणुकीत 'रिगिंग' झाल्याचा आरोप केला गेला व साऱ्या विरोधी पक्षांच्या सदस्यांनी लोकसभेत जाण्याचे बंद केले. तसेच राष्ट्रव्यापी हरताळ जाहीर केला. त्याचा

परिणाम होऊन खलिदा सरकारने राजीनामा दिला, केअर टेकर सरकारने ताबा स्वीकारला व निवडणुका जून १९९६ मध्ये घ्यायचे ठरले.

१९९६-२००१ **शेख हसीना (१)** : हे जरी युती सरकार असले तरी ही निवडणूक ''रिगिंग'' करून झाली असल्यामुळे ही अवैध आहे, असे विरोधी पक्षाचे म्हणणे होते. पोलीस व अवामी लीगच्या सदस्यांनी विरोधी पक्षाच्या लोकांचा छळ केला व त्यांना तुरुंगात टाकले असा खलिदा झियांचा आरोप होता. जून १९९९ पासून पार्लमेंटमध्ये विरोधी पक्षीय गैरहजर राहू लागले. त्यानंतर त्यांनी संप सुरू केला. इतर साऱ्या निवडणुकांत भाग घ्यायचे त्यांनी टाळले. अवामी लीगने राजीनामा देऊन 'केअर टेकर' सरकार स्थापून नवीन निवडणुका घ्यावा असा प्रस्ताव त्यांनी मांडला.

२००१-०६ : **खलिदा झिया (२)** : खलिदा झियांनी ४ पक्षांचे गटबंधन करून निवडणूकीत २/३ मते मिळविली व त्या दुसऱ्यांदा सत्तेवर आल्या. त्यांच्या गटात बहुतेक सारे इस्लामी पक्ष होते. २००४ साली अवामी लीगच्या मोर्चावर आतंकवाद्यांनी ग्रेनेडसचा मारा केला व तो मोर्चा उधळून लावला. त्यात नेता आयव्ही रहमान मरण पावला तर शेख हसीना जखमी झाल्या. अवामींनी देशभर दोन दिवस संप घडवून आणला. साळसूदपणे झियांनी या हल्ल्याचा निषेध केला व तो कोणी केला याची चौकशी करण्यासाठी एक समिती नेमली. नंतर कळून आले की झियांचा मुलगा तारीक रहमानच त्या हल्ल्याचा सूत्रधार होता!

२००६-०८ : **केअरटेकर गव्हर्मेन्ट** : कार्यवाहू सरकार नेमले गेले खरे, पण ते अवामींच्या बाजूचे आहे, असा आरोप खलिदा झियांनी केला. बऱ्याच वादावादीनंतर आणीबाणी लादण्यात आली व भ्रष्टाचार निपटण्याचा निश्चय करण्यात आला. दोन लाख लोकांना अटक करण्यात आली. हसीना त्यांच्या मुलांना भेटण्यासाठी अमेरिकेत गेल्या होत्या. लष्कराच्या सहाय्याने निवडणुका जाहीर झाल्या व त्यांना परत बोलावण्यात आले. त्यांच्यावर चार राजकीय खून केल्याचा व ८ कोटी टाका हजम् केल्याचा आरोप करण्यात आला. दोन व्यापाऱ्यांनी तशी कोर्टात साक्षही दिली. खलिदा

झियांवरही भ्रष्टाचाराचे व कर न भरल्याचे आरोप झाले. या दोन भांडखोर बेगमांच्या आरोप-प्रत्यारोपाच्या रणधुमाळीत शेख हसीना प्रचंड बहुमताने जिंकून आल्या.

२००९-१४ : **शेख हसीना (२)** : पहिली दोन वर्षे शांततेची गेली. मामुली गोष्टींवरून झगडा सुरू झाला : लहानशा भाड्यात ४० वर्षे खलिदा झिया राह्यची ते घर सरकारने ताब्यात घेतले. खलिदा भावाच्या घरी राहू लागली. २०११ साली हसीनानेच काढलेला हुकूम आता तीनेच रद्द केला : निवडणुकांचे काम एका तटस्थ निवडणूक मंडळास सोपवावे. हे तटस्थ मंडळ तटस्थ राहू शकत नाही, असा तिचा दावा होता. १९७१ च्या काळात ज्यांनी, उदा. जमात-ए-इस्लाम, पाकिस्थानी सैन्यास मदत केली होती त्यांना राजद्रोहाच्या आरोपाखाली फासावर चढवावे, असा फतवा हसीनाने काढला व कारवाई सुरू केली. त्यामुळे मोठा वाद सुरू झाला व २०१२ साली हसीनाच्या हत्येचा प्रयत्न सैन्याकडून केला गेला. २०१२-१४ हा काळ फारच अशांततेचा गेला. हरताळ, दंगे व हिंसेचे प्रकार वाढले. पेट्रोल बॉम्ब्ज व कॉकटेल बॉम्बजच्या घटना सर्रास होऊ लागल्या. सुरुवातीला निषेधाचे मोर्चे पण नंतर त्याचे रूपांतर दहशतवादी हल्ल्यात व्हायचे. प्रत्येक नागरिकास असुरक्षित वाटे. तशातच २०१४ साली निवडणुका घेतल्या गेल्या. विरोधी पक्षांनी त्यात भाग घ्यायचे नाकारले. शेख हसीना तिसऱ्यांदा सत्तेवर आल्या.

२०१४-आज **शेख हसीना (३)** : विरोधी पक्षांचा आरोप आहे की ही खरी निवडणूक नाही, विरोधी पक्षांनी त्यावर बहिष्कार टाकला होता. अवामी व बीएनपी यांच्या २०१६ च्या युनियन परिषदेच्या निवडणूकीत १०० जण मारले गेले. त्यावर शेख हसीनाची प्रतिक्रिया? २०१९ च्या निवडणूकीसाठी तयार रहा.

मूर्तिमंत भीती उभी

पूर्वी तो पूर्व पाकिस्थान होता म्हणून व आज तो बांगलादेश आहे म्हणून तेथील मुसलमान बंगाल्यांची असुरक्षितता कायम आहे. एक तर निसर्गानेच त्यांना असुरक्षित ठेवले आहे. तेथे वादळ केव्हा झोडपेल व महापूर केव्हा हैराण करेल ते

सांगणे अवघड आहे. हा देश भूकंपाच्या पट्ट्यात आहे. तेथील प्रवासी खात्याच्या माहितीप्रमाणे एकट्या ब्रिटनहून तेथे दर वर्षी दीड लाख प्रवासी भेट देतात. येथे यायच्या आधी हवामान खात्यास त्यांना 'कोणत्याही नैसर्गिक संकटाची शक्यता' नसल्याचे 'क्लीअरन्स सर्टीफिकेट' द्यावे लागते. आता गोष्ट मानवनिर्मित संकटांची. २०१३ साली ढाकाच्या बाहेर राणा प्लाझा फॅक्टरीस आग लागून १,१२९ मुली व स्त्रिया भाजून मेल्या व २२ बिलियन डॉलर्स किमतीच्या रेडीमेड कपड्यांचा उद्योग खाक झाला. येथून जगभर वॉलमार्ट सारख्या मॉल्सना कपडे पुरविले जात. या आगीमुळे कळले की येथे कोणच्याच कारखान्यात सुरक्षिततेचे नियम पाळले जात नाहीत. इतरही उत्पादन करणाऱ्या कारखान्यात तीच परिस्थिती आहे. १६ कोटी लोकवस्तीच्या या देशात दंगे, मारामाऱ्या, खून, चोऱ्या, बलात्कार, व्यक्ती अदृश्य होणे, पळविणे व पळवून लावणे वगैरे प्रकार नित्याचे. आतंकवाद्यांना अनुकूल असलेल्या खलिदा झिआच्या राजवटीत (१९९१-९६, २००१-०६) गोऱ्या युरोपियांना त्यांची दहशत जास्त होती. शेख हसीनांच्या अवामी लीगच्या राजवटीत (१९९६-२००१ आणि २००९-१६) त्यांचे प्रमाण थोडेसे कमी. अगदीच नाही असे नाही.

बांगलादेशातील शासन जवळ जवळ लुळे पडले आहे. विरोधी पक्षाची नेती खलिदा झिया ढाक्यातील तिच्या पक्षाच्या कार्यालयात नजरकैदेत बंदिस्त आहे. बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीचे (बीएनपी) तीचे कार्यकर्ते देशभर रस्ते, रेल्वे व जलमार्ग अडवून 'रास्ता रोको' करून सर्वत्र अशांतता माजवीत आहेत. निमित्त होते २०१४ च्या ५ जानेवारीच्या निवडणूकातील विजयाच्या पहिल्या वाढदिवसाचे. शेख हसीना त्यात विजयी झाल्या व सत्तेवर आल्या. त्यांच्या विजयाचे खरे कारण होते, त्या निवडणूकीवर विरोधी पक्षांनी घातलेला बहिष्कार. त्यात ५० लोक ठार व हजारो जखमी झाले. १०,००० विरोधी कार्यकर्त्यांची अटक करण्यात आली होती. बहुतेक साऱ्या बीएनपीच्या नेत्यांना जेलमध्ये टाकले होते. बरेचसे भीतीने लपून बसले होते. खलिदा झियांच्या घराची वीज व इंटरनेट कनेक्शन कापण्यात आले होते. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात सार्वत्रिक हरताळ पाळला होता.

या दोघा 'बॅटलिंग बेगमां'चा वैयक्तिक झगडा आता चव्हाट्यावर आला होता. १९९१ सालापासून त्या आलटून पालटून सत्तेवर यायच्या. खलिदा झियांची २००६ साली भ्रष्ट टर्म संपत आली होती. त्यांची मजल राजकीय सिस्टीमच भ्रष्ट करण्यापर्यंत गेली. त्यांनी 'रिगिंग' करावयाचे ठरविले होते. त्यामुळे सैन्यास आत उतरावे लागले व तंत्रज्ञान्यांचे केअर टेकर सरकार निर्माण करवून त्यास निवडणुका

जाहीर कराव्या लागल्या. त्यात हसीनांचा विजय झाला. सत्तेवर आल्यावर त्यांनी असे नियम केले की बीएनपी या जन्मात कधी सत्तेवर येऊच नये. त्यांनी बीएनपीच्या नेत्यांना पकडून भ्रष्टाचारासाठी व आतंकवादाच्या आरोपाखाली तुरुंगात धाडले. विरोधी पक्षांनी या एकपक्षीय लोकशाहीची खूप निर्भत्सना केली. भारत व पाश्चिमात्य राष्ट्रे खलिदा झियांविरुद्ध होती, कारण त्यांचा ओढा चीनकडे जास्त आहे.

फरक

मोदी २०१४ साली सत्तेवर आल्यावर परराष्ट्रीय धोरणात बराच फरक पडला. इंदिरा गांधींच्या वेळी (१९८०-८४) शेजारी राष्ट्रांच्या बाबतीत चक्क दादागिरी होती. आय.के. गुजराल (१९९७-९८) आले व थोडी नरमाई आली. मोदींनी (२०१४) त्यात आर्थिक दृष्टिकोण आणला. भारताचे श्रेष्ठत्व आधी मान्य करा, हे मूळ धोरण तेच चालू राहिले आहे, पण आता त्यात वास्तवता आली आहे, थोडा लवचिकपणा आला आहे. त्यांच्या अंतर्गत राजकारणात आजवर आपण उदासीन होतो, त्यात थोडा फरक पडला आहे. २०१४ सालच्या बांगलादेशातील निवडणुकांत आपण अवामी लीगच्या शेख हसीनांना उघडपणे मदत केली. हा फरक पडण्याचे कारण चीनची भीती. आपले सारे शेजारी जर चीनच्या कच्छपी लागले (मोत्यांची माळ) तर आपले काय होईल ही भीती दिल्लीस वाटणे रास्त व साहजिक आहे. चीन व तिबेटची राजधानी आता हाय स्पीड रेल्वेमुळे जोडले गेले आहेत. भारतीय लडाख भागात चीनने छोटे विमानतळ, पक्के रस्ते व निरीक्षण मनोरे बांधले आहेत. भारताचे सर्व शेजाऱ्यांबरोबर पाण्याचे करार झालेले आहेत, चीन एकमेव अपवाद. ब्रह्मपुत्रा नदी चीनमधून भारतात येते. चीनने मनात आणले तर अरुणाचल वगैरे प्रदेशांचे पाणी तोडू शकेल. चीनने मित्र राष्ट्रांची मोत्याची माळ तयार केली आहे, म्हणजे भारतास लष्करी वेढा घातला आहे. श्रीलंकेत चीन हंबनटोटा बंदर व रस्ते बांधीत आहे. बांगलादेशात पुन्हा खलिदा झिया सत्तेवर आली तर चीनी सहाय्याने मोठे नाविक बंदर तेथे होईलच. जिभूती किनाऱ्यावर चीनी लष्करी केंद्राचे काम चालू आहे. या बंदरात चिनी जहाजे उतरतात, दुरुस्ती करवून घेतात, मालाचा नवीन पुरवठा घेतात. ग्वादार बंदर पूर्ण झाले तर हिंदी महासागरावर चीनचा मोठा प्रभाव राहील. त्याचा भारतास धोका राहील. आपली आशा जपान व अमेरिका यांच्या मैत्रीवर अवलंबून आहे.

बांगलादेशाला १९७१ साली आपण स्वातंत्र्य मिळवून दिले. साहजिकच,

त्या नव्या अर्भकास आपल्याविषयी जास्त आदर, जास्त सहानुभूती वाटणे स्वाभाविक होते. पण संस्थापक मुजीबुर रेहमानांची हत्या झाल्यावर त्यांच्या वारसांची भूमिका व धोरण वेगळे असेल तर ते समजण्यासारखे आहे. त्यामुळे दोन राष्ट्रांच्या मैत्रीच्या संबंधात फरक पडणे हेही स्वाभाविक आहे. त्या काळात मोठा शेजारी/छोटा शेजारी असे आपले संबंध राहिले, विशेषतः राजकीय व आर्थिक बाबतीत. बांगलादेशात अवामी लीगचे सरकार आल्यावर लगेच फरक पडायचा. विशेषतः, आपल्याकडे काँग्रेसचे राज्य असेल तर. तरीही परराष्ट्र मंत्रालयातील बाबूंना श्रेष्ठगंड तर होताच. या दरिद्री देशांकडून काय मिळणार, ही तुच्छतेची भावना त्यांच्यात असावी. हेच बाबू अमेरिकन वा रशियन अधिकाऱ्यांबरोबर किती वेगळे वागतात! एका बांगलादेशी बाबूने त्याचे छान वर्णन केले आहे, ''तुमच्या बाबूंशी बोलायचे म्हणजे टिटानियमचा पाठीचा कणा, पोलादाच्या नसा व हिप्पोची कातडी पाहिजे.'' डिप्लोमॅटस् गोड बोलण्यासाठी प्रसिद्ध आहेत. याने तक्रार केली, ''चक्क नाही म्हणतात.'' याचा प्रत्यय ह्या अधिकाऱ्यास गंगेचे पाणी, जमिनीची अदलाबदल व आसामात जायचे असेल तर बांगलादेशाचे रस्ते, रेल्वे व पाण्याचा मार्ग यांचा वापर या विषयांवर बोलणी करताना आला. *(श्री. व सौ. शेफर, इंडिया अॅट द ग्लोबल हाय टेबल, हार्पर कोलिन्स, पृ. २७२)*

■■■

अफगाणिस्थान

गांधारी ते गांधी

चिनी व भारतीय नेतृत्वात एक मोठा फरक आहे. भारतीय नेते, "जुने सारे विसरून जाऊ या, नव्याने सुरुवात करू या," असे सतत सांगीत असतात, तर चिनी नेते आग्रह धरतात, "जुने कांहीही विसरायचे नाही. जुने गमावलेले सारे वर्तमानात परत मिळवायचे आहे." हे असे कां? कारण, चिन्यांना हरवलेले परत जिंकून घ्यायचा आत्मविश्वास जागृत आहे. आपल्या गुलाम नेत्यांना तो नाही. म्हणून, त्यांना धृतराष्ट्रपत्नी गांधारी व शकूनीमामा, तसेच जगप्रसिद्ध १७६ फूटी बामियानचा पुतळा आणि तक्षशीला विद्यापीठ त्यांना आठवत नाही. त्यांना येथला चाणक्य (खिपूर्व ३२०) व सम्राट अशोक (खिपू २६८ - खिपू २४०), तसेच हिंदू शाही सम्राट -- कांही कांही आठवत नाही. आम्हाला आठवते ते तुर्की महंमद गझनीच्या १००० सालापासून सुरू झालेल्या टोळधाडी. ११७५ साली अफगाणी महंमद घोरीने भारतावर स्वारी करून मुलतान ताब्यात घेतले. संक्रांतीच्या मुहूर्तावर १७६१ साली मराठ्यांवर संक्रांत कोसळली. ४०,००० मराठा सैनिक व तेवढेच त्यांचे कापले गेलेले यात्रेला आलेले नातेवाईक. त्यातले बरेचसे गझनीच्या बाजारात गुलाम म्हणून विकले गेले. तीनच वर्षांआधी पहिल्या बाजीरावाने अहंमद शाहच्या पंजाबच्या नजीबखान या राजपालाचा धुव्वा उडविला होता व पंजाब प्रथमच हिंदूंच्या हाती आला होता. तीन अँग्लो-अफगाण युद्धानंतर १९१९ साली सत्ता इंग्रजांच्या हाती गेली. रशिया अफगाणिस्थान जिंकून भारतात उतरेल अशी जबरदस्त भीती इंग्रजांना वाटे. म्हणून ड्युरांड रेषेची १८९३ मध्ये निर्मिती, तह,

स्वातंत्र्य व त्यास बफर स्टेटचा दर्जा. पहिल्या महायुद्धानंतर अफगाण मुलामुलींना पाश्चिमात्य शिक्षण, गुलामगिरीचे उच्चाटण, बुरखा घालण्याच्या सक्तीचे उच्चाटण, वगैरे सुधारणा तेथे आल्या. १९ व्या शतकांत पश्चिमेकडून इराण्यांची व पूर्वेकडून रणजितसिंगांच्या शूर शीखांची तलवार अफगाणांच्या डोक्यावर लटकत राहिली. शीखांची जागा पुढे इंग्रजांनी घेतली.

एक कटु आठवण म्हणजे अली बंधुंच्या नादी लागून गांधीजींनी अफगाणिस्थानच्या अमीरास भारतावर स्वारी करण्याचे आमंत्रण दिले. (त्या पत्राचा कच्चा ड्राफ्ट गांधींच्या हस्ताक्षरातला होता, तो श्रद्धानंदांच्या हाती लागला!) अमीर इंग्रजांची ताकद जाणून होता. त्याने त्या पत्रास दाद दिली नाही. गांधीजी मात्र फुकट बदनाम झाले. पुढे त्यांनी वायव्य सरहद्द प्रांतातील बादशाह खानांना काँग्रेसच्या कळपात ओढले व त्यांना १९४७ साली पाकी "लांडग्यांच्या" ताब्यात सोडून दिले. गांधी-नेहरूंना युद्धाचा इवलासा अनुभव असता तर त्यांनी पाकिस्थानाचे सँडविच बनवले असते व पाकिस्थानास पठाणांशी सतत होणाऱ्या संघर्षात बिझी ठेवले असते! त्याला काश्मीरकडे लक्ष द्यायला वेळच मिळाला नसता. दुसऱ्या महायुद्धात अफगाणिस्थान तटस्थ राहिले. नंतर शीतयुद्ध सुरू झाले. भारताप्रमाणे अफगाणिस्थानने कोणाचीच बाजू घेतली नाही. १९६९ साली सरहद्द गांधी भारतात आले होते. पाकिस्थानने आपल्या हस्तकांद्वारा महात्म्याच्या गुजरातेत असा जबरदस्त जातीय दंगा घडवून आणला व सरहद्द गांधी व इंदिरा गांधी यांच्यात बेदिली लावून दिली. इंदिरा गांधीनी ते नीट लक्षांत ठेवून असा सूड घेतला व पूर्व बंगालला अलग सार्वभौम बांगलादेशाचा दर्जा मिळवून दिला. पण सिंध, सरहद्द प्रांत व बलुचिस्थान अजून अलग व्हायचे बाकी राहिले होते. हा हंत हंत नलिनी गज उज्जहार । शेख मुजिबुर यांच्या हत्येमुळे स्वप्न स्वप्नच राहिले. ती जबाबदारी आता नरेंद्र मोदींच्या खांद्यावर आली आहे. फ्रॉम इंद्रा टू नरेंद्रा....

रशियन स्वारी

रशिया अफगाणिस्थानवर स्वारी करेल असे इंग्रजांना भय वाटे. तह करून, ड्यूरांड रेषा तयार करून इंग्रजांनी त्यास स्वतंत्र पण बफर स्टेटचा दर्जा दिला. ते जुने भूत १९७९ साली जागे झाले. त्याची प्रचिती १९७९ च्या मध्यभागी आली. आदल्या वर्षी तेथे प्रो-सोव्हिएट राज्य होते. हफिझउल्ला पंतप्रधान व तराकी राष्ट्रपती. राष्ट्रपतींचा खून झाला. आपल्याला अनुकूल अशा अफगाण पंतप्रधानांवर संकट आले म्हणून हेलीकॉप्टर्स व रणगाडे घेऊन रशियन सेना तेथे मदतीसाठी

थडकल्या. इंग्रजांची जागा आता अमेरिकनांनी घेतली होती. प्रे. जिम्मी कार्टरने बंडखोरांचे पारिपत्य करण्यासाठी व कम्युनिस्टविरोधी प्रचार करण्यासाठी लाखो डॉलर्स तेथे ओतले. हे युद्ध नऊ वर्षे (१९७९-१९८९) चालले. त्यास 'रशियाचे व्हिएटनाम' म्हणतात. कारण रशियन सेना अफगाणी जिहादी मुजाहिद्दीनांशी लढण्यात कमी पडली. जिनिव्हा करारानुसार त्या सैन्यास परत फिरावे लागले. सोव्हिएट रशियास सव्वा लाख सैनिक व १८,००० पठाण सैनिक गमवावे लागले. समोर १,००,००० मुजाहिद्दीन, ३०० पाकी जिहादी व कांही इराणी सैनिक कामास आले. अमेरिकेच्या वतीने पाकिस्थानने मुजाहिद्दीनांची भरती व प्रशिक्षण सांभाळले.

भारतासाठी ते वर्ष महत्त्वाचे होते. तीन म्हातारे - मोरारजी देसाई, जगजीवन राम व चरणसिंग - एकमेकांशी भांडले. लोकदलाचे गद्दार चरणसिंग ६४ खासदारांसह कॉंग्रेसला मिळाले व जेपींनी कष्टाने उभारलेले जनता सरकार पडले. त्यानंतरच्या निवडणूकीत इंदिरा गांधी यशस्वी झाल्या व पुन्हा दिमाखाने पंतप्रधान झाल्या. इंदिरा गांधींनी रशियन राज्यकर्त्यांना खाजगीत हे सैन्य लवकरात लवकर काढून घ्या, असे सूचन केले होते. पाकिस्थानसकट शेजारी राष्ट्रांना त्यांनी ही अफगाण समस्या शांततेने सोडवा, तिचे प्रसरण थांबवा, अशी परिस्थिती निर्माण करा की सोव्हिएट सैन्य आपणहून मागे फिरेल, अशी विनंती केली होती. जगाच्या विशाल पटावर त्यांचे ऐकतो कोण? दुर्बलांचे देवही दुर्बलच. या दोन महासत्तांच्या साठमारीत पाकिस्थानास व भारतास बरेच नुकसान झाले. २५ लाख अफगाण निर्वासित पाकिस्थानात पळून आले. भारताने बांगलादेश निर्माण केला खरा पण जे युद्धात कमावले ते शिमल्यास टेबलावर घालवले. काश्मीर समस्या कायमची मिटवून टाकण्याची सुवर्णसंधी घालविली. प्रत्यक्ष युद्धात भारतास जिंकणे अवघड आहे हे लक्षांत आल्यावर पाकिस्थानाने ''थाऊंजड कटस्'ची रणनीती स्वीकारली व रोज भारताचे २-४ सैनिक मारण्याचा यज्ञ सुरू केला व बनावटी नोटा वापरून त्याचे अर्थशास्त्र खिळखिळे करण्याचा निश्चय केला. तेच इस्लामने भारलेले मुजाहिद्दीन, तोच गनिमा कावा, फक्त लक्ष्य रशियाऐवजी भारत व त्याची सेना. या रिकाम्या व बेकार मुजाहिद्दीनांना वेळेवर जर काश्मीरकडे वळविले नाही तर ते आपल्याला येथे डोकुदुखी होऊन बसतील, हे पाकी राजकर्त्यांनी ओळखले. ती त्यांची राजकीय गरज होऊन बसली!

भारत-अफग़ाण भाई भाई

जॉर्ज डब्ल्यू. बुश २००२ ते २००४ इराकच्या सद्दाम हुसेनचा पाडाव

करण्यात गुंतला होता. त्यास ब्रिटनने मदत केली होती. या काळात पाकी आयएसआयने मुल्ला ओमरची तालिबान राजवट अफगाणिस्तनात स्थिर केली. या काळांत अमेरिकेचे लक्ष नाही ते पाहून पाकिस्थानने दुहेरी चाल खेळली. एका बाजूस अमेरिकेची व नाटोची मदत घेऊन अफगाणिस्थान अमेरिकन राजवट पक्की करू पहात होता तर दुसरीकडे तालिबानला मदत करीत होता. ९/११ च्या वाढदिवसाच्या बरोबर एक आठवडा आधी तालिबानाने एक प्रचंड बाँबस्फोट घडवून आणला. त्यात १५ जण ठार झाले. त्याचप्रमाणे २००१ पासून हमीद कारझाईची अफगाणिस्थानवर हुकूमत सुरू झाली होती, त्याच्यावर कंदाहारमध्ये प्राणघातक हल्ला केला होता. पेंटागॉनला २००३ मध्ये इराकवर विजय मिळविल्याचा जरा कोठे आनंद होतो न होतो त्याच समयाला तालिबानने हेलमंड व झाबूलवर गनिमी हल्ले चढविण्यास सुरुवात केली होती. त्यास मदत शेजारच्या पाकिस्थानातून येत होती. मुल्ला ओमरने शूरा मंडळ या आपल्या शासनाची पुनर्रचना केली होती. तालिबानाजवळ ६,७०० सैनिक होते. मुल्ला मंसूर दादुल्ला हा त्यांचा एक पाय असलेला सेनापती होता. रशियाशी लढताना त्याचा एक पाय कापावा लागला होता. मादक द्रव्ये, मारक शस्त्रे व मनोरंजक इलेक्ट्रॉनिक गॅजेटस् यांचे जोरात स्मगलिंग करणारे श्रीमंत जमीनदार अमाप फायदा होत असल्यामुळे खुशीत होते. टोयोटा लँड क्रूझर, एसयुव्ही व ट्रक्सची एजन्सी त्यांच्याकडेच होती. कोठे कोणाला किती लांच द्यायची ते त्यांना बरोबर माहीत असल्यामुळे त्यांना कसलाच त्रास होत नसे.

कमजोर कारझाई

कारझाई नावालाच प्रमुख होता, सारा कारभार युनायटेड नेशन्सच्या देखरेखीखाली होई. कारझाईने १ लाख सैन्यास सुटे केले होते व त्यांनी आपापली शस्त्रे सरकारला परत करावीत असा हुकूम काढला होता. १० महिने होऊन गेले तरी शस्त्रे कोणी परत केली नव्हती. शेवटी आंतरराष्ट्रीय सुरक्षा सेनेने सक्रिय होऊन कारवाई केली तेंव्हा रणगाडे व तोफा परत मिळाल्या. कारझाईला अफगाण राष्ट्रीय सेना वाढवायची होती, पण जमिनदारांना भीती वाटली, ही सेना वाढली तर आपले कोण ऐकणार? तेथे लढणार म्हणजे पश्तुन लोक. त्यांचे स्पर्धक म्हणजे ताजिक. जमीनदार एकजात भ्रष्ट होते. पण कारझाईला त्यांचा पाठिंबा होता. नाटो राजवटीस पैसे, शस्त्रे व लष्करी प्रशिक्षणाची मदत करणाऱ्या तीन राष्ट्रात भारत एक मोठा देश होता. दिल्ली सरकाराने अफगाणिस्थानाची पुनर्रचना करण्यासाठी

५० दशलक्ष डॉलर्स दिले होते. त्यामुळे तेथे भारतास मोठा मान होता. त्याचा पाकिस्थानास मत्सर वाटे.

अफगाणिस्थानातील बहुतेक साऱ्या प्रकल्पांना, उदा. काबुल-कंदाहार हा १९० मैलांचा मार्ग, अमेरिकेचे फंडिंग होते, पण अफगाणांना त्याची कल्पना नव्हती. वरील मार्गास ९ कोटी डॉलर्स खर्च आला होता. तो सैन्यासाठी बांधला आहे, लोकांसाठी नाही, अशीच लोकांची कल्पना होती. भारताने सरहद्दीजवळ भारतीय काँसुलेट २००४ च्या जानेवारीत उभी केली होती. ती रॉच्या हेरगिरीसाठी आहे असाच पाकिस्थानचा समज झाला होता. रॉ अफगाणिस्थानात स्वतंत्र बलुचिस्थानाची चळवळ आपल्या काश्मीरातील आतंकवाद्यांना जबाब म्हणून भारत चालवीत आहे, असा आरोप व प्रचार पाकिस्थान करीत होता. २००४ साली अफगाणांची स्वतःची हेर संस्था तयार झाली होती. त्याच वर्षी डिसेंबरात कारझाई राष्ट्रपती म्हणून निवडून आले होते. त्यांना दोन उपाध्यक्ष लाभले होते, एक ताजिक होता, दुसरा शिया. तालिबान आता कंदाहाराच्या आजूबाजूच्या भूभागात आपली सत्ता प्रस्थापित करीत होता. सुरुवातीला त्याच्यापाशी ३०० सैनिक होते. ती संख्या आता १०,००० वर पोचली होती. अमेरिकेचे तालिबानच्या वाढत्या ताकदीकडे लक्ष होतेच. दोघांच्या चकमकी होत. अमेरिकेचे तेथे १७,००० सैन्य होते व त्यांचे ११ लष्करी तळ वाढता वाढता आता २६ झाले होते. बाग्राम येथे त्यांचे हेड क्वार्टर्स व मोठा विमानतळ होता. अफगाण तालिबान व पाक आयएसआय यामधील संदेश व्यवहार बाग्रामच्या तळाने 'पकडला' होता. अमेरिकन सैनिक आता अफगाणी खेडेगावात तालिबानांच्या काय हालचाली सुरू आहेत यावर नजर ठेवू लागले. त्यांच्या लक्षात आले, अफगाणिस्थान खूप मोठा देश आहे. त्यावर नजर ठेवण्यासाठी कमीत कमी २ लक्ष सैनिकांची फौज हवी. म्हणजे, आत्ताच्या १२ पट.

पेंटॅगॉनने जमीनदारांना मदत करण्याचे थांबविले, सीआयएने बजेट वाढविले व अफगाण राष्ट्रीय सेनेची रीक्रूटभरती सुरू केली. स्थानिक अडाणी पठाण व त्यांचे गांजाचे व्यसन या दोन समस्या त्यांना आड येऊ लागल्या. २००५ साली तालिबानांशी लढण्यासाठी या सैन्यास धाडले की त्या लढाईत १५ टक्के सैनिक गारद होत. ही हानी जरा जास्तच होती. यामुळे सैनिक सोडून जाऊ लागले. २४० डॉलर्स तसा आकर्षक पगार होता. पण या अडाण्यांना कळायचे नाही की ते कोणासाठी लढत आहेत - अफगाण घटनेसाठी, कारझाईंसाठी कां अफगाणिस्थानसाठी? निरक्षर असल्यामुळे घटना वाचणे त्यांना शक्य नव्हते. कारझाई भ्रष्ट सरकारचा प्रमुख

दुर्बळ होता, हे त्यांना दिसत होते. देशाची निष्ठा ही संकल्पना त्यांच्या बुद्धीच्या बाहेर होती. त्यांना फक्त टोळीची निष्ठा समजायची. समोरच्या शत्रूंची युद्ध घोषणा असायची, "अल्ला हो अकबर." हे अफगाणी सैनिक तालिबानाच्या सैन्यास विचारीत, "तुम्ही तर आमच्यासारखे पठाण दिसता. मग आमच्याशी कां लढता?" समोरून उत्तर येई, "तुम्ही शत्रूंना मदत करता, म्हणजे काफर आहात. म्हणून आम्ही तुमच्याशी लढतो." यांना ते पटे. त्यामुळे यांची संख्या घटू लागली व तालिबानांची वाढू लागली. ती आता तिप्पट, म्हणजे, १२,००० झाली."

अफगाणिस्थानात आता नागरी युद्ध सुरू झाले होते. पाकी आयएसआयचा टोळीवाल्यांत प्रचार चांगला होता. सौदी अरेबिया भरपूर पैसा ओतत होता. तालिबानचे लोक पाकिस्थानातून काम करीत. त्यामुळे टोळीवाले प्रभावित होऊन तालिबानाकडे वळत. समोर सीआयएचा अमाप पैसा होता. त्यांचे काम पश्तुन टोळीवाल्यांत जास्त होते. विशेषतः ग्रामीण भागात, लहान लहान गटात. त्यांची रीक्रूटभरती बलुचिस्थान व खैबर भागात मदरसातून होई. मदरसात विद्यार्थी बारा वर्षे शिकत असे. या काळात त्याचे कुराण मुखोद्गत होई. काफीराशी लढले पाहिजे व धर्म वाचविला पाहिजे अशी त्या विद्यार्थ्यांची मनाची तयारी होत असे. काफीर कोण? काफरांना मदत कोण करते? कारझाई व त्याचे अधिकारी. या मदरसांच्या पदवीधरांचा दीड महिन्याचा राजकीय व लष्करी जिहादी प्रशिक्षणाचा कार्यक्रम ठेवला जाई. त्यात चाचपणी होई. निवड झालेल्यांना व्हाया बलुचिस्थान व इराण इराकमध्ये लढायला धाडले जाई. हे नवीन नव्हते. रशियनांशी लढायला पूर्वी याच पद्धतीने जिहादी निवडले जात. त्याची ही पुनरावृत्ती होती. या ऑपरेशनमध्ये पाकी हेर खात्याचा, म्हणजे आयएसआयचा अनुभव दांडगा होता. १९९० च्या दशकांत हे कार्य करणारी फक्त एकच संस्था होती. आता परिस्थिती बदलली होती. पूर्व अफगाणिस्थानातील १,५०० स्वयंसेवक जवळ असणाऱ्या हिज्ब-ए-इस्लामी संस्थेचा सहकार लाभला होता. तसेच अल कायदा संस्थेचा. ही पाकिस्थानच्या ७ टोळीवाल्या प्रांतात (फाटा) काम करीत होती व तिच्याजवळ २,००० प्रशिक्षित तरुणांचा 'लढाऊ' हजर स्टॉक होता. त्यांच्यापाशी स्फोटके बनवायचा कारखाना होता व आत्मघाती बॉबर्स होते. आपला आंतरराष्ट्रीय जिहाद आहे, त्यामुळे आपला दृष्टिकोण विशाल व सर्व इस्लामी पंथीय व उपपंथीयांना अंतर्भूत करणारा आहे, असा या अल कायदावाल्यांचा दावा होता.

कळत नकळत तालिबानवाल्यांची रणनीती मावच्या नीतीशी समांतर वाटत होती : ग्रामीण भागात प्रसार व प्रचार करणे, शहरी भागास वेढा घालणे व नंतर ही

सारी केंद्रे पचविणे. १९८० च्या दशकांत रशियनांशी झगडताना हेच धोरण अंगीकारले होते व ते यशस्वी ठरले होते. त्यावेळी रशियनांनी हवेतून बॉंबमारा केला होता व लोकांची मने साहजिकच रशियाविरोधी झाली होती. आता तोच मूर्खपणा अमेरिकन सैन्य करीत होते. याउलट, पाकिस्थानातून हे तालिबानी अफगाणिस्थानच्या ग्रामीण भागात जात, तेथील वृद्ध लोकांना भेटत व त्या खेड्यात काम करण्यासाठी त्यांची परवानगी मागत. ही परवानगी मिळाली की पुढची कारवाई करायला हे मोकळे. अफगाणी संस्कृती व मानस त्यांना पुरेपूर माहीत असायचे. अमेरिकन अफगाण राष्टीय सेनेने हीच रणनीती अवलंबिली होती. पण त्यांना भाषेचा मोठा अडथळा त्रास देई. त्यांना अफगाण संस्कृतीचेही ज्ञान नसे. तो तालिबान्यांना मोठा फायदा असे. पण अमेरिकनांजवळ जी जादू होती ती अन्य कोणाजवळ नसे - डॉलर्सच्या नोटांचे बंडल. पैशाच्या जादूविषयी म्यां पामरे काय सांगावे? नेते-पुढारी सारे त्याने आकर्षिले जात. सरकारविरुद्ध ते कांही बोलले तर बाबू लोक तिकडे दुर्लक्ष करीत. पैशाची जादूची कांडी फिरली की शत्रू मित्र बनत व मित्रांची मैत्री आणखी घट्ट होई. शस्त्रे लपविण्यासाठी सुरक्षित जागा लागत. त्यासाठी स्वयंसेवक पुढे येत व आपली घरे त्यासाठी खुली आहेत, असे आश्वासन देत.

धर्म कां डॉलर्स? जास्त आकर्षण कसले असायचे? त्यासाठी गावातला मुल्ला आवश्यक असे. तो सांगेल ती पूर्व दिशा. त्याने सांगितले ते इस्लामसाठी व शरियासाठी सच्चे असलेच पाहिजे, अशी त्या अडाणी ग्रामीण लोकांची भावना असे. तालिबानचे लोक त्यांचा फायदा उठवीत. त्यातून काबूलवाल्यांत व वॉशिंग्टनवाल्यांत संघर्ष सुरू होई. बरेच वेळा दोन्ही बाजूंनी ढोलकी वाजविणारेही भेटत. अशा वेळी पारंपारिक युक्ती कामास येई - रात्रीच्या वेळी तालिबानवाल्यांच्या घरी गुपचूप धमक्यांची पत्रके टाकणे. बऱ्याच वेळा त्याने घाबरून जाऊन काही मंडळी शहरात जास्त सुरक्षित स्थळी जात. त्याने इतका घबराट निर्माण केला की २००४ साली ग्रामीण पख्तुन विभागात अफगाण सैनिकांनी पेट्रोलिंग करणे बंद केले व ते आपापल्या सुरक्षित जिल्ह्यात वा शहरात निघून गेले. तालिबानवाल्यांना ग्रामीण मुल्लांचा पाठिंबा सहज मिळत गेला. या मुल्लांचा संसार गावकऱ्यांनी दिलेल्या दानावर चाले. हळूहळू हा मुल्ला तालिबानवाल्यांचा रीक्रूटमेंट एजंट बनला. काबूल सरकार परदेशी काफर लोकांचे सहाय्य घेत आहे व म्हणून "आपले" नाही, असा प्रचार तो करू लागला. कारझाई सरकारला हा वाढता विरोधी प्रचार कानी पडू लागला. त्यांना सरकारी पगार देऊन वश करावे असे वाटू लागले, पण असा पगार

द्यायला तिजोरीत जादा पैसाच कुठे होता? समजा, तसे केले तर गावातील इतर वृद्ध लोकांच्या अपेक्षाही वाढतील. सर्वांना खुश करणे कारझाईंना शक्य नव्हते. हा अपप्रचार फार वाढला तेव्हा या धार्मिक लॉबीवर आळा घालणे कारझाईंना भाग पडले. २००६ साली त्यांनी 'सार्वजनिक नैतिक पोलीस' नावाचे नवे खाते सुरू केले. आर्थिक परिस्थितीमुळे ते शहरांपुरते मर्यादित ठेवले गेले. दुसऱ्या बाजूस, तालिबानाने सरकारला अनुकूल असलेल्या धर्मगुरूंना 'टार्गेट' केले व त्यांच्याकडे 'रात्रीची धमक्यांची पत्रे' रवाना झाली. या धर्मगुरूंनी आपली वागणूक बदलली नाही तर त्यांचे खून पडू लागले. एकट्या कंदाहारात असे २० धर्मगुरू ठार केले गेले. अर्थात हा प्रकार उभयान्वयी होता. जून २००४ व मे २००५ या काळात अमेरिकन सैन्याने ११३ 'बळी' घेतले.

तालिबान, नव्या युगातील

२००५ साली तालिबानला रात्रीची पत्रे लोकांच्या दरवाजांवर लावावी लागत नव्हती. आता जमाना बदलला होता. पूर्वी संगीत व फोटोग्राफीवर बंदी होती. तीही आता उठली होती. आता त्यांचा प्रचार 'हाय टेक' झाला होता. शहरी व ग्रामीण पठाणांना कोणचे संगीत प्रिय आहे त्याचा अभ्यास करून पाकिस्थानातील तंत्रज्ञांनी आता शेकडो हजारो कर्णमधुर कॅसेटस्, सीडी व डीव्हीडीज् तयार करून दिल्या होत्या. आता निरनिराळ्या खबरे व कहाँनियांनी सज्ज अशा या आधुनिक तालिबान्यांची स्वतःची वेबसाईट होती, आणि ३ प्रांतात स्वतःचा शरिया रेडिओ होता. काबूल विश्वविद्यालयातील लकमन नावाचा बऱ्याच भाषा जाणणारा एक विद्यार्थी व तालिबानच्या सांस्कृतिक समितीचा या तालिबानच्या वेबसाईटचा इन चार्ज होता. एका अरब पत्रकारास दिलेल्या मुलाखतीत लकमनने सांगितले, ''तालिबानला उपयोगी ठरेल अशा कोणत्याही विषयावर आम्ही चर्चासत्र सुरू करतो व आमचा ह्या माध्यमातून प्रचार सुरू ठेवतो, उदा. लोकांना शत्रू कसा घाबरवतो, कारझाई सरकार कसे भ्रष्ट आहे, वगैरे. माझ्या बरोबरीची मुले तालिबानला मदत करतात कारण ती स्वतः तालिबानच्या विचारांची आहेत, म्हणून नाही तर त्यांना हे भाडोत्री कारझाई सरकार नको आहे.... कोणी किती लांच दिली वा स्वीकारली हे तालिबानला लगेच कळते. त्याचे खबरे गल्लीगल्लीत व रस्त्यारस्त्यावर आहेत. तालिबानापासून कांही लपून रहात नाही.'' त्याचा अब्दुल रहमान नावाचा एक सहकारी आहे. तालिबानासाठी तो काबूल विश्वविद्यालयात व बाहेर रीक्रूटमेंट करतो. ''आम्ही सावधपणे काम करतो,'' लकमन सांगतो,'' विशेषतः राजकारणावर

चर्चा करीत असताना आम्हाला सावध राहावे लागते. सरकार फार दुर्बळ आहे. ते आमचे कांहीही वाकडे करू शकणार नाही, पण आपण काळजी घेतलेली बरी."

लकमन पुढे सांगतो, तालिबान कमांडर्स कारवाई करायच्या आधी व्हिडीओ शूटींग करण्यासाठी कॅमेरामन तेथे धाडतात. कित्येकवेळा भारी मोबाईल फोनवर काम भागविले जाते. कोणास पळवायचे असेल किंवा एखादा बॉंबस्फोट घडवायचा असेल किंवा कोणास ठार मारायचे असेल किंवा शत्रूचे नुकसान करायचे असेल तर याचे चित्रफितीकरण करायचे, असा आमचा नियम आहे. त्याने आमच्या प्रचाराला मदत होते. त्यात आम्ही आमची कॉमेंटरी टाकतो किंवा संगीत मिसळतो. ह्या डीव्हीडी शत्रूकडील लोकांना धाडून त्यांना धाक दाखविता येतो. हा सारा जिहादचाच एक भाग आहे, असे आम्ही मानतो. या गॅजेट्सचा मॅक्रो व मायक्रो पातळीवर लढायला उपयोग होतो. अफगाण व मुस्लीम दृष्टिकोण बदलायचा असेल तर त्यासाठी अत्याधुनिक गॅजेटसची आता नितांत गरज आहे. कारण आता आपण ख्रिस्ती काफरांशी वैश्विक युद्ध छेडित आहोत. हे केवळ अफगाणिस्थानचे युद्ध नाही, हा त्या जागतिक युद्धाचा एक भाग आहे. कारझाई हा केवळ पाश्चिमात्यांच्या हातातील बाहुले आहे. या लढाईला योग्य ती धार्मिक ओळख मिळावयास पाहिजे. ह्यासाठी उलेमाची गरज, विशेषतः ग्रामीण भागात."

"श्रोत्यांच्या व प्रेक्षकांच्या मनावर योग्य तो ऑडीओ-व्हिज्युअल परिणाम झाला पाहिजे. त्यासाठी पेंटॅगॉनने इराकचा आणि अफगाणिस्थानचा कसा विध्वंस केला आहे, माणसांचा, जनावरांचा व आर्थिक विनाश घडविला आहे ते दाखविणाऱ्या डीव्हीडी आम्ही निर्माण करतो. हिटलरने एक मिलियन ज्यू कसे हालहाल करून मारले, त्याचे म्युझियम बनवून त्या ज्यूंच्या हालअपेष्टांना अमर स्वरूप दिले. तसलाच प्रकार आम्ही या नव्या डीव्हीडीच्या रूपाने सादर करतो. इराक, पॅलेस्टाईन, दक्षिण लेबॅनॉन आणि पाकिस्थान येथील आदिवासींच्या पट्ट्यात अमेरिकेने काय काय व कसा कसा मुसलमानांचा छळ केला ते सामान्य मुसलमानांनी पाहिले की त्यांच्या मनांत अमेरिकेविरुद्ध चीड निर्माण होते. ह्या महाबलाढ्य सत्ताविरुद्ध मुसलमान मुजाहिदींनी कसा लढा दिला व त्यांना कसे पराभूत केले याचेही दर्शन आम्ही या डीव्हीडींमधून दाखवितो. त्यात सुईसाईड बॉंबर्सची निरोपाची छोटी भाषणे टाकतो व आमचे काम आणखी सोपे होते. यात आम्हास आणखी आत्मघातकी बॉंबर्स मिळावेत हा हेतू असतो. आमच्या अमेरिकन शत्रूजवळ हाय टेक्नॉलॉजी आहे. आमचे त्या मानाने जुने तंत्रज्ञान आहे. आमच्या या सीडीज् व डीव्हीडीज् पाहून अशिक्षित ग्रामीण लोकांनी त्यांना तीन मुले असतील तर एक

मुलगा तालिबानला द्यावा, असा आमचा पवित्र हेतू आहे. हा जुन्या काळापासून चालत आलेला एक प्रकारचा विमा उद्योग आहे. शहरात त्या डीव्हीडी पाहून नागरिकांना आम्ही सरकारविरोधी बनवू शकलो तर आम्ही केलेला हा उपक्रम सफळ झाला असे समाधान आम्हास मिळू शकेल.''

कारझाई व नाटो यांचा ऱ्हास

अमेरिकन्स व नाटोजवळ तालिबानाच्या सीडीज् व डीव्हीडीज्वर मात करेल असे प्रचार साहित्य कांहीसुद्धा नव्हते. त्यांनी 'सायकॉलॉजिकल ऑपरेशन्स' मोहिमा सुरू केल्या पण त्यांच्याजवळ पत्रके व बिलबोर्डस यापलीकडे कांहीसुद्धा नव्हते. अफूच्या लागवडीचे दुष्परिणाम तालिबानच्या ताब्यात असलेल्या विभागात व्यंगचित्रांच्या स्वरूपात दाखविण्यापलीकडे त्यांची मजल पुढे जाईच ना. नाटोच्या विमानातून अशी शेकडो पत्रके आकाशातून टाकली जात. इतर भागात 'आवाज आझादीका' नावाच्या पाक्षिकातून पुस्तु, दरी व इंग्रजी भाषेतून काबूल सरकारने केलेल्या विकासाच्या कामाची सचित्र माहिती दिलेली असे. कबाब विकणाऱ्या दुकानदारांना कबाब ठेवायला वा गुंडाळायला हे चांगले कागद आयते हाती आले! प्रचार शास्त्राचा पहिला नियम : समोरच्याची संस्कृती व परंपरा आधी समजून घ्या, ह्यांना त्या पाळता आल्या नाहीत. अफगाणिस्थानात वस्ती विरळ व विखुरलेली. तेथे झनाना विभागात कोणी जायचे व कोणी जायचे नाही, हे यांना माहीत नाही. बाबू लोक, पोलीस व खबरे यांना सत्तेमुळे आपण नियम पाळले नाहीत तर चालेल. अशी बेफिकीरीची वृत्ती अंगी आलेली. सरकारी म्हणजे 'आम्हाला सर्व कांही समजते', असा अहंभाव वा दंभ.

सरकारची अरेरावीची व अहंकाराची दृश्य स्वरूपाची प्रतिमा म्हणजे पोलीस. पाश्चिमात्य पोषाखातील हे अंगठा छाप अफगाण नॅशनल पोलीस (एएनपी) जर्मनांच्या हातून प्रशिक्षित झाले होते. नंतर त्यांना डीनकॉर्प नावाच्या अमेरिकन सिक्युरिटी कंपनीने अमेरिकन बंडखोरांना शोधून काढण्याचे शिक्षण दिले होते. रीक्रूट स्थानिकच असत. पण त्यांना उचलून केंद्रात राष्ट्रीय प्रशिक्षण देऊन बंडखोरांना शोधून काढण्याचे शिक्षण मिळालेले होते. त्यांच्या घरी कोणी भाऊ वा काका वा भाचा तालिबानाशी संबंधित असे. त्याच्यावर धाड पाडायच्या आधी मोबाईलवर त्याने 'आम्ही तुझ्यावर धाड पाडण्याठी येत आहोत,' असा फोन केला तर त्यात अनैसर्गिक काहीच नसे. या एएनपींची संख्या लहान असे, एका गावात फार तर चाळीस. त्यातले १०-१५ जण पेट्रोलिंगला जात. म्हणजे उरले २०-२५. बहुतेक

वेळी तालिबानच्या धाकाने ते घरूनच रिपोर्ट लिहून पाठवीत! त्याउलट तालिबानच्या छावणीत शिस्त व सजा कमालीच्या कडक असत. त्यांची नियमावली असे. त्यात ३० नियम असत, उदा. साध्या-सरळ माणसास त्रास म्हणून द्यायचा नाही; काही वाद झाल्यास उलेमांनी तो वाद सोडवायचा; छापा मारला तर ज्येष्ठ अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय घराची झडती कोणास घेता येत नसे; लूटीत मिळालेली शस्त्रे सारखी वाटून घ्यायची; कोणास हेर म्हणून संशय आला तर कमांडरच्या परवानगीशिवाय त्यास सजा करता येत नसे; कमांडरची परवानगी असेल तर जिहादीस या प्रांतातून त्या प्रांतात जाता येत असे.

या नियमावलीमुळे तालिबानास समाजात न्यायी म्हणून आदर व सन्मान मिळे. पेंटॅगॉनचे काम होते ग्रामीण भागातील बंडखोरी बंद पाडणे. अमेरिकनांना त्यांची चूक लक्षात आली की तेथे त्यांची अप्रियता वाढत आहे व त्याचा फायदा तालिबानला मिळत आहे. बंडखोरी कां होते? गरिबीमुळे. गरिबी कां वाढते? विकास होत नाही म्हणून. विकास कां होत नाही? आपले अधिकारी भ्रष्ट आहेत म्हणून. लोक जर आपल्याशी सहकार्य करणार नसतील तर आपण यशस्वी कधीच होऊ शकणार नाहीत. या विभागात रेल्वे नाही. आपला सारा माल येतो तो रस्त्याने. १०-१० ट्रक्सचा जथ्था असतो. वरून हेलिकॉप्टरचे छत्र असते. पहिला ट्रक थांबविला की सारा जथ्था थांबतो. हेलिकॉप्टरमधून खडकामागे वा झाडामागे लपलेला तालिबानचा सैनिक दिसू शकत नाही. आणि तो मोटारसायकलवर असतो. त्याच्याजवळ सॅटेलाईट मोबाईल असतो. त्यामुळे तो त्याच्या कमांडरशी बातचीत करू शकतो. नाटोजवळ मोबाईलचा वेध घेणारी यंत्रे आहेत. त्याने त्या मोबाईलला टार्गेट केलं की तो तालिबानचा सैनिक आपण मारू शकतो. त्यांना ते माहीत झाल्यापासून ते आता सॅटेलाईट फोन वापरत नाहीत, कोडेड संदेश धाडतात. ते आपले स्कॅनर्स पकडू शकत नाहीत. त्यांना आपल्यापेक्षा वाळवंटाचा भूगोल जास्त चांगला माहीत आहे. ते रशियन मेकचे स्ट्रेला १ व २ ही खांद्यावरून सोडायची मिसाईल्स वापरतात. खूप उंचीवरून उडणाऱ्या जेट विमानातून हे ३-४ जणांचे तालिबानचे गट दिसत नाहीत. हेलिकॉप्टर्स त्यांच्या रशियन मिसाईल्सचे बळी होतात. ती गरम होणाऱ्या इंजिन्सचा वेध अचूक घेतात. हेमंड प्रांतात २००७ साली त्यांनी आपली हेलिकॉप्टर्स टिपली होती. त्याचा त्यांना प्रचारासाठी उपयोग होतो.

पोलिसांना २० ते ७० डॉलर्स पगार मिळतो. संधी मिळाली की ते लांच मागतात. चेक पॉईंट हा त्यांचे लांच मागण्याचे मुख्य स्थळ. लांच दिली नाही तर

आपल्या ट्रक्सला पुढे जाणे ते अशक्य करून सोडतात. अफू, हशीश व गांजा तुमच्याजवळ असेल तर पोलीस खुश. पोलीस धमकी देतात, आम्ही नाही तर तालिबानच्या माणसांना सांगू! पोलीसांची संख्या खूप वाटते, पण ती फक्त कागदावरच असते. नावे खोटी असतात. नसलेल्या पोलिसांचा पगार ते वाटून घेतात. अंगठा छाप पोलिसांना सह्या करता येत नाही. अंगठ्याची निशाणी खरी कां खोटी ते आपल्याला समजत नाही, त्याचा तज्ञ शहरातून येईस्तोवर वाळवंटात एकट्याने राह्यचे म्हणजे धोका. कारझाई सरकार अमेरिकेस मूर्ख बनविते, लाख लाख डॉलर्स नसलेल्या पोलिसांचे वा मजुरांचे पगाराचे बिल दाखवून लुटतात, पण तिकडे काणाडोळा करावा लागतो. कारण सारेच भ्रष्ट आहेत. कोण कोणाला पकडणार?

विजेचे कनेक्शन पाहिजे असेल तर लांच द्यावी लागते, पोलीस कोणालाही कसल्याही खोट्यानाट्या आरोपाखाली तुरुंगात टाकतात, त्याला बाहेर काढायचे असेल तर लांच द्यावी लागते. ड्रायव्हिंग लायसेन्स म्हणजे लांच. घर कायद्याने तुमचेच आहे ते सांगण्यासाठी न्यायाधीश २० ते ३० हजार डॉलर्स लांच मागतो. केसचा निकाल व्हायला ४-५ वर्षे लागतात. त्याच्याउलट, तालिबानच्या कोर्टात त्यान् त्याच दिवशी निकाल. लोक तिकडे जाणे पसंत करतात. पेंटॅगॉनलाही ठाऊक आहे की त्यांचा अर्धा पैसा लांच देण्यात जातो. ती गोष्ट आता त्यांनी स्वीकारली आहे. ४०० अमेरिकन छावण्यांना कपडा, रोटी व पेट्रोल पुरवायचे म्हणजे ट्रक्स कंपन्यांना कंत्राट द्यावे लागते. हे साधारणतः २.१६ अब्ज डॉलर्सचे कंत्राट असते. ते पुन्हा सब-कंत्राटदारांकडे जाते. याशिवाय त्यांना सुरक्षितपणे पोचवायचे कंत्राट. त्यासाठी एके-४७ घेतलेल्या बंदूकधाऱ्यांना कंत्राट द्यावे लागते. ते नाही दिले तर तुमचा जथ्था अचूक तालिबानचे लोक पकडतातच. हा त्यांच्या मोबाईल फोन्सचा फायदा! पोलीस दर ट्रकला १,५०० डॉलर्स आकार लावतात. त्यापेक्षा १०० ट्रक्सला 'सेफ पॅसेज'साठी काय घेणार, हा तालिबानशी सौदा केला तर स्वस्त पडतो. पैसे आधी ठेवावे लागतात, पण मग बघावे लागत नाही. त्यांचे बंदूकधारी सारे व्यवस्थित मॅनेज करतात. त्यांची पख्तुन माणसे कराचीत, क्वेट्यात, कंदाहारात - सर्वत्र असतात, ते सारी पुढची व्यवस्थादेखील चोख पार पाडतात. त्यांचा आकार जो कांही असेल तो द्या. हे सारे करावेच लागते. कारण माल सुरक्षितपणे पोचणे महत्त्वाचे असते. कसा?, हे महत्त्वाचे नसते.

इस्लामला मादक द्रव्ये मंजूर नाहीत. पण ती आपल्यासाठी नाहीत, पाश्चिमात्यांसाठी आहेत, मग तो व्यापार चालेल, अशी तालिबानी रणनीती आहे. ओबामा बिन लादेनने मुल्ला ओमरवर फार दाब आणला व २००१ साली हा व्यापार

४,६०० टनांवरून ४०० टनांवर आला. सरकारला याचे वार्षिक करांचे उत्पन्न २५ ते ५० दशलक्ष डॉलर्स मिळते. तालिबानचे बजेट त्याच्या १०० पटीने मोठे आहे. अफूची लागवड लावायच्याऐवजी कापूस वा तंबाखू ही रोकड पिके घ्या, असा अमेरिकेच्या दाबामुळे कारझाईंनी प्रचार केला. तुमचे जे नुकसान होईल ते आम्ही भरू, असेही आश्वासन दिले. ही नुकसान भरपाई अधिकारी वाटून घेतात, ती शेतकऱ्यांपर्यंत कधी पोचतच नाही. हे शेतकऱ्यांना माहीत आहे, कारझाईंनाही माहीत आहे. कारझाईची माणसे अफूचे शेत तोडायला आली तर त्यांना लांच देऊन घरी परत पाठविता येते. यातून अमाप फायदा होतो. अफगाणिस्थानचे दर डोई वार्षिक उत्पन्न अफूमुळे १,७०० डॉलर्सवर पोचले. देशाचे १/३ जीडीपी उत्पन्न अफूमुळे होते. अफगाण शेतकऱ्यांनी अफू लावली नाही तर स्मगलर्सना पैसे मिळत नाहीत. स्मगलर्सना पैसे मिळाले नाहीत तर तालिबानला व पोलिसांना पैसे मिळत नाहीत. तालिबान व पोलिस अधिकारी यांचे अद्वैत आहे. शेतकरी तालिबानला कर देतात. सरकार जर अफूचे शेत तोडायला आले तर तालिबान शेतकऱ्यांना सांगतात, ''तुम्ही आम्हाला कर द्या व तुमची शेती करा. आम्ही तुमचे रक्षण करू.'' स्मगलर्स पोलिसाला १०० किलो अफू स्मगल करायला १० टक्के आकार लावतात. माल पाकिस्थान, इराण किंवा तडजिकिस्थानपर्यंत पोचवायची हमी पोलिसांची. अफगाणिस्थानमध्ये खूप प्रयोगशाळा आहेत. तेथे १२ किलो कच्ची अफू ३ किलो हिरॉईनमध्ये रूपांतरित होते. त्यामुळे माल न्यायला आणायला सोपा जातो. अफगाणिस्थानात १ किलो हिरॉईनची किंमत २,५०० डॉलर्स. ती तडजिकीस्थानला पोचली की तिची किंमत दुप्पट, म्हणजे ५,००० डॉलर्स. ती मॉस्कोला पोचली की किंमत दसपट, म्हणजे ५०,००० डॉलर्स. मॉस्कोऐवजी ती ग्रीसला व्हाया पाकिस्थान पोचली तर ३०,००० डॉलर्स. पंजाबला पोचली तर २०,००० डॉलर्स. पुढे मुंबईत पोचली तर २५,००० डॉलर्स. सुरक्षित पोचण्यासाठी कॅलाशिनीकॉव्ह बंदूक लागते. तिची गोळी चिलखत भेदून जाते. दुशांबे ही तडजिकीस्थानची राजधानी. तेथे ती ७०० डॉलर्सला मिळते. ती आपल्याकडे येता येता २,००० डॉलर्सची होते. २००६ साली तालिबानांचा पराभव झाला होता. त्यांना कंदाहार जिंकता आले नव्हते. तेव्हापासून तालिबान शिकले. आता ते फक्त कॅलाशिनीकॉव्हच वापरतात.

भारतवासी अफगाण

२००९ पर्यंत भारतात बेकायदेशीर १३,००० अफगाणी पठाण राहतात.

त्यात बरेच हिंदू पठाणही आहेत. काही नामवंत पठाण :

१. **बॉलिवुडमधील अफगाण** : (१) दिलीप खान (युसूफ खान), (२) शाहरूख खान, (३) कादर खान, (४) सलमान खान, (५) फिरोझ खान, (६) संजय खान, (७) अकबर खान, (८) झईद खान, (९) फरदीन खान, (१०) झरीना खान, (११) आसद अहंमद खान व (१२) कबीर खान.

२. **अफगाण क्रिकेटर** : (१) सलीम दुरानी, (२) इरफान पठाण, (३) युसूफ पठाण.

३. **अफगाण राजकारणी** : (१) सलमान खुर्शीद, (२) झाकीर हुसेन.

■■■

बलुचिस्थान

बलुचिस्थानचे महत्त्व

काश्मीरचे जसे 'स्ट्रेटेजिक' महत्त्व इंग्रजांना कळले तसे भारताच्या गांधीजी-नेहरूंना बलुचिस्थानाचे महत्त्व समजले असते तर किती बरे झाले असते. त्यांची चूक नव्हती. दोघांनाही युद्धाचा कसलाच अनुभव नव्हता. त्यांना 'नेते' म्हणून पसंत करणाऱ्यांचा दोष होता. भूराजकीय *(जिओपॉलिटीकल)* महत्त्व समजणारे मोदी पंतप्रधान व्हायला २०१४ साल उजाडावे लागले. मोदींनी हेरले, बलुचिस्थानापाशी स्वतःचा सागरकिनारा आहे. त्याला सागर संधि (स्ट्रेटस् ऑफ होर्मुझ) शेजारी लाभला आहे. जवळच अफगाणिस्थान आणि इराण आहे. जमीन/लोकसंख्या प्रमाण एकदम अनुकूल आहे. तेथे पाकिस्थानच्या फक्त ७ टक्के लोकसंख्या आहे. त्यातली अर्धी पख्तुन आहे. तेथील विरळ लोकवस्ती म्हणजे बाहेरच्यांना खुले आमंत्रण आहे. सुरुवातीपासून भारत अतिशहाणा, म्हणून काश्मीरात ३७० कलम टाकून इतरांना - बिगर -काश्मीरींना - तेथे स्थायिक व्हायला त्याने परवानगी नाकारली. स्व + अर्थ न समजून घेणे म्हणजेच सेक्युलॅरिझम्, अशी त्या काळी बहुधा आमच्या नेत्यांची समजूत असावी. पाकिस्थानात असे अतिशहाणे रहात नाहीत. त्यांना बलुचींना नजीकच्या भविष्यांत अल्पसंख्यांक बनवायचे आहे. पाकिस्तान्यांनी हिंदू अल्पसंख्यांकांना तेथून कसे हाकलले हे जगजाहीर आहे. बलुचींना सारखी भीती वाटते, हिंदूंच्या वाट्याला आली तशी वागणूक तर त्यांच्यावर येणार नाही ना?

घोर फसवणूक

बलुचिस्थान म्हणजे पूर्वीचे कलातचे संस्थान. इतर भारतीय संस्थानांपेक्षा हे वेगळे होते. १८७६ च्या तहाप्रमाणे इंग्रजांनी त्याचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व मान्य केले होते. १९४७ साली इतरांना भारत किंवा पाकिस्थानात विलीन होण्याचा पर्याय दिला होता. कलात स्वतंत्र राहू शकत होते. १९४६ साली कॅबिनेट मिशनसमोर दुर्दैवाने कलातच्या खानाने आपल्या स्वतंत्र दर्जाची वकिली करण्यासाठी जीनांना आपले वकील नेमले. त्यानुसार १९४७ साली त्यांनी आपण स्वतंत्र राहणार, असे जाहीर केले. जीना आता वकील नव्हते, ते सत्ताधीश गव्हर्नर जनरल बनले होते. त्यांनी कलातवर सरळ सैन्य धाडले, खानास हारविले व कलात पाकिस्थानात विलीन केले. तेव्हापासून बलुच्यांच्या मनात असंतोष आणि अलगतावाद खदखदत आहे. "अरे, तुम्ही कुराणावर हात ठेवून शपथ घेतली होती, कलात स्वतंत्र राहील, त्याचे काय झाले?" असा प्रश्न बलुच बंडखोर अब्दुल करीम यांनी १९४८ साली व नौरोझ खान यांनी १९५८ साली पाकिस्थानच्या राजकर्त्यांना विचारला होता. त्यांना फळ कोणचे मिळाले? त्यांना व त्यांच्या साऱ्या कुटुंबियांना फाशीची सजा! बलुची त्याने दबले नाहीत किंवा हिरमुसले झाले नाहीत. १९४८, १९५८, १९६२, १९७३-७७ व २००५ सालापासून दर वर्षी नियमितपणे बंडाळी चालूच आहे. यात फरक असलाच तर स्थळ, मध्यमवर्गीयांची लोकशाहीची मागणी व बलुची सरदारांची बलुचिस्थानच्या स्वातंत्र्याची मागणी.

पाकी सरकार, विशेषतः लष्करी, या बंडाळीकडे एकाच दृष्टीकोणातून बघते- लष्करी दृष्टीकोण. पाशवी शक्तीचा वापर व माध्यमातून ब्लॅक आऊट. लष्करी कारवाई म्हणजे ठार मारणे व प्रेत कचऱ्यात फेकून देणे. संशयितांना 'उचलणे'. मग ते 'अदृश्य' होतात. काही दिवसांनी त्यांची प्रेते कोठे तरी सापडतात. हे बलुचिस्थानातील वास्तव वर्णन २००८ साली *ॲम्नेस्टी इंटरनॅशनलने* केले आहे. ग्वादार बंदराचा विकास हे त्या सरकारच्या उद्धट व असंवेदनशील मनोवृत्तीचे उत्तम उदाहरण आहे. त्याने तर सामान्य बलुची पाकिस्थान सरकारचा दुश्मन बनला आहे. *चीन-पाक एकॉनॉमिक कॉरीडॉर* (सीपीईसी) बलुचींसाठी मोठी डोकेदुखी होऊन बसली आहे. हा प्रकल्प पूर्ण झाला तर बलुची त्यांच्या मुलुखात अल्पसंख्यांक होतील; एवढे इतर लोक तेथे येतील व स्थायिक होतील. संबंध बलुचिस्थानाची लोकवस्ती ६०-७० लाख आहे. हा प्रकल्प पूर्ण झाला तर एकट्या ग्वादार बंदराची वस्ती ५० लाख होईल. जशी सिंध प्रांतात सिंधी हिंदू ही ओळखच नाहीशी झाली तशी आपली अवस्था होईल, अशी भीती बलुचींना वाटते. त्यामुळे बलुची लोक

सतत चीनी कामगार व इंजिनियर्स यांच्यावर हल्ले करून त्यांच्या बांधकामात अडथळे आणीत आहेत.

बलुचींना काय खुपते?

१) आर्थिक विषमता

बलुचिस्थानचा दर्जा "दुर्लक्षित विभाग" असा आहे. त्यामुळे सारे जग त्यास डावलते. पाकिस्थान सरकारास बलुचिस्थानातील खनिज संपत्तीत रस आहे, बलुची लोकांत नाही. म्हणून ते या भागाकडे दुर्लक्ष करते. येथे अर्भक व मातांच्या मरणाचा दर सर्वांत जास्त आहे, तसेच गरिबीचे प्रमाण आणि सुशिक्षितांची संख्या सर्वांत कमी आहे. 'डॉन' पत्राच्या अहवालाप्रमाणे येथील पाकी मंत्री व सरकारी अधिकारी यांच्याजवळ "गावेच्या गावे मावतील एवढ्या जमिनी आणि मोठमोठ्या एसयुव्ही गाड्या व किमान १०० ते १०५ कोटी डॉलर्सची प्रॉपर्टी आहे."

२) विकासाच्या समस्या

अ) गॅस करांचे उत्पादन : सिंध व पंजाब यांच्या मानाने बलुचिस्थान सरकारास गॅसची पर युनिट रॉयल्टी खूप कमी, म्हणजे १/५ च, मिळते. त्यामुळे बलुचिस्थान कर्जात सदैव बुडालेले राहते. भ्रष्टाचारामुळेदेखील रॉयल्टी कमी मिळते.

ब) भौगोलिक विषमता : इंग्रजी अंमलात उत्तरेच्या भागात त्यांनी रेल्वे व रस्ते यांची सोय केल्यामुळे तेथे बरा विकास झाला आहे. तेथे पश्तुनांची वस्ती आहे. त्यामुळे राष्ट्रवादाची भावना तेथे जास्त दिसते. पश्तुनांना देश, पक्ष व धर्म यांची निष्ठा आहे पण त्यांची पहिली निष्ठा त्यांच्या टोळीशी.

क) ग्वाडार : ग्वाडार प्रकल्प २००२ साली सुरू झाला. तो संपूर्णपणे सरकारी आहे. तेथे चिनी इंजिनियर्स व कामगार काम करतात, स्थानिक लोकांना संधी दिली जात नाही. या प्रकल्पामुळे बलुची लोकांना त्याचा कांहीच आर्थिक फायदा नाही. आयात केलेल्या कामगारांसाठी नवी इमारत तयार होत आहे. बलुचींच्या नशिबी ती सवलत नाही. ग्वाडारच्या आजूबाजूची जमीन प्रचंड नफा घेऊन विकून टाकली आहे. त्यातही स्थानिक बलुचींना काहीच फायदा झालेला नाही. त्या विभागात रागावलेल्या बलुचींनी गडबड करू नये म्हणून सर्वत्र सैनिक नेमले गेले आहेत. बलुची अडाणी आहेत, ते नुकसान करतील, ही सबब सांगून त्यांच्याऐवजी पंजाबी मजुरांना काम दिले गेले.

ड) शैक्षणिक समस्या : पाकिस्थानचे सरकार बलुचींना मुद्दामच शिक्षणापासून दूर ठेवते. माणूस सुशिक्षित झाला की लगेच तो त्याच्या हक्कांची

मागणी करावयास लागतो. नवीन प्रकल्पांसाठी अनुभवी व 'स्कील्ड' माणसांची गरज असते. सरकार येथे तशी माणसे मिळत नाहीत, म्हणून बाहेरून तशी माणसे आणी. त्याचा लगेच परिणाम म्हणून स्थानिक विरुद्ध उपरे हा विवाद सुरू झाला. ह्यावर मात करण्यासाठी पंजाबमध्ये शिकणाऱ्या बलुची विद्यार्थ्यांची संख्या वाढविली व त्यांना शिष्यवृत्या दिल्या. दोन्ही अपुऱ्या आहेत अशी बलुची जनतेची तक्रार आहे. जास्त पैसे पंजाब्यांवर खर्च होतात, हे उघड सत्य आहे. अडाणी माणसांवर लष्करास सहज अत्याचार करता येतात. अडाणी माणूस उठसूठ माध्यमांकडे धाव घेत नाही, मुकाट्याने अत्याचार सहन करतो.

मोदींचे धक्कातंत्र

भारत म्हणजे दोन्हीं हात जोडून नमस्कार करणारा, क्षमायाचना करणारा, काहीही केले तरी सहन करणारा. नेहरूंपासून मनमोहन सिंगांपर्यंत सर्वांनी आजवर हेच धोरण स्वीकारले. त्यांच्यामुळे भारतास "सॉफ्ट स्टेट" ही पदवी जगांत मिळाली. गिलगित-बाल्टिस्थान हा पूर्वी काश्मीरचा भाग होता. तेथील ब्रिटीश अधिकारी मेजर विलियम ब्राऊन यांनी (मौंटबॅटनच्या संमतीने) १९४७ च्या नोव्हेंबरमध्ये बंड करून हा भाग पाकिस्थानात नेला. हा भाग अजून अधिकृत रीत्या पाकिस्थानात सामील झालेला नाही. इंग्रजांना व अमेरिकनांना येथून चीन व अफगाणिस्थानावर लक्ष ठेवता येते. हे या भागाचे स्ट्रॅटेजिक महत्त्व आहे. ते नेहरूंना कसे समजणार? येथे शिया बहुसंख्य आहेत. याचा शाक्सगाम घाटीचा ५,००० चौ. कि. मी. चा उत्तर भाग पाकिस्थानाने चीनला देऊन टाकला. १९८० पासून येथे चीन-पाकिस्थानविरुद्ध बंडाळी सुरू आहे. तेथे स्वतंत्र बलवारीस्थानासाठी आंदोलन सुरू आहे. चीनची तेलाची पाईपलाईन येथून जाते. हा भाग भारतात गेला किंवा स्वतंत्र झाला तर त्या पाईपलाईनीला धोका आहे.

१५ ऑगस्ट २०१६ च्या स्वातंत्र्यदिनाच्या भाषणांत मोदींनी गिलगित-बाल्टिस्थान व बलुचिस्थानच्या लोकांचे आभार मानले. (पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंगांनी १६ जुलै २००९ रोजी इजिप्तमध्ये असताना पाक पंतप्रधान युसुफ रझा गिलानी यांच्याबरोबर एका संयुक्त निवेदनात बलुचिस्थानचा प्रथमच उल्लेख केला होता. त्याविरुद्ध भाजपाने टीका केली होती. २०१६ साली यावेळी मोदींवर सलमान खुर्शीद, कपिल सिब्बल व मनीष तिवारी यांनी मोदींवर जबरदस्त टीका केली होती.) पाकिस्थानचे मत : मोदींनी 'रेड लाईन" ओलांडली आहे व पाक दूत येत्या युनोच्या बैठकीत काश्मीरचा प्रश्न मांडणार आहेत.

नाक दाबले की तोंड उघडते ते कळायला २०१५ साल कां उगवावे लागले? कारण, नाक दाबायलासुद्धा हिंमत लागते. आजवर सारे नेते "मग हा प्रश्न आंतरराष्ट्रीय बनेल", या भीतीने पछाडले गेले होते. पं. नेहरूंनी मौंटबॅटनच्या सल्ल्यामुळे काश्मीर प्रश्न युनोत नेला, पण आजही ती समस्या सुटलेली नाही, उलट आतंकवाद्यांमुळे ती आणखी धोक्याची व चिघळलेली आहे. त्यामुळे दूधाने ज्यांचे तोंड पोळलेले आहे असे आपले भारतीय नेते व बाबू लोक आता ताकदेखील फुंकून फुंकून पीत होते व आहेत. भीती हिंमतीला खच्ची करते. त्याने कृती मरते.

ग्वाडार बंदराचा धोका


चीनची काशगर ते ग्वाडार बंदर या महामार्गावरील आर्थिक गुंतवणूक आहे ४५ बिलियन डॉलर्सची. या महामार्गामुळे पाकिस्थानाचे भले होणार आहे. नवीन स्मार्ट शहरे तयार होतील, त्याने विकास वाढेल व मुख्य म्हणजे एकमेकांत लढणाऱ्या टोळ्यांचे विकासासाठी आपोआप एकात्मीकरण होईल. अर्थ तात्पुरते कां होईना, भांडणाऱ्यांना जवळ आणतो व फायद्यांच्या गोष्टी शिकवितो. याकडे पाकिस्थानने आजवर कधी लक्षच दिले नव्हते. त्याची जरूर पडली नव्हती. आज पाकिस्थानचे लष्कर प्रमुख राहील शरीफ सारखे बायजिंगला जातात व त्यांना तक्रार करतात, "येथे सारे कांही सुरक्षित आहे, हा भारत त्याच्या रॉ संस्थेमार्फत बलुचींना चिथावणी देतो." चीन राहीलवर किती विश्वास ठेवतो, ते माहीत नाही. चीनचे बलुचिस्थानात हेर असणारच व ते चीनला माहिती पुरवणारच. या कॉरीडॉरला नेहेमीपेक्षा जास्त वेळ लागत आहे. श्रीलंकेचे कोलंबो बंदर त्यांनी फार कमी वेळेत अद्ययावत् केले. ग्वाडारला भलताच वेळ लागत आहे. बंडखोर बलुची चीनी इंजिनिअर्सना मारून टाकतात, सामान पळवितात. बलुचिस्थान लिबरेशन आर्मीचे फक्त ५०० सभासद आहेत. त्यांचा गनिमी कावा पाकी व चिनी लष्करास रडवितो!

ग्वाडार बंदर विकसित झाले की तेथील मासेमारी बंद होणार व कोळी लोक बेकार होणार. ग्वाडारमधले पाऊण लोक मासेमार आहेत. येथे परके चीनी लोक येऊन आमच्या देशास लुटतात, याची त्यांना चीड आहे. बलुचिस्थान हा एकदम मागासलेला प्रांत आहे. तो तसाच मागासलेला प्रांत रहावा अशी पाकिस्थानची दानत आहे. त्यासाठी पाकिस्थान तेथे 'फोडा आणि राज्य करा' ही नीती वापरीत आहे. त्यामुळे पाकिस्थानात रहावे व राहू नये असे तेथील लोकांचे दोन वेगळे भाग, म्हणजे.त्यांच्यात फूट पडली (नव्हे, पाडली गेली) आहे. कांही बलुचींना वाटते, चीनचे ग्वाडार बंदर पूर्ण झाले की बलुचिस्थानमध्ये स्वर्ग उतरेल. इतरांना

वाटते, ''वेड लागले की काय, तो कस्टम सारा, सारे करांचे उत्पन्न इस्लामाबादला जाईल. आपण अशिक्षितच राहू, येथे इतर पंजाबी व पश्तुन कामगारांना नोकऱ्या मिळतील, खोट्या भ्रमात राहू नका.''

अशा फूट पडलेल्या देशात राज्य करणे किती सोपे आहे! चीन पाकिस्थानला शिकवितो, ''लोक बंडाळी कशी करतात? त्यांना गोळ्या घाला.'' त्यांचे ऐकून मुशरफच्या सैन्याने तेथे मोठ्या संख्येने लोक ठार केले. त्याचे व्हीडीओज् उपलब्ध आहेत. पण त्यामुळे लोक अधिकच पिसाळले. आता स्ट्रॅटेजी थोडी बदललेली आहे. लोकसंख्येचे प्रमाण बदलण्यावर भर आहे. इतरांना ''सेटल'' करून बलुचांची लोकसंख्या तुलनेने कमी करायचा नवा डाव आहे. एकदा कां ते अल्पसंख्यांक झाले की त्यांना कोण विचारतो? ते बलुचींना चांगले माहीत झाले आहे. म्हणून ते जास्तच खवळले आहेत. त्यासाठी चीन्यांनी ग्वाडारमध्ये विमानतळ व युनिव्हर्सिटी बांधण्याचे ठरविले आहे. त्यामुळे लोकांना स्कील समजेल, ज्ञान वाढेल व ते चीनशी राजनिष्ठ राहतील. आता जास्त वेळ आपल्याजवळ नाही हे ओळखून मोदींनी लाल किल्ल्यावरून ती सुप्रसिद्ध घोषणा केली. पाकिस्थानचे नुकसान तो आपला फायदा. चीन जेवढा समृद्ध होईल तेवढा तो भारताला जास्त धोका देऊ शकेल. ही एकच वेळ आहे संधी साधायची. तीही हातातून निघून गेली की बसा बोंबलत.

ग्वाडार बंदरात आज प्रत्येक चीनी कामगारापाठीमागे एक पाकी सैनिक उभा असतो. कामगारांसाठी हे मोकळे वातावरण म्हणता येणार नाही. मार्च



२०१५ मध्ये ५ पेट्रोलचे टँकर्स कराचीहून निघाले. ते बलुचिस्थानातील एका चीनी तांब्याच्या कारखान्यासाठी होते. बलुचिस्थान लिबरेशन आर्मीच्या लोकांनी त्या पाची टँकर्सना आग लावली. पेट्रोल जळायला किती वेळ लागतो? त्यानंतर राष्ट्रपती शीजिनपिंग ईस्लामाबादला आले होते. त्यांना ग्वाडार बंदराची प्रगती डोळ्याने पाह्यची होती. पण पाकिस्तान्यांनी त्यांना तेथे जाण्यापासून परावृत्त केले. २००४ साली तीन चीनी इंजिनियर्सची हत्या बाँबस्फोटाने झाली होती. ती हत्या भारताने घडवून आणली होती, असे पाकिस्थान मानतो व काश्मीरात पैसे देऊन आपल्या सैन्यावर दगडफेक करवितो.

चीन-पाक आर्थिक व्हरांडा हा एप्रिल २०१५ मध्ये सुरू झालेला शीजिनपिंगचा आवडता प्रकल्प. यात २,४०० कि.मी.चे रस्त्यांचे जाळे, रेल्वे व पेट्रोलच्या पाईपलाईनचा समावेश होतो. त्यामुळे मोठाल्या नळातून ग्वाडार बंदरातून सरळ काशगरपर्यंत तेल नेता येईल व चीनचा तयार माल त्या बंदरातून पश्चिम आशियात निर्यात करता येईल. चीनने काराकोरम महामार्ग बाढवीत आझाद काश्मीरातून नेला आहे. काशगर ते ग्वाडार बंदराच्या महामार्गामुळे पाकिस्थानला ४५ बिलियन डॉलर्सचा इन्फ्रा-स्ट्रक्चरच्या रूपाने फुकट फायदा होणार आहे. हा महामार्ग आमच्या गिलगित-बाल्टिस्थान विभागातून जातो, म्हणून भारताचा त्यास विरोध आहे. दुर्बलाच्या विरोधाला जगात कोण किंमत देतो? मोदींच्या भाषणामुळे आजवर गिलगित-बाल्टिस्थानाकडे कोणाचे लक्ष गेले नव्हते. भविष्यात कसलीही चर्चामसलत करीत असताना आता या भागाच्या प्रतिनिधीला बोलवावे लागेल. हे बंडवाले चीन वा पाकिस्थानच्या बाजूनेच बोलतील असा काय भरवसा? दोघांसाठी मोदींनी ही नवी डोकेदुखी निर्माण करून ठेवली आहे. एकदा कां ग्वाडार बंदर पूर्ण झाले तर चीनचा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा अश्वमेधाचा घोडा कोणी अडवू शकणार नाही. त्याचा युरोपियन व्यापारावर परिणाम होईल. त्यावरून दोघांचे भांडण होईल. त्यामुळे ही 'शेवटची संधी' आहे, असे समजूनच मोदींनी पावले पटापट उचलली पाहिजेत.

मोदींचे उत्तर, छाबार बंदर

गेल्या दोन वर्षांत मोदींनी एकंदर ५० वेळा प्रवास केला व ४२ देशांची भेट घेतली. त्यात यूएस, युके, रशिया, फ्रान्स, चीन व जर्मनी या मोठ्या देशांचा समावेश होता. जुन्या ''लुक ईस्ट'' नीतीस त्यांनी ''अॅक्ट ईस्ट'' हे नवे नाव दिले आणि त्यातून नवे डिप्लोमॅटिक कट रचले. त्यांचा यात मुख्य आग्रह होता : *पर*

वैभवं नेतुमेतत् स्वराष्ट्रम् । समर्था भवत्वाशिषा ते भृशम् ।। त्यातून भारताच्या रणनैतिक *(स्ट्रॅटेजिक)* व बाजारी *(कमर्शिअल)* गरजा भागविता आल्या, नव्या धंदाकीय संध्या *(बिझिनेस ऑपॉर्च्युनिटीज्)* साधता आल्या आणि आक्रमक चीनविरोधी शक्तींशी, उदा. व्हिएटनाम, दोस्ती कमावता आली. अमेरिकेने पूर्वी मोदींना व्हिसा नाकारला होता, ते सारे विसरून जाऊन बराक ओबामाने मोदींना ''एक भागीदार *(पार्टनर)* आणि आपला मित्र *(फ्रेंड)*'' म्हणावे यात मोदींची चलाखी दिसून येते. याउलट, चीनने भारतास न्यूक्लिअर सप्लायर्स ग्रुपमध्ये प्रवेश नाकारला, याचा अर्थ कडु कार्ले तेलात वा तूपात तळले तरी कडूच राहते, त्याप्रमाणे हे दोन आशियन जायंटस् भविष्यांत एकत्र येतील वा सहकार्य करतील अशी आशा करणे व्यर्थ आहे.

बलुचिस्थानातील चीनच्या मदतीने बांधल्या जाणाऱ्या ग्वाडार बंदरास भारताच्या मदतीने बांधल्या जाणाऱ्या इराणच्या छाबाहार बंदराची स्पर्धा चांगली चुरशीची ठरणार आहे. मोदींनी २०१६ च्या मे महिन्यात ५० कोटी डॉलर्स खर्च करून हे लहानसे बंदर अत्याधुनिक करून द्यायचे वचन दिले आहे. याशिवाय युरीआ खत व ॲल्युमिनियम यांचे दोन कारखाने तेथे भारत बांधून देणार आहे. त्याशिवाय बंदरास इराणच्या रेल्वेशी जोडणारी रेल्वे नेटवर्क भारत बांधेल. काशगर ते ग्वाडार हा चीनचा पाकिस्थानातून जाणारा 'वन बेल्ट, वन रोड' प्रकल्प आणि आपला हा आता मोदींचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प. २००५ ते २००९ या काळात एकंदर ३४.० कोटीच्या या प्रकल्पात १३.४ कोटी डॉलर्स खर्च केले आहेत. ७० टक्के बंदराचे काम पूर्ण झाले आहे. ९० टक्के इराणची वस्ती पश्चिम भागात राहते. त्या भागातील बंदर आब्बास खोल नाही, त्यामुळे आज अडीच लाख टनी बोटींना युनायटेड अरब एमिरेट्सकडे वळवावे लागते. म्हणून करांचे उत्पन्न युएईला मिळते, इराणला नाही. ही त्रुटी छाबाहार बंदर भरून काढेल. त्यामुळे इराणचा पूर्व भागदेखील विकसित होईल. मोदी हे सारे निःस्वार्थीपणाने करीत आहेत काय? कोणी कोणाला फायदा असल्याशिवाय मदत करीत नाही. छाबाहार ते झाहेदान रेल्वे मंत्रालय बांधून देणार आहे. त्यासाठी आपल्या पोलादांच्या कंपन्यांना ४० कोटी डॉलर्सची ऑर्डर मिळेल. ही रेल्वे बांधण्याचा खर्च १.६ अब्ज डॉलर्स येईल. त्यासाठी अनेक भारतीय कंपन्यांना छोट्यामोठ्या ऑर्डरींचा लाभ मिळेल. तेथे आपण रस्ते बांधणार आहोत. म्हणजे, गडकऱ्यांना १ लाख कोटी रुपयांच्या ऑर्डरी भारतीय कंपन्यांना देता येतील. या कंपन्यांना इराण मोफत गॅसची ऊर्जा पुरवील. मोदी जगभर हिंडतात, लोकांना भेटतात, तेथील नेत्यांशी बोलणी करतात, त्याचे रहस्य कळले

ना? मोदी बनिया आहेत. त्यांना जिकडेतिकडे फायदा दिसतो.

पाकची तक्रार : मोदी नेहरू नाहीत !

शिवाजी महाराज चारित्र्यवान होते व हाती लागलेली शत्रू पक्षातील लावण्यवती स्त्री असो वा कुराणाची प्रत असो, ती सापडली की सन्मानपूर्वक परत करीत असत, असे औरंगजेबाच्या खाफीखानचे सर्टिफिकेट जगास जास्त मोलाचे वाटते. मोदी नेहरू नाहीत ही पाकिस्थानची हळहळ जेव्हा पाकिस्थानची आयएसआय ही हेर संस्था ऑगस्ट २०१५ च्या पुढील अधिकृत स्टेटमेंटमध्ये करते तेंव्हा त्याला जास्त महत्त्व येते. पाकिस्थानचे सारे आरोप खरेच असतील असे नाही, त्यात अतिशयोक्ती वा असत्य घुसडून देण्याचा भाग जास्त. रॉ संबंधित आंतरराष्ट्रीय पेपरातील पुढील निवडक मुद्दे वाचले की सुजाण रसिक वाचक नक्कीच मान डोलावतील:

१. रॉ : पाकिस्थानात अस्थिरता माजविण्यासाठी परकीय भूमीवर पैसे, प्रशिक्षण, स्फोटके व शस्त्रे पुरवून इतर हेर संस्थांना - विशेषत:, अफगाण नॅशनल डायरेक्टोरेट ऑफ सिक्युरीटीज् (एनडीएस) - मदत करते. मुंबईप्रमाणे कराची ही पाकिस्थानची आर्थिक राजधानी. ती अस्थिर करण्यासाठी मुत्तहिदा कौम मुव्हमेंटला (एमक्यूएम) रॉ मदत करते. अफगाणिस्थानातील भारतीय राजदूतवास (एंबसी) व उपराजदूतवास (कॉन्सुलेटस्) यांच्यामार्फत पैशांचा व्यवहार होतो. हा पैसा बलुचिस्थान सब नॅशनॅलिस्टस् व तेहरिक-इ-तालीबान पाकिस्थान या क्रांतिकारक संस्थांना पुरविला जातो. त्यांना बनावट आंतरराष्ट्रीय प्रवासाची साधने (व्हिसा वगैरे) पुरविली जातात. रॉ च्या एजंटांची गर्दी पाक-अफगाण सरहद्दीवरील कॉन्सुलेटस्च्या कार्यालयात झालेली दिसते. ते पाकिस्थानच्या अंतर्गत व्यवहारात वाजवीपेक्षा जास्त लक्ष घालताना दिसतात.

२. हे सारे युनोच्या नियमांविरुद्ध चालते. ७ जून २०१५ रोजी ढाका विश्वविद्यालयात नरेंद्र मोदी म्हणाले, "१९७० चे दिवस आठवा आणि पुढच्या पिढीस आम्ही काय भोगले आहे ते सांगा. आज येथे हजर असलेल्या प्रत्येक मुक्ती योद्ध्यास मी नमन करतो. त्यांच्या खांद्यास खांदा लावून आमच्या भारतीय सैनिकांनी आपले रक्त सांडले आहे. हे रक्त बंगाली स्वातंत्र्य सैनिकांचे का भारतीय जवानाचे, असा त्यावेळी फरक केला नव्हता."

३. अजित डोव्हल या नॅशनल सिक्युरिटी एजंसी च्या सल्लागारांनी त्यांची डीफेंसिव्ह-ऑफेंसिव्ह रणनीती समजावून सांगताना ते म्हणाले, "आपल्याला

पाकिस्थानावर हल्ला चढविणाऱ्या बंडखोरांना मदत करावी लागेल. त्यासाठी पाकिस्थानची नर्मस्थाने कोणची त्याचा अभ्यास करावा लागेल. तो आर्थिक असेल, राजकीय असेल... अफगाणिस्थानातील पाक धोरणाचा आपल्याला पराभव करावा लागेल... त्यांची नर्मस्थाने भारताच्या नर्मस्थानांपेक्षा कितीतरी पटीने जास्त आहेत... पाकिस्तान्यांनो, तुम्ही आणखी एक मुंबई करून दाखवा आणि बलुचिस्थान तुमच्या हातून गेलेले तुम्ही पहाल.''

४. अमेरिकन सिनेटर चक हॅगेल यांनी कॅमेरॉन युनिव्हर्सिटीत २०११ साली भाषण केले : ''पाकिस्थानाविरुद्धच्या लढाईतील अफगाणिस्थान ही भारताची दुसरी आघाडी आहे. आजवर भारताने पाकिस्थानातील समस्यांची गुंतागुंत वाढविण्यासाठी नेहमीच मदत केली आहे.'' याला भूतपूर्व संरक्षण मंत्री मनोहर परीकरांनी पुस्ती जोडली आहे, ''आतंकवाद आतंकवाद्यांची मदत घेऊनच सोडवावा लागेल. ते तसेच होईल. आमच्या सैनिकांना कां म्हणून रोजचा त्रास?'' हे परिकरांचे आऊटसोर्सिंग कसे वाटते? याविरुद्ध मुंबईच्या आतंकी हल्ल्याचा मास्टर माईंड हाफीज सैद व जमात-ऊद-दावाच्या अहमद नदीमने जोरात बोंब ठोकली आहे. *(दै. दिव्य भास्कर, २४ जानेवारी २०१७, पृ. १४)*

५. आतंकवादाविरुद्ध लढणे हे भारताचे अघोषित धोरण राहिले आहे. त्यासाठी भारताने 'पोटा' व 'अफस्पा' हे कायदे चालू ठेवले आहेत. भारत ही मोठी आर्थिक महाशक्ती आहे. भारत जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे. ख्रिस्तीन फेअर म्हणते, ''भारत बलुचिस्थानात पैसा ओतत आहे व भारताचे बॉर्डर रोडस् ऑर्गनायझेशन अफगाणिस्थानात सक्रिय आहे, असे मला खाजगीरीत्या समजले आहे.'' हे खरे असेल तर काट्याने काटा काढावा हे जुने चाणक्याचे तत्त्व भारत प्रत्यक्षात उतरविण्याचा प्रयत्न करीत आहे.

६. रॉ बलुचिस्थानात अस्थिरता माजवीत आहे, हे निश्चित. बलुचिस्थान लिबरेशन आर्मी, बलुच रिपब्लिकन आर्मी व बलुचिस्थान लिबरेशन फ्रंट यांना भारत मदत करीत असून अफगाणिस्थानातील आपल्या कँपाद्वारा त्यांना लष्करी शिक्षण देत आहे. पाकिस्थानने पकडलेल्या कांही बलुच क्रांतिकारकांनी हे कबूल केले आहे.

७. अफगाणिस्थान व बलुचिस्थानातील बलुची जमिनदार आणि बंडखोर यांना रॉ पैसे व शस्त्रे पुरविते. हे बलुच बंडखोर पाकिस्थानात आतंकवाद माजवितात. त्यांची व्हिसा व पासपोर्टची सोय होत असल्याने ते अफगाणिस्थान, युएई व पाश्चिमात्य - स्वित्झर्लंड, युके, वगैरे - देशात पळून जातात. रॉ अनेक पाकिस्थानी

आतंकवाद्यांना भारतात शस्त्रे व लष्करी प्रशिक्षण देते. बलुचिस्थानात पंजाबी व पश्तुन नवागतांचा खून करणे, गॅस पाईपलाईन उडविणे, रेल्वे ट्रॅक्स व इतर महत्त्वाची ठिकाणे उडविणे यांचे हे प्रशिक्षण असते.

८. सर्व महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय स्थानी, उदा. युनो ह्यूमन राइटस् कौन्सिल, बलुची लोकांना नेऊन त्यांना एनजीओ व विचारवंतांच्या संघटनामध्ये जाऊन पाकिस्थानची बदनामी करण्याचे काम करायला लावतात. त्यांचा प्रवासाचा, राहण्याचा जेवणाखाण्याचा सर्व खर्च रॉ करते. त्यांचा प्रचारसाधनांचा खर्च अर्थातच रॉ करते. हे प्रशिक्षित बलुची मोठ्या प्रमाणावर प्रचार व डीसइन्फर्मेशनचे (कंड्या पसरविणे) कार्य करतात.

९. रॉ व अफगाण नॅशनल डायरेक्टोरेट ऑफ सिक्युरीटी (एनडीएस) दोघे मिळून तेकरीक-इ-तालीबान पाकिस्थान (टीटीपी) च्या अफगाण सभासदांना पाकिस्थानविरुद्ध भडकावते. त्यांची प्रशिक्षण केंद्रे व भेदनीती केंद्रे यांचे फंडींग व शस्त्रास्त्रांची मदत रॉ च करते. ईटालिअन पत्रकार ऑस्ट्रो डी. अग्नेली यांनी लिहिले आहे की ताजिकीस्थानात फार्खोर व अयनी विमानतळावरील इंडियन सिक्रेट सर्व्हीस केंद्रात उझबेगिस्थान व ताडकिगीस्थान येथील बेकार तरुणांना पाकिस्थानात काम करण्यासाठी रीक्रूट केले जाते. त्यांना मोठ्ठा पगार दिला जातो. रॉचे एजंटस् आतंकवाद व पाकिस्थान यांचा द्वेष त्यांना शिकवितात. इस्लामचाच वापर करून त्यांना पाकी काफरांविरुद्ध लढण्यासाठी उद्युक्त केले जाते. ते त्यामुळे *जन्नत* ला (स्वर्ग) जातील असे आश्वासन दिले जाते. असे २००० ते २५०० टीटीपी योद्धे नानगऱ्हार व नूरीस्थान या अफगाण प्रांतात सज्ज आहेत.

१०. कराची व पाकिस्थानच्या आर्थिक राजधानीत अस्थिरता निर्माण करण्यासाठी मुत्तहिद्दा कौमी मुव्हमेंट (एमक्यूएम) ला रॉ प्रशिक्षण व फंडींग पुरविते. हे विशिष्ट कौशल्याचे काम तिसऱ्या देशांत - सिंगापूर व थायलँड येथे चालते. या एमक्यूएमच्या प्रशिक्षित तरुणांना पाकिस्थानात सोडण्यात येते. त्यांनी आजवर पाकिस्थानात हजारो निष्पाप माणसे मारली आहेत व तेथे घबराट वा भयाचे वातावरण निर्माण केले आहे.

डॉ. हेन जी. किसलिंग या म्युनिकच्या लुडविग मॅक्सिमिलियन विश्वविद्यालयाच्या इतिहासाच्या प्राध्यापकांनी आयएसआयवर एक अप्रतिम ग्रंथ लिहिला आहे. क्वेटा येथे ४ व इस्लामाबाद येथे ९ वर्षे ते काम करीत होते. त्यांच्या या कार्यासाठी त्यांना फेडरल जर्मन सरकारने ऑर्डर ऑफ मेरीट दिले आहे. वरील अधिकृत माहिती त्यांना आयएसआयने पुरविली आहे, ती जशीच्या तशी मी येथे

उद्धृत केली आहे. ती कदाचित् अतिशयोक्तीपूर्ण वा खोटी असू शकेल. ती कदाचित् खरीदेखील असेल. ती खरी असेल तर मोदी काय चीज आहे ते वाचकांना समजून येईल. खोटी असेल तरी आनंद आहे, अजूनही आपण महाभारतातील धर्मराजाचा राजधर्म पृथ्वीराजाप्रमाणे पाळत आहोत. पण असे असण्याचा संभव कमी आहे कारण ही माहिती अधिकृत आहे. २०११ ते ऑगस्ट २०१५ या काळात या अहवालाप्रमाणे बलुचिस्थानात ४६१८ आतंकवादी घटना घडल्या व त्यात २४०७ नागरी व लष्करी माणसे मरण पावली. एमपीज् म्हणजे मिसिंग पीपल, खासदार नव्हे. २००९ पर्यंत त्यांची संख्या २३९० झाली होती. या एमपीजमध्ये खालील प्रकारच्या माणसांचा समावेश होतो :

१. काम करताना मरण आलेले आत्मघाती बॉंबर्स व इतर अनोळखी मंडळी.

२. सॅबोटाज (भेदनीती) चे बळी.

३. आपले घर सोडून इतरत्र, म्हणजे देशाच्या दुसऱ्या भागात निघून गेलेले लोक.

४. रॉ प्रशिक्षण केंद्रे चालविते त्यांना फेरारी कॅंप्स् म्हणतात. पुष्कळ वेळा आपली मुले अशा कॅंप्समध्ये गेली आहेत याचा पालकांना पत्ताच नसतो. ते मरतात तेव्हा त्यांना कळविले जाते.

५. जेव्हा गुन्हे बाहेर येतात तेव्हा घरच्यांना भीती वाटते व ते चूप्प बसतात. असे निर्ढावलेले गुन्हेगार एमपीज् होतात.

६. बऱ्याच बाबतीत तुरुंगातील कैदी पळून जातात व सापडत नाहीत. ते एमपीज् होतात.

७. ९० टक्के एमपीज्चा आतंकवाद्यांशी संबंध असतो. त्यांना आपण पकडले जाऊ अशी भीती वाटते. ते इतर देशात पळून जातात व अभय मिळवितात. त्यांचे घरवाले त्यांना एमपीज् जाहीर करतात. (असे गोधऱ्याच्या रामसेवकांना भाजून मारणाऱ्या गुन्हेगारांच्या बाबतीत नेमके घडले आहे.)

भारताच्या कुंडलीत बलुचिस्थान हा नवा ग्रह पाकिस्थानास भविष्यात खूपच पीडादायी ठरणार अशी चिन्हे आज दिसू लागली आहेत. मोदी मनातल्या मनात म्हणत असतील : मुद्दई लाख बुरा चाहे । होता है वही होता है जो खुदा ए मंजुरे होता है ।।

■ ■ ■

पाकिस्थान

इतिहास खरा कां खोटा?

परमेश्वराने मला अनेक नेत्यांशी बातचीत करण्याची सुसंधी दिली. मला सर्वांत एक गोष्ट समान आढळली, प्रत्येकास दुसऱ्याला आपल्या जुन्या आठवणी वा घटना सांगाव्याशा वाटतात. कधी त्या घटना यशाच्या असत, कधी पराभवाच्या, कधी अपमानाच्या, कधी नैराश्याच्या, तर कधी सूड भावनेच्या. विजयाच्या जास्त. हे असे कां घडते? याचा मला नेहमीच प्रश्न पडत आला होता व आहे. आपल्या अनुभवांद्वारा जगाने शिकावे व बोध घ्यावा असा त्यांचा आग्रह असतो. जगद्गुरु होण्यामागे या नेत्यांची कोणची महत्त्वाकांक्षा काम करते ते अजून मला समजलेले नाही. ते दोन डोळ्यातून बघतात, एक भूगोलाचा व दुसरा कालरेषेचा. त्या प्रक्रियेत सतत त्यांची मानसिकता डोकावीत असते. आणि त्यांचा आत्मविश्वासदेखील. ''माझी भविष्यवाणी खरी ठरली तर मी प्रेषित ठरेन, ती खोटी ठरली तर जग मला वेडा म्हणेल,'' ही सावरकरांची वाणी त्याचे सुंदर उदाहरण आहे. आणि गांधीजींचे, ''माझे जीवन म्हणजे एक धडा आहे.''

म्हणून गिबनसारखे इतिहासकार व्यक्तीपेक्षा जास्त महान मानव्याचा विचार करतात. गिबन म्हणाला होता, ''फ्रेडरीक द ग्रेटला त्याचा सचिव त्याचा इतिहास वाचून दाखवी तेंव्हा तो राजा गंमतीने म्हणत असे, ''माझ्या त्या थापाड्याला बोलाव.'' मानवतेचे गुन्हे, मूर्खपणा व दुर्दैवी घटना यांची बखर म्हणजे इतिहास, असे गिबनचे मत होते. याउलट, गटे हा महाकवी म्हणे, ''इतिहास मानवासाठी

उत्साहाचा झरा म्हणून काम करतो.'' वाजपेयी सांगायचे, ''गाडीत रेअर व्ह्यू मिरर असतो ना, तसा इतिहासच्या गाडीतला आरसा आहे. त्यात पाहिले की अपघात टळतात. अर्थात् त्यात तुम्ही पाहिले पाहिजे. हिंदूंना - क्या करे, वो देखनेकी आदत नही है।'' इंदिरा गांधींचे इतिहासाचे ज्ञान स्वानुभावावर आधारलेले होते, पुस्तकी नव्हते. त्या म्हणायच्या, ''कांही जण इतिहास निर्माण करतात. ते असामान्य लोक. कांही तो वाचतात. ते सामान्य लोक. आणि कांही तो लिहितात. ते विशेष लोक. त्यांच्यामुळे असामान्यांचे असामान्यत्व अमर होते. म्हणून त्यांना मानसन्मान द्यावा लागतो.'' त्या सांगत, ''जगात इतर गोष्टी बदलतात तसा इतिहासदेखील बदलतो. घटनास्थळ तेच, घटना तीच, पण काळ बदलल्यामुळे इतिहासास त्याच घटनेचा वेगळा अर्थ लावावा लागतो.'' मी विचारी, ''चांगला वारस मिळाला की इतिहास जास्त गौरवशाली बनतो कां? तुम्ही सत्तेवर नसतात तर नेहरूंचा इतिहास खूप निराळा लिहिला गेला असता.'' त्यांचे उत्तर : ''खरे आहे. माझ्या धाकामुळे इतिहासकारांना नेहरूंविषयी लिहिताना संयम दाखवावा लागे.'' इंग्रज सारखे आरोप करतात, भारतात एकछत्री साम्राज्य नव्हते, अनेक राज्ये होती. अशोक, अकबर व विजयनगर हे अपवाद. यावर त्या उसळून म्हणायच्या, ''राजकीय एकता राखणे हे सोपे काम नाही. तुम्हाला तोडायला तुमचे शत्रू सदैव तयार असतात, मग ते देशातील असोत कां देशाबाहेरचे. आणि इंग्लंड तरी कोठे एकछत्री राज्य होते? नॉर्मनांनी १०६६ साली स्वारी केली त्यावेळेस तेथे अनेक राज्ये होती. १५ व्या शतकात 'गुलाबांचे युद्ध' झाले. त्यानंतर एकत्रीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. १३ व्या शतकांत वेल्स जिंकले. सोळाव्यात आयर्लंड व स्कॉटलंड १७ व्या शतकांत. १८ व्या शतकांत आयर्लंड पूर्णपणे सामील झाले. तरी त्यांच्या रोज मारामाऱ्या चालूच होत्या. आणि हे इंग्रज आम्हाला एकछत्रीपणाच्या गोष्टी शिकवितात! औरंगझेब आठवा. खालून शिवाजी व वरून शीख व राजपूत यांचे सतत प्रहार चालूच होते. तो संपला व मोगल साम्राज्य संपुष्टात आले.''

मोदींचे आवडते वाक्य आहे, ''जन्मायत्तं कुले जन्म । मदायत्तं तु पौरुषम् ।।'' ते वाक्य महारथी कर्णाने म्हटले होते. केवढा आत्मविश्वास. पण श्रीकृष्णाने व त्याच्या आईने त्यास त्याचे जन्मरहस्य सांगून त्याचा आत्मविश्वास खच्ची केला. राजकारण म्हटले की भेदनीती आलीच. पण चाणक्याच्या भारतीय वंशजांना त्यांचा ५ वेळा पराभव करूनही पाकिस्थानचा दांडगा आत्मविश्वास अजून तोडता येत नाही.

पाकिस्थानचा रक्तरंजित इतिहास

पाकिस्थानचा सर्वात लोकप्रिय कवी फैझ अहंमद फैझ यांची एक कविता पाकिस्थानाविषयी थोडक्यात पण खूपसे कांही सांगून जाते :

यह डाग डाग उजाला, यह शब-गझिदा सहर
वो इंतजार था जिसका, ये वो सहर तो नहिं ।

(हा डागाळलेला प्रकाश, आणि ती रात्रीने चावून चोथा केलेली पहाट, अरेरे, आम्ही ज्या पहाटेची वाट पाहिली होती ती ही पहाट नोहे.)

हबीब जालीब हा पाकिस्थानचा दुसरा कवी. त्याचाही कडु अनुभव ऐकण्यासारखा आहे. तो म्हणतो :

मोहोब्बत गोलीयोंसे बो रहे हो ।
वतन का चेहरा खूनसे धो रहे हो ।
गुम्मान तुमको के रास्ता कट रहा है ।
यकीन मुझको कर मंझिल खो रहे हो ।।

(तुम्ही हिंसेतून प्रेमाचे बीजारोपण करू पहाता. आणि राष्ट्राचा चेहरा रक्ताने माखता. तुम्हाला वाटते, आपण आपला प्रवास पुरा केला. माझी खात्री झाली आहे की तुम्ही भाग्यापासून दूर दूर जात आहात.)

७ ऑगस्ट १९४७ ची सकाळ. जीना दिल्लीहून क्वेट्टयास जाण्यासाठी व्हाईसरॉयच्या सिल्वर डाकोटा विमानात चढत होते व डोळे भरून दिल्लीचे दर्शन घेत होते. ते स्वतःशी म्हणाले, "पुन्हा मला दिल्लीला यायला मिळेल कां नाही, अल्ला जाने. हे माझे कदाचित् शेवटचे दिल्ली दर्शन असेल." त्यांचे विमान सुरू झाले. चार तासांच्या फ्लाईटमध्ये ते फक्त एकदाच बोलले. त्यांनी त्यांच्या एडीसीला विचारले, "ही वर्तमानपत्रे पाह्यची आहेत कां?" ते कराचीच्या विमानतळावर उतरले तेंव्हा हजारो लोकांनी त्यांचे स्वागत केले. तेथून ते त्यांच्या सरकारी बंगल्यावर गेले.

बरोबर एका वर्षाने, म्हणजे ११ सप्टेंबर १९४८ रोजी ७० पौंड वजन असलेले व क्षयाने कृश झालेले जीना असेच क्वेट्टयाहून गव्हर्नर जनरलच्या वायकिंग विमानातून परत कराचीला जात होते. त्यांना क्षयाची बाधा तर होतीच, पण कॅंसरचीही नव्याने बाधा झाली होती. भारतात त्याचे निदान झाले नव्हते. आणि या खेपेस ते स्ट्रेचरवर पहुडलेले होते, त्यांना चालण्याचे त्राण उरलेले नव्हते. ते मौरीपूर लष्करी विमानतळावर आले खरे, पण त्यांचे स्वागत करायला कोणीच

हजर नव्हते. डिप्लोमॅटिक कोअरने कळवायचे राहून गेले होते. अँब्युलन्स गाडी मात्र हजर होती. ती त्यांना घरी नेणार होती. पण ती रस्त्यात बिघडली. दुसरी अँब्युलन्स येईस्तोवर दोन तास गेले. तोवर त्यांना सडकेवर बाजूला स्ट्रेचरवरच आकाशाच्या छताखाली ठेवण्यात आले. रस्त्यावर गर्दी फारशी नव्हती. पण गव्हर्नर जनरलच्या नशिबात रस्त्याच्या कडेला असे दोन तास पडून रहाणे-- या कर्माला काय म्हणावे? जसे करावे तसे भरावे. जीनांना अल्ला *कर्माचा सिद्धांत* शिकवू पहात होता कां? कदाचित् हो. कारण, जीनांच्या मनावर तो ताण एवढा वाढला की त्याच रात्री जीना पैगंबरवासी झाले. जीनांची शोकांतिका अजून संपली नव्हती. अजून मरणोत्तर विधि करायचे बाकी होते. जन्माने ते 'बारावाले' इस्माईली शिया होते. त्यामुळे घरच्या घरी त्यांच्यावर शिया पद्धतीने मरणविधि पार पडले. मात्र, त्यांचा जाहीर दफनविधि सुन्नी रीतीरीवाजाप्रमाणे पार पडला. जीवनातही दुटप्पीपणा व मरणातही तोच दुटप्पीपणा. जसा नेता, तसा देश. पाकिस्थानचा अथपासून इतिपर्यंत दुटप्पीपणा चालू आहे. दुटप्पी माणसें स्वतः सुखी नसतात, ते दुसऱ्याला सुखी करू शकत नाहीत.

असुरक्षितता

कुठे गझनी, कुठे समरकंद, कुठे काबूल आणि कुठे दिल्ली! तेथून मूठभर घोडेस्वारांनी येऊन लाख सैन्याशी मुकाबला करायचा, युद्धात जिंकायचे व दिल्लीवर राज्य करायचे. त्यासाठी केवढी हिंमत पाहिजे, केवढी शस्त्रास्त्रे पाहिजेत व केवढी मानसिक तयारी पाहिजे. पण ती ते करू शकले, म्हणून ते ५०० वर्षे राज्य करू शकले. इंग्रज त्या बाबतीत त्यांच्या वरचढ होते, पण त्यांचे राज्य १५० वर्षांपेक्षा जास्त टिकू शकले नाही. इंग्रज मुसलमानांपेक्षा क्रौर्यात कमी पडले. ॲटलीऐवजी चर्चिल पंतप्रधान असता तर आणखी पाव शतक जास्त खेचून काढले असते. त्यापेक्षा जास्त नाही.

पाकिस्थानाची निर्मिती अटळ नव्हती. ६ जून १९४६ पर्यंत जीना पाकिस्थानची मागणी 'डीप फ्रीज'मध्ये ठेवण्यास तयार झाले होते व ब्रिटीश कॅबिनेट मिशनचे *फेडरल इंडिया* स्वीकारण्यास तयार झाले होते. दुबळे केंद्र व सामर्थ्यशील राज्ये स्वीकारण्यास काँग्रेसने चक्क नाही म्हटले व मामला विस्कटला. पाँडिचरीचे अरविंदबाबू त्यास तयार झाले होते व तशी त्यांनी तारही धाडली होती. १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध झाले. हिंदू नानासाहेब पेशव्यांनी मुसलमान बादशाहची ढाल पुढे केली. त्यामुळे गुरखे, शीख व हिंदू राजे आणि जमिनदार लढले नाहीत.

१८५७ ते १९४७ हा प्रवास एका पाठोपाठ केलेल्या चुका व घोडचुकांनी भरलेला आहे. त्या प्रदीर्घ पण कंटाळवाण्या प्रवासातली पुढील स्टेशने पहा : १९०६ सालचे वेगळे मतदारसंघ, त्याच वर्षी जन्म होऊन भरारी घेणारी मुस्लीम लीग, १९१६ सालचा लखनौ कराराचा कोरा चेक, १९२१ चा गांधीजींनी केलेला जीनांचा अपमान, १९२९ साली जीनांनी काँग्रेसला केलेला अखेरचा सलाम व चौदा मुद्यांची मागणी, १९३०-३४ साली कवी इकबाल व रहमत अलींना पडू लागलेली पाकिस्थानची स्वप्ने, १९३५ साली जीनांचे लंडन सोडून भारतात परतणे, १९३७ सालचा मुस्लीम बहुसंख्य राज्यात लीगचा दारुण पराभव व जीनांचा कृतनिश्चय, १९३९ सालचा युद्ध सुरू झाल्यानंतरचा सत्ता सोडण्याचा काँग्रेसचा मूर्खपणा, १९४० ची जीनांची पाकिस्थानची मागणी, सत्तेच्या स्पर्शाने पावन झालेली मुस्लीम लीग व तीचा १९४५-४६ च्या निवडणूकीतील पराक्रम, कॅबिनेट मिशनच्या मागण्यास पहिल्यांदा होकार व नंतर नकार, १९४६ चे 'डायरेक्ट ॲक्शन'चे जीनांचे पिस्तूल व १९४७ ची फाळणी. हे प्रत्येक स्टेशन गोध्रा स्टेशन होते - धाकदपटशा, धमक्या, बढाया, बलात्कार, मारामाऱ्या व खूनाखूनी. गोध्रा म्हटले की दंगे आलेच.

हे सारे कशासाठी? सत्तेसाठी. साऱ्या भारताला दार-उल्-इस्लाम बनविणे अशक्य आहे. निदान बहुसंख्य मुसलमानांच्या भागास तर दार-उल्-इस्लाम बनवा. ते काँग्रेस सहज देईल. इंग्रजांना भारतात राज्य करावयाचे होते. हिंदू मराठ्यांनी त्याआधी ७/८ भारतावर सत्ता गाजविली होती व मराठा साम्राज्य स्थापन केले होते. त्याआधी मुसलमान मोघलांचे साम्राज्य भारतावर होते. अशी ही तिरंगी लढत होती. दोघांना भूतकाळातून भविष्याकडे जायचे होते तर एकास वर्तमानातून भविष्यकाळ समृद्ध करावयाचा होता. त्यासाठी तिघांच्या तीन रणनीत्या होत्या. मराठ्यांना आपला धर्म, मंदिरे व तीर्थस्थाने सुरक्षित राखावयाची होती. मुसलमानांना जिहाद खेळून *दारुल हर्ब दारुल इस्लाम* मध्ये रूपांतर करावयाचे होते. लॉर्ड कॅनिंगने स्वातंत्र्ययुद्धाच्या मध्यान्हकाळी (२१ नोव्हेंबर १८५७) कंपनीच्या बोर्डाच्या प्रमुखास लिहिले होते, ''आपण मूठभर इंग्रज. ते १५ कोटी हिंदी. आपल्यास त्यांच्यावर राज्य करावयाचे असेल तर सावधपणे, मोजून मापून, त्यांना विभागून, करू या. इतक्या कौशल्याने की आपल्या सत्तेने त्यांचे डोळे दीपून गेले पाहिजेत, पण त्यांना आपल्याला काय साध्य करावयाचे आहे त्याची कल्पनासुद्धा न आली पाहिजे.'' शिवाजीला, नाना फडणवीसांना, टीपूला त्यांची पूर्ण कल्पना होती पण सामान्यांना हे तागडीवाले येथे फक्त व्यापारासाठीच आले आहेत असे वाटत होते.

मेकॉलेचे १८३५ मधील शैक्षणिक मिनिट्स्नी ते काम चोख पार पाडले : ...a class of persons Indian in blood and colour, but English in taste, in opinions, in morals and in intellect... हे ब्रेन वॉशिंगचे काम झाले. शरीराच्या खच्चीकरणाचे काम विन्स्टन चर्चिलने पार पाडले. त्याचे विचार एका : "Hindu-Muslim antagonism was a bulwark of British rule in India. Were it to be resolved, their concord would result in the united communities joining in showing us the door." याचा अर्थ गांधीजींची कल्पना चूकीची नव्हती, पण ती पुस्तकी होती. ती कल्पना वास्तवात उतरून देण्याएवढे इंग्रज बुद्धू नव्हते. त्यांच्या बाजूस तंत्रज्ञान व मानसशास्त्र होते. पाकिस्थान हे त्या दोघांमधून जन्मलेले लाडके अपत्य होते. गांधीजींजवळ दोन्ही नव्हते. म्हणून सावरकरांना अंदमानाची काळ्या पाण्याची सजा, तर गांधीजींना बिर्ला व आगाखान हाऊसमध्ये राहून नाटके करण्याची मुभा. गांधीजींना गोखल्यांनी म्हणून दक्षिण आफ्रिकेतून बोलावून घेतले होते. सावरकर गांधीजींच्या जागी नेता म्हणून असते तर पाकिस्थान नावाची चीज आज अस्तित्वातच नसती. इंदिरेने अर्धे पाकिस्थान लुळे केले. आणि आता मोदी त्या 'विनाशाय च दुष्कृतां'च्या मार्गावर चालत आहेत.

पाकिस्थान १९४७ साली वास्तव म्हणून जगासमोर आले. ते विकृत पण इंग्रजांचे लाडके बाळ होते. दुसऱ्या महायुद्धाने तथाकथित ग्रेट ब्रिटनचे आर्थिक कंबरडे मोडून टाकले होते. तरी इंग्रजांची पाकिस्थानावर मेहेरनजर चालूच होती. अमेरिकेने पुढे इंग्रजांची जागा घेतली. भारताचे नेहरू मौंटबॅटनमुळे प्रो-इंग्लंड व प्रो-रशिया होते. इंग्रजांना अमेरिकन्स् ऊथळ व कमी प्रतीचे वाटतात. नेहरू स्वतःला इंग्रज समजत. त्यांनाही अमेरिकेबद्दल मनातून अप्रीती होतीच. मालकाप्रमाणे बाबू लोक त्यांची मते बनवितात. अमेरिकेलाही नेहरू सतत सचोटीचा व नैतिकतेचा उपदेश देत, ते आवडत नसे. हंगेरीच्या बाबतीत तर नेहरूंनी चक्क रशियाची वकिली केली. त्यामुळे अमेरिकन बाबू लोकांत *(एस्टॅब्लिशमेंट)* भारताबद्दल आकस होता. त्यात पाकिस्थानचे चांगले फावले. भारताप्रमाणे पाकिस्थानला पापपुण्याचा विधिनिषेध नव्हता. राष्ट्रहित पहिले, मग बाकी फालतू गोष्टी. अमेरिकेने रशियाभोवती सीएटो व नाटो नावाची लष्करी कडी उभी केली, त्यात पाकिस्थान पहिला सभासद होता. अमेरिकेची कृपादृष्टी रहावी म्हणून पाकिस्थान सरकारला सिनेटर्सना विकत घ्यायला कसलीच लाज वाटत नसे. त्यामुळे अमेरिकेची बाजू सांभाळणारी एक प्रचंड लॉबीच अमेरिकेत हजर होती. याउलट निक्सन व डल्लेस इंदिरा गांधींना 'कुरुप हडळ' म्हणत असत. अमेरिकेने पाकिस्थानवर अतोनात पैसा खर्च केला.

अमेरिकेचे पाहून तिची मित्र राष्ट्रे - जपान, ब्रिटन, जर्मनी, कॅनडा, ऑस्ट्रेलिया व युनायटेड अरब एमिरेटस् - पाकिस्थानला मदत करीत. अमेरिका अब्जांत तर ही राष्ट्रे दशलक्षांत. त्यामुळे पाकिस्थान सदैव मजेत राहिला. भारताप्रमाणे त्यांच्या नेत्यांना कोठे जनतेचा विकास करावयाचा होता? ते ही लूट आपापसात वाटून घेत व मजा मारीत. कोणी विरोधी सूर काढला तर तो अदृश्य होई. लोकशाही असेल तेथे न्यायालयात दाद वगैरे मागतात. येथे तर लष्करी राजवट. त्यामुळे मरायला कोणी तयार होत नाही. अमेरिकेलाही ही व्यवस्था पचनी पडली होती. कोणी प्रश्न विचारणारे नव्हते. माध्यमेही पाळलेली होती. वरवर सारे कसे शांत शांत होते.

तीन 'अ'

पाकिस्थानचे सध्या वर्णन तीन 'ए' ने केले जाते. हे तीन 'ए' म्हणजे आर्मी, अल्ला व अमेरिका. पाकिस्थानचे संस्थापक जीना यांना हे वर्णन कधीच पसंत पडले नसते. त्यांना तेथे सदैव लोकशाहीच नांदायला पाहिजे होती. भारतीयांना हे राज्य मूळातून पसंत नव्हते. आर्थिकदृष्ट्या ते स्वतंत्रपणे जगूच शकणार नाही, अशी भारतीय नेत्यांची खात्री होती. अरविंदांचे लौकरच हिंदुस्थान-पाकिस्थान एक होतील असे भाकीत होते. पूर्व-पश्चिम जर्मनी एक झाले, दोन व्हिएटनाम एक झाले, तेव्हा भाबड्या भारतीयांना भास झाला, आता हे दोन भूभाग लौकरच एकत्र येणार. पण तसे कांही घडले नाही. भाबड्या भारतीयांना मग उमजले, सुपरपॉवर अमेरिकेस ते मंजूर नाही. भारत व पाकिस्थानास लढत ठेवल्याने आशियात अमेरिकेचा 'बॅलेन्स ऑफ पॉवर' टिकणार आहे. वसाहतवादी इंग्लंडला फाळणी झाल्यानंतर भारत साम्यवादी होऊन रशियन गटात जाईल अशी भीती वाटली, म्हणून त्यांनी पाकिस्थान निर्माण केले. कमसे कम तो भाग तरी आपला मित्रराष्ट्र राहील. इंग्रजांना मध्य आशियात तेलाचे राज व अर्थकारण करावयाचे होते. त्यासाठी त्यांना त्यावर लक्ष ठेवण्यासाठी या भागात तळ पाहिजे होते. भारताने ते नाकारले. पाकिस्थानने ते हांसत दिले. युद्धानंतर ब्रिटन कर्जबाजारी झाला होता. अमेरिकेने लाखो डॉलर्स खर्च करून ब्रिटनला व मार्शल योजनेद्वारा युरोपला तगविले. तो प्रकार सारा अजब होता, 'न भूतो, न भविष्यति' होता. इंग्रजांची जागा अमेरिकेने घ्यावी हे साहजिक होते. पहिले व दुसरे महायुद्ध फक्त आणि फक्त अमेरिकेच्या प्रचंड शस्त्र सहाय्यामुळे दोस्त राष्ट्रे जिंकली होती. पाकिस्थान ही ब्रिटनची 'लायेबिलिटी' अमेरिकेची 'जबाबदारी' ठरली व जुने मुस्लीम तुष्टीकरणाचे

राजकारण मागील पानापासून पुढील पानावर तसेन् तसेच चालू राहिले. गांधी-नेहरू घराण्याने इंग्रजांचे जुने धोरण पुढे चालविले. मुसलमान पूर्वी मस्तीत रहात. गेली ७० वर्षे पाकिस्थानही मस्तीत राहिला व मस्तीत वाढला. यात भारताचे हिंदू मात्र फुकट भरडले गेले. मोदी २०१४त सत्तेवर आल्यावर त्यांच्या आशा पुन्हा पालवल्या.

याचे आणखी एक कारण, म्हणजे चौथा 'अ', पाकिस्थानाशी नव्याने जोडला गेला होता. त्याचे नाव आतंकवाद. इतके दिवस इस्लाम फक्त भारतास छळत होता. आता तो संघटित होऊन जगास भेडसावू लागला होता. सौदी भूगर्भातील काळे सोने त्याची ताकद वाढवीत होते. हटिंग्टनने भाकीत केल्याप्रमाणे जगात खरोखरीच *'क्लॅश ऑफ सिव्हिलायझेशन'* सुरू झाले होते. सामान्य मुसलमान भयभीत झाला होता. तो म्हणून लागला : ''कयामत आ रही है । २०५० ला फक्त ३२ वर्षेच उरली आहेत.''

१. अल्ला

१४ व १५ ऑगस्ट १९४७ रोजी पाकिस्थान व भारत ही जुळी भावंडे जन्मास आली. वर्षाच्या आतच दोघा देशांचे राष्ट्रपिते देशास सोडून गेले - गांधीजी ३० जानेवारी १९४८ रोजी आणि जीना, ११ सप्टेंबर १९४८ रोजी. पण हे दोघे पुढारी नशिबवान. त्यांना स्वातंत्र्योत्तर समस्यांना तोंड देण्याची वेळ आलीच नाही. दोघांना ते कितपत जमले असते ते सांगणे अवघड आहे. गांधीजींच्या वारसांना अन्नधान्याचा अभाव व क्रौर्याचा कल्लोळ यांना तोंड द्यावे लागले. याउलट, इस्लामचे संस्थापक महंमद पैगंबर यांना सुरवातीला ज्या समस्यांना तोंड द्यावे लागले, त्या समस्या जीनांच्या वारसांना सतावू लागल्या. सुदैवाने, पूर्व पाकिस्थानात एकाच बंगाली भाषेचे व वंशाचे लोक रहात होते. त्याच्या विरुद्ध, पश्चिम पाकिस्थानात पंजाबी, सिंधी, पख्तुनी व बलुची, तसेच मोहाजीर असे गंगाजमनी मिश्रण होते. तेथील नेत्यांसमोर या भिन्न भिन्न भाषिक व वांशिक गटांना एका मोठ्या गटात - पाकिस्थानात - कसे सामावून घ्यायचे याची समस्या भेडसावीत होती. त्यांचा धर्म एक होता, पण ते एक नव्हते. भारतात ५०० च्या वर जास्त संस्थाने होती. ब्रिटीश इंडिया व संस्थाने यांच्यात विभिन्नता होती, पण सरदार पटेलांनी तो फरक दूर केला व भारतातील सारे लोक एका समान पातळीवर आणले. तसे पाकिस्थानात होऊ शकत नव्हते. आता हे जुळ्याचे दुखणे होऊन बसले होते. सतत तुलना होत होती. मध्य आशियात अरब, तुर्क व इराणी यांचा इस्लाम हा धर्म काढून टाकला

तरी ते अरब, तुर्क व इराणी म्हणून स्वतंत्रपणे राहू शकतात. पण या पाकिस्तान्यांचा इस्लाम, समजा, काढून टाकला तर त्यांनी काय करायचे? कोठे जायचे? ते कोण राहतील? दुसऱ्या प्रतीचे भारतीय. कारण, पाकिस्थान 'दोन धर्म, दोन राष्ट्रे' या सिद्धांतावर निर्माण झाले होते. पाकिस्थानाची ओळख इस्लाम ही होती. आता त्यांनी दुसरी ओळख कोणची सांगावी? पाकी नेते हुषार होते. त्यांनी मार्ग शोधून काढला. हिंदू व हिंदुस्थान यांचा द्वेष हीच त्यांची ओळख राहील, असे नक्की झाले. ती काळाची गरज होती. हिंदू आमचे ५०० वर्षे गुलाम होते ही आठवण किती सुखद होती! कुत्र्याच्या शेपटीने शरीर हालविण्याप्रमाणे! हिंदू हा काळा इतिहास बदलू शकणार नव्हते!

फाळणीनंतर पाकिस्थानात सारेच मुसलमान असल्यामुळे भाषा, संस्कृती व ऐतिहासिक बंधने यानुसार तेथे गट तयार होऊ लागले. तेव्हा समजले की जुन्या हिंदुस्थानात मुसलमान अल्पसंख्यांक होते. त्यावेळी इस्लाम हा साऱ्यांना घट्ट बांधणारा धागा होता, तो आता नाही. पंजाबी लोकांची दादागिरी वाढली. साहजिकच, इतर भाषिक विरुद्ध पंजाबी भाषिक असा वाद सुरू झाला. सारी पदे, साऱ्या नोकऱ्या, सारा व्यापार पंजाब्यांच्या हाती गेल्यावर इतरांना वैषम्य वाटणे साहजिकच होते. एका २,००० मधील १८ ते २७ वयोगटाच्या तरुणांच्या सर्व्हेने दाखविले की ७५% तरुणांनी आपण आधी मुसलमान व नंतर पाकिस्थानी आहोत, असे सांगितले. फक्त १४% तरुणांनी आम्ही आधी पाकिस्थानी नागरिक आहोत, असे सांगितले. ''हे असेच होणार'', असे पर्वेझ हुडभॉय म्हणाले, ''पाकिस्थानी शाळकरी मुले मदरसांत प्रथम काय शिकतात? पाकिस्थान का मतलब क्या? ला ईल्ला ईल्लिला।''

जीना तर जवळजवळ इस्लामविरोधी व सेक्युलर होते. त्यांनी भारतीय, खरे सांगायचे तर गांधीजींच्या हिंदू समाजाविरुद्ध इस्लामला 'शस्त्र' म्हणून वापरले. मग पाकी राजकारणात अल्ला केव्हा व कसा घुसला? राजकीय नेत्यांना अनुयायांचे पाठबळ असते. ते लोकांचे प्रतिनिधी म्हणून काम करतात. लष्करी हुकूमशहाला तसे पाठबळ शून्य. लोकप्रियतेचे प्रमाणही तेवढेच. म्हणून आयूबखानाने नवीन टूम काढली, ''उष्ण हवेत लोकशाही चालत नाही, ती युरोपसाठी ठीक आहे. इस्लामला लोकशाही मंजूर नाही.'' (*तारीक अली, द क्लॅश ऑफ फंडामेंटालिझम्स्, न्यूयॉर्क : व्हर्सो, २००२, पृ. १८३*) अल्ला तेथे शिरला तो अशा पाठीमागील दारातून. झियाने आयूबची री ओढली : ''आपल्याकडे लोकशाही आली ती पाश्चिमात्य देशातून. इस्लाममध्ये तीला जागा नाही.'' (*३० जून २००५ रोजी*

हुसेन हक्कानीने चालविलेल्या यु.एस. कमिशन ऑन रिलिजीयस फ्रीडम च्या अहवालातून) आता मुशर्रफांनी कां मागे रहावे? ते मूळचे दिल्लीचे. जास्त हुषार. त्यांचे मत : "अजून पाकिस्थानात लोकशाही नीटशी रुजलेली नाही, 'मॅच्युअर' झालेली नाही, ती तशी होण्यासाठी तसे वातावरण लागते. ते वातावरण आपल्याकडे नाही. म्हणून मला नाईलाजाने विधानसभा विसर्जित करणे भाग पडले." *(डेनिस कक्स, द युएस अँड पाकिस्थान १९४७-२०००, वुड्रो विल्सन इंटरनॅशनल सेंटर फॉर स्कॉलर्स प्रेस, २०००, पृ. २५७)*

इंदिरा गांधींनी बांगलादेश निर्माण करून साऱ्यांना एकत्र आणण्यासाठी 'धर्माचा उपयोग' नावाच्या संकल्पनेसच सुरुंग लावला. पाकिस्थान ज्या कारणासाठी निर्माण करण्यात आले ते कारण खोटे आहे, असे त्यांनी सिद्ध केले. 'इस्लाम खत्रे मे है' असे म्हटले की सारे मुसलमान एकत्र जमतात व धर्मयुद्ध लढतात हे खरे नाही, नाहीतर मुसलमानी देशांत कां बरे मारामाऱ्या झाल्या असत्या? धर्माचा एकत्र आणणारा धागा आता कोठेतरी कमी पडतो आहे, असे पाकिस्थानातल्या विचारवंतांना वाटू लागले. इस्लाम ही पाकिस्थानची ओळख सांगणे तेव्हापासून बंद झाले. त्याचा नाही म्हटले तरी भारतातील मुसलमानांवर परिणाम झाला. पाकिस्थान बंगाली मुसलमानांना वाचवू शकले नाहीत, तर ते आपल्या मदतीला धावून येतील ह्या त्यांच्या श्रद्धेला तडा गेला. हळूच पाकिस्थानी राजकर्त्यांनी पाकिस्थानाची तत्त्वप्रणाली इस्लाम याऐवजी *नझरिया इ पाकिस्थान* असे सांगण्याची सुरवात केली. धर्माएवजी त्यांनी देश ठेवला. दोन राष्ट्रांचा सिद्धांत व हिंदू भारताचा द्वेष ही जुनी पाकिस्थानची ओळख चालूच राहिली.

२. आर्मी

अ) जीनांची लोकशाही

जीनांचा पहिल्यापासून मुसलमानांची संरक्षण क्षमता वाढली पाहिजे असा आग्रह होता. १९३७ साली ऑक्टोबर महिन्यात लखनौ येथे मुस्लीम लीगच्या संमेलनात त्यांनी ही गोष्ट सांगितली. ते म्हणाले, "केवळ समान बळाच्या व्यक्ती वा पक्षांत समझौता होऊ शकतो. त्या दोघात एकमेकांबद्दल मान व भीती असेल तरच समझौता करण्यासाठी तेथे जागा असते. दुर्बल पक्षाने शांततेचे आवाहन केले तर तो त्या पक्षाच्या दुर्बलतेचा कबुलीजबाब समजला जातो. ते जणू सबळ पक्षासाठी आक्रमणाचे आमंत्रण ठरते. राजकारण म्हणजे सत्तेचे राजकारण असते, तेथे न्याय वा सरळ व्यवहार वा *गुडविल* यांना थारा नसतो." *(पीटर हार्डी, द*

मुस्लीम्स् ऑफ ब्रिटीश इंडिया, केंब्रिज युनि. प्रेस, १९७२, पृ. २२६) १९५० च्या मे महिन्यात पंतप्रधान लियाकत अली खान अमेरिकेस गेले त्यावेळी अमेरिकेने नेहरूंना जेवढा मान दिला तेवढाच मान अमेरिकेने पाकिस्थानच्या पंतप्रधानांना दिला. पुढे पाकिस्थानाने हा मान आपल्या हाताने घालविला. ते ओबामांच्या २०१५ च्या जानेवारीतील भारतभेटीच्या वेळी समजले. ९/११ नंतर जग बरेच बदलले. *'पॅरिटी'* व दक्षिण आशियातील *'बॅलेन्स ऑफ पॉवर'* या गोष्टी स्मरणातून गेल्या.

१४ ऑगस्ट १९४७ ची गोष्ट. असगर खान व ले. क. अकबर खान जीनांना भेटले. सर्व उच्च पदे अजून गोऱ्या इंग्रजांकडेच होती. त्याविरुद्ध दोघे जीनांना तक्रार करण्यासाठी आले होते. त्यांना मध्येच थांबवून जीना म्हणाले, "हे लक्षांत असू द्या की तुम्ही राज्याचे नोकर आहात. धोरण तुम्ही आंखत नाहीत. ते काम आम्ही - लोकांचे प्रतिनिधी - नक्की करतो की देशाला काय हिताचे आहे आणि काय नाही. तुमचे काम आम्ही जो निर्णय करू त्याचे काटेकोरपणे पालन करणे. बस्स, याहून जास्त नाही." *(महंमद असगर खान, वुई हॅव लर्ट नथिंग फ्रॉम हिस्टरी, ऑक्सफर्ड युनि. प्रेस, २००५, पृ. ३)* लष्करी प्रमुखांना असे खडे बोल सुनवायची ताकद हळूहळू राजकीय नेत्यांत राह्यली नाही. आयूब खानांनीच लिहून ठेवले आहे, "राजकारण्यांच्या कपाटातील सांगाडे जेव्हा आम्ही बाहेर काढतो, तेव्हा ते थरथरतात. बहुतांश नेते निवृत्तीच्या गोष्टी बोलू लागतात. त्यांना जाहीर चौकशीला तोंड देणे अवघड वाटते. त्यामुळे ही घाण समाजाच्या समोर येण्याआधीच संपते." *(फॉरीन अफेअर्स, जुलै १९६०, पृ. ५४७-५६)* कडक शिस्तीत वाढलेल्या लष्करी अधिकाऱ्यांना या राजकारण्यांची घृणा वाटे. त्यांना या राजकारण्यांना राजकारणात तडजोडी कराव्या कां लागतात, याचेच कोडे वाटे. पहिल्या दोन दशकांत कँटोनमेंट व नागरी विभाग यांचा फारसा संबंध आलाच नाही. भारताप्रमाणे सुरवातीला नागरी नेत्यांनी दादागिरी करून सैनिकांचा आवाज दाबून टाकला. विकासाच्या योजनात पैसे खाणे चालू राहिले. प्रश्न आला जेव्हा पाकी नेत्यांनी संरक्षण खर्चावर कपात आणली तेव्हा. त्यासाठी त्यांनी भारताशी व अफगाणिस्थानाशी संबंध सुधारले. भांडणच नाही तर संरक्षणावर खर्च कोठून होणार? लष्कराला ते धोरण परवडेना. जास्त दुष्मनी, जास्त द्वेष, जास्त लढाया, जास्त खर्च असे लष्कराचे साधे गणित होते. तसे केले तरच लष्करी अधिकाऱ्यांचे दुकान चालणार होते. दुर्दैवाने बऱ्याच भारतीय विद्वानांना हे साधे व सरळ गणित समजतच नाही. या दोघांच्या स्वार्थांच्या लढाईत लष्करी वरचढ ठरले व जन. आयूबखानांचा उदय

झाला. एकदा लष्करी वाघाला सत्तेच्या रक्ताची चटक लागली की तो वाघ कोणाला सोडतो काय?

ब) खरी शक्ती

कोणी काहीही म्हणो, शेवटी राजकारण म्हणजे घटना नाही, लोकसभा नाही, उच्च न्यायालय नाही, किंवा मतदारसंघही नाही. अंतिम निर्णय घ्यायला जी शक्ती भाग पाडेल ती दृश्य वा अदृश्य शक्ती म्हणजे राजकारण. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे आपला शेजारी पाकिस्थान. तेथे लष्करास मोठी मजा येऊन राहिली आहे. लष्कर हीच ती अदृश्य शक्ती. तीच सारे निर्णय घेते. तीच घटना बनविते व रद्द करते. तीच निवडून आलेल्या राजवटीला काढून टाकते व 'आता दुसरी लोकशाही आपण सत्तेवर आणू या', असा निर्णय घेते. पंतप्रधान कोणी व्हायचे ते तीच नक्की करते. आणि हे सारे घडते कारण हेच सुपरपॉवर अमेरिकेला मंजूर आहे. फक्त ते आमच्या कांही नादान नेत्यांना समजू शकत नाही. ते म्हणून 'छोटीशी आशा'ची गीते गातात व मेणबत्तीच्या प्रकाशात मोर्चा काढतात. कां? म्हणे, शांतता प्रस्थापित करण्यासाठी. इतरांना ठाऊक नसते, या नाटकांसाठी त्यांना पगार पुरविला जातो. आणि दिल्ली अशांना पद्म अवार्डस् देते! असे लोक कांहीही बरळतात. कोणी म्हणतो, 'मोदी सत्तेवर आले तर मी हा देश सोडून जाईन.' कोणी म्हणतो, 'माझ्या हाती बंदूक दिली तर मी मोदींना गोळी घालेन!' सर्वांना ह्या पोकळ धमक्या असतात, ते माहीत असते.

पंजाबी वर्चस्वामुळे तेथे सामाजिक व राजकीय क्षेत्रांत सारे लाऊड-लाऊड आढळते. समाजात कपडे व मेकअपचे प्रस्थ फार, साधी रहाणी व उच्च विचारसरणी हे त्यांना मान्य नाही. टीव्हीवर बेनझिर भुट्टोचे मेकअप एवढे भयंकर असे की भारतीय डोळ्यांना नकोसे वाटे! तुमच्या ग्लॅमरवरून तुमचा सामाजिक दर्जा ठरविला जातो. *(मीना मेनन, रिपोर्टिंग पाकिस्थान, पेंग्विन, पृ. ३८)* त्यांचे सणावाराचे दिवस म्हणजे नुसती बोंबाबोंब, आरडाओरड, फटाक्यांचे आवाज, रात्रभर चालणाऱ्या संगीत मैफिली. ईदच्या दिवशी सकाळपासून कुर्बानी होणाऱ्या बकऱ्यांचे आक्रोश. ते कमी पडतात म्हणून पीटीव्हीवर बकऱ्यांची व कधीकधी उंटांच्या कुर्बानीची जिवंत दृष्ये! सर्वत्र पार्ट्या आणि मैफिली! लग्न असेल तर या आवाजाला जणू उधाण येते! *(तत्रैव)*

पाकिस्थानात लष्कर श्रीकृष्णाची भूमिका करते. जेव्हा जेव्हा भारतात गोंधळ माजेल, तेव्हा मी अवतार घेईन, असे श्रीकृष्णाने अर्जुनास वचन दिले होते. श्रीकृष्णाने कधी शिवाजीचा अवतार घेतला तर कधी बंदा बैराग्याचा तर कधी

विनायक दामोदर सावरकरांचा. पाकिस्थानात आर्मीच्या रूपात श्रीकृष्ण अवतरला होता. प्रत्येक लष्करी हुकूमशाह *'ब्लडी सिव्हिलियन्स्'*चे संरक्षण करण्यासाठी उभा ठाकला होता. आयुब व याह्याने झुल्फिकार भुट्टोला आत आणला. झियाने मुहम्मद खान जुनेजोला आमंत्रण दिले. आणि मुशर्रफने ताज मुहम्मद जमाली व शौकत अझिज यांना. सर्वांची दोन समान उद्दिष्टे होती : पाकिस्थानच्या सुरक्षिततेला धोका होता, तो दूर करण्यासाठी पाऊल उचलणे आवश्यक होते. लष्करास सत्तेची जरादेखील लालसा नव्हती, लोकशाहीची गाडी रूळावरून घसरली होती, त्यास ती गाडी पुन्हा रूळावर आणण्याची ड्यूटी करावयाची होती. १९६९ साली याह्या खानही तेच म्हणाला होता : "The nation has to be pulled back to safety and normal conditions have to be restored without delay.... My sole aim in imposing Martial Law is to protect life, liberty and property of the people and to put the administration back on the rails." १९७७ साली चीफ ऑफ आर्मी स्टाफ, जनरल झिया ऊल हक म्हणाला होता : "When the political leaders failed to steer the country out of a crisis, it is inexcusable for the Armed Forces to sit as silent spectator. It is primarily for this reason that the Army perforce had to intervene, to save the country." आता ऑक्टोबर १९९९ मधील जनरल पर्वेझ मुशर्रफचे शब्द पहा : "This is not martial law, only another path to democracy. The armed forces have no intention of staying in charge any longer than is absolutely necessary to pave the way for true democracy to flourish in Pakistan."

राजकारण कसे खेळायचे ते मुसलमानांकडून शिकावे! ते मनात काय आहे त्याचा इतरांना थांगपत्ता लागू देत नाहीत! वाजपयी बस घेऊन १९९९ साली लाहोरला गेले आणि मूर्ख बनले. त्या बसची किंमत कारगील येथे ५२७ मृत्यू व १३६३ जखमी, एवढी ठरली. नवाझ शरीफ हा लष्कराच्या हातचे बाहुले आहे हे मोदींना कळायला किती तरी वेळ लागला. ते आपल्या राज्यारोहण समारंभात 'तुम्ही आलेच पाहिजे' असा हट्ट काय धरून बसले, अचानक मार्ग बदलून त्याच्या मुलीच्या लग्नाला २५ डिसेंबर २०१५ रोजी लाहोरला काय गेले -- सारा प्रकार बालिश होता. हेतू शुद्ध मैत्रीचा होता. लोकेष्णा कांचनमृगासारखी लोभस असते. कळते पण वळत नाही. झियाने मोरारजीभाईंना निशान-ए-पाकिस्थान पदवी देऊन भूलवले-च भुट्टोने सिमला कराराच्या वेळी इंदिरा गांधींना. पहिल्याने पाकी अणुबाँबचा कारखाना वाचविला, तर दुसऱ्याने काश्मीर. कळसुत्री बाहुले का

मालकाला धमकावू शकणार होते? भुट्टोस १९७१ साली लष्कराचा पराभव झाला तेंव्हा लष्करास *'कट् टू साईज'* करण्याची सुवर्ण संधी होती. पण तसे करण्याची त्याची हिंमत झाली नाही. आणि तो भारत द्वेषाने आंधळा झाला होता. त्याचे विधान प्रसिद्ध आहे त्यावेळचे : "If India builds the bomb, we will eat grass and leaves for a thousand years, even go hungry, but we will get one of our own." १९९९ मध्ये कारगिल युद्धात वाजपयींनी मुशर्रफचा पराभव केला होता. नवाझ शरीफला जनरलसाहेबांना डिसमिस करण्याची केवढी नामी संधी होती, पण नवाझसाहेब घाबरले. २ मे २०११ रोजी बराक ओबामांनी अबोटाबाद येथे राहणाऱ्या ओसामा बिन लादेनला खलास केला. त्यावेळी आयएसआयच्या प्रमुखास दूर करून नागरी शासनाचे श्रेष्ठत्व सिद्ध करण्याची संधी प्रेसिडेंट झरदारी व पंतप्रधान गिलाणींना मिळाली होती. त्यांनी ती संधी वापरली नाही.

चक्रव्यूहातून कसे निसटायचे हे पाकिस्थानास चांगले समजते. आमची वृत्तपत्रे वाचली वा टीव्हीवरील बातम्या पाहिल्या की आपल्या परराष्ट्र धोरणाचे कौतुक करावेसे वाटते. परराष्ट्रीय वृत्तपत्रे चाळली की कळते, पाकिस्थान हा आतंकवादाचा एकमेव निर्यात करणारा देश आहे असे जगास अजून वाटत नाही. पाकिस्थान आतंकवादाचा बळी आहे, असेच पाकिस्थान जगास 'बळी कार्ड' खेळून भासवितो. डिप्लोमसीमध्ये पाकिस्थान आपल्यापेक्षा जास्त पुढे आहे हे आपल्या विद्वानांनी आता ओळखण्याची वेळ आली आहे व तशी तयारी केली



पाहिजे. *(सैद आटा हसनैन, इंडियन एक्सप्रेस, ९ ऑक्टोबर २०१७, पृ. ८)*

संरक्षण तज्ञ व सीआयचे माजी अधिकारी आणि भारत व पाकिस्थानच्या संरक्षणावर पुस्तके लिहणारे अमेरिकन अधिकारी लेखक कोहेन म्हणतात ते किती खरे आहे : "Because it (army) believes it is Pakistan's guardian, and because it has the means to enforce this belief, the army will remain the most important institution in Pakistan for many years... Since the army thinks it has the only true professional ability to handle natinal security or the national interest, Pakistan is likely to be in for a long spell of direct and indirect military rule. Therefore, the beliefs of the officer corps will shape both Pakistan's domestic and foreign politics." (*Karen DeYoung, Washington Post, 23 October 2010*) गुल हसन या पाकिस्थानी संरक्षण तज्ञाचे मत याहून निराळे नाही. चीनच्या प्रेमात पडलेले पाकी तज्ञ आता 'ही सारी अमेरिकन खेळी आहे', असे म्हणतात. कदाचित् कांही वर्षांनी ते चीनला दोष देतील. पण लेकाच्यांनो, ते भले खेळवतात, पण तुम्ही कां खेळणे बनता? ती जादू आम्हास कां जमत नाही?

क) न्युक्लिअर पॉवर

१. तत्त्वज्ञान

आयएसआयच्या डायरेक्टर जनरल ले. ज. जावेद नासीर यांनी एका उच्च-स्तरीय बैठकीत सांगितले, ''हिंदूंना फक्त बळाची भाषा समजते, दुसरी कोणचीच भाषा त्यांना समजत नाही. अमेरिका आपल्याला धमक्या देईल पण प्रत्यक्ष कृती करण्याची वेळ आली तर ती कधीच करणार नाही. अशा वेळी आपण उगी ऊगी राह्यचे आणि वेळ विकत घ्यायचा.'' आयूबखानांनी बऱ्याच वर्षांपूर्वी नेमके हेच सांगितले होते. नवाझ शरीफचेही तेच म्हणणे आहे : ''आपली समस्या अमेरिकन माध्यमे व काँग्रेस आहे. ती समस्या जास्त चांगली लॉबी तेथे तयार करून आपण सोडवू शकतो.'' 'विकत घ्या, ऊसना घ्या किंवा चोरा', असे भुट्टोने पाकी शास्त्रज्ञांना फर्मावले. अणुबाँब 'झालाच पाहिजे', इतका भुट्टो पेटला होता. ज्युंजवळ आहे, ख्रिस्त्यांजवळ आहे, हिंदुंजवळ आहे, मग मुसलमानांजवळ तो कां नाही?, असा त्याचा मुस्लीम जगास रोकडा प्रश्न होता. पाकिस्थानसाठी अणुबाँब ही जादूची कांडी आहे. ती हाती आली तर पाकिस्थान व भारत तुल्यबळ होतात व मुस्लीम जगात *पहिले अणुबाँबवाले मुस्लीम राष्ट्र* अशी पाकिस्थानची ख्याती होते. भारताशी शस्त्रसज्जतेत पाकिस्थानची बरोबरी, ही कल्पनाच पाकिस्थानसाठी सुखद होती.

२. कालरेषा

१९४८ 'न्युक्लिअर कार्यक्रम चालू करा', असे मार्क ओलिफंटचे जीनांना पत्र.

१९५३ *युएस अॅटम्स फॉर पीस*ची भारत व पाकिस्थान यांना मदत. (गांधीजी नवपरिणीतांना आशीर्वाद देत, 'लग्न केले ओके, पण ब्रह्मचर्य पाळा.' जयप्रकाशांसारखे ते पाळीत. कांही त्याकडे दुर्लक्ष करीत. तसे भारत व पाकिस्थान या न्युक्लियर ब्रह्मचर्याच्या बाबतीत वागत.)

१९५५ सुऱ्हावर्दींनी न्युक्लिअर पॉवर प्लांटसाठी अमेरिकेकडून ३५०,००० डॉलर्सची ग्रांट मिळविली.

१९५६ पाकिस्थान *अॅटोमिक एनर्जी कमिशन* ची स्थापना. जुळ्या भावंडात स्पर्धा चालू.

१९६० या दशकांत अमेरिकेने पाकी न्युक्लिअर शास्त्रज्ञांना अमेरिकेत बोलावून प्रशिक्षण दिले.

१९६१ डेरा गाझी खान जिल्ह्यात युरेनियमच्या खाणी मिळाल्या.

१९६५ अबदुस सलाम हे पाकी शास्त्रज्ञ अणुतज्ञ बनले. त्यांनी नीलोर येथे रीअॅक्टरची स्थापना केली. एकट्या पाकिस्थानास तो परवडणार नाही असे वाटून भुट्टोंनी *'इस्लामिक बॉंब'*ची कल्पना 'विकायची' सुरवात केली. दुनिया झुकती है, झुकानेवाला बंदा हाजीर है। डॉलर्स जमू लागले.

१९६९ ब्रिटन पाकिस्थानला अणु इंधन पुरविण्यास राजी.

१९७१ १५०,००० चौ. किमी व लाखो बंगाली लोक हातातून घालविल्यावर पाकी नेत्यांचे डोळे खाडकन् उघडले. मुईर खानांनी ''देशाला भारतापासून धोका आहे, आपण अणुबॉंब तयार केलाच पाहिजे'', असे जाहीर वक्तव्य केले. ''आपल्याला परवडेल कां?'', अशी विचारणा झाली. ''या बॉंबच्या प्रकल्पास १५ कोटी डॉलर्स खर्च येईल,'' असे ते म्हणाले.

१९७४ त्याच्या मदतीने कॅनडाकडून कानुप्प-१ हा पहिला *कमर्शिअल न्युक्लिअर पॉवर प्लांट* विकत घेतला. अमेरिकेस कसला संशय आला ते माहीत नाही, पण पाकिस्थानातील अणु संशोधनावर बंदी आली.

१९७२ २४ जानेवारीस भुट्टो राजवटीने (१९७१-७७) ५० पाकी शास्त्रज्ञांना एकत्र केले, अबदुल कादीरला प्रमुख बनविले व बॉंबचे खरेखुरे प्रयत्न केले. त्यासाठी त्याने चीन व उत्तर कोरीयाची मदत घेतली. त्याने

तेलाचे राजे, लिबिया व सौदी अरेबियाकडून इस्लामी बाँब बनविण्यासाठी अब्जावधी डॉलर्स उकळले.

१९७४ १८ मे रोजी इंदिरा गांधींनी बाँबची चाचणी पोखरान येथे *(स्मायलिंग बुद्धा)* केली.

१९७८ इस्त्राएल काहुटावर बाँब टाकून अणु प्रकल्प नष्ट करावयास सज्ज, पण मोरारजीभाईंनी भुज येथे इस्त्राएलच्या विमानात इंधन भरण्याची परवानगी नाकारली. चांगला पाव्हण्याच्या हातून साप मरत होता, पण मोरारजी हिंदू नेते होते. त्यांना राजधर्माच्या ऐवजी यतीधर्म आठवला. त्यांना जन. झियाने *निशाण-ए-पाकिस्थान* ही पदवी दिली. काहुटा खलास केले असते तर 'भारतरत्न' मिळवले असते. पण... आमचेच नाणे खोटे!

१९८० ऑक्टोबरमध्ये जन. झिया व निक्सनची अमेरिकेत भेट. प्रेसि. निक्सन झियास अणुबाँब कार्यक्रम देण्यास तयार झाले.

१९८१ आगा शाहीने अमेरिकेत 'आमचा कार्यक्रम चालू आहे, पण सध्या आम्ही बाँबचे टेस्टिंग करणार नाही', असे जाहीर आश्वासन दिले.

१९८३ 'कोल्ड टेस्ट'मध्ये मुनीरभाई पास. आणखी बऱ्याच थंड चाचण्या केल्या.

१९८६ अमेरिकेची मार्चमध्ये ४ अब्ज डॉलर्सची संरक्षणासाठी मदत.

१९८९ चीनशी न्युक्लिअर करार. उत्तर कोरीयाचे आश्वासन.

१९९० आतंकवादाचा संशय. सर्व संरक्षणविषयक मदत स्थगित.

१९९८ ११-१३ मे या काळात भारताने ५ बाँब स्फोट पोखरान येथे केले. 'आम्हीही त्यात मागे नाही', हे दाखविण्यासाठी पाकी स्फोटाची २८-३० मे या काळात चाचणी. बेनझीर भुट्टो म्हणाली, ''आम्हास फक्त दोन आठवडे व तीन दिवस तयारी करावयास लागले.'' म्हणून दोघांवर अमेरिकन *एंबार्गो.* जगातल्या ९ न्युक्लिअर राष्ट्रांच्या क्लबमध्ये ही जुळी भावंडे दाखल. *ती एकत्र आली तर?* जगाला भारी पडतील. एक चीन पुरे. अशी जगाची विचारसरणी. म्हणून 'फोडा व राज्य करा' ही विचारसरणी जगाने भारतासाठी वापरली.

२००४ अमेरिकन सरकारला पाकिस्थानी अणुबाँबच्या सुरक्षिततेची चिंता. आंतकवाद्यांच्या हाती लागला तर?

२००९ शस्त्रनिर्मितीच्या कामासाठी स्थगिती.

२०१२ 'बाबर' नावाची ७०० किमी अणु टोक असलेली मिसाईल्स् तयार; अणुबॉंब नेण्यासाठी १८ अमेरिकन एफ-१६ लढाऊ विमाने मिळविली; पाकिस्थानची कबुली : ''आम्ही न्युक्लीअर सबमरीन बांधायला तयार आहोत.''

ड) अंतराळ (स्पेस) कार्यक्रम

जुळ्याच्या दुखण्यात स्पर्धा हा 'कॉंस्टंट फॅक्टर' असतो. भारतात हे झाले म्हणजे आपल्याकडे ते आलेच पाहिजे, हा पाकी 'राज' हट्ट होता. आणि अंकल सॅम तो पुरवायला समर्थ होता. १९६० च्या दशकांत तेथे अंतराळ कार्यक्रम सुरू झाला व नासाने १९६१ साली विमानतळ व लॉंचिंग पॅडही सोनमिआनी येथे बांधून दिले. १९६२ साली रेहबार-१ हे घन जळणावर आधारित पाकने पहिले रॉकेट सोडले. १९६२ ते १९७२ या काळांत २०० रॉकेटस् सोडण्यात आली. अर्थात् अमेरिकेच्या सहकार्याने. १९७२ सालापासून अमेरिकेचा उत्साह संपला. त्याचे एकमेव कारण आतंकवाद. वर्ल्ड ट्रेड सेंटरचे दोन कोसळलेले मनोरे.

३. अमेरिका

काळाच्या उदरात काय काय दडलेले असते ते सांगणे अशक्य. नृपनीतीची, म्हणजे राजकारणाची, म्हणूनच वारांगनेच्या नीतीशी तुलना केली आहे. *हिंदी चीनी भाई भाई* चा एके काळी महापूर आला होता. आणि त्या भाई चीनने भारतावर आक्रमण करून नेहरूंना त्यांची जागा दाखवून दिली. एके काळी अमेरिका चीनला युनोत शिरण्याची परवानगी नाकारीत होता. रशियास खलास करण्यासाठी त्याच अमेरिकेने चीनच्या गळ्यात गळे घालावयाची सुरवात केली व सारी अमेरिकन बाजारपेठ 'मेड इन चायना' वाल्या मालाने भरून टाकली. प्रेसि. ट्रंपने चीनशी सख्य वाढविण्याचा प्रयत्न करून बघितला, पण तेथे डाळ शिजत नाही असे पाहिल्यावर व मोदींना भेटल्यावर आता तायवानला शस्त्रसज्ज करण्याच्या गोष्टी ट्रंप करू लागला. पाकिस्थानवरील अमेरिकेचे प्रेम एके काळी उतू जात होते. त्याच अमेरिकेने इस्लामाबादवर ड्रोन सोडू अशी आज धमकी दिली आहे. या साऱ्याचा अर्थ काय समजायचा? एकच, व तो म्हणजे, जगात कोणी कायमचे मित्र अथवा शत्रू नसतात. कायम फक्त राष्ट्रीय हित असते. सारे स्थल-काल-परिस्थितीवर अवलंबून असते. हा सिद्धांत पाकिस्थानला जास्त चांगला समजतो, भारतास नाही. मला इंदिरा गांधी यांनी सांगितलेले शब्द छान आठवतात : ''पाकिस्थानचे मानस नीट समजवून घ्यायचे असेल तर एकच पुस्तक वाचा.

आयूबखानाचे *फ्रेंडस् बट नॉट मास्टर्स.'* त्यांनी ते खडे बोल अमेरिकेला सुनावले होते.'' मी ते वाचले व मला मुस्लीम मानस जास्त चांगले समजायला खूप मदत झाली. प्रत्येक वारांगना असेच म्हणत असेल : *''टेंपररी सेक्स ओके, पर्मनंट स्लेव्ह नेव्हर.''* पाकिस्थानचा सुरवातीचा काळ जीनांचा होता - जीनांना सावरकरांबद्दल खूप मान होता. त्यांना ते टिळकांचे वारस समजत. सुभाषबाबूंना त्यांनीच सावरकरांकडे धाडले होते. मराठी साहित्य सोडले तर इतर भाषेत हा संदर्भ कॉंग्रेसने दडपून टाकलेला दिसतो. सावरकरांच्या साहित्याचा व मध्य पूर्व आशियन राजकारणाचा जीनांनी चांगला अभ्यास केला होता. मुस्लीम देशातील राजकारणाचा त्यांचा अभ्यास चांगला होता. त्यांची मते पुढीलप्रमाणे : ''मध्य आशियातील तेलासाठी इंग्रजांना मुसलमानांवर माया करावीच लागेल, पाकिस्थान हा युरोप व आशियाचा मध्य बिंदू आहे, पाकिस्थानला इंग्लंड-अमेरिकेची गरज आहे त्यापेक्षा त्यांना पाकिस्थानची जास्त गरज आहे, रशियालादेखील तेलासाठी मध्य आशियाची गरज आहे, त्याला संधी मिळाली तर तो त्या भागात आपले साम्राज्य नक्की पसरवील व खाली उतरून व्हाया अफगाणिस्थान, हिंदुस्थानी उपखंडात त्राटकेल, सध्या त्याने लोखंडी पडदा स्वीकारला आहे, पण उद्या तो पडदा झुगारून देईल, साम्यवादाला उत्तर एकच : इस्लाम.'' ते त्यांच्या इंग्रज व अमेरिकन पत्रकार मित्रांना हे सारे सुनावीत. त्याच्या भाषणांच्या संग्रहात ही सारी माहिती सापडते. ते ग्रंथ आजही उपलब्ध आहेत. जीनांना त्यांच्या उंचीचे वारस लाभले नाहीत. सावरकरांचे तेच झाले.

त्यांच्या मलबार हिलवरील घरात जीनांनी १ मे १९४७ रोजी कांही अमेरिकन राजकीय तज्ञांना सांगितले होते, ''अमेरिकेला पाकिस्थानशी मैत्री करावीच लागेल. कारण, पाकिस्थान मुसलमान राष्ट्रांचे नेतृत्व करेल व त्यांना रशियन आक्रमणापासून वांचवेल. अल्लास न मानणाऱ्या साम्यवादास थोपवून धरण्याची ताकद फक्त आमच्यापाशी असेल. आणि एक मोठी भीती आहे. ती म्हणजे सावरकरांच्या हिंदू साम्राज्यवादाची. ते नक्कीच 'झेपावे उत्तरेकडे' असे म्हणून कूच करतील. या दोन साम्राज्यवादांपासून त्यांना फक्त अमेरिका वाचवू शकेल.'' हे सत्य पुढे जॉर्ज आर. मेराल ह्या यु.एस. *चार्ज द अफेअर्स*ने जॉर्ज सी. मार्शल या सेक्रेटरी ऑफ स्टेटला सांगितले. त्याने ते प्रेसिडेंटला सांगितले असावे. *(एम.एस. वेंकटरमण, पाकिस्थानातील अमेरिकेची भूमिका, १९४७-५८, रेडिअंट पब्लिशर्स, नवी दिल्ली, १९८२, पृ. १)* त्या काळात अहिंसावादी गांधीजी जिवंत होते, सावरकरांचा आक्रमक प्रभाव भारतीय मनावर अजून ताजा होता. म्हणून ब्रिटीश सिक्रेट एजंटांनी गांधीजींना

उडविले असेल व हिंदु साम्राज्यवादाची भीती कमी करण्याचा प्रयत्न केला असेल. आजवर ही गोष्ट 'आतल्या वर्तुळात' माहीत होती. पण सावरकर या शब्दाची एवढी जबरदस्त भीती होती की हे सारे दडपले गेले, एवढेच नाही, तर त्यांच्यावर बालंट आणून त्यांना बदनाम करून त्यांना त्यांच्या भक्तांपासून व संघाच्या स्वयंसेवकांपासून अलग करण्यात आले. तो राजधर्माचा एक पैलू आहे व स्वतंत्र पुस्तकाचा विषय आहे. म्हणून तूर्तास त्यास बाजूला ठेवतो. याची परिणती १९४७ च्या ऑक्टोबरमध्ये यु.एस. स्टेट डिपार्टमेंटला लायक अल्लींनी एक *मेमोरंडम* पेश केले व २ अब्ज डॉलर्सची मागणी केली. त्यात १७ कोटी डॉलर्स लष्करासाठी, ७.५ कोटी डॉलर्स हवाई दलासाठी व ६.० कोटी नाविक दलासाठी होते. उरलेली रक्कम देशातील विकासासाठी होती. जीनांमुळे भारताने सावरकरविरोधी पावले उचलली व अमेरिकेने सोव्हिएटविरोधी. सावरकरांचा हिंदू साम्राज्यवाद काल्पनिक होता आणि रशियनांचे आशियावरील साम्यवादी आक्रमण तेवढेच काल्पनिक होते. बाप रे, काल्पनिक भयामुळे जगात एवढी उलथापालथ होऊ शकते! दुसऱ्या महायुद्धामुळे कंटाळलेल्या जगास नेहरूंनी 'काल्पनिक' तिसऱ्या युद्धाच्या भयाचा बागुलबुवा दाखवून आपले *नॉनअलाइनमेंटचे* घोडे पुढे दामटलेच ना?

प्रत्येक इंग्रज अमेरिकनास उथळ, अज्ञानी व मूर्ख समजतो. तो म्हणतो, ''रेड इंडियनला हाकलले व त्याच्या जागी रेड टेप आणले, त्याचे नाव अमेरिकन इतिहास.'' इंग्लंडमध्ये शिकलेल्या भारतीयांचे तेच मत असणे स्वाभाविक होते. त्या कलुषित मानसिकतेतून भारत-अमेरिकेचे संबंध पहिल्यापासून बिघडले. त्याचा फायदा पाकिस्थानला मिळाला. हे खरे असले तरी नेहरूंना आख्खी अमेरिकन घटना जशीच्या तशी भारतासाठी पाहिजे होती. त्यांना भारताचे कार्यकारी राष्ट्रपती (एक्झिक्यूटिव्ह प्रेसिडेंट) व्हायचे होते, पण ते सर्वशक्तिमान हुकूमशहा होतील म्हणून सरदार पटेल व डॉ. आंबेडकर यांनी विरोध केला व मुख्यतः इंग्रजी वेस्ट मिन्स्टर व इतर देशातील काही मुद्दे पसंत करून एक गंगाजमनी घटना निर्माण केली. इंग्रजांची नक्कल करणाऱ्या भारतीयांना आजही अमेरिकन घटनेच्या पुढील पाच मुद्यांना सख्त विरोध आहे : (१) अमेरिकेच्या फेडरल व्यवस्थेत राज्यांना जास्त सत्ता दिलेली आहे; (२) राष्ट्रपतीच्या हाती फारच सत्ता सोपविली आहे; (३) शस्त्रे बाळगण्याचा प्रत्येकास कायद्याने अधिकार; (४) सामान्य, हाय व सुप्रीम कोर्टातील सर्व न्यायाधीशांच्या नेमणूका सत्ताधारी पक्षाच्या हाती असते. (इंदिरा गांधींनी एन रॉय यांची नेमणूक करून तशी सुरवात केली होती.) (५) सत्ताधारी पक्षास आपल्याला अनुकूल असे मतदार संघ निर्माण करण्याची

(जेरीमेंडरिंग) सत्ता आहे. *(पहा टाईम साप्ताहिक, ऑक्टोबर ९, २०१७)* दुर्दैवाने, भारत-अमेरिकासंबंधांची ही 'दुसरी बाजू' कोणी सांगत नाही.

जग म्हणजे एक मोठी रासायनिक प्रयोगशाळा आहे. तेथे निरनिराळे नेते निरनिराळे प्रयोग करीत असतात. तेथे सतत साखळी प्रक्रिया *(चेन रीॲक्शन्स्)* होत असतात. एका घटनेतून दुसरी घटना, दुसरीतून तिसरी... ती प्रक्रिया चालतच राहते. पाकिस्थानात जीना वारले पण घटना चालूच राहिल्या. १९५४ साली साऊथ ईस्ट आशिया ट्रीटी ऑर्गनायझेशन (सीटो) जन्मास आली. मग बगदाद पॅक्ट व त्यानंतर सेंट्रल ट्रीटी ऑर्गनायझेशन (सेंटो). १९५९ साली पाकिस्थानाने लाहोरजवळ अमेरिकेची *'लिसनिंग पोस्ट'* उभारली. १९६० च्या दशकांत यू-टू प्रसंग घडला व १९६२ साली भारत-चीन युद्ध घडले. भारताला नुकसान होईल असे काही करायचे नाही, अशी प्रेसि. केनेडींनी त्या खट्याळ देशाला तंबी दिली होती. नाही तर चीनला पाकिस्थानला पुढे करून काश्मीरात उठाव घडवून आणणे अशक्य नव्हते. अमेरिकेने ते थांबविले. अमेरिकेस सतत नीतीचे डोस पाजणाऱ्या नेहरूंवर त्यांच्या संकटकाली अमेरिकेने डोंगराएवढे उपकार केले होते.

१९६५ साली भारत-पाक युद्ध झाले. अमेरिकेच्या जगप्रसिद्ध पॅटन रणगाड्यांचा भारताने धुव्वा उडविला. अमेरिकेचे नाक जणू कापले गेले! चिडून अमेरिकेने भारत व पाकिस्थान या दोघांवर शस्त्रबंदी पुकारली. त्याने पाकिस्थान जास्त हैराण झाला, कारण पाकिस्थान १०० टक्के अमेरिकन शस्त्रांवर अवलंबून होता. पाकिस्थानने कोणाला न कळेल असे अमेरिकन प्रेसि. निक्सन व त्याचा सल्लागार किसिंजर या दोघांना चीनचे महाद्वार उघडून दिले व आंतरराष्ट्रीय राजकारणात एक नवा अध्याय सुरू झाला. त्यामुळे पाकिस्थानने बांगलादेशात अमानुष अत्याचार केले तरी अमेरिका चूप्प बसली. अमेरिकेचा पाकिस्थान दोस्त होता. काय करणार? घरचा मामला, हळूहळू बोंबला. आणि निक्सनने सातवे आरमार धाडून भारतास धमकावले. १९७५ साली अमेरिकन शस्त्रास्त्रांचा ओघ पुन्हा सुरू झाला. चार वर्षांनी *सिमिंग्टन अमेंडमेंटनुसार* तो ओघ पुन्हा बंद केला गेला. कारण, पाकिस्थानचा गुप्त अणु कार्यक्रम. भुट्टोस १९७९ मध्ये फाशी दिले. त्यामुळे अमेरिकेचा झियावर घुस्सा होताच. त्याच वर्षी पाकी प्रजेने अमेरिकन दूतावासावर हल्ला केला व ती वास्तू पेटवून दिली. त्याच वेळी रशियाने अफगाणिस्थानात आपले सैन्य धाडले (डिसेंबर १९७९). जुनी पापे विसरणे अमेरिकेची गरज होती. पाकिस्थानने मोठी रक्कम उकळली खरी, पण रशियास सैन्य मागे घ्यावेच लागले. १९९८ साली पाकिस्थानाने अणुबॉंबचे स्फोट केले. १९९९ साली नवाझ शरीफविरुद्ध मुशर्रफने

कट केला. ९/११ चा २००१ सालचा न्यूयॉर्कचा हल्ला म्हणजे अमेरिकेच्या सहनशीलतेचा अंत होता. तरी २००३ साली मुशर्रफने ३.२ अब्ज डॉलर्सची मदत अमेरिकेकडून मिळविली. अमेरिकेने पाकिस्थानला दिलेले १ अब्ज डॉलर्सचे कर्जही माफ केले. २००७ साली दर वर्षी अशी ५ वर्षे अमेरिकेने १.५ अब्ज डॉलर्स पाकिस्थानला मदत केली. कर्णाला लाजवेल असे अमेरिकेने पाकिस्थानला दातृत्व का दाखविले?

लक्षांत असू द्या, १९४७ ते १९५८ या ११ वर्षांत नागरी *(सिव्हिल)* राजवट होती, त्यामुळे फार थोडी लष्करी मदत अमेरिकेने दिली. १९५८ साली जन. आयूबखान सत्तेवर आला व १९६९ पर्यंत राहिला. त्यामुळे खूप मदत मिळाली. त्याची जागा याह्याने घेतली. तेव्हा मदतीचा पाऊस पडला - १९७१ ते १९७७ नागरी राजवट. माफक आर्थिक मदत पण लष्करी मदत, इल्ला. मग आला झिया (१९७७-१९८८). रशियास अफगाणिस्थानवर स्वारी करण्याची १९७९ साली दुर्बुद्धी झाली. त्यामुळे अमेरिकेचा मदतीचा भारी वर्षाव. पुन्हा लोकशाहीचा प्रयत्न (१९८८-१९९९). त्यामुळे आखडता हात. मुशर्रफची लष्करी राजवट (१९९९-२००८). लष्करी मदतीचा पुन्हा वर्षाव. पण आतंकवाद्यांना ही मदत पोचते असा ओबामांना संशय. पुन्हा त्यावर ब्रेक. ट्रंप आल्यावर तर *टाईट हँड ब्रेकच.* म्हणून पाकिस्थानी बीब्बीचे चीनशी प्रेम प्रकरण सुरू. या शनी-मंगळाच्या युतीचा भारतास धोका वाटतो. हजार जखमांची रणनीती जोरात चालू. खालील तक्ता अमेरिकन आर्थिक व लष्करी मदतीची सखोल माहिती देईल. *(पहा परिशिष्ठ ५)*

४. आतंकवादी

पाकिस्थान हा शेवटचा व खतरनाक आतंकवादी देश आहे. फरीद झकारियांनी त्याचे फार छान वर्णन केले आहे, ''तुम्ही आतंकवाद्यांसाठी शॉपिंग करायला निघालात तर पाकिस्थान त्यासाठी विशाल सुपरमार्केट आहे.'' तेथे असंख्य जिहादी संस्था आहेत. त्यांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल : (१) *सुन्नी पंथी,* विशेषत: सिपाई सहाबा पाकिस्थान (अहले सुन्नत वाल जमात) व लष्कर इ झांगवी; (२) *काश्मीर-केंद्रित* : देवबंदी गट, उदा, जैश इ मुहम्मद व जरकत उल मुजाहिद्दीन; अहले इ हादिस गट, उदा, लष्कर इ तायबा, आणि जमात इ इस्लामी आधारित हिजबुल मुजाहिद्दीन; (३) *पाकिस्थानविरोधी गट,* उदा तेहरिक इ तालिबान पाकिस्थान.

१९८० च्या दशकांत त्यांनी १,००० पाकी माणसे मारली. भुट्टोस फाशी दिल्यामुळे त्याच्या मुलाने तो उगविलेला सूड होता. पुढील दशकांत जानहानीत ३०० टक्के वाढ झाली. त्याचे नेतृत्व सिपाह इ साहेबा पाकिस्थानकडे होते. ९/११ नंतरच्या (११ सप्टेंबर २००१) दशकांत त्यात १०० टक्के वाढ झाली. त्याचे नेतृत्व तेहरीक इ तालिबान व लष्कर इ झांगवीकडे होते. (*पाकिस्थानातील सत्यशोधक गट मानतो की हे अमेरिकन इनसायडर्सचे काम आहे, त्यांनी अल कायदास मदत केली. अफगाणिस्थानात व इराकवर हल्ला करण्यासाठी हे 'कव्हर अप' वा निमित्त आहे. अमेरिकेतही सत्यशोधकांची चळवळ चालू आहे.*) २००३ ते २०१६ या काळात ६०,७७२ लढाऊ व बिनलढाऊ लोक मारले गेले. लष्कराचे ६,५१६ सैनिक व अधिकारी ठार झाले. आतंकवाद्यांनी किती माणसे मारली? २०१४ साली ५,४९६ कत्तलीत १,७८१ नागरी, ५३३ सैनिक व ३,१८२ आतंकवादी मारले गेले. २०१५ साली ३,६८२ कत्तलीत, ९४० नागरी, ३३९ सैनिक व २,४०३ आतंकवादी मारले गेले. १ जुलै २०१६ पर्यंत १,०७८ हत्येत, ३०७ नागरी, १४६ सैनिक व ६२५ आतंकवादी कामास आले.

जानहानी ओके, पण वित्तहानी किती झाली? अर्थमंत्री इशाक दार यांनी मे २०१६ मध्ये सेनेटला सादर केलेले आकडे पुढीलप्रमाणे : गेल्या ५ वर्षात आतंकवाद्यांमुळे पाकिस्थान सरकारला ५,९१३.९५ अब्ज रुपयांचे (युएस $ ५६.८८ अब्ज) प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष आर्थिक नुकसान झाले. २०१०-११ या काळात जास्तीत जास्त नुकसान, म्हणजे २,०३७.३३ अब्ज रुपये झाले तर कमीत कमी नुकसान २०१४-१५ या काळात, म्हणजे ४५७.९३ अब्ज रुपये झाले.

भारतात या आतंकवादास आळा घालणे काँग्रेसच्या राज्यात अशक्य होते, कारण पाकिस्थानची एक मुस्लीम लॉबीच काँग्रेस पक्षांत काम करीत होती. खुद्द नेहरूंनीच केरळात १० मार्च १९४८ रोजी मुस्लीम लीगचे पुनरुज्जीवन केले होते. त्यावेळी इंदिरा गांधी काँग्रेसच्या अध्यक्षा होत्या. मुसलमानांना झुकते माप देणे हे काँग्रेसचे अधिकृत धोरण होते, धर्म होता. राजीव व व्ही.पी. सिंगांनंतर ते कमी कमी होत गेले. त्यानंतर भारताच्या गुप्तचर यंत्रणेच्या धोरणात अनुकूल बदल होत गेले. मोदी आल्यापासून त्या आतंकवाद्यांच्या आर्थिक नाड्या आवळणे सुरू झाले. सैन्य पोटावर चालते. आतंकवादी अनैतिक सैन्य अनैतिक पैशांवर चालते. दहशतवाद्यांना २५ टक्के अर्थ प्राप्ती पाकिस्थानातून, १५ टक्के ड्रग्ज विकून, १० टक्के शस्त्रास्त्र विक्रीतून, १० टक्के खोट्या नोटांच्या व्यापारातून, १० टक्के देणग्यांतून,

२० टक्के आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनातून व सौदी अरेबियासारख्या इस्लामी देशातून व १० टक्के लुटालूट, दरोडेखोरी व खंडणी यातून या आतंकवाद्यांना अर्थप्राप्ती होते. ही सारी माहिती गृहमंत्री राजनाथसिंग यांनी ८ मे २०१७ रोजी झालेल्या गृहखात्याच्या बैठकीत सांगितली. या उगमांवर प्राप्ती करवाल्या खात्याने सचोटीने धाडी घातल्या तर आतंकवादी एका महिन्यात पैशावाचून तडफडून नष्ट होतील. दुर्दैवाने, भारतीय प्राप्तीकर खातेच भ्रष्टाचारापासून मुक्त नसल्यामुळे आतंकवाद्यांचे फावते. त्या खात्याचे म्हणणे, आम्हाला 'ठार मारू', अशा धमक्या मिळतात. सुरक्षा निधी, अंमली पदार्थांचे विक्रेते, जंगल संपत्तीचा चोरटा व्यापार आणि मुस्लीम उद्योजक व व्यवसायी या साऱ्यांशी गांठ असल्यावर त्या धमक्या खोट्या आहेत असे कसे म्हणावे? आतंकवाद्यांना रीतसर महिन्यास हस्तकांना पगार द्यावा लागतो, त्यांच्या प्रशिक्षणासाठी मोठा खर्च करावा लागतो व त्यांना आधुनिक शस्त्रे विकत घेऊन पुरवावी लागतात. यासाठी त्यांना छोटे दुकानदार, कंत्राटदार, बिल्डर्स, नटनट्या, लाखोंनी कमाई करणारे व्यवसायी वगैरे मंडळींकडून खंडणी जमा करावीच लागते. बराच मोठा हिस्सा पोलीस व गुप्तचर अधिकारी यांना 'विकत घेण्यात' खर्चावा लागतो. बेकायदा खाणकाम करणारे व वाळू खोदणारे तर त्यांना नियमितपणे हप्ते देतात. अशांचे 'स्टींग ऑपरेशन' केले तर या काळ्या प्रवृत्तींवर कांही आळा बसू शकेल. ते कोण करणार? त्यांनाही धमक्यांची टांगती तलवार आहेच मानेवर! प्राण कां नोकरी? या स्पर्धेत प्राण नेहमीच अग्रहक्क मिळवितात.

पाकिस्थानची 'इच्छा यादी'

तवलीन सिंग या दिल्लीतील ज्येष्ठ पत्रकार आहेत. दिल्लीच्या राजकारणाचा त्यांचा सूक्ष्म अभ्यास आहे. मोदी सत्तेवर आल्यापासून दिल्लीत व देशात काय काय बदल घडले याविषयी त्यांचे बारीक निरीक्षण आहे. राजीवच्या दरबारावर तर त्यांचे पुस्तकच आहे. *संडे इंडियन एक्सप्रेस* मध्ये त्यांनी लिहिले : ''नव्या भारतात महात्मा हे आता नायक राहिले नाहीत, हे मोदींना माहीत नाही काय? साबरमती आश्रममधील मोदींचे २९ जून २०१७ रोजी केलेले भाषण संपले आणि सोशल मिडीयात क्रुद्ध विरोधी प्रतिक्रिया सुरू झाल्या. मोदींनी अहिंसेचे गौरवीकरण केले त्यास तरुणांचा विरोध होता. गांधीजींची अहिंसा हे त्यांच्यासाठी 'नपुंसक भारता'चे बोधचिन्ह आहे. कालपर्यंत भारत नपुंसक होता, त्याचे कारण गांधीजी. फाळणीनंतर लाखो हिंदूंची कत्तल झाली याचे कारण गांधीजींची अहिंसा, असे नव्या पिढीचे मत आहे.'' (*संडे इंडियन एक्सप्रेस, २ जुलै २०१७, पृ. १५*)

आजवर कॉंग्रेसचे राज्य होते. त्यामुळे उघडपणे बोलायला बंदी होती. सोशल मिडीयांनी ती पोकळी भरून काढली. मोदी सत्तेवर आल्यावर ते भय नाहीसे झाले. तरुण आता त्यांच्या मनातले विचार सोशल मिडीयात व्यक्त करू लागले आहेत. गांधीजींनी काश्मीरात युद्ध चालू असता व नेहरू आणि सरदार पटेलांचा विरोध असताना भारत सरकारला पाकिस्थानास ५५ कोटी रुपये देण्यास भाग पाडले. भविष्यात असे होत राहिले तर घात होईल म्हणून नथूराम गोडसे या पुण्याच्या सुशिक्षित संपादकाने गांधीजींची हत्या केली. मात्र, त्या हत्येने भारत सरकारचे मुस्लीम तुष्टीकरणाचे धोरण थांबले नाही. ते चालूच राहिले. पाकिस्थानच्या अनेक मागण्या होत्या व आहेत. त्यातल्या कांही पुढे दिल्या आहेत. हेच गांधीजी जीनांना संयुक्त हिंदुस्थानाचे पंतप्रधान नियुंक्त करावयास तयार झाले होते. म्हणून सरदार व नेहरू या दोघांना गांधीजी दिल्लीत नको होते. त्यांनी त्यांना दूर पूर्व बंगालमधील नोआखलीत धाडून दिले होते. गांधीजी जिवंत असते तर पाकिस्थानच्या अनेक मागण्या गांधीजींनी पुऱ्या केल्या असत्या. आता त्यांच्या गैरहजेरीत ही पुढील पाकिस्थानची 'इच्छांची यादी' पूर्ण होऊ शकत नाही. खरे गांधीभक्त केव्हाच संपले. पाकिस्थान उर बडवून काय म्हणतो ते माहीत आहे? *(पहा परिशिष्ठ ३, विच्छा माझी पुरी करा.)*

पाकिस्थान कसा सुधारेल?

भारतीय हिंदूंना सर्वांत मोठी कसली भूक असेल तर 'जगद्गुरु' होण्याची. मुसलमानांना बिगरमुसलमान (काफीर) गुरू कसे चालणार? भारताजवळ ना अमेरिकेसारखी लष्करी ताकद ना तंत्रज्ञान. ना ब्रिटनसारखे बौद्धिक म्हणजे तांत्रिक बळ. १९४८ मध्ये भारताने पाकिस्थानचा काश्मीरात पराभव केला. १९६५ सालच्या युद्धात पुन्हा पराभव केला. १९७१ साली नुसता पराभव नाही तर पाकिस्थानचे दोन तुकडे केले. कार्गिलच्या युद्धाचा अनुभव निराळा नव्हता. त्यामुळे भारतास युद्धांत जिंकणे अशक्य आहे याची पाकिस्थानची खात्री पटली. त्यामुळे *ऑपरेशन टोपाझ* वा *ऑपरेशन काराकोरम* या नावाने प्रसिद्ध असलेली हजार जखमांची रणनीती पाकिस्थानास स्वीकारावी लागली. ८० ते ९० च्या दशकांत त्यांनी खलिस्थानी दहशतवादी आणला, पण इंदिरा गांधीनी पंजाब पोलीसांच्या मदतीने त्या चळवळीचे कंबरडे मोडले. त्याच वेळी माववाद्यांबरोबर त्यांनी हातमिळवणी केली. त्यानंतर त्यांनी काश्मीरमध्ये आपले दहशतवादी धाडून स्थानिक तरुणांना प्रशिक्षित करण्याची सुरवात केली. पाकिस्थान दर वर्षी काश्मीरात ३००

ते ४०० कोटी रुपये हुरियत कॉन्फरन्सच्या दलालांद्वारा खर्च करते. यापेक्षा भारताचा तेथील खर्च चौपट आहे. (*ब्रिग्रे. हेमंत महाजन, तरुण भारत, नागपूर*) याचा अर्थ, पूर्वी केलेल्या पारंपरिक युद्धापेक्षा हे 'थाऊजंड कटस्'चे युद्ध आपल्याला भलतेच महाग पडते. आणि एवढा सारा खोडसाळपणा करून पाकिस्थान शेवटी 'व्हिक्टीम कार्ड' खेळून जगाकडून सहानुभूती मिळवितोच. अमेरिका नाही तर चीनची मदत पाकिस्थानला चालूच आहे.

एवढ्या थपडा खाऊनदेखील भारतास अजून आशा आहे की पाकिस्थानला सुबुद्धी सूचेल व त्याची गाडी रूळावर येईल. काहींना हे शेख चिलीचे स्वप्न वाटते. एकदा सारा पाकिस्थान आपण अणुबॉंब टाकून बेचिराख केला की नव्याने पाकी नेत्यांना पुन्हा पुनर्वसन सुरू करावे लागेल, असे भारतीय लष्करी तज्ञांचे मत आहे. त्यावेळी आपण चांगल्या शेजाऱ्यास काय सांगू, त्याची ही पुढील १० कलमी योजना :

१. त्याच्या नेत्यांना अर्थशास्त्रावर लक्ष केंद्रित करावे लागेल. पूर्वी अमेरिकेने व सध्या चीनने पाकिस्थानास व्हेंटिलेटरवर ठेवून सारे ऑलवेल आहे असा भास उभा केला होता. कारण, लष्करी अधिकाऱ्यांनी ते पैसे आपल्या खिशात टाकून राष्ट्रास कर्जबाजारी बनवून सोडले आहे. त्यामुळे खर्चाचे अग्रक्रम बदलावे लागतील. भारतात अबदुल कलामांनी जसे व्हिजन २०२० बनविले, तसे त्याला व्हिजन २०२५ बनवावे लागेल, उदा. शिक्षणावर जीडीपीच्या ४ टक्के खर्च करावा लागेल.

२. संरक्षण खर्चावर काप मारावा लागेल. तेथे खोट्या लटपटी खटपटी चालणार नाहीत, उदा. मुशर्रफने बराचसा संरक्षणावरील खर्च नागरी खात्यात दाखवून संरक्षण खर्च कमी केल्याचे नाटक केले होते.

३. कराचा पाया जास्त रूंद करावा लागेल व उत्पन्नाप्रमाणे खर्च करण्यास लोकांना शिकावे लागेल. आजवर परदेशांकडून, उदा. अमेरिका, सौदी अरेबिया, वगैरे, कर्ज काढायचे व्यसन त्यास लागले होते. कर्ज थोडेच फेडायचे असते? अशी मनोवृत्ती असल्यामुळे ऊधळपट्टीची सवय लागली आहे.

४. भारताशी फक्त द्वेषभावना व सतत बरोबरी करण्याची अव्यवहारी सवय लागली होती, ती बदलावी लागेल व वास्तव व व्यवहारी भूमिका घ्यावी लागेल. त्यासाठी भौगोलिक वास्तवता लक्षांत ठेवून पावले उचलावी लागतील.

५. अफगाणिस्थानात ढवळाढवळ करण्याचे सोडून त्या राष्ट्राचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व मान्य करावे लागेल. अफगाणिस्थानची भारताशी असलेली

मैत्री स्वीकारावी लागेल.

६. सर्व जिहादी गटांपासून अंतर ठेवावे लागेल. भारतविरोधी कोण व पाकिस्थानविरोधी कोण हे शोधून काढून दोघांचाही खातमा केला पाहिजे. त्यामुळे भारताची सहानुभूती व सहकार्य आपोआप मिळविता येईल.

७. मदरसा हे भारतद्वेषाचे कारखाने आहेत. त्यातील पक्क्या मालाचे रूपांतर आतंकवाद्यात होते. तेथील अभ्यासक्रम बदलून मुलांना विज्ञान व तंत्रज्ञान शिकविण्यावर जास्त भर द्यावा लागेल.

८. आजवर जो पाकिस्थानचा व भारताचा विकृत इतिहास शिकविला जायचा तो बदलून खराखुरा इतिहास सांगावा लागेल.

९. पाकिस्थान आहे म्हणून तेथे लष्कर आहे, ही लष्करास नव्याने समज द्यावी लागेल. आजवर लष्कर आहे म्हणून पाकिस्थान आहे, असे सांगून लष्कराचे अवास्तव महत्त्व वाढवून ठेवले होते.

१०. पाकिस्थानात अनेक प्रकारचे, पंथाचे व जातीचे मुसलमान राहतात. त्यांना शिकवावे लागेल, जगभर असे नानाविध मुसलमान राहतात, पाकिस्थान हा जगात एकटा मुसलमानी देश नाही.

भवितव्य

राजकारण हा वेश्येचा व्यवसाय आहे, त्यात फक्त आपला फायदा पहावयाचा असतो, मग गिऱ्हाईकाचे कितीही मोठे नुकसान होवो. हे कटु सत्य पाकिस्थानचे नेते चांगले जाणतात. प्रथम त्यांनी गांधीजींचे पुरे शोषण केले व पाकिस्थान मिळविले. आज भारत व पाकिस्थानमधून विस्तव जात नाही. नंतर अमेरिकेस लुटले व त्यामुळे तो देश अणुबाँबने सज्ज झाला. आज त्या दोघांचे वाकडे आहे. आता त्यांनी चीनला नादी लावले आहे. हा सामना भविष्यात छान रंगेल. एक चोर, दुसरा डाकू. एल कफल्लक तर दुसरा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा धनिक. चीनने पैसा पुरविला आहे पण दान म्हणून नाही, कर्ज म्हणून. या जन्मात ते कर्ज फिटणार नाही. इंदिरेला जे करायचे होते ते कार्य बहुधा चीन पार पाडेल. सिंध ही डोकेदुखी बहुधा भारताकडे येईल. बलुचिस्थान अफगाणिस्थानाकडे. आणि पंजाब चीनची वसाहत, म्हणजे, कॉलनी. गव्हाचा पेला *(व्हीट बाऊल)*. पांच नद्यांच्या गाळाने जगातील सर्वांत संपन्न व सुपीक भूमी. चीनच्या अब्जावधी लोकाना अन्नधान्याची जरूर आहेच.

■■■

जिहादी

ओळख

इस्लाम हा धर्म नाही, तो एक युद्धपिपासू लोकांचा रक्ताचा तहानलेला पंथ आहे. भारत त्या पंथाच्या आगीत गेली ८०० वर्षे होरपळलेला देश आहे. पाश्चिमात्यांना आता कोठे त्याची झळ लागावयाची सुरवात झाली आहे. त्यामुळे प्रत्येक भारतीय उत्साहाने व थोड्याशा आनंदाने त्यांना म्हणत आहे, "बच्चंजी, ही तर सुरवात आहे. आम्हाला हासत होतात ना? आता तुमची पाळी." ११ सप्टेंबर २००२ च्या न्यूयॉर्कमधील प्रसंगांनंतर त्यांना आतंकवादाचा खरा हिसका कळला. त्यानंतर त्यांनी त्यांच्या पद्धतीप्रमाणे त्याचा सखोल अभ्यास केला व आता ते त्याची पाळेमुळे खणून त्याचा संपूर्ण नाश करण्याच्या मार्गावर आहेत. हे हिंसाप्रेम कां व कोठून येते, हा त्यांच्या समोर पडलेला मोठा यक्षप्रश्न आहे.

हिंदू धर्मात 'रॅडिकल' असा प्रकारच नाही, त्यामुळे हिंदूंना तो प्रकार समजावणे, अशक्य गोष्टीतले काम आहे. शिवराज पाटील, सुशीलकुमार शिंदे व चिदंबरम् या तीन गृहमंत्र्यांनी त्यांच्या राजकारणासाठी 'हिंदू टेरर'चा बागुलबुवा शोधून काढला. त्यांच्या आधी इंग्रजांनी स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतिकारकांना रशियन पद्धतीने (बॉंब वापरून) लढणारे 'हिंदू टेररिस्टस्' असा शब्दप्रयोग केला होता. इस्लामी रॅडिकल संस्थांच्या तुलनेत हिंदूंच्या सनातन संस्थेसारख्या संस्था अगदीच शामळू व मिळमिळीत वाटतात. प्रत्येक हिंदूस आपल्याकडे अशा रॅडिकल संस्था असाव्यात असे वाटते - पण मनातल्या मनांत. अमेरिकन, रशियन, चीनी वा इंग्रजी गुप्तचर खात्यांनी त्यांना मदतीची 'ऑफर' दिलीसुद्धा असेल, नाही असे

नाही. स्वतंत्र भारतात बी.टी. रणदिवे (१९४८) व चारू मुजुमदार (१९६९) हे स्वतंत्र भारतातील आद्य रॅडिकल. त्यांनी अनुक्रमे सीपीआय-मार्क्सिस्ट व सीपीआय-मार्क्सिस्ट-लेनिनीस्ट या राजकीय पक्षांचे नेतृत्व केले. सरदारांनी पहिल्यास व इंदिरा गांधींनी दुसऱ्यास ठोकून काढले. रणदिव्यांनी मला सांगितले, ''मॉस्कोहून हुकूम आला, तो आम्ही पाळला. आम्ही हुकूमाचे ताबेदार. स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची आमची कोठे ताकद होती?'' हुकूमाची ताबेदारी राजकारणाप्रमाणे धर्मसत्तेत वेगळी नसते.

२०१२ च्या सेन्ससप्रमाणे जगांत ख्रिस्ती २.२ अब्ज (३१.५०%), मुसलमान १.६ अब्ज (२२.३२%), हिंदू १ अब्ज (१३.९५%), बौद्ध ४९५ दशलक्ष, व ज्यू १४.३१ दशलक्ष आहेत. ज्यू, ख्रिस्ती व मुसलमान हे अब्राहमिक पंथ आहेत, म्हणजे एक परमेश्वर, एक प्रेषित व एक धर्मग्रंथ. या पंथियांची भाषा 'दातास दात' व 'डोळ्यास डोळा' अशी आहे. हिंदू, जैन, शीख व बौद्ध त्या गटात बसत नाहीत. त्यांची भाषा 'सर्वे सुखिनः भवन्तु । सर्वे सन्तु निरामयाः ।।' अशी आहे. या तिघातील दोघांना *'एज ऑफ रीझन'*मुळे विज्ञानाचे महत्त्व पटले व धर्माचे माहात्म्य कमी झाले. इस्लाममध्ये अजून ते ''विज्ञान माहात्म्य'' रूजायचे आहे. अजून ते मध्ययुगातच मनाने वावरत आहेत. त्यामुळे आज जगात हा संस्कृत्यांचा संघर्ष *(क्लॅश)* दिसतो. तो प्राचीन व आधुनिक मानसिकतेचा झगडा आहे. त्या संघर्षाची मुळे इस्लाम धर्मात – विशेषतः कुराणात – दडलेली आहेत, अशी आता त्यांची खात्री झाली आहे. आधुनिक काळात या वाईट मुसलमानांना (जिहादी वा रक्तपिपासू) चांगले मुसलमान (शांतताप्रेमी) कसे बनवायचे हे त्यांच्या पुढे मोठे आव्हान आहे. भारतीयांनी आजवर, म्हणजे ८०० वर्षे, हे कसे 'मॅनेज' केले व आपले स्वत्त्व, स्वाभिमान, स्वदेश व स्वधर्म कसा टिकवून धरला याचे त्यांना आता कौतुक वाटू लागले आहे. हळूहळू सारे जग भारतीयांच्या (हिंदूंच्या) मार्गाने जाणार आहे, जात आहे. जिहादीपणा विरुद्ध हिंदुत्व (सहिष्णुता) ही आता भविष्यातील मानसिक लढाई आहे. ती लढाई जिंकण्यासाठी भारतात स्वामी विवेकानंद, स्वामी चिन्मयानंद यांच्यासारखे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे व दर्जाचे साधुपुरुष जन्मावे लागतात. ते सामान्यांचे काम नोहे.

इस्लामिक मूळतत्त्ववाद

१. **इस्लामिझम्** : इस्लामचे नाव वापरून आतंकवाद माजविणे, त्यास वहाब्बीझम् म्हणतात. जे आपल्यासारखे नाहीत त्या प्रत्येक व्यक्तीशी युद्ध करणे

यास वहाब्बीझम व सलाफीझम म्हणतात. भारतात त्यास देवबंदी हे नाव देतात. रॅडिकल इस्लामी विचारांच्या संग्रहास कुतुबिझम म्हणतात. अल्लाने महंमदांच्या मुखाने जे हुकूम (आज्ञा) दिले ते (कुराण) व हादित मधील वचने तेवढेच सत्य, इतर सारे फझूल (मिथ्या) असे जे मानतात, ते इस्लामिस्ट्स. जगातील आधुनिकतेच्या गोंडस नावाखाली वाटेल ती बकबक करणे, अश्लील चित्रे व सिनेमा पाहणे (पोर्नोग्राफी), अनैतिक व्यवहार ठेवणे, निधर्मीपणाचे पाखंड माजविणे, समलिंगी व्यवहारांना मान्यता देणे, स्त्रीस्वातंत्र्य व तत्सम कल्पनांचा प्रसार करणे इस्लामिस्टांना जराही मान्य नाही. व्याज खाणे वा त्यावर जगणे त्यांना मंजूर नाही. मादक द्रव्यांच्या वापराचा त्यांना तिटकारा आहे. जुगार तर त्यांच्या नीतीत बसतच नाही. स्त्रीशक्तीचा वापर करून त्यातून फायदा मिळविणे, त्यांच्यासाठी वर्ज्य आहे. याचा अर्थ भारतात सच्चा असा कोणी मुसलमानच नाही. काफीर हिंदूंनी त्यांची मती भ्रष्ट केली आहे. त्यांना सुधरविणे व योग्य त्या शुद्ध मार्गावर आणणे, आणि यास जे कोणी विरोध करतील त्यांची कत्तल करणे एवढेच या रॅडिकल इस्लामिस्टांच्या हाती उरले आहे.

२. **वहाब्बिझम्** : गांधीजी बॅरीस्टर खरे पण त्यांचे सामान्य ज्ञान फारच कमी होते. त्यांच्या अज्ञानातून मुसल्मानांना कोणचीही किमत मोजून वश करण्याच्या लोभापायी त्यांनी भारतात खिलाफत आणून देशाचे मोठे नुकसान केले. ऑटोमन साम्राज्याने पहिल्या महायुद्धात जर्मनीशी हातमिळवणी केली. जर्मनी हारला. इंग्रजांना ऑटोमन साम्राज्य खलास करावयाचे होते म्हणून त्यांनी खलिफाची जरूर नाही असे सांगून तेथे आपल्या चार पित्त्यांच्या हाती सत्ता दिली. त्यावेळी लॉरेन्स ऑफ अरेबिया इंग्रजांच्या बाजूने लढला व जिंकला. सारे अरब त्याचे शत्रू. फक्त चार अरब त्याच्या घोड्याचे मोतद्दार (साईस) होते. इंग्रजांनी पाहिले तर तेथे सारे वाळवंट. अजून तेलाचा शोध लागायचा होता. तेथे उत्पन्न असे कांहीच हाती लागणार नव्हते. म्हणून या चार अरबांना प्रमुख बनवून त्यांनी 'रीमोट कंट्रोल'ने राज्य केले. हे चार प्रमुख म्हणजे अल सौद (सौदी अरेबिया), अल खलिफा (अबु धाबी), अल सबा (दुबई) आणि अल थाळी (कटर). १८५७ नंतर पुणे व नागपूर खालसा करून हैदराबाद, ग्वालेर, बडोदे व इंदूर यांना राजे म्हणून चालू ठेवले त्याची ही अरबी आवृत्ती होती. हे चारी शेख (प्रमुख) पुढे तेलामुळे धनाढ्य बनले व त्यातील एक नशिबवान, म्हणजे सौदी, मक्का-मदीनामुळे इस्लाम धर्माचे परमोच्च अधिकारी बनले. त्यांची इंग्रजनिष्ठा वादातीत होती.

महंमद इब्न अब्द अल् वहाब (१७०३-१७९२) यांनी राजे महंमद इब्न

सौद यांच्याशी हातमिळवणी केली व पवित्र मक्का व मदीनासकट बहुतेक सारा अरबी द्वीपकल्प (पेनिनसुला) जिंकून घेतला. १८१८ साली इजिप्तचा व्हाईसरॉय महंमद अलीच्या राजपुत्राने – इब्राहीमने – त्यांना हारविले. या लढाईत अलीचा पुत्र हुसेन याचे थडगे नष्ट झाले. एका शतकानंतर इब्न सौदने हारलेला सारा अरबस्थानचा मुलूख परत मिळविला व त्यास सौदी अरेबिया हे नाव दिले. या तालीबान राजकर्त्यांनी पैगंबरीय एकेश्वरवादाची पुन्हा स्थापना केली, सुफीवाद, निरनिराळ्या संतांचे पंथ, कांही कारणाने घुसलेल्या परकीय चालीरीती वगैरेंना रजा दिली व मूळचा महंमदाचा शुद्ध इस्लाम प्रस्थापित केला. या वहाब्बींनी धार्मिक रक्षकांची (पोलीस) प्रार्थनेसाठी नेमणूक केली, मक्का व मदीना येथे जंगी मशिदी बांधल्या व लिबरल हनिफी मुल्लांचे उच्चाटन करून मूळ तत्त्ववाद्यांना राजाश्रय दिला.

३. **सलाफिझम्** : सलाफ म्हणजे प्रेमळ पिता. इब्न हनबाल, इब्न तैमियाह सारख्या सलामी धर्मगुरूंनी इस्लामला सशक्त बनविण्यासाठी धर्मातील शिरलेली घाण बाहेर फेकून दिली. १९ व्या शतकात त्या सुधारक चळवळीस अब्द अल् वहाब यांनी साथ दिली. त्यांना पुढे आणखी सुधारक भेटले, उदा. जमाल अलदीन अफगाणी (१८३९-१८९७) व महंमद अबदुह (१८४९-१९०५). त्यामागे पाश्चिमात्यांचा वसाहतवाद व त्यांच्या औद्योगिक व लष्करी ताकदीची भीती हे दोन घटक काम करीत होते. पाश्चिमात्य संस्कृतीच्या लाटेत मुसलमान वाहून जातील अशी भीती त्यांच्या मनात होती. त्यासाठी रशीद रीधासारख्यांनी ही पुराणप्रियतेची व शरियाचा कायदा पाळा अशी चळवळ सुरू केली. (भारतातदेखील आर्य समाजी हिंदूंनी 'वेदांकडे परत' अशी सुधारकी चळवळ सुरू केली होती.) इराणमधील क्रांती व आयातोल्ला खोमेनी (१९००-१९८९), हसन अल् बान्ना (१९०९-१९४९) आणि अबु अल महुदी यांचे साहित्य वाचून मुसलमान राजकीय नेत्यांनी इस्लामचा वापर त्यांच्या राजकारणासाठी केला. अफगाणिस्थानची तालिबान, इजिप्तची जिहाद व अल्जेरियाची इस्लामिक साल्वेशन फ्रंट या चळवळींचे एकच ध्येय होते – नवा सशक्त मुसलमान समाज उभा करणे. *(आर्य समाजाचे नेमके तेच ध्येय होते. स्वयंभू नाही, केवळ प्रतिक्रिया.)*

४. **कुत्बिझम्** : कुतुब सैय्यद (१९०६-१९६६) हे मुस्लीम ब्रदरहुड संस्थेचे सभासद व आधुनिक इस्लामिक चळवळीचे पितामह. १० व्या वर्षी सारे कुराण त्यांच्या मुखोद्गत होते. त्यामुळे त्यांना हाफीझ (ज्ञानेश्वर) ही पदवी लहानपणीच मिळाली. १९३३ साली ते बी.ए. झाले व कैरोच्या दार अल् ऊलम्

या विश्वविद्यालयात शिकवू लागले. त्यांना फेलोशिप मिळाली व त्यांनी उत्तर कोलोराडो विश्वविद्यालयाची एम.ए. मिळविली. अमेरिकेत त्यांना साक्षात्कार झाला : वंशवाद, काळा-गोरा भेद, लैंगिक सैलपणा व ज्यूंविषयी प्रेम या सर्वांनी ते अस्वस्थ बनले. इजिप्तला ते विषण्ण होऊन परतले. *मुस्लीम ब्रदरहुडचे* मुखपत्र, अल् ईखवान, त्याचे ते संपादक म्हणून काम करू लागले. (१९२० मधील डॉ. आंबेडकरांच्या *मूकनायका* प्रमाणे). १९५२ साली कांही लष्करी अधिकाऱ्यांनी राजेशाही उलथवून लष्करी राजवट आणली. त्यांना त्यांनी पाठिंबा दिला. पण जेव्हा नासर यांनी सत्ता काबीज केली तेव्हा त्यांना समजले, इजिप्त *इस्लामी स्टेट* राहणार नाही. त्यांनी नासर यांना विरोध केला. सरकारने त्यांना २९ ऑगस्ट १९६६ रोजी फाशी दिले. महंमद होते तेव्हाचा मुसलमानी धर्म त्यांना परत आणावयाचा होता. नासर, नेहरू व मा. टिटो हे समाजवादी होते. अशांना हटविण्यासाठी हिंसा केली तर क्षम्य आहे, असे त्यांचे मत होते. त्यांच्या लेखनातून स्फूर्ती घेऊन इजिप्तमध्ये बऱ्याच आतंकवादी चळवळी सुरू झाल्या, उदा. जामा अल् तकफिर वा अल् हिजरा, अल जिहाद व जामात् अल् इस्लामियाह. जगभर ती प्रक्रिया पसरली. आयसिलची लढाई इराक-सीरीयापुरती मर्यादित नाही, ती जगासाठी आहे, ही कुतुब यांची कल्पना डोक्यांत बाळगून जिहादी फ्रान्स व बेल्जियममध्ये घुसले. ऑरलँडोमध्ये एका जिहादीने कुतुब व अल बगदादी यांनाही दूर करून एकट्यानेच जिहाद करून पापी माणसांना खलास केले. बांगलादेशात अशीच जिहादी कृत्ये घडली.

कांही जिहादी संस्था

१. **तालिबान** : अरबी भाषेत तालीब म्हणजे विद्यार्थी व तालीम म्हणजे शिक्षण. मशिदींमधील शाळांना मदरसा म्हणतात. येथील विद्यार्थी सैनिक म्हणून भरती करून त्यांच्या फौजेस प्रशिक्षण देऊन अफगाणिस्थानात सोव्हिएट युनियनच्या सैन्याविरुद्ध जिहाद (धर्मयुद्ध) लढण्यासाठी अमेरिका व पाकिस्थान यांनी हजारो जिहादी तयार केले. त्या प्रकल्पाचे प्रमुख (अमीर) होते मौ. महंमद ऊमर. त्यांनी काबूल जिंकल्यावर तेथे धर्मराज्य स्थापन केले. त्या राज्यांत स्त्रियांनी घरात काम करावे, बाहेर त्यांचे काम नाही, पुरुषांनी लांब दाढ्या ठेवाव्यात व पाश्चिमात्य ड्रेस त्यजून अरबी कपडे परिधान करावेत, असे पुराणकालीन नियम होते. त्यांनी त्यांच्या चार वर्षांच्या कारकीर्दीत ८५ टक्के देशात शांतता प्रस्थापित केली. मात्र त्यांनी मुलींच्या शाळांवर बंदी आणली व स्त्रियांना घराबाहेर कोठेही नोकरी

करावयाची नाही असा कायदा केला. त्यांनी इस्लामच्या शरियाप्रमाणे हात पाय छाटणे, वगैरे शिक्षा देणे सुरू केले. ग्रामीण विभागात त्याने फारसा फरक पडला नाही, पण शहरवासीयांना ते कायदे जाचक वाटू लागले. पाकिस्थान, युएई व सौदी अरेबियाने ह्या तालिबान राजवटीस अधिकृत मान्यता दिली. पाश्चिमात्य देशांना ते कायदे मान्य नव्हते. अफगाणिस्थानात अफूची लागवड वाढली. त्यामुळे लोक श्रीमंत झाले. ओसामा बिन लादेन याच्याबरोबर हातमिळवणी व न्यूयॉर्कमधील *वर्ल्ड ट्रेड सेंटरचे* दोन मनोरे यांचे पतन यामुळे तालिबान सरकार व अमेरिका यांचे संबंध बिघडले. त्यात १९९६ साली सुरू झालेले तालिबान सरकार २००१ साली संपले.

२. **अल् काईदा** : खरे म्हणजे याचे नावे अल लगदा पाहिजे. त्यांनी शत्रूचा अक्षरशः लगदा केला. अज्ञाताची भीती आतंकवादाच्या जगन्नाथाच्या रथाच्या एंजीनला बळ देते. सामान्य लोक बंदुकीच्या कायद्यास घाबरतात. त्यामुळे सरकार नावाची गोष्ट विसरली जाते. समाज नावाची अल कायदा ही सुन्नी आतंकवादी इस्लामिस्ट बहुराष्ट्रीय संघटना १९८८ साली ओसामा बिन लादेन, अबदुल्ला आझम व इतर अरब नेते यांनी सोव्हिएट सैनिकांशी लढण्यासाठी स्थापन केली. त्यात इस्लामी आतंकी सलाफीस्ट जिहादी सामील झाले होते. त्यांना युनो, नाटो, युरोपियन युनियन, रशिया, अमेरिका, भारत व इतर राष्ट्रांनी आतंकवादी म्हणून जाहीर केले होते. नागरी आणि लष्करी वास्तुंवर त्यांनी हल्ले चढविले होते. त्यात १९९८ मधील अमेरिकन एंबसीवरील बाँबहल्ला, ११ सप्टेंबरची न्यूयॉर्कची भयंकर घटना व २००२ चे बालीवरील बाँबिंग यांचा समावेश होतो. ९/११ नंतर अमेरिकेने आतंकवादाविरुद्ध लढाई घोषित केली व त्यांचे एकेक नेते मारण्याचे सत्र चालू केले. त्यात ओबामांनी नाविक दलाची माणसे पाकिस्थानात धाडून ओसामा बिन लादेनला २ मे २००१ रोजी मध्यरात्री ठोकला व त्याचे प्रेत समुद्रात फेकून दिले. अल कायदास मुसलमानी देशातील परकीय प्रभाव नष्ट करून तेथे शुद्ध ईस्लामी राजवट (खिलाफत) प्रस्थापित करावयाची आहे.

अल कायदा, अल नुस्र आणि आयसिल या संघटना का फोफावल्या? त्याला अनेक कारणे आहेत. काँग्रेसचा ऱ्हास होऊन भाजप का वाढला? बरोबर तसेच येथे घडले. सौदी अरेबिया व आखाती देशातल्या शेखांचे नाकर्तेपण, भ्रष्टाचार व दडपशाही यामुळे अल कायदा वाढला. काँग्रेसला डाव्या पक्षांनी आपल्या स्वार्थासाठी संपूर्ण पाठिंबा दिला. त्याचप्रमाणे या देशांना काफीर अमेरिका, फ्रान्स व ब्रिटनने पाठिंबा दिला. त्यामुळे एके काळी अमेरिकेचा बगलबच्चा इराण

सीरीयात असद सुन्नींना ठोकून काढण्यात यशस्वी झाला. म्हणून तेथे अल नुस्र वाढली. २००३ साली अमेरिकेने इराकवर हल्ला चढविला. इराक आधीपासून सुन्नी, शिया व कुर्द यांच्या आपापसातील संघर्षामुळे कमजोर बनला होता. त्यात अमेरिकेच्या हल्ल्यामुळे तो संपन्न देश आणखी कफल्लक बनला. त्याचा पुरेपूर फायदा अल बगदादींनी उठविला व आयसिस मजबूत बनविली.

३. **अल् शबाब** : हरकत अल शबाब ही अल कायद्याची सलाफीस्ट जिहादी तरुणांची संघटना आहे. शाबाब म्हणजे तरुण. तीची सुरवात पूर्व आफ्रिकेत झाली. अल कायदाशी तीची युती २०१२ सालची. पण त्या वर्षीच्या फेब्रुवारीत त्यांच्या एका गटाचे अल कायदातील एक गटाशी भांडण झाले व त्याचा परिणाम संघटनेच्या सामर्थ्यावर झाला. २०१४ साली त्यांची ७ ते ९ हजार संख्या होती. एका वर्षात तीची शहरातील संख्या कमी कमी होऊ लागली. शेवटी तर तीचे अस्तित्व फक्त ग्रामीण भागात उरले. आपल्याकडील शिवसेनेच्या बरोबर उलटे.

४. **अन्सार अल् इस्लाम** : हा सिरीया व इराकमधील कुर्दीश सुन्नी मुस्लीम आतंकवादी गट आहे. २००१ साली त्याची सुरवात सलाफीस्ट इस्लामिक चळवळीपासून झाली. त्यांचा प्रभाव असलेल्या खेडेगावी त्यांनी शरिया कायद्याची सक्तीने अंमलबजावणी केली. ही गावे इराणच्या सरहद्दीला लागून आहेत. २००३ साली अमेरिकेने इराकवर स्वारी केली त्यावेळी हा गट लढण्यात अग्रभागी होता. इराकमधून अमेरिकन सैन्य काढून घेतल्यावर हा गट लढायला सिरीयात पोचला. युनो, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, इस्राएल, युके व अमेरिका या देशांनी त्यास आतंकवादी व अल कायदाशी संबंधित ठरवून त्यावर बंदी घातली. २९ ऑगस्ट २०१४ रोजी हा गट आयसिसमध्ये विलीन झाला.

५. **इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड लेवंट** : इराकचे इस्लामी राज्य (आयएस), इराक आणि सीरीयाचे इस्लामी राज्य (आयसिस), इराक आणि लेवांट, म्हणजे भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यावरच्या प्रदेशाचे राज्य (आयसिल) अशा अनेक नावांनी अल बगदादीची संघटना ओळखली जाते. बिन लादेन ठार झाल्यावर अयमान जवाहिरींनी सीरीयात अल नुस्र फ्रंट स्थापन केली. त्याच वेळी सीरीयातील 'असद' ही शिया राजवट हटविली. त्याबरोबर सीरीयामध्ये आणि इराकमध्ये अल बगदादींनी जिहादचा स्वतंत्र अर्थ लावला आणि या एके काळच्या ऑटोमन साम्राज्याच्या भूभागावर व नंतरच्या केमाल पाशाच्या राज्यात त्यांनी आपण नवे खलिफा आहोत असे जाहीर केले. त्यांच्या या नव्या खिलाफतीला धार्मिक अधिकार (बळ) तर पाहिजे ना? त्यासाठी ही 'आयसिल' संघटना.

पौर्वात्य जगातील जिहाद

१. पूर्व तुर्कस्थानातील ईस्लामी चळवळ : आपण भारतीय निराळ्या कारणासाठी १९२०-२१ सालची 'खिलाफतची आफत' विसरू शकत नाही. त्यास सावरकरांनी 'गांधी गोंधळ' असे नाव दिले होते. अशाच निराळ्या कारणासाठी आयसिलचे आतंकवादी तुर्कस्थानच्या खिलाफतीस विसरू शकत नाहीत. तुर्कस्थान नाटोचा सभासद. या नाटोने सिरीयावर सतत बॉम्बिंग व रॉकेट वर्षाव करून आतंक्यांचे अपरिमित नुकसान केले. सूड म्हणून आयएसने तुर्कस्थानावर जोराचे हल्ले केले - त्यात २५० लोक ठार व ८७० घायाळ झाले. तुर्कस्थानातील रशियन राजदूताचा खून १९ डिसेंबर २०१६ रोजी झाला. तेव्हापासून तेथे आतंकवाद एकदम उफाळला. जुलै २०१५ नंतर आतंकवाद्यांनी तेथे ३९० लोक ठार व १३०० घायाळ केले. तुर्कस्तानचे अर्थतंत्र प्रवाशांवर व पर्यटकांवर अवलंबून आहे. असा हिंसाचार चालू राहिला तर कोण मरायला तुर्कस्थानला जाईल?

या मुस्लीम अलगतावादी संघटनेची स्थापना पश्चिम चीनमधील उघूर जिहादींनी केली. आतंकवाद्यांना ह्या चीनी प्रांताचे रूपांतर पूर्व तुर्कस्थानमध्ये करावयाचे आहे. या चीनच्या झिनजिआंग प्रांतात १९९० ते २००१ या काळात २०० आतंकी हल्ले झाले व त्यात १६२ माणसे दगावली व ४४० जखमी झाली. २००६ सालापासून हे जिहादी पुन्हा जोर करू लागले आहेत. २००८ साली बायजिंगमध्ये ऑलिंपिक सामने झाले. जगाचे लक्ष वेधून घेण्यासाठी त्यांनी मुद्दामच हे हल्ले तेथे केले. चीनने पाकिस्थानला 'या आतंक्यांना आवरा' अशी विनंती केली, पण फारसा फरक पडला नाही. उलट, त्यांनी व्हिडीओ संदेश तेथील मुस्लीम बांधवांना पाठविण्यास सुरवात केली. त्यांना अल काईदाचा पाठिंबा आहे. या उघूर आतंक्यांनी सिरीयात जाऊन अनेक चर्चेस तोडून टाकली व तेथे क्रॉसच्या जागी आपला झेंडा लावला. या जिहादी युद्धात उघूरच्या आतंक्यात बंदुका चालविण्याचे प्रशिक्षण मिळालेली लहान मुलेसुद्धा होती. या प्रांतात चीनने आतंक्यांना चिरडून टाकायचा सपाटाच चालविला आहे. त्यासाठी पाकिस्थानाशी सख्य करून तेथे 'चीन-पाकिस्थान आर्थिक पट्ट्या'ची योजना सुरू करून आपला माल मध्य आशियात निर्यात करण्यासाठी ग्वाडार बंदर चीनने आपल्या प्रभावाखाली आणले आहे.

२. दक्षिण थायलँडमधील बंडाळी : खरे म्हणजे थायलँडमध्ये बंडाळी १९४८ पासून सुरू आहे, पण ती जास्त हिंसक व गुंतागुंतीची झाली ती २००१ नंतर. सॉंगखिया प्रांतातील पट्टानी, याला, नाराथीवात हे थायलंडचे तीन दक्षिणेचे जिल्हे व मलेशियाचा ईशान्य भाग १७८५ साली सयामच्या राजाने आपल्या

अधिपत्याखाली आणला. २००४ साली या बंडाळीला ऊत आला व हा आतंकवाद इतर प्रांतात पसरला. १९ सप्टेंबर २००६ रोजी लष्करी कटात ते जिंकले व त्यांचे राज्य आले. असे वाटले की आता शांतता नांदू लागेल. पण २००८ च्या मार्चमधील आतंकवादी हल्ल्यात मृतांचा आकडा ३०० होता.

३. जम्मू व काश्मीर : जीना व मौ. आझाद या दोघांचे ध्येय एकच होते. जीना वास्तववादी होते तर आझाद स्वप्नाळु. आझादांना मोगलांप्रमाणे संपूर्ण भारतास *दारुल इस्लाम* बनवायचे होते. जेथे बहुसंख्य मुसलमान वस्ती आहे आहे तेथे आपल्या हयातीत *दारुल इस्लाम* बनवू या, पुढचे पुढील नेते पाहून घेतील अशी जीनांची वास्तव विचारसरणी होती. पंजाब व बंगाल येथे यश मिळाल्यावर बहुसंख्य मुसलमान वस्तीचे काश्मीर पाकिस्थानात असावे असे त्यांना वाटणे स्वाभाविक होते. नेहरूंनी बंधुवत् शेख अब्दुल्लांच्या मदतीने सुरवातीस चांगली मुसंडी मारली, पण भाऊबंदकीने नेहरूंना हारविले. नेहरूंच्या वारसांनी 'विकत घ्या व राज्य करा' असे धोरण ठेवून काश्मीर आपल्या ताब्यांत ठेवले. मोदींनी ते धोरण बदलले.

पाकिस्थानातील मूलतत्त्ववाद्यांना काश्मीरमध्ये तेथील काफीर हिंदूंना हुसकून लावण्यासाठी व पैसे आणि शस्त्रे पुरविण्यासाठी कांहीतरी जबरदस्त सबब पाहिजे होती. ती त्यांना पवित्र धर्मयुद्धाच्या नावाखाली सहज सापडली. काश्मीर पाकिस्थानासाठी तीन कारणांसाठी उपयोगी ठरले. पाकिस्थानातील लोक तेथील दंडेलशाहीस कंटाळले होते. काश्मीरने त्या प्रजेचे सारे लक्ष तिकडे वळविले. दुसरे, पाकिस्थानातील इस्लामिस्ट पक्ष, लष्करातील राजनिष्ठ व आयएसआय ही गुप्तचर संस्था यांचा एकदम संयुक्त पाठिंबा मिळाला. तिसरे, मध्य आशियातील मार्केट काश्मीरद्वारा पाकिस्थानच्या व्यापाऱ्यांना व उद्योगपतींना उपलब्ध झाले. सशस्त्र आतंकवादी कारवाया करण्यासाठी सौदी अरेबियाने डॉलर्सच्या थैलीचे तोंड बरेच उघडे ठेवले होते. काश्मीर हे या आतंकी मंडळीसाठी सोपे लक्ष्य *(इझी टार्जेट)* ठरले. त्यांना काश्मीरात कमीत कमी खर्च व जास्तीत जास्त फायदा दिसला. अफगाणिस्थानातून रशियन सेना घरी परतल्यावर निरनिराळ्या आतंकी गटांना धर्मयुद्धासाठी (जिहाद) काश्मीर मोठे घबाड हाती आले.

४. वायव्य पाकिस्थान : यास वझिरीस्थान म्हणतात. येथे अल काईदासकट अनेक आतंकवादी काम करतात. २००४ सालापासून येथील आतंकवाद सुरू झाला. या डोंगराळ प्रदेशात आतंकवाद्यांना लपायला सुरक्षित जागा - गुहा व बोगदे - बिन लादेनने बांधल्या होत्या. सोव्हिएट सैन्य घरी परतल्यावर अमेरिकेचे

काम झाले होते. ९/११ नंतर ह्या आतंकवाद्यांचा चटका अमेरिकेसही बसला होता. त्यामुळे पाकिस्थानवर 'हा खेळ आता बंद करा' असा अमेरिकेने दाब आणला. या खेळामुळे पाकिस्थान अर्थ व शस्त्रबळ या दोन्ही बाजुंनी समर्थ व समृद्ध बनला होता. म्हणून त्यांनी या राक्षसांना काश्मीरवर छू केले. पण या राक्षसांची भूक आता खूप वाढली होती. त्यांच्या पुढाऱ्यांना इस्लामिक स्टेटचे डोहाळे सुरू झाले होते. अतिशय शिताफीने मुशर्रफने दुहेरी चाल खेळून एका बाजूस अमेरिकेस खुश ठेवले होते तर दुसऱ्या बाजूस या राक्षसांना पोसणाऱ्या लष्करास. हा घातक खेळ फार काळ चालू ठेवणे अशक्यच होते. कारण येथील अल कायद्याचे आतंकी व अफगाणिस्थानातील आतंकी अमेरिकन सैन्यावर हल्ले चढवीत होते. अमेरिका भारत नसल्यामुळे तीने 'या तालिबान हल्लेखोरांना आवरा', अशी ताकीद पाकी लष्करास दिली. २००४ साली पाकी लष्कर व वझिरीस्थानातील तालिबान यांच्यात तुंबळ युद्ध सुरू झाले. पाकिस्थानातील सर्वात श्रीमंत शहर म्हणजे कराची. तेथील आंतरराष्ट्रीय विमानतळावर २०१४ साली आतंकवाद्यांनी हल्ला करून २६ लोक मारले. पाकी लष्कराने चिडून वझिरीस्थानावर हवेतून बॉंबिंग करून ३७६ आतंक्यांना पैगंबरवासी बनविले. साधे नागरिक किती खत्म झाले ते पाकिस्थानी लष्कर सांगत नाही. या ऑपरेशनचे नाव झर्ब-इ-अझब. महंमदाच्या तलवारीचे हे नाव होते. पाकिस्थान या लढाईवर एकदम चूप्प आहे, पण तेथून ५०,००० लोक निर्वासित म्हणून पळून अफगाणिस्थानात व पाकिस्थानात गेले, यावरून त्याच्या तीव्रतेची आपण कल्पना करून शकतो. या व्यतिरिक्त अमेरिका तेथे सक्रिय होतीच : २००८ व २०१३ या काळात अमेरिकेच्या प्रेसि. ओबामांनी ४०० ड्रोन हल्ले येथे चढविले. हेतू एकच - आतंक्यांना कमजोर बनविणे. आजवर पाकी लष्कर अमेरिकेशी फारसे सहकार्य करीत नसे, पण कराची विमानतळाच्या हल्ल्यामुळे 'आपणही सुरक्षित नाही' याचा त्यांना साक्षात्कार झाला. १४ एप्रिल २०१७ रोजी प्रेसि. ट्रंपने अफगाणिस्थानात दीड कोटी डॉलर्सचा ८,००० किलो (२२,००० पौंड) स्फोटक असलेला राक्षसी बॉंब (मदर ऑफ ऑल बॉंब्ज्) टाकला व डोंगरातील बंकर्समधील लपलेले ८२ आतंकी खतम् करून टाकले. पाकिस्थान ह्या धमकीचा अर्थ समजेल काय?

५. **फिलिपाईन्समधील बंडाळी** : ही चळवळ जानेवारी २००० पासून सुरू झाली. रॅडिकल इस्लामिस्ट गट व अलगतावादी शक्ती एकत्र आल्या व त्यांनी दक्षिणेस असलेल्या बेटांवरील नागरी महत्त्वाच्या वास्तूंवर तसेच बसेस, रेल्वे गाड्या, बाजार वगैरे ठिकाणी बॉंबिंग सुरू केले. तसेच मेट्रो मनिला येथेही बॉंबिंग

झाले. २००० ते २००७ या काळात ४०० फिलिपिनो ठार झाले व १५०० वर लोक जखमी झाले. याचे नेतृत्व अबु सय्याफ व राजाह सुलेमान गटांकडे होते.

पाश्चिमात्त्य जग

१. युएसए (अमेरिका) : ही एके काळी बोस्टन ब्राह्मण म्हणून ओळखले जाणाऱ्या आयरीश इंग्रजांची ही वसाहत फ्रान्सच्या मदतीने ब्रिटनशी स्वातंत्र्यसमर (१७७५-८३) लढली व जिंकली. गुलामीच्या प्रश्नावरून तेथे पुढे दक्षिण विरुद्ध उत्तर असे नागरी युद्ध (१८६१-६५) घडले व हा देश १८६५ साली स्वतंत्र झाला. त्याने दोन्ही महायुद्धात इंग्रजांना व फ्रेंचांना जर्मनीविरुद्ध जंगी मदत करून विजय मिळवून दिला. १९४५ नंतर जपान व जर्मनीस पुन्हा उभे करण्याचे श्रेय याच देशास जाते. मग मात्र इतके दिवस तटस्थ राहणारी अमेरिका 'जगाचा पोलीस' बनली. या नववसाहतवादी अमेरिकेचा युद्धोत्तर प्रवास तीन भागात झाला : (१) फॅसिस्ट वि. मित्र राष्ट्रे यातील गरम युद्ध (१९३९-४५), (२) अमेरिका व सोव्हिएट युनियनमधील शीत युद्ध (१९४६-१९९०) व (३) पुन्हा आता चीन महासत्ता बनल्यावर गरम युद्ध (२०१३ ते आजपर्यंत). थोडक्यात सांगायचे तर युद्ध, युद्ध आणि युद्ध.

इंग्रजांचा तो वसाहतवाद. अमेरिकेने सुरू केला तो नववसाहतवाद. आम्हास भूमी नको, आम्हास व्यापार पाहिजे. व्यापार म्हणजे फायदा. साधासुधा नाही, २०० टक्के, ५०० टक्के, १,००० टक्के फायदा. असा कोणचा व्यापार? गाड्यांचा, विमानांचा व शस्त्रांचा. शस्त्रे कोण विकत घेणार? राष्ट्रे व त्यांची सरकारे. पण शांतता नांदली तर शस्त्रांची जरूरच काय? म्हणून अमेरिकेने राष्ट्रा-राष्ट्रात भांडाभांडी जुंपवून दिली. सर्वत्र युद्धे सुरू झाली. हाणामाऱ्या, खून, बॉंब वर्षाव व रॉकेटचा मारा. रशियाने पहाता पहाता ही विद्या उचलली. त्यामुळे एकास अमेरिकेने तर त्याच्या शत्रूस रशियाने शस्त्रे पुरविण्याचा 'धंदा' सुरू केला. (त्याची छोटी आवृत्ती म्हणजे बडोद्यातील भोगीभाई पटेलांचा जातीय दंग्यांची कंत्राटे घेण्याचा धंदा! पुरे एक शतक त्याने राजकीय हिंसेचा धंदा केला व अफाट माया कमावली. त्याची विधवा आता लंडनमध्ये एका पॅलेसमध्ये राहते.) पूर्वी रशिया खेडवळ होता. १९१७ साली तेथे क्रांती घडली व दुसऱ्या महायुद्धानंतर तो एक महाशक्ती बनला. १९७९ साली त्यास अफगाणिस्थानावर स्वारी करायची दुर्बुद्धी झाली, एक दशक तो तेथे लढला पण त्यास पराभूत होऊन घर वापसी करावी लागली व पहाता पहाता गॉरबचावनंतर आलेल्या येल्टसीनने कट रचून या महाशक्तीचा ऑगस्ट १९९१ मध्ये अंत आणला. चीन रशियाचा चेला. रशियाचे पतन चीनसाठी

सुसंधी ठरली. त्यानेदेखील हा किफायतशीर 'धंदा' सुरू केला. भारतात जन्मलेला व वाढलेला एक महंमद अली लंडनला गेला, तेथे चर्चिलसारख्या इंग्रज राजकारण्यांनी त्यास चक्क 'वापरले' – इतके की देशाच्या फाळणीस तो कारणीभूत झाला. तसाच एक महंमद नावाचा सौदी श्रीमंत तरुण बैरुतमध्ये वाढला, अमेरिकेत इंजिनियर झाला, खूप पैसे कमावले, खूप मौजमस्ती केली, पण सन १९७३ मध्ये त्याचे आयुष्य संपूर्णपणे बदलले.

गौतम बुद्धाप्रमाणे. फरक एवढाच की बुद्ध अहिंसेचा पुजारी झाला तर हा महंमद हिंसेचा. त्याच्या इंजिनीयर पित्याची कंपनी होती इमारती व पूल बांधण्याची. नाव बिन लादेन कॉर्पोरेशन. हा महंमद त्याच्या पित्याच्या ५० मुलांपैकी एक. तो कम्प्युटर, अर्थशास्त्र व व्यवस्थापनशास्त्र या तीन विषयात तज्ज्ञ होता. बापाचा धंदा जोरात चालला होता. पैशाची म्हणून ददात नव्हती. १९७९ साली सोव्हिएट सेनेने अफगाणिस्थानावर स्वारी केली. हा महंमद ओसामा त्या लढाईत सामील झाला व त्यात महानायक म्हणून प्रसिद्धीस आला. पण आता त्याच्यात आमूलाग्र बदल झाला होता. तो आता अमेरिकेचा द्वेष करू लागला होता. अमेरिका नष्ट करण्याची भाषा बोलू लागला होता. अमेरिकेत तो 'मोस्ट वॉंटेड आतंकवादी' म्हणून ओळखला जाऊ लागला. त्याच्या डोक्यावर ५ लाख अमेरिकन डॉलर्सचे बक्षीस होते. कारण? याने अमेरिकेस धडा शिकविण्यासाठी आतंकवाद्यांची फौज उभी केली होती. त्यात सैनिक म्हणून अरब व अफगाण मुजाहिद्दीन होते, डॉक्टर्स होते, इंजिनीयर्स होते, मजूर होते, सारे लोक होते व तो त्यांना मोठाले पगार देई. त्याने १९८८ साली १,३२० मदरसा सुरू केल्या. १९९७ साली त्यांची संख्या २,५१२ झाली. त्यात सारे मिळून २,१९,००० विद्यार्थी (तालिब) शिकत होते. पाकिस्थानासकट सारी मुस्लीम राष्ट्रे व तेथील अमीर (श्रीमंत) या तालिबानांना पोसत होते व शिकवीत होते. यातूनच ओसामास त्याचे सैनिक (मुजाहिद्दीन) मिळत. या तालिबानांचा प्रमुख होता कंदाहारमधील मौलवी महंमद ओमर. या मंडळींनी मध्य आशियात त्यांचा प्रभाव वाढविला. त्यात पाच भूतपूर्व सोव्हिएट राज्ये होती, उदा. ताजिकीस्थान, किर्गीझिस्थान, तुर्कमेनिस्थान, कझकस्थान व ऊझबेकिस्थान.

या फौजेची ताकद ११ सप्टेंबर २००१ ला जेव्हा वर्ल्ड ट्रेड सेंटरचे दोन मनोरे खाली आले तेव्हा जगास कळली. अमेरिकेचे विमान, अमेरिकेचे पेट्रोल, अमेरिकेचे प्रशिक्षण, अमेरिकेचे प्रवाशी आणि अमेरिकेचा विनाश -- अमेरिकन मालहानी आणि अमेरिकन जानहानी. जगाच्या इतिहासात असे कधी घडले नव्हते.

(अपवाद डोनाल्ड ट्रंपचा. दुसऱ्या कोणाचा एकपण डॉलर न घेता त्याने स्वतःच्या खिशातून सारा खर्च केला व निवडणूक लढविली आणि हिलारी क्लिंटनचा आश्चर्यकारक पराभव केला होता. त्यांच्याविरुद्ध जेवढा विरोधी प्रचार झाला तेवढा क्वचित् कोणाचा झाला असेल! अपवाद नरेंद्र मोदी.) कदाचित् भविष्यात असे कधी घडणार नाही. ओबामांचे म्हणणे, मुस्लीम जगाच्या ऱ्हासास फक्त आणि फक्त अमेरिकाच जबाबदार आहे. दुसरा कोई नही.

अमेरिकेचे म्हणणे काय आहे? कलीयुगात सर्वांना समाधान होईल असा न्याय देणे अशक्य आहे. 'जगाचा पोलीस' म्हटला तर स्वार्थ सांभाळून इतरांची हिते सांभाळताना कोणास न्याय, कोणावर थोडा अन्याय होणारच, कारण सारेच साव व सारेच ठक-डाकू नसणार, हे खालील यादीवरून सहज लक्षात येईल :

- काश्मीर संघर्ष (लष्कर ए तोयबा, १९९० ते आजपर्यंत)
- सोमाली नागरी युद्ध (१९९१ ते आजपर्यंत)
- अल्जेरियन नागरी युद्ध (१९९१-२००२)
- बोसनियन युद्ध (बोसनियन मुजाहिद्दीन, १९९२-१९९५)
- अफगाण नागरी युद्ध (तालिबान, १९९४ ते आजपर्यंत)
- पूर्व तुर्कस्थान बंडाळी (१९९७ ते आजपर्यंत)
- चेचन युद्ध व उत्तर कॉकेशस (अरब मुजाहिद्दीन, १९९४ ते आजपर्यंत)
- नायजेरियन शरिया संघर्ष (बोको हराम, २००१ ते आजपर्यंत)
- ईराकी बंडाळी (आयसिस, २००३ ते आजपर्यंत)
- येमेनमधील अल कायदा बंडाळी (२०१० ते आजपर्यंत)
- सिरीयातील नागरी युद्ध (२०११ ते आजपर्यंत)

ही यादी वाचून तुम्ही म्हणाल, काय हा भयानक प्रकार आहे. ही तर युद्ध मालिकाच वाटते.

कबूल, पण ती मालिका म्हणजे अब्जावधी डॉलर्सची कमाई आहे तेही विसरता येत नाही. रोकड फायदा. तेही सोन्याच्या स्वरूपात. पुन्हा अमेरिकन सरकारच्या माथी पाप नाही. कारण, अमेरिकेत सारे खाजगी उद्योग असतात.

२. **घरात वाढणारा आतंकवाद** : येथे तीन प्रश्न सतावतात : (१) तो आतंकवाद कां, कसा व कोण वाढवितो? (२) त्यांना पैसा कोण पुरवितो? (३) त्यास प्रतिबंधक उपाययोजना कशी करावी? आतंक्यांचे उत्तर एकच : अमेरिका, अमेरिका व अमेरिका. सौदी अरेबिया, मुस्लीम बँका, मुस्लीम धनिक, अफगाणिस्थानातील धनाढ्य अफूचे शेतकरी, अपहरणातून वा खंडणीतून जमा

झालेली माया व मुख्यतः तेलाच्या बेकायदेशीर विक्रीतून गोळा होणारे डॉलर्स ही त्यांची जमेची बाजू. त्याची प्रतिबंधक उपाययोजना एकच : अमेरिकेची अर्थव्यवस्था तोडून-मोडून टाका, अमेरिकेस नष्ट करा. अमेरिकेस हे मान्य नाही? अमेरिकेच्या उपाय योजनेचे नाव आहे : डोनाल्ड ट्रंप. मुसलमान आतंकवाद्यांना आपण ठेचून काढणार, या वचनावर तर हा अमेरिकन अध्यक्ष निवडून आला आहे. अमेरिकेचे पाप अमेरिकेपाशी. भारतीयांना फक्त एकच प्रश्न सतावतो : ट्रंपचे व मोदींचे गोत्र जमेल ना? जमेल कारण १.२ अब्ज लोकांची बाजारपेठ.

३. जिहाद टुरिझम : साधारणतः रजेच्या काळात धार्मिक, वैद्यकीय उपचारासाठी, हवाफेर किंवा करमणुकीसाठी लोक प्रवास करतात. जिहाद प्रवास मात्र एकदम वेगळ्या कारणासाठी करतात - शस्त्र प्रशिक्षणासाठी. २०१० साली विकीलीक्समुळे जगास कळले की ह्या रॅडिकल इस्लामचे प्रशिक्षण घेण्यासाठी तरुण लांबून लांबून या छावण्यात (कॅम्प्स) जातात. ब्रिटीश व अमेरिकन मुस्लीम आतंकवादी जवान थेट सोमालियात प्रशिक्षणासाठी जात असत. कधी साहसापोटी, कधी धर्मासाठी तर कधी कोणी भडकावल्यामुळे हे तरुण प्रशिक्षित होतात. त्यांच्या प्रशिक्षणाच्या काळात त्यांचे ब्रेन वॉशिंग एवढे जबरदस्त केले जाते की ते आपणहून आत्मघाती बॉंबर म्हणून काम करायला तयार होतात. त्यांना सांगण्यात येते की ते हुतात्मे झाले तर त्यांचे स्वागत करावयास स्वर्गात शंभर हुऱ्या (अप्सरा) वाट पहात असतील! जेव्हा रशियन सैन्याने अफगाणिस्थानचा कबजा घेतला तेव्हा अमेरिकेने तेथे मदरसा-प्रशिक्षित जिहादी मुले भरती केले. त्यात ब्रिटन व फ्रान्समधून गोरे मुस्लीम तेथे पोचले व रशियनांविरुद्ध लढू लागले. महंमद सिद्दीकी खान व शाहजादा तनवीर हे दोघे अल कायद्याच्या अब्द अल हादी अल इराकी या कमांडरांच्या सहवासात आले, त्याने त्यांच्यावर मोहीनी टाकली व त्याने त्यांना इंग्लंडवर हल्ला करण्यासाठी उद्युक्त केले. ७ जुलै २००५ रोजी लंडन येथे बॉंबिंग झाले. त्यात चार आत्मघातकी होते - त्यातले दोघे म्हणजे हे खान व तनवीर. सौदी अरेबियातील काही श्रीमंत मुसलमान तरुण धर्मयुद्ध लढण्यासाठी अफगाणिस्थान व पाकिस्थान येथे पोचले. जर्मन गुप्तचरांना अल कुड्स या मशिदीत जर्मन आतंकवादी मुसलमान जमतात व त्यांचे आतंकी प्रशिक्षण अफगाणिस्थानात होते, असा सुगावा लागला. शेवटी त्यांना सुरक्षेसाठी या मशिदीला ताळे मारावे लागले. आपल्याकडे असे करणे अशक्य आहे. जरी माहिती कळली तरी कारवाई करताच निषेध मोर्चे व दंगे होण्याची शक्यता. गंमत म्हणजे त्यांना मदत करणारे आपलेच लोक असतात, उदा. फारुख अबदुल्लांनी श्रीनगरमध्ये दगडफेक करणाऱ्यांची बाजू

एप्रिल २०१७ मध्ये घेतली होती आणि राजा दिग्विजय सिंगांनी भारतीय जवानच आतंकवादी आहेत असे देशद्रोही भाष्य केले होते. यात मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्तीबाईदेखील मागे नाहीत. नाहीतर एवढे गुप्तचर व पोलीस असून तेथील शाळांना आगी कशा लागतात? ही शहाणी माणसे असे वेड्यासारखं कां वागतात? त्यांना स्वतःच्या देशावर प्रेम नाही? यात त्यांना काय सुख मिळत असेल? कोणचा लाभ मिळतो? ते कोणाच्या लाभासाठी असली कामे करतात?

४. **सिरीया** : सिरीयाची वस्ती १.७ कोटी. त्यात भर ४० लाख निर्वासितांची. हे खरे आर्मेनियन लोक. त्यात अरब रक्ताचे मिश्रण झाले. सिरीयन मंडळी जगभर आहेत. केरळात सिरीयन ख्रिस्ती मोठ्या संख्येने आढळतात. येथील ख्रिस्ती व मुसलमान लोक अरबी भाषा बोलतात. पूर्वी त्यांना असिरीयन (असूर) म्हणत. हा भाग पूर्वी रोमन साम्राज्यात होता. ७ व्या शतकांत त्याचे अरबीकरण झाले. १२ व्या शतकांत क्रुसेडस् (धर्मयुद्धे) झाली, त्यावेळी हे सारे मुसलमान झाले. येशू ख्रिस्त जी जुनी आर्मेनियन भाषा बोलायचा ती भाषा अजून काही ग्रामीण भागात वापरात आहे. २०११ साली अरब स्प्रिंगच्या सुमारास येथे आतंकवाद सुरू झाला. प्रेसि. बशर अल असाद यांची कारकीर्द भ्रष्ट होती. त्यांना काढून टाकण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले गेले, पण दडपशाही जास्तच वाढली. रशिया आणि हेझबोल्ला यांनी २०१४ साली सिरीयन सरकारलाच मदत केली. आयसिलवर नाटो देशांनी जोरात बॉंबिंग चालू केले. २०१७ च्या जुलैत मोसुल ही राजधानी आयसिसने गमावली.

५. **यु. के.** : ब्रिटनमध्ये २०११ साली २,७८६,६३५ मुसलमानांची वस्ती होती. ती एकंदर लोकवस्तीच्या ४.४ टक्के होती. इंग्लंडमध्ये सर्वात जास्त २,६६०,११६ म्हणजे लोकवस्तीच्या ५.०२ टक्के मुसलमान राहतात तर आयर्लंडमध्ये सर्वात कमी, म्हणजे ०.२१ टक्के. ब्रिटन हे आतंकवाद्यांचे केंद्र बनले आहे. याचे कारण कॉमनवेल्थमुळे अनेक जुन्या वसाहती (कॉलनीज्) देशातून येथे लोक सहज येऊ व जमू शकतात. पण तेथील गुप्तचर एवढे सक्षम व सक्रिय आहेत की त्यांना लगेच आतंकी कोण त्याचा वास येतो. सप्टेंबर २००१ ते डिसेंबर २००९ पर्यंत त्यांनी १८३४ आतक्यांना अटक केली, ४२२ जणांवर खटले भरले व २३७ जणांना तुरुंगात जावे लागले. तेथील सरकारने ५८ संघटनांवर बंदी आणली. त्यात आंतरराष्ट्रीय, आयरीश रिपब्लीकन व इतर ब्रिटीश संस्थांचा समावेश केला आहे. ब्रिटीशांना राजनिष्ठ असलेल्या संघटना त्यांना संपूर्णपणे मदत करतात. थोडक्यात भारताच्या बरोबर उलटे चित्र तेथे दिसते. आपल्याकडे अशी धरपकड झाली तर

काँग्रेसची व डावरी मंडळी एकत्र येऊन केवढी बोंबाबोंब करतील. मानवी हक्कवाले (ह्यूमन राईट्स) त्यांना पाठिंबा देतील. आणि त्यांचे सक्षम नेटवर्क हा 'अन्याय', हा 'छळ' आंतरराष्ट्रीय करतील. राष्ट्रीय हितासाठी सारे पक्ष एक, ही शिकवणूक शाळेपासून आपल्याकडे कधी देणार? काँग्रेसच्या आनंद शर्मांनी हे म्हणायला १४ जुलै २०१७ ही तारीख उजाडावी लागली.

भारतासाठी उपाय योजनांचे पर्याय

१. तोंडओळख : भारतास जेव्हा स्वातंत्र्य मिळाले तेव्हा त्याचे पंतप्रधान, राष्ट्रपती व राष्ट्रपिता भारताच्या संरक्षणाच्या बाबतीत एवढे गाफील होती की त्यांची त्या वेळची विधाने वाचली की हंसावे कां रडावे, तेच समजत नाही. कोणाला लष्करच नको होते, थोडेसे पोलीस ठेवले की बस्स आहे, असे वाटत होते, तर कोणास लष्करास खेडेगावात धाडून शेती करायला लावायचे होते. पाकिस्थानचे आमच्यावर उपकार आहेत की त्याने काश्मीरवर स्वारी करून आमच्या नेत्यांना सावध केले, जागे केले व टोळीवाल्यांच्या वेषातील पाकिस्थानी सेनेशी लढावयास पाठविले. जीनांनी सर्वप्रथम आमच्या नेत्यांच्या 'सत्य' व 'अहिंसा' च्या ढोंगाचा पर्दाफास केला. वेदांपासून रामायण-महाभारतापर्यंत आमच्या ऋषीमुनींनी आम्हाला हे सत्य शिकविले आहे की तुम्हाला आवडो कां न आवडो, पण जेथे माणसे रहातात तेथे राक्षसही वास करतात. तुम्ही त्यांना टाळू शकत नाहीत. त्या माणसातील जे वीर राक्षसांचा नायनाट करतात त्यांना 'देव पद' प्राप्त होते. श्रीरामास दंडकारण्यात धाडण्यामागे हाच हेतू होता की ते जंगल राक्षसमुक्त व भयमुक्त करणे. रामाने रावण संपवला. श्रीकृष्णाने "विनाशाय च दुष्कृतां" हेच आपले ध्येय आहे असे गीतेत ठासून सांगितले. जोपर्यंत हिंदूंनी हे ध्येय डोळ्यांसमोर ठेवले होते तोपर्यंत हे राष्ट्र 'हिंदू राष्ट्र' राहिले. जेव्हा काही हिंदूंनी गद्दारी करून परकीयांशी संगनमत केले तेव्हापासून ते 'हिंदू राष्ट्र' होण्याचे थांबले. आजही तो गद्दारीचा प्रकार चालू आहे. आजही आमच्याच रक्ताचे काही बांधव आसामातील उल्फा आतंकवाद्यांना, झारखंडापासून तेलंगणापर्यंतच्या लाल पट्ट्यात क्रिस्ट लेनिनिस्टांना, पंजाबात खलिस्थान्यांना व काश्मीरात पाक-प्रशिक्षित अल कायद्याच्या आतंकवाद्यांना या ना त्या मार्गाने मदत करीतच आहेत. हुरियतचे लोक पाकिस्थानचे पगारी दलाल आहेत याचे सरकारजवळ ठोस पुरावे आहेत. 'टाईम्स नाऊ' वर ते वेळोवेळी दाखविलेदेखील होते. या सापांना सरकार तरीदेखील दूध पाजीत राहते याचे कोडे सामान्य माणसाला गोंधळात टाकते. कदाचित् ते डबल एजंटस् असावेत.

त्यांच्या काही तक्रारी वा व्यथा असतील, पण हे राक्षस त्या कमी करण्याऐवजी त्यांच्या आगीत तेल ओतून मजा पहात आहेत. लक्षांत ठेवा, या त्यांच्या मजेत आत्तापर्यंत चाळीस हजार माणसे फुकट कामास आली आहेत. त्यात आमची इंदिरा गांधी नावाची एक प्रबळ पंतप्रधान ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी गेली, राजीव नावाचा एक भूतपूर्व पंतप्रधान २१ मे १९९१ रोजी ठार झाला व एक माजी लष्कर प्रमुख जन. अरुण वैद्य १० ऑगस्ट १९८६ रोजी मारला गेला.

सुदैवाने, भारतीयांना नरेंद्र मोदी नावाचा एक समर्थ, सक्षम व सशक्त पंतप्रधान लाभला आहे. भारतास असा एक नेता व महात्मा लाभला होता पण भोळेभाबडे भारतीय भलत्याच भोंदूबाबाच्या मागे लागले व त्यांनी आपण होऊन आपल्या पायांवर धोंडा मारून घेतला. परमेश्वराजवळ प्रार्थना करू या की आता त्यांना तशी दुर्बुद्धी होणार नाही व देशात 'दुष्कृतांचा विनाश' होऊन येथे शांतता व समृद्धी लाभेल. महाशक्ती होण्याचा तो एकमेव मार्ग आहे.

२. **हिंसात्मक** : भारतातील सेक्युलर कॉंग्रेसवाले व डावे सोडून कोणासही हा प्रश्न विचारा, उत्तर एकच येणार : ''पाकिस्थानास धडा शिकविण्याची वेळ आली आहे. पाकिस्थानाशी युद्ध केले पाहिजे, त्याचा नाश केला पाहिजे. आपण त्याचा ४-५ वेळा पराभव केला आहे, आणखी एक पराभव.'' लोक विसरतात, त्यावेळी पाकिस्थानाजवळ ॲटम बॉंब नव्हता. आज आहे. भारताचे जास्तीत जास्त नुकसान करायचे त्याचे ध्येय धोरण आहे. त्यामुळे जवळात जवळ मुंबई वर अणुबॉंब टाकायला तो जराही कचरणार नाही. त्याचा आपण वचपा काढू व त्यास जगाच्या नकाशावरून पुसून टाकू. ज्ञान म्हणजे विचार करून हो म्हणणे. शहाणपण म्हणजे विचार करून नाही म्हणणे. एवढी टोकाची भूमिका घेणे शहाणपणाची ठरेल काय, असे देशातील विचारवंत नक्कीच विचारतील. त्यासाठी अन्य पर्यायच नसेल तर तो मार्ग स्वीकारा (गो अहेड) असे ते म्हणतील. ते पर्याय कोणचे?

३. **अहिंसात्मक** : पूर्वी वाळीत टाकून माणसास हतबल करीत. ज्ञानेश्वरांच्या मात्यापित्यांना त्या पायी आत्महत्या करावी लागली, ते प्रत्येकास करू शकतो. जगात पाकिस्थान जर 'बदमाश देश' (रोग कंट्री) म्हणून जाहीर झाला तर त्याच्याशी संबंध ठेवण्यास इतर देश घाबरतील व तो देश अनाथ व एकाकी पडेल. जागतिक राजकारणात प्रत्येक देशास 'स्वार्थ' महत्त्वाचा असतो. त्यामुळे हे प्रकरण वाटते तेवढे सोपे नाही. विशेषतः पाक-चीन-रशिया दोस्ती सध्या वाढत आहे, हे लक्षात घेतल्यावर. साखरेवर रेशनिंग आणले की ती बाजारातून जशी गायब होते, पण काळ्या बाजारात मिळतच राहते, तसेच राजकीय नीतीचे आहे. दक्षिण आफ्रिकेस

अपार्थीड मुळे जगाने त्यास वाळीत टाकले होते, पण आपणच अनेक शस्त्रांचे स्पेअर पार्टस् त्याच दक्षिण आफ्रिकेतून विकत घेत होतो. त्यामुळे आतंकवाद्यांना नामोहरम करण्यासाठी निरनिराळ्या कल्पक युक्त्यांचा वापर करावा लागेल. जसे आपण बांगलादेशास स्वातंत्र्य मिळवून दिले व पाकिस्थानची मस्ती उतरविली तशी मदत आपण बलुचिस्थान व आझाद काश्मीर (पीओके) मधील बंडखोरांना देऊ शकू. तशी मदत 'जियो सिंध'वाल्या बंडखोरांदेखील पुरविता येईल. त्यासाठी सध्या आपल्यास मोदींसारखा समर्थ नेता लाभला आहे. आपल्याजवळ भरपूर राजकीय इच्छाशक्ती आहे. आपल्याकडे तुटवडा आहे तो अर्थाचा. सारी नाटके करता येतात, पण पैशाचे नाटक करता येत नाही. माझी खात्री आहे की नजिकच्या भविष्यात 'पाकिस्थान म्हणजे फक्त इवलासा पंजाब,' असे समीकरण सिद्ध झालेले आपल्यास पहावयास मिळेल.

सामर्थ्य आहे चळवळीचे ।
जो जो करेल तयाचे ।।

■■■

सावध ऐका, पुढच्या हांका

"काशी जाती मथुरा जाती ।
शिवाजी न होत तो, होत सबकी सुन्नत ।"

ही काव्यपंक्ती आपण नेहमी ऐकत आलो आहोत. उत्तर भारतात शीख गुरू गोविंदसिंग आणि बंदा बैरागी नसते तर त्याच काळात सुन्नी औरंगझेबाने पाकिस्थान जवळ जवळ निर्माण केलेच होते. त्याने शिवाजीला डोंगरातला चूहा (उंदीर) म्हटले होते. गांधीजींनी हिंदूंना "कॉवर्डस्" (भित्रे) व मुसलमानांना "बुलीज्" (गुंड) म्हटले होते. इंग्रजांनी बंगाली हिंदूंना 'स्त्रैण' म्हणून सतत हिणविले आहे. ब्रिटीश भारतीय लष्करात सैन्यातून पळून जाणाऱ्या सैनिकास (डेझर्टर) 'हिंदू' म्हटले जाई. स्वातंत्र्योत्तर इतिहासांत खुद्द भारतात असो, आसामात असो, कां फिजी वा ब्रिटन वा अमेरिकेत असो, हिंदूंनी नेहमी मारच खाल्लेला आहे. त्यामुळे हिंदूंच्या रक्तातच राजकीय जागृती नाही, हे सिद्ध होते. १९४७ नंतर त्यांच्यात ती राजकीय जागृती आणण्याची जबाबदारी हिंदू नेत्यांच्या खांद्यांवर आली. सत्तेवर आले ते एकजात हिंदूविरोधी, निरीश्वरवादी, निधर्मी व डावे काँग्रेसचे नेते. मुसलमानांच्या आधुनिक इतिहासातील प्रवासावरील माझ्या या ग्रंथाच्या शेवटच्या टप्प्यात वाचकांना सतावणाऱ्या पुढील पांच सोप्या वाटणाऱ्या प्रश्नांची उत्तरे आता मला द्यायची आहेत. त्याशिवाय हा ग्रंथ पूर्ण होऊच शकत नाही :

१. धर्माचा व राजकारणाचा संबंध आहे का? वैदिक व अब्राहमिक धर्मात फरक काय? तो कां?
२. धर्म म्हणजे काय? त्याची उत्क्रांती, फायदे, तोटे व अर्थकारण कोणचे?

३. इस्लाम हा मानवतेचा कॅन्सर आहे कां? असेल तर कां? आणि त्याची उपाययोजना? नसेल तर कां नाही?
४. संघर्ष कां होतात? ते कसे टाळायचे?
५. वाट चूकलेल्या मुसलमानांची गाडी रूळावर कशी आणावयाची?
६. समजा, तुम्ही मुसलमानांना सुधरविले व माणसाळविले. अशा नव्या परिस्थितीत हिंदूंनी त्यांच्याशी कसे वागावे?

भ्रांत तुम्हा कां पडे?

कधी माधव ज्युलियनांच्या या काव्यपंक्ती ब्रिटीशांच्या काळांत लिहिल्या गेल्या होत्या. स्वातंत्र्य मिळून आता ७० वर्षे झाली. अजून तो न्यूनगंड काही केल्या जात नाही. ते आमच्यावरील लादलेल्या ६७६ वर्षांच्या मुस्लीम (७११-१७०७) व ८९ वर्षांच्या ख्रिश्चन (१८५८-१९४७) गुलामगिरीचे फलित आहे. आम्हास जो इतिहास शिकविला जातो तो मुस्लीम-केंद्रित व युरो-केंद्रित आहे. सतत 'त्यांचा' विजय व 'आमचा' पराभव! 'ते' शूर आणि 'आम्ही' भित्रे भागूबाई. 'ते' गोरे व 'आम्ही' काळे. 'ते' दर्यावर्दी आणि 'आम्हा'वर सागर न ओलांडण्याचे बंधन. 'ते' मांसाहारी तर 'आम्ही' शुद्ध शाकाहारी. 'त्यांच्या' ज्ञानात विज्ञान व तंत्रज्ञान, आणि 'आमच्या' जवळ व्याकरण व मीमांसा. 'ते' गोमांसभक्षक तर 'आम्ही' गोमातापूजक.

मला सांगा, ५००-६०० वर्षे आमच्या विद्यार्थ्यांच्या मनावर हे असले दोषी शिक्षण ठोकून बसविल्यावर त्यांना न्यूनगंड येणार कां नाही?

जगात आम्ही एकटेच असे अभागी व अनाथ आहोत असे मला सारखे वाटे. पण पॅडी डोचर्टीचे *'द खैबर पास'* व 'एक्झोडस'च्या लिऑं युरीस या लेखकाचे *'द डॅगर'* वाचल्यावर कळले, आपण एकटे नाहीत, आपल्याबरोबर अफगाण व अरबदेखील साथीला आहेत. फरक एवढाच, ते त्यातून बाहेर पडले, अजून आपण अडकून पडलो आहोत. 'खैबर पास' वाचल्यावर लक्षांत आले, आपल्याला त्यांचे काहीच ज्ञान नाही. तुर्कदेखील गुलाम होते व ते गुलाम शिपाई म्हणून इतरांकडे चाकरी करीत. मध्य पूर्वेत कोणी खानदानी राजपुत्र नाही, कोणी सूर्य वा चंद्रवंशी नाही. अलिप्तिजीन गुलाम, त्याचा जावई सेबुक्तिजीन हाही गुलाम. महत्त्वाकांक्षेमुळे गझनीच्या गादीसाठी त्याने बंड तर केले, पण तो प्रयत्न फसल्यामुळे ९८६ साली त्याला काबूलला पळून यावे लागले. ९९७ साली सेबुक्तिजीन मरण पावला. त्याचा मुलगा महंमद. बापापेक्षा जास्त महत्त्वाकांक्षी. इतिहासात तो

महंमद गझनी म्हणून ओळखला जातो. त्याने १५,००० घोडेस्वारांच्या बळावर काबूलच्या जयपाल राजाचा पराभव केला. खैबर खिंड हाती आली. जणू भारतात शिरण्याचा परवाना मिळाला. तो खाली पेशावरमध्ये उतरला, मग पंजाबच्या राजा भीमपालचा पराभव केला. त्याने एकूण १७ स्वाऱ्या केल्या. याने व १००-१५० वर्षांनंतर घोरीच्या महंमदाने - हाही गुलाम शिपाईच - सारख्या स्वाऱ्या करून उत्तर हिंदुस्थान खिळखिळा केला. त्यांच्याच वंशातल्या एकाने - कुतुबद्दीन ऐबकने - दिल्लीवर ताबा मिळविला व तेथे गुलामांचे राज्य सुरू झाले. त्याने वास्तू बाटविण्याची सुरवात केली : दिल्लीतला हिंदू विष्णुस्तंभ (वराहमिहीरांची *ऑब्झर्व्हेटरी*) बाटवून त्याने त्याचा कुतुब मीनार बनविला. या वास्तुची 'घर वापसी' बावळट हिंदू अजून करू शकलेले नाहीत. त्यास गुलाम घराण्याचे राज्य म्हणतात. त्यानंतर ३० वर्षे खिलजी, ९२ वर्षे तुघ्लग, मग ३७ वर्षांसाठी सैय्यद व त्यानंतर ७५ वर्षे लोदींचे राज्य. त्याचा फायदा पुढे बाबरास १५२६ साली मिळाला. त्याची राजधानी आग्रा होती. त्याने राज्याचे साम्राज्य बनविले. सांगायचे तात्पर्य हे की तुर्की गुलामांना साम्राज्ये बनविता येतात, मग हिंदू वीरांनी मागे कां रहावे?

आणखी दोन ग्रंथ

माझ्या वाचनात आणखी दोन ग्रंथ आले. एक सॅम्युअल हटिंग्टनचा *'क्लॅश ऑफ सिव्हिलायझेशन'* व दुसरा केंब्रिज विश्वविद्यालयाने प्रसिद्ध केलेला व प्रो. जारेन रुबिन यांनी लिहिलेला *'रूलर्स, रिलिजियन्स अँड रिचीस : व्हाय द वेस्ट गॉट रीच अँड द मिडल ईस्ट डीड नॉट'.* त्याने समजले की इतिहास नीट कळायचा असेल तर जगाचा इतिहास समजायला पाहिजे, तर आपल्याकडे हिंदू असे कां वागले, मुसलमान तसे कां वागले, गांधी-जीना-नेहरू विशिष्ठ प्रकारे कां वागले, टिळक-सावरकर असे वेगळे कां वाटतात, वगैरे प्रश्नांची उत्तरे आपोआप हाती लागतात. आधुनिक इतिहास म्हणजे पृथ्वी या ग्रहाचा भूगोल, समाजशास्त्र, विज्ञान, कला, संस्कृती वगैरेंचा एकंदर व परस्पर संबंध असलेले ज्ञान आहे. रशियात ऑक्टोबर क्रांती होते व त्याचा परिणाम हिंदी माणसांवर होतो. अमेरिकेत सिव्हिल वॉर होते, इंग्लंडला कापूस मिळत नाही म्हणून वऱ्हाडाच्या कापसाला मागणी येते, दुसरे महायुद्ध संपते व इंग्रज ऑटोमन साम्राज्य निकालात काढतात. ह्या सत्य घटना न समजल्यामुळे गांधीजी खिलाफतीच्या मृगजळामागे धावत सुटतात व भारतीय राजकारण नासवतात - जगाचा इतिहास वाचल्याने ही सारी 'कनेक्शन्स्' समोर उभी राहतात. जगातील उलथापालथ समजली तर धर्म व

राजकारण यांचे 'कनेक्शन' समजू लागते.

या दोन ग्रंथांद्वारा आपल्याला आधुनिक अर्थकारणाचे ज्ञान होते. मध्ययुगात मध्यपूर्वेचे अर्थकारण युरोपच्या अर्थकारणापेक्षा कितीतरी पटीने पुढे होते. मग ते उलटले कशामुळे? इस्लाम व ख्रिस्ती धर्मामुळे? आधुनिक काळात युरोपातून ख्रिस्ती धर्म तर जवळजवळ उखडलाच गेला होता. त्यासाठी राज्यसत्ता कशामुळे टिकते ते आपण आधी जाणून घेऊ. सत्ताधीश सत्तेत टिकून राहण्यासाठी दोन लगाम वापरतात, कायदेशीर अधिकार व सक्ती. पहिल्यात या सत्ताधीशांना राज्य करण्याचा वैध अधिकार आहे असा लोकांना विश्वास वाटतो. दुसऱ्यात तो बळाने वा छळाने राज्य करतो. सत्ताधीश हे दोन अधिकार वापरण्यासाठी काही व्यक्तींचा उपयोग करतात, उदा. राजकीय मुत्सद्दी, टोळ्यांचे प्रमुख, आर्थिक प्रमुख, धर्मप्रमुख, पंडित, नट वा डॉक्टर्स वा वकीलांसारखी स्थानिक सुप्रसिद्ध मंडळी व तत्सम लोक. ही मंडळी सत्ताधीशांना ते 'मच वॉंटेड' कायदेशीर अधिकार मिळवून देतात. कारण या मंडळींचा समाजात दबदबा असतो. त्यांच्या मतास वा शब्दास किंमत असते. लष्कर वा पोलीसचे लोक, तसेच गुंड मंडळी यांचा लोकांवर धाक असतो. सत्ताधीश त्यांचाही उपयोग करून घेतात. त्यासाठी सत्ताधीशांना त्याची किंमत मोजावी लागते. कधी त्यांना करांपासून मुक्तता मिळते, कधी पद्मासारखी ॲवार्डस् तर कधी राज्यपालासारखी उच्च पदे. 'मी तुझे काम करून दिले, आता तू माझे हे काम करून दे,' अशी ही मंडळी सत्ताधीशांवर दाब आणू शकतात. सत्ताधीश कायदे व धोरणे अशी आंखतात की या मंडळींवर त्यास नियंत्रण ठेवता यावे. धर्मसत्ता राजसत्तेवर नियंत्रण ठेवू शकते, राजसत्ता धर्मसत्तेवर नियंत्रण घालू शकत नाही. पण राजसत्ता धर्मसत्तेस 'वश' करून घेऊ शकते, तीला 'विकत' घेऊ शकते वा 'धमकावू' शकते. डायबिटीस असलेल्या ७० वर्षांच्या कांची कामकोटीच्या ६९ व्या शंकराचार्यांना सूडबुद्धीने जयललिताने २००४ च्या नोव्हेंबर महिन्यात तुरुंगात टाकले. तेही खूनाच्या आरोपावरून. कां? कारण ते चालवीत असलेले एक धर्मादाय हॉस्पिटल शशीकलेला पाहिजे होते. असे कृत्य एखाद्या बिशपशी वा मौलवीशी करायची जयललितेची हिंमत झाली असती कां? याउलट, आसाराम बापूसारख्या खूनी साधूमुळे धर्मसत्ता भ्रष्ट होतेच, त्याबरोबर ती अर्थकारणही भ्रष्ट करते. कारण, अर्थसत्ता भ्रष्ट व्हायची शक्यता जास्त.

इस्लाम या वैध म्हणून सिद्ध व्हायच्या बाबतीत ख्रिस्ती धर्मापेक्षा जास्त नशिबवान आहे. याचे मूळ दोघांच्या जन्माच्या वेळच्या परिस्थितीत आहे. इस्लामच्या जन्माच्या वेळी पश्चिम अरबस्थान एका बाजूस सशक्त बिझांटीन साम्राज्य व

दुसऱ्या बाजूस ससानिद साम्राज्य अशा कात्रीत सापडले होते. महंमदास मदीनेच्या लोकांनी हात दिला, त्याची सत्ता स्थापन झाली, त्यामुळे मक्केवर तो राज्य करू शकला. हे सारे एकमेकाशी निगडित होते व त्यामुळे इस्लाम जगांत दुसऱ्या क्रमांकाचा धर्म बनू शकला. इस्लामी धर्मसत्ता हाती राजसत्ता असल्यामुळे कायदेशीर स्वरूप धारण करू शकली. येशू ख्रिस्त तेवढा नशिबवान नव्हता. आजूबाजूस सर्वत्र सामर्थ्यशील रोमन साम्राज्य होते. इस्लाम जन्माच्या पहिल्या शतकात जी घोडदौड करू शकला ती ख्रिस्ती धर्म करणे शक्यच नव्हते. ते करण्यास त्यास तीन शतके जावी लागली. ३१५ साली सम्राट कॉन्स्टेंटाईनने ख्रिस्ती धर्म *राजधर्म* म्हणून स्वीकारला व रोमचा बिशप त्यानंतर पोप बनला. ख्रिस्ती धर्मास कायदेशीर अधिकार मिळविण्यासाठी ३०० वर्षे झगडावे लागले. तोपर्यंत त्याची दोन विश्वे - राजसत्ता व धर्मसत्ता - वेगळी राहिली. म्हणून येशूस म्हणावे लागले, "सीझरला त्याला जे पाहिजे ते द्या आणि देवाला जे पाहिजे ते द्या." (मॅथ्यू २२.२१) क्रुसेडस्नंतर ख्रिस्ती धर्म बलवान बनला.

या परिस्थितीतील फरकामुळे इस्लामच्या अर्थकारणास एकदम भरभराट व समृद्धी आली. महंमदाने मक्केची तीर्थयात्रा आवश्यक केल्यामुळे मक्का व मदीना एकदम समृद्ध शहरे बनली. लुटीस धार्मिक पुण्य मानल्यामुळे सुरवातीच्या मुसलमानांना स्वाऱ्या व लूट करण्यास धर्माने सरळ सरळ उत्तेजनच दिले. सत्ता तुर्की गुलाम सैनिकांकडे गेली. त्यांनी उत्तर भारतावर सतत स्वाऱ्या करून गझनी व काबूल-कंदाहार ही शहरे हिंदुंच्या लूटीच्या बळावर श्रीमंत व समृद्ध बनविली. गझनीच्या महंमदाने एका स्वारीत एवढे हिंदू तज्ञ गुलाम पकडून आणले की प्रत्येक नागरिकाजवळ विकत घेतलेले १-२ गुलाम होते. त्यांनी मध्यपूर्वेस वास्तूशास्त्र, वैद्यक व वाजीकरण विद्या दिल्या. सुप्रसिद्ध अव्हीसेन्ना म्हणजे इब्न सिन्हा. तो त्यातला एक. या लूटीमुळे गझनी व बगदाद (भृगुदत्त) ही मध्यपूर्वेतील सर्वांत श्रीमंत, सर्वांत विद्यासंपन्न व सर्वांत सुसंस्कृत शहरे बनली. तीच हिंदुस्थानी 'मॅन पॉवर' वापरून गेल्या ५० वर्षांत ही आखाती शहरे पुनश्च लखलखीत बनली आहेत. इतिहासात सारखी पुनरावृत्ती होत असते, त्याचे हे सर्वोत्कृष्ट उदाहरण आहे. हे अर्थकारणाचे इ. स. १५०० नंतर गणित एकदम उलटे कां झाले? याची पुनरावृत्ती स्पेनच्या साम्राज्यात झाली. स्पेनच्या लुटारूंनी रेड इंडियनांचे शोषण करून जहाजेच्या जहाजे सोने लुटून आणून स्पेनच्या साम्राज्यास युरोपात 'सुपरपॉवर' करून टाकले. काळाच्या उदरात ते मागे पडले व ब्रिटनची ज्या साम्राज्यावर कधीही 'सूर्य मावळत नाही' अशी ओळख निर्माण झाली.

पण इ. स. १५०० च्या सुमारास जणू जादू घडली. त्यास सॅम्युअल हटिंग्टनने 'ग्रेट डायव्हर्जन्स्' हे नाव दिले आहे. त्या जादुमुळे भारतातील मोगलांचे साम्राज्य, युरेशियातील ऑटोमन साम्राज्य, चिनी किंगचे साम्राज्य, जपानचे टोकुगावा साम्राज्य व कोरीयाचे जोसेन साम्राज्य पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळले. ही जादू समजण्यासाठी धर्म म्हणजे काय, त्याची उत्क्रांती, त्याचे फायदे व तोटे समजून घेतले पाहिजेत.

धर्माची वैश्विक उत्क्रांती

अतिप्राचीन काळी इथिओपियात भूकंप झाला, भूमी दुभंगली, तेथे समुद्राचे पाणी आत शिरले, ३-४ फूट खोल असे मोठे लांबलचक तळे तयार झाले व भूमीवर राहणाऱ्या चार पायांच्या वानरांना श्वास घेण्यासाठी दोन पायांवर उभे रहावे लागले. वानराचा नर बनला तो असा अपघाताने. पूर्वी मान खाली होती. उभे राहिल्यामुळे समोरचे पाहण्यासाठी डोके सरळ व ताठ ठेवणे गरजेचे होते. दोन पायावर चालायचे म्हणजे पाठीचा कणा सरळ ठेवावा लागे. त्याचा परिणाम कमरेच्या हाडांवर झाला. ती रुंद झाली. त्यामुळे प्रसूती सुलभ होऊ लागली. मुलाचे डोके वाढले कारण मेंदूचा आकार वाढला. सुरवातीला माणूस व इतर प्राणी यात फारसा फरक नव्हता. तो रात्री गुहेत व दिवसा झाडावर राही व फळे खाई. झाडी कमी झाली व त्यास गवताळ प्रदेशात यावे लागले. दोन पायांवर माणूस चालू लागल्यामुळे हात मोकळे राहू लागले. मोकळ्या हातात कला आली. आता माणूस हत्यारे बनवू लागला. त्यामुळे शिकार करणे सोपे झाले. एकट्याने शिकार करणे धोक्याचे होते, म्हणून माणसाने समूहाने शिकार करण्याचे तंत्र शोधले. समूहात राह्यचे म्हणजे एकमेकांशी संवाद साधणे गरजेचे होते. संवादासाठी भाषा तयार झाली. पहिल्यांदा बोली, नंतर लेखी. त्यासाठी लिपी, कागद व लेखणी शोधली गेली. आणि पुढे छापखाना. गटाने राह्यचे म्हणजे गटाचे नियम आले, 'हे कर' व 'हे करू नकोस.' गट मोठे झाले, त्यातून टोळ्या निर्माण झाल्या आणि त्यातून पुढे समाज. समाजाचे नियम म्हणजे धर्म. धर्माचा हा प्रवास मोठा प्रदीर्घ होता. पुढील तक्ता थोडक्यात तो प्रवास सोपा करून सांगणारा आहे :

मानवाची सामाजिक व धार्मिक उत्क्रांती		
इतक्या वर्षांपूर्वी	समाजाचे स्वरूप	माणसांची संख्या
१००,०००-१०,०००	गट	१०-१००
१०,०००-५,०००	टोळी	१००-१,०००
५,०००-३,०००	गाव	१,०००-१०,०००
३,०००-१,०००	राज्य	१०,०००-१००,०००
२,००० ते आजपर्यंत	साम्राज्य	१००,०००-१,०००,०००

संघटित धर्माचे फायदे

लोकांना सामाजिक व आर्थिक स्थैर्य मिळवून देण्यासाठी धर्माची स्थापना झाली. संघटित धर्मात एक मध्यवर्ती प्राधिकाऱ्याची आवश्यकता असते. देशातील लोकांना सामाजिक संरक्षण देण्यासाठी त्यास कर गोळा करण्याचे अधिकार द्यावे लागतात. भारतीय व मेसोपोटेमियातील राज्ये धार्मिक असत. राजा व इतर अधिकारी यांना शासकीय व धार्मिक असे दोन्ही अधिकार असत. जगातील बहुतेक देशात अशी व्यवस्था असे, नावे निराळी असत, उदा. सम्राट, दलाई लामा, खलिफा, कैसर, इंग्लंडची राणी, वगैरे. ज्यांचे एकमेकांशी नातेसंबंध नाही अशा लोकांना 'बांधून' ठेवण्याचे काम संघटित धर्म करतो. गटात वा टोळ्यात एकमेकांचे नातेवाईक असतात, पण राज्यात वा साम्राज्यात लाखो लोकांचा एकमेकांशी कांहीच संबंध नसतो. पण ते धर्माच्या एका अदृश्य धाग्याने बांधलेले असतात. धर्म नसता तर ते एकमेकांत भांडले असते, त्यावरून टोळीयुद्धे झाली असती व अनेकांचे मुडदे पडले असते.

धर्मगुरूंच्या हाती अमर्याद सत्ता आल्यावर त्याच्या पाठोपाठ भ्रष्टाचार येतोच. नैतिक बंधने शिथिल होतात व पापपुण्याच्या बाबतीतील विवेक नष्ट होतो. रोमन साम्राज्यात हेच घडले व वाढत्या गुन्ह्यांमुळे रस्त्यावर चालणे असुरक्षित बनले. पॅक्स रोमनात त्या वेळी रोम शहरात ३२,००० वेश्या रहात असत. नीरो व कॅलिगुला यांच्यासारखे सम्राट मोठ्या मेजवान्या देत. लोक एवढे पीत की ते बिमार पडत! रोमन अधिकारी कॉलेसियममध्ये बसून ग्लॅडिएटर्सच्या रक्तबंबाळ लढाया पहात बसत व टाळ्या वाजवीत! इ. स. १८६ ते २८६ या १०० वर्षांच्या काळांत ३७ सम्राट झाले व त्यातील २५ जणांचा अंत खूनाने झाला होता! त्या इतिहासाची पुनरावृत्ती पॅरीसमध्ये घडली. कॅथॉलिक फ्रेंच साम्राज्य कां उडले? १६

व्या लुई राजाने एवढी पैशांची उधळपट्टी केली की त्यास कर भरमसाट वाढवावे लागले. गरीबांची उपासमार होत आहे अशी गरीबांनी तक्रार केली तर राणी मेरी अँटोनिओ म्हणाली, ''पाव मिळत नसेल तर केक खा.'' लोकांच्या रागाचा पारा एवढा वाढला की १६ वा लुई व मेरी अँटोनी राणीस १७८९ साली गिलोटीनला सामोरे जावे लागले.

संघटित धर्माचे अर्थशास्त्र

१७६० च्या पूर्वी, म्हणजे औद्योगिक क्रांतीच्या आधीचे, इंग्लंडचे आर्थिक चित्र आजच्या कोणच्याही मागासलेल्या देशातील चित्राहून निराळे नसे - दुबळी पायाविध सुविधा, दरिद्री दळणवळण, तांत्रिक नवीन उपक्रमांचा अभाव व नावीन्यपूर्ण कल्पनांचे दारिद्र्य, कामाच्या वाटणीचा अभाव, स्थानिक व्यापारावरच भर आणि क्षीण बँकिंग व्यवस्था. १७७६ साली ॲडम स्मिथने *राष्ट्रांची संपत्ती* हा ग्रंथ लिहिला व औद्योगिक क्रांतीस जबाबदार असलेल्या वेगवेगळ्या घटकांचा विचार सुरू झाला. तेथे मुबलक दगडी कोळसा व कोक असल्यामुळे पोलादाची निर्मिती होऊ लागली. कोळसा रेल्वेसाठी व जहाजांसाठी जळण म्हणून काम देई. सरकार युरोपात नव्या कल्पनांना व उद्योगांना उत्तेजन देते. याउलट, चीनने १४३२ साली महासागरातील जहाजांवर बंदी घातली. एके काळी चीन सागर प्रवासात अग्रभागी होता. भारताने सिंधूबंदी आणून परदेशी व्यापार अरबांच्या हाती सोपविला होता. युरोपात नव्या नव्या कल्पना पुढे येत होत्या. पूर्वजांच्या अतिप्रेमापोटी पौर्वात्यांची कल्पनाशक्ती आणि प्रयोगशीलता व नूतनतेची आवड थंडावली. ब्रिटनमध्ये स्वस्त भांडवल व जळण आणि मोठाले पगार यामुळे औद्योगिक क्रांती तेथे आधी आली, मग ती युरोपात पसरली. बंगालमधून केलेल्या लुटीवर इंग्लंडची औद्योगिक क्रांती पोसली गेली.

धार्मिक पर्यटन व्यवसाय *(रिलिजिअस टुरिझम)* हिंदू व मुसलमानी धर्मांना चांगले माहीत होते. ते मनात ठेवून त्यांनी काशी (बनारस) व मक्का शहरांचा विकास उत्तम प्रकारे घडविला. हिंदूंना रेकॉर्ड ठेवणे जमत नाही, त्यामुळे काशीचे आकडे देता येत नाहीत. कुंभमेळ्याचे आकडे मात्र ब्रिटीश काळापासून उपलब्ध आहेत. २०१३ साली २ महिन्यात मिळून तेथे १२ कोटी लोकांनी भाग घेतला. १० फेब्रुवारीस, म्हणजे मौनी अमावस्येस तेथे ३ कोटी लोकांनी भाग घेतला होता. हा जागतिक उच्चांक *(वर्ल्ड रेकॉर्ड)* आहे. मक्केचे आकडे उपलब्ध आहेत व ते आश्चर्यजनक आहेत. हज्जच्या मोसमात १९५० साली १००,००० यात्री होते ते

२००४ साली ३० लाख झाले. २०२० साली त्यांची संख्या ३.४ कोटींवर जाईल असा अंदाज आहे. अल सौदी कुटुंबीयांनी त्यावर ३५ अब्ज डॉलर्स खर्च करून यात्रेकरूंना एअर कंडिशनिंग, शौचालये, बाथरूम्स्, ठिकठिकाणी दिवे पाण्याची सोय, गर्दीचे व्यवस्थापन करणे, सीसीटीव्ही, ईमर्जन्सी एक्झिटस्, बस डेपो व अनेक जमिनीखालील पार्किंग गॅरेजस्ची सोय केली आहे. यात्रेकरूंना गरज आहे, म्हणून ते येतात, त्यांच्या सोयी पुरविणे हे आमचे काम नाही, असे बेदरकारी धोरण आपल्याकडे आढळते. गर्दीच्या नियंत्रणासाठी आता तर प्रत्येक देशाला किती यात्रेकरू, त्यांची 'क्वोटा' व्यवस्था सौदी सरकारने आता केली आहे.

संघटित धर्माचे तोटे

धर्माचे दोन प्रकार : कर्मकांड व अध्यात्म. कर्मकांडात पशुंचे मोठ्या प्रमाणावर बळी दिले जाऊ लागले. काही ठिकाणी तर नरबळीसुद्धा दिले जात. त्यांच्या अतिरेकातून लंबक एकदम दुसऱ्या बाजूस झुकला व अहिंसावादी जैन व बौद्ध धर्मांचे उदय पहावयास मिळाले. कालपर्यंत कलकत्याच्या काली मंदिरात रेडे कापले जात. सर्व धर्मांत धर्माच्या नावाने हिंसा केली जाई, पण इस्लामचा या बाबतीत उच्चांक आहे. याचे कारण, इस्लामने हिंसेस निषिद्ध मानलेले नाही. बिगरमुसलमानाची हत्या खुद्द धर्मानेच सांगितली आहे. जीवाच्या भयाने महंमदसाहेबांना हिजरत करावी लागली. धर्माच्या नावाने मक्केच्या बिगरमुसलमानांनी मुसलमानांची हिंसा केली. त्याचा सूड म्हणून मुसलमानांनी मक्का जिंकली, तेव्हा मुसलमानांनी इतरांची हिंसा केली. त्याची सुरवात बद्रच्या लढाईने (६२४) झाली. त्यानंतर उहुद (६२५), खंदक (६२७), मक्का (६३०) व हुनाईन (६३०) येथे धार्मिक लढाया झाल्या. कुराण यासाठी जिहाद हा शब्द वापरत नाही, हा अर्थ ८ व्या शतकाच्या उत्तरार्धात आला. त्यानंतर १० क्रुसेडस् (धर्मयुद्धे) झाली. महंमदाने काबाच्या मंदिरातील साऱ्या मूर्ती तोडल्या. अपवाद मन्नत देवाच्या मूर्तीची. ती सोमनाथास पळवली गेली. म्हणून महंमदांचे अपुरे राहिलेले काम महंमद गझनीने १०२४ साली पूर्ण केले. बाबर व औरंगझेबाने भारतात जिहाद केला. शियांनाही सोडले नाही. सुदैवाने, मुसलमानांनाही फूट, मत्सर वगैरे हिंदू दुर्गुणांची लागण लागली. औरंगझेबास गोवळकोंडा व विजापूर येथील शिया इस्लामी राज्ये बुडविण्याची दुर्बुद्धी झाली व सारा पैसा दख्खनच्या मोहिमांत खर्च झाल्यामुळे मोगल साम्राज्यही लयास गेले. उत्तर दक्षिणेस बुडविण्यास निघाली, पण झाले उलटेच. बऱ्याच शतकानंतर डीएमके व काँग्रेस संबंधांविषयी हेच म्हणता येईल.

रोमन साम्राज्याच्या पतनाचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे ख्रिस्ती धर्म. दयानिधी येशूने गौतम बुद्धाप्रमाणे रोमनांना शांतिप्रिय बनविले. बर्बरांनी त्यांच्यावर जे हल्ले चढविले त्यांचा मुकाबल करण्यासाठी रोमनांजवळ पुरेसे सैन्यच नव्हते. मरायला कोणी तयार नव्हते. सैनिकांना वेळच्या वेळी पगार द्यावा लागतो. तो सारा पगार ख्रिस्त्यांनी चर्चेस बांधण्यात खर्च केला! अमेरिकेतील ज्यूंप्रमाणे भारतात जैनांची आर्थिक साम्राज्ये होती व आहेत. त्यांची स्थिर राज्ये कधीच बांधली जाऊ शकली नाहीत, कारण त्यांची सारी संपत्ती दगडात, म्हणजे देवळे बांधण्यात जाते. तीच कथा स्वामी नारायण व इस्कॉन पंथियांची. जेवणात चरबी, प्रथिने व कर्ब यांचा सुमधुर तोल सांभाळावा लागतो. तो बिघडला की रोगांना आमंत्रण दिले जाते. राजकीय अर्थशास्त्रात असाच तोल सांभाळावा लागतो. मौर्य सम्राट अशोकाचा सारा पैसा फुकट्या भिक्षु व भिक्षुणींना पोसण्यात गेला व राष्ट्रीय खजिना खाली झाला. त्याचा सरळ परिणाम संरक्षण खात्यावर होतोच. अशोकानंतर मौर्य घराणे अस्त पावले.

१९४२ साली स्पॅनिशांनी मूरांकडून ग्रानडा जिंकून घेतले. मूर उत्तर आफ्रिकेत पळाले. ते चांचे बनले व त्यांनी तेथून स्पॅनिश जहाजांवर हल्ले चढविले. त्यांना तेथील काळ्या सुलतानांची मदत मिळत होती. म्हणून स्पॅनिश लोकांनी त्यांच्यावर हल्ले केले व ओरान, अल्जेअर्स आणि ट्यूनिस ही त्यांची ठाणी जिंकली. या लढयांत मुसलमान गुलाम बनविले जात व अमेरिकेत मळेवाले त्यांना विकत घेत. १७ व्या शतकात एकट्या अल्जेअर्समध्ये २०,००० गुलाम विकले गेले. गुलामांची विक्री हे धार्मिक युद्धाचे फलित समजता येईल. अफगाण राजा अहंमद शाहने १७६१ मध्ये मराठ्यांविरुद्ध जिहाद पुकारला होता. काबूलमध्ये १८९२ साली हझारांनी बंड केले. हजारो हझारांची मुंडकी कापून त्यांचे मिनारे उभे केले गेले व त्यांच्या बायकामुलांना गुलाम म्हणून विकले गेले. वहाब्बींनी १८०१ व १८०२ मध्ये कार्बाला हे शियांचे तीर्थस्थान जिंकून घेतले व इमाम हुसेनच्या कबरीचा विध्वंस केला. पश्चिम आफ्रिकेत १७५० व १९०० या काळात असे अनेक जिहाद झाले व त्यातून हजारो गुलाम विकले गेले. १७८४ साली चेनन वीर शेख मंसूरने रशियनांविरुद्ध असेच जिहाद पुकारले. गोऱ्या गुलामांना नेहमीच मोठी मागणी असे.

सांगायचे तात्पर्य हे की एकट्या भारतात हिंदूंची कत्तल झाली नाही. कत्तल, जिहाद व गुलाम बनविणे हे प्रकार मुसलमानांनी साऱ्या पृथ्वीवर केले. हिंदूंना सिंधूबंदीमुळे त्याची माहिती कळली नाही. ती कळली असती तर कदाचित्

त्यांनी तितक्याच क्रौर्याने त्याचा प्रतिकार केला असता, रणनीतीत फेरबदल केले असते, अधर्म युद्धाशी अधर्म युद्ध खेळले असते, क्षमाबिमा केली नसती.

इस्लाम हा मानवतेचा कॅंसर

कॅंसर हा शरीरातील विशिष्ठ पेशींच्या विकृत *(अॅबनॉर्मल)* वाढीचा विकार आहे. ती वाढ इतकी झपाट्याने होते की ती शरीराच्या इतर भागात वेगाने पसरते. त्यामुळे वजन घटते व रोजची शौचाची नियमितता बिघडते. कॅंसरच्या कारणात तंबाखू (२०%), जाडेपणा (१०%), चांगल्या खुराकाची कमतरता, दारुचे व्यसन व शरीराचे व्यायामास मुकणे, ही प्रमुख आहेत. जर कॅंसर लौकर लक्षांत आला तर त्यावर नियंत्रण ठेवणे सोपे जाते. त्याच्या उपायात रेडिएशन, ऑपरेशन, केमोथिरपी व टार्जेटेड थिरपी यांचा समावेश होतो. २०१५ साली ९.५ कोटी लोकांना कॅंसरची बाधा झाली होती. १.४ कोटी नवे रोगी दर वर्षी जोडले जातात. मानवी मृत्यूच्या संख्येत १५ टक्के रोगी कॅंसरने जातात. २०१० साली अमेरिकेस त्यांच्या कॅंसर रोग्यांना उपाययोजना करण्यासाठी १.१६ ट्रिलियन डॉलर्स खर्च आला. कॅंसर मूळच्या जागेहून निघून दूरच्या अवयवात कोठेतरी जातो व तेथे वाढतो. कॅंसरची वेगवान वाढ प्राणघातक ठरू शकते.

कॅंसरप्रमाणे इस्लामचा प्रसार व प्रचार अत्यंत वेगाने होतो. इस्लामने दूषित झालेल्या भागांत एवढी अस्वस्थता व बंडाळी माजते की त्याचे नियंत्रण साध्या उपायाने न होता तो भाग सैन्याच्या ताब्यात द्यावा लागतो. इस्लामची लागण झाली की शांतता बिघडते व कुरबुर सुरू होऊन तीचे पर्यवसन दंग्यात, म्हणजे रक्तपातात, होते. म्हणून प्रतिबंधक उपाय योजणे जास्त शहाणपणाचे ठरते. ईस्त्राएल-जपानसारखे काही देश या बाबतीत एकदम सावध आहेत, तर भारत, फ्रान्स, जर्मनी व इंग्लंडसारखे लोकशाही देश अर्ध सुप्तावस्थेत जगतात व नंतर हळहळतात. शोमेर मोशिआ यांनी या विषयावर ९ प्रकरणांचा एक ग्रंथ लिहला. त्यात तीन मुद्यांवर भर दिला आहे : (१) धिम्मिंना जाणा; (२) इस्लाम ही महाभयंकर तत्त्वप्रणाली आहे; व (३) इस्लामने स्वतःने स्वतःची कबर खोदली आहे. त्यात रोज मानवी रक्त सांडले जाते. डॉ. साम्म यांचा पुढील संदेश विचार करण्यासारखा आहे : "तुम्ही शरीरात एक महाभयंकर बिमारी घेऊन राहू शकत नाही. तुम्हाला ती बिमारी निपटून काढावीच लागेल. पाश्चिमात्य संस्कृती इस्लामच्या आजाराबरोबर राहू शकत नाही. ह्या बिमारीने आणखी लाखो जीव घेण्याआधी ही बिमारी संपविलीच पाहिजे."

शोमेरप्रमाणे अनेक विचारवंतांना वाटते की इस्लामचा या जगातून नायनाट केला तर जगात शांतता नांदेल व आधुनिक जग हे नंदनवन होईल. कॅंसर जसा भराभर वाढतो व शरीर नासवून टाकतो तसा ईस्लाम हा या जगास दूषित करून हे जग नासवू पहात आहे. कॅंसरला जसे ऑपरेशन करून तेवढा नासलेला भाग काढून टाकतात तसा इस्लामचा भाग लढून निकामा करावा, असे त्यांना वाटते. सिरीयात आज नेमके तेच चालले आहे. इस्लामने जगास चांगले असे काय दिले? युरोपला त्याने संख्या दिली, विज्ञान दिले, असे मानले जाते. युरोप ज्यास *अरबी न्युमरल्स* म्हणतात त्यास स्वतः अरब *हिंदू न्युमरल्स* म्हणतात! मुसलमानी वैद्यकशास्त्र व कामशास्त्र - ज्यावरून *एक हजार अरबी रात्री* लिहिले गेले - तर मूळातले हिंदू आयुर्वेद व कामशास्त्र आहे, अरबांनी फक्त त्याचे भाषांतर केले. इस्लामने जगास रक्तपाताशिवाय दुसरे काहीही दिलेले नाही.

मॅड्रिडच्या रेल्वे ट्रेनचे बॉंबर्स मुसलमान होते. बालीचे नाईटक्लबचे बॉंबर्स मुसलमान होते. लंडनच्या सबवेचे बॉंबर्स मुसलमान होते. मॉस्कोच्या थिएटर्समधील बॉंबर्स मुसलमान होते. बोस्टन शहरातील मॅरॅथॉनचे बॉंबर्स मुसलमान होते. पॅन-अमेरिकन फ्लाईटचे ९३ बॉंबर्स मुसलमान होते. एअर फ्रान्स एंटेबेचे हायजॅकर्स मुसलमान होते. इराणच्या एंबसीचे *टेक ओव्हर* करणारे मुसलमान होते. बैरुतमधील एंबसीचे बॉंबर्स मुसलमान होते. लिबियातील एंबसीचे हल्लेखोर मुसलमान होते. ब्यूनो एरेसचे आत्मघातकी बॉंबर्स मुसलमान होते. ऑलिंपिकमधील इस्त्राएलच्या टीमवर हल्ला करणारे मुसलमान होते. केनियातील अमेरिकन एंबसीवरील बॉंबर्स मुसलमान होते. सौदीतील खोबर टॉवर्सवर हल्ला करणारे मुसलमान होते. बैरुतमधील मरीन बॅरॅक्सवरील बॉंबर्स मुसलमान होते. बेसिअन रशियन स्कूलवरील बॉंबर्स मुसलमान होते. अमेरिकेतील ९/११ चे वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील बॉंबर्स मुसलमान होते. मुंबईतील रेल्वेचे, झवेरी बाझारचे व टाटांच्या ताज हॉटेलवरील बॉंबर्स मुसलमान होते. अचिले लॉरॉ क्रूझ जहाज पळविणारे बॉंबर्स मुसलमान होते. सप्टेंबर ११,२००१ चे विमान पळविणारे मुसलमान होते. सांगायचे तात्पर्य हेच की मुसलमानांनी जगभर धूडघूस घातला होता, ते आजही घालत आहेत व भविष्यात तीच कृत्ये करणार आहेत.

या उतलेल्या व मातलेल्या मुसलमानांना धडा शिकविण्याची जरूर आहे कां नाही?

आजच्या मुसलमानांप्रमाणे साडेचार हजार वर्षांपूर्वी नर्मदाप्रदेशात व पूर्व भारतात क्षत्रिय उतले-मातले होते, म्हणून चिडून जाऊन परशुरामाने २१ वेळा

पृथ्वी निःक्षत्रिय केली. वाल्मिकीने त्यास क्षत्रविमर्दन न म्हणता राजविमर्दन म्हटले आहे. याचा अर्थ, सरसकट क्षत्रियांचा संहार न करता, फक्त दोषी राजांचे परशुरामाने निःकंदन केले.

नेमके तसे निःकंदन आज सिरीयात आजचे परशुराम - ट्रंप आणि पुटीन - करीत आहेत.

आधुनिक लोकशाहीत तेथील नेते असे निःकंदनाचे प्रकार होऊ देणार नाहीत. लोकशाहीला चर्चा करणे व करू देणे मंजूर आहे, हिंसा करणे वा करू देण्यास परवानगी नाही.

मग त्यांची गाडी रूळावर आणण्यासाठी लोकशाहीत कायदा कोणचे मार्ग मंजूर करतो? विशेषतः हिंदूंची व मुसलमानांची 'असम' सामाजिक, राजकीय व आर्थिक परिस्थिती असेल तर --

त्यासाठी हिंदूंचे तसेच मुसलमानांचे स्वॉट ॲनॅलिसीस आपल्याला माहीत असावयास पाहिजे.

स्वॉट ॲनॅलिसीस

अ) हिंदू

१. **बलस्थाने** : देवभिरू, धर्मभिरू, जग काय म्हणेल? ह्या काल्पनिक भीतीमुळे झोप न येणे; पुण्यावर प्रेम व पापाची भीती; सरळ, शांतीमय व पुण्यवान जीवन जगण्याची कोशीश.

२. **नर्मस्थान** : वाचाळ, भित्रे, स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची क्षमता कमी, शिवाजी पाहिजे पण तो शेजाऱ्याकडे, माझ्या घरात नको, ही वृत्ती, भ्रष्टाचारास विरोध नाही, त्यागाच्या बाता, प्रत्यक्षात हावरट; राजकीय भित्रेपणाचे उदाहरण म्हणजे 'गर्वसे कहो हम हिंदू है'ला विरोध करणारे राष्ट्रपती झाकीर हुसेन यांच्या 'आय ॲम एव्हरी इंच अ मुस्लीम'ला विरोध करू शकले नाहीत; अंसारी या उपराष्ट्रपतींनी पद सोडल्यावर 'येथील मुसलमानांना असुरक्षित वाटते' असे विधान केल्यावर कोणी त्यांना जाब विचारला नाही, म्हणजे सारे भित्रे; इतिहासापासून काहीही न शिकणे हे वैशिष्ट्य; गांधीजींनी पुरोगामी जीनांना जवळ घेतले नाही, कट्टर व कडव्या मुल्लामौलवींनाच राजाश्रय दिला; स्वार्थ आधी, राष्ट्रहितं तदनंतरम्।

३. **संधिस्थाने** : १९२० साली असहकार चळवळीत ब्राह्मणेतरांनी भाग घेतला; इंग्रजांना अनुकूल असणारे मराठे राजकारणाच्या मुख्य प्रवाहात आले; थोडक्यात, ब्राह्मणेतर चळवळ आपल्या जातीयवादासह काँग्रेसमध्ये दाखल झाली;

महाराष्ट्रात ब्राह्मण राज्यकर्ते होते या वस्तुस्थितीत ब्राह्मणद्वेषाचे मूळ; त्यातून सत्तेची संधी; त्या चळवळीस विधायक स्वरूप न लाभल्यामुळे हिंसाचार व गांधीवधोत्तर ब्राह्मणाविरोधी जाळपोळ; जातीयवादी ही शिवी हासडली की तो झाला पुरोगामी; मुसलमानांचे लांगूलचालन म्हणजे पुरोगामित्व; राम मंदिराला विरोध म्हणजे पुरोगामित्व; खरे पौरुषत्व काँग्रेस व समाजवाद्यांच्या राजकीय षंढत्वाला विरोध करणे, नेमके ६० वर्षे तेच टाळले गेले; बाबरीनंतर व पुढे २०१४ नंतर परिस्थिती बदलली; हाती आलेली संधी घालविणे हे त्यांचे वैशिष्ट्य; १९२० ते १९४७ या काळात ३ संध्या त्यांनी घालविल्या : (१) दिल्ली मुस्लीम प्रपोजल्स् द्वारा संयुक्त मतदार संघाला संमती मुस्लीम लीगने दिली, पण हिंदूंनी 'नाही' म्हटले; (२) १९३५ च्या कायद्याखाली निवडणुका घेतल्या. काँग्रेस व मुस्लीम लीगचे निवडणूक जाहीरनामे सारखे होते. उत्तर प्रदेशात दोघांचे संयुक्त मंत्रीमंडळ यावे, अशी मुस्लीम लीगची इच्छा, पण नेहरू 'नाही' म्हणाले. त्यानंतर पाकिस्थानसाठी लीगची घोडदौड; (३) फाळणीनंतर भारतात सर्वांना समान अधिकार राहतील, अल्पसंख्यांकांना विशेष अधिकार राहणार नाहीत, याची घटनेत तरतूद करायची गरज होती. काँग्रेसवाले फाळणीपूर्व इतिहासापासून कांहीही शिकले नाहीत. ते न केल्याने काँग्रेसनेच जातीयवादास राजाश्रय दिला, उदा. काश्मीरात ३७० कलम व पोटकमल ३५ अ.

४. **भयस्थाने** : जातीयवादी व सरंजामी वृत्तीचे. त्यातून सुटका कोणालाच नको आहे. 'जो आला तो रमला' अशी अवस्था; उच्चवर्गीयात फुगविलेला अहंकार; गोळवलकर व सावरकर दोघे ब्राह्मण, पण दोघांची तोंडे विरुद्ध दिशांना. आणि यांनी 'हिंदूनो, एकत्र या' असा उपदेश लोकांना करावा? विकले जाणारे दलित पुढारी; मतपेढ्या म्हणून दलितांचा वापर; सत्तास्थाने मिळाली एवढ्यावर दलित नेते खुश; दलितांचे भले हा दृष्टिकोण नाही; थोडक्यात, सारी नाटकबाजी; खरे कांहीच नाही.

ब) मुसलमान

१. **बलस्थाने** : आर्थिक परिस्थिती वाटते त्यापेक्षा चांगली, कारण प्रत्येकजण कमावतो; दादागिरी रक्तात; सामाजिक आणि धार्मिक संस्थांची पुनर्मांडणी, हा प्रकार इस्लामी संस्कृतीत बसत नाही; एक ईश्वर, एक प्रेषित आणि एक धर्म ग्रंथ मानणारा समाज त्या संबंधात नेहमीच कडवा होता व आहे.

२. **नर्मस्थाने** : आपल्यापेक्षा जास्त सामर्थ्यवान असलेल्याशी दबून वागणारा; मात्र, आपल्यापेक्षा अशक्त असलेल्यास लाथा मारणारा; यांचा क्षात्रधर्म

सांगतो, काफीरास फसविणे, लुबाडणे, फसवून लग्न लावणे, बलात्कार करणे, हा अधर्म नाही; उलट शिकवितो, पराया माल अपना।

३. **संधिस्थाने** : शुक्रवाराच्या नमाजामुळे खूपच राजकीय जागृती; सैय्यद अहंमदांमुळे इंग्रजांशी, म्हणजे शत्रूशी, सहकार्य हा मूलाधार बनला; आजही त्यांची चीनशी दोस्ती चालूच आहे. काश्मीरात हुरियतवाले पाकिस्थानचे एजंटस् आहेत, असे 'टाईम्स नाऊ' या चॅनलने सप्रमाण सिद्ध केले; यामुळे कायद्यातून सुटता येईल पण प्रत्यक्षांत यांच्यावर विश्वास कोण ठेवणार?

४. **भयस्थाने** : जागतिक परिस्थितीमुळे धास्तावलेले, विशेषतः ९/११ नंतर; ९ ऑगस्ट २०१७ रोजी तर तसे सर्टीफिकेट खुद्द उपराष्ट्रपती अंसारी यांनी दिले आहे; कुराणात दारुबंदी, व्याजबंदी वगैरे चांगल्या गोष्टी आहेत, पण मुल्लामौलवी ते सांगीत नाहीत; त्यांनाही सुधारणा नको आहेत; त्यांना ''धार्मिक अल्पसंख्य म्हणून सवलती मागणे'', एवढेच पाहिजे आहे; पाकिस्थान निष्ठा बाळगून दहशतवादी कृत्ये करणे वा करविणे, कारण त्यासाठी त्यांना पैसे मिळतात; स्वार्थ हेच एकमेव धोरण वा तत्वज्ञान.

संघर्ष कां होतात?

भांड्याला भांडे लागले की ते वाजणारच. आपण एवढे लोक या पृथ्वीतलावर राहतो. माणसाला 'सामाजिक प्राणी' म्हटले आहे. माणूस एकटा राहू शकत नाही, त्याला इतरांचा सहवास लागतो. पुरुषांचा तसेच स्त्रियांचादेखील. माणूस एकटा पडला वा पाडला गेला तर तो वेडा होईल. त्यासाठी 'काला पाणी' सारखे तुरुंग माणसाने शोधून काढले. कारण एकांतवास ही मोठी शिक्षा आहे. पण लोकांच्या समूहात राहणे म्हणजे एक कला आहे, तसेच शास्त्रही आहे. कारण राह्यचे म्हणजे साळढाळ रहावे लागते, जमवून घ्यावे लागते, 'मी म्हणेन तेच खरे' असे वागून चालत नाही. कांही जण जात्याच भांडखोर असतात, त्यांना भांडल्याशिवाय बरेच वाटत नाही, खाल्लेले अन्न बहुधा पचत नाही. साधारण माणूस अशांना टाळतो वा जमवून घेतो. उगाच भांडून कशाला आपला वेळ, बुद्धी व शक्ती वाया घालवा असा तो साळसूदपणे विचार करतो.

संघर्ष कां होतात? लोकांत समान समजाचा अभाव असला तर संघर्ष होतो. बऱ्याच वेळा आपण आपला दृष्टिकोण दुसऱ्यापर्यंत पोचविण्यात कमी पडतो. कारण योग्य ते 'कम्युनिकेशन' करणे हे एक कौशल्य (स्कील) आहे. प्रत्येकांत ते नसते. बऱ्याच वेळा राजकारण आडवे येते. समोरच्या माणसाच्या

मनांत पाप असते, ते तो आपल्याला सांगू शकत नाही, ते तो लपवितो, त्याने गैरसमजूत होते, त्यातून वादावादी व वादे वादे जायते रक्तपातः।, नाईलाजाने.

संघर्ष कसे सोडवायचे?

संघर्षाचे प्रसंग नेहमीच येत असतात. ते सोडविणाऱ्यांची एक निराळी जात असते. अनेक वेळा त्यास दोन्ही बाजूंचा मार वा अपमान वा गैरसमज पचवावा लागतो. बरेच वेळा ते दोन पक्ष एक होतात व तुम्ही एकटे पडता. हे काम तसे चांगले आहे पण श्रेय मिळेलच असे गृहीत धरून चालू नये. जेव्हा श्रेय मिळते तेव्हा काही काळ तुम्ही नायक असता, तुमच्यावर प्रशंसेचा वर्षाव होतो. पण लोकांची स्मरणशक्ती फार काळ टिकत नाही, ते तुम्हाला लगेच विसरून जातात. अत्रे-फडके वाद माझ्या एका मित्राने सोडविला. त्याने त्यासाठी एक मोठा समारंभ केला. त्याचे त्या काळी १०-१५ हजार रुपये खर्च झाले असतील. 'सात्विक आनंदा'शिवाय त्याला दुसरे काही मिळाले नाही. इंदिरा-यशवंतराव वाद सोडवावा म्हणून मी खूप खटपट केली पण यशवंतरावांना त्यांची खोडी (मिसचीफ्) चांगली माहीत होती, म्हणून ते सतत 'नको, नको'च म्हणत राह्यचे.

संघर्ष कमी करणे, कायमचे मिटवणे वा तात्पुरते बंद करणे हे सुख व शांती मिळविण्याच्या दृष्टीने आवश्यक असते. त्याने फायदा दोघांचा होतो. संघर्षातून लढाई होते, त्यात एक जिंकतो व एक हारतो, हारलेला सूड घ्यायची संधी शोधतो व ती मिळाली की कोणच्याही मार्गाने तो समोरच्यास कसा खतम करता येईल ते बघतो. त्यापेक्षा संघर्ष जर टाळता आला तर दोघांनाही ते चांगले असते. संघर्ष सोडविणे अशक्य नसते. त्याचे पाच प्रकार आहेत :

१) **स्पर्धा** : तारुण्यात खूप उत्साह व खूप आशावाद असतो पण अनुभव कमी असतो. वयानुसार अनुभवांचा साठा वाढत जातो पण आक्रमक वृत्ती कमी कमी होते.

२) **हातमिळवणी करणे** : तुम्ही जिंकणार नाही ही जेव्हा खात्री असते, तेव्हा व्यवहारी माणूस नमते घेतो व समोरच्या पक्षास जाऊन मिळतो. कोणचाही व्यवहार नफा तोटा या दृष्टिकोनातून बघण्याची सवय करून घ्यावी लागते.

३) **सहकार्य करणे** : तशी वृत्ती लागते.

४) **टाळणे** : अहंकारी माणसास तो पलायनवाद वाटतो. समंजस माणूस नेहमी तोटा कमी झाला त्याचा हिशेब करतो.

५) **जमवून घेणे** : जमवून घेणे रक्तांत पाहिजे. त्यासाठी तामसी वृत्ती चालत

नाही.

एप्रिल २०१५ मध्ये जगाची लोकसंख्या साडेसात अब्ज होती. तज्ञांच्या मते ती २१०० साली सव्वा अकरा अब्ज होणार आहे. ह्या तज्ञांकडे अशी 'मॅथॅमेटिकल मॉडेल्स' तयार आहेत व ते तज्ञ थेट ३००० सालपर्यंतची प्रोजेक्शन्स देऊ शकतात. चीनने त्याची दखल घेऊन 'प्रत्येक जोडीस एकच मूल' असा कायदा केला व लोकसंख्येवर नियंत्रण आणले. भारतात 'सब भूमी गोपालकी', असे तत्त्वज्ञान असल्यामुळे व आणीबाणीत नसबंदीमुळे इंदिरा सरकार गडगडल्यामुळे (आणि आपले अल्पसंख्यांकांच्या मतपेटीस धक्का न लावण्याचे धोरण असल्यामुळे) आपण या बाबतीत एकदम बेदरकार राहिलो आहोत.

'ठेविले अनंते सुखी रहावे ।
चित्ती असो द्यावे समाधान ।'

हे आपले सध्याचे तत्त्वज्ञान आहे. आज (२०१२) जगात सर्वांत जास्त ख्रिस्ती २.२ अब्ज (३१.५%), त्या खालोखाल मुसलमान १.६ अब्ज (२२.३२%), निधर्मी १.१ अब्ज (१५.३५%) आणि हिंदू १ अब्ज (१३.९५%) आहेत.

जगाकडून आता आपण भारताकडे येऊ. १९७६ सालच्या घटनेच्या ४२ व्या सुधारणेमुळे भारत निधर्मी राज्य आहे. हिंदू, बौद्ध, जैन व शीख या चार महत्त्वाच्या धर्माचे भारत हे जन्मस्थान आहे. भारताचा सारा गतेतिहास धर्माधिष्ठित व म्हणून रक्तबंबाळ आहे. भारताच्या घटनेप्रमाणे 'धार्मिक स्वातंत्र्य' हा मूलभूत हक्क मानला गेला आहे. जगातील ९० टक्के हिंदू भारतात राहतात. मुसलमानांना त्यांचे होमलॅंड गांधी-नेहरूंनी पाकिस्थानच्या रूपाने देऊन टाकले व भाबडेपणाने भारतास निधर्मी ठरवून भविष्यात आणखी नवी पाकिस्थाने होण्यास मदत केली. हिंदूत - लोक व नेते - राजकीय जागृती नसल्याचा हा जंगी पुरावा आहे. मुसलमानांची संख्या वाढत आहे हे सत्य कॉंग्रेसने जरी दडवून ठेवण्याचा सतत प्रयत्न केला असला तरी सर्व सामान्य माणसालाही ते सत्य आता कळून चुकले आहे. जगातील तीन मोठ्या धर्मियात दोन धर्मिय लोकांची भारतात वस्ती आहे. सर्वांत जास्त मुसलमान इंडोनेशियात राहतात. २०११ च्या सेन्ससप्रमाणे भारतात १७.२ कोटी मुसलमान होते.

माणसे मारण्याचे शास्त्र आहे. त्यासाठी एक नेता लागतो व तो क्रूरकर्मा असावा लागतो. भारतात गुजराथ येथे २००२ साली माणसे मारली गेली. किती? जास्तीत जास्त १,०००. त्यापेक्षा राजीव गांधींनी सातपट जास्त शीख दिल्लीत व

आसपास मारले. नेहरू-गांधींनी फाळणीच्या काळांत १० लाख हिंदू व मुसलमान त्यांच्या धोरणांमुळे ठार केले. यापेक्षा मुसलमानांनी कितीतरी अधिक पटीने जास्त हिंदूंची कत्तल या देशात केली. आधुनिक काळातही या शास्त्राचा वापर आपल्यास पाहायला मिळतो - पण भारताच्या बाहेर. कांही घटना सांगतो म्हणजे खात्री पटेल. १९३९ साली नाझी जर्मनीने होलोकास्ट मध्ये ५० लाख ज्यू मारले. १९४१ साली रशियात तेवढेच ज्यू मारले गेले. युक्रेन या रशियातील प्रांतात १९३२ मध्ये १८ लाखांवर माणसे मारली. लोकशाही कंपुचिआत (कंबोडिया) १९७५ साली २० लाखांची कत्तल झाली. १९१५ साली ऑटोमन साम्राज्यात (तुर्कस्थान + सिरीया + इराक) १० लाख आर्मेनियनांची कत्तल झाली. १९९४ साली आफ्रिकेत रवांडा येथे काळ्यांची संख्या तीन कोटींवरून ३० लाखांवर आणली. युरोपातील देवीच्या रोग्यांनी वापरलेली पांघरूणे (ब्लँकेटस्) त्यांनी रेड इंडियन्सना फुकट बक्षीस म्हणून वाटली व ते पुढे होणारे भीषण नाट्य आरामात बघत बसले. या शास्त्रास *बायॉलॉजिकल वेपन्स्* म्हणतात. हे शास्त्र व ही शस्त्रे वैध नाहीत. विषारी वायू वापरणेदेखील अवैध आहे. पहिल्या महायुद्धांत फॉसजीन, क्लोरीन व मस्टार्ड गॅस सकल समुदायांच्या संहाराचे शस्त्र *(वेपनस् ऑफ मास डिस्ट्रक्शन)* म्हणून वापरले गेले व त्यामुळे १२ लाख माणसे दगावली. नोआखलीचा बिहारींनी मुसलमानांवर सूड घेतला. त्यामुळे भडकलेल्या मौ. आझाद व पं. नेहरूंनी तेथे बॉंबिंग केले असा उल्लेख तेथे त्यावेळी तेथे हजर असलेल्या बाळशास्त्री हरदास यांनी *'व्हॉट हॅपन्ड इन बिहार?'* या पुस्तिकेत आढळतो. दिल्लीत १९८४ साली ज्या रीतीने शीखांची कत्तल राजीव गांधीने केली त्यावरून हिंदू फारसे हिसंक नाहीत, असे विधान करता येणार नाही.

तेथे पाहिजे जातीचे ।
अग्नी तो चेतवावा रे चेतवावा ।
चेतवितासी चेतती ।
केल्याने होत आहे रे ।
आधी केलेच पाहिजे ॥

राजीवचा अपवाद सोडा, पण हिंदूंचा असा नियमित हिंसक ट्रॅक रेकॉर्ड नाही. त्यांच्यात *रुथलेसनेस* चा (निर्दयतेचा) *जीन* च नाही. आणखी एक अपवाद सम्राट अशोकाचा. त्याने कलिंगात १ लाख माणसे मारली आणि तो बौद्ध झाला. त्याच्या दसपट माणसे मारून अहिंसेचा पुजारी 'रघुपती राघव राजाराम' हे भजन ऐकायला तयार! त्यांना कधी बौद्ध व्हावेसे वाटले नाही! शूर वीर गांधीजींनी म्हणून

हिंदूंना 'भित्रे' असे विशेषण दिले असावे. त्यामुळे हिंदू हे 'संहार शास्त्र' लोकसंख्या नियंत्रणासाठी वापरतील ही शक्यता फार कमी. हे सारे समजल्यावर मुसलमानांच्या संख्येची गाडी मार्गावर आणण्यासाठी कायदेशीर मार्ग पुढीलप्रमाणे :

ते मार्ग तीन : १) त्यांच्यावर मानसिक दाब आणणे; २) त्यांचे संख्याबळ कमी करणे व ३) त्यांचे ब्रेन वॉशिंग करणे.

१) मानसिक दाब आणणे

त्यासाठी समोरच्याचे मनोबल प्रथम खची करावे लागते. त्यासाठी भय, छल, बल वा कपट वापरून समोरच्याच्या मनांत गोंधळ उभा करावा लागतो. गोंधळलेले मन चुका करण्यास सहज राजी होते. 'कसेही करा, पण या संकटातून मला बाहेर काढा, असे ते आक्रंदन करीत राहते. 'तू असहाय्य आहेस, तुला कोणी मदत करू शकणार नाही, तू शरण ये,' अशी मानसिक परिस्थिती निर्माण करावी लागते. ही पायरी हांसत पार पाडली तर रेप करणारा यशस्वी होतो. नाही तर मार खातो. आयबीएममध्ये *(इंडिया बिफोर मोदी)* कॉंग्रेस मुसलमानांच्या बाबतीत असे करण्यात सफळ झाली होती. म्हणून १९४७ ते २०१४ एवढा प्रदीर्घ काळ तीने राज्य केले. याउलट, वाजपयींनी पहिल्यांदा तर १३ दिवस, पण नंतर ५ वर्षे; मोरारजींनी दीड वर्षे, देवेगौडा व इंदरकुमार गुजराल यांनी १-१ वर्ष व चंद्रशेखर यांनी तर फक्त ८ महिने, राज्य केले. काय गंमत आहे, जे कत्तली करतात ते क्रूरकर्मा इतिहासांत अमर होतात, मग तो हिटलर असो, कां स्टालीन असो, कां चौ एन लाय असो, कां गांधी-नेहरू असोत. बाकीचे सारे विस्मृतीत जातात. Ruthlessness alone is immortal, everything else is mortal. Strange, very strange, but true. (निर्दयता एकमेव अमर होते, बाकी सारे मर्त्य असते. हे सारे विचित्र वाटते, पण ते वास्तव आहे.) दादूमियांचा हा दुसरा सिद्धांत पाचही खंडांना लागू होतो.

अ) पूर्वी

वैदिक काळात गार्गी, मैत्रेयी व इतर स्त्रिया ऋषींशी वादविवाद व चर्चा करीत. एकदम कांहीतरी घडले आणि स्त्रियांना घरात कोंडले गेले. ते कारण म्हणजे मुसलमानांची टोळधाड. तुलसीदासाने म्हटले, "धोल, गंवार, शूद्र, पशू, नारी, सकल ताडनके अधिकारी." बिहारच्या लालू वा शरद यादवांसारख्या नेत्यांची स्त्रीविषयक शेरेबाजी (उदा. कटा बाल किंवा रस्ते कैसे, जैसे हेमा मालिनीके गाल) ऐकली की आपल्यालाच शरम वाटते. अशा मंडळींनी स्त्री जातीला भारतात

मागे ठेवले, जसे गोठ्यातील गायी-म्हशी. तरीही, लालुने बिहारात १९९० ते १९९७ असे ७ वर्षे राज्य केले, हे विसरता येत नाही.

राम : आंधळ्या पुत्रप्रेमापोटी कैकयी राणीने भरतास राजा बनविण्याचा घाट घातला व सवतीच्या पुत्रास - रामचंद्रास - राज्याभिषेक व्हायच्या आधी एक दिवस १४ वर्षांच्या वनवासावर धाडले. शांतपणाने रामाने त्या आज्ञेचे पालन केले व ह्या काळाचा उपयोग दंडकारण्यांतील राक्षस व लंकाधिपती रावण यांना खलास करण्यात वापरला. रामायणात पावलापावलाला मानसिक दाब वापरून आपले काम करवून घ्यायचे कौशल्य प्रत्येक व्यक्ती दाखविते. कैकयी राजा दशरथाला दबविते तर सीतेने लक्ष्मणास शिव्याशाप देऊन त्यास कांचनमृग आणण्यासाठी जवळजवळ झोपडीबाहेर हांकलले.

कृष्ण : महाभारत म्हणजे श्रीकृष्णाने कौरवांवर एका मागून एक आणलेले मानसिक दाब. श्रीकृष्ण नसता तर दुर्योधन-दुःशासन या दुष्ट दुकलीने पापभिरू पांडवांना जन्मभर भीक मागीत फिरवत ठेवले असते. त्याचा कळस शिष्टाई व कुरुक्षेत्रावरील पहिल्या महायुद्धात झाला. पांडवांचा विजय झाला. ज्याला *सायकॉलॉजिकल वॉरफेअर* शिकायचे आहे त्याने फक्त श्रीकृष्णचरित्र वाचले तरी बस्स आहे.

अशोक : अफगाणिस्थान ते बांगलादेश असे भले मोठे साम्राज्य असलेला सम्राट अशोक महाभारतातील कर्णाचा अवतार वाटतो. त्याची आई कोणी राजकन्या नव्हती, ती एका सामान्य ब्राह्मणाची कन्या होती. बापास त्याच्या शौर्याचे कौतुक होते पण इतर मत्सरी मुलांच्या नादी लागून त्याने या पराक्रमी मुलास हद्दपार केले होते. त्याने खि.पू. २६० साली कलिंग (ओरीसा) देश जिंकला खरा पण १ लाख लोकांचा संहार करून. त्याला त्याचे ६ भाऊदेखील ठार मारावे लागले. पण ती काळाची गरज होती. सारे द्वेषाने एवढे भारलेले होते की त्यापायी साम्राज्य खलास झाले असते. चंद्रगुप्त मौर्याचा हा नातू तसे बरे होऊन देईल? हा सारा मानसिक खेळ तो खेळला, पण ह्या ब्राह्मणीपुत्राचे मन त्यास विचारू लागले, ''पण हे सारे कशासाठी?'' यातून त्याने 'अहिंसा परमो धर्मः' हे मानणारा बौद्ध धर्म स्वीकारला व तो श्रीलंका आणि मध्य आशियात नेला. म्हणजे, याने पांडवांप्रमाणे विजय तर मिळविला पण त्याला तो विजय पचविता आला नाही. तीच कथा औरंगझेबाची. मात्र, शिवाजीने तो विजय मिळविला, पचविला व त्यातून मराठी साम्राज्य निर्माण झाले. औरंगझेब गेला व साम्राज्य पत्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळले. त्याची शोकांतिका म्हणजे त्याचे शव सुरक्षितपणे औरंगाबादेस नेण्यासाठी मराठा सेनेचे

अभय मागावे लागले व ते मराठ्यांनी उदारपणे दिले. मराठे मुसलमान असते तर त्यांनी बादशहाचे शव पळविले असते, मुंडके कापून ते भाल्यात टोचून गडावर प्रदर्शित केले असते! जशास तसे वागल्याशिवाय समोरच्या शत्रूत धाक निर्माण होत नाही. दुष्ट राहू देत, त्यांचा दुष्टपणा जावो असे पसायदानात म्हणणाऱ्या ज्ञानेश्वराचे हे मराठे वंशज. जशास तसे हेदेखिल त्यांना शिकवावे लागते!

खलिफा : महंमदानंतर त्याच्या गादीवर जो बसतो त्यास खलिफा म्हणतात. जिहाद पुकारणे, काफिरांची कत्तल करणे, त्यांना गुलाम म्हणून विकणे किंवा त्यांच्यावर जिझिया कर फटकारणे हे सगळे अधिकार खलिफांच्या हाती असत. इजिप्त देश मुसलमानांनी जिंकला तेव्हा 'अलेक्झांड्रियातील ग्रंथसंग्रहालयाचे काय करायचे?' असा प्रश्न उभा राहिला. खलिफाने फर्मान काढले, "तेथील ग्रंथ कुराणाशी जुळते असतील तर त्यांची जरूर नाही. ते कुराणाविरुद्ध असतील तर ते कुचकामाचे, त्यांना आग लावावी." इंग्रजांनी मध्य आशियात आपली जरब बसविण्यासाठी ही खलिफांची व्यवस्थाच नष्ट केली. त्यांचे श्रेष्ठत्व आपोआप सिद्ध झाले.

बाबर : बाबराने एप्रिल १५२६ मध्ये पानिपतच्या (कुरुक्षेत्रात) मैदानावर हांसत पराभव करून दिल्ली व आग्रा काबीज केले. १५२७ साली राणा संगाने बाबरास हांकून लावण्यासाठी साऱ्या राजपुतांना एकत्र केले. बाबराच्या ज्योतीष्याने भविष्य वर्तविले की तो हे युद्ध हारणार. बाबराचे सैनिकदेखील लौकर घरी परत जाण्यासाठी उत्सुक होते. सारी दारुची पिपे बाबराने ओतून टाकली व जिहादची घोषणा केली की 'आपण अल्लासाठी लढत आहोत.' त्याच्या कुशल मानसिक दाब आणण्याच्या नीतीमुळे बाबर जिंकला व राणा संग हारला. बाबराच्या ह्या मानसिक दाबामुळे मोगल साम्राज्याची सुरवात तर छान झाली. हे साम्राज्य १७०७ साली औरंगझेबाच्या मूर्खपणामुळे संपले.

अकबर : इतर धर्मांचा तौलनिक अभ्यास केल्यावर या सम्राटास 'इस्लाम हा सदोष आहे', असे वाटले. पर्यायी धर्म म्हणून *दीने ईलाही* हा नवा धर्म स्थापन केला. त्याच्या दरबारातील मुल्ला मौलवींना हे वागणे पसंत नव्हते पण बादशहासमोर त्यांचे कांही चालत नसे. मुकाटपणे त्यांनी तो मानसिक दाब सहन केला.

औरंगझेब : शिवाजी जिवंत असेस्तोवर औरंगझेबाने दख्खनकडे लक्ष दिले नाही. शिवाजी १६८० मध्ये गेल्यानंतर १६८१ साली तो १ लक्ष सैन्य घेऊन दक्षिणेत जिहाद करण्यासाठी उतरला व १७०७ साली तेथेच मरण पावला. त्याला सारा भारत मुसलमान (दारुल इस्लाम) करावयाचा होता. अकबराने त्याच्या राजवटीत (१५५६-१६०५) बऱ्याचं इस्लामविरोधी गोष्टी केल्या. सनातनी बदौनीने

त्याचा सारा वृत्तांत लिहून ठेवला आहे. पुरोगामी अबुल फझल यास अकबराचे प्रयोग मंजूर होते. सनातनी औरंगझेब जणू आपल्या आजोबावर व काफरांवर सूड घेत होता, त्यांच्यावर मानसिक दाब आणीत होता व त्यांना मुसलमान बनवीत होता. त्यांच्यावर जिझिया कर टाकीत होता. मथुरा, काशी व अयोध्या येथील हिंदूंची सुप्रसिद्ध मंदिरे तोडीत होता. ब्राह्मणांना तीर्थक्षेत्रांना जायला मनाई करीत होता. तो मेल्यावर रामदासांनी सुटकेचे उद्‌गार काढले,

''बुडाला औरंग्या पापी ।
म्लेंछसंहार जाहला ।।
उदंड जाहले पाणी ।
स्नानसंध्या करावया ।।
जपतप अनुष्ठाने ।
आनंदवनभुवनी ।।''

ब) आता

गांधीजी : त्यांच्या राजकारणाचा मुख्य आधार हिंदू-मुसलमान ऐक्यावर होता. नेत्यांस कोणचेही धोरण राबविण्यासाठी सल्लागारांची गरज भासते. मुसलमानांच्या राजकारणाचे अभ्यासक जदुनाथ सरकार, लजपत राय, सावरकर वगैरेंसारखे तज्ज्ञ सल्लागार गांधीजींनी निवडले होते कां? नाही, त्यांनी शोधून शोधले ते सारे जातीय, जहरी व झनूनी मुसलमान. पहिले दिल्लीचे डॉ. अंसारी अपवाद. मग आले अल्ली बंधू - शौकत व महंमद. एकाने त्यांना जाहीरपणे शिव्याशाप दिले तर दुसऱ्याने त्यांच्याकडून त्याच्या 'कॉमरेड' या पेपरसाठी बरेचसे पैसे उकळले. जीना पुरोगामी होते. गांधीजी त्यांना शत्रू मानीत. २६ ते ३१ डिसेंबर १९२० च्या नागपूरच्या ३५ व्या कॉंग्रेसमध्ये जीनांचा कांटा काढला व आपल्यास अधिकृतपणे 'लोकमान्य टिळकांचा वारस' म्हणून घोषित करवून घेतले. मौलाना बंधुंच्या जागी पुढे मौ. आझाद आले. या आझादांनी गांधीजींचे कान भरले व सरदार पटेलांना गांधींचे शत्रू बनविले. गांधीजी या मुसलमान सल्लागारांच्या इतके आहारी गेले होते की पूछो मत. संभाजी कब्जी कलुशाच्या जसा संपूर्णपणे आहारी गेला होता ना, तस्सा प्रकार. किंवा जाफर शरीफची पंतप्रधान 'हंबल फार्मर' देवी गौडांवर जशी मोहिनी होती तशी. या मुसलमानांच्या 'हिप्नोसिस'मुळे यांना हिंदूंचे हित पाहणे वा जपणे कधी जमलेच नाही. त्यांनी जन्मभर मुसलमानांसाठी परिश्रम केले व मुसलमानांनी सतत त्यांना झिडकारले. गांधीजींची ही शोकांतिका कोणालाही रडवणारी आहे.

नेहरू : गांधीजींनी नेहरूंना आपला लाडका चेला उगाच नाही निवडले, नेहरूंचे सारे सल्लागार एकजात हिंदूविरोधीच होते. सुरवातीला एफ.टी. ब्रुक्स व नंतर मोतीलालांच्या प्रभावाखाली ते वावरत. मोतीलालांनी जवान जवाहरला लाला लाजपत-मालविया गँग पासून 'बचके रहेना'चा सल्ला दिला होता. या गँगने मोतीलालांच्या गोमांस खाण्याचा, शराब पिण्याचा व मुसलमान बाया ठेवण्याचा एवढा बभ्रा केला की काशीचे सनातनी लोक त्यांना मते देईनात! धिंग्रांचे हौतात्म्य घडले त्या काळात जवाहरलाल बॅरीस्टरीचा अभ्यास करीत होते. इंग्रज शिक्षक व मोतीलालांच्या प्रभावाखाली धिंग्रांशी आपले कांहीही सोयरसुतक नाही अशा थाटात ते तेथे वावरत होते. आत्मचरित्रातही धिंग्रांचा उल्लेख नाही. काँग्रेसमध्ये व पुढे अहमदनगरच्या किल्ल्यांत त्यांचे सूत फक्त समाजवाद्यांशी व मुसलमानांशी, विशेषतः मौ. आझादांशी. *भारताचा शोध* हा ग्रंथ त्यांनी अहमदनगरच्या किल्ल्यात मौ. आझादांना विचारत विचारत संपन्न केला. १९२७ साली ते ब्रुसेल्सला व १९२८ साली ते रशिया येथे गेले. तेथे त्यांच्या मनावर साम्यवादी संस्कार झाले. एवढे की अमेरिकन्स त्यांना 'क्रिप्टोकम्युनिस्ट' म्हणत. लंडनला कृष्ण मेननमुळे ते क्रिप्स, ॲटली वगैरे इंग्रज समाजवाद्यांच्या वर्तुळातच रमत. सरदार पटेल १९५० मध्ये गेले. तोपर्यंत त्यांचा समाजवाद नियंत्रित होता. लोकांनी पुढे त्यांचा अनियंत्रित समाजवाद चालवून घेतला, पंचवार्षिक योजना, सरकारी कारखाने, हिंदी-चीनी भाईभाई, रशियन कोलॅबोरेशनचे उद्योग वगैरे योजनांचा स्वीकारही केला, पण १९५५ साली आवडी येथे मात्र त्यांना 'सामूहिक शेती'च्या प्रश्नावर प्रखर विरोध झाला. नेहरूंना संरक्षणाचे काही समजत नव्हते, सुरवातीला ते मौंटबॅटनच्या सल्ल्याने व पुढे कृष्ण मेनन यांच्या सल्ल्याने चालले. त्याचा फटका १९६२ साली त्यांना बसला. त्यांनी १९६२ साली केनेडींना कळवळून लिहिलेले पत्र वाचले की या महापुरुषाची दया येते. त्यांना लखवा झाला व १९६४ मध्ये त्यांचा अंत झाला. नेहरू तीन मानसिक दाबांचे दुर्दैवी बळी ठरले. त्यात देशाचे व हिंदूंचे अतोनात नुकसान झाले. ते तीन मानसिक दाब पुढीलप्रमाणे : (१) सुभाषबाबुंच्या पाठीत खंजीर खुपसला ती खंत; (२) लष्कर व राष्ट्रवादी आपल्याविरुद्ध बंड तर करणार नाहीत ना? ही धास्ती, व (३) सावरकर व गोळवलकर, म्हणजे सभा व संघ चुकून एक झाले तर आपल्यास पदभ्रष्ट तर करणार नाहीत ना? ही भीती, म्हणून त्यांनी या तिघांच्या समान शत्रूस-डाव्यांना-आपले साथी म्हणून पसंत केले. त्यामुळे हिंदुत्ववादी व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष काबीज करतील ही समस्या आपोआप मिटली.

इंदिरा : हे पित्याचे गुपित माहीत असल्यामुळे इंदिरेने आपले सल्लागार सतत बदलत ठेवले. पित्यास काश्मीरच्या प्रश्नावरून खड्ड्यात टाकल्यामुळे तीचे अँग्लोअमेरिकनांशी फारसे कधी सूत जमले नाही. 'गरिबी हटाव' व 'सीआयए हटाव' ही तीच्या राजकारणाची दोन प्रमुख सूत्रे होती. ती फारशी कोणाच्या प्रभावाखाली आली नाही, मात्र लोकांवर तीचा 'अम्मा' म्हणून छान प्रभाव होता. तीचा पहिला राजकीय इंग्रजी चरित्रकार (Can Indira Accept This Challenge? या ५५० पानी पुस्तकाचा) म्हणून सांगावेसे वाटते की ती माधुरी दिक्षीतप्रमाणे ती एका कोकणस्थ ब्राह्मणाची सौ. झाली असती. तीच्या जीवनात दोन मुसलमानांनी तीला फसविले. पहिले १९४१ साली फिरोझ गांधींनी, व दुसरे जून १९७२ मध्ये पाकिस्थानचे पंतप्रधान झुल्फिकार भुट्टो यांनी सिमला कराराच्या वेळी. ९३,००० पाकी सैनिकांना मुक्त करताना काश्मीर प्रश्न कायमचा सोडविण्याची सुवर्ण संधी तीच्या हाती आली होती. नटसम्राट भुट्टोच्या नाटकास ही कसलेली व मुरब्बी राजकारणी बाई फशी पडली नसती तर काश्मीर समस्या कायमची सोडवून तीने देशास केवढी शक्ती दिली असती!

राजीव : प्रमुख सचिव अलेक्झांडर यांच्या मानसिक दावाखाली राजीव बाथरूममध्ये विरघळला व पायलट राजीव 'अपघाता'ने पंतप्रधान बनला. तो तसा बनला नसता तर नेहरू-गांधी कुटुंबाची कैक हजार कोटी रुपयांची मिळकत पुढील परक्या पंतप्रधानाने बाहेर काढली असती! नेहरूंप्रमाणे राजीवला खोडसाळ सल्लागार भेटले व त्यांनी त्यास १९९१ साली खड्ड्यात ढकलले व पार गाडून टाकले. १९६८ सालापासून त्याचे ग्रह बिघडले व त्याने सोनियाशी लग्न लावले. (म्हणून ती राहुलला लग्नच करून देत नाही!) १९८० सालापर्यंत तो राजकारणापासून दूर राहिला. संजयच्या अपघातानंतर त्यास नाखुशीने राजकारणात शिरावे लागले. राष्ट्रपती झैलसिंगशी त्याचे क्षणभरही पटले नाही. ७,००० शिखांची हत्या करणारा पंतप्रधान शीख राष्ट्रपतीला कसा आवडणार होता? श्रीलंकेतच खरे म्हणजे राजीव जायचा, बच गया, म्हणून मे २१,१९९१ रोजी त्यास तमीळ बॉबरने उडविले. व्हीपी सिंगांनी त्याला मामा बनविले. मुसल्मानांनी त्याच्यावर दाब आणून त्यास सुप्रीम कोर्टाचा निर्णय बदलायला लावला. त्यानंतर राम मंदिराचे जे सारे रामायण घडले त्याचे डॉ. तोगडिया खरे नायक होते. एक चीनी म्हण आहे : एकजण खुर्ची बनवितो, दुसरा त्यात बसतो.

वाजपयी : ग्वालेरचा हा सुपुत्र व 'राष्ट्रधर्म' चा संपादक ३१ व्या वर्षी खासदार म्हणून निवडून आला. जनसंघाचे ते १९६८ ते १९७३ या काळात

अध्यक्ष होते. आणीबाणी संपली व त्यांना परराष्ट्रमंत्री बनविण्यात आले. १९८० त जनता सरकार संपले पण वाजपयी भाजपाचे १९८० ते १९८६ या काळात अध्यक्ष राहिले. ग्वालेरच्या महाराणींचे वाजपयींवर व भाजपावर खूप उपकार आहेत. वाजपयींचे वक्तृत्व मानसिक बदल घडवून आणण्यात खूपच प्रभावी होते. खुद्द नेहरू त्यातून सुटू शकले नाहीत. तीच कथा त्यांच्या कन्येची. असे प्रभावी वक्तृत्व पूर्वी कधी झाले नव्हते, ना पुढे होणार आहे. मोदींचा अपवाद सोडून.

सोनिया व खुर्शीद : सोनियाची दिवसेंदिवस लथळत चाललेली तब्येत व राहुलचे नित्यनवे पोरखेळ पाहून सलमान खुर्शीदांना बहुधा स्फूर्ती आली असावी. ते म्हणाले, "राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची चांगली माणसे काँग्रेसमध्ये घुसली असून ती पक्षाच्या मानगुटीवर बसली आहेत." त्यांनी हे विधान *नॅशनल हेराल्ड* या नुकतेच पुनरुज्जीवित केलेल्या पक्षाच्या मुखपत्रात केले : "हे प्रथम बाबरीच्या पतनानंतर लक्षांत आले. त्यावेळी निधर्मी हा शब्द वापरू नये असे काही जण म्हणत होते. माझ्या ते लक्षात आले होते पण मी गप्प बसलो. आता माजी मुख्यमंत्री जगदंबिका पाल आणि काँग्रेसच्या माजी अध्यक्षा रीटा बहुगुणा जोशी भाजपमध्ये गेले. आणखी किती जण जातील ते मला माहीत नाही." मणी शंकर ऐय्यरांनीदेखील असेच निराशेचे उद्गार काढले. वास्तवता मनावर एवढा दाब आणू शकते?

मोदी : मोदी भले 'मी खात नाही, आणि लोकांना खाऊ देत नाही' असे जाहीरपणे म्हणत असतील, पण खेडेगावातील त्यांच्या अधिकाऱ्यांचे काय? ते खोटी बिले बनवतात, त्यांचे रोजच्या मजुरीचे वेतनपत्रक बनावटी असते, त्यांचे हजेरी पत्रकदेखील चक्क खोटे असते. आपण पकडले जाऊ व आपल्याला शिक्षा होईल अशी त्यांना भीतीही कधी वाटत नाही. त्यामुळे दर वर्षी शाळेच्या इमारती, नवीन झाडे लावणे, ओढे व नद्या यांच्यावर बांध उभारणे, समाज स्वास्थ्य केंद्रे बांधणे वगैरे प्रवृत्तीत लाखो-करोडो रुपये खाल्ले जातात व ग्रामपंचायत प्रमुख पटवारी (तलाठी) व अधिकारी यांच्यात ते वाटले जातात. स्पष्ट बोलायचे झाल्यास खेडेगावातल्या कोणालाही तेथील अधिकाऱ्यास भेटून बिले दाखवा, हजेरी पत्रकाची प्रत तपासासाठी द्या, वगैरे म्हणण्याची ताकद नाही व हिंमतही नाही. कारण, असे दाखविण्याची परवानगी देणारा कायदा कोठे आहे? एकटे मोदी या भ्रष्ट अधिकाऱ्यांवर मानसिक दाब आणू शकतील? सर्व व्यवहार कंप्युटरवर टाकण्याची ऑर्डर काढली व रोजच्या रोज ती माहिती केंद्राकडे पाठविण्याचा शिरस्ता चालू केला, तर त्यास बऱ्यापैकी आळा बसू शकेल. मोदी 'डिजिटल इंडिया' चा म्हणून धोशा लावीत सुटले आहेत व हे अधिकारी त्यांच्या मार्गात रोज नवनवे अडथळे निर्माण करीत

आहेत. पूर्वी ह्या 'अदृश्य पहारेकऱ्या'चे काम धर्म करीत असे. आज धर्मावर कोणाचा विश्वास नाही. सारे भारतीय आता 'प्रॉटेस्टंट' व्हायच्या मनःस्थितीत आहेत. कट्टर हिंदू व मुसलमानांचा अपवाद सोडून. सपसारखे बाटगे जरा जास्तच चेकाळल्यासारखे वागतात. नवीन मुसलमान नऊ वेळा नमाज पढतो.

कम्युनिस्टस् : संघ सोडला तर साम्यवाद्यांना शत्रू कोणी नाही. दोघांत बरेच साम्य आहे. एक उगवता सूर्य आहे तर दुसरा मावळतीचा सूर्य आहे. बंगाल व केरळ येथे साम्यवाद्यांची सत्ता आहे. त्यामुळे संघाचे तेथे फारसे चालत नाही. गेल्या दोन वर्षांत केरळप्रमाणे कर्नाटकांतही संघ कार्यकर्त्यांना ठार मारण्याची मोहीम सुरू आहे. १२ जणांना ठार मारले आहे व १२ हून अधिक जणांना घायाळ केले गेले आहे. सेक्युलर व ॲवार्ड वापसी टोळीने त्यांचे एकदाही खंडण केलेले नाही. कर्नाटकाच्या मुख्यमंत्र्यांना आता तिरंग्याबरोबर वेगळा कर्नाटक राज्याचा ध्वज फडकावयाचा आहे. हे अलगतावादाचे लोण काश्मीराहून आले आहे. तेथे ते पॅलेस्टाईनहून व्हाया पाकिस्थान आयात केले गेले. हा मानसिक बदल कोण घडवून आणतो? त्याला पैसा कोण पुरवितो? हा 'धंदा' नक्कीच फायदेशीर असावा, कारण तो वाढत आहे.

२) संख्याबळ कमी करणे

अ) लोकसंख्या

हे तर मुसलमानांचे सर्वात मोठे शस्त्र आहे. ज्या भारतात एकही मुसलमान नव्हता तेथे लोकसंख्येच्या बळावर त्यांनी आपल्यासाठी पश्चिम व पूर्व पाकिस्थान (बांगलादेश) तयार करून घेतला. लाहोर तर हिंदू शहर होते, तेही आपल्याकडे राखले. सारा अफगाणिस्थान बौद्ध होता तो १०० टक्के मुसलमान प्रांत झालाच ना? दक्षिणपूर्वेस इंडोनेशिया हिंदू-बौद्ध होता तो जगातला सर्वात मोठ्या संख्येचा मुसलमान देश झालाच ना? आता त्यांची 'बुरी नजर' युरोपावर आहे. लोकशाहीत अल्पसंख्यांकांचे लाड होतात व त्यांची संख्या वाढण्यास मदत होते. म्हणून त्यांना घरी हुकूमशाही व दारी लोकशाही पाहिजे असते. कारण लोकशाहीत विरोधी पक्षाची बाजूही ऐकून घेतात. आमच्या धर्मास कुटुंब नियोजन मान्य नाही, असे म्हटले की संपले. चीनसारख्या हुकूमशाहीत ते चालत नाही. जपान, ऑस्ट्रेलिया वा अमेरिकेसारखे लोकशाही देशदेखील आता त्यामुळे सावध झाले आहेत. 'आमचे कायदे तुम्हास मान्य नसतील तर तुम्ही तुमच्या देशांत परत जा', असे ते आता बेधडक धमकावू लागले आहेत.

ब) जनन दर (फर्टिलिटी रेट)

११ जुलै २०१६ चा दिवस. त्या दिवशी एका भारतीय-जर्मन लोकसंख्या शास्त्रज्ञाने भारतातील मुसलमान स्त्रींचा प्रसव दर *(टोटल फर्टिलिटी रेट, टीएफआर)* जगात सर्वात जास्त आहे असे सांगून जगास धक्का दिला. भारतीय मुस्लीम स्त्रीचा ३.७ तर हिंदू स्त्रीचा ३.० यांचा अर्थ, मुस्लीम समाजात प्रत्येक स्त्रीस सरासरी ३.७ मुले असतात. ख्रिस्ती स्त्रीस ३.३ तर हिंदू स्त्रीस ३.० मुले होतात. या शास्त्रज्ञाचे संशोधन १९९१, २००१ व २०११ साली केलेल्या भारतीय सेन्ससवर व जिल्ह्यातील सर्व्हेज्‌वर आधारित आहेत. १५ ते १९ या वयोगटातील मुस्लीम स्त्रीचा प्रसव दर एकदम जास्त असतो. बालविवाहांवर बंदी आल्यामुळे हा दर कमी झाला आहे. केरळमधील मल्लापुरम् व कासरगोड जिल्ह्यांत स्त्रियांचे बालविवाह (१०-१४) होतात. तेथे दर आहे ४.६. या दराच्या बळावर मुसलमान भविष्यात भारत जिंकतील असा विश्वास त्यांच्या महत्त्वाकांक्षी नेत्यांना वाटतो. तोच आत्मविश्वास युरोपातील दूर दृष्टीच्या मुस्लीम नेत्यांना वाटतो. या भारतीय-जर्मन शास्त्रज्ञाचे निरीक्षण महत्त्वाचे आहे : ''जेथे शाळा, इस्पितळे, चांगले रस्ते व स्त्रीशिक्षण पोचले त्या जिल्ह्यात मुलींची लग्ने १० ते १४ वरून १५ ते १९ या वयात होऊ लागली.'' मोदींचा आग्रह या चार गोष्टी देण्यावर आहे. या जर्मन शास्त्रज्ञाप्रमाणे अमेरिकन प्यू संशोधन केंद्राचे अहवाल फार महत्त्वाचे आहेत. २०११ च्या अहवालानुसार पुढील २० वर्षात जगाची मुसलमान वस्ती दुप्पट होईल. ती २०३० साली जगाच्या वस्तीच्या पावपट होईल. जगातील मुसलमान स्त्रियांचा प्रसव दर ३.१ आहे. *वर्ल्ड ख्रिश्चन विश्वकोश*प्रमाणे इस्लामच्या निरनिराळ्या स्त्रियांच्या उपपंथांचा प्रसव दर पुढीलप्रमाणे :

उपपंथ	१९८२ चा वृद्धी दर (%)	२००१ चा वृद्धी दर (%)
सुन्नी	-	-
हनाफी	२.८	२.१
शफी	२.९	२.२
मालिकी	२.४	२.०
हनबाली	२.७	२.२
शिया	-	-
बारावाले	२.८	२.२

ईस्माइली	३.४	२.७
जायदी	२.८	२.३
अलवाईटस्	२.८	-
अहंमदी	४.२	३.३
खारिजी	२.७	२.१
वहाब्बी	-	१.४

यावरून ख्रिस्ती मिशनरी कोणच्याही समाजाचा किती खोलवर जाऊन अभ्यास करतात ते कळून येईल. संघ व भाजपा सुपर पॉवर होण्याच्या बाता करतो पण पायाच्या माहितीकडे दुर्लक्ष करतो! आपल्या समाज शास्त्रज्ञांनी पाश्चिमात्यांचा धडा उचलला पाहिजे. त्यासाठी मानसिक चौकट बदलावी लागेल, कठोर परिश्रम करावे लागतील व बोलघेवडेपणा कमी करावा लागेल. असे कांही हिंदू मिशनरी मला उत्तरपूर्व भारतात भेटले. आपल्या त्रुटी वा दोषांमुळे समोरचा पक्ष कंड्या पसरवून व धमक्यांच्या जोरावर आपले इप्सित साध्य करतो.

क) भविष्यकथन : २०५० सालाचे

- २०५० साली ख्रिस्ती व मुसलमान यांची जगातील संख्या समान राहील.
- भारतात हिंदू बहुसंख्य असतील पण जगातील जास्तीत जास्त मुसलमानांची संख्या भारतात असेल व ती इंडोनेशियास मागे टाकेल.
- युरोपात मुसलमानांची संख्या १०% च्या वर जाईल.
- अमेरिकेत ज्युंपेक्षा मुसलमान संख्येने जास्त असतील. तेथील बिगरख्रिस्त्यांत मुसलमानांचा पहिला क्रमांक असेल.

ड) कारणमीमांसा

- हे सारे राष्ट्राच्या तरुणतरुणींच्या लोकसंख्या वाढीचे स्थलांतर हे तिसरे व महत्त्वाचे कारण असेल. स्थलांतरामुळे युरोपची संख्या १.८% नी वाढेल.
- सौदी अरेबिया मुसलमान निर्वासितांना स्वीकारायला चक्क नकार देतो. ती जबाबदारी जर्मनी आपल्या शिरावर घेतो व ५ लाख मुसलमानांना आश्रय देतो. त्यामुळे तेथील जर्मन नागरिकांना असुरक्षित वाटू लागते. फ्रान्सची व इंग्लंडची अवस्था वेगळी नाही. लंडनचा मेयर मुसलमान आहे. तिन्ही लोकशाहीवाले देश आहेत. तिन्ही ठिकाणी *लव्ह जिहाद* च्या घटना वाढत आहेत. मुसलमान लोकशाहीचा कसा फायदा करवून घेतात, ते पहाण्यासारखे

आहे. भारतही लोकशाही देश आहे. लोकशाहीत मतपेटी महत्त्वाची, बाकी सारे गौण. मतांसाठी अक्कलसुद्धा गहाण ठेवायची मानसिक तयारी कां होते, ते मोठे कोडे आहे. शेवटी स्थल, काल व परिस्थिती माणसाला तसे वागण्यास भाग पाडते, असे वाटते. कालाय तस्मै नमः ।

- काँग्रेसने अनेक मार्गांनी मुसलमानांच्या संख्या वृद्धीचे सत्य लपविण्याचे प्रयत्न केले. सत्तेपुढे शहाणपण चालत नाही. खुषवंतसिंह या इंदिरेच्या चमच्याने मला सांगितले : "काँग्रेसला ह्या मुस्लीम वस्तीच्या वृद्धीविरुद्ध प्रचार करायचा आहे. म्हणून मी तो लेख छापला. बंदा क्या कर सकता है? खरं सांगू? बिहार व युपीच्या ओबीसींचे आभार माना. त्यांनी तेथील मुसलमानांना फिटींग रीप्लाय दिला आहे या वस्तीच्या बाबतीत." मी त्यांनी 'ईलस्ट्रटेड विकली'मध्ये हिंदूंची वस्ती कमी होत नाही, उलट वाढत आहे, असा एक खोडसाळ व प्रचारी लेख प्रसिद्ध केला होता, त्याविषयी विचारले होते. ते त्यावेळी विकली चे संपादक होते.

ई) भारत

इस्लामची वाढ सर्वांत जास्त व जबरदस्त आहे. १९९१-२००१ या दशकात मुस्लीम वृद्धी दर २९.५२% होता तर हिंदूंचा १९.९२% होता. २००१-२०११ या दशकात मुस्लीम वृद्धी दर २४.६% एवढा घसरला. हिंदू कुटुंब नियोजन करतात तर मुसलमान व ख्रिस्ती यांचा त्यास विरोध आहे. मुसलमानांची लग्ने लौकर सुरू होतात व उशिरा संपतात. हिंदूंना एकपत्नीत्व तर मुसलमानांना बहुपत्नीत्वाचा अधिकार कायद्यानेच दिला आहे. हा वृद्धी दर असाच राहिला तर मनमोहन सिंगांनी २००६ साली नेमलेल्या एका समितीच्या अहवालानुसार २१ व्या शतकाच्या अखेरीस मुसलमानांनी संख्या ३४ कोटी (एकंदर लोकसंख्येच्या १९ वा २० टक्के) होईल. २०११ साली ती संख्या १८ कोटी होती. प्यू संस्थेच्या अहवालानुसार ही जगातील इंडोनेशियानंतर दुसरी मोठी संख्या होती.

ऊ) चीन

१९६४ ते १९८२ या काळातील चीनमधील मुसलमानांचा वृद्धी दर २.७% होता. तो पुढील दोन दशकांत २.१% राहिला. याचे कारण तेथील इमामांनी एक मूल असण्याचे फायदे मुस्लीम स्त्रियांना समजावून सांगितले. आपल्याकडे परिस्थिती उलट आहे. सुभाषबाबूंना हे सत्य माहीत असावे. म्हणून त्यांनी भारतात पहिल्या ५० वर्षात हुकूमशाही राज्य असावे, असे धीट विधान

केले होते. लोकशाही व शिस्त एकत्र नांदू शकत नाहीत.

फ) युरोप

युरोपात इस्लाम हा सर्वांत जास्त वेगाने वाढणारा धर्म आहे. प्यूच्या अहवालाप्रमाणे युरोपात मुसलमानांची वस्ती ३ कोटी १९९० साली होती, ती ४.४ कोटी २०१० साली व २०३० साली ती ५.८ कोटी होईल. त्यांचा वृद्धी दर १९९० साली ४.१% होता तो वाढून २०१० साली ६% झाला. २०१० साली तेथे ४.४ कोटी मुसलमान होते (३.८ टक्के).

ग) धर्मांतर

पाव शतकापूर्वी न्यू जर्सीला गेलो होतो. मजजवळ वेळच वेळ होता. पास टाईम म्हणून तेथील कॅथेड्रलमध्ये गेलो. तेथील पाद्री मल्याळी होता. मला थोडे थोडे मल्याळी येते. त्यामुळे त्याच्याशी चांगली दोस्ती झाली. पास टाईम म्हणून मी तेथे रोज जाऊ लागलो. तेथे मला बऱ्याच गोष्टी शिकायला मिळाल्या. आपण जातीचा विचार करतो, ते धर्माचा. आपल्याकडे गीतेत कोठेही लोकांचे धर्मांतर करा असे सांगितलेले नाही, त्यांच्या बायबलमध्येच धर्मांतराच्या आज्ञा आहेत *(मॅथ्यू २८ : १८-२०)*. 'बळाने नाही, सत्ता वापरून नाही तर प्रेमाने' *(झकारिआ ४:६)*. धर्मांतर हे दैवी काम आहे, त्यामुळे तुम्ही अंधारातून प्रकाशात येता, पुनर्जन्म होऊन *(जॉन ३:३)* पुण्याच्या प्रदेशात प्रवेश करता (कोलोसिअन्स १:१३). कुराणाने या बाबतीत बायबलचीच नक्कल केली आहे. भारतात सिंध प्रांतात समूह धर्मांतर केले गेले. त्यासाठी देवल स्मृतीची योजना केली गेली. सिंध पुनश्च हिंदू झाला. स्वामी दयानंदांनी आर्य समाजामार्फत ही चळवळ चालू केली पण आमच्याच महात्म्यांनी व पंडितांनी ती चळवळ हाणून पाडली. अपवाद म्हणून गोवा, महाराष्ट्र वगैरे कांही ठिकाणी थोडी थोडी धर्मांतरे झाली. उदा. मसुराश्रम.

अमेरिकेत व अबु धाबीला मला शिकायला मिळाले की धर्मांतरांना राजाश्रय असावा लागतो. रोमनांनी येशूला क्रॉसवर लटकावला. ते मोठे पाप होते. पाप्यांना पापमुक्त करण्यासाठी धर्मांतर हा राजमार्ग होता. *(रोमन्स ३:२३)* साऱ्या राष्ट्रांना ख्रिस्ती बनवायचे आहे, कारण तशी येशूची इच्छा होती *(ल्यूक २४:४७)*. इस्लाम हा अब्राहमचा (इब्राहीम) पुस्तकी पंथ आहे. (ख्रिस्त्यांप्रमाणे धर्मांतराच्या बाबतीत इस्लामदेखील राजाश्रयात मानतो. सौदी अब्जावधी डॉलर्स त्यासाठी वापरतो. भारतात अंतुल्यांनी त्याचा पूर्ण फायदा उठविला.) न्यूजर्सीच्या माझ्या पाद्री मित्राने अमेरिकेत ख्रिस्ती धर्म हा मोठा, म्हणजे १३० अब्ज डॉलर्सचा,

उद्योग आहे असे सांगून मला धक्का दिला. अमेरिकेत एकट्या कॅथॉलिक चर्चची प्राप्ती २००१ साली १०२ अब्ज डॉलर्सची होती. १५ सप्टेंबर २०१६ रोजी ख्रिस्ती धर्म हा वार्षिक १.२ ट्रिलियन डॉलर्सचा उद्योग *(इंडस्ट्री)* होता, म्हणजे अमेरिकेतील १५ वा मोठा उद्योग आहे, असे सरकारी आकडे सांगतात. भले, धार्मिक लोकांची संख्या हळूहळू कमी होत असेल तरी धर्माच्या नावाखाली सामाजिक कार्यक्रमासाठी केलेला खर्च गेल्या १५ वर्षांत तिप्पट झाला आहे. आज अमेरिकेत ५० चॅरिटी संस्था आहेत व त्यांची आवक ४५.३ अब्ज डॉलर्स आहे. यात चर्चेस, सायनॉगॉग्ज्, मशिदी, मंदिरे व चॅपल्स यांचा समावेश होतो. धार्मिक कारणांसाठी लोकांची गर्दी जमते अशी अमेरिकेत ३४४,००० स्थाने आहेत. त्यांच्यापाशी हजारो, नव्हे लाखो माणसांचा स्टाफ (सेवकवर्ग) आहे. अमेरिकेत धर्म ही शक्ती आहे, हे ट्रंपसाहेब निवडून आले त्यावरून स्पष्ट झाले. ह्या धार्मिक स्थळातून अनेक सामाजिक व स्वास्थ्याची कामे होत असतात, उदा. दारुच्या व्यसनापासून मुक्ती, गरिबांना मदत, म्हाताऱ्यांना घरांची सोय, वगैरे. अरबी राष्ट्रांतही ह्याच धोरणाची नक्कल केलेली मला आढळली, कारण अरबांचे आर्थिक व धार्मिक कन्सल्टंट्स् अमेरिकन आहेत.

माझी निरीक्षणे शंकराचार्यांना कळवावीत म्हणून मी त्यांची भेट मागितली. सुदैवाने ते बडोद्यांत आले होते व लक्ष्मीविलास राजमहालात ते उतरले होते. मला अर्धा तास वेळ मिळाला होता. माझ्याबरोबर विजय साने होते. आम्ही दोघे पंचविशीचे व शंकराचार्य साठीचे. आम्ही हिंदीत बोलत होतो व ते तामीळमध्ये. दुभाष्यामार्फत आमचे संभाषण चालले होते. दुभाष्याने काय गडबड केली ते माहीत नाही, पण ते एकदम भडकले व 'पो' 'पो' असे ओरडू लागले. 'पो' म्हणजे चालते व्हा, एवढे मला माहीत होते. त्यांचा गैरसमज झाला, आम्ही धर्माचा व्यापार करावा असे कांही सांगीत आहोत, असे त्यांना वाटले. ते सान्यांना मारायला उठले. म्हणून आम्ही दोघे पळायला लागलो. आम्ही पुढे व शंकराचार्य आमच्या मागे. शंकराचार्यांशी पकडापकडीचा खेळ खेळण्याचे भाग्य आमच्यासारखे क्वचितच् कोणास मिळाले असेल. आम्ही तरुण असल्यामुळे त्यांच्या तावडीत सापडणे शक्यच नव्हते. सांगायचे तात्पर्य हे की हे ओआरआय (ऑर्गनाईज्ड रिलिजिअस इंडस्ट्री) ची माहिती हिंदू धर्माच्या सर्वोच्चापर्यंत पोचविण्याचे काम मी जरूर केले पण, भाषेच्या घोटाळ्यामुळे, कां कांही अन्य कारणामुळे, मला त्यात यश मिळू शकले नाही. पुढे जयललिताने शंकराचार्यांना शिक्षा ठोठावली तेव्हा मनांत आले की आपण त्यांना हिंदू धर्म ओआरआय मध्ये रूपांतर करण्यात यशस्वी ठरलो असतो तर त्यांना पकडण्याची हिंमत झाली नसती.

नुकत्याच केलेल्या अमेरिकन वारीत मला कळले की वरील ओआरआयने आता अमेरिकेत *इस्लामोफोबिया* पसरविण्याचा २० कोटी डॉलर्सचा उद्योग चालविला आहे. (आपण येथे असा उद्योग कां करू नये? दुर्बळांचे उद्योगपतीही दुर्बळच.) याचा २००८ ते २०१३ या काळातील कैर (कौन्सिल ऑन अमेरिकन-इस्लामिक रिलेशन्स) व बर्कले (कॅलिफोर्निया) विश्वविद्यालयाने केलेला विस्तृत अहवाल मला वाचावयास मिळाला. त्यात ७४ गटांची यादी आहे. हे गट *इस्लामोफोबिया* पसरविण्यासाठी पैसे वाटतात. मुसलमान अमेरिकेशी कधीच एकनिष्ठ राहणार नाहीत, उलट येथे आतंकवाद आणतील असे त्या अहवालात लिहिले आहे. या प्रचाराने दोन फायदे झाले आहेत : (१) द्वेषमूलक गुन्हे (हेट क्राइम्स) वाढले आहेत, व (२) इस्लामविरोधी कायदेही वाढले आहेत. फ्लॉरीडात हेट क्राईम्स ५०० पटीने २०१५ साली वाढले होते. २०१३ सालापासून ८१ नवे इस्लामविरोधी कायदे रीपब्लिकनांनी सीनेटमध्ये पास केले आहेत. त्याने अमेरिकेतील मुसलमान धास्तावले आहेत. ट्रंपमुळे तर त्यांचे 'भय इथले संपत नाही.'

धर्मांतर ही जागतिक चळवळ आहे. लोकशाहीमुळे डोक्यांच्या संख्येस महत्त्व आले, डोक्यातील मेंदुला नाही. गुणवत्ता व संख्या यांचा झगडा जुना आहे. पूर्वी गुणवत्तेला मानायचे, ती असणाऱ्यांचा मानसन्मान केला जाई, त्यांना बक्षिसे मिळायची व त्यामुळे प्रत्येकास आपली गुणवत्ता आपण सुधारावी अशी प्रेरणा मिळायची. आजच्या बाजारी दुनियेत जाणकारांना गुणवत्तेचे महत्त्व कळते, पण सर्वसामान्यांना गुणवत्ता कमी असली तर चालते, किंमत स्वस्त आहे व त्यामुळे आपल्याला फायदा झाला, यातच त्यांना सुख मिळते. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी व मुसलमान मुल्लामौलवींनी म्हणून दलितांना व आदिवासींना पकडून आपल्या धर्मात त्यांना खेचण्याचा उद्योग ब्रिटीश कालखंडात १००-१५० वर्षे केला. स्वतंत्र भारतात त्यास खीळ पडेल अशी अपेक्षा होती, पण जुना कार्यक्रम तेवढ्याच उत्साहाने चालू राहिला. याचे मुख्य कारण गांधी-नेहरूंना 'धर्मांतर म्हणजे राष्ट्रांतर' हा सावरकरी सिद्धांत मान्य नव्हता.

प्यू संशोधन केंद्राच्या २०१५ च्या अहवालाप्रमाणे जगात मुसलमानांचे जनन भविष्यांत जास्तीत जास्त व शीघ्र गतीने वाढेल. तरुणांची संख्या जास्त असेल. २०१० ते २०५० या काळांत धर्मांतराने फक्त ०.३% (५००,००० लोक) वाढतील तर १५२,०००,००० लोक जन्मामुळे वाढतील. 'न्यूयॉर्क टाइम्स'च्या अहवालाप्रमाणे अमेरिकन मुसलमानात २५% बाटगे आहेत. ब्रिटनमध्ये दर वर्षी ६,००० लोक बाटून मुसलमान होतात. त्यातील बहुसंख्य स्त्रिया असतात, कारण

लव्ह जिहाद हा सर्वात सुरक्षित राजमार्ग. आख्खी लॅटीन अमेरिका या राजमार्गाने ख्रिस्ती झाली. आख्खा पाकिस्थान या 'अबला प्रॉडक्शन'चा माल आहे. हिंदू पुरुषांना हे 'सोशल सायन्स' त्यांच्या बापजाद्यांनी शिकविलेच नाही. एक योद्धा संन्याशी - दयानंद - तसे सांगीत होता, पण त्याच्याच दोन भाईबंदांनी 'हा आपला मार्ग नव्हे', असे सांगून त्यास यशस्वी होऊ दिले नाही. नाही तर त्याच्यापासून स्फूर्ती घेऊन सारे शिया परत पार्शी बनण्यास तयार होते. 'हफिंग्टन पोस्ट'नुसार दर वर्षी २,००० अमेरिकन्स इस्लाम धर्म स्वीकारतात. भारतात धर्मांतराविरुद्ध व लव्ह जिहादा विरुद्ध खूप आरडाओरड होते, पण प्रत्येक राज्यात दर वर्षी किती धर्मांतरे होतात, पुरुष किती, स्त्रिया किती, ही माहिती मिळू शकत नाही. कारणे तीन. सेक्युलर राज्यात हा उद्योग करणे कम्युनल (जातीय) मानले जाते. कांहीही काम करणे, म्हणजे कृती करणचा उत्साह गुलामी वृत्तीमुळे कमीच. प्रत्येक काम आजकाल खर्चिक बनले आहे. या घरोघर फिरून सर्व्हे करण्याचा खर्च कोण देणार? आता सुप्रीम कोर्टाने व एनआयएनेच लक्ष घातल्यामुळे त्या बाबतीत जास्त माहिती व आकडे पुढे येतील अशी आशा करावयास जागा आहे.

यात एक गट धरला जात नाही. तो गट प्रत्यक्ष मुसलमानी धर्म न स्वीकारणाऱ्यांचा, पण तो आचरणाऱ्यांचा. तसेच, कागदावर मुसलमान पण तो धर्म न आचरणाऱ्यांचा. यात गराशिया राजपूत मुसलमान बनले, उदा. बॉक्सर महंमद अली (मूळचा कॅशिअस क्ले). अशांची मुले जन्माने मुसलमान असली तरी ते घरांत ख्रिस्ती धर्मच पाळतात, उदा. प्रेसि. बराक ओबामा व शिकागोचा आतंकवादी हेडले. २०१५ च्या सर्व्हेप्रमाणे १.०२ कोटी अमेरिकन मुसलमान परत ख्रिस्ती झाले. भारतात 'घर वापसी'ची संख्या किती? भारतात असे डॉक्युमेंटेशन (नोंदणी) कधी सुरू होईल? त्यासाठी लोकांच्या मनाची चौकट बदलावी लागेल. ताप किती असे विचारले तर 'थोडासा किंवा खूप', असे उत्तर मिळेल, '१०२ अंश सेंटिग्रेड' असे उत्तर मिळणार नाही. कारण, मनाला अजून तशी सवयच लागलेली नाही. हल्ली 'टाईम्स ऑफ इंडियाने' अशी संख्याशास्त्रीय कोष्टके (स्टॅटिस्टीकल टेबल्स्) पहिल्या पानावर देण्याची सुरवात केली आहे. त्यांची तक्रार आहे, ती कोणी वाचीत नाहीत. महत्त्वच कळले नाही तर ती कोण व कशाला वाचणार?

३) ब्रेन वॉशिंग

एक ईश्वर, एक प्रेषित आणि एक धर्मग्रंथ या संबंधात एके काळी ख्रिस्ती लोकदेखील मुसलमानांएवढेच कट्टर व कडवे होते. पण मार्टीन ल्यूथरसारखी समर्थ

मंडळी भेटल्यावर त्यांच्या सतत केलेल्या प्रचार व प्रबोधनाच्या माऱ्यापुढे त्यांना वाकावे लागले व त्यातून प्रॉटिस्टंट पंथ जन्मास आला. त्या दिशेने नीट प्रयत्न व प्रयोग केल्यास आयसिस वगैरे सोडा, पण भारतीय उपखंडातील मुसलमानांना परिस्थितीच्या दबावाखाली व प्रबोधनाच्या रेट्याखाली भारतीय मुसलमानांना नक्कीच बदलावे लागेल. काळाच्या उदरात ते श्रेय मोदींना मिळावे असे विधिलिखित आहे की काय, ते फक्त काळच सांगू शकेल. जीनादेखील कोणे एके काळी आपल्याला 'मुस्लीम गोखले' व्हायची स्वप्ने पहात होते. महत्त्वाकांक्षेच्या मानसिक दाबाखाली १९४० नंतर ते पार बदलले. आपल्याकडे ही मानसिकता बदलण्याचे खास प्रशिक्षण देणारी केंद्रे सुरू केली पाहिजेत. बडोद्याच्या महाराजा सयाजीराव विश्वविद्यालयांत आम्ही असा एक उपक्रम नव्याने सुरू केला आहे. त्याचे नाव लीडरशिप अँड गव्हर्नन्स फॅकल्टी. त्याचे प्रमुख आहेत जीगर इनामदार. गायक वा नायक जन्मावा लागतो, हा सिद्धांत जुनापुराणा झाला. कल असेल व प्रशिक्षण मिळाले तर तो उत्तम गायक वा नायक होऊ शकतो, असे आधुनिक विज्ञान सांगते. मुंबईत रामभाऊ म्हाळगी प्रबोधन संस्था त्याच कार्यासाठी १९८२ साली जन्मली होती.

ब्रेन वॉशिंग आवश्यक

इस्लामची रूळावरून घसरलेली गाडी परत रुळावर आणण्याची जगातील प्रत्येक सुजाण नागरिकाची इच्छा आहे. विशेषतः भारतातील हिंदू लोकांची. याचे कारण, ते मुसलमान पूर्वाश्रमीचे हिंदूच होते. त्यात शुद्ध अरब वा इराणी वा तुर्क रक्त असलेला लाखांत एखादाच सापडणार. बाकी सर्व बाटगे. बळाने, छळाने वा फळाच्या आशेने धर्मांतर केलेले बाटगे. ब्राह्मणांनी त्यावेळी त्यांना शुद्ध करून घेतले असते तर येथे औषधालाही आज मुसलमान सापडला नसता. याचे कारण? कारण प्रत्येक हिंदू 'परधर्मो भयावहः।' या सूत्रास मानतो. जुन्या ब्राह्मणांची चूक दोन आधुनिक ब्राह्मणांनी सुधरविली. एक सौराष्ट्रातील ब्राह्मण तर दुसरा महाराष्ट्रातील. पहिला स्वामी दयानंद या नावाने ओळखला जातो तर दुसरा वीर सावरकर म्हणून. त्यांच्या चळवळीत दोन भारतीयांनी खो घातला. एक महात्मा तर दुसरे पपूजी. पहिल्याने ती चळवळ बंद पाडली, दुसऱ्याने तिकडे दुर्लक्ष केले. दोघे गगनाइतके उत्तुंग. दोघे त्या काळी सक्रिय असते तर आज पाकिस्थान नसते.

धर्मांतराच्या दोन पद्धती - ब्राह्मिक व अब्राह्मिक. अब्राहमचे वंशज ख्रिस्ती व मुसलमान शरीराचे धर्मांतर करतात तर ब्रम्ह्याचे हिंदू वंशज मनाचे. म्हणून नाव

शुद्धी. मर्त्य शरीरास विकत घेता येते, धमकावता येते, त्यास लालूच दाखविता येते. संभाजीराजांच्या मनाप्रमाणे मन भरभक्कम असेल तर टेफ्लॉनप्रमाणे त्यावर कशाचा म्हणून परिणाम होत नाही.

सत्य कथन हे रामबाण औषध

अ) ब्रेनवॉशिंगची आवश्यकता : आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगांत रूळावरून घसरलेली मुसलमानांची गाडी रूळावर आणणे फार सोपे काम आहे. फक्त राजकारण्यांजवळ इच्छाशक्ती पाहिजे. जर्मनीचे उदाहरण आपल्या डोळ्यांसमोर आहे. हिटलरने प्रथम मृतवत् जर्मनांच्या शरीरात प्राण फुंकला व त्यांना लढण्यासाठी खडे केले. हिटलरला त्याचा अहंकार नडला व त्याच्या हातून चुका होऊ लागल्या. १९४१-४२ च्या हिवाळ्यातील मॉस्कोवरील हल्ला ही त्याची सर्वात मोठी घोडचूक. त्याला नेपोलियनचा तेथे कसा पराभव झाला ते माहीत नव्हते कां? त्या कुडकुडत्या थंडीत त्याचे सैन्य तडफडून मेले व त्याचा शेवट १९४५ साली हिटलरच्या आत्महत्येत झाला. त्याच जर्मनांवर अमेरिकेने मोहिनीअस्त्र वापरले व त्यांना हिटलरविरोधी बनविले. अमेरिकेने १९४६ ते १९५२ या काळात २२ अब्ज डॉलर्सची मार्शल मदत (आजचे १८२ अब्ज डॉलर्स) करून जर्मनीला पुन्हा उभे केले. जर्मनी युरोपचा अग्रणी देश बनला. जगाच्या इतिहासात असे प्रथमच घडले. हे शक्य झाले, कारण नेत्यांची व लोकांची इच्छाशक्ती. भारताला त्या दर्जाचे नेतृत्व लाभले असते तर भारतीय मुसलमान सुतासारखे सरळ आले असते. भारतास असे नेते मिळाले की ज्यांनी शत्रूशी प्रत्यक्ष युद्ध चालू असता शत्रूला ५५ कोटी रुपयांची मदत केली! आणि हे आमच्या देशाचे बाप!

धन्य आधुनिक भारत! धन्य त्याचे नेते! एक महात्मा तर दुसरा पंडित! तिसरा शास्त्री! त्याने १९६५ सालच्या युद्धात जिंकलेली सारी स्ट्रॅटेजिक ठाणी शत्रूला परत देऊन टाकली! मर गये, बच गये!

जेव्हा भारत सुवर्णभूमी होती तेव्हा तीला नेते कसे मिळाले होते? कृष्णार्जूनांसारखे. कृष्णाने समोरच्या सेनापतीवर असा कांही मानसिक दाब आणला व यश नक्की केले. कृष्णाने कर्णाला युद्धात ऐनवेळी त्याच्या जन्माचे रहस्य त्याच्या सख्ख्या आईच्या तोंडूनच ऐकविले. कर्ण पार थंड पडला. आपल्याला तसे 'सत्यकथन' करून या मानसिक लढाईत समोरच्या स्पर्धकास सरळ करावयाचे आहे. सत्य हा नारायण असतो हे गांधीजींचे विधान आपल्याला सिद्ध करावयाचे आहे. भारतीय मुसलमानांना त्यांचे जन्मरहस्य समजले तर त्यांच्या चालण्यात, बोलण्यात, वागण्यात

फार मोठा बदल घडून येईल. सत्य कटु असते तसे भीतीदायकही असते. मुसलमानांच्या बाबतीत आजवर काँग्रेसने भीतीच्या पोटी किंवा सत्तेच्या लोभापायी त्यांना न सांगितलेले सत्य कोणचे आहे?

ब) शिवभक्त अरब : ख्रिस्त्यांनी जे रोमनांचे हाल केले ते मुसलमानांनी बिगरमुसलमानांचे केले. महंमद व त्याचे अनुयायी यांनी इस्लामपूर्व अरबस्थान कसा होता ते सांगणारे सारे पुरावे नष्ट करून टाकले, ग्रंथालये जाळली व सत्य सांगू शकणाऱ्यांना धमकावून चूप्प बसविले. भारतात दिल्ली सल्तनतेत त्यांचे हिंदू चमचे होतेच. बक्षीसाच्या आशेने त्यांनी कोठे काय उपलब्ध आहे ते सांगितले व सुलतानांना मदत केली. तरी कांही पुरावे बाकी राहिलेच. १७४२ साली तुर्की *सुलतान सलीमने* इस्लामपूर्व काव्यांचा संग्रह बनवून घेतला. त्याचे नाव *शायर-उल-ओकुल.* त्याचे तीन भाग आहेत. पहिला चरित्रात्मक आहे व त्यात प्राचीन कवी आणि त्यांच्या कृती याविषयी माहिती आहे. बर्लीनमध्ये १८६४ व १९३२ साली *शायर ऊल ओकुल* ची पहिली व दुसरी जर्मन आवृत्ती प्रसिद्ध झाली. त्यात *ऊकाझ* (जत्रा) विषयी माहिती आढळते. ह्या वार्षिक जत्रेत कवी संमेलन योजिले जाई व सारे अरब कवी त्यात भाग घेत असत. काबाच्या मंदिरात सर्वोत्कृष्ट कविता भिंतीवर लावली जात असे व लोक ती आवडीने वाचत. इतर कविता बकऱ्याच्या चामड्यावर लिहीत व मंदिराच्या बाहेरच्या भिंतीवर लावल्या जात. अशा रीतीने काबा मंदीर हे स्थळ उत्कृष्ट अरबी काव्यांसाठी प्रसिद्ध झाले. महंमद व त्याचे अनुयायी यांनी काबावर हल्ला केला तेव्हा फार मोठा संग्रह त्यांनी नष्ट केला. कांही कविता वाचल्या त्या *शायर उल ओकुल*मध्ये घेतल्या गेल्या. उमर बिना हसनाम हा त्यातील एक कवी. महंमदाचा काका. त्याने मुसलमान होण्यास नकार दिला म्हणून महंमदाच्या अनुयायांनी त्यास ठार मारले. त्याच्या एका कवितेचा सारांश पुढीलप्रमाणे :

१. ज्या माणसाने अनीती व पापात सारी जिंदगी घालविली त्याने त्याचे सारे जीवन काम व क्रोध यात व्यर्थ घालविले.

२. त्या माणसाने महादेवाची मनापासून पूजा केली तर पुण्याच्या प्रवासातील शेवटचे टोक तो गाठू शकतो.

३. हे परमेश्वरा, माझे सारे आयुष्य घे पण मला भारतात एक दिवस रहाण्याची संधी दे. कारण, त्या पवित्र भूमीत जो जातो तो पापमुक्त होतो.

४. भारताची तीर्थयात्रा केल्याने पवित्र हिंदू गुरुजनांची ओळख होते व पावित्र्य

प्राप्त होते.

यावरून सरळ दिसते की काबाच्या मंदिरातील काळा पथ्थर म्हणजे शिवाची पिंडी होती. मक्केत किबलेश्वराचे मंदिर होते व त्यातून *किब्ला* शब्द जन्मला, अशी भारतात मान्यता प्राचीन काळापासून होती. नमाझ पढत असताना किब्लाकडे मुसलमानांनी तोंड करायचे असते. काबलेश्वराचा आपल्याकडील अवतार म्हणजे षोडशी (चंद्राची १६ वी कला). इस्लामचा व चंद्राचा जवळचा संबंध आहे तो या षोडशीमुळे. महंमदाने काबाच्या मंदिरातील इतर साऱ्या मूर्ती तोडल्या. शिवलिंगाचे भंजन करावयास तो धजला नाही. त्यातून महंमदाने आसुरी पंथ सुरू केला. गीतेच्या १६ व्या अध्यायात आसुरी पंथियांच्या आचारविचारांविषयी विस्ताराने माहिती आढळते ती जिज्ञासूंनी पहावी.

या सत्यकथनाची पूर्व तयारी म्हणून आपल्याला अरबी भाषा जाणणारे सच्चे तज्ञ निर्माण करावे लागतील. राष्ट्रपती झाकीर हुसेन माझे चांगले मित्र होते. महंमदपूर्व अरबस्थानातील सामाजिक स्थितीवर आमची चर्चा चाले. ''मुसलमानांना पटविण्यासाठी,'' ते मला सांगीत, ''तू मौलवी हो व हा प्रचार कर. तुझ्या अरबी शिक्षणाची मी चांगली सोय करेन. बाटग्या मुसलमानांना हा इतिहास नक्की आवडेल.'' हे सारे प्रकरण मी पांडुरंगशास्त्री आठवल्यांच्या कानी टाकले. ''एवढ्या कोटी देवांत महंमदाला सामावून घेण्यास कोणची हरकत आहे? विष्णूच्या अवताराप्रमाणे आपण ह्यास शिवाचा अवतार बनवू,'' दादा (आठवले) म्हणाले. मी कैरोच्या *अल अझहर* या प्रसिद्ध विश्वविद्यालयात शिकण्यासाठी जायचे नक्कीदेखिल केले. अटलजी वाजपयींनी खो घातला. ते म्हणाले, ''हा वेडेपणा पुरे करा. मुसलमान फॅनॅटिक आहेत, ते तुम्हाला पाखंडी म्हणतील व मारून टाकतील. हिंदुंचे मात्र मोठे नुकसान होईल. हम ये नही होने देंगे।'' मला माझा विचार बदलावा लागला. मला अरबी शिक्षण घेणारा कोणी वारस मिळू शकला नाही. कारण, माझी अट : त्यांना संस्कृत साहित्याचे ज्ञान असणे आवश्यक आहे. संस्कृतवाल्यांना अरबीची ॲलर्जी होती! तेवढीच गरज देशभक्त पुरातत्व (आर्किआलॉजी) शास्त्रज्ञांची. यांच्या सहाय्याने प्राचीन अरब-भारत संबंधावर बराच नवा प्रकाश पडू शकेल. त्यामुळे प्रथम अरबांचे व नंतर भारतीय मुसलमानांचे ब्रेन वॉशिंग करणे एकदम सोपे होऊन जाईल. नव्या जमान्याची ती गरज आहे.

क) काबा मंदिर : *एनसायक्लोपिडीया ऑफ इस्लाम* नुसार एका प्राचीन ख्रि.पू. तिसऱ्या शतकातील नकाशात मॅकोराबा (मक्का) हे जुने तीर्थक्षेत्राचे व त्यामुळे व्यापाराचे केंद्र होते. टॉलेमीने तसे लिहून ठेवले आहे. ग्रीक इतिहासकार

डायोडोरस याने तेथील प्रसिद्ध मंदिराचा उल्लेख केला आहे. अरब तेथे हुबल व अल्ला देवाची पूजा करीत. कौरव-पांडव कुरुक्षेत्रावर लढले. हारलेले कुरुवंशी अरेबियात त्यांच्या असुर मित्रांच्या आमंत्रणावरून येथे आले असावेत. झमझम विहीरीला गंगेसारखे पवित्र मानीत. गंगेवर जसे काशी वसली तसे झमझम या *ओॲसिस*भोवती मक्केची स्थापना झाली. लाखो भारतीय मुसलमान काबास भेट देतात, पण त्यांना काबाची फारशी माहिती नसते. त्यांच्यासाठी कांही मुद्दे पुढीलप्रमाणे:

१. पूर्वी ही वास्तू अर्धवर्तुळाकार (हिज्र इस्माईल) होती. महंमदसाहेबांना ती तशी बांधायचे मनांत होते पण शेवटपर्यंत राहून गेले. कारण त्यांना ती बांधण्यासाठी असुरी संपत्तीचा (दाता जुगार, लूट, चोरी, वेश्यागिरी, व्याजापासून मुक्त असावा) वापर नको होता. व्यापारी वर्तुळात अशी धुतल्या तांदुळासारखी सज्जन माणसे कोठून मिळणार?

२. काळा पथ्थर (पिंडी) तुटलेला आहे. ऊम्मय्या सेनेने अबदुल्ला इब्न झुबैर यांच्या मक्केला वेढा घातला तेव्हा झालेल्या ६९२ च्या हाणामारीत तो तुटला असावा. इतरांचे म्हणणे कार्मेशियनांना पिंडीची पूजा पसंत नव्हती. त्यांनी केलेल्या ९३० च्या हल्ल्यात तो तुटला. त्यांनी मक्केत हजारो लोकांची कत्तल केली व ती प्रेते झमझम विहीरीत फेकली. त्यांनी पिंडी चोरून कूफाला नेली व तुकडे केले. आब्बासीद राजाने मोठी खंडणी दिल्यावरच ते तुकडे त्यास परत दिले. आता ते चांदीच्या कवचात ठेवले आहेत.

३. काबा दोन आहेत. एक मक्केत, दुसरे तीच्या डोक्यावर आकाशात. कुराणात तसा उल्लेख आहे : इस्र वाल मिराजच्या प्रवासाविषयी अल्लाचा चाकर सांगीत होता : ''मला मग अल्लाचे घर (अल बैत उल मामूर) दाखविण्यात आले. मी त्याविषयी गॅब्रिअलला विचारले. तो म्हणाला ''हे अल बैत उल मामूर आहे. येथे ७०,००० देवदूत रोज प्रार्थना करतात व पुन्हा परत येत नाहीत.''

४. काबाच्या आत काय आहे हे प्रत्येकास जाणून घ्यायची उत्सुकता असते. पूर्वी ते शक्य नव्हते. आता गुगलवर त्याचा अधिकृत व्हिडीओ उपलब्ध आहे. तो जिज्ञासूंनी अवश्य पहावा. भिंती व जमिनीवर उत्कृष्ट संगमरवरी टाईल्स बसविल्या आहेत. भिंतींवर सौदी राजांची चित्रे लावली आहेत.

भिंतीच्या वरच्या बाजूला हिरवे कापड लावले आहे. सारे कसे स्वच्छ, नीटस व सुंदर आहे. (याच्याऊलट, हिंदू देवदेवतांना गंधकीत रहावे लागते. पुजारीसुद्धा घामट व घाणेरडे असतात.)

५. मक्केच्या खोऱ्यात तळाशी काबा आहे. त्यामुळे जास्त पाऊस पडला तर अर्धे काबा मंदिर पाण्यात बुडत असे. त्याकाळी गटर व्यवस्था नव्हती. दर्शनासाठी (तवाफ) भाविकांना चक्क पोहत जावे लागे. आता तसे होऊ देत नाहीत.

६. शिवाचे मंदिर सर्वांना चारी बाजूने उघडे असते, तेथे द्वारे नसतात. काबाचेही एके काळी तसेच होते. पण शत्रूंना इस्लाम नको होता. त्यांनी हल्ले सुरू केले. दर्शनार्थीही वाढले. म्हणून दर आठवड्यास दोनदा लोकांना जाऊ दिले जायचे. कोणास मज्जाव नसे. ती संख्या एवढी वाढली की ह्या दर्शनाची परवानगी वर्षातून फक्त दोनदा दिली जाऊ लागली. तेसुद्धा थोरामोठ्यांसाठी.

७. काबाच्या किल्ल्या फक्त एका कुटुंबापाशी असतात. महंमदसाहेबांच्या काळांत निरनिराळ्या कुरेशी नेत्यांकडे त्या ठेवल्या जात. मक्केचा ताबा जेव्हा त्यांच्याकडे आला तेव्हा काबा मंदिराची चावी त्यांना सोपविण्यात आली. त्यांनी ती चावी बानी शैबा कुटुंबाच्या ओस्मान बिन तल्हांकडे दिली. ती त्यांच्या घराण्याकडे अनेक शतके राहिली आहे.

८. काबाचे मंदिर पूर्वी रंगीत (हिरवा, लाल व पांढरा) असे. आता काबाचा चौकोन काळा मखमलीचा व सोनेरी पट्ट्याचा असतो. ही पद्धत आब्बासिड खलिफांपासून सुरू झाली. त्यांचा काळा रंग आवडता होता.

९. एके काळी काबास दोन दरवाजे – प्रवेश व बाहेर जाण्यासाठी – व एक खिडकी होती. आता फक्त एक विशाल दरवाजा आहे. खिडकी नाही.

१०. काबाचे मंदिर अनेक वेळा बांधण्यात आले आहे. याची कारणे नैसर्गिक व मानवनिर्मित संकटे ही आहेत. प्रत्येक अरब टोळीस पिंडीची मालकी पाहिजे होती. महंमदसाहेबांनी युक्ती योजिली. सर्व टोळ्यांच्या प्रमुखांना एका मोठ्या झोळीत ठेवलेली पिंडी एकाच वेळी उचलावयास सांगितली. त्यामुळे रक्तपात टळला. त्यानंतर २-३ शतकांनी मंदिराची पुनर्बांधणी होत गेली. १९९६ साली शेवटची बांधणी झाली. ती आधुनिक धर्तीवर असल्यामुळे खूपच मजबूत झाली आहे, विशेषतः, छप्पर व पाया.

ड) काबावरील हल्ले : माणसाला जसे शत्रू असतात तसे देवाला नसावेत, अशी साधारण समजूत. दुर्दैवाने माणसांनी देव वाटून घेतले आहेत. त्यामुळे 'माझा देव', 'तुझा देव' यावरून जेथे शिया व सुन्नी मुसलमान आपापसात लढतात त्या कर्माला काय म्हणाचे? यावर स्वतंत्र पुस्तक लिहिता येईल.

भारतातील हिंदू-मुस्लीम दंगे किंवा आपल्या मंदिरावरील हल्ले यापुढे किस पेडकी पत्ती! ही पहा सर्वांत पवित्र, सर्वांत श्रेष्ठ मक्केवरील हल्ल्यांची थोडक्यात कालरेषा :

६०० महापुरामुळे काबाच्या मंदिराचा नाश झाला. म्हणून मंदिराचा पुनरोद्धार.

६२४ पूर्वी जेरुसलेमकडे पाहून नमाज पढत. आता मक्केचा ताबा मिळाला, मक्का तीर्थक्षेत्र ठरविले गेले. म्हणून काबाकडे पाहून नमाझ पढायचा (किबला) असे नक्की झाले.

६२९ मक्का जिंकल्यावर काबामधील ३६० देवदेवतेच्या मूर्ती तोडूनफोडून टाकल्या. काळा पथ्थर (पिंडी) अपवाद. सारी चित्रे काढली, फक्त येशू व मेरीच्या चित्राचा अपवाद. महंमदसाहेब म्हणाले, ''असत्य गेले, सत्य आले.'' *(प. कु. १७:८१)*

६८३ आगीत लाकडी मंदिर जळाले. मंदिर पुन्हा बांधले.

६९२ ऊमयादने राजा अब्द अल्ला बिन अल झुबैरवर हल्ला केला व मक्केस वेढा घातला. प्रजाजनांवर गोटफेक झाली. लाकडी मंदिर पुन्हा बांधावे लागले.

९३० कार्मेशियन्सनी मक्केवर हल्ला चढविला व झमझममध्ये प्रेते फेकून जागा अपवित्र केली.

९५२ अब्बासिदांनी मक्केची लूट केली.

१६२९ भारी वर्षा व काबाचे नुकसान. ऑटोमन सम्राट ४ था मुराद यांनी ग्रॅनाईट पथ्थरांनी काबाचे मंदिर व मशीद पुन्हा बांधून दिले. ती रचना अजून बदललेली नाही.

१९७९ नोव्हेंबर व डिसेंबरमध्ये काबावरील हल्ल्याचा व्हिडीओ उपलब्ध आहे. त्यात पाकिस्थानी सेनेने बचावाची खूप मदत केली. तरी २५५ यात्रेकरू व सैनिक मरण पावले आणि ५६० लोक जखमी झाले. ९ जानेवारी १९८० रोजी ६३ बंडखोरांचा शिरच्छेद करण्यात आला.

१९८७ २ ऑगस्ट रोजी शिया इराण्यांनी काबावर हल्ला चढविला. चक्क लढाई झाली. ४०० लोक कामास आले.

२०१६ मदीनातील मशिदीजवळ व महंमदाच्या थडग्याजवळ ४ जुलै रोजी तसेच मक्केत २४ जून २०१७ रोजी एका आत्मघाती बाँबरने ग्रांड मॉस्कपाशी एका इमारतीजवळ धडाका केला. ती इमारत कोसळली. अल कायदाची व आयसिसची ग्रँड मॉस्क उडविण्याची योजना होती, सौदी पोलिसांनी ती असफळ केली. रशियाने आयसिसचा नेता अल् बगदादी ला सिरीयावरील हवाई बाँब हल्ल्यात ठार केला. जेड्डाचा एक आतंकवादी गट व मक्केतील दोन गट काबावर हल्ला करण्याच्या योजनेत गर्क आहेत. हल्ला केव्हाही होऊ शकतो.

ई) आसुरी पंथ : हिंदू धर्मशास्त्रात शिव ही देवता सुर (देव), तसेच असुर ह्या दोघांकडून पूजिली जाते. शिवाच्या आसुरी भक्तात रावण व भस्मासूर यांची नावे आढळतात. महंमदसाहेबांनी आसुरी पंथाचा त्याग करून आपला स्वतःचा महंमदी पंथ स्थापन केला, पण शिवलिंगाचा मानसन्मान चालू ठेवला. हज्जच्या यात्रेकरूंनादेखील त्यांनी शिवलिंगाचा मान राखण्यास सांगितले. आसुरांचा गुरू शुक्राचार्य. म्हणून मुसलमानांना शुक्रवार जास्त पवित्र वाटतो. दर शुक्रवारी शुक्रनीतीचे पारायण होईल. त्याचे दुसरे नाव जुम्माचा नमाज. तो सहसा कोणी चूकवीत नाहीत. काबा शब्द काव्यावरून आला. (बंगालमध्ये विजयचे बिजय आजही होते!) काव्याचे स्त्रीलिंगी स्वरूप म्हणजे कविता व पुल्लिंगी स्वरूप म्हणजे शुक्र (किंवा आसुरी पंथ). पिंडीवर पाणी ओतण्याची (जलाभिषेक) क्रिया बंद केली व त्यावेळी आसुरी अरबस्थानात प्रचलित असलेली चुंबन घेण्याची पद्धत चालू केली. हिंदू धर्मशास्त्रात ही पद्धत आहे पण तीला "तामसी" मानले गेले आहे.

महंमदाने बिगरमुसलमानांना काबाच्या मंदिरात प्रवेश नाकारला. त्यांना भीती वाटली, पुन्हा ते लोक पिंडीवर जलाभिषेकाची प्रथा सुरू करतील. प्राचीन अरबांचे जुने रीतीरीवाज त्यांनी चालू ठेवले. मात्र पिंडीवर पाणी ओतले तर सर्वनाश होईल असे त्यांनी सांगितले. अरब मूळचे शैव पंथीय. त्यामुळे त्यांची प्रदक्षिणा किब्लाला मध्यभागी ठेवून घड्याळाप्रमाणे *(क्लॉकवाईज)* करतात. मंदिर उजव्या बाजूस (दक्षिण) ठेवले जाते. महंमदांनी ती प्रदक्षिणा घड्याळाच्या उलट्या बाजूने *(अँटीक्लॉकवाईज)* केली. माळा फिरविण्याची पद्धतदेखील उलटी केली. तसेच, हात पाय धुण्याची दिशा *(ओजू)* उलटविली. रोटी (पोळी) शेकण्यासाठी तवा

वापरतात. देव (हिंदू) लोक त्याच्या खोलगट भागात ती ठेवतात तर महंमदी टेकाड्याच्या भागावर. बंगालमध्ये हिंदू केळ्याच्या पानावर जेवतात. ती बाजू चकचकीत असते. हे उलटे करण्याचे खूळ इतके पुढे गेले आहे की बंगाली मुसलमान केळ्याच्या पानाच्या खरखरीत भागावर जेवण वाढतात व जेवतात.

हे असे कां? पराभूत कुरेशी (कुरुवंशी) पांडवांची नक्कल कसे करतील? केलेच तर फक्त उलटे..

'जर'चा ज्वर

प्रत्येक शास्त्रीय सिद्धांतास एक 'जर' *(इफ)* असतो, उदा. चार्लस् बॉईलच्या सिद्धांतात दाब व आकार कायम राहतात, 'जर' उष्णतामान सारखे राहिले तर. राजकीय सिद्धांतातही तोच 'जर' राज्य करतो, उदा. विकास व प्रगती लौकर व सायास, सहज साधता येते – जर हुकूमशाही असेल तर.

त्याच थाटात वरील तीन गोष्टी सहज साधता येतील, जर (१) हिंदूंनी त्यांचा नेहमीचा भाबडेपणा सोडला तर, आणि (२) त्यांनी त्यांचे मानसिक व शारीरिक दौर्बल्य (बायसेस) दूर केले तर.

(१) भाबडेपणा

प्रत्येकात चौकसपणा असतो. त्यास खतपाणी घालून तो वाढविण्याची गरज आहे. बरेच वेळा पालक वा शिक्षक त्यांनाच माहीत नसल्यामुळे 'तुला कशाला पाहिजेत या नसत्या चांभारचौकश्या?' असे सांगून ते कुतूहल मारून टाकतात. विशेषतः आजच्या राखीव जागांच्या जमान्यात! अज्ञानातून भाबडेपणा वाढत जातो. ज्ञानातून जागृती होते. सिंधूबंदीने हिंदूंचा विश्वसंचार ठप्प झाला. त्यामुळे ते कूपमंडुक वृत्तीचे झाले. त्याचे जिवंत उदाहरण म्हणजे आमचे भूगोलाचे अज्ञान. आमच्या क्षत्रियांना आखातीच्या देशातील लोकांचे मानसशास्त्र व त्यांच्याकडील अद्ययावत् युद्धशास्त्राचे ज्ञान माहीत झाले असते तर कदाचित् ते जास्त चांगल्या रीतीने लढले असते व आपण एवढी शतके गुलाम राहिलो नसतो. धर्मगुरु, मुल्लामौलवी व आपले साधू-महात्मे अज्ञान व अंधश्रद्धा यांचा प्रसार करतात. आयबीएम, म्हणजे इंडिया बिफोर मोदी, या काळांत (१९४७-२०१४) भाबड्या हिंदूंना कॉंगेस व डाव्यांनी पसरविलेल्या अनेक थापांशी व अंधश्रद्धांशी सामना करावा लागला. चांगला शिक्षणमंत्री मिळाला तर मोदी आता त्या भूलथापांचे प्रदूषण दूर करू शकतील.

अ. पूर्वी

■ कुशाण राजा कनिष्काने बौद्ध धर्म स्वीकारला व त्याने इ. स. १२० साली बौद्ध भिक्षुंची मोठी परिषद भरविली. ग्रीक राजा मिनँडर हादेखील असाच बौद्ध झाला होता. त्याने 'मिलिंदपन्ह' नावाचा एक ग्रंथ रचला व स्वतःचे नाव बौद्ध साहित्यात अजरामर करून ठेवले. त्याच्या मृत्यूनंतर बौद्धांनी त्याच्या मृत देहावर स्तूप बांधून त्याचा गौरव केला. या सगळ्या प्रकारात बौद्धांचा भाबडेपणा स्पष्ट होतो. ते परधार्जिणे होते. शत्रूने केवळ आपला धर्म स्वीकारला यामुळे ते एवढे हुरळून गेले की विचारू नका. वैष्णव धर्मीय कांही मागे नव्हते. हेलिओदोरस नावाच्या एका ग्रीक अधिकाऱ्याने गरुडस्तंभ उभारला व त्यावर लेख कोरून आपल्या धर्मांतराचा अविस्मरणीय व कायमचा पुरावा ग्वॉलेरजवळ भिलसा गावात मागे ठेवला आहे. केवळ आपला धर्म स्वीकारला एवढ्यावर कोणीही हुरळून जाणे हे राजकारणात केव्हाही अनिष्टच आहे. अशा वेळी रामाची आठवण येते. बिभीषण रावणाचा पक्ष सोडून रामाकडे आला, तेव्हा रामाने हनुमंतास त्याच्याविषयी पूर्ण माहिती काढून आणण्यास सांगितली व नीट खात्री पटल्यावरच रामाने बिभिषणाचा स्वीकार केला. (संभाजी व शंकरसिंह वाघेला यांच्यावर अनुक्रमे मोगल व सोनियांची काँग्रेस यांनी कधीच विश्वास ठेवला नाही! दोघांनीही कंटाळून नंतर 'घर वापसी' केली.)

■ सारा मध्य आशिया व पूर्व युरोपचा कांही भाग अरबांनी २०० वर्षांत पादाक्रांत केला. हा सारा भाग मुसलमान झाला. याउलट, अरब व तुर्कांना हिंदुस्थानावर ताबा मिळविण्यासाठी ५०० वर्षे सतत झगडावे लागले. तरी सारा हिंदुस्थान त्यांना जिंकला आला नाहीच, उदा. आसाम, नेपाळ, वगैरे. मुख्य म्हणजे अरबांना हिंदुस्थानात विजय कधी मिळालाच नाही. अपवाद त्यांचे सिंधवरील १५० वर्षे राज्य आणि दक्षिणेत मदुरावर कांही थोडी वर्षे. भाबडे हिंदू अजून डाव्यांच्या थापांवरच विश्वास ठेवतात.

■ देव जागृत होते, भाबडे कधीच नव्हते. त्याचे सुंदर उदाहरण म्हणजे संजीवनी विद्या शिकण्यासाठी देवांचा गुरू बृहस्पती याने आपला पुत्र कच याला शत्रूच्या गोटात धाडून तो ती विद्या शिकून परत सुखरूप घरी आला, अशी व्यवस्था केली. याचा अर्थ देव जागृत होते, दानव व दानवांचे गुरू भाबडे होते, असाच होतो. (मुसलमान विद्यार्थी ग्रीस व भारतात विद्या शिकत व अरबीत ग्रंथ लिहित. त्यांचे व्यापारी स्पेनपासून चीनपर्यंत संचार करीत व भूगोलाचे ज्ञान आपल्या बंधुंना शिकवीत. आम्ही मात्र सिंधुबंदी करून आमचा व्यापार परकीय

अरबांच्या व नंतर युरोपियनांच्या हाती दिला. जपानने असे शेकडो कच युरोपात धाडून आपली वैज्ञानिक प्रगती साधली. पहाता पहाता जपान आशियाचा जर्मनी बनला.)

■ नाना फडणविसांनी १७९५ साली काशीस कर्मनाशी नदीवर पूल बांधावयास काढला, पण त्या नदीचे पाणी हटेचना. आमच्या इंजिनियरांनी हातपाय गाळले. मांत्रिक-तांत्रिकांनी जलदेवतेला प्रसन्न करण्याकरिता तोडगे केले. नानांचा काशी येथील कारकून कुंटे याने कुमारस्वामी कोमटी याच्या विद्यमाने अनुष्ठान आरंभिले. पण शास्त्रीय उपाय योजण्याचे सोडून अर्थशून्य बडबड करणाऱ्या या मांत्रिकाकडे पाहून जलदेवता मनांत फक्त हांसली असेल! शेवटी कंटाळून नाना फडणविसांनी बेकर नावाच्या इंजिनियरला बोलावणे धाडले, आणि तो आल्यावर कृष्णाचा स्पर्श होताच यमुनेने वाट करून द्यावी, त्याचप्रमाणे बेकरच्या कळीच्या बंबाचा स्पर्श होताच जलदेवतेने सुखाने पूल बांधू दिला! नर्मदेवरील १८८१ साली बांधलेल्या सुवर्ण पुलाची अशीच मजेदार गोष्ट सांगतात.

■ मुसलमानांनी आपल्यावर १,००० वर्षे राज्य केली यासारखी दुसरी कोणचीच मोठी थाप नसेल. *(पहा परिशिष्ट १)*

■ कर्नाटकातील लोक केवढे भाबडे, टिपू इंगजांशी लढला म्हणून त्यास ते अजून स्वातंत्र्यसैनिक समजतात! थेट केरळात व तामीळनाडुमध्ये जाऊन त्याने सक्तीने हिंदूंना बाटविले याकडे ते सरळ दुर्लक्ष करतात. हैदर व टीपू स्वतःस हिंदुस्थानी मुसलमान कधीच मानीत नव्हते.

■ आपण ज्यांना भारतावरील स्वाऱ्या म्हणतो त्या 'स्वाऱ्या' होत्याच. खरे म्हणजे आपण भारतीय जमिनीवरील त्या मुसलमानांमधील तुर्क, अफगाण, पर्शियन्स, मंगोल व तार्तर – आपापसातील मारामाऱ्या होत्या, हे सत्य विसरता कामा नये. त्या निरनिराळ्या मुसलमानांच्या टोळ्यांना मात्र एका सूत्राने बांधून ठेवले होते; ते सूत्र म्हणजे : 'काफर हटवा'. (१९७१ नंतर पाकिस्थानास हेच धोरण स्वीकारावे लागले.) त्यांचे ७० टक्के उच्च नागरी व लष्करी अधिकारी परकीय (इंपोर्टेड) मुसलमान असत. अकबरही त्यास अपवाद नव्हता. औरंगझेब "आम्ही तुर्क, तुम्ही हिंदुस्थानी" असे म्हणून येथील मुसलमानांना हिणवत असे. आजवर हे सत्य दडवले गेले, नाहीतर येथील मुसलमानांनीदेखील औरंगझेबाचा द्वेषच केला असता. खोटा इतिहास सांगून सेक्युलरवाद्यांनी इतिहासाचे 'व्हाईटवॉश' केले. आमच्या पुरातत्व (आर्किऑलॉजी) खात्याचा सारा भर मुसलमानांच्या थडग्यांना सुरक्षित ठेवण्यावर असतो. दक्षिणेकडे मोठाली मंदिरे दिसतात तशी प्रचंड मंदिरे उत्तर

भारतात होती. हिंदू माणसे बाटविली तशा या वास्तुंना बाटविले गेले, हे कोणी शिकवीतच नाही. (हे आपल्याकडे होते असे नाही. तुर्कस्थानातील इस्तंबूलमध्ये ग्रीकांचे पॅट्रिआर्किअल बॅझिलिका होते त्याचे रोमनांनी ५३७ साली रोमन ख्रिश्चन कॅथेड्रल बनविले. तुर्की मुसलमानांनी २९ मे १४५३ रोजी त्याची प्रसिद्ध नीळी मशीद बनविली. १९३१ साली केमाल पाशाचे निधर्मी राज्य आले व त्याचे म्युझियम बनविले गेले. लाल किल्ल्याशेजारची बडी मशीद खरे म्हणजे म्युझियम व्हायला पाहिजे. त्यासाठी नेत्यात 'दम' असावयास पाहिजे. भारतीय मुसलमान खाजगीत हळहळतात, एक तर आम्हाला घाबरणारे डरपोक हिंदू भेटतात, नाहीतर आमचे तुष्टीकरण करणारे. कोई मर्द मिलते ही नही.''

■ १८५७ साली हिंदू आणि मुसलमान खांद्याला खांदा लावून लढले ह्या भाबड्या समजूतीला काय म्हणावे? हिंदू चाकरमाने होते व त्यांनी मुसलमानांच्या पदरी चाकरी करण्यात धन्यता मानली. मुसलमान सत्ताधीश होण्यासाठी नेहमीच आसूसलेले होते. हिंदूंनी नाखुशीने कां होईना, दुय्यम भूमिका कधीचीच स्वीकारली होती. मुसलमानांचा जुलूम प्रतिकाराशिवाय सहन करण्याचे त्यांनी आपखुशीने स्वीकारले होते. हिंदू धर्म मूळातूनच सहिष्णु होता. त्यांना फक्त एकच गोष्ट माहीत होती – अलगतावाद किंवा वेगळेपण. दोघा समाजांना कॉंग्रेसमध्ये नांदायला काय हरकत होती? १९०७ साली लॉर्ड कर्झनच्या आशीर्वादाने त्यांनी मुस्लीम लीगची स्थापना केली. मुसलमानांनी कॉंग्रेसमध्ये जाऊ नये यासाठी ती योजना होती. जीनांनी प्रथम विरोध केला पण १९१३ साली त्यांनीही तीचे सदस्यत्व स्वीकारलेच. ते पाकिस्थानचे निर्माते बनले. टिळकांचा लखनौ करार हे तुष्टीकरणाच्या प्रवासाचे पहिले स्टेशन होते. शेवटचे पाकिस्थान. पहिला ड्रायव्हर आगाखान. नंतरचा जीना.

■ हिंदू फारच भाबडे. त्यांना एक संत पाहिजे होता, त्याचा आश्रम पाहिजे होता, त्यांना त्याचे रामराज्य एकदम आवडून गेले. संताला स्पर्धा चालत नाही. या संताने लाला लजपत राय, चित्तरंजन दास व मोतीलाल नेहरूंना आपल्या कळपात ओढले. राहिले जीना. या संताने महंमद अली व शौकत अली यांच्या सहकार्याने जीनांचा १९२१ साली नागपुरात निकाल लावला. सप्रू, शास्त्री, जयकर हे नेमस्त. या संताने त्यांनाही निष्प्रभ केले. भाबड्या हिंदूंना फसवून व्यक्ती म्हणून संत जिंकले पण त्यात देश हारला. ब्रिटीश बाबू जिंकले! मुस्लीम जातीयवादी चळवळीला खतपाणी घातले गेले. अलगतावादाने भाबडेपणावर विजय मिळविला. (आरिफखानांना राजीवच्या भाबडेपणामुळे कॉंग्रेसचा राजीनामा द्यावा लागला. भारतीय मुसलमानही तेवढेच भाबडे! त्यांनीही अरब ही 'मास्टर रेस' हे कटु सत्य स्वीकारलेच!)

■ इंग्रजांनी आपल्यावर धाक बसविण्यासाठी खोटा इतिहास तयार केला. हेतू सरळ होता : हिंदूंना मुसलमानांची भीती वाटावी. आणि मुसलमानांना इंग्रजांची. इंग्रज गेले तर आमचे काय होईल, ही भीती हिंदूंना वाटू लागली व इंग्रज गेले तर हिंदूंच्या लोकशाहीत आपली संख्या अल्प असल्यामुळे आपल्याला आवाज नसणार, अशी भीती मुसलमानांना वाटू लागली. म्हणून गांधीजींनी त्यांचे पाय धरणे सुरू केले. हिंदू अशक्त आहेत म्हणून ते आपले लांगूलचालन करतात, असा भ्रम मुसलमानांना वाटू लागला. म्हणून सावरकरांना स्पष्ट शब्दात सांगावे लागले, "याल तर तुमच्यासह, न याल तर तुमच्याशिवाय व विरोधाल तर त्या विरोधासह, आम्ही स्वातंत्र्य मिळविणारच." गांधीजींच्या लांगूलचालनामुळे एक रक्ताचा थेंब न सांडता मुसलमानांना आयते स्वातंत्र्य पदरी पडले. त्यामुळे हिंदू व मुसलमानांची समानता (पॅरीटी) होऊ शकतच नाही. फक्त मराठा नेते मुसलमानांना घाबरत नव्हते. याचे कारण शिवाजी. पंजाब व आसाम सोडले तर दुसऱ्या कोणच्याच प्रांतास शिवाजी लाभला नव्हता. इंग्रजांनी टिळकांनंतर कॉंग्रेसमध्ये मराठी नेत्यांची खच्ची कशी होईल ते फार छान 'मॅनेज' केले. भाबड्या हिंदूंनी ते होऊ दिले. गांधीजींनी मराठी नेत्यांना जवळ केले खरे, पण त्यांना विनोबाप्रमाणे होयबा बनविल्यावरच. १९३७ नंतर त्यांना पर्यायी नेता लाभला होता. तो त्यांनी स्वीकारला नाही.

ब. आता

■ १९१४-१५ या काळात १८५७ ची पुनरावृत्ती झाली, सारा कट छान रचला गेला. एवढ्यात कळले की बुटासिंग नावाचा पोलीस हा हेर आहे. रासबिहारींनी हुकूम दिला, "बुटासिंगला ठार मारा." क्षमा शूरस्य भूषणम असे म्हणून त्यास भाबडेपणाने सोडून देण्यात आले. हा कट यशस्वी झाला असता. त्या दिवशी कमीत कमी गोरे शिपाई भारत भूमीवर होते. (असा भाबडेपणा प्रतापराव गुज्जरांनी केला होता व मोगल सेनेस जाऊ दिले होते. शिवाजीने त्यांना माफ केले नाही.) शीखांच्या देशद्रोहामुळे हे स्वातंत्र्ययुद्ध आपण पुन्हा हारलो.

■ **गांधीजी** :

(१) गांधीजींनी महात्म्याला साजेशी अशी गूढवादाची भाषा सुरू केली. अनेक विषयांवर निर्णय देताना आपल्या आतल्या आवाजाच्या प्रेरणेची ते साक्ष देत. सत्याग्रह जेव्हा १९१९ साली हट्टाग्रह बनला तेव्हा आपण आपल्या आतल्या आवाजाच्या प्रेरणेवर सत्याग्रह सुरू केला, ती हिमालयाएवढी मोठी चूक झाली हे त्यांनी कबूल केले.

(२) बिहारमधील प्रचंड भूकंपाच्या वेळीदेखील 'दलितांना वाईट वागविल्याबद्दल झालेला हा देवाचा कोप' असे स्पष्टीकरण दिले. टागोरांनी 'कशावरून?' असा प्रश्न विचारला. ते म्हणाले, "आतला आवाज तसे सांगतोय." त्यावर कोणीच विश्वास ठेवला नाही. ते उघडे पडले. गांधीजींनी हिंदूंच्या भाबडेपणाचा शेवटपर्यंत फायदा उठविला. त्यांच्या भाषणाची सुरवात 'रघुपती राघव राजाराम पतित पावन सीताराम!' या माधुरी खरे यांच्या सुरेल आवाजातील प्रार्थनेने होई. त्यांच्या तोंडी रामराज्याची भाषा असे. त्यावेळी ते सारे चालले. कारण, जनता भाबडी होती. त्यावेळी टीव्हीचे आजचे तरुण चलाख पत्रकार असते तर गांधीजींना केव्हाच पळ काढावा लागला असता.

■ नेहरू :

(१) गांधीजींचा भाबडेपणा नडला. १९ पैकी १२ प्रदेश काँग्रेस समित्यांनी सरदार पटेलांना काँग्रेस अध्यक्ष म्हणून निवडले होते, पण गांधीजींनी त्यांना समजावले, "नेहरू हॅरोचा विद्यार्थी आहे, केंब्रिजचा पदवीधर आहे व बॅरिस्टर आहे. इंग्रजांशी काही बोलणी करावयाची झाल्यास नेहरू ते ती जास्त चांगली करू शकतील." शेख अबदुल्लांना नेहरू भाऊ मानीत. सारी हातातली कामे सोडून त्यांना सोडवायला ते काश्मीरात १९४६ च्या जुलै महिन्यात गेले होते. सरदारांनी तेव्हा त्यास 'भावनिक वेडेपणा' म्हटले होते. महाराज सप्टेंबर १९४७ मध्ये विलीनीकरणाच्या कागदावर सही करायला तयार होते. नेहरू 'नाही' म्हणाले व 'आधी शेख अबदुलांना जेलातून सोडा', अशी अट टाकली. ऑक्टोबरमध्ये काश्मीरवर हल्ला झाला. नेहरूंनी मौंटबॅटन यांना संरक्षण कौंसिलचे प्रमुख नेमले. त्यांचा ओढा पाकिस्थानकडे होता. त्यांनी पटविले, 'युनोत काश्मीरची केस न्या.' सरदार भडकले. त्यांनी २३ डिसेंबर १९४७ रोजी राजीनामा दिला, पण गांधीजींनी तो रोखून धरला. युनोत अपेक्षेप्रमाणे भारताविरुद्ध केस जाऊ लागली. दोघा भावांचे एवढे फाटले की १९५३ च्या ऑगस्टमध्ये नेहरूंनी अबदुल्लांना कैद केले. काश्मीर केस जर सरदार पटेलांकडे दिली असती तर हा घोळ न होता सारे कसे व्यवस्थित झाले असते. काश्मीर केस म्हणजे गांधी-नेहरूंच्या भाबडेपणाचा जिवंत पुरावा आहे.

(२) बांडुंगला नेहरूंना चीनच्या महत्त्वाकांक्षेची ओळख पटली होती. तरीदेखील चीनवर पुरा भरवसा दाखविण्याचा भाबडेपणा त्यांनी दाखविला. पाकिस्थानाने परस्पर चीनला पाकमध्ये रस्ता बांधू दिला. आयजीच्या जीवावर बायजी उदार. इतर देशांत राष्ट्राचा आकार वाढत जातो. नेहरूंच्या राज्यात नेमके उलटे झाले.

१९६२ मध्ये भारताचा पराभव झाला. लोकसभेत नेहरूंनी गळा काढला, ''चीनने आमच्या पाठीत खंजीर खुपसला.'' राजाजी लगेच उभे राहिले. त्यांनी नेहरूंना विचारले, ''पण तुम्ही त्या वेळी काय करीत होतात?''

■ **सिंडिकेट** : १९६८ च्या अखेरीस देसाई व कामराज एकत्र आले व इंदिरेला काढून मोरारजीभाईंना पंतप्रधान करण्याचा कट रचू लागले. सिंडीकेट संजीव रेड्डींना काँग्रेस अध्यक्ष नेमून इंदिरेस काढून तिच्या जागी देसाई पंतप्रधान होतील असे मनसुबे रचू लागली. १६ जुलै १९६९ रोजी हकसरांना *लायटनिंग कॉल* करून कळविले की तीने मोरारजीभाईंना अर्थमंत्र्यांच्या पदावरून काढले आहे. तीने लोकांना सांगितले, तिच्या समाजवादी तत्त्वांना योग्य असा अर्थमंत्रीच पाहिजे. मोरारजीभाईंना मात्र तो धक्का सहन झाला नाही. त्यावेळी मी त्यांच्या घरी होतो. त्यांच्या घरी भांड्यांची आदळआपट चालली होती. थोड्याच दिवसांत तीने बँकांचे राष्ट्रियीकरण केले. कामराजांच्या जागी काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निजलिंगप्पांना सिंडीकेटने काँग्रेस अध्यक्ष म्हणून नेमले. तो बिचारा सरळ माणूस होता. भाबडेपणाने त्याने इंदिरेला पत्र लिहले, ''तू तुझ्याशी एकनिष्ठा हा निकष ठरविला आहेस, पक्षाशी एकनिष्ठा हा निकष पाहिजे.'' निजलिंगप्पा व इंदिरा यांची तुलनाच होऊ शकत नव्हती. खरे म्हणजे सिंडिकेटचे सर्वच पुढारी असे भाबडे होते. म्हणूनच इंदिरा त्या सर्वांची वाट लावू शकली.

■ **इंदिरा गांधी** :

(१) १९७१ मध्ये बांगलादेश निर्माण करून इंदिरेने जीनांच्या 'दोन राष्ट्रांचा सिद्धांत' साफ तोडून मोडून काढला. मात्र, त्या नंतर झालेल्या सिमला करारात झुल्फिकार भुट्टोने चांगला सूड उगविला. भारताकडे ९३,००० युद्धकैदी होते. ते भारताने पाकिस्थानास परत केले. त्यासाठी भारतास काय मिळाले? कांही नाही. खरे म्हणजे, इंदिरेस ती 'काश्मीर प्रश्न' सोडविण्याची सुवर्ण संधी होती. इंदिरेने त्याचा लाभ उठविला नाही. भुट्टोने मात्र नाटकबाजी करून बाईंना चांगले फसविले.

(२) त्याचप्रमाणे राष्ट्रीय सुरक्षेचा कांहीही विचार न करता मुसलमान बांगलादेशींना रोज शेकडोंच्या संख्येने घुसखोरी इंदिरेने होऊ दिली, या भाबडेपणास काय म्हणायचे? मुर्शिदाबाद, मालडा, पश्चिम दिनाजपूर व बीरभूम यांची मुसलमान वस्ती अनुक्रमे ५८.६६, ४५.७९ व ३०.९७ टक्के १९८१ च्या सेन्ससप्रमाणे आहे. प. बंगालची मुस्लीम वस्ती २९.६ टक्के आहे. हा सरळसरळ देशद्रोह आहे. सत्तेवर राहण्यासाठी केलेला देशद्रोह.

■ नरसिंह राव :

(१) नेमीचंद जैन यांनी बिहारच्या जंगलात पांच वर्षे तपश्चर्या केली होती व कांही सिद्धी मिळविल्या होत्या. ते चंद्रास्वामी म्हणून पुढे प्रसिद्धीस आले. लक्ष्मी कांतम्मा व चंद्रास्वामी यांच्या मदतीने नरसिंह रावांनी आपली राजकीय प्रगती साधली. पण निर्णय घेताना चंद्रास्वामींवर अवलंबून राहणे हा भाबडेपणा त्यांना नडला. तरुणपणी ते मुख्यमंत्री झाले, म्हणजे त्यांना इंदिरेने 'नियुक्त' केले. आंध्रात रेड्डींचे राज्य. रेड्डी म्हणजे मोठे जमिनदार. पाटील वा पटेलांसारखे. इंदिरा समाजवादी. तीला खुश करण्यासाठी यांनी जमीन सुधारणा सुरू केल्या व रेड्डींच्या जमीनीची मर्यादा नक्की केली. रेड्डींजवळ तर हजारहजार एकर जमीनी होत्या. ते सगळे एकत्र आले व स्वतंत्र तेलंगणाच्या नावाखाली दंगे सुरू केले. इंदिरेला तेथे राष्ट्रपतींची राजवट जाहीर करावी लागली. एका वर्षातच रावांना मुख्यमंत्री पद गमवावे लागले.

(२) चंद्रास्वामींवर रावांचा भरवसा फार. रावांना मराठी चांगले येई. ते पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजात शिकले होते. त्यामुळे संघाच्या मराठी बोलणाऱ्या नेत्यांशी त्यांनी नोव्हेंबरमध्ये गुप्त बैठका घेतल्या. युपीचे मुख्यमंत्री कल्याणसिंगांनी त्यांना आश्वासन दिले, बाबरी मशीदीस धक्का लागणार नाही. २५ नोव्हेंबर रोजी अडवाणी, वाजपयी व कल्याणसिंगांनी त्यांना आश्वासन दिले, कांही गडबड होणार नाही. पण अयोध्येत गर्दी वाढत होती. २५ नोव्हेंबर १९९२ रोजी फक्त ५०० लोक तेथे जमले होते, ते ३० तारखेस पावणेदोन लाख झाले. ५ डिसेंबर रोजी ते २ लाख झाले. अशा वेळी आश्वासनांवर विसंबून राहणे भाबडेपणाचे लक्षण होते. रावांचा भाबडेपणा मूर्खपणा ठरला.

(३) नरसिंह रावांचा बाबरी मशिदीसंबंधीचा भाबडेपणा काँग्रेसला चांगलाच भोवला. त्याचा फायदा भाजपला १९८४ मधील २ च्या ८६ (१९८९) बैठका मिळण्यात झाल्या. १ व २४ नोव्हेंबर १९९२ या काळांत युपीत त्यांनी राष्ट्रपती राजवट जाहीर केली असती तर मशीद तुटली नसती व पुढचे दंगे झाले नसते. २०१४ साली कोब्रापोस्टने कांही स्टींग ऑपरेशन्स केली. त्यात रावांची अप्रत्यक्ष मदत होती हे सिद्ध झाले आहे. त्यामुळे काँग्रेसच्या काळ्या यादीत रावांचे नाव गेले.

■ **वाजपयी** : वाजपयी बोलूनचालून कवी मनाचे. त्यांचा भाबडेपणा तीन वेळा देशाला नडला : (१) १९९८ च्या डिसेंबरात खाटमंडू ते न्यू दिल्ली जाणाऱ्या इंडियन एअरलाईन्सचे आयसी ८१४ या विमानाचे अपहरण झाले व ते विमान तालिबानचे राज्य असलेल्या अफगाणिस्थानात नेण्यात आले. मिडीयावर नातेवाईकांचा एवढा आक्रोश दाखविण्यात आला की मसूद अझहरसारख्या भयंकर आतंकवाद्यास

सोडावे लागले व विमानातील प्रवाशांचे प्राण वाचवावे लागले. भारताची त्यात *सॉफ्ट स्टेट* म्हणून नाचक्की झाली. (२) एका बाजूस १९९८ वर्षाच्या अखेरीस शांतता प्रस्थापित करण्यासाठी वाजपयींनी लाहोर-दिल्ली बस चे उद्घाटन केले व लाहोर येथे शांततेची घोषणा केली. दुसऱ्या बाजूस मुशर्रफने काश्मीरात कारगिल येथे पाकिस्थानी सैन्य घुसविले. जून १९९९ मध्ये घनघोर 'ऑपरेशन विजय' ची लढाई झाली व ५०० भारतीय जवान कामास आले. भारताचे गुप्तचर खाते झोपले होते, असा याचा अर्थ झाला. (३) २००१ सालच्या १४-१५ जुलैची आग्रा येथील शिखर परिषद. मुशर्रफ त्यांना बनवू पहात होता. अडवाणींनी त्यांना सावरले. कोणच्याही चांगल्या नेत्यास हा भाबडेपणा शोभणारा नाही.

■ **ज्योती बसुंचे बंगालचे शासन** : असा भाबडेपणा फक्त भारतीय साम्यवादीच करू शकतात. आणि भाबडे केंद्र सरकार त्याच्यावर कांहीही कारवाई करू शकत नाही. सारी ह्यात पोलीस स्टेशनांची हर्राजी होते, तसेच डीजीपीच्या पदाचीही. आणि या पाठीमागे तेथील चीफ सेक्रेटरी असतो. आणि तरी भाबडे लोक डाव्या आघाडीच्या सरकारचे कौतुक करतात? *(तुषार तालुकदार यांचे पुढील बंगाली भाषेतील पुस्तक वाचा : नेरे बीर – लांच खाणारा महानायक)*

■ **फडणीस** : त्यांच्यावर कोणाचा दाब आला ते फक्त त्यांना माहीत, पण मुंबईची शान खलास करणाऱ्या आतंकवाद्यांबरोबर वावरणाऱ्या तुरुंगवासाची सजा भोगणाऱ्या संजय दत्तला पॅरोल, रजा आणि विशेष सवलती देण्याचा त्यांचा भाबडेपणा अक्षम्य आहे.

(२) बलोपासना

शक्ती व संपत्ती यांची पूजा पहिल्यापासून भारतवर्षात होत आहे. श्रेष्ठींनी सांगितले :

गुणी गुणं वेत्ति न वेत्ति निर्गुणी
बली बलं वेत्ति न वेत्ति निर्बलः ।
पिको वसन्तस्य गुणं न वायसः
करी च सिंहस्य बलं न मूषकः ।।

(गुणी इतर गुणी माणसांची पारख करू शकतो. निर्गुण्याला गुणांची पारख कशी बरे करता येणार? तीच कथा बलवान माणसाची आहे. कोकीळेला वसंताचे सौंदर्य समजते, कावळ्याला नाही. हत्तीला सिंहाचे बळ कळते, उंदराला नाही.)

जसा चांगला डॉक्टर औषध वापरण्याआधी त्याचे दुष्परिणाम जाणून घेतो,

त्याप्रमाणे भारतीय तत्त्वज्ञांनी बळ या शक्तीचे दुष्परिणाम कोणचे ते आधी अधोरेखित केले आहेत :

यौवनं धनसंपत्तिः प्रभुत्वमविवेकिता ।
एकैकमप्यनर्थाय किमु यत्र चतुष्टयम् ।।

(तारुण्य, संपत्ती, सत्ता व अविवेक यापैकी कोणचेही एक अनर्थ घडवून आणण्यासाठी पुरेसे आहे. मग ते चारी एकत्र आले तर केवढा मोठा अनर्थ घडून येईल)

भारतात बलवानांनी चांगल्यापेक्षा वाईट गोष्टीच जास्त केल्या आहेत. चांगल्या कर्मांपेक्षा अनर्थच जास्त घडविले आहेत. आणि तेच देशाचे दुर्दैव आहे. आपल्याकडे शिवाजी वा बाजीरावांची एकंदर संख्या अत्यल्पच. पण ती जागतिक वास्तवता आहे.

अ. पूर्वी

■ चांगली तब्येत ठेवली की शारीरिक व मानसिक बळ आपोआप येते, असा आपल्या वैदिक पूर्वजांचा विश्वास होता. त्यामुळे त्यांची प्रार्थना होती :

पश्यामि शरदः शतम् ।
श्रुणुयाम शरदः शतम् ।
जीवेत शरदः शतम् ।

त्यांचे अश्वमेध यज्ञासारखे यज्ञ बलोपासनेचे जिवंत पुरावे आहेत.

■ रामकृष्णांना लहानपणी बलोपासनेचे प्रशिक्षण मिळाले होते. रामायणातील हनुमंत व महाभारतातील भीम ही शक्तीची चिन्हे आहेत. चाणक्याने राजपुत्रांच्या प्रशिक्षणाविषयी बरेच महत्त्वाचे लेखन केले आहे.

■ सशक्त व समर्थ शासक दिल्लीत (केंद्रात) असेल तर आजवर कोणीही परकीय शत्रू आपल्यावर स्वारी करण्यात यश मिळवू शकत नाही. ग्रीक शिकंदराचा मौर्यांनी पराभव केला, हूणांचा स्कंदगुप्ताने, अरबांचा राजपूत व प्रतिहार यांनी, मंगोलांचा खिलजींनी, मंगोलांचा अफगाणांनी व इंग्रजांचा हैदर अली व महादजी शिंद्यांनी. पण या महाशक्तीचे वारस दुर्बळ निघाले वा त्या शक्ती आर्थिक वा लष्करीदृष्ट्या कथळल्या की लगेच परक्यांचे ग्रह सुधरतात. दुबळ्या मौर्यांवर ग्रीकांनी विजय मिळविला, हूणांनी गुप्तांवर, तुर्कांनी राजपुतांवर, तैमूरलंगाने अशक्त तुघ्लगांवर, मंगोलांनी लोदींवर, इराणी नादीर शहांनी मोगलांवर आणि इंग्रजांनी म्हैसूरवाल्यांवर व मराठ्यांवर. १९६२ चा नेहरूंचा चीनी नेत्यांनी केलेला पराभव

आपण कसे विसरू?

■ शिवाजीच्या व पेशव्यांच्या बालपणी कसे प्रशिक्षण मिळायचे त्याची माहिती आपल्याला जुन्या बखरीतून मिळते. "सैन्य घेरना, दुर्ग तोडना, यह थे उनके प्रिय खिलवार," असे झांशीच्या लक्ष्मीबाईंचे वर्णन आपल्यास वाचावयास मिळते.

■ कर्झन मोठा स्कॉलर व उत्तम शासक होता. तरी त्याचे लष्करी प्रमुखापुढे कांही चालले नाही, त्याला परत इंग्लंडला जावे लागले. 'आपण बंदुकीच्या जोरावर भारत काबूत ठेवीत आहोत', हे सत्य इंग्रज बाबुंना बरोबर माहीत होते.

ब. आता

■ सुरवातीला इंग्रजांशी राजनिष्ठ राहूनच सारे कॉंग्रेसवाले राजकारणाची भाषा बोलत असत. १९०५ सालानंतर लो. टिळकांनी ती लाचाराची भाषा सोडली व हक्काची भाषा सुरू केली. १९१५ पर्यंत मवाळ अग्रणी मेहता व गोखले हयात होते. तोपर्यंत लोकमान्य असले तरी त्यांना अध्यक्षाच्या खुर्चीचा मान कधीच मिळू शकला नाही. कारण मवाळांना संपूर्ण स्वातंत्र्य नकोच होते. जास्तीत जास्त होम रूल. बस्स. त्या पलीकडे कांही नाही. संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा सावरकरांनी १८९९ साली व पं. नेहरूंनी १९४० साली रावी नदीच्या कांठी केली. मात्र प्रत्येक नेत्यास भारतीयांनी सशक्त व सामर्थ्यवान व्हावे असे सतत वाटत होते.

■ इतिहासाचार्य राजवाडे : इंग्रज भारतीयांपेक्षा बौद्धिक (वैचारिक) बाबतीत पुढे कां व कसे आहेत ते राजवाड्यांनी सांगितले आहे," ....या टोपीवाल्यांकडून कारीगार बंदुका, तोफा व दारुगोळा जो शहाजी घेई, तो त्याने महाराष्ट्रात त्याबरहुकूम बनविण्याची व्यवस्था कां केली नाही? अथवा शहाजीचा मुलगा शिवाजी त्याने तरी कां केली नाही? ....उत्तम, रेखीव व नेमके हत्यार बनविण्याची कला पैदा होण्यास शास्त्रीय ज्ञानाची जी पूर्वतयारी राष्ट्रात व्हावी लागते, ती त्या काळी महाराष्ट्रात नव्हती. शहाजीच्या हयातीत युरोपात द कार्ट, बेकन इत्यादि विचारवंत सृष्टपदार्थ संशोधनकार्याचे वाली ज्यारीतीने पंचभूताचा शोध लावण्यात लोकांना प्रोत्साहित करीत होते आणि आपल्याकडे एकनाथ, तुकाराम, दासोपंत, निपटनिरंजन इत्यादी संत पंचमहाभूतांना मारून ब्रह्मसाक्षात्कारात राष्ट्राला नेऊन मुक्त करण्याच्या खटपटीत होते. अशांना स्क्रू, टाचणी, बंदूक व तोफ यांचा विचार वमनप्राय वाटल्यास नवल कसले?... हा प्रचंड संस्कृतिप्रवाह म्हणजे ज्याला लो. टिळक आधुनिक भौतिक शास्त्रीय संस्कृती म्हणतात त्या प्रवाहाने एकट्या इस्लामी विकृतीलाच तेवढे क्षीण केले असे नाही. या प्रवाहाने ख्रिस्ती विकृतीलाही दुर्बल करून

सोडले. ही संस्कृती कालांतराने हिंदी विकृतीला व बौद्ध विकृतीलाही मुरगळून टाकणार होती." *(राधामाधवविलासचंपू, पृ. १०७-०८)* राजवाड्यांच्या मते या 'विकृती' १५५० च्या सुमारास बऱ्याच क्षीण झाल्या. हा साधारणतः हुमायूनाचा काळ येतो.

■ **लो. टिळक** : एका बाजूस भिक्षांदेहीचे सनदशीर राजकारण आणि दुसऱ्या बाजूस सशस्त्र क्रांतीचे उतावीळ व व्यवहारशून्य राजकारण, या दोहोंच्यामधून निःशस्त्र क्रांतीच्या मार्गाने राष्ट्रसभेची नौका हाकावी व त्यासाठी तीचे कर्णधारित्व नव्या पक्षाकडे घ्यावे असे टिळकांना वाटत होते.

■ **दादाभाई नौरोजी** : दादाभाईंचे ध्येय पुढीलप्रमाणे होते : 'Self Government of Swaraj like that of the United Kingdom or the Colonies.' समारोपाच्या भाषणांत वसाहती किंवा इंग्लंड यापैकी कोणाचाच उल्लेख न करता केवळ एवढाच संदेश त्यांनी दिला होता : 'Be united, persevere and achieve self-government.' त्याविषयी लो. टिळकांनी लिहिले होते, "स्वराज्य – लोकांनी आपण होऊन चालविलेले स्वराज्य – आपणांस प्राप्त झाल्याखेरीज आपल्या उद्धाराचा दुसरा मार्ग नाही, असे नेटाने, स्पष्टपणे व सोप्या भाषेत, गहिवरून दादाभाई यांनी जेव्हा काँग्रेस सभेच्या व्यासपीठावरून अखेरीस सांगितले, तेव्हा कोणी वृद्ध देवदूत आपल्या तरुण पिढीस शेवटचा उपदेश करण्याकरिताच अवतरला आहे की काय, असा क्षणभर भास झाला." *(लो. टिळकांचे केसरीतील लेख, भाग ३ रा, पृ. १३२-३४)*

■ **स्वामी विवेकानंद** : "What our country now wants are muscles of iron and nerves of steel, gigantic wills which nothing can resist, which penetrates into the mysteries the secrets of universe and accomplish their purpose in any fashion, even if it means going down to the bottom of the ocean and meeting death face of face. That is what we want, and that can be only created, established and strengthened by understanding and realizing the idea of *advaita*, and the ideal of oneness of all. Let me tell you that we want strength, strength and everytime strength. And the only religion that ought to be taught is of fearlessness. None is really weak, the soul is infinite, omnipotent and omniscient." स्वामी विवेकानंदांचे बलोपासनाचे औषध तरुण बंगालने स्वीकारले व तेथे एवढ्या संख्येने बेडर व बलवंत कार्यकर्ते निर्माण केले की इंग्रज शासक कंटाळून सुरक्षेसाठी कलकत्ता सोडून १९११ साली दिल्लीस पळाले व तेथे त्यांनी ल्युटिअन दिल्ली ही राजधानी केली. महाराष्ट्रात असाच महाप्रलय सुरू झाला होता, पण त्यांनी सावरकर नावाच्या त्यांच्या म्होरक्यास जेरबंद करून त्याची

रवानगी १९१० साली अंदमानात केली व महाराष्ट्रातली आग शांत झाली.

■ **सावरकर** : १५ एप्रिल १९३८ रोजी मुंबई मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानाहून केलेल्या भाषणात सावरकर म्हणाले, "तरुणांनो, लेखण्या मोडा व बंदुका हाती घ्या. पुढील दशकांत सुनीते रचणारा एकही तरुण नाही निघाला तरी चालेल... जर्मन संगीनीच्या सामर्थ्यापुढे मान तुकवावी लागली होती, जर्मन सुनीतापुढे नाही! राष्ट्रीय जीवनाचे संरक्षण हीच आपल्या साहित्याची आद्य चिंता. आपल्या राष्ट्राची आजची मृत्युंजयमात्रा म्हणजे त्याचे शस्त्रबळ, साहित्य नव्हे.... नगरानगरातून सैनिक महाविद्यालये गजबजलेली आढळली पाहिजे. मग अधूनमधून त्या तरुणांनी एखादी प्रेमकथा लिहिली वा एखादे सुनीत लिहिले तरी चालेल. दिल्लीच्या बादशहाची दाढी जाळून आल्यावर पहिले बाजीरावही मस्तानीच्या अंत:पुरात एखादे पान खाताना आढळत. पण जन्मभर नुसती झाडाचीच पाने चघळणाऱ्या आणि तमाशातील तबलेच झडवत राहिलेल्या दुसऱ्या बाजीरावाचे ब्रह्मावर्तच या राष्ट्राने बनावे... हे मला पहावत नाही! शस्त्राने रक्षिलेल्या राष्ट्रातच काव्यशास्त्र विनोदाला वाव असतो. शस्त्रेण रक्षिते राष्ट्रे शास्त्रचर्चा प्रवर्तते ।"

■ कांही राजकीय महत्त्वाचे मुद्दे आपण लक्षांत ठेवले पाहिजेत. भारतात इंग्रजांएवढे बलाढ्य नसेल पण भारतात मौर्य, गुप्त, प्रतिहार, खिलजी व मोगल साम्राज्ये छान नांदत होती. मराठा व म्हैसूरची (विजयनगर) साम्राज्ये यांचादेखील रूबाब होता. ही सारी साम्राज्ये आर्थिक व लष्करीदृष्ट्या त्यांच्या प्रांतिक राज्यपालांमार्फत सुशासित होती. भारतात अशोक, चंद्रगुप्त मौर्य, चंद्रगुप्त विक्रमादित्य, अकबर, पेशवे या सर्व सत्ताधीशांनी सबळ केंद्र शासन करून व शत्रुंना लोळवून देशाचे नाव मोठे केले. मोगलांनी इराण्यांना काबूल व कंदाहारमध्ये सतत गुंतवून ठेवले. या 'आगे बढो' (फॉरवर्ड पॉलिसी) धोरणामुळे इराण्यांची भारतावर चाल करायची कधी हिंमतच झाली नाही. पहिल्या अँग्लो-मराठा युद्धांत पुण्याजवळ इंग्रजांचा पराभव केल्यानंतर महादजी शिंद्यांनी इंग्रजांना मध्य प्रदेशात गुंतवून ठेवले. सत्ता बदलली की राजधानीदेखील बदलायची -- कधी अयोध्या, कधी दिल्ली, कधी आग्रा, कधी पाटलीपुत्र, कधी अजमेर तर कधी पुणे. एके काळी पाटलीपुत्रानंतर कनौज ही नगरी फार नावाजलेली होती. पाल, प्रतिहार व राष्ट्रकूट ती घेण्यासाठी झगडत होते. हर्षाने तेथून राज्य केले. मुसलमानांना दिल्लीचे आकर्षण जास्त होते.

१९११ साली इंग्रजांनी कलकत्ता सोडले व दिल्ली ही आपली राजधानी पसंत केली. मुस्लीम लीगला १९४७ साली लाल किल्ल्यावर हिरवा झेंडा

फडकवावयाचा होता. संघाने तसे होऊ दिले नाही. त्यासाठी त्यास बक्षीस काय मिळाले? वर्षभर बंदी. ही सुसंघटित संस्था आपल्या हाती आलेली सत्ता हिसकावून घेईल अशी नेहरूंना भीती वाटल्यास नवल नव्हते.

ऐदी व उन्मत्त खासदारांत शिस्त आणण्यासाठी प्रत्येकास काश्मीर, लेह वा सियाचीन येथे १५ दिवस सैन्याबरोबर राहण्याची सक्ती करणे आवश्यक आहे.

नेहरू-गांधींचा भारत केंव्हाच संपला

"काँग्रेसला आता अस्तित्वाचे संकट झेलावे लागत आहे," जयराम रमेश राखी पोर्णिमेच्या दिवशी, म्हणजे ७ ऑगस्ट २०१७ रोजी म्हणत होते, "जुने मंत्र आता चालणार नाहीत. काँग्रेसने आता बदलायला पाहिजे." आता काळ बदलला आहे. आणि हे सत्य हिंदू नेत्यांनी प्रत्येक मुसलमानापर्यंत पोचेल अशी व्यवस्था केली पाहिजे. कोणचे सत्य? नेहरू-गांधींचा भाबडा भारत आता संपलेला आहे. आता तुम्ही त्यांना मूर्ख बनवून, बाप बनून कांहीही करवून घेण्याची स्वप्ने पहात असाल तर उगाच नाकावर आपटाल. मुसलमान अतिशय हुषार, चाणाक्ष व चलाख आहेत. ते आदर्शवादी नाहीत. त्यांना त्यांचे स्वहित समजते, त्यांना स्वार्थ समजतो. त्यांना आत्महत्या करायला कधीच आवडत नाही, संधी मिळाली तर मारायला आवडते. त्यांना काळ बदलला आहे असे सांगण्याची गरज नाही, ते सत्य नीट जाणतात. वेळ आली आहे ती हिंदूंना त्यांचा स्वार्थ काय व स्वहित कशात आहे ते सांगण्याची. त्यांना आधुनिक पाश्चिमात्य शैलीच्या लोकशाही राजवटीत मजेत रहावयाचे असेल तर त्यांनी पुढील पंचशील जाणून घेतले पाहिजे.

१. आधुनिक राज्यात माहितीवरील सरकारची एकाधिकारशाही केंव्हाच संपलेली आहे. मार्क्स व लेनिन यांचे युग संपले, नव्या युगाचे देव आहेत छोट्या ट्रांझिस्टर्स व मोठ्या पोटाच्या जेट विमानांचे संशोधक बेल लॅब व बोईंग कॉर्पोरेशन. ट्रांझिस्टर्सनी साऱ्या दुनियेची माहिती खाती पार बदलून टाकली आहेत. बीबीसी, सीएनएन, झी वा विव्हो वा अनेक इतर असंख्य चॅनेल्सनी माहिती खात्याचा चेहरा पार बदलून टाकला आहे. जंबो जेट विमानांनी लोक व मालाचे दळणवळण सोपे, स्वस्त व वेगवान करून सोडले आहे. त्यामुळे कल्पना, तंत्र व मंत्र आणि आतंकवादही त्याच वेगाने सर्वत्र पसरू लागला आहे. सोशल मिडीयामुळे क्लीपा फटाफट साऱ्या समाजात पोचतात व खरा खोटा प्रचार होऊन नेत्यांची खुर्ची धोक्यात येऊ शकते, उदा. झोपडपट्टी पुनर्वसन संस्था आणि मुख्यमंत्री फडणीस, मंत्री प्रकाश मेहता व सनदी अधिकारी मोपलवार; तसेच, ६० बालकांना प्राणवायू न मिळाल्यामुळे

त्यांना मिळालेले मरण व उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि थेट १९९६ सालापासून केरळात सुरू असलेले ५०० च्या वर हिंदू व ख्रिस्ती पोरींचे *लव्ह जिहाद* व तेथील चुप्प बसलेले मुस्लीम लीग व कम्युनिस्ट सरकार किंवा काँग्रेसवाले लांचखोर होते पण काम करायचे, भाजपवाले लांच घेतात पण कामही करीत नाहीत हा संदेश.

२. युद्ध झाले तर सरकार प्रजेस वांचवू शकणार नाही. याचे कारण १९४५ साली अणुबॉंबचा शोध लागला. १९८५ साली रेगन म्हणाले होते, "आपण अणुयुद्ध लढू शकत नाही. आणि लढलो तर जिंकू शकत नाही." अशा रीतीने त्यांनी परकीय आक्रमणापासून सरकारची आवश्यक अशी संरक्षणाची जबाबदारीच एका वाक्यात झटकून टाकली. १९५० ते १९९० या कालखंडात फक्त अमेरिका व रशिया या दोन महाशक्तींपाशी अणुबॉंब होते. गेल्या २०-२५ वर्षांत उत्तर कोरीया, भारत, पाकिस्थान, लिबिया, इराक, इस्त्राएल वगैरे राष्ट्रांजवळ अणुबॉंब आले. जगास सारखी भीती वाटते की या नव्या अणुसज्ज राष्ट्रातून आयसिसचे आतंकवादी चोरी करतील व जग धोक्यांत आणतील. उत्तर कोरिआ तर रोज डरकाळ्या देत आहे! ट्रंप त्या मुकाटपणाने ऐकून घेतात.

३. सरकार भविष्यात आर्थिक स्थैर्याची हमी देऊ शकणार नाही. प्रत्येक सरकार आर्थिक विकासाची व न्यायाची हमी देते, सुख वा समृद्धीची नाही. 'अच्छे दिन आऐंगे' असे आश्वासन दिले जाते, पण हे अच्छेपण नेमके कसे राहील ते कोणी सांगीतं नाही. सारे गोलगोल बोलतात. १९ व्या शतकाने शहरीकरण, औद्योगीकरण व यांत्रिक शेतीचे मॉडेल दिले, ते आजही चालूच आहे. त्याने समृद्धी कोणास आली असेल, तर ती बड्या बहुराष्ट्रीय कंपन्यांना. पर्यावरणाचा व्यवसाय आजकाल जोरात चालू आहे. पण त्यासाठी निसर्ग व भूगोल तुमच्यावर प्रसन्न पाहिजे. ते प्रसन्न असतील तर तुमच्या गावापासून युरोप-अमेरिकेपर्यंत विमानाची 'डायरेक्ट फ्लाईट' सुरू होऊ शकते.

४. सरकारची न्यायदानाची सत्ता संपुष्टात येऊ लागली आहे. ॲरिस्टॉटल म्हणाला होता, "राजकारण म्हणजे सामाजिक न्याय व समता." हा न्याय तुमच्या राष्ट्रापुरता मर्यादित रहातो. काळ पालटला आहे. आता परकीय मानवी हक्कवाले तुमच्या देशांत घुसून तुमच्यावरच दादागिरी करतात. काश्मीरचे उदाहरण आपल्या डोळ्यासमोर आहे. परक्या देशात विकीलीक बातम्या प्रसिद्ध करतात व तुमच्या देशात त्याचे पडसाद उठतात. युरोपात आयसिसमुळे निर्माण झालेले निर्वासित युरोपियन अर्थशास्त्राची ऐसीतैसी करून टाकतात. बाळासाहेब ठाकऱ्यांनी

मुसलमानांना व्होट बँक मतदानाचा अधिकार नाकारण्याची सूचना दिली होती. अशा वेळी राष्ट्रीय आणीबाणी जाहीर करून खोडसाळ माध्यमांवर खूपच नियंत्रण ठेवावे लागेल. माध्यमांना, विशेषतः सेक्युलर, भडकावण्याची व मग मजा बघण्याची सवय लागली आहे.

५. सरकारवर 'आतून' हल्ला व्हायचे प्रमाण वाढले आहे. जेथे अनेक रक्ताचे व अनेक वंशाचे लोक राहतात अशा सोव्हिएट युनियनची १९९०-९१ मध्ये शकले झाली व ती स्वतंत्र बनली. युगोस्लाव्हियात तीच प्रक्रिया नडली. १९७१ साली बांगलादेश फुटून वेगळे राष्ट्र बनले. जर्मनीच्या नेतृत्वाखाली युरोप एक झाले, पण नुकतेच ब्रिटन त्यातून बाहेर पडले. १९५० च्या २-३ दशकांत नव्या राष्ट्रांच्या तोंडी एकच भाषा होती : "Unity in Diversity या तत्त्वांच्या आधारे आपण सुखाने नांदू व समृद्ध बनू." काळ बदलला. परिस्थिती बदलली. त्यात एके काळी या देशांचे नेते डाव्या मतप्रणालीने भारलेले होते. आता त्याची जागा चंगळवादाने घेतली. धार्मिक, प्रादेशिक, भाषिक व आर्थिक क्षेत्रात अलगतावादी गट 'वेगळे व्हायचे मला' असे म्हणत राजकीय व आर्थिक विकासाची स्वप्ने पाहू लागली आहेत.

शनी-मंगळ युती

हत्ती सरळ चालतो. घोडा अडीच घरे धावतो. आणि उंट तिरक्या गतीने पळतो. तो त्यांचा गुणधर्म आहे. त्याचे दुसरे नाव आहे चातुर्वण्य. 'गुणधर्मविभागशः' असे श्रीकृष्णाने जे निर्मियले ते चातुर्वण्य. धर्म पूर्वी ऋषीमुनींच्या हाती होता तोवर तो नीतीनियमांच्या चौकटीत काम करीत राहिला. पुढे तो व्यापाऱ्यांच्या हाती गेला. व्यापार व व्यापारी कधी सरळ असू शकतात काय? अमेरिकेत धर्म हा अब्जावधी डॉलर्सचा उद्योग बनला आहे. तेथील ताजा उद्योग म्हणजे इस्लामचे भय दाखवून समाजास जागे करण्याचा. भारतात हिंदू धर्माची निंदानालस्ती करणे हा कोट्यवधी रुपयांचा मोठा उद्योग बनला आहे. त्याची सुरवात ब्रिटीश इंडिया कंपनीने केली. त्यांनी दुर्बल हिंदूंना जुजबी इंग्रजीचे ज्ञान दिले व त्यांना कारकून बनविले, त्यांचा शासनात वापर केला. दुसऱ्या बाजूस वायव्य सरहद्द आणि पंजाबच्या धिप्पाड मुसलमानांना लष्करांत रीक्रूट केले व त्यांच्या अलगतावादास खतपाणी घातले. इंग्रज व मुसलमान या दोघांनी मिळून हिंदूंना विरोध केला. इंग्रजांनी भारत सोडला पण जाताना सत्तेवर हिंदूविरोधी नेते येतील अशी व्यवस्था केल्यावर मगच ते घरी परतले.

स्वातंत्र्यानंतर सत्ता हिंदूविरोधी, म्हणजे सेक्युलर मंडळींच्या हाती आली.

प्रथम मौ. आझाद व नंतर नुरूल हसन यांना भारताच्या नव्या पिढीच्या शिक्षणाची जबाबदारी सोपविली गेली. शिक्षणक्रम असा आंखला गेला की नवी पिढी हिंदू संस्कृतीपासून वंचित रहावी. छापील व इलेक्ट्रॉनिक माध्यमातील साऱ्या उच्च जागा व सेक्युलर मंडळींनी व्यापून टाकल्या. जरा विरोधी सूर निघाला की तो लगेच दडपला जावा अशी माध्यमांत व्यवस्था (मॅनेजमेंट) केली गेली. याचे सारे श्रेय काँग्रेस व कम्युनिस्टांच्या अभद्र युतीस द्यावे लागले. मध्ये जनता सरकार (१९७७-७९) व एनडीए (१९९८-२००४) सरकार सत्तेवर आले खरे पण पक्षांतर्गत लाथाळ्यातून ही मंडळी बाहेर येऊ न शकल्यामुळे डाव्यांचा प्रभाव कायम राहिला- जुने हिंदूविरोधी धोरण मागील पानापासून पुढे चालूच राहिले.

युपीए-१ व युपीए-२ अशी ही काँग्रेस-कम्युनिस्ट (२००४-२०१४) राजवट तब्बल १० वर्षे भारतात राज्य करीत होती. काँग्रेस श्रेष्ठींच्या घोटाळ्यांच्या आड डाव्यांनी त्यांचे हिंदूविरोधी धोरण पूर्णत्वास नेले. माध्यमे त्यांच्या हाती होती. 'आऊटलुक' सारखी नवी साप्ताहिके व एनडीटीव्ही सारख्या चॅनेल्समधून हिंदूंना सतत आरोपींच्या कठड्यात उभे केले गेले. जयललितांनी शंकराचार्यांना 'खूनी' ठरवून तुरुंगात टाकले, त्यात ही शनी-मंगळाची युतीच पडद्यामागून काम करीत होती. १९८९ मध्ये रशियाचे पतन झाले व कम्युनिस्ट पक्षाची मदत घेणारे आमचे सेक्युलर बुद्धिवंत एका रात्रीत बेकार झाले. त्यांच्या सुदैवाने नेमके त्या वेळेस सोव्हिएट-अफगाण युद्ध झाले व या बेकारांना पाकी आतंकवाद्यांनी ह्यांना *लेफ्ट लिबरल्स्* असे नवे लेबल लावून पाश्चिमात्य विश्वविद्यालयांत पुन्हा आश्रय दिला. याचे सुंदर चित्रण डेव्हिट होरोवित्सझ यांनी त्यांच्या *अनहोली अलायन्स : रॅडिकल इस्लाम अँड द अमेरिकन लेफ्ट* या त्यांच्या ग्रंथात केले आहे. आपल्या भारतीय डाव्या बुद्धिवंतांना त्यांनी या आतंकवाद्यांच्या मॅचमधील 'चीअर लीडर्स' म्हटले आहे. अशा वेळी हे स्त्रीद्वेष्टे (लिबरल्स सिगायनीस्ट), 'गे' विरोधी (होमोफोबिया), वंशवाद (रेसिझम), परदेशियांविषयी संशय बाळगणारे (क्झेनोफोबिया) व अल्पसंख्यांकविरोधी मानसिकता (अँटीमायनॉरिटी माईंडसेट) यावर सतत भाष्य करीत असतात. रशियन कम्युनिस्ट सरकारात ॲजिअप्रॉप (ॲजिटेशन + प्रोपेगंडा) नावाचे महत्त्वाचे खाते ही बुद्धिवंत मंडळी सांभाळतात. भारतात ५०-६० वर्षे तेच घडले. युतीची जागा आता त्रिकोणाने घेतली. काँग्रेस, कम्युनिस्ट व टेररिस्टस् यांचा त्रिकोण. हिंदू टेररिस्टस् या त्रिकोणाचे खतरनाक उत्पादन (प्रॉडक्ट). तीन गृहमंत्र्यांना - शिवराज पाटील (२००४-२००८), चिदंबरम् (२००८-२०१२) व सुशीलकुमार शिंदे (२०१२-२०१४) – वापरले

आणि मूर्ख बनविले गेले. जसे विनोद मेहतांसारखे कांही संपादक व कांही तहलका सारखी मासिके यांना वापरले गेले, तस्से. परी, पैसा व प्रसिद्धीचा मोह टाळणे अवघड असते. देवांना जे जमले नाही ते कुतो मनुष्यः ।

तीन अनपेक्षित गोष्टींनी या अमंगल युतीचा पराभव घडवून आणला – नरसिंह राव (१९९१-९६), सोशल मिडीया व रशियाचे पतन. रावांनी नेहरूवियन समाजवादाची वाट लावली व बंदीस्त भारतीय अर्थशास्त्र खुले केले. पहिल्यांदा ऑर्कूट, मग फेसबुक, त्यानंतर व्हॉटस् ॲप व आता ट्विटर यांनी नेहमीच्या लोकप्रिय माध्यमांची ऐसीतैसी करून टाकली. काँग्रेस-कम्युनिस्ट बुद्धिवंतांना मे २०१४ मध्ये जेव्हा मोदी बहुसंख्येने निवडून आले तेव्हा लक्षात आले की 'आपण हे सशक्त मिडीयाचे माध्यम वापरायचे विसरून गेलो.' पण आता फार उशीर झाला होता. मोदी खूप पुढे निघून गेले होते. रशियाचे पतन अचानक घडले नव्हते. ते हळूहळू घडवून आणले गेले. ते नीट कळण्याआधी घडून गेले होते. युएसएसआर जाऊन इवलासा रशिया मागे उरला. नव्या स्वतंत्र बनलेल्या देशांना परत रशियाची दादागिरी नको होती. नबरेशाहीचा जांच ७-८ दशके सहन केला होता. घटस्फोटाचा आनंद उपभोगायचा होता.

पुटीनच्या महत्त्वाकांक्षेची ऐसी तैसी

भारतीय मुसलमानांनी लक्षांत ठेवले पाहिजे की जमाना बदल चूका है। हिंदू आता जागृत झाले आहेत. आता आपली दादागिरी चालणार नाही. पाकिस्थान आपले पालकत्व घेण्यास राजी नाही. अरबी देश आपल्यास हीन दर्जाचे समजतात. गोरे युरोपियन्स व अमेरिकन्स आपल्यावर बारीक नजर ठेवून आहेत. चीन्यांना आपल्याला व पाकिस्थान्यांना गुलाम म्हणून वापरायचे आहे. आपण नव्या भारताच्या घटनेच्या चौकटीत राहू व शांतीने सुव्यवस्थित राहू तर जगू. नाहीतर आपली गत रोहिंग्या मुसलमानांप्रमाणे होईल.

हिंदुसाठी ही सुवर्ण संधी आली आहे. ती त्यांनी दोन्ही हातांनी पकडून घट्ट हाती धरली पाहिजे. जगांत आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले पाहिजे. अंतर्गत व बाह्य शत्रूंना खलास केले पाहिजे. जगांत महाशक्ती म्हणून मानाने जगले पाहिजे.

खुद को कर बुलंद इतना । की हर तकदीर लिखने से पहले ।
खुदा बंदे से खुद पुछे । बता तेरी रजा क्या है ।।

भारतीय इस्लाम, क्वो वाडीस? (कोणच्या मार्गाने?)

बनिया गांधी व पंडित नेहरूंचे साम व दाम चे मार्ग तर आपल्या डोळ्यांसमोर

फसले. आता राहिले दोनच मार्ग – दंड व भेद. भारतात १७ कोटी मुसलमान राहतात. त्यांना पाकिस्थानात घालवून देण्याची सुवर्ण संधी आपण तेव्हाच घालविली. उदाहरण डोळ्यासमोर होते. डॉ. खरे अलवार संस्थानाचे दिवाण होते. त्यांच्या राज्यांतून मेवो मुसलमानांनी पळ काढला होता. ते जात होते, तेंव्हा गांधीजींनी मौलाना आझादांचे ऐकून त्यांना परत बोलावण्याची दिल्लीत चळवळ सुरू केली. त्यासाठी ऊपास केला. त्यावेळी तीन कोटी मुसलमान पाकिस्थानात गेले असते तर पाकिस्थानचे आर्थिक कंबरडे पार मोडले असते व फाळणी रद्द करावी लागली असती. डॉ. आंबेडकरांनी व खुद्द जीनांनी लोकसंख्येची अदलाबदल सूचविली होती. गांधी-नेहरूंनी ती सूचनादेखील नाकारली. आता ती संधी पुन्हा मिळणे अशक्य. म्हणजे दंड नाहीच. राजकीय जागृती नसल्याचा याहून सबळ पुरावा आणखी कोणचा असू शकेल?

मग आता राहिला भेदाचा मार्ग. कासव व ससा यांची शर्यत लावली व आपल्यास कासवास जिंकवायचे असेल तर आपण काय करू? कासवाला उत्तेजन देऊ व सशाला कांही वेळ धरून ठेवू. संजय गांधीने ती हिंमत दाखविली होती. त्याची एक चूक झाली. त्याने सर्वांचीच सक्तीने नसबंदी केली. हिंदूंना त्याने ती सक्ती केली नसती तर चालले असते. भविष्यातील संजय गांधीसाठी ही सूचना. त्याचप्रमाणे एखाद्या रेषेस लहान करावयाचे असेल तर काय करू? तीच्या वर दुसरी जास्त लांब रेषा काढू. समजनेवाले समज जाएंगे।

२१ ऑगस्ट २०१७ रोजी आग्रा येथे २००० नवपरिणीत वधू-वरांच्या मेळाव्यात मोहन भागवत अध्यक्ष होते. त्यांनी त्यांच्या भाषणांत सांगितले, "मला हिंदू लोकसंख्या रोडावत आहे हे पाहून मोठी काळजी वाटू लागली आहे. हिंदू लोकसंख्या वाढून द्यायची नाही असा या देशात कायदा आहे कां? नाही. जेव्हा इतर धर्मियांची लोकसंख्या वाढत आहे व आपली घटत आहे, तेव्हा त्यावर आपल्याला कांहीतरी जालीम उपाय केलाच पाहिजे. हिंदूंच्या देशात हिंदूंनी अल्पसंख्यांक रहावे यासारखी दुसरी शोकांतिका कोणची असू शकेल?"

या नंतरची घटना १५ ऑगस्ट २०१७ ची तारीख. स्थळ पालक्कड जिल्ह्यातील एक प्रमुख शाळा. १४ तारखेस सायंकाळी शाळेच्या हेड मास्तरला मेरी कुट्टी या जिल्हाधिकारिणीने कळविले होते, "तुमच्या शाळेस सरकारी ग्रांट मिळते. उद्याचे ध्वजारोहण तुम्ही केले तरी चालेल. तुम्ही कोणत्याही राजकीय नेत्यास बोलावलेले चालणार नाही." आणि हा मनाई हुकूम मोडून संघाचे सरसंघचालक मोहन भागवत तेथे गेले व ध्वजवंदनाचा समारंभ त्यांच्या अध्यक्षत्वाखाली झाला. मुस्लीम लीग

व कम्युनिस्ट सरकार वि. सरसंघचालक. असे नाट्य पूर्वी कधी घडले नव्हते. काळ केवढा बदलला आहे! कितना बदल गया ईन्सान?

भारत हे इस्लामचे कबरस्थान

महंमद हे प्रेषित ५७० साली जन्मले व वयाच्या ६२ व्या वर्षी, म्हणजे ६३२ साली वारले. ५२ व्या वर्षी त्यांना जीवाच्या भयाने मक्का सोडून मदीनेस पळावे *(हिजरत)* लागले. एका दशकात मदीना येथे त्यांनी सैन्याची जमवाजमव करून चांगला जम बसविला. ६० व्या वर्षी त्यांनी मक्का परत जिंकून घेतली. त्याच्यानंतर वारसाईचे युद्ध सुरू झाले. पहिले तीन खलीफा – अबु बक्र (६३२-६३४), ओमर (६३४-६४४) व ओथ्थम (६४४-६५६) - त्यांच्या रक्ताच्या नात्याचे नव्हते, चौथा अली हा त्यांचा जावई होता. अलीपासून (६५६-६६१) खरा इस्लाम सुरू होतो असे मानणारे ते शिया. पहिल्या तीन खलिफांसकट अलीस मानणारे ते सुन्नी.

आपल्यावर जीवघेणे हल्ले केले म्हणून आपण महंमदाकडे निराळ्या दृष्टीकोणातून बघतो, ते स्वाभाविक आहे. तेथील लोक त्याच्याकडे 'सुधारक' म्हणून बघतात. १०० बायकांऐवजी फक्त ४ बायका करा ही त्या काळी सुधारणा होती. अनेक देव भजण्यापेक्षा 'एको देवः केशवो वा शिवो (काबालेश्वर) वा ।' हे केव्हाही श्रेयस्कर, त्याने झगडे कमी होतात, ही सुधारणा देशाला उपकारकच होती. मक्केची तीर्थयात्रा फरजियात *(आजचे रिलीजिअस टुरिझम्)*, कारण त्याने मक्केची अर्थव्यवस्था सुधरली. सत्ता हाती आली व महंमद बदलला. मक्केचा महंमद फक्त सुधारकच होता. तेथील अरब ते समजतात व पुढे जातात. आपले मुसलमान ते समजत नाहीत, म्हणून ते 'जैसे थे' राहतात. (इंग्रज, मुल्लामौलवी व गांधी-नेहरू यांनी मिळून त्यांना पुढे जाऊ दिलेच नाही. जेवढे ते गरीब व अज्ञानी तेवढे आपण जास्त सुरक्षित, असे त्यांचे धोरण होते. नेहरू-इंदिरा-राजीव यांना हा शॉर्टकट् पसंत पडला. मोदींना त्यांना बदलायचे आहे, पण ते फार जड जात आहे. कारण, मुसलमानांची जागतिक मानसिकता बदलली आहे. स्थल-काल-परिस्थितीप्रमाणे धोरण बदलायचे असते, स्वतःच्या अहंकारास मुरड घालावी लागते. लोकशाही म्हणजे गाजावाजाच फार. उदंड करी गुप्तरूपे । राजकारण बहुत करावे । परंतु कळोच नेदावे ।। इस्लामशी वागताना गुप्तता व सावधपणा ठेवणे जमले तर शिवाजी होतो, नाही जमले तर संभाजी होतो.)

६३३ सालापासून मुस्लीमांच्या स्वाऱ्या सुरू झाल्या. ६३३ ते ६४२ या

दशकांत मुस्लीम लष्कराने सुपीक चंद्रकोर - इजिप्त, सिरीया, पॅलेस्टाईन व मेसोपोटेमिया – जिंकली व उत्तर आफ्रिकेचा किनारा व पर्शियन आणि बिझांटीन साम्राज्याचे कांही भाग आपल्या वर्चस्वाखाली आणले. सातवे शतक संपेस्तोवर उत्तर आफ्रिका हिरवी झाली होती व तेथून ते ७१० साली स्पेनमध्ये घुसले होते. ७३२ सालच्या टुर्सच्या लढाईमुळे ''झेपावे उत्तरेकडे''चा त्यांचा उत्साह थंडावला. म्हणून ते पश्चिमेकडे वळले व ७१२ साली त्यांनी सिंध घशात घातला. ७१५ साली खलिफाने महंमद बिन कासिमला परत बोलावले. आणि सिंध प्रांत पुन्हा हिंदू झाला. 'इंडिया कॅन मेक इट'च्या इतिहासांत हा महत्त्वाचा मैलाचा दगड आहे.

१०००-१०३० व ११७५-१२०६ या काळात तुर्क महंमद गझनी व अफगाण महंमद घोरीने भुरट्या चोरांसारखे हल्ले केले, पण दोन शतके मर्दुमकी गाजवून भारताच्या ''गेट वे'' अशा खैबर व बोलन या दोन खिंडी सोडून त्यांच्या हाती विशेष असे कांहीच लागले नाही. सोन्या-चांदीची व मानवी संपत्ती मात्र अफाट होती. या आयात केलेल्या ज्ञानाच्या बळावर मध्य पूर्व आशिया अडाणी युरोपास सुशिक्षित व साक्षर करू शकला. पुढे १२०६ ते १५२६ ही ३२० वर्षे दिल्ली सल्तनतीची व मोगलाईची १८१ वर्षे भारतावर मोगली मुसलमानांचे राज्य होते. (पहा दादूमियाकृत 'भेदरलेले हिंदू' हा ग्रंथ.)

एवढी वर्षे राज्य करूनही भारतात ८० टक्के प्रजा हिंदूच होती. 'परधर्मो भयावहः ।' असे सांगणाऱ्या वर्णाश्रमामुळे ते वांचले. म्हणून सध्या 'वर्णाश्रम नष्ट करा' अशी डावी चळवळ सुरू करण्यात आली आहे. वर्णाश्रमात व जातीव्यवस्थेत खूप मोठा फरक आहे, ते लक्षांत ठेवणे आवश्यक आहे. वर्ण व जात भिन्न आहेत. हुषार मुसलमान नेते या फुटीचा नक्की फायदा उठविणार. जे इतके वर्षे घडले ते भविष्यात पुन्हा घडत राहणार. म्हणून म्हणतो, ''सावधान! दक्ष!!''

२०० वर्षांत इस्लामच्या तलवारीने सारा पश्चिम आशिया, उत्तर आफ्रिका व दक्षिण युरोपचा कांही भाग धाकदपटशा दाखवून आपल्या कह्यात आणला. भारत जिंकायला मात्र त्यांना ६०० वर्षे झुंझावे लागले. पुढे त्यांनी ५०० वर्षे राज्य केले पण ते सतत असुरक्षित होते.

मागे हिंदूंनी एक मूर्खपणा केला : बाटलेल्यांना 'शुद्ध' करून परत हिंदू धर्मात घेतले नाही. बाजीरावास समशेर बहादराची मुंज करावयाची इच्छा होती. धर्मसत्तेने राजसत्तेस 'नाही' सांगून आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले. शिवाजीच्या वेळी रामदासांनी काशीहून गागाभट्टास बोलावून स्थानिक ब्राह्मणांचे शॉर्ट सर्कीट केले. बाजीराव मुसलमान असता तर पुण्याच्या ब्राह्मणांची त्याने मुंडकी छाटली असती!

तो जुना मूर्खपणा पुन्हा करणारी आज अनेक भगवी मंडळी वरच्या थरात वावरताना दिसतात. तो मूर्खपणा आता जर टाळला नाही तर मुसलमान 'टेम' होणार नाहीत. लोकशाहीत लोकसंख्या हीच त्यांची ताकद आहे. ती त्यांनी पूर्व युरोपात दाखविली आहे. चीनलाही ती टेस्टोस्टरॉनची ताकद उत्तरेस जाचक ठरत आहे. आफ्रिकेत ख्रिस्ती मिशनऱ्यांवर अमेरिका उगाच नाही एवढाला खर्च करीत. जर्मनी व फ्रान्सदेखील आता या मुस्लीम टेस्टोस्टरॉनमुळे धास्तावलेले दिसतात. यासाठी हुषार राजकारण्यांनी या महत्त्वाच्या लोकसंख्या या विषयावरून लोकांचे लक्ष क्षुद्र जातीपातींच्या लढायांवर (मराठा-कुणबी, दलित वि. ओबीसी, जाट वि. ओबीसी वगैरे) वळविले आहे. राजकारण म्हणून त्यांच्या हुषारीचे कौतुक आहे, पण देशहिताचे काय?

बऱ्याच वेळा परकीय शक्ती पैसे देऊन ह्या समस्येची आग भडकावण्याचा खेळ मुद्दाम करताना आढळून आले आहे. एकदा आग भडकली की त्यात तेल ओतण्याचे काम डावी मंडळी मोठ्या उत्साहाने करताना दिसतात. त्यांच्या खोड्यांवर बारीक लक्ष ठेवण्याचे काम फारच गरजेचे आहे. प्रायॉरीटी आधी कशाला द्यायची हे ज्यास कळते तो खरा देशभक्त राजकारणी. बाकीचे सारे स्वार्थी व संधिसाधू नेते.

वह दीने-हजाजी का बेबाक बेडा
निशाने जिसका अक्सा-ए-आलम में पहुँचा
मजाहम हुआ कोई खतरा न जिसका
न उमां में ठट्का न कुलजम मे झिज्का
किए पैस्पर जिसने सातो समुंदर
वह डुबा दहाने में गंगा मे आकर

— हाली

(अरबी इस्लामचे जहाज जगातल्या सर्व बंदरात पोचले. त्यास कसलीच भीती वाटली नाही, कसल्याच संकटाला सामोरे जावे लागले नाही, कोठे कसलाच अडथळा आला नाही — नाही ओमानच्या सागरात, नाही कुलझामच्या समुद्रात. ते जहाज साती समुद्र पार करून आले. अरेरे, ते शेवटी गंगेत बुडाले.)

■■■

परिशिष्ठ १

प्रदेश	कालखंड	किती वर्षे राज्य
सिंध	७००-१८५३	१,१५०
वायव्य सरहद्द प्रांत	१०००-१८१२	८००
पंजाब	१०२७-१८००	७७५
दिल्ली	११९६-१७८४	६००
काश्मीर खोरे	१३२६-१[illegible]	५००
लडाख	१६६०-१८२०	१७५
हिमाचल प्रदेश	१६५०-१८००	१५०
उत्तर प्रदेश	१२००-१८००	६००
बिहार	१२००-१७५७	५५०
बंगाल	१२०६-१७५७	५५०
ओरीसा	१५६८-१७५०	१७५
आसाम	१६६०-१६७०	१०
मध्यप्रदेश-माळवा	१३००-१७४०	४५०
मध्यप्रदेश-छत्तीसगढ	१६४०-१७१५	१७५
गुजराथ	१३००-१७४०	४४०
महाराष्ट्र	१३१८-१६६४	३५०
उत्तर कर्नाटक	१३२०-१७६०	४४०
दक्षिण कर्नाटक	१६४०-१८००	४०

पश्चिम आंध्र	१३४०-१८००	५००
दक्षिण आंध्र	१६४०-१८००	१५०
पूर्व आंध्र	१५७५-१७५२	१७५
उत्तर तामीळनाडु	१६५०-१७७५	१२५
उत्तर केरळ	१७६४-१७९२	२८
दक्षिण तामीळनाडु व केरळ		

■■■

परिशिष्ठ २

पराया माल अपना

इस्लामचे अधिकृत धोरण आहे, *पराया माल अपना.* वो दस्तअंदाजी (हस्तक्षेप) नही है। दुसऱ्याची दानिश (विद्या), दुसऱ्याचे द्रव्य, दुसऱ्याची दारा (पत्नी), दुसऱ्याचे दस्तकार (कारीगर), दुसऱ्याचे दबीर (लेखक), दुसऱ्याचे दफ्तर (कार्यालय), दुसऱ्याचा दरबार (राजमहाल), दुसऱ्याचे दस्तावेज (कागदपत्र) किंवा दुसऱ्याचे मंदिर हडप करणे यास इस्लाममध्ये दगाबाजी मानली जात नाही, कारण तीचा जुना मालक काफीर असतो. इस्लामसाठी ती आता 'ट्रॉफी' होते. स्वतः महंमदसाहेबांनीच ही प्रथा काबापासून सुरवात केल्यामुळे इतरांना तसे करण्याचा मुक्त परवानाच होता व आहे.

सिंधुबंदी केल्यामुळे इस्लामविषयक माहितीचा झरा आटला व हिंदूंना प्रतिबंधक उपाययोजना कशी करावी ते कळेना. नाहीतर, त्यांनी प्रतिक्रिया म्हणून त्याच भाषेत उत्तर दिले असते. हिंदूंनी मशिदीचा वा त्यांच्या झनान्याचा मान ठेवल्यामुळे ही एकतर्फी रहदारी सुरूच राहिली. त्यामुळे त्यांचे फावले. कांहीही केले तरी आपल्या मशिदी, मालमत्ता व मलंग सुरक्षित राहणार आहेत. परदेशात असा बावळटपणा दाखविला नाही. ज्यूंचे धोरण होते, डोळ्यास डोळा, दातास दात. फर्डिनाद व इसाबेला यांनी आख्खे स्पेन परत ख्रिस्ती केले. हिंदू ते करू शकले नाहीत. आजही तेच चालले आहे. इस्लाम जास्त हुषार, त्यांना तुमची भावनाशीलता कळते. तुम्ही तुमचेच जुने मंदिर कसे तोडणार? तुमच्याच पत्नीला कसे पळवणार?

बिगरमुसलमानांची पूजास्थाने कशी जगभर 'बाटवली' गेली ते पाहू :

१. युरोप

- **लंडन** : इंग्रजांना आपण बहुसंस्कृतीवाले असल्याचा केवढा अभिमान.

त्यामुळेच तेथे आतंकवादी जन्म घेतात व प्रशिक्षित होतात. मुसलमानांना शरिया कायदा लावण्यास परवानगी द्या, अशी तेथे चळवळ चालते. तेथील विश्वविद्यालयातून इस्लामचे कोर्सेस चालतात. रीयाध वा तेहेरानप्रमाणे क्वीन मेरी युनिव्हर्सिटी ऑफ लंडनमध्ये विद्यार्थिनींसाठी वेगळे प्रवेशद्वार आहे व त्यांना वर्गात हात उंच करणे वा प्रश्न विचारणे यावर बंदी आहे. ह्यात युनायटेड चर्च इजिप्तच्या मुसलमानांनी विकत घेऊन त्याची मशीद केली आहे. एका मेथॉडिस्ट चर्चची ब्रिक लेन मशीद बनली आहे. लंडनमध्ये आज ४२३ मशिदी आहेत. त्या सर्व जुन्या मृत चर्चेसवर उभ्या आहेत. लंडनचा मेयर सादिक खान आहे. डायनाची लफडी कुप्रसिद्ध आहेत.

- **जर्मनी** : बर्लीनमधील न्युपोस्टोलिश कर्शे मशीद; मॉचेनग्लॅडबाशमधील जुन्या मेथॉडिस्ट चर्चची मशीद; इव्हँजेलिशे काटकर्शे जोहोनेस चर्च, आता मर्केझ कामी मशीद.
- **हँबुर्ग** : कापेरमौंकिर्शेची मशीद.
- **आर्मेनिया** : कॅथेड्रल ऑफ कार्स व कॅथेड्रल ऑफ आनीचे मशिदीत रूपांतर.
- **सायप्रस** : ऑटोमनचे साप्रसमध्ये राज्य आले व तेथील महत्त्वाच्या चर्चेसचे रूपांतर मशिदीत केले गेले, उदा. सेंट निकोलस कॅथेड्रल (१५७१) व सेंट सोफिया कॅथेड्रल, निकोसिया.
- हंगेरी : ऑटोमनचे हंगेरीमध्ये राज्य आले व तेथील महत्त्वाच्या चर्चेसचे रूपांतर मशिदीत केले गेले, उदा. चर्च ऑफ अवर लेडी ऑफ बुदा (१५४१) ची मशीद झाली व १६८६ साली तीचे पुन्हा चर्चमध्ये रूपांतर; चर्च ऑफ मेरी मॅगडेलेन, बुदा १६०२ मध्ये मशीद व १६८६ त पुन्हा चर्च; फ्रांसिस्कॅन चर्च ऑफ सेंट जॉन द बाप्टिस्ट, बुदा याची मशीद व ती १६८६ त पूर्ण जमीनदोस्त करण्यात आली.
- **लेबेनॉन** : बैरुतमधील चर्च ऑफ सेंट जॉन द बाप्टिस्टची १२९१ मध्ये मशीद बनली.
- **नेदरलँड** : हेगमधील अक्सा मशीद - पूर्वी तेथे ज्यूंचे सायनागॉग होते.

२. आशिया

- **मक्का** : अल्लात, अल ऊषा व मन्नत या देवतांचे काबाचे मंदिर मक्कावासीयांनी प्राचीन काळापासून बांधले होते व चारी दिशांहून लोक तेथे तीर्थयात्रेसाठी येत. महंमदसाहेबांनी तेथील मूर्ती तोडल्या, पण काबाची पिंडी कायम

ठेवली. आज यात्रेकरू त्याचे चुंबन घेतात.

- **तुर्कस्थान** : हेगिया सोफीआ (पवित्र ज्ञान) पूर्वी ३६० पासून बॅसिलिका, मग १४५३ मध्ये नीळी मशीद आणि नंतर १९३१ मध्ये म्युझियम; ॲनाटोलिआमधील (इस्तंबूल) सर्व चर्चेस मशिदी बनल्या. सेंट मेरीचे चर्च तेवढे अपवादात्मक. ऑर्थोडॉक्स चर्चेसमध्ये निकाइकाचे हेगिआ सोफिआ चर्च व ट्रॅबझॉनचे हेगिआ सोफिआ चर्च मशिदी बनल्या.
- **इंडोनेशिया** : तेथील मेनारा कुडुस मशीद पूर्वी हिंदू मंदिर होते. मंदिर तोडून तेथे मीनार बांधून त्याची मशीद बनविली गेली.
- **इराक** : इराक व सिरीयाच्या आयसिसने तेथील सर्व चर्चेस बाटविली, उदा. मोसुलचे सिरीयन ऑर्थोडॉक्स चर्च व खाल्डीअन चर्च ऑफ सेंट जोसेफ.
- **इराण (पर्शिया)** : पार्शांची सर्व जुनी सूर्य मंदिरे व अग्नी मंदिरे यांच्या मशिदी केल्या.
- **इस्त्राएल** : चर्च ऑफ सेंट जेम्स इंटरसिसस व डोम ऑफ द रॉक.
- **पाकिस्थान** : मुलतान (मूलस्थान) चे व लाहोर (लवपूर) चे मंदिर बाटविले गेले आहे. इतर शेकडो बाटविलेली मंदिरे आहेत.
- **भारत** : यावर सीता राम गोयल यांचा दोन भागात रंगीत फोटो असलेला ग्रंथच उपलब्ध आहे. त्यात २,००० महत्त्वाच्या हिंदू मंदिरांच्या बाटवून मशिदी केल्या गेल्या, यांचे सखोल विवेचन आहे. आज जैन, बौद्ध, शीख वगैरे मंडळी स्वतःस वेगळे समजत असतील तरी मुसलमानांनी त्यांची मंदिरे तेवढ्याच प्रेमाने पाडली व आपण मूर्तिभंजक आहोत, पूजक नाहीत, हे सिद्ध केले. डाव्या व काँग्रेसी सेक्युलर मंडळींनी तसे काही घडलेच नाही वगैरे सांगून पाहिले व पाठ्यपुस्तकांत तसा मजूकर घातला, पण त्यावर कोणी विश्वास ठेवला नाही. काशी, मथुरा व बाबरी-इ-जन्मस्थान ही तीन प्रमुख देवळे - तिघांच्या औरंगझेबाने मशिदी बनविल्या. यातील फक्त एकच तोडली. अजून तेथे राम मंदिर बांधले गेले नाही. स्वातंत्र्य मिळाल्यावर सरदार पटेलांनी सोमनाथ मंदिराचा जीर्णोद्धार केला. त्याला नेहरू व गांधीजी यांनीच केवढे अडथळे निर्माण केले. हिंदू त्यामुळे कर्मवीर नाहीत, वाचीवीर आहेत, असे वाटते. आज जग हिंदूंना हांसते. मुसलमान हजारो मंदिरे बाटवू शकतात. हिंदूंना तीन मशिदींची मंदिरे बनविता येऊ शकत नाही? गर्वसे कहो, हम षंढ है.

३. आफ्रिका

- **मोरोक्को** : टँजिअरची ग्रँड मॉस्क (जुम्मा मशीद) पूर्वी चर्च होते.
- **उत्तर आफ्रिका** : तेथील वसाहती मुक्त झाल्या, त्यांच्या चर्चेसवर गदा आली व त्या मशिदी बनल्या, उदा. अल्जेअर्समधील सेंट फिलिप कॅथेड्रल; काँस्टंटीन नॉत्र दॅमचे चर्च; त्रिपोलीतील कॅथेड्रल; लिबियातील बेंगाझीचे कॅथेड्रल; सोमालिआतील मोगाडिशू कॅथेड्रल, वगैरे.

४. अमेरिका

- अमेरिकेत अक्षरशः शेकडो मशिदी आहेत. त्यांना सौदीचे फंडिंग मिळते. ९/११ नंतर त्यांच्यावर कडक बारीक नजर ठेवली जाते.

५. ऑस्ट्रेलिया :

तेथे बऱ्याच मशिदी आहेत, पण तेथे आतंकवादी पकडले गेल्यापासून त्यांच्यावर बारीक नजर ठेवली जाते.

■■■

परिशिष्ठ ३

पाकिस्थानची 'इच्छा यादी'

तवलीन सिंग या दिल्लीतील ज्येष्ठ पत्रकार आहेत. दिल्लीच्या राजकारणाचा त्यांचा सूक्ष्म अभ्यास आहे. मोदी सत्तेवर आल्यापासून दिल्लीत व देशात काय काय बदल घडले याविषयी त्यांचे बारीक निरीक्षण आहे. राजीवच्या दरबारावर तर त्यांचे पुस्तकच आहे. *संडे इंडियन एक्सप्रेस* मध्ये त्यांनी लिहिले : "नव्या भारतात महात्मा हे आता नायक राहिले नाहीत, हे मोदींना काय माहीत नाही काय? साबरमती आश्रममधील मोदींचे २९ जून २०१७ रोजी केलेले भाषण संपले आणि सोशल मिडीयात क्रुद्ध विरोधी प्रतिक्रिया सुरू झाल्या. मोदींनी अहिंसेचे गौरवीकरण केले त्यास तरुणांचा विरोध होता. गांधीजींची अहिंसा हे त्यांच्यासाठी 'नपुंसक भारता'चे बोधचिन्ह आहे. कालपर्यंत भारत नपुंसक होता, त्याचे कारण गांधीजी. फाळणीनंतर लाखो हिंदूंची कत्तल झाली, याचे कारण गांधीजींची अहिंसा, असे नव्या पिढीचे मत आहे." *(संडे इंडियन एक्सप्रेस, २ जुलै २०१७, पृ.१५)*

आजवर काँग्रेसचे राज्य होते. त्यामुळे उघडपणे बोलायला बंदी होती. सोशल मिडीयांनी ती जागा भरून काढली. मोदी सत्तेवर आल्यावर ते भय नाहीसे झाले. तरुण आता त्यांच्या मनातले विचार सोशल मिडीयात व्यक्त करू लागले आहेत. गांधीजींनी काश्मीरात युद्ध चालू असता व नेहरू आणि सरदार पटेलांचा विरोध असताना भारत सरकारला पाकिस्थानास ५५ कोटी रुपये देण्यास भाग पाडले. भविष्यात असे होत राहिले तर घात होईल म्हणून नथूराम गोडसे या पुण्याच्या सुशिक्षित संपादकाने गांधीजीची हत्या केली. मात्र, त्या हत्येने भारत सरकारचे मुस्लीम तुष्टीकरणाचे धोरण थांबले नाही. ते चालूच राहिले. पाकिस्थानच्या अनेक मागण्या होत्या व आहेत. त्यातल्या कांही पुढे दिल्या आहेत. हेच गांधीजी जीनांना संयुक्त हिंदुस्थानचे पंतप्रधान नियुक्त करावयास तयार झाले होते. म्हणून

सरदार व नेहरू या दोघांना गांधीजी दिल्लीत नको होते. त्यांनी त्यांना नोआखलीस पार्सल केले होते. गांधीजी जिवंत असते तर पाकिस्थानच्या अनेक मागण्या गांधीजींनी पुऱ्या केल्या असत्या. आता त्यांच्या गैरहजेरीत ही पुढील पाकिस्थानाची 'इच्छांची यादी' पूर्ण होऊ शकत नाही. खरे गांधीभक्त केव्हाच संपले. पाकिस्थान उर बडवून काय म्हणतो ते माहीत आहे?

विच्छा माझी पुरी करा

मोदी सत्तेवर आल्यापासून चित्र बदलले आहे. गांधीजींचे राजकीय जीवन खिलाफतपासून सुरवात झाले व पाकिस्थानाशी येऊन संपले, एवढेच ते त्यांच्याविषयी जाणतात. मात्र, प्रत्येक जाहीर समारंभात त्यांना ते देखल्या देवा दंडवत् घालतात. त्यात चूकत नाहीत. आज गांधीजी हयात असते तर पाकिस्थानाने पुढील १५ कलमी मागण्यांची यादी त्यांच्या हाती ठेवली असती:

१. भारताला पाकिस्थानास बंडखोर काश्मीरचे खोरे देऊन टाकण्याची वेळ आली आहे. मदत करा.
२. भारताची सियाचीनमधून पिछेहाट झालेली आम्हास पहावयाची आहे. मदत करा.
३. भारताकडून पाकिस्थानास सीरी (श्री) क्रीक पाहिजे आहे. मदत करा.
४. सिंधू पाणी करारानुसार सिंधू नदीच्या पश्चिमेकडील नद्यांवर कोणचेच प्रकल्प भारत बांधणार नाही. मदत करा.
५. भारताने अफगाणिस्थानातील सारे प्रकल्प थांबविले पाहिजेत. मदत करा.
६. अफगाणिस्थानातील भारताची सारी कॉन्सुलेटस् बंद करावीत. मदत करा.
७. अफगाणिस्थान परत तालिबानांच्या हाती सोपवा. मदत करा.
८. अफगाणिस्थानातील इतर टोळीवाल्यांनी तालिबानाचे श्रेष्ठत्व मान्य केले पाहिजे. मदत करा.
९. अफगाणिस्थानाने ड्युरांड रेषा मान्य करावी व काबूल नदीचा प्रवाह कमी करू नये. मदत करा.
१०. अमेरिकेने भारताशी जसे नागरी अणु करार केले तसे करार पाकिस्थानशी करावेत व दोघांना न्युक्लिअर सप्लायर्स ग्रुप मध्ये दाखल करावे. मदत करा.
११. युनोच्या सिक्युरिटी कौंसिलमध्ये भारतास प्रवेश नको; द्यायचा असेल तर

दोघांना एकाच वेळी तो द्या. मदत करा.

१२. अमेरिकेच्या वित्त संस्था आणि इतर आंतरराष्ट्रीय वित्त संस्था पाकिस्थानला भविष्यात मदत करतील. मदत करा.

१३. भारत व आंतरराष्ट्रीय समाज भारत व पाकिस्थान यांची समानता (पॅरिटी) मान्य करतील. मदत करा.

१४. पाकिस्थानला त्याचे बेजबाबदार आर्थिक धोरण तसेच चालू ठेवण्याची परवानगी द्या. मदत करा.

१५. आतंकवाद्यांच्या बाबतीत पाकिस्थानवर आणखी जास्त निर्बंध यापुढे नकोत. मदत करा.

कदाचित् ही यादी पाहून ''हे राम'' म्हणून गांधीजींनी मान टाकली असती. त्यांच्या हत्येचा प्रश्न आपोआप सोडविला गेला असता.

■■■

परिशिष्ठ ४

जिहादचे प्रकार

मला दिल्लीत मलकानी संपादक असताना, 'ऑर्गनायझर'च्या कार्यालयात एका प्रसिद्ध मौल्लवींशी झालेला माझा संवाद आठवतो. त्याने मला विचारले, ''तुम्हाला व तुमच्या संघाला आमची शस्त्रेच माहीत नाहीत. तुम्ही आमच्याशी कसे लढणार?'' मी डोक खाजविले. तो म्हणत होता त्यात तथ्य होते. आम्हाला शत्रूचे आर्थिक बळ, शस्त्र बळ व त्याची रणनीती माहीत असायला पाहिजे. सामान्यांना जिहाद म्हणजे धर्मयुद्ध एवढेच माहीत असते. इस्लाम हा क्षात्र धर्म आहे. जिहादचे दहाही प्रकार तेवढेच महत्त्वाचे, अर्थपूर्ण व इस्लामच्या प्रसारास पूरक आहेत. ते पुढीलप्रमाणे :

अ) जिहाद बिल काल्ब/नफ्स : सैतान तुम्हाला मोहात पाडतो व आडमार्गाला नेतो. सैतानाशी लढणे सोपे नसते. सैतानाने हुमायूनास अफुचे व्यसन लावले होते. त्या जिहादात हुमायून शिडीवरून पडला व मेला. सैतानाने झुल्फिकार भुट्टो व प्रेसि. झिया असे २ बळी घेतले.

ब) जिहाद बिल लिसान : लिसान म्हणजे जीभ. यात जिहादी संदेश तोंडाने सांगून त्याचा सर्वत्र प्रसार केला जातो.

क) जिहाद बिल याद : याद म्हणजे हात. सत्यासाठी व अन्याय दूर करण्यासाठी हा जिहाद पुकारला जातो. अकबर भले बादशाह असेल, पण तो इस्लाम धर्म पाळत नव्हता. म्हणून दरबारी मौल्लवींनी या जिहादाचा आश्रय घेतला होता. अकबर ग्रेट कां? त्याने त्यांना ठार मारले नाही, क्षमा केली. औरंगझेबाने दारा या सख्ख्या भावास याच प्रकाराने संपविले व तो गादीवर आला.

ड) जिहाद बिस सैफ : सैफ म्हणजे तलवार. सैफी मुसलमान हा प्रकार वापरतात. मुस्लीम ब्रदरहुडची एक शाखा सैफी मुस्लीमांची आहे.

ई) जिहाद अल टार्बिया : हा प्रकार शिक्षणाच्या क्षेत्रात वापरतात. मौ. आझादांनी तो सुरवातीला स्वतंत्र भारतात शिक्षण मंत्री या नात्याने (१९४७-५८) केला. हिंदू संस्कृतीस त्याचे दुष्परिणाम ४-५ पिढ्यांना भोगावे लागले. त्याचा सूड पुढे विश्व हिंदू परिषदेने हजारो एकल विद्यालयांमार्फत घेतला. अमेरिकेतील भारतियांनी या प्रकल्पास लाखो डॉलर्सची मदत केली.

फ) जिहाद अल दावा : याचे दुसरे नाव मिशनरी जिहाद. याचा धर्मांतराशी संबंध येतो. १९ फेब्रुवारी १९८१ रोजी थिरुनलवेल्ली जिल्ह्यातील मीनाक्षीपुरम गावात ८०० दलितांना पैसे व धान्य देऊन इस्लामची दीक्षा देण्यात आली. हा प्रकार इंदिरा गांधींना आवडला नाही. या दलितांना त्यांनी परत हिंदू धर्मात आणले *(घर वापसी)*. ''आसामातील धर्मांतरे थांबविण्यासाठी त्यांनी मला उदार राजाश्रय दिला,'' असे मला एकनाथजी रानड्यांनी सांगितले.

ग) जिहाद अल दावाह : याचे दुसरे नाव बौद्धिक जिहाद. बुद्धीचा वापर करून लढणे. भारतात जिहादींनी त्यासाठी कम्युनिस्टांची साथ घेतली. त्यात मानवेंद्र रॉय यांचा पुरेपूर फायदा उठविला. त्यांनी प्रथम एलन रॉय या त्यांच्या रशियन पत्नीस आपल्या बाजूस आणली.

ह) आर्थिक : गरिबांना आर्थिक मदत करून गरिबीशी केलेला हा लढा असतो. याचा जाहीर प्रयोग ट्यूनिशियात प्रेसि हबीब बोर्गुबांनी विकासासाठी केला. खरे म्हणजे पाकिस्थानात हा प्रकार व्हायला पाहिजे होता. पण जनकल्याणाऐवजी जनरल्सच्या कल्याणावर अमेरिकेने जास्त भर दिला. पंजाबी लष्करी अधिकाऱ्यांची संपत्ती डोळ्यात खुपू लागली.

य) जिहाद अल निकाह : जिहादींचे मनोधैर्य वाढविण्यासाठी काही स्त्रिया त्यांना उपभोगू देतात. सिरीयात विरोधकांना बदनाम करण्यासाठी हा प्रकार वापरला गेला होता. सध्या या प्रकाराकडे केरळात संशयाने बघितले जाते.

ज) लव्ह जिहाद : केरळ, कर्नाटक, गुजराथ व महाराष्ट्र येथे उच्चवर्णीय पोरींवर कट करून त्यांना गर्भार करण्यात येते. हेतू शुद्ध बीजाचे अल्लाचे सैनिक तयार करण्याचा असतो. इंग्लंड, फ्रान्स व जर्मनीत हेच कटकारस्थान चालते. इजिप्शिअन लक्षाधीश मोहंमद दुदी फैदयाने तर प्रिन्सेस डायनाला जेथे सोडली नाही तेथे छोटी छोरीओकी क्या बात है? दोघेजण ३१ ऑगस्ट १९९७ रोजी पॅरीस नगरीत एका कार अपघातात इष्कके शहीद और अल्लाके प्यारे हो गये।

■■■

परिशिष्ठ ५

पाकिस्थानला मिळणारी अमेरिकेची मदत					
वर्ष	आर्थिक मदत	लष्करी मदत	वर्ष	आर्थिक मदत	लष्करी मदत
१९४७	उ.ना.	उ.ना.	१९७६ टीक्यू	१८३.८	०.३
१९४८	०.७	०	१९७७	२९६.७	०.९
१९४९	उ.ना.	उ.ना.	१९७८	१९९.८	१.४५
१९५०	उ.ना.	उ.ना.	१९७९	११९.७	१.१
१९५१	२.७	०	१९८०	१२७.९	०
१९५२	६९.३	०	१९८१	१५२.८	०
१९५३	६९७.८	०	१९८२	३७२.८	१.१
१९५४	१४६.४	०	१९८३	४९७.०	४६५.०
१९५५	६८३.३	२४७.९	१९८४	५२८.६	५१७.३
१९५६	९९२.९	१०१२.३०	१९८५	५६५.०	५४३.०
१९५७	१००५.४०	४०७.५	१९८६	५८०.१	५०७.८
१९५८	९०१.५	४९६.४	१९८७	५५७.६	४९७.६
१९५९	१२७२.७०	३४१.३	१९८८	७१६.४	४०१.१
१९६०	१५७२.९०	२१४.४	१९८९	५२१.३	३४१.९
१९६१	९२०.८	२४२.४	१९९०	५१०.३	२६३.९
१९६२	२१७२.१०	५१०	१९९१	१३९.३	०
१९६३	१९२२.९०	२७२	१९९२	२५.३	६.७
१९६४	२०६७.९०	१७४.५	१९९३	६९.१	०

१९६५	१७९५.८०	७२	१९९४	६३.७	०
१९६६	७५९.७	७.८	१९९५	२१.५	०
१९६७	११२८.९०	२४.५	१९९६	२०.४	०
१९६८	१३९६.९०	२४.२	१९९७	५२.३	०
१९६९	५०४.१	०.५	१९९८	३३.२	०
१९७०	९००.२	०.८	१९९९	९८.७	०.२
१९७१	४४१.७	०.७	२०००	२२.४	०
१९७२	६४४.३	०.४	२००१	२१२.१	०
१९७३	६६४.९	१.२	२००२	८७५.८	३२९
१९७४	३५४.९	०.९	२००३	३६२.७	२८७.९
१९७५	५७१.२	०.९	२००४	३७७.९	८९.८
१९७६	५९८.७	१.२	२००५	४५७.८	३२२.४
सारे आकडे अब्जात आहेत.			२००६	६४३	२९९
उ.ना. म्हणजे उपलब्ध नाही.			कुल	३३,६०६.९०	८,९३२.००

■■■

परिशिष्ठ ६

मध्य आशियात जाणाऱ्यांच्या संख्येत घट

गेल्या काही वर्षात आखाती देशात जाणाऱ्या भारतीयांची संख्या कमी कमी होत आहे. त्यात हिंदू किती व मुसलमान किती ते आकडे उपलब्ध नाहीत. या कामगारांनी भारतात धाडलेल्या पैशांचे आकडे उपलब्ध आहेत. २०१४-१५ मध्ये त्यांनी ६९,८१९ डॉलर्स धाडले तो आकडा २०१५-१६ साली ६५,५९२ डॉलर्सवर घसरला. सौदीस जाणाऱ्या भारतीय कामगारांची संख्या कमी दोन कारणांमुळे कमी झाली : (१) सौदी अरेबियाचे अर्थकारण तेलाच्या राजकारणामुळे मंदावले आहे, व (२) सौदीकरणाचे धोरण, म्हणजे परदेशी कामगारांपेक्षा स्वदेशी कामगार कामावर ठेवण्याचे धोरण. मंदावलेल्या अर्थकारणामुळे सौदी सरकारला लोकांवर नवनवे कर बसवावे लागत आहेत. पूर्वी तेथे कोणचेच कर नव्हते.

मध्य आशियात जाणाऱ्यांच्या संख्येत घट			
देश	२०१४	२०१५	२०१६
बहारीन	१४,२०७	१५,६१९	११,९६४
कुवेत	८०,४१९	६६,५४३	७२,४०२
ओम्मान	५१,३१७	८५,०२८	६३,२२४
कतार	७५,९८३	५९,३४०	३०,६१९
सौदी अरेबिया	३,२९,८८२	३,०६,६४२	१,६५,३५६
युएई	२,२४,०३७	२,२५,५१२	१,६३,७३१
कुल	७,७५,८४५	७,५८,६८४	५,०७,२९६
टाइम्स ऑफ इंडिया, २४ जुलै २०१७, पृ.१			

परिशिष्ठ ७

लव्ह जिहाद

सुप्रीम कोर्टाने १६ ऑगस्ट २०१७ रोजी नॅशनल इन्वेस्टिगेशन एजन्सीला लव्ह जिहाद चा सखोल तपास करण्याचा हुकूम दिला आहे. १९९६ सालापासून अशा ५,००० केसेस् केरळात घडल्या असून ह्या सुशिक्षित मुलींना आयसिस त्यांच्या सैनिकांसाठी डॉक्टर, नर्सेस वा सेक्स टॉयीज् म्हणून वापरीत असल्याचा पुरावा पोलिसांना मिळाला आहे. २००९ साली डीजीपीने ही जाहीर तक्रार केली होती पण डाव्या सरकारने ते प्रकरण दडपून टाकले. केरळ हायकोर्टाने असे एक लग्न रद्द केले व त्या दुर्दैवी हिंदू मुलीस तीच्या वडिलांना सोपविण्यास सांगितले. कॉंग्रेस व स.प. ने त्यावर टीका केली व मानवी हक्क आणि मानवी स्वातंत्र्याच्या हक्कांवर ही गदा आहे, असे त्यांचे मागणे आहे. असे मित्र देशातच असल्यावर शत्रुंची गरजच काय?

■ ■ ■


परिशिष्ट ८

तलाक, तलाक आणि तलाक

महंमदापाशी सुरवातीला मूठभर मुसलमान अनुयायी होते. आज अर्धे जग त्याला प्रेषित मानते. त्याच्या भक्तांना उरलेले जग संपूर्ण इस्लाममय *(दार-उल-इस्लाम)* करायचे आहे. हे शक्य होण्यासाठी बायकांवर 'चूल आणि मूल' ठोकून बसविणे गरजेचे बनले. ज्या काळी टेप रेकॉर्डर्स, टीव्हीसारखे घरात करमणूकीचे दुसरे कोणचेच साधन नव्हते, त्यावेळी घरच्याघरी पुरुषांची कामेच्छा पुरी पाडणे व मुलांचे संगोपन करणे हे स्त्रीसाठी योग्य होते. ती गर्भवती असेल तेव्हा पुरुषाचे अडायला नको म्हणून दुसरी, तीही गर्भार असेल तर तिसरी व तीही मोकळी नसेल तर चौथी, अशी पुरुषांना रुचेल, पचेल अशी सवलत देणे धर्म संस्थापक म्हणून महंमदास भाग पडले असावे, तेही समजण्यासासारखे आहे. नव्या व उगवत्या धर्मासाठी ते पोषक होते. अनुयायांची संख्या वाढणे ही काळची गरज होती. धर्म वाढतो तो तलवारीच्या बळावर. युद्धात सैनिक मरणे हेही स्वाभाविक आहे. इस्लाम हा क्षात्र धर्म होता व आहे. सैन्यास सतत ताज्या रक्ताचा पुरवठा पाहिजे. स्त्री हा एकमेव मुले निर्माण करण्याचा कारखाना होता. शत्रू हारला की पुरुष ठार मारायचे व त्याच्या बायकामुलांना बाटवून अल्लाचे सैन्य वाढवायचे, हा आणखी एक नवीन मार्ग त्यांच्यासमोर खुला होता व तो त्यांनी स्वीकारला. जुना कारखाना उत्पादन कमी देऊ लागला किंवा उत्पादन बंद झाले तर काय करायचे? सोपे आहे, दुसरा कारखाना सुरू करायचा. *शो मस्ट गो ऑन.* म्हणून *इंस्टंट तलाका* ची गरज. आजच्या मॅनेजमेंटच्या भाषेत बंद पडलेले युनिट रीप्लेस तर करायला हवेच ना? *प्रॉडक्शन मॅटर्स, इंडिव्हीज्युअल्स् डोंट. बिझिनेस नोज् नो सेंटिमेंटस्, नो इमोशन्स्. बिझिनेस मॅटर्स द मोस्ट. इस्लाम इज अ बिझिनेस ऑफ वॉर्स. इन बिझिनेस द एंड मॅटर्स, नॉट द मीन्स्.*

ही इस्लामची पार्श्वभूमी नीट लक्षांत घेतली तर पुढील पाच घटनांचे रहस्य सहज लक्षांत येईल : (१) नेहरूंनी हिंदू कोड बिल हांसत पास करवून घेतले, मुसलमानांच्या पर्सनल लॉला हात लावायची स्वतंत्र भारतात त्यांची हिंमत झाली नाही. त्यांचीच नाही तर त्यांच्या सर्व वारसांची. (२) १९८० च्या दशकांत शाह बानोने हिंमत दाखवून तीला तलाक देणाऱ्या नवऱ्याविरुद्ध तीने सुप्रीम कोर्टात केस केली. ती जिंकली, पण पंतप्रधान राजीव गांधींनी सुप्रीम कोर्टास खोटे ठरविण्यासाठी घटनेत सुधारणा करवून घेतली! चिडून अरिफ महंमद खान या मंत्र्याने राजीनामा दिला. मतांची लाचारी. तो राजीनामा राजीवने स्वीकारला. (३) लव्ह जिहादचा प्रश्न छान हाताळला, मशिदीत स्त्रियांना गाभाऱ्यात प्रवेश मिळाला, तलाकची समस्या सुटली, रोहिंग्या मुसलमानांना प्रवेश नाकारण्यात आला. आता राहिले चार लग्नांची सवलत, शिक्षणसंस्थेत सर्व सवलती, मदरसातील शिळा शिक्षणक्रम व कुटुंबनियोजनाची सक्ती नाही असे ४-५ डोकेदुखीचे प्रश्न. ते बहुधा पुढील टर्मसाठी. *समल समल के जय्यो, ओ बनजारे, दिल्ली दूर नही है* / (४) हा सुप्रीम कोर्टाचा निकाल आहे. विरोधी पक्षाला मान्य करावेच लागेल. मोदी नामानिराळे ! (५) आता लोकसभेने व राज्यसभेने हे बिल पारित करून त्याचा कायदा (लॉ) बनविला पाहिजे. ते झाले तर २०१९ ला अर्ध्या मुसलमानांची -स्त्रियांची - मोदींना मने व मते १०० टक्के मिळणार व त्यांची दुसरी टर्म नक्की. याचे नाव मोदींची जादू.

■■■


Silk Roads
China plans to spend billions on infrastructure in Pakistan that would help open new trade routes
Spending on projects
SECTOR | EST. COST, IN BILLIONS
Energy $33.79
Road 5.90
Rail 3.69
Mass transit in Lahore 1.60
Gwadar Port 0.66
China-Pakistan fiber optics 0.04
TOTAL 45.69
Proposed road network
ENERGY PROJECTS
Coal mining/power plant
Hydro
Solar
Wind
150 km
Kashgar
CHINA
THE HIMALAYAS
Peshawar
Islamabad
INDIA
Faisalabad
Lahore
AFGHANISTAN
Quetta
PAKISTAN
Gwadar
Karachi
Hyderabad
U.S. civilian aid program in Pakistan since 2009, in billions
Energy $2
Border area rehabilitation 2
Education/health/other 1
TOTAL 5
schools
THE WALL STREET JOURNAL.



वैचारिक ₹४००

9789387042292

www.vijayprakashan.com

भारतात मुसलमानी राज्य आले व भारताची चार वर्णांची आश्रम व्यवस्था लोप पावून एकच वर्ण देशात उरला. त्याचे नाव शूद्र वर्ण. ब्राह्मणाने इतर वर्णांना शिक्षण देऊन समाज जागृत ठेवण्याचे काम सोडले. क्षत्रियाने शत्रूशी लढून त्यास पराभूत करून देश स्वतंत्र व सार्वभौम ठेवण्याचे काम सोडले. व्यापाऱ्याने व्यापार करता करता दानधर्म करून ब्रह्म व क्षात्र वृत्ती जागृत ठेवण्याचे काम सोडले. सारा समाज मुसलमानांचा गुलाम झाला. जो तो नावापुरता ब्राह्मण वा क्षत्रिय वा वैश्य होता. आपले काही चुकते आहे याचाच समाजाला विसर पडला होता. त्याचे स्मरण करून देणारे पहिले संत म्हणजे समर्थ रामदास व पहिले खरेखुरे क्षत्रिय म्हणजे शिवाजी. बाकीचा सारा गुलाम समाज कसा होता त्याचे वर्णन या पुस्तकात वाचायला मिळेल.